

## यशवंतराव चव्हाण

# शब्दाचे सामर्थ्य

संपादक

राम प्रधान

यशवंतराव चव्हाण

# शब्दाचे सामर्थ्य

संपादक

राम प्रधान

# अनुक्रमणिका


मनोगत


## संस्कार


१. संस्कारांचे सामर्थ्य

२. आई विठाई

३. अविस्मरणीय घटना

४. आठवणींचा गुच्छः१

५. बरॅक नं. १२ः विद्वानांच्या सहवासात शाकुंतल ते समाजवाद

६. आठवणींचा गुच्छ : २

७. अखेरचा लढा

८. स्वातंत्र्याचा पहिला दिवस

९. कृष्णाकाठची प्रदक्षिणा

१०. केल्याने देशाटन

११. राजकीय आयुष्याची घोडदौड

१२. संयुक्त महाराष्ट्राचे साध्य : माझी भूमिका

१३. मंगल कलश

१४. मराठी राज्याचे स्वप्न


## व्यक्ती


१५. महात्मा गांधी

१६. राजर्षि शाहू छत्रपती

१७. पंडित जवाहरलाल नेहरू

१८. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

१९. संत नामदेव

२०. कर्मवीर भाऊराव पाटील
२१. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे
२२. डॉ. राजेन्द्रप्रसाद
२३. लाल बहादूर शास्त्री
२४. बाबू जगजीवनराम
२५. काकासाहेब गाडगीळ
२६. दादासाहेब कन्नमवार
२७. नाना पाटील
२८. एस्.एम्.जोशी
२९. वसंतराव नाईक
३०. तुळशीदास जाधव
३१. रत्नाप्पाअण्णा कुंभार
३२. भाऊसाहेब वर्तक
३३. उद्धवराव पाटील
३४. भाऊसाहेब बांदोडकर
३५. यशवंतराव मोहिते
३६. मधुकरराव चौधरी
३७. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्
३८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
३९. कृ.भा.ऊर्फ अण्णासाहेब बाबर
४०. डॉ. धनंजयराव गाडगीळ
४१. किसन वीर
४२. वसंतरावदादा पाटील
४३. नरूभाऊ लिमये

४४. विठ्ठलराव विखे पाटील

४५. दादा उंडाळकर

४६. शंतनुराव किर्लोस्कर

४७. बाबूराव शेटे

४८. धों. म. मोहिते

४९. सुधांशु (ह.न.जोशी)

५०. नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर

५१. वि.स.खांडेकर

५२. सोन्याचा सोहळा कवी यशवंत

५३. वा.सी. बेंद्रे


## विचार


५४. संयुक्त महाराष्ट्राचे साध्य

५५. भारतसेवक महाराष्ट्र

५६. नव्या प्रेरणांना साथ देऊ या

५७. आज आणि उद्या

५८. राष्ट्रीय ऐक्याची समस्या

५९. भारतीय राष्ट्रवादाला आव्हान

६०. आजच्या राजकारणातील माझी भूमिका

६१. लोकसाहित्याच्या भावगंगेत

६२. माझी साहित्याची रूची

६३. बांधिलकी कलम करता येत नाही

६४. आवड-निवड

६५. हिंदीची प्रगती कशी होईल ?

६६. सामाजिक जबाबदारी

६७. लोकशाहीतील प्रशासन

६८. आजचे तरूण व सैनिकी शिक्षण

६९. विकसित आणि अविकसित राष्ट्रांचे आर्थिक संबंध

७०. आर्थिक निरगाठीची उकल

७१. भाषण म्हणजे संवादच

७२. मराठी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य-लढ्यातील कार्य

७३. विदर्भ साहित्य संमेलन
(रौप्यमहोत्सवी संमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगीचे भाषण)

७४. मराठी विज्ञान परिषद (७ डिसेंबर, १९६८)

७५. अखिल भारतीय ४३ वे मराठी नाट्यसंमेलन
(२५ मार्च, १९६१)

७६. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कराड
(६ डिसेंबर, १९७५)

## चिंतन

७७. माझ्या आयुष्यातील आशा-निराशेचे क्षण

७८. काही संस्मरणीय वाढदिवस

७९. भारताची सद्यःस्थिती

८०. जीवनाचे पंचामृत

८१. सातव्या मजल्यावरील चढ

# मनोगत

राजकारण व साहित्य यांच्यामध्ये समन्वय साधणारे यशवंतराव चव्हाण एक दुर्मीळ पुढारी होते. 'राजकारण व साहित्य - दोघांचेही माध्यम शब्द आहे. राजकारणी हे साहित्यिकांचे शब्दबंधू असतात,' असे प्रतिपादन करताना त्यांनी म्हटले, 'शब्दाच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर माझा नितांत विश्वास आहे. नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य शब्द करतात, तसेच, साम्राज्यशक्ती धुळीला मिळविण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दांत आहे. कल्पना, विचार आणि शब्द ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे.'

**'शब्दाचे सामर्थ्य'** या ग्रंथाची प्रेरणा वरील विचार आणि शब्दांत प्रतिबिंबित झालेली आहे. सुदैवाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानाचा विश्वस्त म्हणून त्यांची कागदपत्रे व लिखाण तपासणीचे काम काही वर्षांपूर्वी मी स्वीकारले. त्यात यशवंतरावांचे अनेक मूळ लेख पाहावयास मिळाले. बरेच लेख केसरी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स व अनेक दिवाळी अंकांत वेळोवेळी प्रसिद्ध झाले होते. 'कृष्णाकाठ' व 'ऋणानुबंध' या आत्मचरित्रात्मक पुस्तकांत यशवंतरावांनी बऱ्याच लेखांचा उपयोग केला आहे. याव्यतिरिक्त अनेक मराठी पुस्तकांसाठी त्यांनी प्रस्तावना लिहिल्या. प्रसंगी संदेश पाठविले व लेख लिहिले. या सर्व लिखित शब्दांबरोबर त्यांनी अनेक प्रसंगी केलेली भाषणेही सुदैवाने लिखित स्वरूपात वाचावयास मिळाली. या सर्वांतून यशवंतराव चव्हाण एक विचारवंत राजकीय नेता, असामान्य साहित्यिक आणि शब्दांचा भोक्ता, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व माझ्यासमोर उभे राहिले. या ग्रंथात ते व्यक्तिमत्त्व मी सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

यशवंतराव चव्हाण म्हणजे एक देशभक्त, मुत्सद्दी, व्यवहारी राजकारणी व महाराष्ट्राचे शिल्पकार अशी ओळख सामान्यतः महाराष्ट्राच्या नवीन पिढीसमोर आहे. मागील पिढीतील ज्या लोकांचा यशवंतरावांशी संबंध आला अथवा त्यांना त्यांचे निरनिराळ्या क्षेत्रांतील कार्य पाहावयास मिळाले, तसेच, प्रत्यक्ष त्यांच्या तोंडातून त्यांचे उत्स्फूर्त विचार ऐकावयास मिळाले, त्यांनी यशवंतरावांचे असंख्य गुण अनुभवले. यशवंतरावांच्या मृत्यूनंतर कित्येक

मान्यवर व्यक्तींनी त्यांच्याविषयी लिहिताना त्यांनी पाहिलेल्या व अनुभवलेल्या अशा कित्येक पैलूंविषयी लिहिले. त्यामध्ये समाविष्ट असलेले काही पैलू म्हणजे, रसिक मन, विचारवंत, गुणग्राही, सौजन्यमूर्ती, दिलदार मित्र, लोकांच्या प्रेमात गुरफटलेला नेता, समर्थ, लोकशाहीचे पुरस्कर्ते, थोर चारित्र्यसंपन्न समाजसेवक, अभिरूचिसंपन्न कलारसिक, सुसंस्कृत राजकारणी, ओजस्वी वक्ता, सह्याद्रीचा प्रतिभासंपन्न भूमिपूत्र, मराठी मानाचा तुरा, इ.इ. परंतु माझ्या मते भावी पिढीच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे कोडे म्हणजे यशवंतराव बळवंतराव चव्हाण ही असामान्य व्यक्ती कशी निर्माण झाली? कोणते संस्कार व कोणत्या व्यक्तींनी त्यांची बुद्धी, मन व विचार यांची जडणघडण केली ? व त्यांनी महाराष्ट्राच्या पुढील पिढीसाठी काय वारसा ठेवला आहे ? या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांच्याच लिखाणांचे उत्खनन करून शोधावी, या भावनेने या ग्रंथाची योजना हाती घेऊन त्याचे संपादन केले आहे.

या ग्रंथातील प्रत्येक वाक्य, विचार व भाषशैली यशवंतराव चव्हाणांची आहे. त्याची रचना करताना यशवंतरावांची ओळख महाराष्ट्राच्या नवीन व पुढील पिढीला उपयुक्त स्वरूपात राहावी, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवण्यात आला आहे. त्या अनुषंगाने यशवंतरावांच्या लिखाणाचे चार भाग केले आहेत. एकः **संस्कार,** दुसराः **व्यक्ती,** तिसराः **विचार** व चौथाः **चिंतन.**

पहिल्या भागात यशवंतराव चव्हाणांवर झालेले संस्कार दिसून येतील. तसेच, त्यांची जडणघडण कशी झाली, याचा उलगडा होईल, अशी माझी अपेक्षा आहे. कारण मला परिचित यशवंतराव हे एक तेजस्वी हिरकणीप्रमाणे होते. हिरकणीची निर्मिती एका दगडापासून होते व दगडाची जडणघडण योग्य तऱ्हेने केल्यानंतरच तो दगड हिरकणी म्हणून आपल्यासमोर येतो. या सह्याद्रीच्या काळ्या दगडाची निर्मिती कशी झाली, हे पाहण्यासाठी मी काही वर्षांपूर्वी देवराष्ट्रे गावी गेलो. कराडपासून बावीस-तेवीस कि.मी. अंतरावरच्या सागरेश्वराच्या सान्निध्यात असलेल्या ह्या छोटयाशा गावात त्यांचा जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांच्या आईंनी व आजीनं यशवंतरावांना व त्यांच्या भावां-बहिणीला वाढवले, शिक्षण दिले. या सह्याद्रीतील दगडाची खरी जडणघडण व संस्कार केले, ते त्यांच्या आईनेच. याचे वर्णन यशवंतरावांनी 'ऋणानुबंधा'मध्ये केले आहे. **'संस्कारांचे सामर्थ्य'** या लेखाची सुरूवात करतानाच त्यांनी म्हटले आहे की, 'सिंहावलोकन करीत कर्तृत्वाची वाटचाल करताना मी एक संस्कारक्षम माणूस आहे.... मी माझ्या आईच्या अवतीभोवती

वाढलो. साक्षात प्रेम, असे जिच्याकडे पाहून म्हणावे, अशी माझी आई आहे. तिची अन् शाळेची ओळख नसेलही, पण तिचे कर्तृत्व दांडगे आहे. खऱ्या अर्थाने ती सुमाता आहे. आईच्या प्रेमाने वाढविलेली, फार मोठी झालेली माणसे मी आजही जेव्हा पाहतो, तेव्हा मला माझी आई अधिक समजते. माझ्या कुटुंबात हीच खरी श्रीमंती आहे. श्रीमंतीने मला मनाचा राजा बनायला शिकविले.' या संस्कारांची छाप यशवंतरावांच्या सतेज चेहऱ्यावर, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सदैव दिसत असे.

त्यांच्या मनावर पुढील संस्कार कराड येथील टिळक हायस्कूलमध्ये झाले. लोकमान्य टिळकांप्रमाणे यशवंतरावांच्या मनातही प्रखर ध्येयवाद, देशप्रेम, देशसेवा, स्वार्थत्याग व जिद्द या भावना पेरल्या गेल्या. त्याचबरोबर महात्मा फुले, तसेच, त्यांचे बंधू कै. गणपतराव यांचे सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याच्या कार्यामुळे यशवंतरावांना एक नवीन दृष्टी मिळाली. एम्.एन्. रॉय यांच्याशी संबंध व त्यांची विचारसरणी यांमुळे कोणत्याही राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक प्रश्नांचे सूक्ष्म दृष्टीने पृथक्करण करण्याची प्रवृत्ती त्यांच्या मनात जागृत झाली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर राजकीय सत्तेमध्ये त्यांनी जेव्हा पदार्पण केले, तेव्हा आपली स्वतःची व आपल्या मनाची एक दृष्टी स्पष्ट होती. सामाजिक विषमता काय, लहान मोलमजुरांचे, शेतकऱ्यांचे प्रश्न काय; शिक्षणाअभावी व दारिद्र्यामुळे बहुजन समाजातील मुले व मुली समाजात कधी वर येऊ शकत नाहीत, हे यशवंतरावांनी देवराष्ट्रे व कराड येथे पाहिले होते. राजकीय जीवनाला सुरूवात व तुरूंगवास याचाही यशवंतरावांच्या संस्कारांत महत्त्वाचा वाटा आहे. १९३० सालात त्यांनी राजकारणात उडी घेतली व तुरूंगवासही भोगला. १९४० साली पुण्यातील येरवडा जेलमध्ये झालेल्या तुरूंगवासात त्यांना मौलिक बौद्धिक शिक्षण मिळाले. त्या शिक्षणाचे वर्णन 'बरॅक नं. १२ : विद्वानांच्या सहवासातः शाकुंतल ते समाजवाद' या लेखात सापडते. कारावासात काढलेले आयुष्य, निरनिराळ्या राजकीय शास्त्रांचे मनन, चर्चा व चिंतन यांविषयी त्यांच्या शब्दांत म्हणावयाचे, तर '१९४० पासूनची वैचारिक बैठक, राजकीय प्रवासातील माझी कायमची सोबत झाली आहे. ह्या विचारमंथनात, आर्यभूषण भवनाच्या शेजारच्या गुडलक रेस्टॉरंटचाही भाग आहे. १९३९ साली लॉ कॉलेजला असताना गुडलकमध्ये पिवळा हत्ती सिगारेटचा धूर सोडीत व तो पाहत मी तासन् तास काढी.' या विचारमंथनातूनच, तसेच, १९४२ च्या स्वातंत्र्य-लढ्यात सातारा जिल्ह्यातील पत्री सरकारच्या

कार्यात सहभागी होऊनही यशवंतरावांची लोकशाहीवरील निष्ठा व वैचारिक बैठक एकापरीने पक्की झाली. त्याचे उदाहरण म्हणजे १९५२ साली ते म्हणाले की, 'गरीब मनात नव्या आकांक्षा उत्पन्न करून, त्यांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजी त्यांच्यांत असंतोषच पसरविण्याचा प्रयत्न झाला, तर रात्री त्यांचे लक्ष त्या श्रीमंतांच्या तिजोरीकडे जाईल, इतकेच. पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा हा पुंजीपतीच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून, तो आकाशातील ढगांत आहे. त्या ढगांतून खाली पडणाऱ्या जलधारांत आहे. त्या पाण्याच्या प्रवाहरूपी नदीत आहे. नदीच्या दुकाठांस मिळणाऱ्या काळ्या जमिनीत आहे. त्याच जमिनीतील खनिज संपत्तीत आहे, त्याच खनिज संपत्तीद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामग्रीत आहे, इतकेच नव्हे, तर त्या सर्वांना एका सूत्रात बांधणाऱ्या मानवाच्या मनगटात आहे. असे जर ह्या गरीब जनतेला पटवून देऊन, त्यांच्यांत सर्जन-शक्ती निर्माण करून कार्यप्रवण केले, तर आपले सर्व प्रश्न सुटतील व त्या सुटण्यातच भारतीय लोकशाहीचे भवितव्य सामावलेले आहे.' सहा-सात वाक्ये, पण त्यांत कितीतरी विचार सामावलेले आहेत. त्यांना हे विचार कुठून सुचले ?

थोडक्यात, यशवंतरावांची आई, कराड येथील टिळक हायस्कूलमधील विद्यार्जन, तसेच, राजकीय प्रवासातील तुरूंगवास या संस्काराने यशवंतरावांच्या मनाची जडणघडण केली. हे संस्कार काय व कसे झाले, हे पहिल्या भागात सादर करण्यात आले आहे.

दुसरा भाग व्यक्तींविषयी आहे. यशवंतरावांची वृत्ती लोकसंग्रहाची होती. त्यामुळे निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेक व्यक्तींशी त्यांचे मैत्रीचे व घनिष्ठ संबंध होते. त्यांमध्ये जसे राजकारणी होते, तसेच, समाजसेवक, पत्रकार, उद्योगपती, नट-नट्या, निरनिराळ्या क्षेत्रांतील लेखक, साहित्यिक, कलाकार होते. त्याचबरोबर ज्या मातीतून यशवंतराव निर्माण झाले, ज्या कृष्णा-कोयना परिसरात स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी झेप घेतली, त्या भागात, प्रत्येक गावात अनेक व्यक्तींशी त्यांचे प्रेमाचे घनिष्ठ संबंध होते. आयुष्यभर यशवंतरावांनी ते संबंध जोपासून ठेवले.

वरील व्यक्तींपैकी काही निवडक व्यक्तींविषयी त्यांनी जे लिहिले आहे, त्याचे संकलन या ग्रंथात केले आहे. त्यांत प्रामुख्याने यशवंतरावांची दैवते महात्मा गांधी, राजर्षि शाहू छत्रपती, पंडित जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक आहेत. तसेच शिक्षण व सामाजिक क्षेत्रात ज्यांनी त्यांची जडणघडण

केली, असे कर्मवीर भाऊराव पाटील व महर्षि विठ्ठल रामजी शिंदे आहेत. त्यांच्या परिसरातील, ज्यांचा राजकीय आयुष्यात घनिष्ठ संबंध आला, असे नाना पाटील, रत्नाप्पा कुंभार, किसन वीर, वसंतदादा पाटील, नरूभाऊ लिमये आहेत व नाटक आणि साहित्य क्षेत्रांत काकासाहेब खाडिलकर, वि.स. खांडेकर, कवी यशवंत वगैरे आहेत. कितीतरी अधिक व्यक्तींविषयी त्यांनी निरनिराळ्या प्रसंगी लिहिले आहे किंवा त्यांच्याविषयी ते बोलले आहेत. कित्येक साहित्यिकांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहिताना त्यांनी त्या साहित्यिकांशी असलेला संबंध, तसेच, त्यांच्या साहित्याचे विश्लेषण केलेले आहे. हा प्रस्तावना स्वरूपात असलेला मौलिक ठेवा श्री. विठ्ठलराव पाटील यांनी आपल्या पुस्तकात नुकताच प्रसिद्ध केला आहे.

यशवंतरावांची श्रद्धास्थाने सोडली, तर बऱ्याच इतर व्यक्तींशी त्यांचा जवळचा संबंध निरनिराळ्या प्रसंगी व निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत आला होता. त्यांतील काही त्यांचे आयुष्यभर जिवलग मित्र राहिले, तर काहीजण यशवंतरावांच्या पडत्या काळात त्यांच्यापासून दूरही झाले. त्यांनीही काही व्यक्तींना व राजकीय पुढाऱ्यांना न दुखवता दूर केले. ज्यांना ते मित्र म्हणून मानीत, त्यांच्या सोबतीत राजकारण व आपले पद विसरून यशवंतराव आनंदाचे क्षण भोगत असत. आपल्या सोबत्यांविषयी त्यांनी म्हटले आहे की, 'माणसाचे जीवन फुलवयाचे असेल, तर त्याला सोबत्यांची सांगड पाहिजे. माझा तरी तो अनुभव आहे. माझ्या आयुष्यात जे काही घडल्याचे दिसत असेल, ते माझ्या सोबत्यांनी घडविले आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे. प्रत्येक मनुष्य आपले स्वतःचे आयुष्य घडवितो, असे मी तरी मानीत नाही.'

या व्यक्तिविषयक विभागासाठी अनेक व्यक्तींचा समावेश करावा, असे प्रथमदर्शनी वाटले; परंतु एकंदर पुस्तकाची रचना, तसेच चार भागांचा समतोल व एकूण पानांची संख्या या सर्वांचा विचार केल्यानंतर काही निवडक व्यक्तींचाच या विभागात समावेश करावा लागला. त्यामुळे यशवंतरावांनी ज्यांच्याविषयी काही लिहिले आहे, अशा कित्येक व्यक्तींचा समावेश करता आला नाही, याची मला तीव्र जाणीव आहे.

तिसरा भाग **विचारांचा.** यशवंतरावांविषयी लिहिताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले होते, 'श्री. यशवंतरावांचे विचार पश्चिमेकडून वाहणारे सह्याद्रीचे वारे आहेत; हे विचार युगान्तराचा संदेश देत असतात. यशवंतरावांच्या मनोभूमिकेवर मूळ भारतीय संस्कृतीचा व व्यापक अशा

भारतीय संतांच्या भावभक्तिपूर्ण विचारसरणीचा खोल संस्कार झाला आहे, हे खरे आहे...' भारतीय लोकशाही क्रांतीच्या आणि भारतीय परिस्थितीच्या संदर्भात वस्तुवादी दृष्टिकोनातून त्यांनी चिंतन केले. या त्यांच्या चिंतनाचे सार त्यांच्या 'सह्याद्रीचे वारे' व 'युगान्तर' या भाषणसंग्रहांत प्रतिबिंबित झाले आहे. यशवंतरावांनी निरनिराळ्या प्रसंगी केलेली भाषणे त्यांच्या विचारांचा, तसेच, मराठी भाषेचा अमूल्य ठेवा आहे, असे माझे मत आहे. त्यांचे विचार किती चौफेर व परिपक्व होते, याचे दर्शन घडवण्यासाठी त्यांनी केलेली काही भाषणे व निवडक लेख या विभागात आहेत. त्यांत साहित्य संमेलनात, नाट्य संमेलनात, तसेच, विज्ञान परिषदेत त्यांनी सादर केलेले विचारही आहेत. त्यांच्या भाषणशैलीत मांडलेल्या विचारांमुळेच त्यांना पुढील पिढीतील मराठी वाचक विचाराने परिपक्व झालेला नेता म्हणून, तसेच विचारवंत राजकीय पुरूष म्हणून ओळखतील. त्यांच्या विचारांचा वारसा अनेक क्षेत्रांतील सामान्य व्यक्तींसाठी, तसेच, विद्वानांसाठी एक अमाप खजिना आहे, यात शंका नाही.

शेवटी चौथ्या **चिंतन** या भागात यशवंतरावांनी आपल्या जीवनाचे केलेले सिंहावलोकन, तसेच, दृष्टिक्षेप समाविष्ट आहे. त्यात 'आपल्या आयुष्यातील आशा-निराशेचे क्षण', 'भारताची सद्यःस्थिती', 'जीवनाचे पंचामृत', 'सातव्या मजल्यावरील चढ' हे लेख समाविष्ट केले आहेत.

काही लेख भाषणाच्या स्वरूपात असल्यामुळे, संपादन करताना सुटसुटीत स्वरूपात सादर करण्यासाठी योग्य ती पुनर्रचना करणे आवश्यक होते व तसे करण्यात आले आहे.

यशवंतरावांचे साहित्य व अनेक साहित्यिकांशी संबंध हे त्यांच्या जीवनाचे एक महत्त्वाचे अंग होते. ते पुस्तकप्रेमी होते व अनेक विषयांवरील ग्रंथ ते सतत वाचत असत व त्यांवर चिंतन करीत असत. त्यांनी जमविलेले दहा हजारांहून अधिक ग्रंथ कराड येथील वेणूताई स्मारक ग्रंथालयात उपलब्ध आहेत. ते पाहिले, म्हणजे यशवंतरावांची चतुरस्र बुद्धिमत्ता व राजकीय प्रवासाविषयी त्यांनी वेळोवेळी लिहिलेले विचार यांचा उगम कुठे आहे, हे समजते. त्यासंबंधी ते म्हणाले, 'ग्रंथवाचनाने माणूस मोठा झाला नाही, तरी शहाणा जरूर होतो.' जरा अवखळपणे पुढे म्हणाले, 'जसे सर्व मोठे लोक शहाणे नसतात, त्याचप्रमाणे सर्व शहाणे लोक मोठे होऊ शकत नाहीत.'

राजकारण व साहित्य यांच्यामध्ये समन्वय साधणारे यशवंतराव हे एक असामान्य व्यक्ती होते, यात शंका नाही. साहित्य व शब्दांवरील प्रेम,

त्याविषयी आपले विचार त्यांनी निरनिराळ्या प्रसंगांत मांडले आहेत. त्यावरून साहित्यिक यशवंतराव याविषयी बोध सहज उपलब्ध आहे. त्यांच्याच शब्दांत, 'साहित्य हे एक सामर्थ्य आहे. कारण ते विचार देणारे आहे, बंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही, ते सामर्थ्य विचारांतून येते, संस्कारांतून येते आणि हे काम साहित्यामार्फत घडते.' परंतु केवळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य नाही, असे त्यांचे मत होते. 'जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कुणी घालू शकेल, असे मला वाटत नाही', असे ते एका भाषणात म्हणाले होते.

यशवंतरावांच्या भाषाशैलीकडे पाहता, असे वाटते की, एक साहित्यिक म्हणून यशवंतरावांनी जगावयाचे ठरविले असते, तर मराठी भाषा कितीतरी पटीने समृद्ध झाली असती, 'यशवंतरावः एक साहित्यिक' या शीर्षकाखाली दि. १ मे १९७५ च्या 'समर्थ' साप्ताहिकात लिहिलेल्या लेखात ना.सी. फडके यांनी लिहिले होते की, 'यशवंतराव मला अधिक प्रिय वाटतात, ते साहित्यिक आणि वक्ता या दोन्ही नात्यांनी.... यशवंतरावांची प्रभावी वाणी जशी स्पृहणीय आहे, तसाच, त्यांच्या लेखणीचा संचार कौतुकास्पद आहे. नेता आणि शासनकर्ता अशी जोड भूमिका यशवंतरावांना करावी लागत असल्याने त्यांच्या वाणीचा विलास नित्य होत असतो. त्यामानाने त्यांचे लेखन अधूनमधून क्वचित वाचावयास मिळते. परंतु जेव्हा जेव्हा ते लेखणी उचलतात, तेव्हा तेव्हा अशा काही उत्कृष्ट दर्जाचं साहित्य त्यांची लेखणी निर्माण करून जाते, की वाचक थक्क होऊन जातो. राजकारण व राज्यकारभार यांची धुरा यशवंतरावांनी खांद्यांवर घेतली आहे खरी, परंतु त्यांच्या मनाला खरे आकर्षण आहे साहित्याचे नि कलांचे... यशवंतरावांचे पडलेले भाषण जसे कधी कुणी ऐकलेले नाही, त्याचप्रमाणे फसलेला लेख मी कधी वाचलेला नाही. क्वचित प्रसंगी त्यांची लेखनाची पातळी इतक्या उंचीवर गेलेली असते, की ती पाहून मी स्तिमित होतो.'

भाषण कसे व किती लांब करावे, याविषयी यशवंतरावांनी आपले विचार 'भाषा म्हणजे संवादच' या लेखात मांडले होते. तो लेख आत्मविश्लेषणात्मक असल्यामुळे या ग्रंथात समाविष्ट केला आहे. विद्यार्थिदशेपासून त्यांनी भाषणे केली. त्यांच्याच शब्दांत म्हणावयाचे, तरः 'आजच्या काळात माझी होणारी वेगवेगळी भाषणे यांचे तीन-चार प्रकार करावे लागतील. राजकीय

विषयावरची पक्षासाठी केलेली भाषणे, साहित्यविषयक सभांतून केलेली भाषणे व लोकसभेमध्ये केलेली भाषणे अशा प्रकारचे भाषणांचे वेगवेगळे गट होतील. त्या प्रत्येकाचा उद्देश वेगळा असतो व त्याच्यासाठी स्वीकारल्या जाणाऱ्या शैलीतही फरक असतो. आता शैलीत फरक आहे, असे जरी मी म्हणत असलो, तरी या वेगवेगळ्या शैलींत भाषण करणारा मी एकच माणूस असल्यामुळे माझ्यामधली शैली सर्वच ठिकाणी असते, परंतु विषय मांडण्याच्या पद्धतीत फरक असतो.'

आपले भाषण, त्यामधील मुद्दे, आपल्या भाषणाच्या विषयावरील वाचन व चिंतन जसे त्यांच्या भाषणात जाणवत असे, तसेच, त्यांनी आयुष्यभर केलेल्या विविध वाचनाचा संग्रह हेच त्यांचे शक्तिस्थान आहे, हे श्रोत्यांना सहज जाणवत असे. त्यांच्या भाषणात विषयाची मांडणी, नर्म विनोद आणि सुटसुटीत लोकशिक्षण भाषा ही महत्त्वाची अंगे असत, सामान्यतः ते अर्ध्या तासाहून अधिक बोलत नसत. आपल्या मितभाषेविषयी 'नरूभाऊ लिमये- एक मोलाची मैत्री' या लेखात ते लिहितातः 'सामान्यतः मी कमी बोलतो, असा प्रवाद आहे. त्यात काही सत्यांशही आहे. वस्तुस्थितीचा विपर्यास होऊ लागला, माणसे राखण्यापेक्षा दुखावली जातील, असे वाटू लागले, कार्यसिद्धीऐवजी कार्यनाश होईल, अशी शंका येऊ लागली की, शब्दांवरचा माझा विश्वास फार फार कमी होतो. माझ्या कमी बोलण्यालिहिण्याचे हे एक कारण असू शकेल.'

त्यामुळे ते भाषा आणि भाषाशैलीचा कर्तृत्वसंपन्नपणे उपयोग करीत. मराठवाड्यामध्ये झालेल्या साहित्य संमेलनात त्यांनी सांगितले की, 'माणसाने भाषा निर्माण केली; आता भाषेला माणसे निर्माण करावी लागणार आहेत.' राजकीय असो अथवा सामाजिक असो, यशवंतरावांच्या प्रत्येक भाषणात त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट दिसतो.

या ग्रंथात समाविष्ट केलेली त्यांची भाषणे फारच थोडी व निवडक आहेत, असे म्हणावे लागेल. राजकीय नेता म्हणून जगलेल्या आपल्या चाळीस वर्षांच्या जीवनात त्यांनी अनेक प्रसंगी अनेक भाषणे केली आणि उपलब्ध भाषणांतून काही भाषणे निवडण्याचे काम संपादक म्हणून मला करावे लागले. ते करताना इतर अनेक चांगली भाषणे निवडता आली असती, याची मला जाणीव आहे. परंतु एकंदर या ग्रंथाच्या रचनेच्या दृष्टीने मला तसे करता आले नाही, याचा खेद वाटतो.

शेवटी या चार विभागांचे सार म्हणजे यशवंतरावांचे विचार व त्यांना लाभलेले संस्कार, राजकीय आयुष्यातील अनुभव, सहकारी व मित्र यांची सोबत, तसेच त्यांनी केलेले विचारमंथन हे मराठी भाषेत आणि महाराष्ट्रातील नवीन पिढीसाठी एक मार्गदर्शक ठरतील, अशी माझी भावना आहे. त्यांच्याच शब्दांत 'वर्तमान काळ समजण्यासाठी इतिहासाचे चिंतन करावे लागते. कारण वर्तमान काळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल, तर वर्तमान काळाशी तो फारसा झगडू शकणार नाही.' भूतकाळाचे महत्त्व समजणाऱ्या नेत्यांनी भविष्याकडे दृष्टी ठेवून महाराष्ट्राच्या स्थापनेच्या प्रसंगी महाराष्ट्राला 'जगन्नाथाचा रथ' अशी उपमा देत असताना ते म्हणाले, 'महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे... त्या सफरीतील आम्ही प्रवासी आहोत. ही सफर तुम्हां-आम्हांला पुरी करावयाची आहे... ती सफर आज मला माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे... ती लांबची सफर आहे... पण ती पुरी केलीच पाहिजे... कारण त्यांत जनतेचे कल्याण आहे...' त्यांचे हे शब्द महाराष्ट्राला सदैव मार्गदर्शक ठरतील, असे मी म्हणतो.

या ग्रंथाच्या संपादनासाठी गेली चार-पाच वर्षे मला ज्यांनी मदत केली व ज्यामुळे हे साध्य होत आहे, त्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे योग्य होईल. कराड येथील वेणूताई चव्हाण स्मारकाचे ग्रंथपाल विठ्ठलराव पाटील हे यशवंतराव चव्हाण प्रेमी व त्यांच्या कार्याचे गाढे अभ्यासक म्हणून समजले जातात. त्यांनी अत्यंत परिश्रम घेऊन, निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेले लेख मला उपलब्ध करून दिले व संपादनात बहुमोल मदत केली.

त्याचप्रमाणे 'अमेय प्रकाशना'चे हे तरूण प्रकाशक उल्हास लाटकर यांनी अत्यंत समंजसपणे, खर्चाचा विचार न करता या ग्रंथाच्या छपाईसाठी जे कष्ट केले, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

तसेच, माझे मित्र श्री. बाबूराव शिर्के यांनी आपले स्वीय सहायक चंद्रकांत कदम यांची सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे हा ग्रंथ संपादित होत आहे, याची मला जाणीव आहे. त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

या ग्रंथाचे खरे लेखक कै. यशवंतराव चव्हाण आहेत. त्यामुळे या ग्रंथाचे सर्व हक्क, तसेच रॉयल्टीचे हक्क सौ. वेणूताई चव्हाण स्मारक, पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांना प्रदान करीत आहे. यास मान्यता दिल्याबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानाचे अध्यक्ष शरद पवार व त्यांचे इतर सहकारी

यांचा मी आभारी आहे.

हा ग्रंथ संपादन करताना मला एक विशेष समाधान होत आहे. ज्या यशवंतरावांनी आपल्या हयातीतील पस्तीस-चाळीस वर्षे मला ज्या मैत्रीपूर्ण व बंधुत्वाच्या भावनेने प्रेम अणि विश्वास दिला, त्यांच्याविषयी असलेला माझ्या मनातील नितांत आदर व कृतज्ञता मी या ग्रंथाच्या स्वरूपात सादर करीत आहे. अगोदर म्हटल्याप्रमाणे हा ग्रंथ कै. यशवंतराव यांचा आहे. यातील जवळजवळ प्रत्येक शब्द त्यांनी बोललेला किंवा लिहिलेला आहे, हे मी स्पष्ट करू इच्छितो. या ग्रंथाच्या स्वरूपात साहित्यिक म्हणून यशवंतराव चव्हाण मराठी भाषकांसाठी अमर राहतील, मी माझी भावना आहे.

गुढीपाडवा
५ एप्रिल, २००० **राम प्रधान**



# संस्कार

# १... संस्कारांचे सामर्थ्य

सिंहावलोकन करीत कर्तृत्वाची वाटचाल करणारा मी एक संस्कारक्षम माणूस आहे. सभोवतालच्या परिस्थितीशी जुळते घेत मी आलो आणि पुढे चाललो आहे. काही करावयाचे, असे ठरवून, एखाद्या मुशीत बांधून घेण्याचा 'जाणता' प्रयत्न मी कधी केलेला नाही. माझ्यात काही वेगळीक आहे, असे मला विद्यार्थिदशेत असतानाही कधी वाटले नाही. एवढे मात्र खरे की, मी वयाने वाढत असताना, आपण एका सामान्य कुटुंबातील आहोत, याची जाणीव व्हावी, असे काही माझ्या अवतीभोवती सतत घडत होते. जाणिवेने मी ते न्याहाळत होतो; पण त्याची मला खंत वाटावी, असे वातावरणच माझ्याभोवती नव्हते.

कारण असे की, मी माझ्या आईच्या अवतीभोवती वाढलो. साक्षात प्रेम असे जिच्याकडे पाहून म्हणावे, अशी माझी आई आहे. तिची अन् शाळेची ओळख नसेलही; पण तिचे कर्तृत्व दांडगे आहे. खऱ्या अर्थाने ती सुमाता आहे. आईच्या प्रेमाने वाढविलेली फार मोठी झालेली माणसे मी आजही जेव्हा पाहतो, तेव्हा मला माझी आई अधिक समजते. माझ्या कुटुंबात हीच खरी श्रीमंती आहे. या श्रीमंतीने मला मनाचा राजा बनायला शिकविले. 'मन थोडे मोठे कर' असे कुंतीने धर्मराजाच्या एका प्रश्नाला, म्हणे, उत्तर दिले आहे. आईने आम्हां भावंडांची मने अशीच मोठी बनविली. मनाचा कोतेपणा हा अनेक दुःखांचे मूळ असू शकतो, याचे धडे आईने मला प्रत्यक्ष दिले नसतीलही; परंतु तिच्या कृतीतून मी ते सतत टिपले आहेत. परिस्थितीने गांगरून जायचे नाही, हा पहिला धडा आईने माझ्याकडून गिरविला, तो अगदी लहानपणी. त्या वेळी आम्ही कराडला होतो. घरची अतिशय गरिबी. वडील लहानपणीच वारलेले. घरात मिळवते कोणी नाही. हातातोंडाची गाठ पडावी, एवढेही साधन जवळ नाही आणि त्यातून आई आम्हांला वाढवीत होती. नकळत माझ्यात एक जिद्द निर्माण करीत होती. शाळेतील शिक्षण याच अवस्थेत संपले. मुले दुबळी आहेत, याची आईला नेहमी खंत वाटत असे. मुलांना कोणी पाठीराखा नाही, म्हणून तिचे मन तुटत होते, पण तिने कधी भासू दिले नाही. तथापि, आम्ही

मुले परावलंबी होणार नाही, याचीही काळजी होती. त्या लहान वयात मला ते थोडे-फार समजत होते; पण त्यावरचा उपाय मात्र उमजत नव्हता, आणि तेही खरेच आहे. थोरांचे उलगडे लहानांना होऊ लागले, तर जगातले बाल्यच नाहीसे होईल, नियतीची तशी योजना नाही. नियतीला हे जग केवळ सुखीही ठेवायचे नाही आणि दुःखीही बनवायचे नाही. श्रीखंडाच्या जेवणातही हिरव्या मिरचीची चटणी लागतेच, तरच त्या जेवणाला रूची येते आणि सुखाचे श्रीखंड पोटभर खाता येते; पण त्या वेळी माझ्या पानात काहीच नव्हते. मोकळ्या ताटावर बसून भूक भागविण्याची आईची कला मला अवगत नव्हती.

मनाच्या कोंडवाड्यातून बाहेर पडावे, धडपड करावी, शिकावे, आईचे ओझे हलके करावे, असे नेहमी वाटे, परंतु जागच्या जागी पंख फडफडविण्याव्यतिरिक्त मी काही करू शकत नव्हतो. परिस्थितीचे कुंपण चारी बाजूंनी उभे होते. एरवी कुंपणात शिरणाऱ्यांना काटे बोचतात, ते बोचावेत, अशीच ती व्यवस्था असते. कुंपणाच्या आत जे असेल, ते स्थिर राहावे, अशासाठी ती योजना असते; परंतु मला कुंपणात स्थिर व्हावयाचे नव्हते. तशी स्थितीच नव्हती, हीच खरी अडचण होती. परिस्थितीच्या कुंपणातून बाहेर पडताना अंगाला काटे बोचतात, अंग फाटून निघते, याचाही अनुभव माझ्या गाठी नव्हता. आहे त्या कोंडीतून बाहेर निसटायचे, एवढेच माझ्यासमोर होते.

मी जेव्हा प्रत्यक्षात बाहेरच्या जगात पाय ठेवला, त्या वेळी मी अधिक दुबळा बनतो, की काय, असे मला वाटू लागले. बाहेरच्या समाजातल्या ज्या वातावरणाकडे मी पाहत होतो, ते मला शुद्ध, स्वच्छ वाटत नव्हते. हिमालयाच्या अंगावरून स्फटिकशुभ्र पाण्याचे झरे स्वच्छंद धावत असतात. श्रमिक पथिकांचे लक्ष ते झरे तेव्हाच वेधून घेतात. तहानलेला पथिक त्याचा मनमुराद आस्वादही घेतो; परंतु नंतर मात्र त्याच्या अंगाला दाह होऊ लागतो. असे सांगतात की, तेथील अनेक झरे जे वाहत येतात, त्यांच्या मार्गात विषारी वृक्ष असतात. त्या वृक्षांच्या मुळांतील विष त्या पाण्याबरोबर नेहमीच वाहत असते आणि ते शुभ्र जीवन अनेक पथिकांचा जीवनप्रवाह गोठविण्यास कारणीभूत ठरते. त्या स्वच्छंदी झऱ्यासही त्याची कल्पना नसते, तो आपला वाहतच असतो.

आमच्याकडील समाजपुरूषाच्या मनातही विचारांचे जे झरे पाझरत होते, ते मला काहीसे असेच वाटत होते. परिस्थितीची कोंडी फोडण्यासाठी मी बाहेर पडत होतो खरा; परंतु दुसरी एक वैचारिक कोंडी माझ्याभोवती तयार होऊ पाहत होती. आमच्या भागात त्यावेळी ब्राह्मणेतर चळवळीची एक वावटळ

उठली होती. घरात आणि घराबाहेरचे वातावरण या चळवळीने वेढलेले होते. आजूबाजूला मी जे पाहत होतो, ऐकत होतो, अनुभवीत होतो, ते काही प्रसन्न नव्हते. सत्यशोधकांचे मी जे वाचीत होतो, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे असे दुसरे मोठे पवित्र काही आहे; आणि ते समाजासमोर हिरिरीने का ठेवले जात नाही, असेही वाटत होते. त्या वेळचा काळ मोठा वैचारिक गोंधळाचा होता आणि त्या सर्वांमधून मी मोकळा कसा राहिलो, याचे मला कधी कधी आश्चर्य वाटते. ब्राह्मणेतर चळवळीचे विशेष असे आकर्षण माझ्यावर फार काळ टिकले नाही. ते का टिकले नाही, याचे उत्तर देणे हे मला आजही बुचकळ्यात टाकते; परंतु माझ्या मनाचे त्याचे जे एक कारण असू शकेल, ते म्हणजे अवतीभवती विचारांची वेटोळी पडलेली असतानाही मी त्याशिवाय वेगळे असे काही वाचीत होतो.

मी शाळेत असताना सत्यशोधक चळवळ जोराला लागली होती. लोकमान्य टिळकांच्या विरोधी बोलणे, लिहिणे ही एक चळवळ त्या वेळी सुरू होती. जाणती माणसे हिरिरीने ती चळवळ करीत होती. तेही सारे मी वाचीत असे; पण हे सारे काय चालले आहे, कशासाठी चालले आहे, त्यापेक्षा अनेक महत्त्वाचे प्रश्न देशात आहेत. त्यांच्याकडे ही जाणती माणसे लक्ष का देत नाहीत, अशी एक हुरहूर मनाला चिकटलेली असे आणि या हुरहुरीतूनच आपण काही केले पाहिजे, या विचाराचा जन्म झाला; पण करायचे, म्हणजे तरी काय? आणि ते कसे, हा प्रश्न होताच. तथापि, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी मला फार काळ लागला नाही. कारण या गंभीर विचारातूनच माझे गंभीर वाचन सुरू झाले होते. त्या वेळी मी जे वाचले, राष्ट्रपुरूषांची चरित्रे होती, टिळकांचे राजकारण होते, स्वातंत्र्य-युद्धातील क्रांतिकारकांचे ज्वलंत विचार होते. कॉंग्रेसच्या नेत्यांची शिकवण होती. समाजनेत्यांचा आदर्श होता. आणखी पुष्कळ होते. मी विचार करून वाचीत होतो आणि वाचून विचार करीत होतो आणि या दोन्हींची सांगड अनुभवाशी लावीत होतो. पुढे-पुढे तो एक माझा स्वभावच झाला. विचार करून, अनुभवातून प्रतिक्रिया व्यक्त करावयाची, हा माझ्या स्वभावाचा स्थायिभाव त्या वेळेपासूनचा आहे. गेल्या बेचाळीस वर्षांच्या माझ्या राजकीय जीवनात त्या वेळच्या त्या संयमी विचारांची सोबत मला अनेकदा उपयोगी पडत आली आहे.

वाचनाला आणि विचाराला अनुभवाचे कोंदण लाभावे, अशी त्या वेळी कराडची स्थिती होती. आमचा कराड भाग नेहमीच जागृत. सत्यशोधकांच्या

चळवळीमुळे समाजाचे मन बदलत चालले होते, बदललेही होते; मी ते अनुभवीत होतो. माझे अंतःकरण मात्र दुसरेच काहीतरी धुंडाळीत होते, मोठमाठी माणसे तुरूंगात जातात, हालअपेष्टा भोगतात, देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलाढ्य इंग्रजांना तरूण मने आव्हान देतात, जिवाची कुर्बानी करतात. हसत-हसत फासाची दोरी स्वतःच स्वतःच्या गळ्याभोवती आवळून घेतात आणि 'जय भारत' म्हणून पंचत्वात विलीन होतात, हेही माझ्या वाचनात होते. सत्यशोधक मंडळी यासंबंधी का बोलत नाहीत, असे मला नेहमी वाटे. स्वातंत्र्याचा शोध हाच खरा सत्याचा शोध असू शकतो, याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नव्हती. समाजात वावरताना मात्र मला जो अनुभव मिळत होता, तो खटकणारा होता. तथापि, अनुभव कोणता का असेना, तो कधी व्यर्थ जात नाही, अशी माझी धारणा असल्याने तसलाही अनुभव गाठी बांधून मी पुढे जात होतो.

तेव्हा माझे वय सोळा-सतरा वर्षांचे असेल. कराडला त्यावेळी प्लेग सुरू होता. अर्धेअधिक गाव फुटले होते. लांब कुठेतरी दोन-तीन मैलांवर रानांत वस्त्या उभ्या होत्या. प्लेगच्या भीतीने माणसे रानावनांत पसरली होती. अगोदरच विस्कळीत झालेल्या समाजातील ही फुटाफूट अधिकच भयाण वाटावी, अशी स्थिती होती. शाळा बंद होत्या, म्हणून अभ्यासही बंद होता; पण तेही एका दृष्टीने ठीकच होते. अभ्यासाकडे लक्ष देण्याला माझे मन तरी कुठे स्थिर होते ?

त्या वेळच्या त्या घटना मनात आजही ताज्या आहेत. क्रांतिकारकांच्या उठावणीचा तो काळ होता. लाहोर-कटाच्या खटल्याने साऱ्या भारताचे चित्त खेचून घेतले होते. अनेक क्रांतिकारकांना त्या वेळच्या नोकरशाहीने तुरूगांत डांबून, त्यांचे अनन्वित हाल मांडले होते. नोकरशाहीने ज्यांच्यावर दात धरला होता, अशा अनेकांना लाहोर-कटाच्या जाळ्यात गोवले होते, आणि त्यांतच बंगालचे प्रसिद्ध क्रांतिकारक श्री. जतींद्रनाथ दास हे एक होते. जतींद्रनाथांना, वस्तुतः लाहोरच्या कटाशी त्यांचा दूरान्वयानेही संबंध सिद्ध न करताना, सरकारने पकडले होते. १९२० सालच्या असहकाराच्या चळवळीत सामील झाल्यापासून नोकरशाहीचा त्यांच्यावर दात होता. पाच वर्षांत त्यांना चार वेळा तुरूगांत अडकविण्यात आले. चौथ्यांदा ज्यावेळी ते मैमनसिंगच्या तुरूंगात गेले. तेव्हा त्यांचा इतका छळ झाला की, वैतागून त्यांनी जेल सुपरिटेंडेंटशी मारामारी केली; परंतु या गुन्ह्यामुळे त्यांना अंधार-कोठडीची शिक्षा भोगावी

लागली. तेथे जतींद्रनाथांनी उपवास आरंभिला. तेवीस दिवस त्यांनी उपाशीपोटी काढले. तेव्हा त्यांच्या तक्रारीची थोडीशी कुठे दाद लागली.

लाहोर-कटात अडकवून त्यांना बंदिखान्यात टाकल्यानंतरही पुन्हा तसलाच प्रसंग उद्‌भवला होता. राजकीय कैद्यांना निर्ढावलेल्या बदमाश गुन्हेगारांप्रमाणे वागविले जात आहे, असे पाहून सात्त्विक संतापाने जतींद्रांनी तुरूंगात उपोषण आरंभिले होते. वृत्तपत्रांतून त्यांच्या उपोषणाच्या बातम्या नित्य येत असत. जतींद्रनाथांच्या अगोदरपासून सरदार भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी, राजकीय कैद्यांना विशिष्ट सवलती मिळाव्यात, म्हणून उपोषण आरंभिले होते. क्रांतिकारकांच्या या अन्नत्यागाच्या सत्याग्रहाने साऱ्या देशात चिंता पसरली होती. उपोषणाचा एक-एक दिवस वाढत होता आणि नोकरशाही अधिकाधिक निगरगट्ट बनत चालली होती. या दोघां क्रांतिवीरांना उपोषण सुरू करून एक महिना उलटला, तरी इंग्रज राज्यकर्त्यांना घाम फुटेना, तेव्हा तुरूंगातील इतर कैद्यांनीही अन्नसत्याग्रह पुकारला. त्यात जतींद्रनाथही सामील झाले. त्यामुळे भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांच्या उपोषणास गंभीर व उग्र स्वरूप प्राप्त झाले आणि त्यापुढच्या प्रत्येक दिवशी भयाणपणा वाढतच गेला.

कराडला त्यावेळी 'केसरी', 'ज्ञानप्रकाश' व 'नवाकाळ' एवढीच वर्तमानपत्रे वाचावयास मिळत असत. अन्नसत्याग्रहाचे काय झाले, हे समजण्यासाठी मी रानातल्या वस्तीवरून रोज दोन-तीन मैल चालून गावात येत असे. कंबरेइतक्या पाण्यातून नदी ओलांडून मी येत असे. त्यावेळी वर्तमानपत्र वाचावयास मिळणे हे सहजसुलभ नव्हते. ज्या कोणाकडे वृत्तपत्र येत असेल, त्याच्याकडे जाऊन ते वाचावे लागे. मी रोज तसे करीत असे. क्रांतिकारकांच्या उपोषणाने मी अस्वस्थ झालो होतो. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांची उपासमारीने सर्व शक्ती संपत आली होती. परंतु त्याहीपेक्षा एक महिन्याने उपवास सुरू केलेले जतींद्रनाथ यांस उपवासाने प्रेतकळा आल्याची वर्णने येत होती. एक तर सरकारने शुद्धीवर आले पाहिजे किंवा प्राणाने देह सोडून गेले पाहिजे, अशा अटीतटीने क्रांतिकारकांचा उपवास सुरू झाला होता. वर्तमानपत्रात त्या वेळी येणारी वर्णने चित्तथरारक होती. का, कोणाला ठाऊक, परंतु जतींद्रनाथांच्या उपोषणाने मला घायाळ केले होते. शेवटचे वीस दिवस तर जतींद्रनाथांची प्रकृती क्षणाक्षणाला घसरत असल्याचे वृत्त येऊ लागले. धडधडत्या अंतःकरणाने मी ते वाचीत होतो. जतींद्रनाथांच्या सुटकेच्या बाबतीत सरकारने धरलेला निष्ठुरपणा यमालाही लाजविणारा होता, असे मला वाटे. जतींद्रनाथ

हे काही थोड्या घटकांचे सोबती असताना व पंजाब सरकार त्यांना सोडून भावाच्या ताब्यात देण्यास तयार असतानाही, त्यांच्यापासून जामीन घेतल्यावाचून त्यास सोडू नये, अशी सरकारने अपमानास्पद अट घातली; परंतु या अटीपुढे मान तुकविण्यास जतींद्रनाथांचा भाऊ कबूल नव्हता. दुसरे काहीजण जामीन भरण्याच्या तयारीने पुढे आलेही; परंतु स्वतः जतींद्रनाथांची जामिनावर सुटका करून घेण्याची तयारी नव्हती. जणू काही इहलोकाच्या बंदिवासातून कायमची सुटका करून घेण्याच्या क्षणाचीच ते वाट पाहत होते.

माझ्या बालमनावर या घटनांचा चिरकाल परिणाम झाला. देशासाठी देह सोडणारे जतींद्र माझे कोणी जवळचे आप्त आहेत, असे माझ्या मनाने ठामपणे घेतले, बासष्ट दिवस जतींद्रनाथांनी देशासाठी तीळतीळ आहुती दिली आणि बासष्टाव्या दिवशी लाहोरच्या तुरूंगात भर दुपारी एक वाजता सूर्याला साक्ष ठेवून त्यांनी स्वदेहाची पूर्णाहुती दिली. मातृदेवतेसाठी झिजून-झिजून त्यांनी प्राणार्पण केले.

जतीद्रांचा आत्मयज्ञ ही एकच एक घटना त्या दिवशी सर्वांमुखी होती. वृत्तपत्रात मी त्या आत्मयज्ञाचे वृत्त वाचले आणि या प्रसंगाने मी भांबावून गेलो. जतींद्रांनी देशासाठी प्राण दिला, या घटनेने मला बेचैन केले. काय होत आहे, हे समजेनासे झाले. देहाचे व्यापार सुरू होते; परंतु मनाचे व्यवहार उधळले होते. परमदुःखाच्या खोल गर्तेत मी कुठे तरी पडलो आहे, असे स्पंदन मनात कोठे तरी चालू होते; परंतु कोठे जावे, काय करावे, कोणाला सांगावे, हे काही सुचत नव्हते, बधिर झालेल्या मनाने मी तसाच चालायला लागलो आणि चालता-चालता रडायलाही लागलो. मी केव्हा रडायला लागलो, हेही मला समजले नाही. गावातील घरे ओलांडून मी पुढे चाललो होतो. ती निर्मनुष्य घरे मला भयाण वाटली. सायंकाळी नदी ओलांडून जाताना नेहमी घरट्याकडे जाणारे पक्ष्यांचे थवे मला त्या दिवशी आढळले नाहीत. रानात भिरभिरणारा वारा सुस्तावला होता. झाडेझुडुपे स्तब्ध झाली होती. सारे वातावरण कुंद बनले होते. माझ्या मनाचे प्रतिबिंब मला जणू चराचरांत दिसत होते. त्यामुळे तर मी अधिकच व्याकूळ झालो. दिवस संपून गेला होता. मी वस्तीवर पोहोचलो, तेव्हा कडुसं पडलं होतं. वाढत्या अंधकारात झोपड्यांतील मिणमिणते दिवे वातावरणाला उजाळा देण्यास असमर्थ होते. काळ्या रानातील त्या काळ्या अंधारात नेहमी तासन् तास तारकांशी खेळ खेळणारा मी, त्या रात्री तारकापुंजात जतींद्रनाथ मला कुठे दिसतात का, हे शून्य दृष्टीने पाहत होतो. पोटात भूक असूनही

अन्नावरची वासना उडाली होती. तहान-भूक हरपलेल्या स्थितीत मी एकच एक करीत होतो... एकसारखा रडत होतो. आई समजावीत होती आणि मी रडत होतो.

अशा स्थितीत रात्र सरली; पण माझे रडणे संपले नाही. मातेचे मऊ मन माझ्यामुळे मरगळून गेले होते. कलकत्त्याचे कोणीतरी निधन पावले, म्हणून मी दुःख मानावे, हे आईला समजत नव्हते. माझ्या केविलवाण्या मनःस्थितीचा तिच्यावर वेगळाच परिणाम झाला. 'मुलाला काय झाले आहे, पाहा, हो, याला कोणाला तरी दाखवा हो' असे ती शेजाऱ्यांना म्हणत होती. मी हे सारे समजत होतो; पण माझे मन आईला खुले करून कसे दाखवावे, हे मला उलगडत नव्हते.

जतींद्रांच्या देहातील राष्ट्रीय स्वातंत्र्याचे प्रखर तेजोवलय माझे अंतःकरण छेदून गेले. हे मी या माउलीला कसे समजावून सांगणार होतो ? एवढे मात्र खरे की, त्या घटनेने माझ्या चित्तवृत्तीत बदल झाला. देशात घडणाऱ्या घटनांचे अर्थ मला अधिक जवळचे वाटू लागले. मी त्यांचे अर्थ समजावून घेण्याच्या मनःस्थितीपर्यंत पोहोचलो. कराडचे आमचे त्या वेळचे नेते श्री. बाबूराव गोखले, सदाशिवराव आळतेकर, त्यांचे चिरंजीव गणपतराव आळतेकर, माझ्या शाळेतील राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षक या सर्वांचे व्यक्तिमत्त्व माझ्या मनावर काही संस्कार घडवीत होते. ते जे बोलत असत. ते मी मनाने टिपत होतो. त्यादृष्टीने १९२७ ते १९४० हा बारा-तेरा वर्षांचा काळ शिक्षणाबरोबरच माझी राजकीय मनोभूमी तयार होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. या काळात राजकीय चळवळ, तुरूंगवास, वैचारिक खळबळ अशा कितीतरी घटना घडल्या. अशा वेळी मला मित्रांची बहुमोल मदत झाली आहे. किंबहुना माझे व्यक्तिमत्त्व हे माझ्या सर्व मित्रांच्या आशीर्वादाचे आणि प्रयत्नांचे दृश्यरूप आहे, असेच मी मानतो.

१९३० साली मी राष्ट्रीय चळवळीत उतरलो, त्या वेळी माझ्या मनात एक वैचारिक द्वंद्व निर्माण झाले. स्वातंत्र्य-चळवळीला सामाजिक व आर्थिक स्वरूपाची एक बाजू असावी, असे मला नेहमी वाटे. त्यादृष्टीने रॉय यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर अधिक पकड करू शकला.

सांप्रदायिकतेने एखाद्या विचारांशी बांधून घेणे हा माझा स्वभाव नाही. जे मला पटत नाही, त्या विचारातून आणि कृतीतून दैनंदिन जीवनाला योग्य ते मार्गदर्शन लाभणार नसेल, तर मी अशा विचारापासून अलग होत गेलो

आहे. वैचारिक सिद्धांताचा अचूकपणा मी तोच जाणतो की, ज्यातून कार्याचा प्रभाव निर्माण होऊ शकतो. तसे न होईल, तर त्या विचारातच काहीतरी चूक असली पाहिजे, असे समजण्यास हरकत नसावी. तशी चूक असेल, तर विचार तपासण्याची माझी वृत्ती असते. १९४० पासूनची ती वैचारिक बैठक राजकीय प्रवासातील माझी कायमची सोबत झाली आहे.

मला असे नेहमी वाटते की, माणसाचे जीवन फुलायचे असेल, तर त्याला अशा काहीतरी सोबतीची सांगड पाहिजे. माझा तरी तो अनुभव आहे. माझ्या आयुष्यात जर काही घडल्याचे दिसत असेल, तर ते माझ्या सोबत्यांनी घडविले, असे माझे प्रांजळ मत आहे. प्रत्येक मनुष्य स्वतःचे जीवन स्वतःच घडवितो, असे मी तरी मानीत नाही. जीवनाची मी जी वाटचाल केली, त्यात योगायोगाचा काही भाग जरूर आहे. योगायोग याचा अर्थ, तेथे कर्तृत्व निष्प्रभ होते, असा नव्हे. मनुष्य हा स्वयंप्रकाशित आहे, ही अध्यात्माची भाषा खरी असली, तरी व्यवहारात मनुष्याची शक्ती मर्यादित आहे, असा अनुभव येतो. अदृश्यातील अनेकानेक शक्ती मानवी जीवन मागे-पुढे खेचू शकतात. ही वस्तुस्थिती निर्विवाद मानावी लागते. माणसाची इच्छाशक्ती असीम खरी; पण तिची पूर्तता सर्वस्वी मानवाची आहेच, असे नव्हे. तसे जर असते, तर 'योगायोग' या शब्दाचा जन्म होऊ शकला नसता. मानवमात्राच्या ठिकाणी विचारांची शक्ती मोठी असली, तरी त्याच्याही पलीकडे नियती शिल्लक उरतेच. एखाद्या गोष्टीचे ज्ञान पूर्णांशाने होऊच शकत नाही. ही नियतीची अबाधित व्यवस्था आहे. नियतीचा हा क्रम बदलण्याची शक्ती अजून उपलब्ध व्हावयाची आहे. जगाच्या अर्ध्यावर अंधार आणि अर्ध्यावर उजेड, हा नियतीचा नियम मानवी जीवनातही आढळतो. गावात शिरून मोठमोठ्या हवेल्या पाहिल्या, तरी त्या गावची वेस विसरावयाची नाही, ही कृतज्ञता मला परिस्थितीने शिकविली आहे.

भारतीय लोकशाहीची मृत्युघंटा वाजते आहे, अशा घोषणांनी मी सचिंत होत नाही. मला स्वतःला भारतीय लोकशाहीचे रोपटे रसरसलेले आहे, असे वाटते आणि लहानशा वादळाने ते उन्मळून पडेल, अशी भीती मला वाटत नाही. शासनाचा दर्जा आणि उंची दिवसेंदिवस वाढवायला हवी. राज्यकारभार हाकण्यासाठी दिवसेंदिवस नवी तडफदार तरूण मंडळी पुढे येत असून, त्यांच्या आशाआकांक्षा-महत्त्वाकांक्षा ध्यानी घेतल्या जाणे जरूर आहे. हे तरूण नव्या पिढीचे प्रतिनिधी आहेत, जे राजकीय, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत जागरूक आहेत. सरकारातील किंवा कायदेमंडळातील लोकप्रतिनिधी

त्यांच्यांशी कसे वागतात व त्यांना वागवून कसे घेतात, याला फार महत्त्व आहे. सरकारी यंत्रणेची पोलादी चौकट अद्याप फारशी बदललेली नसली, जुने सनदी नोकर आणि त्यांच्या काम करण्याच्या विशिष्ट पद्धतीत फारसा बदल झालेला नसला, तरी जुन्या-नव्यांना बरोबर घेऊन आपल्याला चांगली कामे करवून घ्यावयाची आहेत, त्यांना पटवून देऊन जनतेच्या गरजा पुऱ्या करावयाच्या आहेत, हे सरकारात किंवा उच्च पदांवर बसलेल्यांनी विसरता कामा नये. सुदैवाने सर्वच राजकीय पक्षांतील जुनी अनुभवी व नवी तरूण शिकलेली मंडळी आजकाल कायदेमंडळात व सरकारात दिसू लागली आहेत. या मंडळींवर नव्या बदललेल्या परिस्थितीत फार मोठी जबाबदारी आहे. सार्वजनिक जीवनातील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी आपल्यावर काही बंधने घालून घेऊन, आपल्या जबाबदाऱ्या पार पाडायला हव्यात. नैतिक चारित्र्य, कर्तृत्व, अभ्यासूपणा, गुणग्राहकता, लोकसंग्रह यांना विशेष महत्त्व असून, ज्याच्याजवळ किमान ही पुंजी नसेल, तर तो फारशी प्रगती करू शकणार नाही. ‘स्वार्थापेक्षा सेवा मोठी, भोगापेक्षा त्याग मोठा’ याची किंमत कमी झालेली नाही. लोक या गोष्टीकडे अजूनही मोठ्या कटाक्षाने बघत असतात. त्याचबरोबर जुन्या अनुभवी मंडळींकडून आपण काही शिकले पाहिजे, उमेदवारी केली पाहिजे, असा दृष्टिकोन ठेवून आपापली वाढ केली पाहिजे.

कोणाला जर वाटत असेल की, आपण स्वयंसिद्ध आहोत किंवा परिपूर्ण आहोत, तर चे चुकीचे आहे. सरकारबाहेर फार मोठी मंडळी काम करीत असतात व सरकारचे व सरकारातील घटकांचे काम ते बारकाईने पाहत असतात. या मंडळींकडून केवळ वाहवाच नव्हे, तर वेळोवेळी सल्लामसलत, विचारविनिमयाचा लाभही मिळविता आला पाहिजे, महाराष्ट्र किंवा मुंबई राज्याचा कारभार हाकताना मी या गोष्टींकडे विशेष लक्ष देत होतो. राज्यात काम करताना त्याची विशेष आवश्यकता असते. राज्यकर्त्यांनी दुहेरी दळणवळण व दुसऱ्याचा दृष्टिकोन समजावून घेण्याची गरज विसरता कामा नये. सूडबुद्धी न बाळगता दृष्टिकोन समतोल व वृत्ती शांत ठेवायला हवी. या भूमिकेचा मला वादळी स्थितीतही फार उपयोग झाला.

राज्य कोणत्या पक्षाचे आहे, हे कोण चालवितो, यापेक्षा ते कसे चालविले जाते, याला फार महत्त्व आहे. चालू काळ संक्रमणाचा आहे. त्याचबरोबर वेगवेगळी आव्हाने दिली जात आहेत. या आव्हानांना सार्थपूर्ण तोंड देऊन भारतीय लोकशाही टिकेल व वाढेल, अशी माझी श्रद्धा आहे.

# २... आई विठाई

आजोळी माझ्या आईला सर्वजण 'आक्का' म्हणत असत. ती घरात सर्वांत मोठी, म्हणून आला-गेला माणूसही तिला 'आक्का'च म्हणत असे.

आजोळी असताना एकदा आजीला मी विचारले, तेव्हा ती म्हणाली,

'आक्काचं नाव देवाचं आहे. विठाई आपला देव आहे.'

आजी काय म्हणते, ते मला कळत नव्हते; पण ती काहीतरी चांगले म्हणाली, असे मला वाटले. याच वेळी बोलण्याचा ओघात माझ्या नावामागची कथाही तिने सांगितली.

ती म्हणाली,

'तुझ्या जन्माच्या वेळी आईला फार त्रास झाला. ती बेशुद्ध झाली. आपलं गाव खेडेगाव, दवापाण्याची सोय नाही. घरगुती औषध-पाणी केलं; पण गुण येईना. माझ्या जिवाला घोर लागला. अखेर सागरोबाला साकडं घातलं आणि देवाला काकुळतीनं विनवलं, आक्काला जगवण्यात माझ्या हाताला यश दे. तुझी आठवण म्हणून मुलाचं नाव यशवंत ठेवू. सागरोबानं ऐकलं. म्हणून तुझं नाव यशवंत ठेवलं.'

आजीने, इडा-पिडा टळो, म्हणून गालांवरून बोटे उतरली आणि कडकड मोडली. तिच्या डोळ्यात पाणी जमले.

रात्री आजीने दृष्ट काढली आणि सागरोबाचा अंगारा लावला.

विठाई आणि यशवंत या दोन नावांमागचा इतिहास प्रथमच मला समजला. आईच्या प्राणांची साक्ष म्हणून माझे नाव यशवंत आहे, हे कळल्यापासून आई हाच माझा प्राण झाली.

माझ्या थोरल्या बंधूंना नोकरी मिळाल्यानंतर ते काही दिवस कराडमध्ये होते. नंतर त्यांची बदली होऊन ते विट्याला गेले; परंतु माझ्या आईने निर्णय घेतला की, दोन्ही धाकटी मुले घेऊन आपण कराडला राहावे आणि त्यांचे शिक्षण पुरे करावे. माझ्या आईचा हा एक ध्यास होता. तिने स्वीकारलेला मंत्र

होता की, शिक्षण ही शक्ती आहे. ती मिळवली पाहिजे, आपल्या मुलांचे शिक्षण पुरे केले पाहिजे. या दृष्टीने तिने घेतलेला हा निर्णय आमच्या आयुष्याला दिशा द्यायला मूळ कारणीभूत आहे, हे मला स्पष्ट दिसत आहे. तिच्या या निर्णयाच्या निमित्ताने आम्ही कराडकर झालो. त्यानंतर कराडशी जो संपर्क आला, तो कायमचाच ! तेच आमचे गाव झाले आणि कार्यक्षेत्रही झाले.

माझी आई शाळेत शिकली नव्हती, पण शिक्षणाचे मोल ती मनोमन जाणत होती. आमच्या घरची तशी गरिबीच असली; तरी संस्कारांनी आई श्रीमंत होती. ही श्रीमंती आम्हां मुलांपर्यंत पोहोचविण्याचा तिचा सततचा प्रयत्न होता. देव आपल्या पाठीशी आहे, ही तिची निष्ठा होती. त्यामुळेच ती संकटकाळी कधी डगमगली नाही. आम्हांला ती सतत धीर देई. पहाटे दळण दळताना -

***नका, बाळांनो, डगमगू***
***चंद्र-सूर्यांवरील जाई ढगू***

ही दिलासा देणारी ओवी तिच्या मांडीवर झोपून मी कितीतरी वेळा ऐकली आहे.

जतींद्रनाथ दासांच्या मृत्यूने मी किती हादरून गेलो होतो. माझ्या आईने प्रत्यक्ष पाहिले होते. ज्या दिवशी जतींद्रनाथ वारले, तो सबंध दिवस मी जेवलो नाही. रात्री झोपलो नाही. हे तिने पाहिले होते. माझ्या मनाचा अंदाज तिला लागला नाही. तिला वाटे, आपल्या मुलाला काहीतरी लागीर झाले आहे. म्हणून ती चार मंडळींत त्याच्या उपाययोजनेची चौकशी करू लागली.

मी आईला सांगितले,

'मला काही झालेले नाही, तू काही काळजी करू नकोस.'

पुढे तिला माझे म्हणणे पटले. तिने माझी चिंता करायचे सोडून दिले. ती म्हणे, 'बाबा तू वाचतोस, हिंडतोस, फिरतोस, हे सगळे चांगले आहे, पण कधी वाइटाच्या नादाला लागू नकोस. आपण गरीब असलो, तरी आपल्या घराची श्रीमंती आपल्या वागण्या-बोलण्यांत आहे. रीतिरिवाजांत आहे, ती कायम ठेव.

'तुला कुणाची नोकरी-चाकरी करायची नसली, तरी माझी हरकत नाही. मी कष्ट करून तुझे शिक्षण पुरे करीन; पण ह्या शिक्षणामधे हयगय होईल, असे करू नकोस. तुम्ही शिकलात, तुमचे दैव मोठे होईल.'

आईने एका अर्थाने आम्हांला तिच्या विचाराने जीवनाचे एक तत्त्वज्ञानच दिले होते. प्रपंच तीच चालवीत होती. त्यामुळे त्यातल्या अडचणी तिला माहीत होत्या.

माझी आई सुसंस्कृत होती, हे तिच्या वागण्या-बोलण्यावरून दिसतच असे. आमच्या गरिबीच्या घरात का होईना, कोणी आले-गेले, तर आपल्या शक्तीप्रमाणे त्यांचा योग्य तो पाहुणचार करण्यास ती कधीच चुकली नाही. कधी कधी नात्याची आणि देवराष्ट्राची आठ-आठ, दहा-दहा मंडळी आमच्या घरी पाहुणे म्हणून येत असत. त्या सर्वांचे तिने केले. ती म्हणत असे,

'आपण अर्धपोटी राहावे; पण आलेल्या-गेलेल्यांना पोटभर जेवू घालावे.'

देवधर्मावर तिची श्रद्धा होती. रामायणाच्या कथेबद्दल तिला फार आदरभाव असे. कराडच्या एका मंदिरात रामायणाची कथा चाले. तिथे जाऊन ती महिनोगणती ऐकत असे. अधून-मधून ती मलाही घेऊन जात असे. तिच्याबरोबर जाऊन ऐकत असल्याने रामकथेत मलाही रस निर्माण झाला. आईला रामायणाची सगळी प्रसंगांसहित माहिती असे. मी तिला उलटे-सुलटे प्रश्न विचारीत असे. ती म्हणे,

'तू शिकला आहेस. ते वाचून पाहा. मी जे ऐकले आहे, ते भक्ति-भावनेने खरे मानते.'

आई माझ्याकडून अधून-मधून साखरेबुवांची सार्थ ज्ञानेश्वरी वाचून घेत असे. ज्ञानेश्वरी समजायला जरा अवघडच. जुनी भाषा असल्यामुळे त्यातला अर्थ मलाही जसा समजायला पाहिजे होता, तसा समजत नव्हता; पण मी वाचीत असे, ते ती भक्तिपूर्वक ऐकत असे.

एका आठवड्यात मी तिला दोन अध्याय वाचून दाखविले. मी तिला विचारले, 'आई, तू हे सगळे ऐकून घेतलेस. त्याचा सारांश तुझ्या मनाशी काय आला ?'

तिने मला एका वाक्यात सांगितले.

'कृष्णदेव अर्जुनाला सांगतात की, तू आपला 'मी' पणा सोड आणि जे तुझे काम तू केले पाहिजेस, ते तू करीत राहा. असे सगळे ते सांगत आहेत आणि ते बरोबर आहे.'

गीतेचा इतका सरळ, सोपा आणि साधा आशय मी दुसऱ्या कुण्या पंडिताकडून ऐकलेला नाही.

तिची समज चांगली होती. मन धैर्यशील आणि उदार होते. आमची खरी शाळा आमची आई होती.

एकदा मी, आमची आजी आणि आई अशी तिघे मिळून पंढरपूरला गेलो. कराडपासून पंढरपूर जवळजवळ ऐंशी मैल आहे. आमच्या कराडच्या मारूतीबुवांच्या मंदिरातून आषाढी-कार्तिकीला पालखी जाते आणि बरोबर चार-दोन बैलगाड्या जातात. मी, आजी, आई एका गाडीतून इतरांबरोबर निघालो. अट अशी होती की, आम्ही तिघांनी एकाच वेळी गाडीत बसायचे नाही. कुणीतरी एकाने चालले पाहिजे, म्हणजे गाडीत बसणाऱ्या सगळ्यांची सोय होईल. त्याप्रमाणे मजल-दरमजल करीत आमचा प्रवास सुरू झाला होता. माझ्या आजीचे वय तेव्हा साठीच्या पुढे होते. त्यामुळे तिला आम्ही गाडीत बसण्याचा आग्रह करीत असू. परंतु तिची प्रकृती काटक होती, ती म्हणे, 'मला काय झाले आहे?' आणि तीही आपला चालण्यामधला हिस्सा उचलत असे.

एकादशीच्या दिवशी विठ्ठलाच्या दर्शनासाठी लागलेल्या रांगेमध्ये आम्ही सर्व उभे राहिलो. किती तास उभे राहिलो, लक्षात नाही; पण चार तासांपेक्षा जास्त वेळ उभे होतो, असा अंदाज आहे. शेवटी आम्ही एकदाचे कसेबसे मंदिरात पोहोचलो. गंध, अक्षता, फुले, कापूर, ऊद, धूप, इत्यादी पूजा-साहित्याच्या संमिश्रणातून निर्माण झालेला, आपल्याकडील सगळ्याच देवळांत असतो, तसा वास सर्वत्र दरवळत होता. टाळमृदंगांच्या-साथीने विठ्ठलनामाचा गजरही दुमदुमत होता.

गर्दीमुळे मी घामाघूम झालो होतो.

कोणीतरी सांगितले, की हा गरूडखांब आहे.

मी जाऊन त्याला हात लावला.

कोणीतरी ओरडले,

'हात लावायचा नाही.' आणि नंतर त्यानेच माझ्या आईला सांगितले , 'बाई, तुमच्या मुलाला सांभाळा.'

शेवटी विठ्ठलाच्या मूर्तीपर्यंत कसबसे पोहोचलो.

तेथे बसलेले पुजारी-बडवे एक क्षणही देखील कोणाला थांबू देत नव्हते, पुढे ढकलत होते.

माझी उंची त्या वेळी स्वाभाविकच कमी होती. पायांवर डोके ठेवण्याइतका मी उंच नव्हतो.

कोणी एक पुजारी माझ्या आईवर खेकसला,

'चला लौकर येथून!'

पण आईने त्या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून मला उचलून विठ्ठलाच्या पायांवर घातले आणि मग आम्ही तेथून परतलो.

## ३... अविस्मरणीय घटना

टाळ आणि मृदंग यांच्या साथीचे संगीत भजन हा एक नवा प्रकार मला अनुभवायला मिळाला. काही दिवस ही भजने ऐकण्याचा छंदच मला लागला होता. पुढल्या काळात चैत्र-वैशाखांत गावोगावी होणाऱ्या जत्रांच्या निमित्ताने होणारे तमाशांचे फड पाहण्याचाही छंद मी केला. आमच्या शाळेतील अशाच काही छंदी मित्रांची एक टोळीच बनली होती. खेड्यांतील तमाशे आणि कुस्त्या आवडीने पाहायचा हा नादच त्यांनी घेतला होता. देवराष्ट्राच्या निमित्ताने मला ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी माहिती असली, तरी या जीवनातील सांस्कृतिक बाजू या निमित्ताने समजून येऊ लागली. रामा कुंभार, सावळजचा तातोबा मांग आणि निसरे-नावडीचा एक तमासगीर-आज त्याचे नाव माझ्या लक्षात नाही -या तमासगिरांचे तमाशे आठ-दहा मैलांच्या अंतरावर जेथे असतील, तेथे पाहण्यासाठी आम्ही जात असू. त्या वेळी मी इंग्रजी शाळेत पाचवी-सहावीत असेन. शाळेतील संमेलनाच्या निमित्ताने एकदा बर्नार्ड शॉच्या 'डॉक्टर्स डायलेमा' या नाटकातील एका प्रवेशातले काम मी केले होते. त्या निमित्ताने बर्नार्ड शॉ यांच्या नावाची ओळख झाली होती. या तमाशा बघायच्या माझ्या नादात बर्नार्ड शॉच्या नावाचा मजेदार उल्लेख मला नेहमी आठवतो.

कराडपासून स्टेशन रोडने स्टेशनच्या बाजूला असलेल्या एका गावी असाच एक नामांकित तमाशा होणार होता. त्या गावातील आमच्या एका मित्राने आम्हांला जेवायचे निमंत्रण दिले होते, म्हणून आम्ही संध्याकाळी जायला निघालो. पाच-सहाजण होतो. आम्ही कृष्णा नदीची फरशी ओलांडून एक मैल गेलो असू, नसू , तो समोरून येणारे आमच्या शाळेचे शिस्तप्रिय ड्रिल मास्तर दिसले.

मी बरोबरच्या मुलांना सांगितले, की आपण कुठे जातो आहोत, हे जरी नक्की सांगितले नाही, तरी आपण मास्तरांशी मुळीच खोटे बोलायचे नाही.

माझ्या अपेक्षेप्रमाणे झाले. आम्हां मुलांना पाहिल्यावर मास्तरांनी विचारले,

'कोठे चाललात, रे, एवढ्या संध्याकाळी?'

मी पुढे होऊन सांगितले.

'आम्ही स्टेशनवर चाललो आहोत. तेथे टॉम शॉ येणार आहे. त्यांना बघायचे आहे.'

ड्रिल मास्तरांनी आम्हांला विचारले.

'हा कोण टॉम शॉ ?'

मी त्यांना सांगितले,

'हा बर्नार्ड शॉचा भाऊ आहे.'

आमचे उत्तर मास्तरांना पटलेले दिसले आणि ते म्हणाले,

'जा जा, चांगले आहे.'

ते पुढे निघून गेल्यानंतर आम्हांला हसू आवरले नाही.

हसत-खिदळत त्या मित्राच्या घरी पोहोचलो आणि त्याला ही कहाणी सांगितली, तेव्हा फारच मजा आली.

ही सबंध रात्र आम्ही आमच्या मित्राच्या घरी घालविली.

नाटक कंपनीची नाटके मी मोठ्या हौसेने पाहत असे. 'आनंदविलास नाटक मंडळी' ही आमच्या कराडला वर्ष-दीडवर्षाने भेट देत असे. मास्टर दीनानाथ मंगेशकर व रघुवीर सावकार या प्रसिद्ध नटांच्या कंपन्यांची नाटकेही कराडला होत. पिटातल्या स्वस्त तिकिटाच्या जागेत बसून मी ती सगळी नाटके मनमुराद पाहिली. रात्री नऊ-साडेनऊला नाटक सुरू व्हायचे, ते पहाटे तीन-चार वाजेपर्यंत चालू राहायचे. 'मृच्छकटिक' नाटक तर यापेक्षा अधिक वेळ चाले. त्यातली संगीताची मैफल तर फारच रंगत असे.

नाटक पाहता-पाहता नाटकात काम करावे, अशी मला इच्छा झाली. आमच्या शाळेच्या संमेलनातील 'माईसाहेब' या नाटकात किर्लोस्करवाडीला एका प्रयोगात मी काम केल्याचे आठवते. आमच्या नाटकाचे सूत्र-संचालन श्री. बाबूराव गोखले यांनी केले होते.

मला याच्यापेक्षा दुसरी चांगली नाटके पाहावीत, अशी इच्छा असे, पण योग येत नसे, बालगंधर्व, केशवराव दाते या नामवंत नटांची नावे नुसती ऐकत होतो; पण प्रयत्न करूनही त्यांची कामे पाहायला मिळत नसत. केशवराव दाते यांच्या महाराष्ट्र कंपनीचे नाटक कोल्हापूरला आहे, असे समजले. त्यांच्या

'प्रेमसंन्यास' नाटकाची जाहिरात 'नवा काळ' मध्ये मी पाहिली आणि मनाने ध्यास घेतला, की हे नाटक पाहिले पाहिजे.

गावात माधवराव घाटगे नावाचे माझे एक मित्र होते. ते नुकतेच ट्रेंड शिक्षक म्हणून नोकरीला लागले होते. त्यांची नेमणूक कराडलाच झाली होती. माझ्यापेक्षा ते वयाने थोडे मोठे होते; पण आमची मैत्री जुळली होती. माझ्यावर प्रेम करणारे हे गृहस्थ होते.

मी माधवरावांना म्हटले,

'केशवराव दाते यांचे काम पाहण्यास कोल्हापूरला जायचे काय ?'

नुकत्याच त्यांचा शाळेतल्या नोकरीचा पगार झाला होता आणि त्यांच्या खिशात पैसे होते. ते मला म्हणाले,

'जरूर जाऊ या. परंतु कोल्हापूरमध्ये राहणार कुठे ? तेथे माझी कुणाशी ओळख नाही.'

मी म्हणालो.

'नको कोणाची ओळख. दुपारच्या सर्व्हिस मोटारने कराडहून निघून संध्याकाळी कोल्हापूरला जायचे. कुठेतरी हॉटेलात चहा-फराळ करून नाटक पाहून झाले, की थेट स्टेशनवर येऊन रात्रीच्या गाडीने कराडला परत येऊ'

माधवरावांना माझी सूचना पटली आणि आम्ही दोघे कोल्हापूरला त्या वेळच्या सर्व्हिस मोटारने गेलो. कोल्हापूरला पोहोचायला तीन तास लागत असत. दुपारनंतर आम्ही निघालो. संध्याकाळी दिवे लागण्याच्या वेळी कोल्हापूरला पोचलो. कोल्हापूरची काहीच कल्पना नव्हती. विचारीत-विचारीत पॅलेस थिएटरकडे गेलो. तिकीट-विक्री सुरू होती. दोन तिकिटे घेतली. शेजारच्या हॉटेलमध्ये जाऊन चहा, भजी खाल्ली आणि थिएटरमध्ये जाऊन आपल्या जागी बसलो. आम्ही एवढ्या लांबून 'प्रेमसंन्यास' पाहायला आलो होतो; पण कोल्हापूरकरांना 'प्रेमसंन्यास' पाहण्याची फारशी आवड दिसली नाही. कारण अर्धेअधिक थिएटर मोकळेच होते. नाही म्हटले, तरी अशा गोष्टींचा परिणाम मनावर राहतो. नाटक सुरू झाले आणि जयंताच्या भूमिकेत मी केशवराव दात्यांना पाहिले. त्यांचा अभिनय, शब्द उच्चारण्याची पद्धत मला फारच आकर्षक वाटली. ज्यासाठी मी आलो होतो, त्याचे चीज झाल्यामुळे मला समाधान झाले.

रात्री दीड-दोनच्या सुमारास नाटक संपले.

आता पुढे काय करायचे, असा आमच्यापुढे प्रश्न होता. तेव्हा पॅलेस थिएटरपासून चालत आम्ही रेल्वे स्टेशनपर्यंत गेलो. रेल्वे स्टेशनवर तेव्हा कराडला जाणारी कुठलीच गाडी नव्हती. पॅसेंजर वगैरेही तेथे कोणी नव्हते. सर्व एकदम शांत शांत होते. पांघरायला गरम असे काही नेले नव्हते, फक्त अंगांवरचे कपडे होते. निदान स्टेशनच्या भिंतीचा आडोसा तरी होता; पण आमची पंचाईत केली रेल्वेच्या पोलिसाने. त्याने चौकशी सुरू केली,

'गाडी नसताना तुम्ही स्टेशनमध्ये काय करीत आहात ?'

कदाचित त्याचे बरोबरही असेल. तो आपले काम करीत असेल; पण आमची गैरसोय होऊ लागली. आम्ही त्याला सर्व खरे सांगितले.

'आम्हांला सकाळपर्यंत वेळ काढावयाचा आहे. सकाळच्या गाडीने आम्हांला कराडला परत जायचे आहे.'

'निव्वळ नाटक पाहण्यासाठी तुम्ही इतके दूर आलात का ? त्याने विचारले.

आम्ही 'हो' म्हटले.

मला वाटते, पोलिसांतही काही काही चांगली माणसे असतात. कदाचित तोही नाटकाचा शौकीन असावा.

'तुम्ही खुशाल बाकांवर झोपा, तुम्हांला कोणी त्रास देणारे नाही.' असे त्याने सांगितले.

अशा रीतीने उरलेली रात्र मंद प्रकाशात, थंडीने कुडकुडत का होईना, त्या स्टेशनवर, बाकड्यांवर अंग टाकून काढली.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या गाडीने कराडला परत आलो.

विद्यार्थिदशेतले आमचे हे प्रयोग माझ्या घरातील सर्व मंडळींना पसंत होते, असे नाही; पण झालेली हकीकत मी त्यांना खरी सांगे.

२६ जानेवारी, १९३० आणि नंतरचा काळ बऱ्याच उद्योगांत गेला. माझ्या राजकीय हालचाली तर चालू होत्याच.

आमच्या शिक्षक - वर्गात दोन तऱ्हेची शिक्षक मंडळी होती. एक वर्ग असा होता, की जो मूलतःच राष्ट्रीय वृत्तीचा होता. अभ्यास चांगला करून राजकीय हालचाली करणाऱ्या मुलांना ते एक प्रकारे उत्तेजनच देत असत. शाळेचे दोन प्रमुख शिक्षक पाठक आणि दुवेदी हे माझे शिक्षक होते. माझा अभ्यास उत्तम

करून मी चळवळी करतो, म्हणून, नाही तरी, त्यांचा माझ्यावर लोभच होता; पण दुसरे काही शिक्षक असे होते, की त्यांना असे वाटत असे, की आम्ही नको ते उपद्व्याप करतो.

त्या वेळी आमच्या शाळेमध्ये शेणोलीकर म्हणून एक शिक्षक होते. ते मात्र वेगळ्या प्रकारचे होते. वर उल्लेख केलेल्या कुठल्याही गटात न बसणारे, अत्यंत वक्तशीर, व्यवस्थित आणि टापटिपीने काम करणारे शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांचे चालणे-बोलणेसुद्धा अगदी खास शैलीदार होते. त्यांना खरा शौक होता शिकविण्याचा आणि क्रिकेटचा. त्यांनी मला क्रिकेटमध्ये गुंतविण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु मी त्यांच्या हिशेबात बरोबर बसलो नाही. त्यामुळे त्यांनी माझा नाद सोडून दिला. आमच्या शाळेत आणि गावात त्या वेळी जे थोडे-फार क्रिकेट चालले होते, त्याचे सर्व श्रेय या गुरूजींना दिले पाहिजे.

त्यांनी एकदा आमच्या वर्गात मुलांना विचारले,

'तुम्हांला प्रत्येकाला काय व्हायचे, ते तुम्ही एका कागदाच्या चिठ्ठीवर लिहून द्या'

प्रत्येकाने आपल्यापुढे आदर्श असणाऱ्या एका थोर पुरूषाचे नाव लिहून दिले असावे.

मी माझ्या मनाशी विचार केला, की कुठल्या तरी मोठ्या पुरूषाचे नाव लिहून देणे म्हणजे आपली फसवणूक करून घेणे होय. मोठी माणसे आपल्या कर्तृत्वाने मोठी झालेली असतात. त्यांच्यासारखे आपण होऊ, हा विचार चांगला; पण तसा निर्णय अवास्तव, म्हणून मी माझ्या चिठ्ठीवर लिहिले:

'मी यशवंतराव चव्हाण होणार.'

मास्तरांनी सर्व मुलांच्या चिठ्ठ्या पाहिल्या आणि माझी चिठ्ठी पाहून ते माझ्याजवळ आले आणि म्हणाले,

'अरे, तू तर चांगलाच अंहकारी दिसतोस. तू सार्वजनिक कामांत रस घेतोस, हे चांगले आहे, पण त्यामुळे तू निदान देशातील मोठ्या माणसांचा आदर्श तरी आपल्या डोळ्यांपुढे ठेवला पाहिजेस.'

मी म्हटले,

'तुमचे म्हणणे खरे आहे, पण मला वाटले, ते मी लिहिले, झाले.'

हा विषय माझ्या दृष्टीने मी वर्गातच संपविला, पण त्यांनी टीचर्स रूममध्ये जाऊन शिक्षक-बंधूंशी या गोष्टीची चर्चा केली असावी. कारण पाठक सरांनी मला विचारले. ते आमचे हेडमास्तर होते. त्यांना मी झालेली खरी हकीकत सांगितली, तेव्हा त्यांनी मात्र मला सांगितलेः

'यात काय गैर आहे ? आपले व्यक्तिमत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करण्याची तुझी इच्छा आहे, असा त्याचा अर्थ आहे, आणि तो योग्य आहे. शेणोलीकर तुला काही म्हटले असतील, तर त्याकडे तू लक्ष देऊ नकोस.'

# ४... आठवणींचा गुच्छ : १

नियती प्रत्येक माणसाला आठवणींचा एक भरघोस गुच्छ देऊन त्याचा सत्कार करीत असते. अर्थात ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाप्रमाणे त्या गुच्छातील फुले विविध प्रकारची असतात. माझ्या वाट्याला आलेल्या आठवणींच्या गुच्छातील फुले सर्व प्रकारची आहेत. त्यांत मनाला कर्तव्यपूर्तीचे समाधान देणारी फुले जशी आहेत, तशी असंख्य चांगल्या माणसांच्या सहवासाचा सुगंध देणारीही आहेत. काही कडवट व उग्र वासाची फुले आहेत, तर काही फुलांवर पडलेले अश्रूंचे दवबिंदू अजूनही सुकलेले नाहीत. काही फुले अस्वस्थता निर्माण करतात, तर काही निर्भेळ आनंद देतात. एकंदरीत नियतीने दिलेला माझ्या आठवणींचा गुच्छ समृद्ध आहे - आकर्षक आहे, कधी न सुकणारा आहे, हे माझ्या आयुष्यातील एक फार मोलाचे धन आहे.

पाच पुत्रांची माता ती देवराष्ट्रातली... सागरोबाच्या डोंगरमाथ्यावरलं एक लहानसं गाव देवराष्ट्र. कौलारू, माळवदी घरं. गावात ढासळलेल्या भिंती आणि दगडमातीचे ढिगारे. पिवळ्या फुलांच्या काटेरी धोतऱ्याची लहानलहान झुडपं, तरवड, नाहीतर पाला वाळून काडीच्या टोकावर सुकलेलं पांढरं फूल घेऊन उभी असलेली गवतासारखी वनस्पती एवढीच तिथली हिरवळ. 'सोनहिरा' ओढ्याच्या काठावर काही मोठी झाडं. बाकी सर्व उजाड, रखरखीत. रस्त्यावर सुटलेल्या बैलगाड्या-काही दोन चाकांवर उभ्या - काहींचं एक चाक, नाहीतर कणा मोडल्यामुळं कललेल्या. पडकी आवारं आणि धूळ फुंकीत तिथं हिंडणाऱ्या गाई-म्हशी. गावातली म्हातारी माणसं देवळाच्या कट्ट्यावर, पारावर तंबाखू खात, चिलीम ओढीत बसलेली. एखादेच काका डोकीवर रूमाल ठेवून पायांतला जोडा वाजवीत इकडून तिकडे चाललेले. असं अगदी एक साधं, गरिबांचं, कुणब्यांचं गाव. लक्ष्मीनं पायवाट बदलली होती. गावात एखादंच बऱ्यापैकी घर. घराला मोठा दरवाजा आणि तटाच्या भिंतीवर तांबड्या कावेचे पट्टे ओढलेले दिसले, म्हणजे गावातलं ते जरा भल्यापैकी घर. बाकी घरं शेणानं, मातीनं सारवलेली, काहीशी पडकी, गळकी.

अशाच एका घरात मी राहात होतो, असं सांगतात, की देवराष्ट्र हे पूर्वी

एका राजाचं गाव होतं. राजाबरोबर लक्ष्मीही तिथं नांदत होती. सागरोबाच्या परिसरात यज्ञकुंड सुरू असायचं. ऋषिमुनींचं ते ठिकाण. प्रासादिक परिसर, पवित्र कुंड आणि त्यातलं तीर्थ. काळाच्या ओघात राजा गेला. ऋषि-मुनी गेले आणि लक्ष्मीही गेली. मागे राहिली सागरोबा आणि रयत. त्या रयतेतला मी एक.

आता जेव्हा एखाद्या खेड्यात जातो, तेव्हा लहानपणचं खेडं सहसा समोर येत नाही. खेडं आता बदलत राहिलं आहे. एक मात्र खटकतं. महारवाडा. आजही तो गावाच्या, खेड्याच्या बाहेरच उभा आहे. परिस्थितीच्या भिंती ढासळत गेल्या, वेशी उद्ध्वस्त झाल्या; पण जाती-जमातींच्या भिंती पडलेल्या नाहीत. भल्याभल्यांनी सुरूंग लावले, पहारी चालविल्या, पण ते तट अजून उभेच आहेत. मांगांची मुलं, मुली व स्त्रिया आजही वाखाच्या दोऱ्या वळीत, त्या तटाच्या बाहेर उन्हात उभ्या आहेत. त्याच त्या गवतानं शेकारलेल्या झोपड्या आणि पाठीला लागलेली पोटं!

पूर्वी खेड्यांतली सारीच माणसं परिस्थितीनं बनविली होती. आज माणसं तिथली परिस्थिती बनवीत आहेत. भलीबुरी. शिक्षण त्यांच्या घरापर्यंत पोचलं आहे. कुंभारी कौलांनी घरं शाकारणारे आज घरांवर बंगलोरी तांबडी कौलं चढवीत आहेत. मधेच एखादं दुमजलीही दिसतं. त्या दुमजली घराच्या हिरव्या, निळ्या, गुलाबी भिंती लक्ष वेधून घेतात. एखाद्याच्या घरात ट्रान्झिस्टर गात असतो. एखादी मोटारसायकल फडफडत घरासमोर थांबते. मुलं-मुली नेटके कपडे घालून शाळेत जाताना दिसतात. तालुक्याच्या गावात असलेल्या कॉलेजला पोचण्यासाठी एखादा तरूण सायकल दामटीत असतो. पैरणीची जागा बुशशर्टनं घेतली आहे. खळणा शर्ट आणि गांधी टोपी हा जमाना शे-दोनशे वस्तीच्या गावातही पोचला आहे.

लहानपणी गावाबाहेरचं उजाड माळ, नाहीतर देवराष्ट्राच्या 'सोनहिरा' ओढ्याचं वाळवंट ही आमची खेळायची जागा. आट्यापाट्यांचा डाव तिथं चालायचा. आजकाल बऱ्याच ठिकाणी गावाबाहेरची शिवारं पाटाच्या पाण्यानं ओली बनली आहेत. हिरवी झाली आहेत. जिथं अजूनही माळ आहे, ओढे कोरडे आहेत, विहिरी आटत आहेत, तिथली माणसं परिस्थिती बदलण्याचा ध्यास धरून आहेत. हे पाहिलं, म्हणजे समाधान वाटतं. लहानपणी स्वातंत्र्याचा अर्थ कळत नव्हता, तेव्हा हातात तिरंगी झेंडा धरून स्वातंत्र्य मागणाऱ्यांच्या प्रवाहात झोकून दिलेला मी ! माणसानंच परिस्थिती बदलायची असते, हा त्या

स्वातंत्र्याचा अर्थ, आज बदलणारी परिस्थितीच मला समजावून देत आहे. मागे वळून पाहताना परिस्थितीचे किती तरी टप्पे दिसू लागतात. पण त्यांतल्या महारवाड्याच्या टप्प्याशी आलं, की आजही पाय तिथचं घुटमळतात. गाव बदलायला निघालेल्या माणसांनी इथं का थांबू नये, असं मनात येतं. सर्व अवयव शाबूत आणि चांगले असले, तरच ते शरीर चांगलं! समाजशरीराचे सर्व अवयव चांगलेच हवेत!

लहानपणाचा एक उपक्रम आठवतो, मॅट्रिकमधे शिकत होतो. महारवाडा त्या वेळी 'हरिजनवाडा' झाला होता. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी चळवळ सुरू होती. हरिजनांना शिक्षण देण्याच्या चर्चा झडत होत्या. माझा हरिजन मित्र उथळे आणि मी त्यावर बोलत होतो आणि त्यातूनच हरिजनांसाठी 'नाईट स्कूल' सुरू करण्याचं ठरलं. तसे ते सुरू केलंही. हरिजनवाड्यात जाऊन आम्ही मित्रमंडळी शिकवण्याचं काम करीत होतो. माझ्या घरी सर्व जातीजमातींचे मित्र जमत, चर्चा होत; आई आम्हां सर्वांना जेवू घालीत असे. कराडच्या बुधवार पेठेतली ही शाळा. आमचं ते कार्यक्षेत्र बनलं होतं. त्यामागे समाजकल्याणाची श्रद्धा होती. आम्ही मुलं त्या वेळी राजकारणात होतो, पण सत्याग्रही या अर्थानं! या शाळेमुळं आमचं राजकारण हे समाजकारणाचाच एक भाग बनलं होतं. केवळ राजकारणाच्या आधारे समाजकारण यशस्वी होऊ शकणार नाही, असं गांधीजी सांगत होते. म्हणजे करायच्या-घडवायच्या, त्या गोष्टी जनतेच्या हृदयावर बिंबवल्या पाहिजेत. त्याशिवाय माणसा माणसांना संघटितपणे एकमेकांविरूद्ध वागण्यास शिकविणारा जातिवाद नाहीसा होणार नाही, निदान कमी होणार नाही, असं आम्ही बोलत असू.

तो टप्पा ओलांडून मी पुष्कळ पुढं आलो, पण अजूनही ती चर्चा ऐकायला मिळते. बुद्धिवंत त्यांच्या भाषेत बोलतात, राजकारणी भाषेला धार लावून बोलतात आणि प्रत्यक्षात खेडी कृतीनं बोलकी बनत आहेत. वाटचाल सुरूच आहे. रस्त्यात काही खुणेच्या गोष्टी आढळतात आणि वाटचाल बरोबर मार्गानं होत राहिली आहे ना, हे त्या खुणा सांगतात. या खुणा काही वेळेला कानगोष्टीही करतात आणि माझ्यासारख्या वाटसरूला पुढं ढकलतात. मी हा अनुभव घेतला आहे. घेत आहे. या अनुभवांनी मला काही धडेही दिले आहेत. वाटचाल करताना दमछाक होणं, निराशा येणं हे घडतच असतं. पण आतून निराश राहा आणि बाहेरून आशावान असल्यासारखा उद्योग कर- स्वतःच्या धैर्यावाचून संकटातून कुणीही पार करणार नाही, हा धडा या

वाटचालीच्या अनुभवातूनच मिळवला. म्हणूनच हरिजनवाड्यात पोचणारी वाट चालतो आहे.

संकटांची सुद्धा चव घ्यावी लागते. खडीसाखरेची गोडी माहिती नसलेल्या माणसानं ती खाल्ल्याशिवाय तिच्या गोडीचं ज्ञान होत नाही - तसंच संकटांचं आहे. ती सामाजिक असोत, राजकीय असोत, ती चाखावीच लागतात. निश्चयी लोक आपल्या कार्यापासून कधी उद्विग्न होत नाहीत. याबद्दलचे दाखले मी जेव्हा इतिहासात वाचतो, त्यावेळी संकटं चाखायची, ती कशासाठी, हे उमजतं. तरूणपणी हे सर्व समजून घेऊन आम्ही खांद्यावर तिरंगा घेतला, असं नव्हे. त्या वेळचे ते पोरसवदा धाडसही असेल. पावसाळ्यात नदीचं पाणी गढूळ असणारच. बुद्धी कितीही निर्मळ, उदार, शुद्ध असली, तरी तारूण्यात ती मलिन बनतेच. पण बुद्धी अशी मलिन बनण्याच्या काळात म्हणूनच तुरटीचा हात मधून-मधून फिरवावा लागतो. मलिनतेचा गाळ त्यामुळं खाली बसतो. माझ्या पूर्वायुष्यात घरात आईनं हे काम केलं. तिच्या वागणुकीनं मला पुष्कळ शिकवलं आणि बाहेर टिळक, गांधी, नेहरू या महापुरूषांच्या विचारांच्या आणि कृतीनं! त्यांच्या विचारांचं बोट धरूनच माझी वाटचाल सुरू झाली. त्या वाटेवर चंदनाचा सुगंध होता, चंदन स्वतः झिजतं; पण माणसाला सुगंध देतं. त्या महापुरूषांचा सुगंध असाच होता. सुंदर फुलांचे वृक्ष पुष्कळ असतात; पण चंदनाचे वृक्ष विरळ आणि विरळा असतात, ही जाणीव त्या वाटचालीतच झाली.

देवराष्ट्रातलं बालपण मागे टाकून विटे आणि नंतर कराडला मी आलो होतो. दारिद्र्याचे चटके तिथं आणखी तीव्रतेनं बसत होते- जाणवत होते. देवराष्ट्रात सारेच गरीब, त्यांतलेच आम्ही. पण विटयाचं आणि कराडचं वातावरण वेगळं होतं. सरमिसळीचं होतं. कमालीचं दारिद्य आणि अज्ञान हे त्या वातावरणात विशेष जाणवणारं होतं. समोर दिसणारी माणसं आणि त्यांची घरं, राहणी काही सांगत होती. मी शाळेत शिकत होतो. खेडं आणि शहर यांतला फरक हरघडी जाणवत होता. मनात प्रश्न निर्माण होत होते; पण उत्तर मिळत नव्हतं. कुणी सांगत नव्हतं. कोण सांगणार ? ज्यांनी उत्तर द्यावं, त्यांच्यांत आणि माझ्यात परिस्थितीची मोठी दरी होती. ही दरी ओलांडायची, तर वाटचाल करणं एवढंच समोर दिसत होतं. वाटचाल करीत होतो. एक विद्यार्थी म्हणून!

होता होता १९३० साल उजाडलं. मी एक विद्यार्थी. मित्र माझ्याकडे

पाहून 'हुशार' म्हणत असत. त्यांच्या मतानं अभ्यासात मी बरा होतो. पण या वाटचालीतच एक दिवस या 'हुशारी'वर शिक्कामोर्तब पुणे शहरातील चिकित्सक परिक्षकांनी केलं होतं. १९३० साली पुण्याला एका वक्तृत्व - स्पर्धेसाठी मी उपस्थित होतो. तिथं मी बोललो. म्हणजे भाषण केलं, आणि त्या स्पर्धेतील पारितोषिक माझ्या वाट्याला येऊन माझ्या हुशारीवर माझ्या मित्रांच्या म्हणण्याप्रमाणे शिक्कामोर्तब झालं. वक्तृत्वाचा विषय होता : 'खेड्याचा विकास'. हा विषय लहानपणापासूनच मी पचवीत होतो, जगत होतो. त्या वक्तृत्वात माझ्या अनुभवालाच जणू वाचा फुटली असावी. शहरी मंडळींना ते बोलणं जिवंत वाटलं. त्यात काही अपूर्व होतं, की नाही, असेल-नसेलही, पण चिकित्सक श्रोते भारावले, एवढं मात्र खरं. स्पर्धेनं मला पारितोषिक दिलं. पण हा व्यावहारिक लाभ होता. माझा फायदा झाला होता, ते वेगळाच होता. 'खेड्याचा विकास' हा शहरवासीयांनी समजून घेण्याचा आणि त्यांना समजावून देण्याचा विषय आहे, त्याचबरोबर खेडुतांनाही समजावून देण्याचा विषय आहे, याची जाणीव मला झाली. हा माझा खरा फायदा झाला होता.

मनानं या विषयाला पकडलं आणि ध्येयाच्या वाटेवर नकळत एक पाऊल पडलं. या वाटेनं आजवर पुष्कळ वाटचाल झाली, पण ते पहिलं पाऊल... एखाद्या माळरानातनं ऐन उन्हाळ्यात जाताना असं एखादं ठिकाण येतं, की तिथनं बऱ्याच पायवाटा फुटलेल्या असतात. ज्या गावाला जायचं, त्या गावची नेमकी वाट विचारायला जवळपास कुणी नसतं. थांबून विचार करावा, म्हणून आसपास पाहावं, तर सावलीसाठी एखादं झाडही नसतं; आणि मनानंच एखाद्या वाटेवर पहिलं पाऊल टाकावं लागतं. बरीच वाटचाल करीत जावं आणि समोर त्या अपेक्षित गावाच्या खुणा दिसू लागाव्यात, म्हणजे वाटचालीनं दमलेल्या मनात मग आनंद जमा होऊ लागतो; पण या आनंदाची खरी मालकी असते, ती त्या पहिल्या पावलाची.

खेड्यातल्या दारिद्र्याचा आणि अज्ञानाचा शोध घेण्याचा, त्यावर उपाय शोधून काढण्याचा माझा छंद हा त्या वेळेपासूनच आहे. भारताचा विकास म्हणजे भारताच्या ग्रामीण भागाचा विकास, तिथल्या शेतीचा आणि शेतकऱ्यांचा विकास, उद्योगाचा विकास आणि साऱ्या माणसांचाच विकास, याला माझ्या मनात बळकटी प्राप्त झाली, ती त्या पहिल्या पावलामुळं! परिस्थितीच्या चटक्यामुळं! तापवल्याशिवाय वाकवता येत नाही, हे लहानपणी, लोहाराच्या भात्याशेजारी बसून मी पाहिलं होतं. परिस्थिती बदलण्यासाठी शहरांतली

आणि खेड्यांतली मनं तापवली तर....

- आणि ही जागृती करण्याची संधी मला १९३० च्या चळवळीनं दिली. त्या वेळी मी मॅट्रिकच्या आसपास होतो. त्या काळात मॅट्रिक उत्तीर्ण होणाराला सरकारदरबारी सहजगत्या नोकरी उपलब्ध होती. एकदा नोकरी मिळाली, की सुखाचं जीवन सुरू होत असे. त्या काळातले बहुसंख्य विद्यार्थी मॅट्रिक पदरात पाडून घेण्यासाठी झटत असत. मी पाहत होतो, माझ्या बरोबरीचे सवंगडी अभ्यासात मग्न होते. घोकंपट्टी सुरू होती. मलाही मॅट्रिक व्हायचं होतं. पुढचं सुख दिसत होतं. आमच्या घराला सुखाचा स्पर्श झालेलाच नव्हता. वडील आणि नंतर थोरले बंधू सरकारी नोकरीत होते - पण एक सामान्य नोकर म्हणून. ते होते  बेलिफ. घरची जमीन चार-पाच एकर. तेही माळरान. दोन-चार पोती धान्य देणारं. मी मॅट्रिक होऊन नोकरीत शिरल्यानं निदान दोन वेळा घरची चूल तरी पेटणार होती. वडिलांनी दारिद्र्यात आणि अर्धपोटी अवस्थेतच जगाचा निरोप घेतला होता. आम्हां मुलांना जगवण्यासाठी आई हाडाची काडं करीत होती. दिवसभर कष्ट करावे आणि संध्याकाळची चूल पेटवावी, असं तिचं जीवन. कष्ट, कष्ट आणि कष्ट हेच तिच्या जीवनाचं सार. आम्हांला धीर देणं हे तिच्या कष्टाचं आणखी एक अंग होतं. पण मला आईचं मोठेपण दिसत होतं, अनुभव येत होते, ते तिच्या मनाच्या मोठेपणाचे! मुलं परिस्थितीनं दुबळी आहेत, याची बोच आईच्या मनाला होती. 'नका, बाळांनो, डगमगू', ही तिची ओवी मी ऐकत होतो. त्यामुळं माझं अवसान दुप्पट होत असे. परिस्थितीनं माणसं स्वार्थी बनतात, एकमेकांचं शत्रुत्व करतात, आपल्यापुरतं पाहतात, हे मी अवतीभोवती पाहत होतो. अनुभवीत होतो. पण घरात एक वेळेला चूल पेटविणारी आई या साऱ्याच्या पलीकडची होती. जेवणवेळेला कुणी आलं, तर आपल्या घासातला अर्धा घास घालण्यासाठी ती बेचैन असे. कुणी नको म्हटलं, तर रागवायची.

विठाईनं म्हटलं होतं:

**'तुझा माझा भाऊपणा । भाऊपणाला काय देऊ ।**
**एक लवंग दोघी खाऊ ।।**
**साधूला मेजवानी घाली मणाचं पुरण ।**
**खाली साखरेचं आळं, वर तुपाचं दुरण ।'**

ही तिच्या मनाची तयारी होती. पण परिस्थितीनं तिला ते सुख तेव्हा मिळू

दिलं नाही. हे मी पाहत होतो. जे माझ्या घरात होतं, तेच शेकडो आणि हजारो घरांत होतं. सारेच परिस्थितीनं अवघडलेले. माझ्या मनातल्या यातना माझ्या काही मित्रांच्या मनांतही होत्या, ते मला समजत होतं.

मनात परिस्थितीचं असं द्वंद्व. समोर मॅट्रिकची परीक्षा आणि अवतीभवती वाढत असलेली राजकीय चळवळ. त्रिकोणात उभं राहून माझं मन विचार करीत होते. लोकमान्य टिळकांचा धगधगता राजकीय काळ संपून महात्मा गांधींकडे काँग्रेसची सूत्रं आली होती. भारताच्या स्वातंत्र्यसंपादनासाठी नव्या नव्या विस्तृत कल्पना महात्माजींनी रूजवण्यास प्रारंभ केला होता. देशाचं स्वातंत्र्य तर साऱ्यांनाच हवं होतं. महात्माजींना त्याबरोबरच आणखी काही घडावं, असं वाटत होतं. सामाजिक आणि आर्थिक न्याय त्यांना हवा होता. देशातल्या दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना भारत स्वतंत्र व्हायला हवा होता.

स्वातंत्र्यप्रयत्नांत आणि स्वातंत्र्याच्या इतिहासात 'स्वातंत्र्य कशासाठी?' या प्रश्नाला आणि स्वातंत्र्याच्या कल्पनेला निश्चित स्वरूप प्राप्त करून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. देशात हे प्रथमच घडत होतं. साध्य आणि साधन याला निश्चित स्वरूप प्राप्त होण्याचा तो काळ ठरला. ब्रिटिशांच्या वसाहतवादाखाली भारतातील सामान्य लोकांचं जीवन चिरडून गेलं होतं. 'फोडा आणि झोडा' या तंत्राचा आश्रय करून ब्रिटिशांनी इथलं सामाजिक स्वास्थ्य विस्कटून टाकलं होतं. जातीयवाद ठिकठिकाणी डोकं वर काढीत होता. काही ठिकाणी त्यानं मूळ धरलं होतं आणि ब्रिटिश राज्यकर्ते त्याला खतपाणी घालीत राहिले होते. समाजाला या मनोवस्थेतून बाहेर काढून राष्ट्रात ऐक्य आणि एकविचार प्रस्थापित होईल, यासाठी महात्माजी प्रयत्न करीत होते आणि त्यासाठी स्वातंत्र्य-चळवळीला एक वेगळं रूप देण्यासाठी ते पराकाष्ठा करीत होते. देशातल्या तरूण मनांवर त्याचा अपेक्षित परिणाम घडत होता. त्यातून माझं तरूण मन बाजूला राहणं शक्यच नव्हतं. १९२७ पासूनच मी राजकारणातल्या घडामोडी वाचीत होतो आणि समजावून घेत होतो. १९३० सालात सत्याग्रह आणि प्रभातफेऱ्या यांना उधाण आलं आणि मी त्यांत उडी घेतली. सामान्य लोकाचं जीवन माझ्यासमोर घडत होतं. ते जीवन अधिकाधिक गर्तेत जात होते. त्या लोकांच्यासाठी, त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी काही तरी केलं पाहिजे, या विचाराचा मनावर जबरदस्त पगडा होता आणि त्यातूनच माझी पावलं शाळेत जाण्याऐवजी प्रभातफेरीकडे

वळली. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. ब्रिटिश सरकारनं मला तुरूंगाची शिक्षा ठोठावली आणि शिक्षणाच्या रूळांवरून चाललेल्या गाडीचा सांधा बदलला. राजकारणाच्या रूळांवरून ती धावू लागली.

गांधीजी १९३१ च्या अखेरीस, डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईत परतले. तेव्हा त्यांच्यापुढे अनेक महत्त्वाच्या समस्या वाढून उभ्या होत्या. त्यांच्या स्वागतासाठी देशातील अनेक नेते मुंबईस आले होते. पं. जवाहरलालजी यासाठीच मुंबईस निघाले असता त्यांना वाटेतच अटक झाली.

या वातावरणात आमच्या तालुक्यातल्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक १०-१२ जानेवारीच्या सुमारास तांबवे येथे आम्ही भरवली. त्या ठिकाणी बरेच कार्यकर्ते जमले होते. त्या कार्यकर्त्यांमध्ये काशिनाथपंत देशमुख आणि राघूअण्णा लिमये हे प्रमुख होते. या बैठकीत काही महत्त्वाचे कार्यक्रम ठरले. ग्रामीण भागात जंगल सत्याग्रह संघटित करावयाचा आणि जितके जास्तीत जास्त सत्याग्रही कारागृहात पाठविता येतील, तितके पाठवावयाचे, असा निर्णय झाला आणि त्याची जबाबदारी राघूअण्णा लिमये व काशिनाथपंत देशमुख यांनी आपल्यावर घेतली.

खुद्द कराड शहरातील २६ जानेवारीची तयारी करण्याचे काम मी माझ्या मित्रांच्या गटाकडे सोपविले. तालुक्याच्या महत्त्वाच्या चार-दोन गावांमध्ये कार्यक्रम संघटित करण्यासाठी मी दोन दिवसांची सायकल-रपेट केली. १५ जानेवारीला संध्याकाळी कराडला परत आल्यानंतर आखलेल्या कार्यक्रमाची कल्पना माझ्या मित्रांनी मला दिली. ती अशी, की शहरातील सर्व प्रमुख ठिकाणी रात्रीचे झेंडे लावावयाचे, त्यांत म्युनिसिपल कचेरीवर तिरंगी झेंडा लावणे ही मुख्य कल्पना होती. आमच्या मित्रमंडळींनी कायदेभंगासंबंधी लिहिलेली पत्रके व गांधींच्या अटकेबद्दल सरकारच्या निषेधाच्या घोषणा रात्री गावातील प्रमुख ठिकाणी चिकटवायच्या व हायस्कूलमधल्या आम्ही मुलांनी हायस्कूलच्या प्रांगणात असलेल्या झाडावर झेंडा चढवून दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता झेंडावंदन करायचे. त्याचप्रमाणे आम्ही कामाला लागलो. एका गटाने रात्री ११ च्या पुढे गुप्तपणे जाऊन म्युनिसिपल कचेरीवर झेंडा चढविला. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता ठरवल्याप्रमाणे आम्ही आमच्या हायस्कूलच्या पटांगणातील झाडाभोवती जमलो, आमच्यापैकी एकाने झाडावर चढून झेंडा फडकविला आणि आम्ही सर्वांनी ध्वजवंदन करून झेंड्याला सलामी दिली. 'वंदे मातरम्' च्या घोषणा दिल्या. नंतर राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रम समाप्त केला आणि

आपापल्या घरी परतलो, परंतु शाळेच्या तपासणीसाठी आलेले एज्युकेशनल इन्स्पेक्टर समोरच्या बहुलेकरांच्या बंगल्यात मुक्कामास होते. त्यांनी आमचा झेंडावंदनाचा हा कार्यक्रम चालू असतानाच तपशीलवार पाहिला होता. त्यांनी हे सर्व पहिल्यानंतर शाळेच्या प्रमुख अध्यापकांकडे चौकशी सुरू केली.

इकडे पांडूतात्या डोईफोडे यांना पोलिसांनी पकडल्यानंतर आणखी कोण कोण साथीदार आहेत, यांची चौकशी केली. तेव्हा मी समजून चुकलो, की माझे नाव सांगितले जाणार आणि अटक होण्याच्या तयारीनेच शाळेत जायला पाहिजे. त्याप्रमाणे ११ वाजता मी नित्याप्रमाणे शाळेत गेलो. शाळा सुरू झाली आणि माझ्या वर्गात बसलो. शाळेचा तास चालू होता, पण माझे त्यात लक्ष नव्हते. शाळेचा चालू असलेला तास संपण्यापूर्वीच हेडमास्तर एका पोलिस अधिकाऱ्याला घेऊन आमच्या वर्गात आले, मला बाहेर बोलावून घेतले.

आम्ही हेडमास्तरांच्या कचेरीत गेल्यानंतर पोलिस अधिकाऱ्याने सकाळच्या झेंडावंदनाची आणि बुलेटिनची वगैरे माहिती विचारली. तात्या डोईफोडे यांनी माझे नाव सांगितले असल्याची गोष्ट मला सांगितली, त्यांना मी सांगितले,

'हो, मी हे सर्व केले आहे आणि असे करत राहण्याचा आमचा निर्धार आहे.'

पोलिस अधिकाऱ्याने हेडमास्तरांना सांगितले,

'मी ह्या विद्यार्थ्याला अटक करतो आहे आणि घेऊन जातो आहे. त्याच्या पालकांना कळवा.'

.... आणि अशा रीतीने माझी पहिली शास्त्रशुद्ध अटक झाली.

काही दिवस गेल्यानंतर एके दिवशी मला आणि तात्या डोईफोडे यांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. आम्हांला आमच्यावरचे आरोप वाचून दाखविण्यास आले. आम्ही गुन्हा कबूल केला.

मॅजिस्ट्रेटचे काम सोपे होते, त्याने तातडीने आम्हांला अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली आणि खटल्याचे काम संपले.

## ५... बरॅक नं. १२ : विद्वानांच्या सहवासात शाकुंतल ते समाजवाद

एका संध्याकाळी पोलिस-पहाऱ्यात आम्ही रेल्वेने पुण्याकडे निघालो. पुण्याहून सकाळी येरवडा जेलमध्ये जाण्यासाठी आलेल्या मोटारीतून आम्ही जेलकडे निघालो. जेलच्या दारासमोर गाडी उभी राहिली आणि आम्ही सर्व मोटारीतून खाली उतरलो.

जेलचे तपासनीस पुढे आले आणि त्यांनी प्रत्येक कैद्याची पाहणी केली. त्यांपैकी फक्त बाबूराव गोखले यांना 'बी क्लास' असल्यामुळे दरवाज्यातून आत घेतले, आणि आम्हां बाकीच्यांना पुन्हा गाडीत बसायला सांगून हुकूम सोडला.

'या लोकांना कॅम्प जेलमध्ये घेऊन जा.'

जेलमध्ये पंधरा महिन्यांचे माझे जीवन म्हणजे माझ्या जीवनातला एक अत्यंत उत्तम काळ होता, असे आजही मला वाटते. माझ्या जीवनात भावनाशीलता कमी होऊन, विचारांची खोली वाढविण्याची प्रक्रिया या जेलमध्येच सुरू झाली, ही एक गोष्ट कबूल केली पाहिजे.

पहिले आठ दिवस मी असेतसेच काढले. तुरूंग हळूहळू भरत होता. एका आठवड्याच्या आत त्या जेलमध्ये जवळजवळ हजाराच्या वर कार्यकर्ते आले. या लोकांची वेगवेगळ्या बराकींमध्ये वाटणी करून, त्यांची व्यवस्था लावण्याचे काम आम्हां सत्याग्रहींपैकी ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आपल्या हाती घेतले. बराकींना नंबर देण्यात आले. त्यांमध्ये बराक नंबर १२ या एका महत्त्वपूर्ण बराकीची निर्मिती झाली. ही बराक नंबर १२ मी जन्मभर विसरू शकणार नाही. जी प्रमुख माणसे जेलमध्ये आली होती, त्यांतील निवडक व नामवंत माणसांना, या बराकीत घ्यायचे, असे कोणी तरी पुढाकार घेऊन ठरविले आणि त्याच मंडळींनी, हायस्कूल व कॉलेज-शिक्षण अर्धवट सोडून यावे लागलेल्या विद्यार्थ्यांना याच बराकीत ठेवावे, असे सुचविले, त्यामुळे माझी या बराकीत निवड झाली आणि या बराकीतील आमचा बंदिस्त जीवनक्रम सुरू झाला.

प्रत्येक बराकीत शंभर माणसे राहतील, अशी व्यवस्था होती. बारा नंबरच्या

बराकीमध्ये अगदी निवडक शंभर माणसे होती. त्यांमध्ये नावे सांगावयाची झाली, तर आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन यांची नावे प्रथम सांगावी लागतील. तसेच, या बराकीचे सुरूवातीला तेच प्रमुख होते, असे म्हटले, तरी चालेल. रावसाहेबांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि इंग्रजीवरचे प्रभुत्व यांमुळे नवीनच आलेल्या जेल अधिकाऱ्यांनी त्यांना ऑफिसमध्ये येऊन कामात मदत करण्याची विनंती केली. रावसाहेबांनी ती मान्य केली आणि ते रोज ऑफिसमध्ये जाऊ लागले. रावसाहेबांच्या ऑफिसमध्ये जाण्यामुळे एक उत्तम फायदा झाला. त्यांनी अधिकाऱ्यांची मने वळवून राजबंद्यांना वाचण्यासाठी सर्व तऱ्हेची सर्व विषयांवरील पुस्तके मिळविण्याची व्यवस्था केली. मुंबई, पुणे येथील कार्यकर्त्यांच्या व जाणत्या मित्रांच्या सहकार्यामुळे लायब्ररीतून आणि इतरही काही ठिकाणांहून नानाविध पुस्तके जेलमध्ये येऊ लागली. राष्ट्रीय चळवळीतील काही लोकांनी तर अशा तऱ्हेने राजकीय कैद्यांना पुस्तके पुरविण्याचे काम हेच आपले राष्ट्रीय काम मानले होते. त्यामुळे थोड्याच दिवसांत बारा नंबरच्या बराकीमध्ये एक चांगल्यापैकी लायब्ररी स्थापन झाली, असे म्हटले, तरी हरकत नाही. अर्थात या पुस्तकांचे महत्त्व मला पहिल्या प्रथम समजले नाही, ही गोष्ट खरी.

बराकीतल्या लोकांच्या अधिक ओळखी होऊ लागल्या. तेव्हा माझ्या लक्षात आले, की महाराष्ट्रातील फार महत्त्वाची माणसे या बराकीत राहायला आली आहेत, यांमध्ये पुण्याचे श्री. अतीतकर, आयुर्वेदतज्ज्ञ मामा गोखले, श्री. वि. म. भुस्कुटे होते. श्री. एस्.एम्.जोशी होते. तसेच, त्यांत टिळक महाराष्ट्र विद्यापीठात व पुण्याच्या आयुर्वेद विद्यालयात शिकणारे काही विद्यार्थी बरेच होते. तसेच, अहमदनगरच्या राष्ट्रीय शाळेतीलही विद्यार्थी होते. कोणी अंडरग्रॅज्युएट होते, तर कोणी मॅट्रिकपर्यंत शिकलेले होते, कोणी मॅट्रिक परीक्षेला बसणारे माझ्यासारखे चार-सहा जण होते. या दृष्टीने हा एक मोठा वेगळ्या स्वरूपाचा संच तेथे जमला होता, असे मला वाटू लागले.

या सर्व मंडळींची ओळखपाळख व्हायला आठवडा, दोन आठवडे गेले. बराकीत अंथरूणाला अंथरूण लागून बिस्तरे टाकले गेले होते आणि प्रत्येकाचा बिस्तरा म्हणजे जणू काही होस्टेलची रूम, असे त्याचे स्वरूप असे. कामाशिवाय असलेला वेळ आपापल्या बिस्तऱ्यावर बसून किंवा वाचन करून घालवावयाचा, असा कार्यक्रम चालू होता. हळूहळू त्यातून एक संघटित स्वरूप निर्माण झाले. समविचारांची माणसे एकत्र आली. शारीरिक खेळांची

किंवा पत्ते वगैरे बैठ्या खेळांची आवड असणारी माणसे एकत्र आली. गंभीर वाचन करून वैचारिक चर्चा करणाऱ्यांचा एक स्वतंत्र ग्रूप तयार झाला. शंभर माणसांच्या छोटेखानी समान घटकांमध्ये त्यांची वेगवेगळी अशी अंगे प्रस्थापित झाली.

आचार्य भागवत यांनी एकदा मला आणि माझ्याइतकेच शिक्षण झालेल्या लोकांना एकत्र बोलाविले आणि सांगितले,

'तुम्ही तुमचा येथील वेळ, बुद्धी आणि मन संस्कारित करण्याच्या प्रयत्नांत घालवा. परीक्षेला बसता येईल किंवा नाही, हे सांगता येत नाही, पण एवीतेवी तुम्ही देशभक्तीच्या कार्यात उडी टाकलेली आहे, तेव्हा होणाऱ्या परिणामाची पर्वा करू नका. पण जेव्हा केव्हा बळ मिळेल, तेव्हा येथे असलेल्या माणसांची ओळख करून त्यांच्या सहवासाचा लाभ घ्या. तसेच, येथे उपलब्ध होणारी पुस्तके वाचून, त्यांचाही उपयोग करून घ्या.'

मला तर हेच हवे होते. म्हणून माझ्यासारखीच असणारी जी तरूण मुले होती, त्यांच्याशी मी याबाबत बोललो. त्यांमध्ये पांडूतात्या डोईफोडे होते, सेनापती बापट यांचे चिरंजीव वामन बापट होते, पुण्यातील प्रसिद्ध डॉक्टर लागू यांचे कनिष्ठ बंधू होते, सोलापूरचे भोसले होते, माझे कराडचे मित्र कोपर्डेकर होते. आम्ही विचार केला, की आपण एखाद्या विद्वान मंडळींची मदत घेऊ या.

या वेळेपर्यंत आणखी काही नवे सत्याग्रही आमच्या बराकीत भरती होत होते. त्यांमध्ये माझे मित्र राघू अण्णा आले, शिवाय ह.रा.महाजनी हेही आले. कर्नाटकामधील एक-दोन ज्ञानी मंडळीही या बराकीची सदस्य होती. ह.रा.महाजनी माझ्या जिल्ह्यातले, म्हणून चांगलेच परिचित होते. मी त्यांना आचार्य भागवतांनी मला दिलेला सल्ला सांगितला, 'तुम्ही या कामात सहकार्य कराल काय?' असे विचारले. ते स्वतः 'वाङ्मयविशारद' होते. संस्कृतचे मोठे पंडित होते. आधुनिक शास्त्रांचेही वाचन ते करीत होते. आम्ही तर आमच्या जिल्ह्यामध्ये त्यांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळे 'महाजनीशास्त्री' या नावानेच त्यांना संबोधीत होतो. महाजनींनी सुचविले, की या सर्व विद्यार्थी मंडळींना जमवून आपण कालिदासाच्या 'शाकुन्तल' चे वाचन करू या. त्यांच्याजवळ ते पुस्तक होते व ते बरोबरच घेऊन आले होते; आणि मग दुसऱ्या दिवसापासून आमचा हा 'शाकुन्तल' च्या वाचनाचा वर्ग सुरू झाला. कालिदासाची आणि माझी जुनी ओळख 'मेघदूता'पासून होती. आता महाजनींसारखा पटाईत

संस्कृततज्ज्ञ आणि उत्तम शिक्षक आम्हांला 'शाकुन्तल' शिकवू लागल्यामुळे हा वाचन-वर्ग बराच लोकप्रिय झाला. त्यामुळे आम्हां विद्यार्थ्यांखेरीज इतर मंडळीही त्या वर्गाला येऊन बसू लागली.

आमचे 'शाकुन्तल' चे वर्ग सुरू झाल्यानंतर काही दिवसांनी आचार्य भागवतांनी आम्हांला शेक्सपिअरचे एक नाटक शिकविण्याचे कबूल केले. त्याचप्रमाणे त्यांनी निवड केली 'ज्युलिअस सीझर' या नाटकाची. आम्हां विद्यार्थ्यांचे इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंतचे होते, तेव्हा शेक्सपिअरच्या अभ्यासासाठी ते उपयोगी पडू शकेल, की नाही, याची आम्हांला शंका होती, पण आचार्य भागवत हे हाडाचे शिक्षक होते, त्यांनी फार परिश्रम घेऊन नाटकाची पार्श्वभूमी, ज्यूलिअस सीझरचे इतिहासातले महत्त्व आणि या नाटकातील इतर व्यक्तिरेखा व सौंदर्यस्थळे इतक्या कौशल्याने सांगायला सुरूवात केली, की 'शाकुन्तला'चा वर्ग जसा लोकप्रिय झाला, तसाच हाही झाला, ज्यूलिअस सीझरच्या आणि शाकुन्तलच्या या कीर्तीमुळे इतर विद्वान मंडळींनीही अशाच प्रकारचे वर्ग बराकीत सुरू केले.

हे दोन्ही प्रयोग जवळजवळ महिनाभर चालू होते. त्यानंतर आमचाही आत्मविश्वास वाढला. इतर इंग्रजी पुस्तके वाचण्याची आमची इच्छा जागी झाली. कधी इतरांच्या शिफारशीवरून, तर कधी आपल्या आवडीवरून, आम्ही पुस्तके निवडू लागलो व वाचू लागलो.

राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी संबंध याचाही आता बराकीमध्ये चर्चेच्या रूपाने व्यासंग सुरू झाला होता.

आचार्य भागवत हे कट्टर गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होते आणि गांधीवादाची ते बौद्धिकदृष्टया उकल करून सांगत असत. गांधीवादाच्या चर्चेबरोबरच समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीतील या वर्गात चर्चा सुरू झाली आणि त्याला पोषक असे वाङ्मयही आम्हां लोकांना वाचण्यासाठी मिळू लागले. आमचे राजकीय शिक्षण हे या पद्धतीने नियमित सातत्याने व मोठ्या तीव्रतेने सुरू झाले. काय वाचावे आणि काय वाचू नये. असे वाटावे, इतक्या पुस्तकांचा साठा तेथे जमला होता. एस्.एम्.जोशी. ह.रा. महाजनी ही तरूण मंडळी गांधीवाद स्वीकारलेल्यांपैकी दिसत नव्हती. त्यांच्या मनांत त्यासंबंधी अनेक शंका होत्या व ते त्या वेळावेळी विचारात असत. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी समाजवादाचा विचार आवश्यक नाही का, असे प्रश्न उभे करीत आणि त्यांचे हे प्रश्न बरोबर आहेत, असे मला वाटे.

वि.म. भुस्कुटे हे मार्क्सवादाचे नवे भोक्ते होऊ घातले होते. त्यांच्या मताने निव्वळ समाजवादाची पोकळ भाषा बोलून काही काम भागणार नाही, तर समाजवादाचा शास्त्रीय विचार करून, त्या विचाराची पद्धती राजकीय लढ्यात स्वीकारल्याशिवाय हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाही, असे विचार ते मांडत.

प्रथमतः मला अवघड वाटणाऱ्या आणि माझ्या काहीशा आवाक्याच्या बाहेर असणाऱ्या पुस्तकांच्या वाचनाला मी हात घातला. इंग्रजी शब्दकोशाचा वारंवार उपयोग करून आणि अवतीभोवतीच्या मित्रमंडळींशी चर्चा करून मी बर्ट्रांड रसेल यांचे 'गेट्स टु फ्रीडम' हे पुस्तक वाचले. जवळजवळ एक महिनाभर मी हे पुस्तक वाचत होतो. या पुस्तकाच्या वाचनामुळे विचारांच्या कक्षा किती व्यापक आहेत, याचा अंदाज आला आणि स्वातंत्र्याच्या हा प्रश्न केवळ हिंदुस्थानपुरता मर्यादित नसून, सर्व मानवजातीमध्येच या प्रकारच्या विचाराने खळबळ माजविली आहे. याचीही कल्पना आली.

या पुस्तकाच्या वाचनानंतर आपण आणखी काही इंग्रजी पुस्तके वाचू शकू, असा आत्मविश्वास माझ्या मनात आला आणि त्याप्रमाणे गांधीजींच्या जीवनावर लेनिनच्या जीवनावर असलेली पुस्तके मी पाहू लागलो.

मार्क्सवादाच्या मला समजणाऱ्या वाङ्मयाबरोबर रशियन राज्यक्रांतीबद्दलही मी बरेचसे वाचले. 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' हे जॉन रीड् यांचे पुस्तक मागच्या बराकीत फार लोकप्रिय झाले होते. मी त्या पुस्तकावरील चर्चा आणि त्याचे प्रत्यक्ष वाचन, या दोन्ही तऱ्हांनी पुस्तक समजावून घेण्याचा प्रयत्न केला. रशियन राज्यक्रांतीची सगळी कहाणी रोमांचकारी आहे अणि त्यातील लेनिनचे कार्य जागतिकदृष्टया ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

लेनिनसंबंधीच्या गोष्टी डॉक्टर शेट्टी आणि ह.रा.महाजनी यांच्याशी बोलत असतानाच त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय या हिंदी कम्युनिस्ट नेत्याचा उल्लेख केला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यांनी देशत्याग करून कशा प्रकारे वनवास पत्करला आणि हे वनवासाचे जीवन भटकत काढत असताना मेक्सिकोमध्ये त्यांनी कम्युनिझमचा स्वीकार कसा केला, त्याचप्रमाणे रशियन राज्यक्रांतीनंतरच्या बांधणीच्या काळात आंतरराष्ट्रीय कम्युनिझमच्या प्रसारानिमित्त उभारलेल्या संघटनेत रॉय यांनी लेनिनच्या बरोबर काही वर्षे काम कसे केले, या संबंधीच्या हकीकती त्यांनी मला विस्ताराने सांगितल्या. या हिंदी नावासंबंधी मला एक नवी जिज्ञासा वाटू लागली. डॉक्टर

शेट्टी हे या सत्याग्रहात जेलमध्ये होते, तरी तेथून आपल्या सर्व मित्रमंडळींशी ते पत्रव्यवहाराने कसा संबंध ठेवतात आणि आपले विचार कळवीत असतात, याची काहीशी गुप्त माहितीही त्यांनी मला सांगितली.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नावाशी माझी पहिली ओळख अशी झाली आणि पुढे त्यांच्या विचारांशी असलेला संबंध काहीसा वाढत गेला. जेलमधून बाहेर पडल्यानंतर मी माझ्या अनेक सहकारी मित्रांच्या सोबतीमुळे आणि आग्रहामुळे काही काळ रॉय यांच्या विचारांचा पाठपुरावा केला होता.

या राजकीय स्वरूपाच्या पुस्तकांच्या वाचनाबरोबरच वाङ्मयविषयक पुस्तकांचे वाचनही मी सुरू केले. मराठी वाङ्मयाच्या वाचनाची माझी आवड जुनी होती. तिला आता नवा अर्थ प्राप्त झाला. आचार्य भागवतांच्या बिछान्याभोवती रोज संध्याकाळी आम्हां अनेक जिज्ञासू सत्याग्रहींचा गराडा पडलेला असे.

आचार्य भागवत हे सर्वंकष बुद्धीचे गृहस्थ होते. प्रखर विद्वत्ता आणि तितकीच परखड वाणी ही त्यांची दोन मोठी आयुधे होती आणि ते अनेक विषयांवर तासन् तास बोलत असत आणि ते निव्वळ ऐकूनसुद्धा कोणी मनुष्य बहुश्रुत, ज्ञानी झाला असता! आचार्य भागवतांच्या श्रोत्यांतला मी एक कायमचा श्रोता होतो. बोलण्यापेक्षा ऐकण्यावर मी तेव्हापासून अधिक भर देऊ लागलो.

एकदा बोलता-बोलता सहज त्यांनी बॅरिस्टर सावरकर यांच्यासंबंधी उल्लेख केला. त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणावर त्यांनी सपाटून टीका केली. आचार्य भागवतांनी सावरकरांनी केलेल्या हिंदुत्वाच्या व्याख्येसंबंधी विश्लेषण केले. या हिंदुत्वाच्या पायावर जर आम्ही राजकारण उभे करण्याचा प्रयत्न केला, तर भारताचे रहिवासी असलेल्या अनेकविध धर्मांतील लोकांची एकता कशी साधणार? जनतेची एकता हा स्वातंत्र्याचा प्राण आहे. हा हिंदुत्वाच्या आग्रहामुळे जनता एकसंघ राहू शकणार नाही, म्हणून हा प्रतिगामी विचार आहे. भागवतांच्या टीकेचा हा सारांश होता.

मला ही टीका पटली.

ओघाओघाने कोणी तरी त्यांना विचारले,

'साहित्यिक म्हणून सावरकरांबाबत तुम्हांला काय वाटते?'

मघाशी त्यांच्यावर राजकीय टीका करणारे आचार्य भागवत एकदम

बदलून गेले. त्यांच्या मनामध्ये, त्याचप्रमाणे बोलण्यामध्ये एक प्रकारचा हळुवारपणा निर्माण झाला आणि त्यांनी सांगितले.

'मला अत्यंत प्रिय आहेत, ते कवी सावरकर'

एवढेच नव्हे, तर दुसऱ्या दिवसापासून सावरकरांचे 'गोमंतक' आणि 'कमला' यांचे प्रकट वाचन सुरू करणार असल्याचेही जाहीर करून ज्यांना कोणाला यायचे असेल, त्याने यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आता 'गोमंतक' आणि 'कमला' या काव्यांच्या वाचनासाठी आम्ही सर्व मंडळी दररोज जमू लागलो. सावरकरांच्या या काव्याचा आस्वाद घेण्याची संधी मला प्रथमच मिळाली. त्यातील 'कमला' काव्याची गोडी तर अवीट आहे, त्याची भाषा, आपल्या भावना आणि त्याच्यामध्ये असलेली देशप्रेमाची उत्कटता ती तरूण मनाला मोहून टाकणारी होती. मी यापूर्वीच सावरकरांची कविता का वाचू शकलो नाही, याचे मला आश्चर्य वाटू लागले.

या सामुदायिक वाचनानंतर इतरही काही पुस्तकांच्या सामुदायिक वाचनाची पद्धतही आमच्या बराकीमध्ये रूढ झाली, याचे नेतृत्वही आचार्य भागवत यांच्याकडे होते. ते उत्तम शिक्षक असल्यामुळे आपल्याला जे आवडते आणि माहीत आहे, ते सर्वांना सांगून जाणते करावे, हा त्यांचा स्वभावधर्म होता आणि त्यामुळे ते मोठ्या आनंदाने हे काम करीत असत. या तऱ्हेने शिक्षण देण्याची त्यांना हौस होती, पण त्याचबरोबर अर्धवट. अपुऱ्या तऱ्हेने वाचन करणाऱ्या लोकांवर त्यांचा राग होता.

मला एकदा आठवते. एक चांगले वकील असलेले गृहस्थ 'गीतांजली' वाचत होते. त्यांना काही शंका उद्‌भवल्या म्हणून ते आचार्य भागवत यांना विचारू लागले.

'आचार्यजी, मी 'गीतांजली' वाचतो आहे. परंतु त्यातल्या 'दाऊ' आणि 'हिम' यांचा नेमका अर्थ काय ?'

आचार्यांच्या डोळ्यांत आग उभी राहिली.

'तुम्ही रवींद्रनाथांची 'गीतांजली' वाचता आहात आणि त्यातल्या 'दाऊ' आणि 'हिम' चा अर्थ तुम्हांला कळत नसेल, तर वाचायचे बंद करा !' असे तुसडे उत्तर देऊन ते मोकळे झाले.

जिज्ञासूला शिक्षित करावे, परंतु दांभिकपणाने वाचन करणाऱ्यांचा तिरस्कार करावा, अशी त्यांची मनोवृत्ती होती.

मी भुस्कुटे यांच्याकडेही जाऊन बसत असे आणि त्यांच्याकडून मार्क्सवादाचा विचार समजावून घ्यायचा प्रयत्न करी. भुस्कुटे हे आचार्यांसारखे प्रतिभासंपन्न विद्वान नव्हते; परंतु त्यांनी आपला मार्क्सवादाचा अभ्यास अत्यंत प्रामाणिकपणाने चालू केला होता. त्यावरील काही ग्रंथांचे मराठी वाचकांसाठी भाषान्तर करण्याच्या कामातही गुंतले होते. त्यांनी दिलेली 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ही पुस्तिका मी त्यांच्याजवळ बसूनच समजावून घेऊन अभ्यासली. मार्क्सच्या विचारांचे, पुसट का होईना, दर्शन व्हायला 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ही पुस्तिका पुरेशी आहे, असे माझे तेव्हापासून मत बनले आहे.

एस्.एम्.जोशी हे विशेषतः तरूण कार्यकर्त्यांच्या चळवळीकडे आणि त्यांच्या प्रश्नांकडे मोठ्या आत्मीयतेने पाहत असत. ते त्या वेळी 'यूथ लीग' चे पुढारी होते. बारा नंबरच्या बराकीमध्ये एके दिवशी संध्याकाळी युवक चळवळीच्या संबंधाने त्यांचे एक सुरेख व्याख्यान झाल्याची मला आठवण आहे. त्यांची त्या विषयाची तळमळ आणि स्वातंत्र्यासंबंधी असलेल्या भावनेची तीव्रता, सर्व जातींच्या मंडळींना एकत्र घेण्यासाठी वाटणारी गरज या त्यांच्या विचारसरणीने माझ्या मनात त्यांच्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला. दररोज चाललेल्या वादाच्या खटपटीत ते फारसे भाग घेत नसत. प्रसंगोपात्त ते वादात पडत. परंतु जेव्हा पडत, त्यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल मला फार मोठा आदर वाटण्यासारखा अनुभव या काळात आला. जेलमध्ये त्यांनी सत्याग्रहींचे केस कापण्याचे आणि दाढी करण्याचे काम आपणहून आपल्याकडे मागून घेतले आणि हळूहळू ते त्यात थोडे-फार तज्ज्ञ झाले, असे म्हणायला हरकत नाही. हे काम ते मोठ्या आनंदाने आणि हसत-खेळत करीत असत. त्यामुळे एस्. एम्.जोशी हे बाराव्या बराकीतील एक लोकप्रिय व्यक्तिमत्त्व होते.

या जेलमध्ये काढलेले एक वर्ष म्हणजे माझ्या मताने माझे एक प्रकारे विद्यापीठीय जीवन होते. १९३२ साल उजाडले आणि शिक्षेपैकी एक वर्षाचा कालावधी झाला. एक वर्ष संपल्यानंतर या जेलमधून आमची बदली विसापूर जेल इथे झाली. विसापूर जेल म्हणजे अत्यंत कष्टदायी जेल, अशी त्याची ख्याती होती. हवामान चांगले नाही, पाण्याची कमतरता, फार कडक बंदोबस्त व कठोर अधिकारी असलेला जेल, अशी या जेलीची ख्याती होती.

दुसऱ्या दिवशी आम्ही विसापूरला पोहोचलो. विसापूर जेल दौंड आणि मनमाड या रेल्वे-लाईनवर असलेल्या विसापूर स्टेशनपासून दोन-तीन मैलांवर आहे. एखाद्या ओसाड वाटणाऱ्या माळावर बांधलेला हा जुना जेल

बऱ्याच लांबून पाहिल्यावर मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण करतो. तेथे पोहोचल्यानंतर मात्र आमच्या ध्यानात आले, की गेले वर्षभर तेथे राहणाऱ्या परंतु सत्याग्रहींनी त्याला अतिशय वेगळे रूप दिलेले आहे, जेल अधिकाऱ्यांची आणि सत्याग्रहींची एक सहकाराची भावना तेथे निर्माण झाली होती. गुजरात आणि मुंबई येथून आलेले अनेक प्रमुख नेते आणि कार्यकर्ते या जेलमध्ये गेले वर्षभर राहत होते. या जेलला अनेक बराकी होत्या आणि प्रत्येक बराकीतल्या सत्याग्रहींतून एक प्रमुख 'स्पोक्समन' निवडला जात असे. त्या बराकीतील सत्याग्रही कैद्यांचे जे प्रश्न असतील, ते हा पुढारी सोडवून घेत असे.

आम्ही तेथे गेल्यानंतर थोड्याच दिवसांत येरवड्यातील बाराव्या बराकीचे रूप या विसापूरच्या बराकीस देण्याचा प्रयत्न केला. मुंबईचे प्रसिद्ध नेते स.का. पाटील त्यावेळी विसापूर जेलमध्ये होते. त्यांनी जेलमध्ये अतिशय व्यवस्थित आणि संपन्न अशी लायब्ररी उभी केली होती. शेकडो जुनी पुस्तके दररोज परत जात आणि शेकडो जुनी पुस्तके येत, असा या सहकार्याचा संबंध येथे प्रस्थापित झालेला मी पाहिला. आमच्या या बराकीमध्ये कँप जेल १२ मधील बराकीतीलही काही मित्र होते. तात्या डोईफोडे, दयार्णव कोपर्डेकर आणि मी होतो. योगायोगाने ह.रा.महाजनी सुद्धा या बराकीत आले होते. त्यामुळे वाचनाच्या चर्चेच्या बैठकी येथेही सुरू झाल्या.

१९३२ च्या मे महिन्यात आमची शिक्षेची मुदत संपली व आम्ही सजा होण्यापूर्वीचे आमचे घरचे कपडे अंगावर चढवून विसापूर स्टेशनवर येऊन दाखल झालो. तात्या डोईफोडे आणि मी एकदम जेलमध्ये आलो होतो आणि दोघेही परत चाललो होता. घरचे कपडे अंगावर घालताच काही क्षण मला चुकल्या चुकल्यासारखे वाटू लागले; पण फक्त थोडा वेळ, जेलचे अधिकारी तिकिटे वगैरे काढून देण्याकरता स्टेशनवर आले होते. त्यांच्या मदतीने तिकिटे काढून घेतली आणि दौंडहून पुण्याला जाणाऱ्या गाडीत बसलो आणि या तऱ्हेने कारागृहातील एक लांब मुदतीचा मुक्काम संपवून आम्ही आता आमच्या घरच्या वाटेला लागलो होतो.

# ६... आठवणींचा गुच्छ : २

१९३१ साली शिक्षा भोगून मी तुरूंगाबाहेर आलो. तुरूंगातून मुक्त झालो होतो; परंतु चळवळीच्या विचाराच्या पगड्यातून सुटका झाली नव्हती. उलट, ते विचार अधिक प्रक्षोभक बनले होते आणि त्यांतूनच चळवळीच्या प्रचारासाठी बुलेटिन्स वाटणं, तरूणांमध्ये जागृती करणं या कामास प्रारंभ झाला आणि त्याची परिणती, कराडच्या म्युनिसिपालिटीवर कॉँग्रेसचा झेंडा फडकावण्याचा बेत आम्ही तरूण कार्यकर्त्यांनी मुक्रर केला आणि एक संधी साधून झेंडा फडकाविला. १९३२ सालाची ही घटना, त्यामुळे पुन्हा तुरूंगाची वारी करण्याचा प्रसंग निर्माण झाला. तुरूंगातून बाहेर येण्यासाठी १९३३ साल उजाडलं आणि मगच मॅट्रिकच्या वारीची तयार सुरू झाली. १९३४ साली मॅट्रिक झालो, त्या वेळी वयाच्या एकविसाव्या वर्षात पदार्पण केलं होतं. मॅट्रिक पदरात पडण्यास वयाचं एकविसावं साल उजाडलं. तीन-चार वर्षं गेली. पण ही वर्षं वाया गेली, असं मला कधीच वाटलं नाही. राजकीय विचाराच्या दृष्टीनं तो प्रारंभीचा काळ मला आजही महत्त्वाचा वाटतो. कारण याच काळात तुरूंगामधे असताना मला विविध राजकीय प्रवाहांचं वाचन करता आलं. समाजवादाचे विचार त्या काळात जोर धरून उठले होते. मार्क्सच्या विचारांचा अभ्यासही सातारच्या भूमीत रूजवला जात होता. विचार, संस्कार, चर्चा, संभाषणं निरनिराळ्या गटांत सुरू होती, देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपण त्याग करू शकतो, ही भावना वाढत होती दलित जनतेची दुःखं दूर करण्याच्या विचाराला आणि कृतीला प्राधान्य दिलं जात होतं.

मार्क्सचं तत्त्वज्ञान आणि रशियन राज्यक्रांतीवरील ग्रंथ मी वाचीत होतो. एकेकाळी कॉँग्रेसमध्ये असलेलेच डांगे, मिरजकर, रणदिवे, पी.सी.जोशी, आदी कॉँग्रेसमधेच सवता सुभा निर्माण करण्याच्या तयारीत होते. त्याचा परिणाम माझ्या तरूण मनावर घडत होता. ३४-३५ चा काळ महाराष्ट्रात समाजवादी पक्षाची बैठक तयार करीत होता. राष्ट्रीय पातळीवर जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव, अरूणा असफअल्ली, एस्.एम्.जोशी, अच्युतराव पटवर्धन, ना.ग.गोरे, आदी समाजवादी विचाराला निश्चित स्वरूपाची पक्षाची बैठक तयार करीत

होते. काँग्रेसअंतर्गत या समाजवादी पक्षाच्या स्थापनेत मीही सहभागी झालो होतो. काँग्रेसमधील काहीजण या डाव्या विचारसरणीकडे झुकत होते; पण फक्त 'भारताचं स्वातंत्र्य' या विचारावर आणि ध्येयावर स्थिर झालेले निर्भेळ गांधीवादीही काँग्रेसमध्ये बहुसंख्येने होते, ते फक्त 'स्वातंत्र्य' पाहत होते. अन्य कोणत्या गोष्टीचा विचार त्यांना मान्य नव्हता. महात्माजींनी त्या सर्वांना भारतीय स्वातंत्र्याच्या ध्येयाशी आणि विचाराशी बांधून ठेवलं होतं.

१९३४ ते ३८-३९ हा काळ त्या दृष्टीनं माझा वैचारिक संघर्षात आणि धामधुमीत गेला. एम् . एन्. रॉय यांचं नेतृत्व १९३७ नंतर जोर करून उठलं होतं. आणि तरूण मनाला या नेतृत्वानं मोहिनी घातली होती. १९३९ मधे तासगावला एम्.एन्.रॉय हे एका परिषदेसाठी आले होते. त्यांचे विचार आणि विचारांतील जोश पाहून मी त्यांच्या जवळपास गेलो. पण दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, ब्रिटिशांच्या विरूद्ध उठावणी करण्याच्या बाबतीत त्यांच्या विचाराशी माझं जमेना. काँग्रेसनं त्या वेळी पूर्ण विचाराअंती ब्रिटिशांशी असहकार करण्याचा निर्णय केला होता. ब्रिटिशांशी असहकार पुकारण्यात हिटलरच्या हुकुमशाहीला काँग्रेसचा पाठिंबा होता, असं नव्हे, रॉय मात्र घटपटादी वादात अडकून पडले आहेत, असं मला वाटत होतं, आणि त्यातूनच पुढे त्यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाला जन्म दिला.

या घटनांचा अन्वयार्थ लावण्यात माझा बराच काळ गेला. मनाची काहीशी द्विधावस्था निर्माण झाली होती. हिटलरची हुकुमशाही ही लोकशाही विचार आणि मानवता यांवर एक भंयकर संकट होतं. हे तर खरंच; परंतु दुसऱ्या बाजूला ब्रिटिशांचा वसाहतवाद आणि हिटलरची हुकुमशाही यांत फरक करणंही कठीण जात होतं. अशा स्थितीत ब्रिटिशांना त्या युद्धात साहाय्य करावं, असं म्हणणं म्हणजे केवळ बौद्धिक कसरत करण्यासारखं होतं. या वैचारिक द्वंद्वात सापडल्यानंतर त्यावर खूप उलट-सुलट विचार करून शेवटी काँग्रेसच्या स्वातंत्र्य-सैनिकांबरोबरच राहण्याचा निर्णय मी मनात पक्का केला आणि रॉय यांच्या विचारांचं बोट सोडून दिलं. इतिहासानं रॉय यांची भूमिका खरी असल्याचं नंतर सिद्ध केलं, हा भाग वेगळा !

राजकीय चळवळीच्या दृष्टीनं वैचारिक संघर्षाच्या काळातून जात असतानाच मी महाविद्यालयीन शिक्षण घ्यावं, असा आग्रह माझे मित्र मला करीत होते. १९३४ साली तुरूंगातून मी बाहेर आलो, तो आपली राजकीय वाटचाल मनाशी निश्चित करूनच आलो होतो. एका निश्चित ध्येयासाठी

आयुष्य समर्पण करायचं, हा विचार पक्का झाला होता. त्यामुळे मित्रांच्या आग्रहामुळे महाविद्यालयीन शिक्षण सुरू करायचं झालं, तरी सुद्धा ते मूळ ध्येय शाबूत ठेवून, त्या ध्येयासाठीच, असं ठरवलं. मॅट्रिकला असतानाच सामाजिक आणि शैक्षणिक जागृतीच्या कामास प्रारंभ झाला होता. कराडला आम्ही काही मित्रांनी हरिजनवाड्यात हरिजनांच्या मुलांसाठी एक शाळा सुरू केलीच होती. सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याचं त्या काळात आम्हां तरूणांच्या हाती काही साधनच नव्हतं; पण म्हणून आपण थांबावं, याला मनाची म्हणण्यापेक्षा परिस्थितीची तयारी नव्हती. वर्षानुवर्ष ज्या समाजाला अक्षरओळख झालेली नाही आणि अज्ञानाच्या खोल गर्तेत जो अडकून पडला आहे, त्याला वर काढून, त्याच्या मनात स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत प्रज्वलित करणं सहज शक्य होतं. कराडच्या टिळक हायस्कूलमधे- राष्ट्रीय शिक्षणाचे उद्‌गाते लोकमान्य टिळक यांचं नाव शिरोधार्य ठेवलेल्या हायस्कूलमध्ये शिकणारे आम्ही तरूण शिक्षणाच्या कार्यासाठी उसळी मारून उठलो नसतो, तरच नवल! आम्ही ते कार्य सुरू केलं होत; आणि त्याच वेळी मला महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरचा मार्ग धरावा लागला.

कोल्हापूरचं वातावरण त्या काळात शैक्षणिक दृष्ट्या भारलेलं होतं. समाजातील दुर्बल घटकांना, विशेषत:, शैक्षणिक क्षेत्र उपलब्ध करून देण्यासाठी कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराज एका विशिष्ट ध्येयदृष्टीनं प्रेरित झाले होते. मला माझं शिक्षण कोल्हापुरातच करावं लागणार होतं. पण मनानं मी सातारा जिल्ह्याच्या राजकीय चळवळीशी पूर्णपणे समरस होऊन गेलो होतो. त्यामुळे शिक्षणासाठी म्हणून शरीरानं मी कोल्हापुरात पोचलो, तरी मनाने सातारा जिल्ह्यातच वावरत होतो. परिणाम असा झाला की, शिक्षण कोल्हापुरात आणि राजकीय जागृती करण्याचं काम सातारा जिल्ह्यात, असा दुहेरीपणा निर्माण झाला. महाविद्यालयातल्या माझ्या मित्रांचं मला त्या काळात अमाप साहाय्य झालं. तेथील मित्रांनी महाविद्यालयात माझी आठवड्यातील चार दिवसांची हजेरी नोंदवायची आणि प्रत्यक्षात मी मात्र सातारा जिल्ह्यातील गावागावांतून सभा, भाषणं करीत हिंडत रहायचं, असा क्रम सुरू राहिला. कोल्हापूर-सातारा त्या वेळी मोटारीला एक रूपया भाडं होतं. कोल्हापुरात चार दिवस खानावळीत जेवण्यापेक्षा हे एक रूपया भाडं खर्च करणं परवडत असे. विचार करणारा एक कार्यकर्ता म्हणून सातारा जिल्ह्यातील तरूणांनी मला मान्य केलं होतं, कार्यकर्त्यांशी स्वीकारलं होतं. माझ्या संग्रही

सांगण्यासारखं काही आहे, असं ते सर्वजण मानीत असत. याचा फायदा झाला. संघटना मजबूत करायचं काम होतं. त्याला गती मिळाली, हिंडत राहिल्यानं लहानमोठ्या गावांतून अनेकांच्या ओळखी झाल्या आणि माणसं समजण्याचं शिक्षणही या निमित्तानं मला मिळून गेलं. राजकीय जागृतीचं काम करायचं आणि शेवटच्या दोन महिन्यांत परीक्षेचा अभ्यास करायचा, या धावपळीतच १९३८ साली बी.ए.ची पदवी माझ्या पदरात पडली. १९३४ ते ३८ हे खऱ्या अर्थानं सातारा जिल्हा हे माझं कार्यक्षेत्र बनलं होतं. आत्माराम पाटील, ह.रा. महाजनी, लक्ष्मणशास्त्री जोशी, दामुअण्णा एकबोटे, किसन वीर, काशिनाथ देशमुख, राघूअण्णा लिमये, बाबूराव गोखले, दादासाहेब आळतेकर, दिनकरराव निकम इंदुलीकर, भाऊसाहेब सोमण अशी कितीतरी मंडळी त्यावेळी पक्षाच्या कार्यात मग्न होती. याच काळात विष्णु चितळे हे कम्युनिस्ट कार्यकर्ते कराडला होते. सातारा जिल्हा हा राजकीयदृष्टया अतिशय जागृत झाला होता. सभा, परिषदा, जनतासंपर्क, परस्पर मैत्री, सौहार्द, पक्षाकरिता राबणं असा तो काळ, जेवण मिळालं, न मिळालं, तरी त्याची पर्वा नव्हती, त्या काळात आत्तासारख्या मोटारी नव्हत्या. त्यामुळे प्रवास पायी किंवा बैलगाडीनं सुरू राहायचा. पण कष्टाची फिकीर नव्हती.

एका बाजूला काँग्रेसच्या कार्याचं असं जागृतीचं चित्र निर्माण झालं असताना त्याच वेळी म्हणजे १९३७ सालात, असेंब्लीच्या निवडणुकीच्या निमित्तानं जिल्ह्यात एक लहानसा संघर्षाचा प्रसंग निर्माण झाला. अनिच्छेनं त्या संघर्षात मलाही पडावं लागलं. संघर्ष निर्माण झाला, उमेदवार म्हणून कोणाची निवड करावी, यावरून ! जिल्ह्यातील प्रमुखांचा आणि मान्यवर नेत्यांचा आग्रह, उमेदवार हा शिकलेला, शक्यतर वकील असावा, असा होता; आणि उमेदवार हा तरूण १९३० च्या चळवळीतून आलेला, तयार झालेला असावा, असं दुसरं मत होतं. त्या दृष्टीनं आत्माराम पाटील या त्यागी कार्यकर्त्याबद्दल दुसऱ्या मताच्या कार्यकर्त्यांनी आग्रह धरला आणि त्यातूनच मतभेदाची ठिणगी उडाली. प्रमुख नेत्यांना परोपरीनं सांगूनही ते आत्माराम पाटील यांना उमेदवार म्हणून स्वीकारण्यास तयार होत नव्हते. किंबहुना त्यांनी त्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती आणि त्यातून अंतर्गत संघर्ष मग अटळ ठरला.

मला आठवतं, आत्माराम पाटील यांच्या उमेदवारीबाबत काँग्रेस श्रेष्ठीपर्यंत वाद नेण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी केला आणि माझ्यावर ही कामगिरी

सोपविण्याचा निर्णयही त्यांनी पक्का केला. कामगिरी अवघड होती. श्रेष्ठींशी तशी जवळीक नव्हती. पण कामाची तर जबाबदारी होती. कार्यकर्ते जिद्दी बनले होते. स्थानिक वाटाघाटी निराशा निर्माण करीत होत्या. त्यातूनच मग एक दिवस ठरल्याप्रमाणे मी पुण्यास देव-जेधे यांच्या भेटीसाठी गेलो. चर्चा केली. कार्यकर्त्यांची इच्छा सांगितली. जेधे त्यामधे काहीसे अनुकूल दिसले; पण निर्णय कुणीच दिला नाही. मी तसाच सातारला परतलो. यश मिळालं नव्हतं, पण कार्यकर्ते स्वस्थ बसण्यास तयार नव्हते. मुंबईपर्यंत जावं आणि निर्णय करून घ्यावा, असा त्यांचा आग्रह सुरू झाला. 'भाड्यासाठी पैसे द्या, मी मुंबईला जातो', असं त्यांना सांगितलं आणि अखेर एक दिवस मुंबईला पोचलो. सरदार पटेल हे त्या वेळी मुंबईला आपल्या मुलाकडे राहत होते. त्यांच्या घरी गेलो आणि भेटीसाठी चिठ्ठी आत पाठवली. बराच वेळ झाला, तरी काही जमेना आणि भेटीचं लक्षण दिसेना. म्हणून मग तिथेच बैठक मारली. थोड्या वेळानंतर सरदार पटेलांनी बोलावलं आणि कुठले, कोण, का आलात वगैरे विचारलं. धाडस करून सांगितलं. सीनिअर बी.ए.च्या वर्गातला मी एक विद्यार्थी. खालच्या वर्गातून आलेला मी एक कार्यकर्ता, हेही त्यांच्या नजरेस आणलं. सरदारांनी सर्व ऐकून घेतलं. पण हो नाही; आणि नाही, असंही नाही. सरदारांनी मनाचा थांगपत्ता लागू दिला नाही.

मी सातारला परतलो. कार्यकर्त्यांना सर्व सांगितलं; कोणालाच काही सुचत नव्हतं, अन् आश्चर्य असं की, चार दिवसांनंतर उमेदवारांची नावं जाहीर झाली, त्यांमध्ये आत्माराम पाटील यांचा समावेश झालेला होता. साऱ्यांनी निःश्वास सोडला. पहिल्या फेरीत तर विजय संपादन केला होता. पण उमेदवारी जाहीर झाल्यानंतर समोर कामाचा, अडचणींचा डोंगर उभा राहिला. प्रत्यक्ष निवडणुकीचं आणि प्रचारकार्याचं काम हा प्रश्न भंडावू लागला. जवळ पैसा नाही, साधनं नाहीत, जिल्ह्यातले सन्मान्य नेते तटस्थ. त्यांचा जिव्हाळा कमी. निवडणुकीचा पहिला अनुभव मी घेत होतो. प्रचारमोहिमेचा पहिला धडा, पहिलं शिक्षण घेणारा मी प्रमुखांपैकी एक होतो. पण कार्यकर्त्यांची जिद्द दांडगी. सारा जिल्हा सभा-भाषणांनी ढवळून काढावा, असं सर्वांनी ठरवलं. जिद्दीनं सारे कामाला लागले, तहानभूक विसरले. हळूहळू जम बसू लागला आणि पक्षाचं नशीब असं बलवत्तर की, सातारा जिल्ह्यातून जे उमेदवार निवडणूक लढवीत होते, त्या सर्वांपेक्षा आत्माराम पाटील यांना सर्वांत जास्त मतं मिळाली. महाराष्ट्रातही सर्वाधिक मतं मिळविणाऱ्यांपैकी ते एक विजयी

उमेदवार ठरले. निवडणूक संपली. तरूण कार्यकर्त्यांना विजय मिळाला; पण खरी अडचण पुढेच होती. मनं फाटली होती. विजयानंतर तर फाटलेली मनं अधिकच उधळतात. हे सारं सांभाळायचं होतं. रोखायचं होतं, पण विजयाचं मूल्य जोखणाऱ्या जिल्ह्याच्या सन्माननीय नेत्यांनीच स्वतःला सावरलं आणि त्यामुळे कार्यकर्तेही सावरले गेले. निवडणूक संपल्यानंतर भाऊसाहेब सोमणांनी संघर्ष सावरून धरला. इतकंच नव्हे, कार्यकर्त्यांच्या पाठीशी त्यांनी आपला आशीर्वादही उभा केला. आज मागे वळून पाहताना, निवडणुकीतील तो पहिला विजय किती तरी आठवणींची उजळणी मनात करून जातो.

आता तीस-चाळीस वर्षानंतर मी माझ्या आठवणींच्या फुलांची ओंजळ भरत आहे. त्यावेळी त्यांतील अनेक रंगांची आणि मधुर व कडवट वासांची फुलं अजूनही ताजी टवटवीत दिसतात. स्मृतिपुष्पं म्हणावीत, फार तर; पण त्यांचा रंग आणि सुंगध ताजा असल्यासारखा वाटतो. तळाला काही फुलं कोमजलेली असतील, पण निसर्गाची करणी. नियतीची इच्छा. काही फुलं कोमेजली असली, तरी सुंगध परिचयाचा आहे. वाळा वाळलेला असला, तरी सुंगध देतोच. ओलाव्याचा शिडकावा केला, तर सुगंध अधिकच दरवळतो. आता आठवणींना उजाळा देत असताना, ज्यांनी अलोट प्रेम दिलं, त्यांच्या त्या प्रेमाचा ओलावा मनातून पाझरत-पाझरत हाताच्या ओंजळीपर्यंत पोचत आहे आणि त्या ओलाव्याचा स्पर्श झाल्यामुळे, की काय, ओंजळीतील आठवणींची फुलं अधिकच सुगंध देत आहेत.

सदतीसची निवडणूक जिंकली आणि अडतीसला बी.ए. झालो. तेव्हा कोल्हापूर आणि सातारचं क्षेत्र अपुरं वाटू लागलं. पाय पुण्याकडे वळत होते. डोक्यात विचार घोळत होते वकील बनण्याचे. त्यासाठी पुण्याला जाण्याची हौस होती. लोकमान्य टिळकांचं राजकीय पुणं शिक्षणाचं आणि विद्वानांचं माहेरघर. पुण्यात येण्यानं अनुभवाचं आणि ज्ञानाचं, अभ्यासाचं क्षेत्र रूंदावणार होतं. राजकारण वळण घेत पुढं आणि पुढंच चाललं होतं. अनुभवाच्या गाठी बांधण्याची जरूरी वाटत होती. डोळ्यांपुढं पुणं होतं. मनात विचार फिरत होते. पण... पुण्यात जायचं, ते कुठं-कुणाकडं ?

- आणि एक दिवस या प्रश्नालाही उत्तर मिळालं. पुण्यात राहायचं कुठं, हे कोडं सुटलं होतं. आत्माराम पाटील हे पुण्यात मुक्काम करून होते. त्यांच्याकडेच बाडबिस्तारा टाकण्याचं ठरवलं आणि एक दिवस पुण्यात दाखल झालो. वकील होण्यासाठी मग लॉ कॉलेजात नाव दाखल केलंही!

वकील होण्यासाठी पुण्यात आलो खरा. पण इथला दोन-तीन वर्षांचा म्हणजे १९४१ अखेरपर्यंतचा काळ हा माझा वैचारिक संघर्षाचा काळ ठरला. मॅट्रिक होताना १९३० ते ३३ ही तीन वर्षे अशीच वैचारिक संघर्षाची गेली. अगोदर हे, की अगोदर ते, हे निश्चित ठरत नव्हतं. तीच स्थिती ३९ ते ४१ या तीन वर्षांत पुन्हा उद्‌भवली. १९३९ ते ४१ हा काळ, तसं पाहिलं, तर राजकीय जीवनात क्राइसिसचा, वैचारिक अस्थिरतेचा काळ होता. अनेक प्रश्न निर्माण होत होते आणि कशातच समाधान होत नव्हतं. दुसरं महायुद्ध सुरू झालं होतं. कुणी काय करायचं, या वादात सारे पक्ष गोंधळून गेले होते. काँग्रेस पक्ष प्रत्यक्ष कृती करण्यापासून दूर होता. रॉय यांचा पक्ष बुद्धिवादी विचारमंथन करण्यात गुंतला होता. या युद्धाचं वर्णन 'इंपीरियलिस्ट वॉर'असं कम्युनिस्ट पक्ष करीत होता. पंडित नेहरू चीनमध्ये होते. फॅसिझमविरूध्द उभं राहायचं, की कम्युनिझमविरूद्ध? वसाहतवादाच्या विरूद्ध सुरू केलेल्या लढ्यांचं काय? असे प्रश्न विविध अंगांनी चर्चिले जात होते. युद्ध सुरू झालं. ती सारी रात्र आम्ही चर्चेत संपविली. पुण्याला त्याच वेळी अखिल भारतीय काँग्रेसची बैठक झाली, राजाजी, सरदार, पंत, आदी उपस्थित होते, पण काही निश्चिती होत नव्हती.

मनाच्या अशा कोंडमाऱ्यातच सापडलो असताना एक दिवस कम्युनिस्ट पक्षाचं बोट धरावं, असा विचार मनात डोकावू लागला. काही तरी करावं,यासाठी घडपडणारं मन, कुणी काहीच करत नाही, करू देत नाही, म्हणून कुचंबलं होतं. कम्युनिस्ट काही वेगळं बोलत होते, सांगत होते. पण करीत नव्हतं कुणीच काही ! मनाची अवस्थता वाढत होती. अभ्यासाकडं, परीक्षेकडं लक्ष लागत नव्हतं. त्यातूनच ऑक्टोबर परीक्षेला न बसण्याचा निर्णय केला आणि सहा महिने वाया गेले. आमचे मित्र आत्माराम पाटील, ह.रा.महाजनी यांनी काँग्रेस सोडली होती. त्याच्यावर विचार करीत होतो. कम्युनिस्ट बनायचं, असं मन सांगत होतं. पण ज्यांच्याबरोबर काम केलं, त्यांच्याशी चर्चा केल्याशिवाय निर्णय ठरत नव्हता आणि एक दिवस त्यासाठी सातारा गाठला. कम्युनिस्ट होण्याचं वैचारिक आकर्षण कार्यकर्त्यांना, मित्रांना सांगितलं, रात्र रात्र चर्चा झाल्या. पण कम्युनिस्ट झालात, तर आम्हांला साथ देता येणार नाही, असं बरोबरचे साथीदार सांगू लागले. त्यांचंही बरोबर होतं. स्वातंत्र्यासाठी काँग्रेस झगडत होती आणि आम्हां सर्वांचं ते प्रमुख ध्येय होतें. उलटसुलट चर्चा होऊन अखेर काँग्रेसमध्ये राहूनच झगडायचं, असा सर्वांच्याबरोबर माझ्या मनानं

निर्णय केला आणि समाधनानं पुण्याला परतलो. दरम्यान ४० सालानंतर काँग्रेसनंही वैयक्तिक सत्याग्रहाचा निर्णय केला आणि मग मन स्थिर झालं आता काही करायला मिळेल, म्हणून ! मन स्थिर बनलं होतं. म्हणून मग परीक्षेला बसायचं ठरवलं आणि ४० साली एकदाची फर्स्ट एल्‌एल्‌.बी पदरात पडली. पण पुढं सेकंड एल्‌एल्‌.बी चा विचार मनात असतानाच सातारा जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची सूत्रं सांभाळण्याची जबाबदारी निर्माण झाली. ही जबाबदारी सांभाळत-सांभाळतच अखेर १९४१ मधे सेकंड एल्‌एल्‌.बी पास होऊन पदवीच्या अर्थानं वकील बनलो.

# ७... अखेरचा लढा

ही आठवण झाली, की मन वर्षांचे पंख लावून तीस वर्षांपूर्वीच्या काळात जाते. १९४२ चा अखेरचा स्वातंत्र्य-लढा डोळ्यांपुढे उभा राहतो. मी त्या वेळी सातारा जिल्ह्यातला एक लहानसा काँग्रेस कार्यकर्ता होतो. अ.भा.काँग्रेस कमिटीची बैठक ८ ऑगस्टला निश्चित झाली होती. या बैठकीचे वातावरण काही तरी वेगळेच आहे, हे आम्हांला जाणवत होते. आता होईल, तो लढा अंतिम असणार, अशी जाणीव कुठे तरी मनात होती. आम्ही जिल्ह्यातील सात-आठ कार्यकर्ते ५ ऑगस्टला मुंबईस गेलो. अ.भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीतील भाषणे मन लावून ऐकली; पण महात्मा गांधींच्या भाषणाने आम्ही भारावून गेलो.

गांधींची 'चले जाव!' ची घोषणा झाली होती आणि ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी सारेच तयारीला लागले होते. सातारा जिल्हा तर अगादेरच जागृत जिल्हा. लोकविलक्षण स्वातंत्र्ययुद्धात हिरिरीनं उडी घ्यायचं आम्ही मुंबईतच ठरवलं. ब्रिटिशांनी धरपकड सुरू केली होती. बडे नेते गजांआड झाले होते. आमच्या वाट्यालाही तेच येणार होतं. म्हणून गुप्तपणानं सातारा जिल्ह्यात पोचायचं आणि उठाव करायचा, असे डाव आखण्यात आम्ही गुंतून गेलो आणि तेच केलं. सातारा जिल्ह्यातलं बेचाळीसचं आंदोलन हा एक प्रदीर्घ इतिहास आहे. त्यांची पानं किती उलटावीत! जन्मभर आणि जन्मांतरी आठवणीत राहतील, अशा त्या साऱ्या आठवणी आहेत. तिथला तो भूमिगतांचा इतिहास भूमिगतच राहावा, असं वाटतं. सारेच श्रेयाचे वाटेकरी. ते श्रेय कुणाकडे कमी-अधिक करून वाटता येण्यासारखं नाही. त्या आंदोलनातील भूमिगत अवस्थेतील काळ, पत्नी आणि बंधूंची धरपकड, मला स्वतःला झालेली अटक आणि भूमिगत अवस्थेतील अनेक रोमांचकारी प्रसंग आठवताना अभिमान आणि अनुकंपा यांचं काही चमत्कारिक मिश्रण मनात तयार होत राहतं. घडलं, ते सारं रोमांचकारी, हे तर खरंच !

रात्री आम्ही बद्रिकाश्रमात खूप वेळ चर्चा करीत होतो. शेवटी आम्ही ठरविले, की काहीही झालं, तरी तुरूंगात जायचे नाही. भूमिगत राहून चळवळ

पुढे न्यायची. हा अंतिम लढा यशस्वी करायचा. पहाटे सर्व राष्ट्रीय नेत्यांची धरपकड झाली. आमचीही वॉरंट्स आमच्या स्वागतासाठी तयार असणार, याची खात्री होती, म्हणून मुंबईहून एकेकट्याने गुपचूप परत जावे, असे ठरले. त्याचबरोबर जिल्ह्यात गेल्यानंतर हाती घ्यावयाच्या कार्यक्रमाबद्दलही आम्ही खूप विचार केला. आमच्यापुढे दोन पर्याय होते. एक म्हणजे, ब्रिटिश सत्ता खिळखिळी करण्यासाठी त्या सत्तेला आधारभूत असलेल्या गोष्टींचा विध्वंस करणे किंवा स्वातंत्र्य-लढ्याचा संदेश जनतेपर्यंत नेऊन तिला लढ्यासाठी संघटित करणे. माझ्या दृष्टीने दुसरा पर्याय महत्त्वाचा व आवश्यक होता आणि तोच आम्ही स्वीकारला. तेथूनच सातारा जिल्ह्यातील लोकविलक्षण स्वातंत्र्य-लढ्याला सुरूवात झाली. माझ्या दृष्टीने या लढ्याचे दोन टप्पे पडतात. पहिला टप्पा जागृत जनतेने उठविलेल्या आवाजाचा आणि दुसरा टप्पा ह्याच जनतेने ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीला दिलेल्या प्रत्युत्तराचा. अर्थात पहिल्या टप्प्याशी माझा फार निकटचा संबंध होता.

आम्ही भूमिगत बनून जिल्ह्यात परत आलो, तरी भूमिगत आहोत, असे काही वाटत नव्हते. कारण आम्ही उजळ माथ्याने फिरत होतो. सभा घेत होतो. बैठकी घेत होतो. याचे रहस्य म्हणजे, स्थानिक पोलिसांची आम्हांला असलेली सहानुभूती व जनतेचा पाठिंबा हेच होते. जिल्ह्यात येऊन आम्ही कामाला लागलो. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मोठेमोठे मोर्चे काढावयाचे. ब्रिटिश सत्तेचे प्रतीक असलेल्या मामलेदार कचेरीवर हे मोर्चे न्यावयाचे आणि प्रत्येक कचेरीवर कॉंग्रेसचा झेंडा लावावयाचा, असा कार्यक्रम ठरला. हा कार्यक्रम साधा वाटला, तरी त्यामागे बराच अर्थ होता. मोर्च्याच्या रूपाने स्वातंत्र्य-लढ्याचे लोण समाजातल्या सर्व थरांत पोचणार होते. अनेकांना स्फुरण चढणार होते आणि आपण प्रत्यक्ष ब्रिटिश सत्तेच्या मर्मस्थानावर घाव घालीत आहोत, ही भावना जनतेमध्ये निर्माण होणार होती.

ह्या मोर्च्यांनी सबंध जिल्ह्यातील वातावरण पालटले. स्वातंत्र्याच्या जाणिवेची एक प्रबळ लाट सर्व तालुक्यांत निर्माण झाली. अनेक नवे तरूण पुढे आले. ज्यांचा चळवळीशी सुतराम् संबंध नव्हता, अशा सामान्य तरूणांना चेतना मिळाली. तासगावचा मोर्चा श्री. पागे यांनी यशस्वी केला. तेथे तर खुद्द मामलेदार मोर्च्याचे स्वागत करण्यासाठी पुढे आला. कराडलाही श्री. बाळासाहेब उंडाळकर यांच्या नेतृत्वाखाली असेच यश मिळाले. आमची उमेद वाढली. पण लगेच ब्रिटिश सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले.

तरीही लोकांची जिद्द कमी झाली नाही. वडूजच्या प्रचंड मोर्च्यावर गोळीबार झाला. ९ माणसे त्यात दगावली. हुतात्मा परशुराम पहेलवान अमर स्मृती ठेवून गेले. इस्लामपूरच्या मोर्च्यावरही असाच निर्घृण गोळीबार झाला. मला आठवते, त्या गोळीबारात किर्लोस्करवाडीला इंजिनिअर असलेला पंड्या नावाचा तरूण बळी पडला. वास्तविक त्याचा चळवळीशी काहीही संबंध नव्हता, पण तो सर्वस्व झुगारून देऊन मोर्च्यात सामील झाला होता. अशी किती तरी नावे सांगता येतील.

दडपशाही वाढू लागली, तशी लोकांच्या मनांतील चीडही वाढीला लागली. एक प्रकारची बेडरपणाची वृत्ती जनतेत निर्माण होऊ लागली. ब्रिटिश सत्तेबद्दलचे प्रेम तर राहिलेच नव्हते, पण जी थोडी-फार भीती होती, तीही नष्ट झाली. शासनाबद्दल प्रेम किंवा भीती वाटणे हेच कुठल्याही सत्तेचे दोन आधारस्तंभ असतात. ते दोन्ही डळमळले होते.

केवळ गोळीबार, लाठीहल्ला एवढ्यापुरतीच ही दडपशाही मर्यादित नव्हती, तर भूमिगतांच्या नातेवाइकांना त्रास देणे, त्यांचा छळ करणे हे प्रकार सुरू झाले. माझे परिस्थिती थोडीशी अवघड होती. २ जून, १९४२ रोजी माझे लग्न झाले आणि ९ ऑगस्टपासन मी भूमिगत झालो. हा रामदासाचा तर सुधारलेला अवतार नाही, अशी शंका माझ्या पत्नीच्या मनात आलीही असेल. कारण, तिचे पूर्वायुष्य अत्यंत शांत वातावरणात गेले होते. असले वादळी जीवन पाहिल्यानेच ती अनुभवत होती, पण मोठ्या धीराने तिने या प्रसंगाला तोंड दिले. पण तेवढ्यावरच भागले नाही. माझा ठावठिकाणा शोधण्यासाठी सरकारने तिला त्रास दिला. इतकेच नव्हे, तर माझ्या मधल्या बंधूंना व माझ्या पत्नीला अटकेत ठेवण्यात आले. नव्या संसाराची स्वप्ने रंगवण्याच्या वयात तिला तुरूंगाची हवा चाखावी लागली, तीही तिने माझ्याशी लग्न केले, या एकाच अपराधाबद्दल! मला जास्त वाईट वाटले, ते तिच्या लग्नानंतरच्या पहिल्याच कौतुकाच्या संक्रांतीवर तुरूंगाची संक्रांत आली, म्हणून. पण तिने ह्या निराशेचा कडवटपणा कधीही जिभेवर येऊ दिला नाही. आम्ही भूमिगत कार्यकर्ते मात्र सणवार विसरून किर्लोस्करवाडी, औंध, ओगलेवाडी, कुंडल यांसारख्या संस्थानी हद्दीतील गावांतून आमच्या बैठकी घेत होतो. कार्यक्रम आखत होतो. जिल्ह्यात ठिकठिकाणी जाऊन सभा घेत होतो. त्या मंतरलेल्या काळात सभेची पूर्वतयारी वगैरे काही भानगड नव्हती. जनतेच्या मनात स्वातंत्र्याचा अग्नी धगधगत होता. फक्त पंधरा मिनिटे आधी एखाद्या गावात

सूचना जायची. पंधरा मिनिटांत हजारो लोक सभेला जमायचे. मला अशीच एक शिराळ्याची सभा आठवते. अक्षरशः पंधरा मिनिटांत प्रचंड जनसमुदाय हजर झाला होता. मी सभेत भाषण केले. पोलिसही हजर होते. पण एवढ्या जनसमुदायादेखत अटक करण्याचे अविचारी धाडस पोलिसांनी केले नाही. अशा वेळी सभा संपली, रे, संपली, की पोलिसांच्या हातावर तुरी देऊन त्या गावातून पोबारा करण्याची खबरदारी घ्यावी लागे. त्या काळात जनतेचे प्रेम म्हणजे काय असते, याचा जो अनुभव आला, तो लाख मोलाचा होता. सामान्य लोक फार आपुलकीने वागवीत. अहमहमिकेने खाण्यापिण्याची सोय करीत. एखाद्या गावात आम्ही मुक्कामाला असलो आणि एखादा अनोळखी चेहरा गावात दिसला, की ताबडतोब आम्हांला संदेश मिळत असे. लोक आमच्या रक्षणासाठी अत्यंत जागरूक असत. शक्यतो एका रात्रीपेक्षा अधिक काळ एका गावात वस्तीला राहावयाचे नाही, असा आमचा अलिखित नियम होता. पण काही वेळा हा नियम पाळणे अशक्य असे. माझ्यावर असा विलक्षण प्रसंग आला होता. माझे सर्वांत मोठे बंधू वारले. ही बातमी मला समजली, तेव्हा मीच स्वतः अतिसाराने भूमिगत अवस्थेत अंथरूणाला खिळून होतो. घोडनदीला एका लोणाऱ्याच्या घरात मी पंधरा दिवस रूग्णावस्थेत काढले. गावात आजारपणाची चर्चा नको, म्हणून पुण्याच्या डॉक्टरकडून औषध आणले जात असे. बंधूंच्या मृत्यूचे दुःख अगतिकतेमुळे फार फार जाणवले.

ब्रिटिश सरकारने दहशतीचे व दडपशाहीचे वातावरण तीव्र करण्याचेच धोरण स्वीकारल्याबरोबर जनतेची प्रतिक्रियाही तितक्याच तीव्रतेने दिसू लागली. सरकारच्या दडपशाहीला समर्थपणे तोंड देण्यासाठी सर्व कार्यकर्ते दंड थोपटून उभे राहिले. येथून सातारा जिल्ह्यातील लढ्याचा दुसरा टप्पा सुरू झाला. सर्व राष्ट्रीय नेते तुरूंगात होते. अधिकृत मार्गदर्शन मिळत नव्हते. तथापि, श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आणि श्री. अच्युतराव पटवर्धन यांचे मार्गदर्शन मिळत होते. तरीही प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक कार्यकर्त्यांनाच आपापले कार्यक्रम ठरवावे लागत होते. यामुळे एक मोठा फायदा झाला. तो असा, की या निमित्ताने अनेक धडाडीचे तरूण पुढे आले. नेतृत्व करू लागले. अशा धाडसी तरूणांचे गट तयार झाले. या गटांनी रेल्वे स्टेशनावर हल्ले करणे, खजिना लुटणे, शस्त्रे पळविणे यांसारखे प्रखर कार्यक्रम हाती घेतले. ब्रिटिश सरकारशी प्रसंगी दोन हात करण्याची तयारी असावी, हा हेतू होता. ब्रिटिश सरकार खिळखिळे कारणे एवढेच ध्येय त्यांच्यापुढे होते. कराडच्या

आसमंतात लक्ष्मणराव धन्वंतरी, काशीनाथ शेटजी, सदाशिव पेंढारकर, महादेवराव जाधव, भिकुबा साळुंखे, बाबूराव कोतवाल अशी किती म्हणून नावे सांगावीत ? त्यांच्या त्या वेळच्या धडाडीचे कौतुक करायला शब्द अपुरे पडतात.

त्याचबरोबर जिल्ह्याचे नेतृत्व करायला श्री. नाना पाटील, श्री. किसन वीर, श्री पांडू मास्तर, श्री. नागनाथ नायकवाडी, श्री. जी. डी. लाड, बर्डेमास्तर, श्री. वसंतराव दादा यांच्यासारखे जबरदस्त व कणखर कार्यकर्ते चळवळीच्या पाठीशी होते. त्यांच्यापैकी एकेकाचे कर्तृत्व सांगायचे, तर स्वतंत्र पुस्तक लिहावे लागेल. स्वातंत्र्य-चळवळीतील सातारा जिल्ह्याची भूषणे म्हणून यांचा उल्लेख करायला हरकत नाही. श्री. किसन वीर पकडले गेले, याचे आमच्यापेक्षा त्यांनाच जास्त दु:ख झाले. ही गोष्ट त्याना इतकी लागली, की सहा आठवड्यांच्या आत हा मनुष्य तुरूंग फोडून इतर सहकाऱ्यांसह बाहेर आला. श्री. वसंतराव दादाही असेच बहादुरीने तुरूंग फोडून बाहेर आले. श्री. नाना पाटलांच्या कथा तर सातारा जिल्हा हजारो जिभांनी अजून सांगतो.

ब्रिटिश सरकार या सर्वांच्या मागे हात धुऊन लागले होते. त्यासाठी निरनिराळे मार्ग अवलंबिण्यात येत होते. सरकारची खुशामस्करी करणारा एक वर्ग समाजात नेहमी अस्तित्वात असतो. तसा त्या वेळीही होता. अशा सरकारधार्जिण्या लोकांनी स्वातंत्र्य-सैनिकांच्या संबंधात अनेक गुन्हे केले. गावात अत्याचार केले, अनैतिक प्रकार केले. पोलिस त्यांना पाठीशी घालीत असल्यामुळे त्यांना कुणाची भीती वाटेनाशी झाली. सामान्य जनतेला त्यांच्यापासून उपद्रव होऊ लागला. तेव्हा ज्या जनतेने भूमिगत कार्यकर्त्यांना मोठ्या मायेने वागविले होते, त्या जनतेचे संरक्षण करणे कार्यकर्त्यांना आपले कर्तव्य वाटले. म्हणून अशा गुन्हेगारांना पकडून शिक्षा करण्याचे कार्य भूमिगत कार्यकर्त्यांना अंगावर घ्यावे लागले. अशा रीतीने गुन्हेगारांना शासन करणारे प्रतिसरकार सातारा जिल्ह्यात स्थापन झाले. 'पत्री सरकार' हे त्याचे अतिशयोक्त वर्णन होय. हे प्रतिसरकार स्थापन झाले, तरी त्याचे मूलभूत धोरण हेच होते, की मुद्दाम कुणाला ठार करावयाचे नाही आणि खाजगी मालमत्तेला हात लावायचा नाही. फक्त समाजाविरूद्ध व स्वातंत्र्य-चळवळीविरूध्द गुन्हे करणाऱ्यांना योग्य ती शिक्षा देण्यासाठीच या प्रतिसरकारचा जन्म झाला होता.

या धामधुमीत जिवावरचे गंभीर प्रसंग जसे येऊन गेले, तसे काळजाला

चटका लावणारेही प्रसंग अनुभवावे लागले. माझा मित्र सदाशिव पेंढारकर असाच चटका लावून गेला. अत्यंत प्रेमळ व धडाडीचा कार्यकर्ता पकडला गेला आणि सात वर्षांची शिक्षा त्याला झाली. तुरूंगात कॅन्सर झाला आणि गेला. त्याच्या मृत्यूने मी अतिशय हळहळलो. अजूनही ते दु:ख केव्हा तरी तीव्रतेने मला जाणवते ! अशी काही दु:खे असतात, की काळाचा कितीही प्रवास त्यावरून वाहून गेला, तरी त्याचा चटका विसरता येत नाही. सदाशिवचे दु:ख त्या प्रकारचे आहे.

पण यावर उतारा म्हणूनच, की काय योगायोगाने काही विनोदी प्रसंगही भूमिगत अवस्थेत माझ्यावर आणले होत. त्यांतला वानगीदाखल एक सांगायला हरकत नाही.

मला काही सहकाऱ्यांनी काही दिवसांसाठी जिल्ह्याबाहेर जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे रेल्वेने पुण्याला जायचे ठरले. कराडहून रात्रीच्या गाडीने निघायचे. माझ्याबरोबर दोन मित्र होते. त्यांतील एकाने सेकंडक्लासची तिकिटे काढावयाची आणि दुसऱ्याने डब्याच्या दाराजवळ उभे राहावयाचे. मी स्टेशनसमोरच्या रानात दबा धरून बसायचे - अशी योजना होती. त्याप्रमाणे मी रानात दबा धरून बसलो. एकजण तिकीट काढायला गेला. गाडी आली. दुसरा डब्याजवळ थांबला. मी धावत प्लॅटफॉर्मवर गेलो आणि डब्यात शिरलो. वरच्या बर्थवर डोक्यावर पांघरूण ओढून झोपून राहिलो. तो मित्र तिकीट काढायला गेला होतो, त्याचे आणि तिकीट मास्तरचे भांडण जुंपले. त्यामुळे त्याला तिकीट मिळालेच नाही. गाडी सुरू झाली आणि एक पोलिस आमच्याच डब्यात शिरला. आम्हांला वाटले, आता सर्व संपले. येथून पळणे कठीण. कारण गाडी चालू झाली होती. तेवढ्यात पोलिसाने आम्हांला विचारले.

'कुठे जाणार आहात?'

'पुण्याला.' निर्विकारपणाने माझा मित्र म्हणाला.

'तिकिटं कुठाहेत तुमची?' पुन्हा पोलिसाचा प्रश्न.

' फार घाई झाल्यामुळं आम्हाला तिकिटं काढायला वेळ मिळायला नाही. पण आम्ही पुढच्या स्टेशनवर गार्डाला सांगणार आहोत.' मी वेळ मारून नेण्यासाठी म्हणालो.

पोलिसांने आमच्याकडे पाहिले आणि आम्हांला विश्वासात घेऊन बोलण्यासारखे तो म्हणाला,

'कोणाला सांगताय् ? गार्डाला? मी आहेच की इथं. तिकिटाचे पैसे गार्डाला देण्याऐवजी मला द्या, म्हणजे झालं. मी तुम्हांला सुखरूप स्टेशनबाहेर पोचवीन.'

मला हसू आले. त्या बिचाऱ्याला चळवळीचा गंधही नसावा आणि असता, तरी त्याला तिकिटाचे पैसै अधिक महत्त्वाचे होते. मग मात्र आम्ही निश्‍चिंत मनाने झोपलो. आमच्या संरक्षणासाठी खास पोलिस होता. इतर पोलिसांना तर सोडाच, पण तिकीट-चेकरला सुद्धा तो डब्याकडे येऊ देणार नव्हता. माझा मित्र सातारा रोडला उतरून गेला. मला घोरपडीला उतरावयाचे होते. माझ्या रक्षकाने मला घोरपडीला उतरविले. सुखरूपपणे स्टेशनच्या बाहेर नेऊन पोचविले आणि वर एक सलामही ठोकला. मी खूश होऊन त्याला आणखी दहा रूपये दिले.

१ ९ ४ ३ च्या मे मध्ये माझी पत्नी अतिशय आजारी पडली. ती मृत्युशय्येवर असल्याची बातमी मला मिळाली. या बातमीने मात्र मी विलक्षण अस्वस्थ झालो. लग्न झाल्यापासून तिला सुखाचे दिवस असे दिसलेच नव्हते. सतत मनस्ताप आणि काळजी. तिच्या संसाराची सुरूवातच अशी दुःखमय झालेली. त्यात तुरूंगवासाचा त्रास. माझ्या मोठ्या बंधूंचा मृत्यू... माझे मलाच अपराध्यासारखे वाटू लागले. या क्षणी तरी मला तिला भेटलेच पाहिजे, हा विचार तीव्रतेने मनात येऊ लागला. माझ्या अनेक सहकाऱ्यांनी, असे करणे चूक आहे, असे सांगितले. पण शेवटी मी माणूसच होतो. माणसाचे गुणदोष माझ्यातही होते. मी पत्नीला भेटायला जायचा निर्णय घेतला. त्या वेळी ती फलटणला आपल्या माहेरी होती. फलटण हे संस्थान होते आणि तेथील पोलिस प्रमुख हा माझ्या श्‍वशुरांचा अत्यंत जवळचा स्नेही होता. तेव्हा फलटणला जाण्याचा फारसा धोका आहे, असे मला वाटले नाही. पत्नीला भेटून व तिला धीर देऊन आपण सहज परत येऊ, अशी माझी कल्पना होती. त्यादृष्टीने रात्री पुण्याहून निघायचे, १ ० वाजेपर्यंत फलटणला पोचायचे व पहाटे ४ वाजता परत यायचे, असा कार्यक्रम ठरला होता. पण तो दुर्दैवाचाच दिवस असावा. आमची गाडी नीरेजवळ पंक्चर झाली. मी पहाटे ४ वाजता फलटणला पोचलो. दुपारी वाड्याला पोलिसाचा वेढा पडला. ज्यांच्याबद्दल मला फार आशा वाटत होती, तो पोलिस प्रमुखच स्वतः दोन्ही हातांत दोन पिस्तुले घेऊन माझ्यापुढे आला. मला अटक झाली आणि माझ्या आयुष्यातील चळवळीचे एक पर्व संपले.

# ८... स्वातंत्र्याचा पहिला दिवस

स्वातंत्र्य-जी कालपर्यंत एक अमूर्त कल्पना होती, ती आज मूर्त स्वरूपात येत होती. जे, काल एक स्वप्न होते, ते आज सत्य ठरणार होते. जो, कालपर्यंत एक संकल्प होता, तो आज सिद्ध होणार होता. कालपर्यंत गुलाम असलेला एक देश आज स्वतंत्र होणार होता. पारतंत्र्याचा काळोख संपून स्वातंत्र्यासाठी मंगलप्रभात आज उगवणार होती.

अननुभूत आनंदाचा तो एक दिवस, कृतार्थभावनेचा तो दिवस आज पंचवीस वर्षांनंतरही माझ्या डोळ्यांसमोर ताजा आहे. पंचवीस वर्षे झाली. कालगणनेचे चक्र चालू आहे, अव्याहत चालू आहे, त्याची नोंदच आहे ती. ती चुकेल कशी? खरोखरच पंचवीस वर्षे झाली असलीच पाहिजेत; पण त्या दिवसाची आठवण झाली, की मनाचे हरिण केव्हाच त्या पवित्र दिवसापाशी जाऊन पोचते.

तो स्वातंत्र्यदिन, लौकिकार्थाने दि. १५ ऑगस्ट खरा; पण दि. १४ ऑगस्टलाच आम्ही त्याच्या स्वागतासाठी सिद्ध झालो होतो. त्या दिवशी मध्यरात्री जुन्या सचिवालयाच्या इमारतीवर तिरंगा फडकणार होता. अधिकृत अशा त्या स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य कार्यक्रमाचे वेध, तसे म्हटले, तर सकाळपासूनच लागले होते. मी तेव्हा पार्लमेंटरी सेक्रेटरी होतो, आणि त्या समारंभाला मला हजर राहावयाचे होते. आमचे बिऱ्हाड तेव्हा मरीन लाइन्सजवळ होते. येणाऱ्या-जाणाऱ्यांची वर्दळ घरी तेव्हा खूप असायची. त्याही दिवशी सकाळपासून मित्रमंडळी येत-जात होती. गप्पागोष्टी चालल्या होत्या. विषय स्वातंत्र्याचाच होता. माझे काही मित्र, स्वातंत्र्य-लढ्यातले माझे सहकारी मुंबईतला स्वातंत्र्यदिन सोहोळा पाहण्यासाठी मुद्दाम आले होते, तेही घरी होतेच. एका धन्यतेच्या भावनेने आम्ही स्वातंत्र्याबद्दल गोष्टी बोलत होतो. हा दिवस इतक्या लवकर पाहायला मिळेलसे आम्हांला पाच वर्षांपूर्वी - ४२ साली काही वाटले नव्हते. पण आज स्वातंत्र्याची पहाट झाली होती. ती कोवळी उन्हे अंगावर खेळवत असतानाच आम्हांला आमच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील काही प्रसंग आठवत होते, काही सहकाऱ्यांची याद येत होती. स्वातंत्र्य मिळाले,

आता पुढच्या जबाबदाऱ्या कोणत्या, याची चर्चा आम्ही करीत होतो.

गप्पागोष्टी चालल्या होत्या आणि माझ्या एका सहकाऱ्याने आम्हांला जवळजवळ सोळा वर्षे मागे खेचून नेले. आम्ही साजऱ्या केलेल्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाची आठवण निघाली होती. स्वातंत्र्य-चळवळीचा एक भाग म्हणून लाहोर काँग्रेसमध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रस्ताव संमत झाला, त्या दिवशी २६, जानेवारीला स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे आदेश काँग्रेसने दिले होते. १९३० सालची २६ जानेवारी जवळ येत चालली होती. कराडमध्ये हा स्वातंत्र्यदिन कसा साजरा करावयाचा, याचा आम्ही काही तरूण मंडळी विचार करीत होतो. मी तर तेव्हा वरच्या वर्गातला शाळकरी विद्यार्थीच होतो. पण काँग्रेसच्या चळवळीत स्वतःला लोटून दिलेले होते. समविचाराच्या युवकांत रंगून गेलो होतो. असेच आम्ही काहीजण कराडमधल्या एका छोट्या छापखान्यात जमलो होतो; दि.२६ जानेवारीचाच विचार चालू होता. 'स्वातंत्र्याची हाक' देणारे एक बुलेटिन तयार करून शाळेतून व चौकाचौकांतून वाटावे, अशी कल्पना पुढे आली आणि लगेच संमतही झाली. मी तेव्हा थोडासा लेखक होतो. शाळेतील निबंध वगैरे बऱ्यापैकी लिहीत असे. तेव्हा काही लिहिण्याचा प्रसंग आला, म्हणजे माझे सहकारी ते काम माझ्यावर टाकीत, त्या दिवशी 'स्वातंत्र्याची हाक' लिहिण्याचे कामही माझ्यावर आले होते. त्या रात्री लिहिलेली 'स्वातंत्र्याची हाक' स्वातंत्र्याच्या त्या पहिल्या दिवशी व त्यानंतर आज पंचवीस वर्षांनीही माझ्या कानांत खणखणते आहे.

त्या 'स्वातंत्र्याच्या हाके'तील शब्द जसेच्या तसे आज मला आठवणार नाहीत, हे खरे; पण त्याचा आशय निश्चितच आठवतो आहे. म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या लढाईतील आम्ही सैनिक आहो. देशाच्या स्वातंत्र्यासाठी पडेल तो त्याग करावयाला आम्ही सिद्ध आहो. प्रसंगी आमचे प्राणही आम्ही अर्पण करणार आहो. असा तो प्रतिज्ञालेखच होता. तेव्हाच्या तारूण्यसुलभ उत्कट भावनेला शोभणारा. ती 'स्वातंत्र्याची हाक' आम्ही कराडच्या चौकाचौकांतून कशी वाटली, शाळेतील विद्यार्थ्यांना कशी दिली, यांच्या आठवणी निघाल्या.

या आठवणींची उजळणी चालू असतानाची एक गोष्ट मला चांगलीच स्मरते. म. गांधींच्याबद्दल कृतज्ञतेच्या भावनेने आमची मने अगदी ओतप्रोत भरून आली होती. आम्ही स्वातंत्र्यदिन साजरा करीत होतो, पण आमचा स्वातंत्र्याचा सेनानी मात्र दूर नोआखलीमध्ये दंगलीत बरबाद झालेल्यांचे अश्रू पुसत होता. त्यांची आठवण झाली आणि माझे मन गंभीर झाले. मी गांधीवादी

केव्हाच नव्हतो, पण गांधीजींबद्दल एक अपरंपार श्रद्धा मनात वागवत होतो. इतरांप्रमाणेच मीही त्यांना केवळ लांबूनच पाहिलेले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही स्वातंत्र्याची लढाई लढली होती. बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी जनतेने निर्भय होऊन झुंज दिली होती, ती म. गांधींच्याच प्रेरणेने ! भारत स्वतंत्र होत असताना त्यांचे स्मरण पदोपदी येत होते. माझे लक्ष सहज माझ्या घरातील भिंतीवर गेले आणि मनातल्या मनात मला शरमल्यासारखे झाले. माझ्या मुंबईच्या घरी म. गांधींचा फोटोसुद्धा नव्हता ! मन बेचैन झाले. चाललेल्या गप्पांतून लक्ष उडाले आणि सारखे वाटू लागले, हे काही खरे नाही. आज स्वातंत्र्यदिन आहे. आज आपल्या घरी म. गांधींची तसबीर आपण लावू या.

मनात आले आणि मी हळूच घरातून बाहेर पडलो. कोणाशीही न बोलता, कोणालाही न सांगता, मरीन लाइन्स स्टेशनजवळचा रेल्वेचा ओव्हरब्रिज ओलांडला आणि चालत- चालतच ठाकुरद्वार नाक्यावर पोचलो. रस्ता गर्दीने दुथडी भरून वाहत होता, पण माझे गर्दीकडे लक्षच नव्हते. मी फ्रेममेकरचे दुकान शोधत होतो. एक दुकान सापडले; तिथे मिळाला, तो म. गांधींचा एक फोटो मी घेतला आणि घराकडे निघालो. हातात म. गांधींची ती तसबीर होती, आणि मनात त्यांच्याबद्दलची अपरंपार कृतज्ञता होती. त्यांचाच विचार करीत मी चाललो होतो. घरी आलो आणि माझ्या अभ्यासिकेत तो फोटो मी लावला, तेव्हा माझे मन थोडे शांत झाले.

आज पंचवीस वर्षे झाली, मरीन लाइन्समधून आम्ही मलबार हिलवर गेलो, आणि गेली दहा वर्षे आमचे बिऱ्हाड दिल्लीला आहे. घराच्या जागा बदलल्या. कालमानानुसार घरातले फर्निचर बदलले. अनेक कलावस्तूंचीही भर पडली. पण बदलली नाही, अशी एकच वस्तू म्हणजे म. गांधींचा तो फोटो.

त्या फोटोचा विषयच निघाला, म्हणून सांगायला हरकत नाही. सौ. वेणुताईंची त्या फोटोवर अपरंपार श्रद्धा जडलेली आहे, का, कोणास ठाऊक, त्या फोटोला ती काधीही नजरेआड होऊ देत नाही, फुटू नये, म्हणून तिने त्याची काच काढून ठेवली आहे. प्रवासाला निघाली, तर म. गांधींची ती तसबीर तिच्या सामानात हलक्या हाताने, कपड्यांच्या घडीत जपून ठेवलेली असते.

म. गांधींची तसबीर लावली आणि थोडक्यात वेळात एका सभेसाठी मी भायखळ्याला गेलो. जागा आता नक्की आठवत नाही; पण बहुधा डिलाईल रोडवरील चाळ असावी. सातारा जिल्ह्यातील कामगारांनी स्वातंत्र्य-दिनाची सभा ठेवली होती. एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून स्वातंत्र्यदिनांच्या त्या सभेत भाग

घेताना मला अतिशय आनंद झाला होता. माझे भाषण लोकांना कसे वाटले, कोणास ठाऊक; पण मला ते अजून आठवते आहे. एका भारावलेल्या मनःस्थितीत मी भाषण संपवून बसलो होतो. म. गांधींच्या तसबिरीचा विषय ताजा होता. म.गांधीच्या नेतृत्वाबद्दल, त्यांच्या नोआखलीच्या यात्रेबद्दल त्या सभेत मी बरेच काही सांगितले. त्या दिवशी मी अगदी गांधीमय होऊन गेलो होतो.

सभा संपवून मी घरी निघालो. रात्रीच्या मुख्य समारंभाला हजर राहण्याची घाई होती. सभेला मी आलो, तेव्हा ध्यानात न आलेली एक गोष्ट आता दिसत होती. लोकांचे जथेच्या जथे आनंदोत्सवात भाग घेण्यासाठी निघाले होते. रोशनाई झाली होती. स्वातंत्र्याचे वारे संचारले होते. एक गुलाम देश स्वतंत्र झाला होता. आजच्या पिढीला या आनंदाची कल्पना सांगूनही येणार नाही. एक प्रकारच्या बहोशीतच मी घरी पोचलो होतो. स्वातंत्र्य घोषित व्हायला आता अवघे दोन तास उरले होते. उत्कंठा, औत्सुक्य, उत्साह, समाधान, इत्यादी भावनांचे अमृतमय रसायन या दोन तासांत इतके उदंड भरले होते, की विचारू नका. थोड्याच वेळाने जुन्या सचिवालयात मी पोचलो. ओव्हल मैदानाच्या बाजूला जी चिंचोळी बाग, त्या बागेत आम्ही उभे होतो. बाळासाहेब खेर मुंबई राज्याचे पंतप्रधान होते. जुन्या सचिवालयाच्या पोर्चवर त्यांनी राष्ट्रध्वज फडकवला. विश्वविजयी प्यारा तिरंगा वायुलहरींवर डोलू लागला. भारत स्वतंत्र झाल्याची ती निशाणी होती. ध्वजवंदन झाल्यावर, मला वाटते, बाळासाहेब खेरांचे थोडा वेळ भाषण झाले. आज त्या भाषणातले मला काहीच आठवत नाही. झेंडावंदनाच्या वेळची धुंदी, हर्ष मात्र, आज पंचवीस वर्षे झाली, तरी डोक्यात घर करून बसला आहे. पुढे अनेक महत्त्वपूर्ण प्रसंगी झेंडावंदने झाली. मी राज्याचा मुख्यमंत्री झालो, तेव्हा झेंडावंदन झाले. संरक्षणमंत्री म्हणून लाल किल्ल्यावर होणाऱ्या झेंडावंदनाच्या समारंभाचे यजमानपदही मी भूषविले. पण जुन्या सचविलयाच्या छोट्याशा हिरवळीवर झालेले स्वतंत्र भारतातील पहिले झेंडावंदन अजूनही आठवते.

आठवण झाली, की अजून मन मोहरून येते. हृदय भरून येते. देह पुलकित होतो. या झेंड्याला स्वतंत्र भारताच्या नभांगणात फडकलेला पाहावा, म्हणून जी लढाई झाली, तीमधील मी एक साधा सैनिक, हा झेंडा खांद्यावर घेऊन शाळकरी जीवनात मिरवणुका काढल्या. पोलिसांची कडी तोडून या झेंड्याचा सन्मान राखण्यासाठी मार खाल्लेला मी, मी एक शिपाई. आज कृतार्थपणे त्या झेंड्याचे वैभव पाहत होतो. भारत स्वतंत्र झाला होता. एक

संकल्प सिद्ध झाला होता. स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवशी हे स्वातंत्र्य सार्थ करण्याचे नवे संकल्प मनात डोकावत होते.

खरे म्हणजे, हे संकल्प तसे नवे नव्हते. स्वातंत्र्याच्या चळवळीत आम्ही ओढले गेलो होतो, हे काही नुसत्या स्वातंत्र्याच्या भावनात्मक कल्पनेने नाही; आणि केवळ भौगोलिक कल्पनेनेही नाही. स्वातंत्र्याचा राजकीय, सामाजिक व आर्थिक अर्थ हा ध्येयरूपाने मनात वागविला होता. म्हणूनच झेंडावंदन संपवून घरी परतताना मी विचारमग्न झालो होतो. हे संकल्प सिद्ध होतील का? स्वातंत्र्याचा सामाजिक व आर्थिक समतेचा अर्थ प्रत्यक्षात उतरेल का ? डोक्यात काहूर उठले होते.

मन असे साशंक का होते? त्यालाही काही कारणे घडली होती. दि. १५ ऑगस्टला देश स्वतंत्र झाला; पण तो लौकिकार्थाने, कारण सत्ता त्यापूर्वीच हाती आली होती. १९४६ च्या निवडणुकीत आमचा पक्ष विजयी झाला होता व प्रांतिक सरकारे स्थानापन्न झाली होती. गेले पंधरा महिने आम्ही सत्ता राबवतच होतो. लोकांशी आमचे संबंध येत होते. आमच्या कारभाराबद्दल बरी-वाईट मते ऐकायला मिळत होती; आणि सत्तेचा हा अनुभव काही फारसा उत्साहवर्धक नव्हता. चालला आहे, असाच कारभार जर चालू राहिला, तर स्वातंत्र्याचे जे अर्थ अभिप्रेत आहेत, ते साकार होतील का, असे वाटू लागले होते. पक्षाच्या बैठकीत झालेल्या चर्चा आठवत होत्या आणि त्या वेळच्या प्रांतिक नेतृत्वाने घेतलेल्या भूमिकांबद्दल नाराजी वाढू लागली होती. कार्यकर्ते उघड बोलू लागले होते.

मला एकदम महारवतन रद्द करण्यासंबंधी झालेला वादविवाद आठवला १९४६ च्या अखेरीस महाराष्ट्रभर महारवतन रद्द करण्यासंबंधी मोठी चळवळ झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या त्या चळवळीला माझा मनातून पांठिबा होता. पक्षाच्या बैठकीत, प्रांतिकच्या नेत्यांजवळ मी चर्चा केली होती. महारवतन रद्द करा, असे मागणे घेऊन जेव्हा प्रचंड मोर्चा आला, तेव्हा आपण वतने नष्ट करण्यासाठी घोषणा करू या, असे मी सुचविले होते. पण मला मिळालेला प्रतिसाद निराशाजनक होता. (पुढे मी मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्या काही दिवसांतच आम्ही महारवतने नष्ट केली, त्याची पार्श्वभूमी इतकी जुनी होती.)

साशंकतेचे आणखी एक कारण होते. ते म्हणजे कारभारावरील अधिकारी वर्गाच्या पकडीचे. तेव्हाचे मुरब्बी अधिकारी होते कार्यक्षम, हुशार; पण

सत्तान्तरापलीकडे स्वातंत्र्याचा जो अर्थ आम्हांला अभिप्रेत होता, त्याच्याशी ते समरस झालेले नव्हते, होण्याची शक्यता दिसत नव्हती, तसा विश्वास वाटत नव्हता. गेल्या पंधरा महिन्यांतील असे काही प्रसंग, काही पेचप्रसंग, अधिकाऱ्यांशी झालेले वाद आठवत होते.

आणखी काही लोकांची सत्तेवर पकड वाढणार, की काय, अशी भीती वाटू लागली होती. आम्ही जेव्हा लढत होतो. तेव्हा त्यांचे चेहरे कधी दिसले नव्हते, त्यांच्या अंगांवर खादीचे कपडे चढले होते. सत्तेच्या नेहमीच जवळ वावरणारे हे लोक आमच्या पक्षात दिसू लागले होते. थोड्याच वेळापूर्वी असे काही चेहरे सचिवालयाच्या हिरवळीवर पाहिलेले नजरेसमोर येत होते आणि स्वातंत्र्याचा अर्थ हे लोक सार्थ करू देतील का, असे वाटत होते.

या सगळ्याचा परिणाम पक्षावर होताना मला स्पष्ट दिसत होता. पक्षात जोरात वादविवाद चालू झाले होते. आजच सकाळी आमच्या गप्पांत झालेली चर्चा ताजी होती. काही कार्यकर्त्यांच्या बैठका झाल्याच्या बातम्या येत होत्या. त्यांचे वृत्तांत कळत होते. निमंत्रणे मिळत होती. एकीकडे आता जो शेतकरी कामगार पक्ष म्हणून प्रसिद्ध आहे, त्याच्या स्थापनेची तयारी चाललेली दिसत होती. कॉंग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचे पायही रिंगणाबाहेर पडणार, असे वाटू लागले होते. पक्षांतर्गत संघर्षाची चाहूल लागली होती.

या सगळ्या गोष्टी विचारांच्या आवर्तात घोंगावत होत्या. पण त्याच वेळी म. गांधी, पं. नेहरू यांच्या नेतृत्वाचा आधार वाटत होता. स्वातंत्र्ययुद्धाचे हे सेनानी, ज्यांनी राजकीय बदल घडविला, ते आर्थिक व सामाजिक बदल घडविल्याशिवाय राहणार नाहीत, असे मनोमन वाटत होते. तोच दिलासा होता. तेच सामर्थ्य होते. आतापर्यंतच्या निराशेच्या ढगातून प्रकाशाची रूपेरी कडा या दोघां नेत्यांच्या स्मरणातून मनात चमकून गेली आणि मनाला थोडी स्वस्थता मिळाली. विश्वासाने मी स्वतःशीच म्हणालो:

'चला, पहिली मजल संपली, एक चढ चढून आलो; आता पुढल्या चढाईची वाटचाल सुरू!'

# ९... कृष्णाकाठची प्रदक्षिणा

संगम जिथे कुठे झालेला असेल, ते ठिकाण माझ्या आवडीचे असते. मला ते रम्य वाटते. स्फूर्ती देणारे, जीवनाचा एक वेगळाच अर्थ सांगणारे असे भासू लागते. नद्यांचा संगम झालेले स्थान हिंदुस्थानात पवित्र मानले जाते; पण ते धार्मिक अर्थाने. मला ते भौतिक दृष्टीने पवित्र वाटते. ते मनाला काही वेगळेच सांगत असते. दोन नद्या एकात एक मिसळतात, तेव्हा दोन शक्तींचे मीलन झाल्याचे ते दर्शन असते. दोघी एक होऊन, एकरूप, एकजीव होऊन पुढे जातात आणि हजारोंचे जीवन संपन्न करीत असतात.

माणसामाणसांचे असे मीलन होईल, विचारांचा संगम होईल आणि माणसे एकजीव बनून कर्तृत्व करतील, तर सारेच सुखाने नांदतील, त्यांचे जीवन संपन्न बनेल, राग, द्वेष, स्पर्धा, शत्रुत्व त्या संगमात मिसळून-विरघळून जाईल आणि विशुद्ध जीवनाचा स्रोतच पुढे जात राहील, असे निसर्गाने निर्माण केलेल्या संगमाच्या ठिकाणी उभे राहिले, की माझे मन सांगू लागते.

कृष्णा-कोयनेच्या प्रीति-संगमाच्या सान्निध्यातच मी लहानाचा मोठा झालो. खेळलो, बागडलो. त्या संगमात डुंबलो. त्याचाही हा परिणाम असेल कदाचित. श्रावणातला हर्षाचा पाऊस पडून गेलेला असावयाचा; पृथ्वीचा उत्साह ओसंडू लागावयाचा. कृष्णा-कोयनेची ऐन पावसाळ्यात गढूळ झालेली पात्रे काहीशी निवळलेली असावयाची आणि ते निवळशंख जीवन एकजीव बनून, पात्राचे दोन्ही काठ धरून भरल्या उभारीने संथपणाने पुढे चाललेले पाहून नदीच्या पात्राप्रमाणे मनही आनंदाने काठोकाठ भरून जात असे. वरून संथ दिसणाऱ्या या प्रवाहाची अंदरकी बात काही वेगळी असल्याचे नावाडी सांगत असत. त्यांचे म्हणणे, वरून प्रवाह संथ दिसतो, परंतु पाण्याला आतून ओढ चांगलीच असते. शक्य आहे; लक्षावधींचे जीवन संपन्न करण्यासाठी निघालेला प्रवाह, त्याच्या अंतर्मनात वेगाने पुढे जाण्यासाठी ओढ असणारच!

श्रावणातला शेवटचा सोमवार आमचा मोठा आनंदाचा दिवस असावयाचा, माझ्या लहानपणी, कराडला, कृष्णेच्या तुफान भरलेल्या पात्रात नावांच्या

शर्यती होत असत. दिवस ठरलेला - शेवटचा श्रावणी सोमवार. शर्यत अशी असावयाची की, प्रवाहात नाव सोडल्यानंतर सरळ रेषेने नावेने पलीकडचा तीर गाठावयाचा. सरळ रेषेत पल्याड तीरावर पोहोचावयाचे, ही त्यांतील प्रमुख अट, जी नाव सर्वांत प्रथम पोहोचेल, तिने ती शर्यत जिंकली, असा निकाल जाहीर व्हावयाचा, सरळ रेषेत पाणी कापीत जावयाचे काम मोठे कष्टाचे असे. कारण पाण्याला आतून ओढ असावयाची आणि अंतःप्रवाहातील धार कापीत -कापीत पल्ला गाठावा लागे. सरळ रेषेत जाण्यासाठी नावाड्यांना अति कष्ट पडत असत. दोन्ही तीरांवर उभे असलेले शेकडो लोक मात्र नावांच्या शर्यती पाहून आनंदित होत असत. या आनंदात पुष्कळदा मीही सहभागी झालो आहे. या शर्यतीत रेठरे गावाचे नावाडी - आंबेकरी हमखास यश मिळवीत.

कृष्णाकाठावर उभे राहिल्यानंतर स्वच्छ जीवनाचा तो प्रशांत प्रवाह आणि तीरावरील हिरवागार सुंदर निसर्ग पाहत राहणे याचा आनंद काही वेगळाच. अंतःकरणात तो बसून राहतो आणि स्मरणमात्रे अंतश्चक्षूंसमोर उभा राहतो. लहानपणापासून कृष्णाकाठचे प्रेम माझ्या मनात भरून राहिले आहे.

दहा-बारा वर्षांचा असेन मी. असाच एकदा वाईच्या खोऱ्यात असलेल्या मेणवली गावी गेलो होतो. मेणवलीला नाना फडणविसांचा टोलेजंग वाडा आहे. तो मी पाहिला, पण मेणवलीच्या कृष्णाकाठावर, कृष्णेच्या घाटाचे शिल्प मोठे सुंदर आहे, कलापूर्ण आहे. या घाटावर उभे राहिले की, कृष्णामाईचे लांबच लांब पात्र दिसते आणि महाबळेश्वर सोडून निघाल्यानंतर ज्या डोंगर-दऱ्यांतून कृष्णामाई झेपावत पुढे येते, ते खोरे समोर उभे दिसते. नितांतसुंदर, रम्य असे हे ठिकाण माझ्या ते चांगलेच लक्षात राहिलेय्.

महाबळेश्वरात एकाच ठिकाणाहून पाच नद्या उगम पावतात आणि डोंगरातून वेगवेगळ्या अंगांनी वाटा काढीत, सपाटीवरून धावताना दिसतात. या पाच भगिनींचे एकमेकींवरचे प्रेम मोठे अमर्याद, जन्माच्या ठिकाणी त्या आपले आगळे अस्तित्व दाखवतात, पण ते क्षणभरच. फुगडीचा फेर त्यांनी धरला आहे, असे दिसावे, तोच त्या एकजीव होऊन जातात आणि गोमुखातून बाहेर उडी घेतात. उडी घेताना यांतील कृष्णा कोणती, वेण्णा कोणती, कोयना कोणती किंवा भागीरथी, सरस्वती कोणती, हे ओळखता येत नाही. दिसते, ती एक धार. गोमखातून ही स्वच्छ धार कुंडात उडी घेते आणि पुन्हा जमिनीच्या खालून वाटा काढीत पाच बाजूंनी पाच भगिनी निघून जातात. पुढे कुठेतरी मग डोंगरावरून खाली उडी घेताना दिसतात. भागीरथी आणि सरस्वती

गुप्त मार्गाने वाहत राहूनच आपल्या मोठ्या बहिणीला रस्त्यात कोठेतरी भेटतात, अशी आख्यायिका आहे. परंतु एक गोष्ट मात्र खरी, उगमापासून काही मैलांच्या अंतरावरच पाचही भगिनींचा मिलाफ होतो आणि कराडपासून पुढे या सर्वजणी कृष्णामय बनूनच सागराला भेटायला जातात. जरा थोराड अंगाची कोयना कराडला आपल्या भगिनीला, कृष्णामाईला कडकडून भेटते. संगमावर मग आनंदाचा कल्लोळ होतो. या ठिकाणी पोहोचलेल्या या सर्व जणींचे पंचामृत मोठ्या पात्रात साठते आणि चविष्ट, सुगंधित बनून पांथस्थांची तहान शमविण्यासाठी पुढे आणि पुढेच, महाराष्ट्र ओलांडून आंध्रात पोहोचते. पाचही भगिनींचे सागराशी मग एकाच वेळी मीलन होऊन जाते.

सबंध कृष्णाकाठ हा एक माझ्या प्रेमाचा, आवडीचा विषय आहे. महाबळेश्वरातल्या, उगमापासून निघून कृष्णेच्या काठाकाठाने थेट राजमहेंद्रीपर्यंत, तिच्या मुखापर्यंत जावे, असे माझे फार दिवसांचे स्वप्न आहे. बदलत्या पात्राची भव्यता पाहावी, निसर्गशोभा मनात साठवावी, गावोगावच्या लोकांना भेटावे, त्यांच्या चालीरीती पाहाव्यात, पिके डवरलेली शेती पाहावी, असे सारखे मनात येत असे. अजूनही येत राहते. श्रावणसरी कोसळू लागल्या की, कृष्णामाईची याद मनात हटकून येते.

श्रावण सुरू झाला, की आणखी एक आठवण मनात येते. ही आठवण होते 'आगाशिव' डोंगराची. कराडपासून दीड-दोन मैलांवरील हा आगाशिव. डोंगरावर महादेवाचे एक सुंदर मंदिर आहे आणि लेणी आहेत. दर श्रावण सोमवारी पुष्कळ शिवभक्त आगाशिव चढून महादेवाच्या दर्शनासाठी जात असतात. मुलांना आनंद असतो, तो लेणी पाहण्याचा आणि दिवसभर डोंगरावर भटकत राहून निसर्गाच्या सोबतीने खेळण्याचा. आम्ही विद्यार्थी शनिवार-रविवार गाठून हमखास जात होतो.

एकदा ज्ञानकोशकार केतकर यांना आगाशिव पाहण्यासाठी नेल्याची एक आठवण माझ्या मनात कायमची राहिली आहे.

कराडच्या हायस्कूलमधील गणेशमंडळाच्या त्या वेळी मी चिटणीस होतो. ज्ञानकोशकार केतकर उत्सवातील व्याख्याते म्हणून त्या वेळी कऱ्हाडला आले होते. बोलता-बोलता 'आगाशिव' चा उल्लेख निघाला, तेव्हा तो डोंगर, ते स्थान एकदा पाहावे, असे केतकरांच्या मनाने घेतले. माझ्यापुढे मोठा प्रश्न उभा राहिला. केतकरांचे वय झालेले, त्यांना डोंगर चढण्याचे श्रम मानवतील का, असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. त्यांना मी तसे सांगितलेही. परंतु

केतकरांची उमेद दांडगी, 'हो, हो! मी डोंगर चढू शकेन!' त्यांनी होकार भरला आणि वेळ ठरवून आम्ही मग आगाशिवच्या मार्गाला लागलो. आम्ही डोंगर चढू लागलो आणि थोड्याच वेळात माझी धास्ती खरी ठरली. पायथ्याचा थोडासा भाग केतकर आमच्या बरोबर चढले आणि मग पार थकले, संपूर्ण डोंगर चढून जाण्याचे लक्षण दिसेना, त्यांना ते झेपणारेही नव्हते. थकल्याने ते थांबले आणि एका दगडावर बसले.

मी विचार करू लागलो. आम्हांला तर डोंगरावर जायचे होते. लेण्यांत पोहोचायचे होते.

'तुम्ही आता असं करा, इथंच झाडाखाली विश्रांती घ्या.' मी केतकरांना सुचविले.

केतकरांनाही ते मान्य दिसले.

त्यांना मग विश्रांतीकरिता थांबवून आम्ही मुले पुढे गेलो.

आगाशिवला मी दरसाल जात असे. परंतु त्यामध्ये ज्ञानकोशकारांच्या बरोबर आगाशिवला गेल्याची आठवण मात्र मनात कायमची राहिली.

कृष्णाकाठ धुंडाळावा, डोंगरदऱ्यांतून हिंडावे, निसर्गशोभा लुटावी, हा माझा छंद जुना आहे. या छंदापायी तरूणपणी कराडच्या जवळचे आणि लांबचे अनेक गड, किल्ले चढलो, वसंतगड, सदाशिवगड, मच्छिंद्रगड हे तर आमच्या परिसरातील गड. सातारचा अजिंक्यतारा, परळीचा सज्जनगड, कोल्हापूरजवळच्या पन्हाळा या किल्ल्यांवरूनही सफरी केल्या. प्रतापगड, रायगडची मजल केली. गड आणि किल्ले चढण्याचा एक वेगळाच आनंद असावयाचा. किल्ला चढताना आणि चढून गेल्यावर त्या किल्ल्याचा निसर्ग आणि इतिहास यांचे तर दर्शन घडतेच, परंतु एकदा किल्ल्यावर चढून उभे राहिले आणि अवतीभोवती सभोवार नजर टाकली. म्हणजे खालून वाहणाऱ्या नद्या, पाण्याने भरलेली त्यांची पात्रे, नागमोडी वळणाचा त्यांचा तो मार्ग आणि तीरावरील वृक्षांच्या रांगा पाहून मन हरखून जात असे.

शेतांची शोभा वेगळीच. काही शेतांतली पिके निघालेली, काहींतली उभी, मध्येच एखादे गवताचे, सरमडाचे, कडब्याचे बुचाड शिखरासारखे दिसायचे. एकाच गालिच्यावर निरनिराळ्या रंगांचे आणि आकारचे पट्टे काढून गालिचा आकर्षक बनवितात, तसा हा शेतीच्या अंथरलेला गालिचा उंचावरून मोठा सुंदर दिसतो. सृष्टीच्या रूपाने अशा वेळी मला वारकऱ्यांचे दर्शन घडायचे.

कराडहून पंढरपूरला जाणारे वारकरी मी पाहत असे. वारकऱ्यांची पताका, गळ्यातला वीणा, खांद्यावरची पडशी, हातांतले टाळ, गळ्यातली माळ, डोक्यावरचे मुंडासे, प्रत्येकाचा रंग वेगळा. चेहऱ्याचेही तसेच. कपाळावर बुक्क्याचा टिळा आणि इतरत्र गोपीचंदन. निरनिराळ्या रंगांच्या मुद्रा उठविलेल्या पाहताक्षणीच निरागसता लक्षात यावी, पवित्र वाटावे, अशी एकूण ठेवण. डोंगरावरून शेताचे, सृष्टीचे दर्शन असेच व्हावयाचे. जीवनातले ते दिवस सुगीचे वाटत असत.

हळूहळू ते दिवस मागे सरकले. विचाराने, कृतीने, मनाने राजकारणात राहून मी धावपळ करीत होतो. टप्पे ओलांडीत राजकारण पुढे चालले, तसा मीही जात राहिलो. भारत आज स्वातंत्र्याच्या टप्प्याजवळ येऊन पोहोचला होता आणि मी मुंबईत येऊन थांबलो होतो. कऱ्हाडच्या प्रीतिसंगमाच्या आठवणी बाळगून आणि कृष्णाकाठची प्रदक्षिणा करण्याचे स्वप्न मनात धरून! मुंबईत सरकारी कामे करीत होतो. भारत स्वतंत्र झाला आणि राजकारणात मला आणखी एक पुढची झेप घ्यावी लागली. प्रवासाची कक्षा आता थोडी रूंदावली.

# १०... केल्याने देशाटन

कामानिमित्त दिल्लीला आणि अन्यत्र कुठे कुठे जात-येत होतो. परंतु संपूर्ण भारत अजून मनानेच पाहत होतो. मी धावत असताना, मन माझ्याही पुढे पळत राहिले. वर्षामागून वर्ष ही पाठशिवणी चालूच राहिली. भारतयात्रेचे प्रस्थान मी ठेवले. तेव्हाच ही पाठशिवणी थोडी थांबल्यासारखी वाटली. परंतु तोपर्यंत १९६२ साल उजाडले होते. वयाने जवळजवळ पन्नाशी गाठली होती. जबाबदारीच्या कामासाठी आता मला भारतभ्रमण करावे लागणार होते. समाधान होते, देशाटनाची इच्छा पूर्ण होत असल्याचे.

भारताच्या निरनिराळ्या भागांत हिंडून आल्यावर आणि भारतातील विविधता पाहिली, तेव्हा भारत म्हणजे काय, याची मला कल्पना आली. कृष्णा, कोयना, आणि गोदावरीच्या तीरांवरील भारत मी पाहिला होता. परंतु सिंधूच्या तीरावरील, लेहच्या परिसरातील भारत, ब्रह्मपुत्रेच्या दऱ्याखोऱ्यांतील भारत, गंगाकाठचा भारत, नागाभूमीत पर्वतराजीवर उभा असलेला भारत, नर्मदा, तापी व साबरमतीच्या तीरांवरील भारत आणि दक्षिणेत रामेश्वरापर्यंत पसरलेला, नारळ-पोफळींनी शाकारलेला भारत, गोमंतकातील काजूसारखा आटोपशीर भारत, सागराच्या धडका परत फिरविणारा लांबच लांब किनाऱ्याचा भारत, असा हा विविधतेने नटलेला भारत पाहिला; डोळे भरून पाहिला. रोमहर्षक काव्य मनात साठवले. देशाटनाने बरेच काही साध्य झाल्याचा प्रत्यय आला. भारताचे वर्णन करणारी पुस्तके पुष्कळ वाचली होती. त्यामुळे भारत जेवढा समजला, त्याच्यापेक्षा किती तरी पटीने अधिक ज्ञान देशाटनाने मिळाले. दिल्लीला गेल्यानंतर संरक्षणाच्या कामासाठी भारतभ्रमण पुष्कळ करावे लागले. परंतु हे भ्रमण इथेच थांबणार नव्हते. त्यातूनच पुढे जागतिक भ्रमण, पृथ्वीपर्यटन सुरू व्हायचे होते आणि तसे ते सुरू झालेही.

परदेशी जाण्यासाठी भारताचा किनारा प्रथम मी १९६३ मध्ये ओलांडला संरक्षण-व्यवस्थेच्या सरकारी कामासाठी त्यावेळी रशिया, इंग्लंड आणि अमेरिका या देशांची सफर केली. त्यानंतर गेली पाच वर्षे तर दरसाल जगाच्या निरनिराळ्या देशांतून भ्रमण करीत आहे. या पाच वर्षांत माझी आता

पृथ्वीप्रदक्षिणा झाली. केवळ देशाटनाचेच नव्हे, तर पृथ्वीपर्यटनाचे अनेक अनुभव, अनेक प्रकारची माणसे, त्यांच्या चालीरीती, संस्कृती, इतिहास, राजकारण, साहित्य, कला, संगीत, निसर्गशोभा, जगाचे वैज्ञानिक वैभव, उद्योगाची उभारी अशी पुष्कळ माहिती संगृहीत झाली. पृथ्वीपर्यटन झाले, तरी पृथ्वीची संपूर्ण माहिती सापडली, असा दावा कोणालाच करता येणार नाही. पुष्कळ माहिती मिळाली, असेच म्हटले पाहिजे.

माझे सर्वच परदेशी प्रवास हे सरकारी कामासाठी म्हणून असतात. इंग्लंड, अमेरिका, लॅटिन अमेरिका, रशिया, युगोस्लाव्हिया, इजिप्त, सीरिया, थायलंड, ताश्कंद, मलेशिया, केनिया, लेबनान, सायप्रस, इटली, फ्रान्स, स्वीडन, कॅनडा, रोम, सिंगापूर, सिलोन, बांगला देश, जपान, मेक्सिको, जमेका, कॅरेबियन-सी मधील लहान लहान देश, गयाना, हवामा, बहामा, आफ्रिका, पेरू, इत्यादी जगाच्या पश्चिमेकडील आणि पूर्वेकडील अनेक राष्ट्रांत काही महत्त्वाच्या कामांकरिता जावे लागले. विविध देशांच्या प्रवासात असताना, नियोजित कामातून फुरसतीचे जे क्षण सापडतील, त्यावेळी, सामान्यतः तेथील ऐतिहासिक, प्रसिद्ध स्थळे, इमारती, सांस्कृतिक जीवन, शिक्षणसंस्था, विद्यापीठे, संरक्षणविषयक प्रशिक्षण संस्था, प्रबोधिका, शिल्पकला, वस्तुसंग्रहालये, बुकस्टॉल्स, नाट्यगृह, वाद्यवृंद आणि यांशिवाय त्यांच्या जीवनातील जे जे उत्तम असेल, ते पाहण्याचा, त्यांतील बारकावे समजून घेण्याचा मी प्रयत्न केला या भ्रंमतीत अनेकानेक गोष्टी मला पाहावयाची संधी मिळाली. परदेशांत वर्षानुवर्ष स्थायिक झालेल्या भारतीयांना भेटण्याचा आनंदही मिळाला.

परदेशांत भारतीय-हिंदी-समाज हा अभ्यासाचा वेगळा विषय आहे, असे मला वाटते. दुनियेच्या पाठीवरील वेगवेगळ्या देशांत, भारताच्या वेगवेगळ्या भागांतील जे लोक पोहोचले आहेत, त्यांच्या जाण्याचे आणि तेथील कामाचे स्वरूप हे वेगळे आहे. शे-दीडशे वर्षांपूर्वी मजूर म्हणून, गुलाम म्हणून जे गेले, त्यांच्यातील पुष्कळ लोक आता तिथे व्यवसायांमध्ये स्थिर झाले आहेत. ते गेले, त्या वेळच्या राज्यव्यवस्थाही आता बदलल्या आहेत. अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली आहेत. या भारतीयांचा, त्यांच्या मूळ भाषेचा संबंध तुटला असला, तरी त्यांना पूर्वजांची आठवण कायम आहे. मात्र बाहेर असलेल्या सर्वच भारतीयांना एकाच साच्यात बसवता येईल, अशी परिस्थिती नाही.

इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, कॅरेबियन -सी मधील त्रिनिदाद, गयाना, सुरीनाम, मॉरिशस, मलेशिया, जमेका या देशांतून भारतीय मोठ्या संख्येने

आहेत. दुनियेतील आफ्रिका, फ्रान्स, जपान, मध्यपूर्वेतील देश, सागरी बेटे इथेही भारतीय लोक पोहोचलेले आहेत. परंतु त्यांतील प्रत्येक ठिकाणची परिस्थिती, प्रश्न वेगळे आहेत. त्यामुळे परदेशांतील भारतीयांचा एकत्रितपणे, त्यांना एका साच्यात ठेवून विचार करता येणार नाही. अमेरिकेतील आधुनिक भारतीय हा वेगळा आहे. कोणी तिथे उच्च शिक्षणासाठी गेलेले आहेत, तर कोणी भारतात उच्च शिक्षण पूर्ण करून नोकरी-व्यवसायानिमित्त पोहोचला आहे. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा तिथे निरनिराळ्या क्षेत्रांत उपयोग आहे, म्हणून कोणी राहिलेले आहेत, तर अनेक जण, आर्थिक दृष्ट्या सोयिस्कर म्हणून स्थायिक झाले आहेत. अनेकांनी तेथील नागरिकत्व स्वीकारले आहे. ही मंडळी भारताकडे परत येणार आहेत, की पिढ्यान् पिढ्या तिथेच राहणार आहेत, हा एक प्रश्नच आहे.

कॅरेबियन -सीमधील त्रिनिदाद, गयाना, सुरीनाम, मॉरिशस, मलेशिया, इथेही मोठ्या संख्येने भारतीय आहेत. हे देश आता स्वतंत्र झालेले आहेत. गयानामध्ये हिंदी समाज म्हणून स्वतंत्र संस्था आहे. गयानामध्ये मी गेलो, तेव्हा या सर्वांना भेटलो, मंडळाचा म्हणून स्वतंत्र असा कार्यक्रम होण्याची गरज नव्हती. मी ज्या ठिकाणी गेलो, तिथेही भारतीयांचा स्वतंत्र असा कार्यक्रम आयोजित केलेला नव्हता; पण बहुसंख्येने भारतीय होते. जमेकामध्येही असेच घडले. जमेकामधील भारतीयांनी महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्वागतासाठी एक समारंभ केला. त्यानंतर मी तिथे असताना स्वतंत्रपणे ही त्यांनी मला बोलाविले. जमेकामध्ये भारतीयांची संख्या आठ-दहा हजारांच्या आसपास असावी. यांतील काही जुने आहेत, काही नव्याने पोहोचले आहेत. कोणी नोकरीसाठी गेलेले आहेत, तर कोणास यूनोच्या कामासाठी पाठविण्यास आलेले आहे. महाराष्ट्रातील दबडघाव, वैद्य अशी अलीकडेच गेलेली काही कुटुंबेही तिथे भेटली.

बरीचशी माणसे पिढ्यान् पिढ्या तिथे राहत असून, त्या त्या देशांच्या वातावरणाशी पोषक अशीच त्यांची वागणूक आहे. त्यांचे आणि भारतात राहणाऱ्या भारतीयांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. येथील काही मतभेद तिथेही पोहोचतात, त्यामुळे काही गुंतागुंती निर्माण होतात, हे खरे; पण त्यांच्या प्रश्नांची तुलनाच होऊ शकत नाही.

परदेशांतून परतल्यावर, भारतीय माणसे परदेशांतील माणसांबद्दल, त्यांच्या वृत्तीबद्दल, त्यांच्या भारतीयत्वाबद्दल प्रश्न विचारतात, तेव्हा मला मोठे

आश्चर्य वाटते. परदेशांत पिढ्यान् पिढ्या स्थायिक झालेल्या भारतीयाला आपल्यासमोर उभा करून ही मंडळी त्याच्याशी तुलना करतात आणि त्यांची भारतीय संस्कृती, भाषा, रीतिरिवाज, राष्ट्रनिष्ठा शाबूत आहे का; आणि नसेल, तर भारत सरकार त्या बाबतीत कोणती भूमिका स्वीकारणार आहे, असेही विचारतात.

माझे म्हणणे असे की, परदेशांतील भारतीयांच्या मनांत आपल्या पूर्वजांची, प्राचीन इतिहासांची आठवण कायम असल्याने, आजच्या भारताने त्या सर्वांशी संस्थात्मक संबंध ठेवण्याचे प्रयत्न करावेत. भारत सरकार त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. संगीत, हिंदी नृत्य, भाषा, वाङ्मय- पुरवठा यांद्वारे हा जिव्हाळा कायम टिकविण्याचा प्रयत्न आहे. शिक्षणासाठी किंवा अन्य सांस्कृतिक कार्यांसाठी त्यांना भारतात बोलाविण्यातही येते. माझ्यासारखी मंडळी त्या त्या देशाला भेट देतात, त्यावेळी तेथील भारतीय आवर्जून भेटीसाठी येतात. आम्हांला पाहून त्यांना आपल्या घरचा कोणीतरी आला आहे. अशी भावना निर्माण होते आणि प्रत्यक्ष भेटीच्या वेळी त्यांचे दर्शनही घडते. वर्षानुवर्ष दूरवर राहत असलेल्या भारतीयांना पाहून आपल्यालाही आनंद होतो. पण ही झाली एक बाजू; भावनात्मक म्हणा, फार तर, परंतु दुसरी बाजू यापेक्षा मला अधिक महत्त्वाची वाटते. भारताबाहेर पिढ्यान् पिढ्या ज्या कोणत्या देशात भारतीय नागरिक या ना त्या कारणासाठी स्थायिक झालेले आहेत, त्यांनी या देशाचे नागरिकत्व स्वीकारलेले आहे, हे उघड आहे. अशा स्थितीत त्यांचा देश कोणता? अर्थात ते ज्या देशाचे नागरिक बनले आहेत आणि नागरिकत्वाचे हक्क कायदेशीररीत्या उपभोगत आहेत, ते लोक त्याच देशाचे नागरिक ठरतात. ते ज्या देशात राहतात, तोच त्यांचा देश-राष्ट्र होय. कारण तेथील भाषा, चालीरीती, शिक्षण, राज्यपद्धती यांच्याशी समरस होऊनच ते तेथे राहत आहेत. जो मनुष्य ज्या देशाचा नागरिक बनला असेल, त्याने त्या देशाच्या प्रश्नांशी, हितसंबंधांशी, राजकारणाशी, समाजकारणाशी एकरूप होऊन, भागीदार बनूनच राहिले पाहिजे. भारतीय म्हणून वेगळेपणा जतन न करता त्या देशाचा नागरिक म्हणूनच, त्यांची वागणूक असावयास हवी. तो भारतीय आहे, म्हणून त्याने आपली संस्कृती, भाषा, देशाबद्दलचा जिव्हाळा, प्राचीनतेचा, इतिहासाचा अभिमान जरूर जतन करावा; पण हे सर्व त्याच्या किंवा कुटुंबाच्या मर्यादेपुरते असले पाहिजे, राहिले पाहिजे. हा स्वाभिमान त्या देशाच्या हिताच्या आड येता कामा नये. कारण त्याचा देश कोणता? तर तो

ज्या देशाचा पिढ्यान् पिढ्या नागरिक बनला आहे, तो त्याचा देश. त्याला दोन्ही घोड्यांवर स्वार होता येणार नाही. मूळची संस्कृती, देश, यासंबंधीचा जिव्हाळा असावा. पण प्राथम्य मात्र तो ज्या देशाचा नागरिक, त्या देशालाच त्याने दिले पाहिजे. आमच्या दृष्टीने त्याला विरोध असण्याचे कारण नाही. उलट, ते नागरिक तिथे समरस होऊन काम करीत राहिल्याने, भारत आणि तो देश यांच्यांत मैत्रीचे संबंध प्रस्थापित होण्यास मदतच होईल. भारताला जगातल्या निरनिराळ्या राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करावयाचे आहेत. त्याला, मला वाटले, हा दृष्टिकोन अनुकूल ठरेल.

दुनियेच्या सफरीत मी अनेक लहान-मोठे देश पाहिले, परंतु त्यांतील काही देशांची स्मृती, विशिष्ट कारणामुळं, तिथे जे पाहिले, अनुभवले, ऐकले, त्यामुळे कायमची टिकून राहिली आहे. सामान्यतः मी जिथे जातो, तेथील इतिहासप्रसिद्ध स्थळे पाहतो आणि सांस्कृतिक जीवन समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

१९६३ साली प्रथमच मी रशियाला गेलो. त्या वेळी, मोकळेपणाने काही भागांत हिंडलो. रशियाच्या खुल्या मैदानातील इतिहास, भुगोल पाहिला. मॉस्कोतील प्रदर्शनात शेतीपासून, विज्ञानाच्या आधुनिक अंतराळ-उड्डाणापर्यंची दालने पाहिली. लेनिन आणि टॉलस्टॉयच्या समाध्यांची दर्शने घेतली. वोल्गा नदीच्या किनाऱ्यावरील दुसऱ्या महायुद्धाच्या स्मारकांचा दुर्दशेचा तो इतिहास पाहिला. हे स्मारक एका टेकडीवर जिवंत करणाऱ्या कलावंतालाही भेटलो. टॉलस्टॉयने विश्वाचे चिंतन करण्यात सारी हयात घालविली, ते 'यस्ना पलाना' या ठिकाणचे त्याचे निवासस्थान, ते जिथे बसले, बोलले, लिहिले, ते सारे जिवंतपणाने जसेच्या तसे जतन करून ठेवलेलेही पाहिले. टॉलस्टॉयचे हे स्मारक म्हणजे एक जिवंत, बोलके, रम्य मनोहर असे तपोवन आहे. बालपणी टॉलस्टॉयचे ज्या वृक्षाचे बीजारोपण केले. तेच वृक्ष आता त्याच्या समाधीवर चौऱ्या ढाळत आहेत. फुलांचा वर्षाव करीत आहेत. ज्ञानाची दिव्य अनुभूती मिळावी, असे ते ठिकाण.

इंग्लंड आणि अमेरिका या दोन देशांच्या भेटींमध्ये लंडन इथे, इंग्रजांनी जतन केलेले जुन्या इतिहासांचे दालन पाहताना या कर्तृत्ववान देशाच्या चारशे-पाचशे वर्षांच्या क्रियाशीलतेचे दर्शन घडून गेले. भारत हा जसा प्राचीन इतिहासाने भरलेला देश आहे, आणि इथे जुनी ऐतिहासिक कागदपत्रे पाहावयास मिळतात, त्याचप्रमाणे लंडनमधील हे इतिहासाचे दालन युरोपातील इतिहासाने भरलेले आहे. प्रयत्नांतून, क्रियाशीलतेतून निघालेला हा इतिहास आहे. या

लोकांनी समुद्र व्यापले, साम्राज्ये निर्माण केली. युरोपचे जीवन घडविले. ते सर्व इथे पाहता येते. लंडनमधील जुने राजवाडे, वस्तुसंग्रहालये यांचे एक वेगळे आकर्षण आहे. लंडनमध्ये मी काही नाटके पाहिली. सुंदर नाटके पाहण्याचे लंडन हे उत्तम ठिकाण आहे. तेथील नाट्यजीवन मला प्रसन्न वाटते.

अमेरिकेच्या इतिहासाला तशी प्राचीनता नाही. अलीकडील तीनशे-चारशे वर्षांचा या राष्ट्राचा इतिहास आहे. परंतु आधुनिक जीवनातील विज्ञानाचा स्पर्श झालेल्या किंवा विज्ञानमय बनलेल्या ज्या गोष्टी आहेत, त्या पाहताना मनुष्य थक्क होतो. प्रामुख्याने मी तिथल्या शिक्षणसंस्था पाहिल्या, हॉर्वर्डसारखी विद्यापीठे पाहिली. डिफेन्स विभागातील एअर-फोर्स व नेव्हल अकादमी पाहिल्या. परंतु या सर्वांमध्ये जॉर्ज वॉशिंग्टनच्या निवासस्थानाने माझे मन आकर्षून घेतलं. जॉर्ज वॉशिंग्टन तेव्हा जसा राहत होता, त्या वेळचे ते रूप जसेच्या तसे जतन करून ठेवले आहे. तो कसा राहत होता, कोठे झोपत होता, त्याचे ग्रंथालय, स्वयंपाकघर, तो बसत असे, ती बग्गी हे सर्व पाहण्यासारखे आहे. त्याचा तिथे बंगला आहे आणि सभोवती शेकडो एकर जमीन आहे. त्या बंगल्यात प्रवेश केला की, जॉर्ज वॉशिंग्टनच्या जीवनाचे संपूर्ण चित्र समोर उभे राहते. मला हे ठिकाण फार आवडले.

न्यूयॉर्क आणि लंडन येथील नाट्यमंदिरे आणि तिथे सुरू असलेली काही नाटके ही पाहिली या दोन्ही शहरांतील नाट्य-कला-क्षेत्र मोठे भव्य आहे. मन प्रसन्न होते.

फ्रान्समधील पॅरिस हे युरोपच्या संस्कृतीचे केंद्र वाटले. एका अर्थाने मला हे शहर युरोपच्या संस्कृतीचे, केंद्रच होते. व्हर्सेलिसच्या पॅलेसमध्ये नेपोलियनच्या कर्तृत्वाचे दर्शन आजही घडते. नेपोलियनच्या वेळच्या परिस्थितीचे चित्र या ठिकाणी सजीवतेने उभे करण्यात आले आहे. या शहरातील ऐतिहासिक इमारत, उत्तुंग शिल्पकला, भव्य इमारती, वस्तुसंग्रहालये हे सर्व व्यवस्थित आणि नीट-नेटक्या अवस्थेत असलेले दिसून आले. फ्रान्सच्या सांस्कृतिक खात्याचे मंत्रिपद जेव्हा आँद्रे मॉर्ला यांच्याकडे सोपविण्यात आले, त्या वेळी या मंत्र्याने या सर्व शिल्पकला वास्तूंची मलिनता, जुनेपणा झटकून टाकून, त्या सर्व ताज्या टवटवीत बनविल्या. शहर मोठे सुंदर आहे. वस्तुसंग्रहालयांतील जुनी चित्रकला पाहताना मन मोहून जाते. शहराच्या मध्यभागी असलेल्या एका सुंदर चर्चसमोरील सुमारे अर्धा एकर जागेतील कलाकारांचा बाजार पाहताना पाय तिथेच अडखळतात. या पटांगणात कलाकार मंडळी लहान-

लहान तंबू उभारून, त्या ठिकाणी चित्रे रेखाटीत असतात. हे एका मोठे अजब ठिकाण आहे. चित्रे रेखाटणाऱ्या या कलाकारांचे हात मोठ्या कुशलपणाने फिरत असतात. पाहणारेही अवतीभोवती भटकत असतात. मला हा मेळावा पार लक्षवेधी वाटला. माझी ही आवड ध्यानात ठेवून, त्या मेळाव्याचे तेथील चित्रकाराने काढलेली एक चित्र माझ्या एका तरूण मित्राने नंतर मला भेट म्हणून दिले. मी मोठ्या चवीने माझ्या बैठकीच्या दालनात ते लावून टाकले आहे.

जगातल्या या मोठ्या शहरांतून फिरताना माझ्या असे लक्षात आले की, या महत्त्वाच्या शहरांना नदीकाठ आहे. सागराचा प्रचंड जलाशय पाहून मन प्रसन्न होते, हे तर खरेच; पण नद्यांचे काठ मला त्यापेक्षाही सुंदर दिसतात. नदीची मला फार भूरळ पडते. मी नदीकाठचा आहे, त्याचा हा परिणाम असेल कदाचित; पण नदीचे, जलाशयाने भरलेले पात्र आणि तीरावरील हिरवीगार वृक्षराजी, पिकाने भरलेली शेती पाहून माझ्या मनाला नदीकाठाचीच भुरळ अधिक पडते. मोठमोठ्या नद्यांचे किनारे व्यवस्थित राहतील, याकडे परदेशांतील मंडळींनी जे खास लक्ष दिलेले दिसते, ते लक्षात येते. नद्यांचा उपयोग प्रामुख्याने शेती, वीज आणि जलवाहतूक यासाठीच केला जातो. नदीच्या पाण्याबद्दल या लोकांना जबरदस्त प्रेम आहे.

व्हिएन्ना, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया आणि तेथून अन्य देशांत वाहत जाणारी विशाल डॅन्यूब नदी, रशियातील प्रचंड वोल्गा नदी, उत्तर-पूर्व आफ्रिकेतून युगांडा, इथिओपिया, सुदान, इजिप्त, आदी देशांतून भूमध्य समुद्रापर्यंत वाहत जाणारी मोठी नदी नाईल-ब्लूनाईल, सेंट लॉरेन्स नदी, सैबेरियातील दक्षिणेतून निघून उत्तर समुद्राकडे जाणारी ओब (Obe) नदी ही सुद्धा एक जबरदस्त नदी आहे. सैबेरियातील नेवासेब्रिस्क हे एक मोठे वाढते शहर आहे. या शहरापासून थोड्या अंतरावर ओब नदीला कोयनेसारखे एक प्रचंड धरण बांधले आहे. मध्य आफ्रिकेतील कांगो आणि निगर नदी, झांबियामधील झांबिया नदी, या सर्वच नद्या प्रचंड असून, या नद्यांच्या पाण्याचा उपयोग मानवी जीवन भौतिक अर्थाने संपन्न बनविण्यासाठी केला जात आहे. आस्वानसारखे प्रचंड धरण अलीकडे बांधले गेले. परंतु युरोपात नदीच्या पाण्याचा उपयोग शेती, उद्योग, वीज आणि वाहतूक यांसाठी करावयाचा, हे फार पूर्वीपासून सुरू आहे.

भारतात गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, कृष्णा, नर्मदा यांसारख्या प्रचंड नद्या

आहेत. परंतु या नद्यांकडे पाहण्याची भारतीयांची दृष्टी धार्मिकतेची राहिली. धार्मिकदृष्ट्या पवित्र मानले गेलेले पाण्याचे साठे घाण झाले, तरी आम्ही ते तसेच राखले. नद्यांच्या पाण्याने, लोकजीवन संपन्न करण्याच्या नव्या विचाराने अता आपल्याकडेही मूळ धरले आहे, हे मला सुचिन्ह वाटते. पाश्चात्त्य देशांतीलही नद्यांचे पाणी स्वच्छ राखण्याचा प्रश्न आता निर्माण होऊ लागला आहे. नदीकाठच्या औद्योगिकीकरणामुळे तेथील नद्यांचे पाणी आणि आसमंत घाण होऊ लागले असून, त्यातून दूषित हवामानाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ब्ल्यू डॅन्यूबचे वर्णन पूर्वी आम्ही जे काव्यात वाचले होते, ते आता शिल्लक उरलेले नाही. ब्ल्यू डॅन्यूब आता 'मडी-डॅन्यूब' बनली आहे. या लोकांचे नदीचे प्रेम किती विलक्षण आहे, ते मला झेकोस्लोव्हाकियात प्रवास करीत असताना आढळून आले. स्लाव्हाकियामधील ब्राटिस्लाव्हा या राजधानीच्या शहरी पोहोचलो, तेव्हा शहराच्या बाहेर एका रम्य ठिकाणी संध्याकाळी फिरायला जाण्याचा आणि तिथेच जेवण घेण्याच्या कार्यक्रमाचा, एकूण कार्यक्रमात समावेश करण्यात आला होता.

राजधानीच्या बाहेर, कापेथियन पर्वतराजीच्या सान्निध्यात 'झोकशेके' नावाचे सुंदर रेस्टॉरंट आहे. खुल्या जागेवर बसून मंडळी तिथे जेवण घेतात. आम्ही गेलो, तेव्हा सर्व सिद्धता होती. रशियन तरूणांचा एक कलावृंद तिथे सज्ज होता. या तरूण गायक कलाकारांनी एक सुरेख गीतगायन सुरू केले. लक्ष देऊन मी श्रवणभक्ती करू लागतो, हे गीत रशियन भाषेतले होते. त्यामुळे ते म्हणत असताना मला त्या गीताचा अर्थ समजला नाही; पण ते गीत ऐकत असताना त्याची गतिमानता, स्वरांची आर्तता आणि नादबद्धता यांनी मी फारच प्रभावित झालो.

नंतर मी चौकशी केली, तेव्हा या तरूणांनी सादर केलेले हे गीत 'वोल्गा' नदीवर रचलेले आहे, असे समजले. त्या गीताचे मग मी इंग्रजी भाषांतर करून घेतले. मला ते आवडले होते. या गीताची मी माझ्या डायरीत नोंद करून ठेवली. खरोखरच हे एक साधे पण सुंदर गीत आहे. ऐकताना समाधान झाले. डायरीतले गीत मी जेव्हा पुन्हा वाचतो, तेव्हा गीत म्हणताना त्या कलाकारांनी निर्माण केलेले वातावरण, ती स्वरांची आर्तता, माझ्यापुढे ते सारे तसेच उभे राहते. या सर्व लोकांचे नदीबद्दलचे प्रेम जबरदस्त आहे, पण ते धार्मिक अर्थाने नव्हे, हे पाहून बरे वाटले.

लॅटिन अमेरिकेत गेल्यानंतर तेथील सामाजिक परिस्थिती पाहताना दोन-

तीन वंशांच्या मिश्रणातून एक चौथाच समाज तिथे निर्माण झाला असल्याचे आढळले. दक्षिण अमेरिकेची संस्कृती, तसे पाहता, काही हजार वर्षांची जुनी आहे. सुमारे पाचशे वर्षांपूर्वी स्पेनमधून स्पॅनिश राज्यकर्ते तिथे गेले. आपल्याकडे जसा लॉर्ड क्लाइव्ह पोहोचला, तसा स्पेनचा कोर्टेस हा लॅटिन अमेरिकेत गेला. त्याने तिथे जी जुनी राज्ये होती, त्यांचा पाडाव केला आणि आपले राज्य स्थापन केले. नंतर पोर्तुगीज गेले. इंग्रज पोहोचले. तिथे जे मूळचे लोक आहेत, त्यांना पुढे इंडियन्स म्हणण्याचा प्रघात पडला. नव्या राज्यकर्त्यांनी मग आफ्रिकेतून गुलाम म्हणून काही लोकांना नेले. त्या सर्वांनी आपला घाम, रक्त आणि कर्तृत्व यांतून देशाची बांधणी केली. हळूहळू त्यांच्यांत रोटी-बेटी व्यवहार सुरू झाले आणि मूळचे इंडियन, नंतर आलेले स्पॅनिश, इंग्रज, आफ्रिकी, पोर्तुगीज यांच्या मिश्रणातून एक चौथाच समाज निर्माण झाला आहे. तर मेक्सिकोमध्ये मुळचे इंडियन आणि गोरे यांच्या मिश्रणातून एका नव्या पिढीने जन्म घेतला आहे. एकूण हा सारा समाजच मल्टिरेशियल समाज बनला आहे. काही ठिकाणी गोरे अधिक आहेत. तर काही ठिकाणी काळे अधिक आहेत.

कॅनडामध्ये हिंडताना, कॅनडामधील काही नामवंत लेखकांनी लिहिलेले ग्रंथ खरेदी करण्यासाठी म्हणून मी काही पुस्तकांच्या दुकानांतून फेरफटका मारला. ओटावामध्ये असताना तेथील एक तरूण, तरतरीत अधिकाऱ्याबरोबर मी पुस्तकांच्या दुकानात गेलो. पुस्तकांची चांगली दुकाने आपल्याला पाहावयाची आहेत आणि पुस्तके खरेदी करावयाची आहेत, असे मी या अधिकाऱ्याला सांगितले होते. त्याने मला मोठ्या दुकानांतून फिरविले. हा तरूण अधिकारी पूर्वी भारतात आला होता आणि महाराष्ट्रात उरळी कांचनला आठ-दहा दिवस राहिलेला होता. मोठा हुशार वाटला.

पुस्तकांच्या दुकानात गेल्यावर, ग्रंथांवरून मी नजर टाकली आणि काहीही खरेदी न करता परत फिरू लागताच, माझ्या बरोबरीच्या तरूणाला मोठे आश्चर्य वाटले.

'पुस्तकं खरेदी करणारा आहात ना?' त्याने विचारले.

'मला पाहिजे आहे, ते इथं दिसत नाही.' मी सांगितले.

यावर तो आश्चर्यचकित होऊन माझ्याकडे पाहतच राहिला.

वस्तुस्थिती अशी होती, की तिथे हारीने मांडलेले ग्रंथ हे अमेरिकन लेखकांचे

होते. मला हवे होते ग्रंथ कॅनडामधील लेखकांनी लिहिलेले. पण मला असे आढळले, की अमेरिकन लेखकांनीच ग्रंथबाजाराचा बव्हंशी कबजा घेतलेला आहे. इंग्लंडमधील पुस्तकांच्या दुकानांतून मला इंग्रज लेखक आढळले. परतु कॅनडामधील दुकानांत अमेरिकन लेखकांचा भरणाच अधिक दिसला.

कॅनेडियन लेखकांची माहिती मिळेल, म्हणून मोठ्या उत्साहाने मी खरेदीसाठी गेलो होतो. अखेर या तरूण अधिकाऱ्यासच कॅनडामधील लेखकांची यादी देण्यास मी सुचविले. अर्थात कॅनडामधील तीन-चार दिवसांच्या मुक्कामात मला जे दिसले, त्यावरून माझे हे मत बनले. संशोधन करून हे मत बनले आहे, असे नव्हे. कॅनेडियन लेखकांचीही पुस्तके अन्यत्र कोठे असू शकतील, परंतु मी गेलो, तेथील दुकानांत मला जो भरणा दिसला, तो मात्र अमेरिकन लेखकांचा होता.

या साऱ्या प्रवासात सायप्रसची भेट मात्र माझ्या लक्षात वेगळ्याच कारणाकरिता राहिली. सायप्रसचा प्रश्न सध्या वादग्रस्त बनला असून, सायप्रसच्या प्रचलित सरकारला शक्ती मिळावी आणि तेथील प्रमुख दोन समाजांत सहकार्य निर्माण व्हावे, असे भारताचे धोरण होते.

सायप्रसमध्ये ग्रीस आणि टर्किश असे दोन समाज आहेत. मी गेलो, तेव्हा हे लहानसे बेट पाहण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी दोन-तीन गोष्टी प्रामुख्याने लक्षात आल्या. मी जे पाहिले, त्याबद्दल आता काही मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. पण जे पाहिले, ते मात्र मनात राहिले आहे. तेथील खिस्तपूर्व राजधानी 'सलामिस' ही 'सइन्स' मध्ये आहे. इथे पूर्वी रोमन राज्य होते. खिस्तपूर्व काळातील राजवाडे, थिएटर, स्नानगृह, तेथील पुस्तके वगैरे गोष्टी आजही पाहावयास उपलब्ध आहेत. राजवाड्यातील स्नानगृह पाहण्यासाठी गेलो, तेव्हा मला तिथे एक प्रतीक दिसले. आपल्याकडे जसे ब्रह्मा, विष्णु, महेश असे तिघांचे एकत्रित प्रतीक आहे, तसे खिस्तपूर्व काळातील ते त्यांचे प्रतीक आहे. पण आश्चर्य असे की, या प्रतीकाची शिरे कापलेली होती. हा प्रकार पाहिल्यानंतर माझ्या बरोबर जी मार्गदर्शक स्त्री होती, तिच्याकडे याबाबत पृच्छा केली, तेव्हा ती म्हणाली,

'ख्रिश्चनांनी केलेला हा अत्याचार आहे. त्यांच्या विध्वंसक वृत्तीचा नमुना या अवस्थेत येथे उभा आहे.'

पुढे दोन तासांनी, अन्य ठिकाणे पाहत-पाहत आम्ही, उत्तरेला असलेल्या

फामागुस्ता या ठिकाणी पोहोचलो. फामागुस्ता हे बंदर असून, तिथे ग्रीक व टर्किश असे दोन्ही जमातींचे स्वतंत्र भाग आहेत. आम्ही टर्किश वस्तीत एक मशीद पाहण्यास गेलो. या मशिदीचे शिल्प मला चर्चसारखे दिसले. बाकी सर्व भाग चर्चसारखा आणि मध्येच एक मिनार अशी ही इमारत पाहून बरोबरीच्या स्त्रीकडे चौकशी केली, तेव्हा तिने जे सांगितले, त्याने मला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला. ती म्हणाली,

'पूर्वी हे चर्च होते. इस्लाम धर्म येथे आला, तेव्हा त्यांनी चर्चची मशीद बनविली. इमारत तीच, फक्त एक मिनार उभारला. बस्स ! चर्चची मशीद बनली!'

या सर्व प्रकारावर आमची चर्चा सुरू असताना त्या स्त्रीने जे उद्गार काढले, ते मी माझ्याजवळ नोंद करून ठेवले आहेत.

'धर्माच्या नावाखाली मानव किती शतकांपासून हा अन्याय सहन करीत आहे !' असा तिचा सवाल होता आणि 'मानवाचे ते दुःख अजूनही संपलेलं नाही.' असा उत्तरार्ध तिने केला.

माझ्या मनात तिचे शब्द कोरले गेले. सगळ्याच धर्मांचे हे असे आहे का? असा प्रश्न मी मग माझ्याच मनाला विचारला. सायप्रसमध्ये धार्मिक निष्ठेतून करण्यात आलेला विध्वंस मी नव्याने पाहत होतो; परंतु भारतात घडून गेलेले असे कितीतरी विध्वंस मी त्याअगोदर पाहिले होते. अशा स्थितीत त्या स्त्रीच्या सवालाला मी काय उत्तर देणार! ख्रिश्चॅनिटी आणि इस्लाम जेथून निघाला, तेथून त्यांनी आपल्या बरोबर आपली राज्येही जगभर नेली आणि जेथे गेले, तेथील पूर्वीच्या राज्यांचा, त्यांच्या धार्मिक प्रतीकांचा उच्छेद केला, हा इतिहास आहे. युरोपात तर धर्माच्या नावाखाली अनन्वित अत्याचार झाल्याच्या साक्षी आहेत.

फामागुस्ता (Famagusta) या बंदराची आणखी एक निशाणी माझ्या मनात राहिली. या बंदराला तटबंदी आहे आणि तटबंदीवर 'ऑथेल्लो टॉवर' या नावाचा टॉवर आहे. शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' या प्रसिद्ध नाटकाची पार्श्वभूमी म्हणजे हा टॉवर होय. शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' मधील तो कृष्णवर्णी सरदार की, ज्याला त्याची गोरी प्रियकरीण, पत्नी डेस्डिमोनाबद्दल संशय आला आणि म्हणून त्याने या टॉवरवर तिचा गळा दाबून खून केला ! त्या घटनेची आठवण करून देणारा हा टॉवर तिथे उभा आहे. 'ऑथेल्लो टॉवर' हे त्याचे नाव.

टॉवरच्या समोर प्रचंड सागर आहे. पर्वतप्राय लाटा सागरात उसळत असतात. तो सारखा खळाळत असतो. टॉवरवर डेस्डिमोनाचा गळा दाबून तिच्याच प्रियकराने केलेल्या खुनाचे प्रतीक अणि तो खळाळणारा सागर यांचे तेथील चमत्कारिक मिश्रण काही वेगळेच सांगून जाते. सायप्रसमधील धर्माची संकटे, चर्च, मशिदी येतील-जातील; पण प्रीती आणि असूया या मानवी चिंरतन भावनांचा संघर्ष पाहिलेला साक्षीदार हा टॉवर तेथे मुक्काम करूनच उभा आहे. तेथील सागरही असूयेतून घडलेल्या अनेकानेक घटनांचा साक्षीदार आहे. धर्माची असूयाही त्याने पाहिली आणि डेस्डिमोनाचा गळा दाबून तिला निष्प्राण करणारी प्रीतीची असूयाही पाहिली. हा टॉवर आणि समोर खळाळणारा सागर यांच्याकडे आळीपाळीने पाहिले, तेव्हा ते दोघेही एकमेकांकडे पाहून असूयेने विकट हास्य करीत आहेत, असे मला भासले.

सायप्रसमध्ये असे काही गंभीर पाहिले; परंतु मनात निर्माण झालेले गांभीर्य बाजूला करणारे, आनंदाने, भरलेले एक दृश्यही याच दौऱ्यात मला पाहायला मिळाले. हजारो माणसे आनंदाने मोकळ्या मनाने जल्लोश करीत आहेत. स्वानंदात मग्न आहेत, असे होते ते दृश्य.

सर्व ग्रीक लोक सप्टेंबरच्या १२ ते २० तारखांच्या आठ दिवसांत 'वाईन फेस्टिव्हल' - मदिरोत्सव साजरा करतात. सायप्रसच्या दक्षिणेला 'लिमासिल' नावाचे एक प्रसिद्ध बंदर आहे, ते पाहायला गेलो होतो, तेव्हा मदिरोत्सव सुरू झाला होता. तरूण स्त्री-पुरूष, मध्यम वयाची माणसे उत्तम पोशाख करून या उत्सवासाठी आलेली असतात, हे सर्वजण मनमुराद मदिरापान करतात. नाचतात, बागडतात, हसतात. मोकळेपणाने आनंदीआनंद करतात. पण तिथे कसला बीभत्सपणा आढळत नाही. हे सारे जण आपल्याच नशेत काहीसे रममाण झालेले मला दिसले. समाजाने कधी तरी एकदा मोकळे बनून सामुदायिक आनंदोत्सव साजरा करण्याचा, खळखळून हसण्याचा हा उत्सव वर्षातून आठ दिवस होत असतो. सायप्रसमधील ग्रीक लोकांची ही जत्रा मला काहीशी वेगळीच वाटली. भारतातील अनेक जत्रा मी पाहिल्या आहेत, तरूण वयात या जत्रेत हिंडलोही आहे; पण हा मदिरोत्सव आणि तोही सामुदायिक, शेकडो, हजारो लोक एकत्र येऊन यथेच्छ मदिरापान करीत आहेत, मोकळेपणाने हसत आहेत, आनंद करीत आहेत, हे दृश्य मला नवीन होते.

भारत हा काहीतरी, धार्मिक, पारलौकिक गोष्टींचा विचार करणारा,

अध्यात्मवादी देश आहे, अशी काही अस्पष्ट कल्पना अजूनही बऱ्याच पाश्चात्त्यांच्या मनांत घर करून आहे. हा एक प्राचीन संस्कृतीचा देश आहे, अशी कल्पना आहे. आधुनिक भारताच्या आर्थिक, वैज्ञानिक कर्तृत्वाची माहिती तुलनेने त्यांना कमीच आहे. आधुनिक भारताच्या जीवनाची माहिती देण्याचा आमचा सतत प्रयत्न सुरू आहे. भारत आणि मेक्सिको, जमेकासारखे लांबचे देश यांतील मोठे अंतर ही एक अडचण जाणवते, परंतु तरीही आमच्यासारखे भारतीय तेथे पोहोचतात, तेव्हा नव्या भारताची, स्वतंत्र भारताची माहिती मिळते. या पुढच्या काळात व्यापारी, आर्थिक व्यवहार ज्या प्रमाणात वाढतील, त्या प्रमाणात हे अंतर कमी होईल, अशी अपेक्षा आहे. कॅरेबियन देशांत आणि मेक्सिकोसारख्या ठिकाणी लोकांनी गांधी-नेहरू यांचे पुतळे उभारले आहेत. या नेत्यांनी स्वातंत्र्याचे विचार दिले, त्याचा परिणाम येथे उमटला आहे. जुन्या पिढीतले लोक त्यांना मानतात. गांधी, नेहरू, टागोर या त्यांच्या प्रेरणा आहेत. नव्या प्रेरणा तेथवर पोहोचविणे हेच यापुढचे काम आहे, असे प्रवासानंतर माझे मत बनले.

भारताच्या परराष्ट्र-नीतीबद्दलच्या धोरणाने पाश्चात्त्य जगात आता चांगलेच मूळ धरले आहे, याची जाणीवही परदेशच्या प्रवासात सातत्याने होत राहते. जागतिक लष्करी गटबाजीपासून अलिप्त राहून देशहिताच्या दृष्टीने स्वतंत्र निर्णय घेण्याचे धोरण पं. नेहरूंनी पुरस्कारले, त्या वेळी उलट-सुलट टीका होत राहिल्या. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंटे तडजोडीच्या मार्गाने सुटावेत, असा भारतीय नेत्यांचा कळकळीचा प्रयत्न होता. पं. नेहरूंनी त्या दृष्टीने जे प्रयत्न केले. त्यामुळे जागतिक राजकारणात पंडितजींना आणि पर्यायाने भारताला मानाने स्थान मिळाले. भारताला जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाल्याने देशातील जनतेचा स्वाभिमानही द्विगुणित झाला. पंडितजींच्या या स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणामुळे, परदेशांतील बड्या राष्ट्रांकडून भारताला जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाल्याने देशातील जनतेचा स्वाभिमानही द्विगुणित झाला. पंडितजींच्या या स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणामुळे, परदेशांतील बड्या राष्ट्रांकडून भारताला मदतीचा ओघ सुरू राहण्यास मदत झाली आणि त्यामुळे देशाच्या अंतर्गत गरजा लक्षात घेऊन, आवश्यक ते आर्थिक धोरण भारताला आखणे शक्य झाले. अलिप्तवादी धोरणाबद्दल पाश्चात्त्यांचे काही आक्षेप होते, टिका केल्या जात होत्या. अमेरिकेचे मुत्सद्दी शंका व्यक्त करीत होते, तर रशिया सहानुभूती दाखवीत होता. तरी पण पं. नेहरूंनी जाणीवपूर्वक

आपल्या धोरणाचा पाठलाग चालूच ठेवला. भविष्यकाळात या धोरणाला भरघोस पाठिंबा मिळेल, असे चिन्ह काही लोकांना दिसत नव्हते. आज मात्र पं. नेहरूंनी सुरू केलेली अलिप्तवादाची परराष्ट्रनीतीच योग्य असल्याचा पडताळा येऊ लागला आहे.

सध्या शंभरावर राष्ट्रे या धोरणाचे सभासद आहेत, काही देश पं. नेहरूंनाच या धोरणाचे उद्गाते मानतात. त्याचे प्रतीक म्हणून सार्वजनिक उद्यानांतून म. गांधी, पं. नेहरूंचे पुतळे त्यांनी उभारलेले आहेत. अविकसित देशांमध्ये अलिप्तता तत्त्वाचा स्वीकार आता झालेला आहे. एका अर्थाने याबाबत स्पर्धा सुरू आहे. राष्ट्रांच्या निरनिराळ्या परिषदा होतात, त्या वेळी अलिप्तता तत्त्व मानणाऱ्या राष्ट्रांच्या जोडीला बसण्यासाठी 'आमच्या देशाला सभासद करून घ्या' अशी मागणी पुढे येत राहिली आहे. या संदर्भात भारताला जागतिक क्षेत्रात मोठे काम करता येण्यासारखे आहे. तशी परिस्थिती निर्माण होत आहे. मला विविध देशांच्या भेटींमध्ये हे जाणवले. विकसनशील राष्ट्रांसमोर आज त्यांच्या देशान्तर्गत विकासाचे विविध प्रश्न उभे आहेत. विकासाच्या स्पर्धेत बड्या राष्ट्रांच्या जोडीला बसण्याची प्रत्येकाची ईर्ष्या आहे. विकास साध्य करून जनतेचे जीवनमान सुखी व्हावयाचे, तर विकासाच्या रथाला अडथळा प्राप्त होणार नाही, असेच जागतिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता विकसनशील राष्ट्रांना आता मान्य असल्याचे दिसू लागले आहे.

प्रत्येक राष्ट्रातील अंतर्गत विषमता व राष्ट्राराष्ट्रांतील विषमता दूर करण्यासाठी व्यापार, उद्योगधंदे या आर्थिक क्षेत्रातील कार्यपद्धतीत मूलभूत फरक करून दुनियेतील संपत्तीची पुनर्वाटणी मानवी विकासासाठी झाली पाहिजे, असा प्राथमिक स्वरूपाचा प्रश्न जगापुढे अग्रहक्काने आहे. या प्रश्नाच्या उत्तरावर व त्याच्या अंमलबजावणीवर जागतिक शांतता व एका अर्थाने मानवाचे भवितव्य अवलंबून आहे.

विकसनशील राष्ट्रे या संदर्भात आशेने आणि विश्वासाने भारताकडे पाहत आहेत. चर्चा, वाटाघाटी, निरनिराळे आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक देवाण-घेवाणीचे करार घडत आहेत. परराष्ट्र नीतिसंबंधांत तत्त्वनिष्ठ, पण व्यवहारी धोरण भारताच्या नेतृत्वाने स्वीकारले असल्याने विकसनशील राष्ट्रांच्या मनात त्याने मूळ धरले आहे. मला वाटते, भारत या दृष्टीने ऐतिहासिक कामगिरी करू शकेल. पृथ्वीपर्यटनाने माझा हा विश्वास वृद्धिंगत झाला आहे.

# ११... राजकीय आयुष्याची घोडदौड

आयुष्य हे घोडेस्वारासारखं आहे, असं मला नेहमी वाटतं, दऱ्याखोऱ्यांतून घोडेस्वाराला नेहमीच धावावं लागतं. डोंगरदऱ्या पार कराव्या लागतात, आणि सुखरूप तर राहावं लागतंच. एखाद्या घोडेस्वाराच्या चित्राकडे मी पाहतो, तेव्हा वैयक्तिक काय किंवा राजकीय जीवनात काय, असंच संकटांतून एकसारखं धावावं लागलं, असं दिसतं. संकटाशिवाय आजवर काही मिळालं नसलं, तरी एक खरं की, कामाचं समाधान आहे.

१९४१ साली वकील झालो आणि वकिली सुरू करण्याच्या इराद्यानं कराडला पोचलो. पण वकिलीत चित्त लागत नव्हतं. लक्ष होतं राजकारणाकडे. जिल्ह्यानंही त्या वेळी मला एक नेता म्हणून मान्य केलं होतं. आजवर कुटुंबाकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नव्हता. मी काही मिळवावं, अशी घरच्या लोकांची अपेक्षा असणं स्वाभाविक होतं. तशातच १९४२ च्या २ जूनला विवाहबद्ध झालो आणि जीवनाचा एक नवा अध्याय सुरू झाला. आशा उत्तरोत्तर वाढत चालली होती. एक नेता बनलो होतो. वकील झालो होतो आणि संसार सुरू केला होता; पण मन पुढेच कुठेतरी धावत राहिलं होतं. मनाची स्थिती मोठी विलक्षण असते. क्षणात आनंद, क्षणात खिन्न, तर क्षणात विमनस्क. पण असंही वाटतं की, मनानं केलं जातं, तेच खरं कर्म ! मनाच्या निश्चयानं जे केलं जातं, त्याचा नाश करण्यास कुणीही समर्थ नाही, हा अनुभव आजवर घेत आलो होतो. नियतीनं तेच ताट पुढंही वाढून ठेवलं होतं.

मी भूमिगत असतानाच थोरल्या बंधूंचं निधन झालं. मधले गणपतराव स्थानबद्धतेत असतानाच त्यांना क्षयानं पछाडलं आणि विवाहानंतर पहिल्या संक्रांतीलाच पत्नीला - सौ. वेणूताईंना पोलिसांनी पकडल्यानं तिच्या मनालाही धक्का बसला. एका भल्या घराण्यातनं आलेली ही चव्हाणांच्या घरातली सून, तिला तुरूंगाची हवा आणि तुरूंगाचं वातावरण नवीन होतं. अपरिचित होतं. असह्य झालं तिला ते आणि तिनं अंथरूण धरलं. बंधूंच्या आणि पत्नीच्या औषधाची व्यवस्था करण्यासाठी म्हणून मग पॅरोलवर सुटून बाहेर यावं लागलं.

कुटुंबानं माझ्यासाठी सर्व काही वेचलं होतं. भोगलं होतं. माझं शिक्षण केलं होतं. राजकारणात उडी घेऊ दिली होती; पण कुटुंबासाठी मी काय केलं होतं आणि करीत होतो? ४५ साली मधले बंधू गणपतराव यांना औषधासाठी मिरजेला दाखल केलं. आणि वकिलीचा व्यवसाय सुरू करून, कुटुंबाला स्थैर्य प्राप्त करून द्यावं, असा विचार केला. पण कुटुंबाचं स्थैर्य हे नियतीला मंजूर नव्हतं.

वकिलीची पुस्तकं नुकती कुठं उलगडू लागलो होतो, तोच १९४६ च्या पहिल्या असेंब्ली निवडणुकीचे नगारे वाजू लागले आणि राजकारणाच्या गाड्याला मला पुन्हा जुंपून घ्यावं लागलं. त्या निवडणुकीला मीच उभं राहावं, असा माझ्या बंधूंचा गणपतरावांचा आणि मित्रांचा आग्रह होता. मला ते टाळता आलं नाही. मी उभा राहिलो आणि यशस्वीही झालो. पण या निवडणुकीतील विजयानं मला सातारा जिल्ह्याच्या बाहेर काढून महाराष्ट्राच्या राजकारणात आणून उभं केलं. कराडात वकील म्हणून जम बसवीत राहिलो असतो, तर राजकारणातले हे नंतरचे अध्याय आज कदाचित दिसले नसते. नियतीच्या मनातच ते होतं. सर्वज्ञ असो, बहुज्ञ असो, नियतीला, सृष्टीनियमाला बदलण्यास कुणीही समर्थ नाही, हेच खरं! म्हणूनच नाश पावलं असेल, त्याची उपेक्षा करावी लागते आणि जीवनात जे प्राप्त होतं, त्याचा अंगीकार करावा लागतो.

वकिली माझ्या हातून गेली होती आणि राजकारण समोर उभं होतं. ४६ ते ५२ या काळात राजकारणच करीत राहावं लागलं. हा काळ दुहेरी चिंतेत गेला. १९४७ मधे बंधू गणपतराव सोडून गेले आणि पत्नीची प्रकृती अत्यवस्थ बनल्यानं त्यांना मिरजेला ठेवावं लागलं. चिंता सहन करण्याचाच तो काळ ठरला. पण चिंता करण्यासही फुरसत नव्हती. पत्नी मिरजेच्या दवाखान्यात आणि मी बाहेर, असं सुरू होतं. रोगाचं निश्चित निदान होत नव्हतं आणि अशक्तपणा वाढत राहिला होता. मला आठवतं, पत्नीला मिरजेला नेण्यासाठी म्हणून गाडीत बसवलं, त्या वेळी तिला घरातून उचलून गाडीत ठेवण्याचं काम आमच्याच जवळच्या नात्यातल्या चौदा-पंधरा वर्षांच्या मुलानं केलं होतं. अंगात शक्ती अशी काही नव्हतीच. काही महिने असेच गेले. गाडी ऐलतीराला येण्यासाठी डॉक्टर झटापट करीत होते आणि हरप्रयत्नांनी त्यांनी गाडी ऐलतीराला आणलीही!

सुख एवढंच होतं की, स्वातंत्र्याची स्वप्नं पाहत असलेला भारत स्वतंत्र झाला होता. १५ ऑगस्ट, १९४७ ला युमनेच्या काठावर स्वातंत्र्य मूर्तरूप

बनून उभं होतं. कालपर्यंतची एक अमूर्त कल्पना मूर्त रूप धारण करून उभी असलेली दिसत होती आणि साक्षात दर्शनानं सारा शीण संपला होता. १४ ऑगस्टच्या रात्री आम्ही, माझे मित्र-सहकारी, मुंबईत होतो आणि मध्यरात्री सचिवालयावर फडकणारा स्वातंत्र्य-तिरंगा पाहून अननुभूत आनंदानं फुलून गेलो होतो. ४२ च्या आंदोलनातील दिवस आणि रात्री मनासमोर उभ्या राहत होत्या. कृतार्थ भावनेचा तो दिवस. स्वातंत्र्याबद्दल आम्ही बोलत होतो आणि ते स्वातंत्र्य प्रत्यक्षात पाहत होतो - याच देही, याच डोळा, हजारो स्वातंत्र्यवीर, हुतात्मे, युगपुरूष तो स्वातंत्र्याचा सोहळा, आकाशातून लकलकत्या डोळ्यांनी पाहत होते. त्यांच्याबद्दलची अतीव कृतज्ञता मनातून आणि डोळ्यांतून ओसंडत होती. संकेत पुरा झाला होता. रणांगणावर लढणाऱ्या सैनिकानं विजयाचा बिगुल ऐकावा, विजयाचा झेंडा समोर फडफडताना पाहावा, त्याच्या चित्तवृत्ती अमृतानं जशा न्हाऊन निघतात, तसा मी स्वातंत्र्यामृतानं अंतर्बाह्य ओलाचिंब बनलो होतो. सुख, सुख म्हणून मी ज्याचा उल्लेख केला, ते हेच होते.

आज मागे पाहताना त्या क्षणाच्या आठवणीनं की, स्वातंत्र्याकरिता जे आमच्या खांद्याला खांदा लावून लढले, रणात पडले, ते आमच्यांत नाहीत, म्हणून ! आणि हा स्वातंत्र्यमहोत्सव पाठीमागे राहिलेले आम्ही पाहत आहोत, या संमिश्र भावनांनी ! स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वातंत्र्यदिन कराडात साजरा कसा करायचा, याचे बेत करीत होतो, ते १९३० मधे शाळकरी असतानाचे दिवस आजही आठवतात. त्या वेळचा मी एक स्वातंत्र्यसैनिक, पंचवीस वर्षानंतर पार्लमेंटरी सेक्रेटरी झालो होतो आणि मुंबईला त्या अथांग सागराच्या काठावर उभा राहून प्रकट झालेल्या स्वातंत्र्यदेवीच्या दर्शनासाठी निघालेल्या अथांग जनसागराचा एक बिंदू बनून गेलो होतो. स्वातंत्र्य मिळालं.... आता पुढं... मनात विचार गर्दी करीतच होते.

मनात विचार येत होते, ते बहुसंख्य जनतेचे. स्वातंत्र्यदेवतेला वंदन करण्यासाठी जमा झालेला जनसागर मी समोर पाहत होतो, त्या जनतेचे! ते काही सारेच राजकीय पक्षाचे लोक नव्हते. तसं पाहिलं, तर राजकीय पक्षाचे लोक हे थोडेच असतात. पक्षांच्या बाहेरच मोठी जनता असते. याच जनतेचं ४२ च्या आंदोलनात आम्हा राजकीय कार्यकर्त्यांना, चळवळ्यांना, भूमिगतांना फुलांसारखं झेललं होतं. उघडपणानं हिंडू-फिरू दिलं होतं. मी पार्लमेंटरी सेक्रेटरी बनलो होतो. त्यामुळे मैदानातल्या राजकारणापेक्षा वेगळा, सरकार आणि जनता यांच्यांतील वेगळ्या संबंधाचा प्रत्यय थोडा-फार माझ्या

संग्रही जमा झाला होता. स्वातंत्र्य मिळवलं होतः पण ते मिळालं आहे, हे पुढच्या काळात जनतेला पटवावं लागणारं होतं. काँग्रेस पक्षावर ही नवी जबाबदारी आली होती. माझ्या मतानं, पक्षवाले काय म्हणतात, यापेक्षा जनतेचं मत काय आहे, याला अधिक महत्त्व आहे. त्या जनतेचा अंदाज घेऊन जो वागतो, निर्णय करतो, तोच शहाणा! तो पक्ष असो अगर व्यक्ती! लढवय्या हा चक्रव्यूहात शिरतोचः पण त्यातून बाहेर पडण्याचं ज्याला साधतं, तोच खरा लढवय्या, असं मला नेहमी वाटतं. काँग्रेसला आता चक्रव्यूहाचा भेद करायचा होता. स्वातंत्र्य मिळालं आणि काँग्रेस हा राज्यकर्ता पक्ष बनलाः पण ती इतिश्री नव्हती. सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे गांधीजींचे बोल स्वातंत्र्याच्या आनंदोत्सवात विरून जाणार नाहीत, याची जबाबदारी काँग्रेस पक्षावर आली होती. परिस्थितीचा चक्रव्यूह तयारच होता.

४६ ते ५२ या काळात मी पार्लमेंटरी सेक्रेटरी होतोः पण आयुष्यातील हा काळही संघर्षात गेला. काँग्रेसला ध्येयाकडे खेचण्यासाठी, ध्येयाची जाणीव करून देण्यासाठी हा संघर्ष करावा लागला. ज्या ध्येयासाठी काँग्रेस लढली, त्याचं प्रतिबिंब स्वातंत्र्यानंतर सुरू झालेल्या महाराष्ट्रातल्या राजवटीत उमटत नव्हतं आणि त्यामुळं कार्यकर्ते, काही नेते अस्वस्थ बनले होते. 'इंग्रजी बंद करा', 'दारूबंदी करा' वगैरेंकडेच महाराष्ट्रातील त्या वेळच्या राज्यकर्त्यांचं लक्ष केंद्रित झालं होतं. तिथं ते अडकून पडले आहेत, अशी भावना नेत्यांमधे आणि जनतेमधे वाढत होती.

समाजवादी काँग्रेसबाहेर गेले होते, आणि महाराष्ट्रातील उर्वरित काँग्रेस नेत्यांपैकी काहींनी 'शेतकरी कामकरी पक्ष' स्थापन करण्याची जुळवाजुळव सुरू केली होती. राजकीय संघर्षच सुरू झाल्यानं महाराष्ट्र काँग्रेस दुबळी बनते, की काय, अशी स्थिती होती. देव, देवगिरीकर, दास्ताने एका बाजूला अणि बहुजन समाजातील नेते जेधे, मोरे, भाऊसाहेब राऊत दुसऱ्या बाजूला, असा हा सामना उभा राहिला. ग्रामीण भागातून निर्माण झालेल्या नेतृत्वाचा प्रत्यक्ष मंत्रिमंडळात समावेश झाल्याखेरीज जनतेला न्याय मिळणार नाही, समाजकल्याण खऱ्या अर्थानं साधता येणार नाही, ही भावना वाढली होती आणि त्यातूनच शेतकरी कामकरी पक्षाचा सवता सुभा जन्मास आला. मी त्या वेळी महाराष्ट्र काँग्रेसचा चिटणीस होतो. ४७ साली बंधूंचं निधन झालं. घरात पत्नीचं आजारपण होतं. पार्लमेंटरी सेक्रेटरी आणि महाराष्ट्र काँग्रेसचा सेक्रेटरी ही जबाबदारीही होती. शेतकरी कामकरी पक्षाची स्थापना करू म्हणणाऱ्यांची

टीका मला मान्य होती; पंरतु ज्या ध्येयासाठी काँग्रेसमध्ये राहिलो आणि लढलो, ते ध्येय साध्य करण्यासाठी काँग्रेसमधेच राहायचं, की तो मुख्य प्रवाह सोडून आणि महाराष्ट्रात प्रांतिक पक्ष काढून बाजूला व्हायचं, याचा निर्णय करण्याचा, मनात संघर्ष निर्माण करणारा तो काळ ठरला.

नव्या विचाराची पेरणी करण्यासाठी कार्यकर्त्यांच्या बैठकी सुरू होत्या. मुंबईला भाऊसाहेब राऊत यांच्या घरी अशीच एक बैठक झाली. शे.का. पक्ष स्थापन करण्याची पूर्वतयारी या वेळपर्यंत झाली होती. मला आठवतं, दत्ता देशमुख, अत्रे, पी.के. सावंत, शाहीर निकम, आदी बैठकीला उपस्थित होते आणि मला माझा निर्णय द्यायचा होता. माझ्या पुढं राजकीय आव्हान उभं होतं. त्या बैठकीत मी एकाकी आहे, हेही दिसत होतं. पण तरी सुद्धा असा प्रादेशिक पातळीवरचा पक्ष काढण्यास मी विरोधच केला. त्यांच्या कार्यक्रमाबाबत मी सहमत होतो. सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवा, हे कोण नाकारणार! सबंध देशाचाच तो प्रश्न होता आणि तो सोडवण्यासाठी भारतीय पातळीवर विचार करणंच जरूरीचं वाटत होतं. प्रादेशिक पातळीवर त्यासाठी वेगळा पक्ष निर्माण करून काय साधणार? ही माझी भूमिका. म्हणूनच मुख्य प्रवाहातून त्यासाठी फुटून बाजूला व्हावं, याच्याशी मी सहमत झालो नाही. ४६ ते ५२ या काळात संघटना शाबूत ठेवण्याच्या कामासाठी मग महाराष्ट्रभर हिंडत राहिलो. सुख आणि दुःख यांच्या हिंदोळयावरच बैठक होती. जातीजातींत वैमनस्य वाढत राहिलं होतं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचं दुसरं पर्व सुरू झाल्याचा भास अनेकांना होत होता. ४७ मधे शे.का. पक्षाची स्थापना आणि ४७ मधील गांधींची हत्या यांमुळे सारा महाराष्ट्र हालला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यागासाठी आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राला दृष्ट लागली होती.

या साऱ्या धावपळीत ५२ साल उजाडलं. निवडणुका समोर होत्या. या सार्वत्रिक निवडणूकीनं मात्र, महाराष्ट्र काँग्रेस शाबूत आहे, असं सिद्ध केलं. काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवाहाशी ती एकरूप होती, हे मोठं समाधान मिळालं. भाऊसाहेब हिरे हे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष होते. पण पुढे ५२चं मंत्रिमंडळ आणि नेत्या-नेत्यांमधील वाद हा त्या काळातला माझा चिंतेचा विषय बनला. परस्पर समज-गैरसमज यांची वावटळ उठत राहिली होती. पण सत्तेच्या राजकारणाची बैठक मी माझ्या मनात तयार होऊ दिली नव्हती. तो माझा पिंड नाही. सत्तेच्या राजकारणाच्या फंदात मनुष्य एकदा सापडला की, राजकारणातील दुटप्पीपणाचं बोट त्याला धरावं लागतं आणि हळूहळू

राजकारणात त्या यशापासून त्याची पावलं दूर दूर पडू लागतात. त्याची काही उदाहरणं माझ्या समोर होती. बावन्नच्या मंत्रिमंडळात मी एक मंत्री होतो आणि एक-दोन खात्यांचा कारभार पाहण्याची जबाबदारी आली होती. कारभार सुरू झाला होता. पण नेते मंडळी अंतर्गत मतभेदांत अडकून पडली होती. स्वातंत्र्य मिळालं होतं, पण केवळ स्वातंत्र्यप्राप्तीमुळं समस्या संपणार नव्हत्या किंबहुना त्या जिवंत बनल्या होत्या. त्यांना वाचा फुटत होती. समाजातील फार मोठ्या दुर्बल घटकांच्या आशा वाढल्या होत्या. लोकशाहीच्या पवित्र परंपरा प्रामाणिकपणानं आणि कसोशीनं पाळण्याची जबाबदारी वाढली होती. विचारात सरळपणा आणि नेमकेपणा राखून, खुल्या, पण निश्चयी मनानं ध्येयाच्या वाटेनं चालायचं ठरवलं, तर कुणाची खुशामत करण्याचा प्रसंग निर्माण होत नाही; पण हे घडत नव्हतं.

त्याच वेळी म्हणजे १९५२ मधे भाषावार प्रांतरचनेचा पुकारा झाला होता. आंध्रची चळवळ यशस्वी झाली होती. मराठी भाषक हे मुंबई, मध्यप्रदेश आणि हैद्राबादमधे विभागले गेले होते, तर महाराष्ट्राच्या बाबतीत एका बाजूला महाविदर्भाची मागणी जोर धरीत होती आणि दुसऱ्या बाजूला मराठवाडा, विदर्भ आणि मुंबई प्रांताचं असं संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात यावं, या मागणीचा जोर होता. संयुक्त महाराष्ट्राचा मी पुरस्कर्ता होतो. संयुक्त महाराष्ट्र समितीचा मी सभासदही होतो आणि या मागणीच्या मांडणीसाठी जे प्राथमिक प्रयत्न झाले, त्यांत इतरांच्याबरोबर कामही केलं. ती मागणी सर्वांना मान्य असलेली लोकशाहीनिष्ठ मागणी होती. एकभाषी राज्यामुळं लोकशाहीचं - म्हणजे लोकांचं राज्य होण्यास मदत होते, ही कल्पना मला मान्य होती. पण संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न खरा धसाला लागला, तो राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर! या अहवालात समतोल द्वैभाषिक सुचवलं होतं. माझा त्याला कठोर विरोध होता. संयुक्त महाराष्ट्राची मागणी घेऊन महाराष्ट्र काँग्रेसचं शिष्टमंडळ दिल्लीलाही गेलं होतं. पण तिथे कल्पना निघाली विशाल द्वैभाषिकाची ! त्यालाही विरोध केला. काम सरळ नव्हतं. बरेच पेच निर्माण झाले होते. पं. नेहरूंनी आंध्रच्या मागणीला मान्यता दिली होती. पण भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी कुणी चळवळ करीत असतील, तर त्याला लगाम घालण्याची, मनाची तयारीही पं. नेहरूंनी केलेली होती. भारताच्या ऐक्यालाच अशा चळवळीमुळे तडा जाईल, अशी भीती त्यांना वाटत असावी.

१९५३ च्या हैद्राबाद काँग्रेसमधे भाषिक राज्य पुनर्रचनेचा प्रश्न

काकासाहेब गाडगीळ यांनी उपस्थित केला. त्याला आणि मराठी भाषकांच्या बहुव्यापक राज्यनिर्मितीला मी दुजोरा दिला. पं. नेहरूंचं मन त्यासाठी तयार करण्याचा प्रश्न होता. त्यासाठीही प्रयत्न झाले. परंतु त्रिराज्य योजना, मुंबई शहराचं केंद्रशासन आणि पुन्हा विशाल द्वैभाषिक असा क्रम घडला. द्वैभाषिकाच्या सूचनेला मी विरोध दर्शविला, पण ते राबविण्याची जबाबदारी मी स्वीकारली. देशाचं स्वातंत्र्य, राष्ट्रैक्य आणि समाजवादी पुनर्रचना या गोष्टी माझ्या दृष्टीनं अधिक मौलिक होत्या. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मला मूलभूत वाटला नाही. माझी राजकीय निष्ठा काँग्रेस पक्षाशी बांधलेली होती, त्या पक्षाची शिस्त बंधनकारक होती आणि ज्या मूलभूत प्रेरणा मला अभिप्रेत होत्या, त्या काँग्रेसमार्फतच मला आणायच्या होत्या. मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला होण्याचा धोका नाही, असं आढळून येताच द्वैभाषिक राज्य राबविण्यास मी संमती दिली, पण त्याच वेळी एकभाषी राज्याबाबतची माझी अनुकूल भूमिकाही स्पष्ट केली आणि पुढं अगदी निश्चयानं, मनापासून वर्ष, दीड वर्ष द्वैभाषिक राबवलं !

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ १९५५-५६ मधे शिगेला पोचली होती. सारा महाराष्ट्र जागा होता. काँग्रेसपासून ही चळवळ बाजूला नेण्याचे प्रयत्न होत होते. काँग्रेसचे नेतेही यथायोग्य काम न करता धरसोड करीत राहिले. समज आणि गैरसमज पसरत होते, पसरवले जात होते. शब्दांचे आणि वाक्यांचे अर्थ सोयिस्कररीत्या लावले जात होते. या काळातही मला निकरानं लढावं लागलं. काँग्रेसअंतर्गत आणि बाहेर. ५५ ते ६० हा काळ मोठा चमत्कारिक अनुभवांचा आणि मनोवस्थेचा असा गेला. महाराष्ट्रात काँग्रेस सुस्थिर करणं, महाराष्ट्रातल्या जनतेचा राग विझवणं, गुजराती बंधूंचा संशय दूर करणं आणि केंद्रीय सत्तेचा विश्वास संपादन करणं असं चौफेर काम करायचं होतं. ते करीत होतो. ५५ ते ६० या काळात माझं पाच वर्षांचं आयुष्य कमी झालं, इतका अनावर ताण पडला. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर होणाऱ्या महाराष्ट्रातील प्रचंड सभा, जनतेचा उठाव, त्यातून झालेले गोळीबार, ते सभा उधळणं, प्रतापगडचा सामना - किती तरी प्रसंग डोळ्यांपुढं उभे राहतात. घोडेस्वाराप्रमाणे उपाशीतापाशी मी धावत होतो. महाराष्ट्र स्थिर कसा होईल, संशय दूर कसा होईल, तो कमी होऊन धोरण अमलात कसं येईल, ही चिंता होती. १ नोव्हेंबर, ५३ ला द्वैभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी मी स्वीकारली होती आणि समोर समस्यांचे ढीग पडले होते.

लोकांना बरोबर घेऊन पुढं जायचं होतं आणि ५७ च्या सार्वत्रिक निवडणुकाही जिंकायच्या होत्या.

# १२... संयुक्त महाराष्ट्राचे साध्य : माझी भूमिका

लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य, आणि एकभाषी राज्यामुळे लोकांचे राज्य होण्यास मदत होते, ही कल्पना मान्य केली पाहिजे. अशा सर्वमान्य भूमिकेवरून संयुक्त महाराष्ट्राला माझा पाठिंबा होता. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा मी सभासद होतो आणि संयुक्त महाराष्ट्राची मागणी मांडण्यापर्यंत जे प्राथमिक प्रयत्न झाले, त्यांत इतरांच्या बरोबरीने मीही काम केलेले आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न खरा धसास लागला, तो राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर. या रिपोर्टात सुचविलेल्या 'समतोल द्वैभाषिक' राज्याला मी विरोध केला होता, विशेष कठोरपणे विरोध केला होता. पुढे महाराष्ट्र काँग्रेसचे शिष्टमंडळ संयुक्त महाराष्ट्राची मागणी मांडण्यासाठी व काँग्रेसश्रेष्ठांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला गेले. मी त्यात होतो. तेथेच 'विशाल द्वैभाषिक' राज्याचा पर्याय सुचविण्याची कल्पना निघाली. ही कल्पना कोणाकडून व कशी पुढे आली, याची मला माहिती नाही, पण या कल्पनेला मी विरोध केला, प्रखर विरोध केला. आपण संयुक्त महाराष्ट्र मागायला म्हणून येथे आलो, आणि विशाल द्वैभाषिक पर्याय म्हणून मागावयाचे, ही गोष्ट मला पसंत नव्हती. 'मी शिष्टमंडळात नाही,' असेही सांगितले; पण वडिलधारी मंडळी तेथे होती. त्यांनी आग्रह केला. ही सूचना फेटाळली गेली. या वेळी मी एकंदर आढावा घेण्यास सुरूवात केली. हे काम सरळ नाही, पेचाचे आहे, असे मला आढळून आले. नंतर त्रिराज्य-योजना, मुंबई शहराचे केंद्रशासन आणि अखेर पुन्हा विशाल द्वैभाषिक असा घटनाक्रम घडला. प्रथम पुन्हा एकदा 'मी संयुक्त महाराष्ट्र मानतो, पण शिस्त म्हणून तुमचा निर्णय पाळीन', असेच काँग्रेसश्रेष्ठींना मी स्पष्टपणे सांगितले. पण ज्या द्वैभाषिकाच्या सूचनेला मी त्या वेळी विरोध केला, ते राबविण्याची जबाबदारी शेवटी मी स्वीकारली. तसे करण्यातील माझी भूमिका मी प्रांजलपणे मांडतो.

सर्वसामान्य व सर्वमान्य लोकशाहीनिष्ठ मागणी म्हणून मी संयुक्त महाराष्ट्र मागत होतो, पण हा मौलिक स्वरूपाचा प्रश्न मी कधीच मानला नाही. देशाचे स्वातंत्र्य, राष्ट्रैक्य व समाजवादी पुनर्रचना या गोष्टी मौलिक स्वरूपाच्या मी

मानतो; त्यांच्या तुलनेने संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मूलभूत स्वरूपाचा मी मानला नाही. त्या माझ्या सार्वजनिक जीवनाच्या तीन मूलभूत प्रेरणा आहेत आणि त्याच निकषांवर माझे राजकीय धोरण व निर्णय मी ठरवितो. या मूलभूत गोष्टी साधावयाचे साधन म्हणजे राजकीय पक्ष. माझी राजकीय निष्ठा काँग्रेस पक्षाशी निबद्ध होती व त्या पक्षाची शिस्त माझ्यावर बंधनकारक होती. ज्या तीन गोष्टी पायाभूत म्हणून मी सांगितल्या, त्या काँग्रेसमार्फत आणावयाच्या, असा माझ्या मनाचा निर्धार असल्यामुळे तुलनेने त्यापेक्षा कमी मूलभूत स्वरूपाची अशी संयुक्त महाराष्ट्रासारखी गोष्टही पक्षात राहूनच साधणे इष्ट, हा माझा दृष्टिकोन होता. आपल्या मागणीतील न्याय व तिचे महत्त्व अखिल भारतीय नेत्यांना व महाराष्ट्राबाहेरच्या लोकांना पटविणे हे आपले कर्तव्य आहे, असेही मला वाटे. म्हणूनच सर्व मराठी प्रदेश व गुजराती प्रदेश एकत्र येत आहे व त्रिराज्य योजनेतील मुंबई महाराष्ट्रापासून तुटण्याचा धोका नाही, असे दिसताच, 'विशाल द्वैभाषिका' बाबत मला विचारले गेले, तेव्हा एकभाषी राज्याबाबतची माझी अनुकूल भूमिका सुस्पष्टपणे वरिष्ठ नेत्यांपुढे मांडूनच, द्वैभाषिक राबविण्यास मी संमती दिली.

मनात एकभाषिक ठेवून मी द्वैभाषिक चालविले नाही. या प्रयोगाला पूर्ण वाव द्यावयाचा, तो यशस्वी होत असेल, तर त्याला संपूर्ण संधी द्यावयाची, अशा निर्धाराने एक-दीड वर्ष मी अगदी एकनिश्चयाने (single-minded) द्वैभाषिक राबविले. त्यात सदिच्छा कायम राखण्यास संधी मिळेल, राष्ट्रीय दृष्ट्या हा एक प्रयोग होत आहे, त्याला आपल्याकडून संपूर्ण सहकार्य द्यावयाचे, अशी माझी या बाबतीतील धारणा होती.

द्वैभाषिकाच्या फेरविचाराला चालना कोणी व केव्हा दिली, ते तपशिलाचे प्रश्न आहेत, पण फेरविचाराच्या प्रक्रियेला सर्वसाधारणपणे कशी चालना मिळाली, ते सांगतो, द्वैभाषिकाचा कारभार सुरू करताना मला जे सहकार्य मिळाले, त्यामुळे मला खूप उत्साह वाटत होता. या राज्यातील प्रचंड साधनसामग्रीचा उत्कृष्ट विनियोग करून विकासकार्याच्या द्वारे या विशाल प्रदेशाचे भवितव्य घडविण्याची ही सुसंधी आपल्याला लाभली आहे, अशी एक प्रकारची 'थ्रिल' मला वाटत होती; परंतु दीड-पावणेदोन वर्षांनतर संमिश्र अनुभव येऊ लागला. ज्यांच्यासाठी आपण हे सारे करावयाचे, त्यांनाच यात काही रस वाटत नाही, असे राजकीय दृश्य डोळ्यांसमोर दिसायचे. एका बाजूने विकासकार्याच्या आघाडीवर आपले राज्य नेण्यासाठी आलेली संधी पाहून मला स्फुरण चढे

आणि दुसऱ्या बाजूला ज्यांच्यासाठी हे सर्व आपण करावयाचे, ते लोक अनुकूल मताचे नाहीत, या विचाराने मन खिन्न होत असे. असा दुहेरी अनुभव मी घेत होतो. मात्र जनतेची मनोभावना मला विकृत अथवा उपेक्षणीय केव्हाच वाटली नाही. शेवटी लोकशाहीत लोक हाच कोणत्याही कार्याचा आधार. लोकांच्या भावनांचा विचार हाच प्रधान विचार. आपली जी साध्ये आहेत, त्यांच्यासाठी प्रयत्न करताना लोक आपल्याबरोबर असतील, तर मनाला वाटणारा उत्साह द्विगुणित झाल्याशिवाय राहणार नाही, असे पुढेपुढे माझ्या मनात येत असे. पण एक गोष्ट मी कटाक्षाने पथ्य म्हणून पाळली होती. ती अशी की, ज्यांनी माझ्यावर द्वैभाषिक राबविण्याची जबाबदारी टाकली होती, त्यांनी या बाबतीत मला विचारीपर्यंत आपण होऊन या प्रश्नाचा फेरविचार करा, असे सुचवावयाचे नाही; पण जेव्हा ते होऊन मला परिस्थितीचा अंदाज विचारतील, तेव्हा मात्र सुस्पष्ट कल्पना द्यावयाची. आपल्या विकासकार्यांत लोकांचे उत्साहपूर्ण पाठबळ लाभत नाही, हा अनुभव जसा मला येत होता, त्याचप्रमाणे राष्ट्रीय नेत्यांनाही त्याची जाणीव होत असलीच पाहिजे, असा माझा विश्वास होता. त्याप्रमाणे त्यांच्याही मनात डाचणारी ही गोष्ट त्यांनी मला विचारली आणि प्रांजलपणे व सुस्पष्टपणे माझे परिस्थितीबाबतचे बनलेले मत मी वरिष्ठ नेत्यांना सांगितले. आताच म्हटल्याप्रमाणे सवंगपणाने मतप्रदर्शन करण्याचा मोह मी टाळला होता. किंबहुना आपण अशा वेळी जे मत देऊ, ते निर्णयासच कारणीभूत व्हावे, इतकी आपली शक्ती निर्माण व्हावयास हवी, असे मला वाटे. राष्ट्रीय नेत्यांकडून अर्थात माझ्या मतप्रदर्शनाची कदर केली गेली आणि माझे मत निर्णय ठरविण्याच्या कामी महत्त्वाचे मानले गेले.

## १३... मंगल कलश

प्रतापगड येथे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ १९५७ मध्ये. पं. नेहरूंच्या हस्ते पार पडला. प्रतापगडचा समारंभ व त्या वेळी झालेली निदर्शने, या निदर्शनांचे नियंत्रण यांचा नेहरूंच्या मनावर चांगला परिणाम झाला. त्यांची अशी खात्री झाली, की माझाही जनतेशी जवळचा संबंध आहे व मी तिचे नेतृत्व करू शकतो. नेहरूंनाही लोकांचे प्रचंड निदर्शन पाहता आले आणि त्यांच्या भावना ओळखता आल्या. निदर्शन प्रचंड होते, पण लोक संयमाने वागले व त्याचाही नेहरूंच्या मनावर परिणाम झाला. आमच्या सभांतूनही ते लोकांशी बोलले. या वेळी त्यांच्या लक्षात आले की, आम्ही जरी द्वैभाषिक राबवीत आहोत, तरीही लोकांच्या मनांत काही संदेह आहे.

वाईमार्गे आम्ही पुण्याला येत असता, अनेक निदर्शक पायी वा सायकलवरून परत फिरत असताना भेटत होते. ते उत्साही होते आणि नेहरूंना पाहिल्यावर ते त्यांचे स्वागत करीत, नमस्कार करीत आणि काही जण 'मुंबई महाराष्ट्राला मिळालीच पाहिजे' अशा घोषणाही करीत. नेहरू हे सर्व पाहत होते आणि त्यांची मनःस्थिती उल्हसित होत होती. लोकांच्या या स्वागताने व घोषणांनी त्यांचा उत्साह वाढला होता. खेळकर वृत्तीने ते निदर्शनांचा विचार करीत असावेत. मला ते हिंदीत म्हणाले की,

'पंजाबीही रागावलेले आहेत. (त्या वेळी पंजाबी सुभ्याचा प्रश्न होता.) पण पंजाबीही रागावतात लवकर व विसरतातही लवकर. परंतु तुम्ही मराठी लोक मोठे विलक्षण आहात. तुम्हांला लवकर राग येत नाही व आल्यानंतर तुम्ही तो लवकर विसरत नाही.'

नेहरू हे सर्व सद्‌भावनेनेच बोलत होते.

आम्ही मग पुण्याजवळ आलो. तेथेही निदर्शने झाली आणि स्वागतही झाले.

लोक कसल्या घोषणा देत आहेत ? असे त्यांनी मला विचारले. तेव्हा मी म्हणालो,

'लोक तुम्हांला दीर्घायुष्य चिंतीत आहेत, पण त्याचबरोबर 'संयुक्त महाराष्ट्र स्थापन करा, महाराष्ट्रापासून मुंबई हिरावून घेऊ नका', असेही म्हणत आहेत.'

यावर त्यांनी विचारले,

'मुंबई त्यांच्यापासून कोण हिरावून घेत आहे?'

मी मनात विचार केला, की याचा उपयोग करून घेता येईल काय?

पुढे मी दिल्लीला गेलो असता नेहरूंनी मला सांगितले की,

'हैद्राबादला काँग्रेस महासमितीची बैठक भरेल, तेव्हा तू मला गाजावाजा न करता एकट्याने भेट, मला आता सवड नाही.'

त्यांना माझ्याशी दिल्लीतच बोलावयाचे होते, पण ते अशक्य होते.

नंतर महासमितीचे अधिवेशन हैद्राबादला भरले. त्या वेळी पाकिस्तानात, इस्कंदर मिर्झा यांनी सत्ता ताब्यात घेतली होती. त्याविषयी ते माझ्याशी बोलत होते. तेवढयात मध्येच त्यांनी विषय बदलला व मला ते म्हणाले,

'मी तुझ्याशी काही गोष्टींबाबत चर्चा करीन, असे म्हणालो होतो. मग तुला मी कधी भेटावयास हवे ?'

मी सांगितले,

'तुम्ही सांगाल, तेव्हा!'

यावर, 'दुसऱ्या दिवशी दुपारच्या भोजनाच्या थोडे अगोदर आपण महासमितीतून बाहेर पडू व भोजनानंतर विश्रांती घेऊ' असे सांगून त्यानंतर, म्हणजे अडीच वाजता मी यावे, अशी सूचना नेहरूंनी केली.

ठरल्याप्रमाणे मी अडीच वाजता गेलो. नेहरूंनी मला लगेच त्यांची विश्रांतीची जी खोली होती, तीत नेले आणि महाराष्ट्रातील परिस्थितीविषयी माझे मत काय, म्हणून विचारले. तसेच, गुजरात व विदर्भाच्या मंत्र्यांशी माझे कसे संबंध आहेत, अनेक प्रमुख व्यक्तींची नावे घेऊन त्यांच्याशी कसे संबंध आहेत, कारभारयंत्रणा कशा प्रकारे चालू आहे. अधिकाऱ्यांचा प्रतिसाद कसा आहे, असे अनेक प्रश्न त्यांनी विचारले.

मी प्रत्येकाची उत्तरे दिली.

'कारभारयंत्रणा चांगली चालली आहे, विकासाची कामे होत आहेत, परंतु...'

नेहरूंनी विचारले,

'हे परंतु काय?'

मी म्हणालो,

'परंतु लोक समाधानी नाहीत !'

'का नाहीत?'

या प्रश्नाला मी उत्तर दिले की,

'विकासाची कामे करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे व सरकार ते करील. पण यासाठी द्वैभाषिकाची गरज नाही, अशी लोकभावना आहे व म्हणून ते संतुष्ट नाहीत. तुम्ही इतर मंत्र्यांशी बोलून त्यांचे काय मत आहे, हेही पाहावे. माझ्याबरोबर काम करावयाचे असल्याने ते मला एक सांगत असतील, पण त्यांच्या काही इतरही कल्पना असण्याचा संभव आहे.'

नेहरू यावर हसले आणि अगोदरच यांपैकी काही जणांशी बोललो असून, माझे विश्लेषण प्रायः बरोबर, असेही ते म्हणाले.

अशाच प्रकारचे बोलणे झाल्यावर अखेरीस त्यांनी मला विचारले की,

'शासकीय दृष्ट्या द्वैभाषिक मुंबई राज्य चांगले चालले आहे, पण राजकीय दृष्ट्या तसे ते चाललेले नाही, हाच तुझा निष्कर्ष आहे ना ? हे तुझ्या मनातले आहे, हे खरे काय ?'

मी होकार दिला व माझे स्पष्ट मत असल्याचेही म्हणालो.

त्यावर -

'तू तुझे मन बोलून दाखविलेस, हे चांगले झाले', असा अभिप्राय देऊन आमच्या संभाषणाबद्दल कोणापाशीही न बोलण्याचा सल्ला त्यांनी मला दिला.

हे संभाषण १९५८ च्या मध्यास झाले. नेहरूंच्या सल्ल्याप्रमाणे मी या संभाषणाची गंधवार्ता कोणालाच लागू दिली नाही. नेहरू या साऱ्या प्रश्नाचा फेरविचार करण्याच्या मनःस्थितीत आहेत, याचा अंदाज मला या वेळी लागला.

नेहरूंनी हा विषय त्यांच्या काही निकटवर्तीयांपाशी नंतर काढला असेल. राजकीय परिस्थितीचे मी केलेले विश्लेषण त्यांनी पं. पंत यांना सांगितल्याचेही मला नंतर कळाले.

नेहरू ५८ साली डिसेंबरच्या सुमारास मुंबईत आले होते. त्यांचे उपनगरात कार्यक्रम होते. या कार्यक्रमानंतर दुपारच्या भोजनासाठी राजभवनावर येण्याऐवजी आरे वसाहतीत खास अतिथिगृह आहे आणि तेथे जेवणाची व्यवस्था होऊ शकते, असे मी म्हणालो, तेव्हा नेहरूंनी ते लगेच मान्य केले. भोजनानंतर आपण एखादी डुलकी घेऊ, असेही ते म्हणाले. पण कोणत्याही कारणाने असो, त्यांना झोप आली नाही व त्यांनी बोलावणे धाडले. त्यांची भाची नयनतारा सहगल बरोबर होती. तिला हे माहीत नव्हते. म्हणून या वेळी नेहरूंची झोपमोड कशासाठी करतो ? असे तिने विचारले. नेहरूंनीच बोलावणे धाडल्याचे मी तिला सांगितले. मी खोलीत गेलो, तेव्हा पंडितजी आडवे झाले होते. त्यांनी बसावयाला सांगितले व लगेच हैद्राबादच्या संभाषणाची त्यांनी आठवण दिली आणि विचारले की, 'द्वैभाषिक तोडून दोन स्वतंत्र राज्य केली, तर काँग्रेसला बहुमत मिळेल काय ?' महाराष्ट्रात ५७ साली काँग्रेसला कमी जागा मिळाल्या होत्या, त्याचाही त्यांनी उल्लेख केला. मी त्यांना सांगितले, की 'मी याचा विचार केलेला नाही. आणि मी याबद्दल कोणाशी बोललो नाही, पण तुम्हांला याचे उत्तर पुढील बैठकीत देऊ शकेन.' त्यांनी ते मान्य केले, काँग्रेसच्या बहुमताविषयी त्यांना खात्री हवी होती.

काँग्रेसचे अधिवेशन ५९ च्या जानेवारीत नागपूरला झाले. अधिवेशनाचे यजमानपद माझ्याकडे होते. त्यामुळे मोकळा वेळ थोडा मिळत होता. पंडितजी राजभवनावर राहत होते. आमची गाठ पडे, तेव्हा ते त्या मुक्कामात नागपूर व नागपूरच्या लोकांचे प्रश्न यांविषयी विचारणा करीत. नागपूर सोडण्यापूर्वी आदल्या संध्याकाळी त्यांनी मला बोलावणे धाडले आणि द्वैभाषिक तोडल्यावर काँग्रेसला बहुमत मिळेल, की नाही, याचा हिशेब केला, की नाही, असे त्यांनी विचारले. मी होकार देऊन बहुमत मिळेल, असे म्हटलं. 'हे कसे शक्य आहे?' असे त्यांनी विचारल्यावर मी सांगितले, की

'तांत्रिकदृष्ट्या आम्ही अल्पमतात आहोत, पण विरोधकांतले निदान पंधरा सदस्य केवळ महाराष्ट्राच्या प्रश्नावरच विरोधी पक्षात आहेत. पण द्वैभाषिक तोडले जात असून, महाराष्ट्र स्थापन होत आहे, हे जर त्यांना कळले, तर हे पंधराजण तरी काँग्रेसला पाठिंबा देतील, ते काँग्रेसमध्ये येतील, की नाही, हे सांगता येणार नाही, पण तेही शक्य आहे.'

पंडितजी म्हणाले,

'मला त्यांची नावे कळण्याची गरज नाही, पण हे सर्व शक्य आहे, असे

तुझे निश्चित मत आहे काय?'

मी म्हणालो,

'होय!'

त्यावर मे मध्ये किंवा मार्च वा एप्रिलच्या प्रारंभी मोरारजीभाईंच्याबरोबर एक बैठक करावी लागेल आणि त्यांच्याशी बोलून, चर्चा करूनच जे काही ठरवावयाचे, ते ठरवावे लागेल, असे ते म्हणाले. मी अर्थातच हे मान्य केले आणि मग मार्च अखेरीस व एप्रिलच्या प्रारंभी ही बैठक घेण्याचा बेत ठरला.

पुढे मार्चच्या मध्यावर माझी प्रकृती बिघडली. मला किडनीचा विकार झाला होता आणि शस्त्रक्रिया करणे भाग पडले. ती होऊन मला बरे वाटेपर्यंत जून-जुलैत मी मुंबईस कामावर परतलो. नेहरू माझ्याशी बोलले व आजारपणामुळे द्वैभाषिक प्रश्न मागे पडला व आता त्याबद्दल केव्हा चर्चा करावयाची, याची त्यांनी चौकशी केली. ऑगस्टमध्ये ती करणे बरे, असे मी सांगितले. ते त्यांना मान्य झाले. मी १९ वा २० ऑगस्टला दिल्लीत यावे, असे त्यांनी सुचविले. तत्पूर्वी निदान काही प्रमुख व्यक्तींशी चर्चा करणे बरे, असे मत मी बोलून दाखविले. तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी याबद्दल काय ते ठरवू, असे त्यांनी उत्तर दिले व मला दिल्लीला बोलावले.

दिल्लीला निघण्यापूर्वी मी मोरारजीभाईंकडे फोन केला. नेहरूंनी मला बोलावले असून, द्वैभाषिक राज्याचा आढावा त्यांना घ्यावयाचा आहे व तुमची हजेरी अपेक्षित आहे, असे मी कळविले. मी मोरारजीभाईंशी बोललो, की नाही हे, आठवत नाही. पण त्यांच्याकडेच मी उतरत आलो होतो व याहीवेळी त्यांच्याकडे उतरावयाचे होते. मी त्यांच्या कुटंबातल्यासारखाच होतो. मोरारजीभाईंशी बोलून मी निरोप दिला, की नाही, हे आठवत नसले, तरी त्यांचे चिटणीस श्री. टोणपे यांच्याशी बोललो, हे निश्चित. टोणपे हे माझे दिल्लीतील मित्रच होते. दुसऱ्या दिवशी मी दिल्लीत आलो, तेव्हा विमानतळावर मला घेण्यासाठी टोणपे आले होते. त्यांनी सांगितले की, मोरारजीभाई संसदेत गेले आहेत आणि पंडितजींना भेटण्यापूर्वी मी त्यांना भेटावे. मोरारजीभाईंच्या सवडीने मी त्यांना भेटेन, असे मी टोणपे यांना सांगितले, त्याप्रमाणे चारच्या सुमारास मला त्यांच्याकडून बोलावणे आले.

मोरारजीभाई रागावले नव्हते, पण अस्वस्थ होते. त्यांनी मला एकंदर परिस्थितीचा आढावा काय, असा प्रश्न केला. मी माझे मत दिले.

मोरारजीभाईंनी ते ऐकून घेतले. त्यांनी राग वा विरोध व्यक्त केला नाही. त्यांना वाईट मात्र वाटले होते. मी त्या वेळच्या त्यांच्या वृत्तीचे जरूर कौतुक करतो. अर्थात आपल्याला वाईट वाटले, हेही त्यांनी मला सांगितले नाहीच. दुसऱ्या काही मित्रांना सांगितले.

तसे ते अतिशय संयमी वृत्तीचे आहेत. माझे मत ऐकून घेतल्यावर मोरारजीभाई म्हणाले,

'हे तुमचे प्रामाणिक मत असेल, तर मी याबद्दल काही बोलू शकत नाही. परंतु हे सर्व दुःखद व दुर्दैवी आहे, हे मात्र खरे!'

त्यानंतर आम्ही उगाच इकडच्या - तिकडच्या गोष्टी उपचारार्थ केल्या.

रात्री आम्ही दोघेही मोरारजीभाईंच्या घरी एकत्र जमलो व एकाच मोटारीतून पं. गोविंद वल्लभ पंत यांच्याकडे गेलो.

पंडितजी तेथे आले होते व याप्रकारे आम्ही चौघेच जमलो होतो. आम्ही बसताच पंडितजी म्हणाले,

'चव्हाण, तुमचा काय आढावा असेल, तो सांगा, पाहू...'

त्यावर मी माझ्या दृष्टिकोनातून परिस्थितीचे विश्लेषण केले. मी सांगितले की,

'गुजराती समाजाबरोबर आमचे संबंध चांगले आहेत, कारभारयंत्रणाही ठीक रीतीने चालू आहे. मराठी व गुजराती समाजांतील तणावही बराच नियंत्रणाखाली आहे. पण दोन्ही समाज सध्याच्या व्यवस्थेबाबत समाधानी नाहीत. द्वैभाषिकाचा प्रयोग चालू ठेवण्याची माझी तयारी आहे. पण लोक खूश नाहीत.'

यावर -

'गुजरातीही समाधानी नाहीत, हे कसे मी म्हणतो?' असे मला विचारण्यात आले.

मी उत्तर दिले.

'मी मुख्यमंत्री आहे आणि रोजच्या अनुभवावरून मी हे सांगतो. मुख्यमंत्री या नात्याने ५७ साली मी अहमदाबादला गेलो, तेव्हा अत्यंत उग्र निदर्शने झाली आणि गोळीबार करावा लागला. त्यानंतर मी न्यायालयीन चौकशीचा आदेश दिला. न्यायमूर्ती कोतवाल यांना चौकशीसाठी नेमण्यात आले. या आयोगापुढे

जाऊन मी लेखी कैफियत दिली व सर्व जबाबदारी माझ्याकडे घेतली. नंतर या आयोगाचा अहवाल आला, तेव्हा त्याने माझी प्रशंसा केली.'

गुजरात कॉंग्रेसचे कार्यकर्ते चांगले सहकार्य देतात, हेही खरे असल्याचे मी स्पष्ट केले, पण लोक समाधानी नाहीत, याची जाणीव करून दिली.

यावर पंतजी म्हणाले की,

'चव्हाण मुख्यमंत्री आहेत व ते आपले अनुभव सांगत आहेत.'

त्यामुळे एकंदर रागरंग मोरारजीभाईंच्याही लक्षात आला.

मग पंतजींना विचारण्यात आले,

'पुढे काय?'

ते म्हणाले,

'चव्हाण यांना जर याप्रकारे वाटत असेल, तर आपल्याला काही करावे लागेल.'

मग मोरारजीभाईंना त्यांचे मत देण्यास सांगण्यात आले. मोरारजीभाई म्हणाले,

'द्वैभाषिक राज्य मोडण्याची कल्पना मला मान्य नाही. ती माझ्या तत्त्वाच्या विरूद्ध आहे. तेव्हा पक्षाने द्वैभाषिक मोडावे, असे मी सांगणार नाही; पण चव्हाणांचे मत वेगळे आहे आणि आपल्याला याचा विचार करावा लागेल', एवढे बोलून त्यांनी जगाच्या इतिहासातील द्वैभाषिक राज्यांची उदाहरणे दिली.

मी मग म्हणालो,

'द्वैभाषिक राज्याचा प्रयोग चांगला आहे. मोरारजीभाई म्हणतात, यात काही चूकही नाही, परंतु द्वैभाषिकाचा प्रयोग करण्यासाठी आमचीच का निवड केली, असे लोक विचारतात आणि त्यांच्या मनाला ते डाचते. इतरांचा हक्क आपण मान्य केला आहे, मग आमचा का नाही? असा त्यांचा प्रश्न. निदान मराठी लोकांना हे फार बोचते. त्यांच्याशी या संबंधात तर्कसंगत चर्चा करणे शक्य नाही.'

मोरारजीभाई म्हणाले,

'इतर राज्यांबाबतही हा प्रयोग करण्याची कल्पना होती, पण कोणी मानली नाही. तामिळनाडू व केरळ यांचे एक राज्य करण्याची सूचना झाली होती, पण कामराज यांनी ती मानली नाही.'

हा प्रश्न निघाला, तेव्हा कामराज कसे बसले होते व ते 'नाही, नाही' एवढेच कसे म्हणाले, याची नक्कलच मोरारजीभाईंनी केली.

मी पुन्हा सांगितले की,

'द्वैभाषिकाच्या मी विरूद्ध नाही, पण हा प्रयोग केला आणि तो फसला.'

यानंतर बैठक संपली. ही बैठक निर्णायक होती.

सकाळी मी मुंबईला परतलो.

त्या दिवशी दिल्ली, मुंबई, अहमदाबाद वगैरे ठिकाणच्या वृत्तपत्रांत या बैठकीची बातमी ठळकपणे आली. पंडितजींनी घेतलेल्या बैठकीचा हा वृत्तांत कदाचित त्यांच्या वर्तुळातून प्रसिद्धीला दिला गेला असेल. मी मुंबईला पोहोचलो, तेव्हा मला बरेच लोक भेटावयास आले. विधानसभेचे अधिवेशन चालू होते. माझ्या मंत्रिमंडळातील मंत्री डॉ. जीवराज मेहता यांना वाटले, की विधिमंडळाचा हा विश्वासभंग झाला. मी त्यांना सारा इतिहास निवेदन केला, पण ऑगस्ट-सप्टेंबरपासून वेगळीच अडचण उभी राहिली. काँग्रेसचे अध्यक्ष होते ढेबर. त्यांचा द्वैभाषिक तोडण्यास विरोध होता. गुजरातच्या लोकांना ही बदललेली भूमिका आम्ही कशी पटवणार, असे त्यांनी नेहरूंना विचारले. पंडितजींच्या स्वभावाचे एक वैशिष्ट्य होते. अशा वेळी ते शिंपल्यात जाऊन बसतात. तसे ते बसले. इकडे लोकांना द्वैभाषिकाच्या फेरविचाराची योजना समजली होती; पण हालचाल होत नव्हती. हा फेरविचार करण्याचे पाऊल कसे टाकावयाचे, हे मी नेहरूंना विचारले. तेव्हा ढेबर व मोरारजीभाईंचे मत त्यांनी मला ऐकविले आणि मीच या संबंधात शंकासमाधान केले पाहिजे, असे म्हणाले. आता जर द्वैभाषिकाचा फेरविचार केला गेला नाही, तर काय होईल, या विचाराने मला धडकी भरली, मी अस्वस्थ झालो.

याच सुमारास विदर्भात असंतोष माजला. मी शहाणपणाने महाराष्ट्र मिळविला, पण आता आपल्याला गुलाम केले जाईल, असे तेथील काही लोकांना वाटू लागले. त्यांना राग आला. लोकनायक अणे वगैरे याप्रमाणे बोलत होते. अशा प्रकारे दोन प्रश्न निर्माण झाले आणि त्यावर मीच तोडगा काढावा, असे पंडितजी सांगत होते. मग मी विदर्भातील माझ्या सहकाऱ्यांना बोलावून पंडितजींचे म्हणणे सांगितले. त्यावर वसंतराव नाईक, शेषराव वानखेडे, नासिकराव तिरपुडे, काझी या विदर्भाच्या मंत्र्यांनी चांगली भक्कम भूमिका घेतली. ते म्हणाले,

'आपण दिल्लीत जाऊ. खासदार वगैरेंना भेटू आणि महाराष्ट्र राज्यात आपल्याला राहावयास हवे, असे त्यांना सांगू.'

मी हे मान्य केले; पण सांगितले, 'जे इतर सहकारी आपल्याविरूद्ध आहेत, त्यांच्याविरूद्ध काही करू, बोलू नका.' हे सर्वांनी कबूल केले व मग हे माझे सहकारी अनेकांच्या गाठीभेटी घेऊ लागले.

मी कन्नमवारांनाही बोलावले व विदर्भाच्या चळवळीबद्दल बोललो.

ते म्हणाले,

'मी जाहीररीत्या विदर्भाबद्दल बोललो आहे, तेव्हा मला माघार घेता येणार नाही, पण मी तुमच्याविरूद्ध जाणार नाही.'

मग हे कसे करावयाचे, असे मी विचारले. तेव्हा दोन्ही भागांतील दोन-दोन तीन-तीन काँग्रेसजनांची एक समिती नेमावी व या प्रश्नाचा विचार करून तिने काही ठरवावे, अशी सूचना कन्नमवार यांची होती, ती मी मान्य केली.

तथापि, एकट्या महाराष्ट्र-विदर्भापुरता हा प्रश्न नव्हता. गुजरातमध्येही काही हालचाल करावयास हवी होती. त्या वेळी मोरारजीभाई मुंबईत आले असता मी त्यांची भेट घेतली. मी त्यांना म्हणालो,

'मोरारजीभाई, द्वैभाषिक मोडून दोन राज्ये करण्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला आहे. आता जर काहीच न करता आपण स्वस्थ बसलो, तर परिस्थिती बिकट होईल.'

मग काय करावे, असे त्यांनी विचारले.

मी म्हणालो,

'तुम्हांला द्वैभाषिक तोडण्याची कल्पना तत्त्वतः मान्य नाही, आपला विश्वासभंग झाला, असे तुम्हांला वाटते. पण आपण वस्तुनिष्ठ विचार केला पाहिजे. म्हणून दोन राज्ये सद्भावनेने कशी करावीत, हे ठरविण्याची आता गरज आहे. आपण दोघे एकत्र बसून तोडगा काढू.'

मोरारजींनी याला मान्यता दिली. 'पण दिल्लीच्या नेत्यांचा सल्ला घेतला काय?' असे त्यांनी विचारले. मी 'नाही' म्हणून सांगितले, तसेच, पंडितजींशी सल्लामसलत करण्याची गरज नाही, असेही म्हणालो. याचे कारण माझे मला माहीत होते.

नेहरूंनी या संबंधात स्वतः हालचाल न करण्याचे ठरविले होते, पण

मोरारजीभाईंनी मला दिल्लीच्या नेत्यांशी चर्चा करण्याचा आग्रह केला आणि आपणही गुजराती नेत्यांशी बोलू, असे ते म्हणाले.

मी मग दिल्लीला गेलो आणि विदर्भ व गुजरात यांच्याबाबत कोणत्या मार्गाने मी पावले टाकीत आहे, हे पंडित पंत यांना निवेदन केले. त्यांना ते पसंत पडले व मला, 'आगे बढो', असे त्यांनी सांगितले. नेहरूंना आपण खुलासा करू, असेही ते म्हणाले.

मी नंतर मुंबईला परतलो.

आठवडाभराने मोरारजीभाईंनी मला दिल्लीला बोलावले. त्याप्रमाणे मी गेलो. तेव्हा मोरारजीभाई म्हणाले,

'गुजरातच्या राजधानीचा व डांगच्या भवितव्याचा विचार केला पाहिजे.'

मी हे मान्य केले व सहकाऱ्यांशी चर्चा करतो, असे सांगून मुंबईला परतलो.

मुंबईला आल्यावर मी विचारविनिमय सुरू केला. भाऊसाहेब हिरे यांना मी बोलाविले व गुजरातच्या राजधानीसाठी पैसे द्यावे लागतील, इतरही काही रक्कम तोडून द्यावी लागेल, हे मी त्यांना स्पष्ट केले. ते म्हणाले की, याबाबत काही जबाबदारी घेण्याची आपली तयारी नाही. इतरही काही कार्यकर्त्यांची हीच भूमिका होती. मी या आर्थिक प्रश्नाबाबत तोडगा काढण्यासाठी काही अधिकाऱ्यांना सांगितले. तसेच, माझ्या बाजूला आणखी एक घटक होता. तो असाः

द्वैभाषिक राज्यात महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही भागांतून विरोधी पक्ष होते. त्यांच्या चर्चा चालत. एकत्र येऊन या राज्याला विरोध करण्याचे त्याचे बेत होत होते. अशा एका चर्चेच्या वेळी डांग गुजरातला देण्याची डांगे यांनी तयारी दर्शविली होती. मला याची माहिती होती. मी मग माझ्या अनेक पक्ष-सहकाऱ्यांना बोलावले. विरोधी पक्षांची डांगबद्दल काय भूमिका आहे, हे मी त्यांना स्पष्ट केले. मी असेही सांगितले, की डांग गुजरातला देण्यास माझा व्यक्तिशः विरोध आहे, पण आपण या प्रश्नावर बोलणी तोडणार काय ? माझी स्वतःची भूमिका व्यवहार्य आहे. या प्रश्नावर बोलणी तोडू नयेत, असे मला वाटते.

हे सहकारी म्हणाले,

'आपल्याला मुंबई मिळत आहे, तेव्हा तुम्हीच काय ते ठरवा, महाराष्ट्र ते

मान्य करील.'

द्वैभाषिक तोडल्यावर आर्थिक नुकसानभरपाई, राजधानी बांधण्याचा खर्च, इत्यादी किती रक्कम द्यावी लागेल. याचा अभ्यास मी काही अधिकाऱ्यांना करावयास सांगितला होता. आंध्र व मद्रास राज्यांची फारकत झाली, तेव्हा यासंबंधीची पद्धत ठरली होती.

याप्रमाणे तीसएक कोटी द्यावे लागतील, असे मला सांगण्यात आले. एवढी रक्कम एकदम द्यावयाची, हे मराठी मनाला मानवणारे नव्हते. काही सहकाऱ्यांनी याबद्दल चिंता व्यक्त केली. तेव्हा एकट्या मुंबईतील विक्रीकर २५-३० कोटींच्या घरात जातो, तर मग ५० कोटी द्यावे लागले, तर दोन वर्षांत ती रक्कम मुंबईच्या विक्रीकरातूनच वसूल होईल, असा युक्तिवाद मी केला व तो माझ्या सहकाऱ्यांनी मान्य केला. काय रक्कम द्यावयाची असेल, ती तुम्ही ठरवा व हा प्रश्न मिटवा, असे त्यांचे मत पडले.

मी लगेच दिल्लीला गेलो. मोरारजीभाईंना डांग देण्याची तयारी असल्याचे सांगितले. राजधानी बांधण्यासाठी खर्च देण्याचे मान्य केले. हा खर्च व बाकीची भरपाई याचे कोष्टक आंध्र व मद्रासची फारकत झाली, त्या धर्तीवर असावे, असे मी सांगितले व त्यांनी अधिकाऱ्यांकडून याची तपासणी करावी, अशी सूचना केली. तेव्हा महाराष्ट्र व गुजरात यांच्याकडून दोन दोन अधिकारी व रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर अशा पाचजणांची समिती नेमली गेली. आमच्या बाजूने बर्वे व यार्दी होते. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर तेव्हा भट्टाचार्य होते. राजधानी बांधण्याच्या खर्चाचा प्रश्न समितीकडे न सोपविता आपण आपापसांत सोडवू, असे मोरारजीभाई म्हणाले, तेव्हा मी तात्काळ मान्यता दिली व आंध्र व मद्रासच्या धर्तीवर सात कोटी रूपये देण्याची तयारी दर्शविली. मोरारजीभाई म्हणाले,

'नाही, दहा कोटी हवेत.'

मी ते कबूल केले. ही रक्कम द्वैभाषिक राज्याच्या अर्थसंकल्पातून येईल, असेही मी म्हणालो व ते मोरारजींना मान्य होते.

मी हिशेब केला, की द्वैभाषिकाच्या अर्थसंकल्पातून ही रक्कम येणार, म्हणजे महाराष्ट्रावर केवळ सात कोटींचाच बोजा पडेल !

पुढे मी पुन्हा दिल्लीला गेलो, तेव्हा चव्हाणांनी माझ्याशी चांगला व्यवहार केला, असे मोरारजींनी काही जणांना सांगितल्याचे मला कळले. पंडितजी

वगैरेंच्या मध्यस्थीशिवाय आपापसांत हा प्रश्न सोडविता आला, याचे त्यांना समाधान होते. मी पंतांना सर्व हकीगत निवेदन केली. विदर्भाबाबत एक समिती नेमली आहे व ती तोडगा काढील, असेही त्यांनी सांगितले. त्यांनी मग मी पंडितजींना भेटून सर्व निवेदन करावे, असे सुचविले. त्याप्रमाणे मी नेहरूंना भेटलो. माझी हकीगत ऐकून त्यांना आनंद झाला.

ते म्हणाले,

'आता आपल्याला पुढचे पाऊल टाकण्यास हरकत नाही.'

विदर्भाबाबत नऊजणांची समिती नेमली होती. तीत महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भाचे प्रतिनिधी होते व पं. पंत अध्यक्ष होते. आमच्या दोन-तीन बैठका झाल्या व आम्ही एकमताने अहवाल तयार केला. विदर्भ महाराष्ट्रात राहावा, हे मान्य झाले व काही आश्वासने देण्यात आली. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा मार्ग मोकळा झाला.

# १४... मराठी राज्याचे स्वप्न

१ मे, १९६० ! युगायुगांतून येणारा तो दिवस अखेर महाराष्ट्राला दिसला. भारताच्या सर्वश्रेष्ठ नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र मान्य केला व त्या दिवशी संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्षात आला. पण त्यापूर्वी २७ एप्रिलला महाराष्ट्रानं शिवनेरीवर तुतारी फुंकून सूर्य उगवल्याचं सांगितलं होतं. मला आठवतं, त्या दिवशी मी शिवनेरीस पोचलो, तेव्हा प्रतापगडपासून शिवनेरीपर्यंतचा घडलेला संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला. महाराष्ट्राची तीन कोटी जनता त्या दिवशी शिवनेरीकडे पाहत होती. महाराष्ट्र राज्याचा उत्सव शिवछत्रपतींच्या जन्मदिवशी शिवनेरीवर सुरू झाला होता आणि १ मे, १९६० ला महामंत्री पं.नेहरूंच्या हस्ते पहाटे संयुक्त महाराष्ट्राचं नवराज्याचं उद्‌घाटन झालं. सोनियाचा दिवस महाराष्ट्रानं पाहिला. आज ते सारं सारं आठवतं.

ज्या दिवशी राज्य स्थापन झाले, त्या पहिल्या दिवशी महाराष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात मी पुढील विश्वास व विचार व्यक्त केले होते.

‘गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती, ती आता संपून महाराष्ट्राला यापुढे स्थैर्याचे दिवस येतील, अशी आशा करण्यास मुळीच हरकत नाही. त्यायोगे लोकांना आता आपल्या विकासाच्या प्रश्नांकडे कटाक्षाने लक्ष देता येईल व विकासकार्यांच्या बाबतीत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणे तोंड देऊ शकतील.’

हे एक; आणि त्यानंतर -

‘नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील, ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. हा जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणे हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो.’

आज या रोमांचकारी स्मृतींच्या दिवसांकडे पाठीमागे वळून दृष्टिक्षेप टाकल्यानंतर, मनात काय विचार येतो, तो जास्त महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र राज्याचे स्वप्न साकार होणार, की नाही, हे ठरविण्याची कसोटी मी या माझ्या

'सह्याद्रीचे वारे' या भाषणांच्या संग्रहात दिलेली आहे, आणि ती म्हणजे, जनतेच्या सुखाचे दिवस येतील, ही जी अपेक्षा आहे, त्या अपेक्षापूर्तीचे क्षण जवळ आणणे. हा मानबिंदू मानून ह्या कसोटीवर गेल्या वीस वर्षांची तपासणी केली पाहिजे. आज मी असे म्हणू शकणार नाही, की हा अपेक्षापूर्तीचा मानबिंदू आम्ही जिंकलेला आहे. महाराष्ट्राचे समाजजीवन हे जातिधर्मांमध्ये विस्कटून, तुटूनफुटून निघालेले आहे. या समाजजीवनास एकजिनसी रूप आणता यावे, हा एक प्रमुख उद्देश राज्यनिर्मितीत होता. त्यासाठी काही ध्येयधोरणे घालून दिली होती व निश्चित अशी प्रयत्नांची दिशा ठरवली होती. उपेक्षित दलित समाजाच्या सहकार्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व ध्येयधोरणाचा पाठपुरावा करून महाराष्ट्राचे राज्य व राजकारण करावे, असा हेतुपुरस्सर प्रयत्न केला गेला; परंतु चंद्रपूरपासून कोकणच्या टोकापर्यंत पसरलेल्या महाराष्ट्राच्या विशाल भूमीतील या समस्या दूर करण्याकरिता प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांची उणीव, तसेच, त्यासाठी लागणारी निष्ठा व सामाजिक प्रयत्न यांची कमतरता पडली. प्रयत्न झाले नाहीत, असे मी म्हणणार नाही. पुरेसे आणि सातत्याने झाले नाहीत, ते कबूल करावे लागेल आणि त्यामुळे आज या दिशेने आमची प्रगती जशी व्हावी, तशी झालेली नाही, हे प्रामाणिकपणाने कबूल करावे लागेल. या प्रश्नाचे स्वरूप विसरून एकटाच महाराष्ट्र काही संपूर्ण वेगळे करू शकेल, हे खरे नव्हते. हा एक विचार म्हणून मी त्यांची नोंद येथे केली आहे. अपयश झाकण्यासाठी एक सबब म्हणून नव्हे.

समतेचा विचार गेल्या शतकापासून सांगणारी महात्मा फुले, शाहू महाराज, आगरकर, डॉ. आंबेडकर, आदी नेत्यांची परंपरा महाराष्ट्रात जरी निर्माण झाली असली, तरी जनमानसाला मुळापर्यंत हालवून सोडणारी ती भावना बनलेली नव्हती. दलित साहित्याचा विचार आणि त्याला मिळणारी मान्यता ही गेल्या दहा वर्षांतील शुभचिन्हे आहेत. एक हजार वर्षांच्या मराठी साहित्यात माणुसकीस हरवून बसलेल्या अस्पृश्यासंबंधाने पोटतिडकेने रागाचा एक शब्द निघालेला नाही, हे सत्य तर कबूल करावे लागेल. अपयशाची मीमांसा करताना याही एका मूलभूत गोष्टीची नोंद घ्यावी लागणार, म्हणून त्याचा उल्लेख केला आहे. लोकशाहीची व राजसत्तेची जी नवी साधने आता आमच्या हातांत आलेली आहेत, त्यांचा उपयोग करून या दिशेने त्याचे निराकरण करायला पाहिजे. परंतु साहित्यादी इतर सामाजिक शक्तींचीही त्याला साथ

पाहिजे. मराठी राज्याने या बाबतीत विशेष प्रयत्न केले पाहिजेत. कोणत्याही राज्याचे यश अपयश किंवा त्यासाठी प्रयत्न करणे हे त्या राज्याच्या नेतृत्वावर अवलंबून असते, असा माझा अनुभव आहे.

आर्थिक क्षेत्रात शेतीचे व उद्योगांचे प्रश्न, त्याचप्रमाणे, ग्रामीण व शहरी बेरोजगारीचा विचार हे आज महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न आहेत. मला आठवते, मराठी राज्याच्या स्थापनेच्या वेळी इतर भाषक पुढारी जो अपप्रचार करीत असत, त्यामध्ये अशी एक शंकाही बोलून दाखविली जात असे, की मुंबई शहर हे एकभाषिक राज्याची राजधानी झाली, म्हणजे या शहरातील भांडवल व कारखानदारी मुंबई व महाराष्ट्र सोडून बाहेर पळून जातील. वस्तुतः हा प्रकार मतलबी होता आणि त्याचा परिणाम राष्ट्रीय पातळीवरील काही नेतेमंडळींवर झालेला मला माहीत होता. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून अतिशय जागरूकतेने आम्ही प्रयत्न केले. मी पहिल्या प्रथम उद्योग खात्याची जबाबदारी स्वतः माझ्याकडे घेतली. दोन-अडीच वर्षे नवीन नीतिनियमांच्या, तसेच, एम् आय् डी सी सारख्या नवीन यंत्रणा विधेयकाने निर्माण करून या सर्वांच्या मदतीने महाराष्ट्र राज्याने हे दाखवून दिले, की त्यांच्याविरूद्ध चाललेला हा प्रचार मतलबी होता. महाराष्ट्रातून भांडवल आणि कारखानदारी दूर गेलीच नाही. उलट, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, पुणे, नागपूर, इ. शहरांमध्ये गेल्या वीस वर्षांमध्ये उद्योगधंद्यांची वाढ झालेली पाहायला मिळते. 'सिकॉम' सारख्या नव्या संस्थाही या कामासाठी उभ्या केल्या. अशी या प्रगतीच्या दिशेने महाराष्ट्र सरकारने पावले टाकलेली आहेत, हे कबूल करावे लागेल. या क्षेत्राच्या कार्यप्रणालीत कुठे दोष नसतील, असा माझा दावा नाही, परंतु झालेल्या प्रगतीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अर्थात कितीतरी अपुरेपणा अजून आहे, हा विचार ध्यानात येतो. महत्त्वाचे उद्योगधंदे मागासलेल्या कोकण, मराठवाडा व विदर्भ यांच्या अंतर्गत प्रदेशांत अजून गेलेले नाहीत, या विचाराचाही समावेश होतो. लहान उद्योगधंद्यांची वाढ व्हावी, म्हणून विचारपूर्वक असे पूरक प्रयत्न झालेले आहेत. त्याला काहीसे यशही आलेले आहे. पण असे उद्योगधंदे अजूनही मोठ्या शहरांतच आहेत. बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने लहान उद्योगधंद्यांनी ग्रामीण क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे. सुशिक्षित बेकारीचा प्रश्न हा एक दुसरा भयानक प्रश्न उत्तराची वाट पाहत आहे. उत्तरास उशीर झाला, तर त्यातून स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

शेती हा महाराष्ट्राचा स्वाभाविकच इतर राज्यांप्रमाणे महत्त्वाचा उद्योग आहे. शेती व पाणी यांचा अभेद्य संबंध आहे. याबाबतीत कृष्णा-गोदावरी तंट्याच्या उशिराने झालेल्या निर्णयाने बरीच अडचण आणलेली आहे; परंतु नवीन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर या प्रश्नाचा तसाच गंभीरपणाने विचार करून काही नवीन पावले टाकली गेली होती. श्री. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नांचा समग्रतेने विचार करण्यासाठी इरिगेशन कमिशन नेमण्यात आले होते. त्याबाबतीत अनेकविध कामे सुरू होऊन प्रगतीच्या दिशेने पावले पडली आहेत. त्याने सर्वांचे समाधान झाले, असा माझा दावा नाही. शेतीत पाणी व वीजपुरवठा यांना महाराष्ट्रामध्ये अग्रहक्क आग्रहाने देण्याची गरज होती व आहे. गेल्या वीस वर्षांत शेतकी क्षेत्राच्या प्रश्नाच्या संबंधात आलेले नवे अनुभव, त्या क्षेत्रात निर्माण झालेली नवीन टेक्नॉलॉजी, भूगर्भातील पाण्याच्या वापराची शक्यता वगैरे अनेकविध नवीन स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांत महाराष्ट्राच्या शेतीच्या सिंचाईसंबंधीच्या प्रश्नाचा पुन्हा विचार करण्यासाठी श्री.अण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कमिशन नेमले आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. शेतीच्या संदर्भात प्रामुख्याने समोर येणारा प्रश्न आहे, तो जिराईत शेतीचा. जोपर्यंत शेती आणि तीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांना सन्माननीय जीवन जगावे, इतकी शक्ती येत नाही, तोपर्यंत शेतीच्या विकासाचा प्रश्न सुटलेला आहे, असे मानता येणार नाही. किंबहुना जी नवीननवीन माहिती हाती येते, तीवरून असे दिसते, की जिराईत शेतीत काम करणारे मध्यम परिस्थितीतील शेतकरी या धंद्यावर अवलंबून कसा राहत आहे, याचेच मला आश्चर्य वाटते. कर्जाचे प्रचंड ओझे, पडत्या किमतीचे संकट, अधूनमधून पडणाऱ्या भीषण दुष्काळांची विक्राळ भीती यांच्या तावडीत तो सापडला आहे. जेथे शेतीमध्ये पाणी पडले आहे, तेथे उन्हाळ्यातही हिरवळ दिसते. पहिल्या मानाने काही बरे दिवस आलेले आहेत. परंतु पडत्या किमतींनी मात्र नव्या संकटाची भीती निर्माण केलेली आहे. सिंचाईच्या वाढीमुळे महाराष्ट्रामध्ये सरकारी क्षेत्रातील साखर धंदा चांगल्या प्रमाणात वाढला आहे. परंतु आज साखर धंदाही अडचणीत आला आहे. त्याच्यापुढे नवी प्रश्नचिन्हे निर्माण झाले आहे. ही दोन-तीन वर्षे त्यांना कष्टाचीच जातील, अशी साधार भीती वाटते. सहकारी साखरधंदा ही महाराष्ट्राची अभिमानास्पद कमाई आहे, असे मी मानतो. त्याच्याकडे जिव्हाळ्याने पाहायला पाहिजे. त्यात काही दोष निर्माण झाले असतील, ते दूर करण्याकरिता सहानुभूती व विधायक दृष्टीने प्रयत्न

केले पाहिजेत. सहकारी साखर कारखानदारीतील सर्वच सभासद श्रीमंत शेतकरी आहेत, असा सोयिस्कर गैरसमज काही लोकांच्या मनांत झालेला दिसून येतो. त्यांच्यापुढे वस्तुस्थिती ठेवून त्यांचा हा गैरसमज दूर केला पाहिजे. परंतु त्याचबरोबर सहकारी कारखानदारीच्या क्षेत्रात एकाधिकारशाहीची प्रवृत्ती आपले डोके वर काढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यात नवीन नेतृत्व निर्माण झालेले आहे, त्याचा मला अभिमान आहे. पण पहिल्या पिढीतील या नेतृत्वाने आपल्या अनुभवाचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करून या क्षेत्रात दुसरी-तिसरी पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, असे मला मुळीच दिसत नाही. हे कारखाने यशस्वी झाले आहेत, याचे कारण ते आधी योग्य वेळी सुरू झाल्यामुळे अधिक साधने त्यांच्याजवळ आहेत. त्यांच्यामध्ये नवीन ट्रस्ट निर्माण करून सत्ता आपल्या हातांत केंद्रित करण्याची भीतिदायक प्रवृत्ती निर्माण झालेली आहे. हे सहकारी क्षेत्रातील नेत्यांनीच विचार करून दुरूस्त केले पाहिजे. यामध्ये सत्तेने मुद्दाम हात घालावा, असे मी सुचविणार नाही, पण स्वयंप्रेरणेने जर याबाबतीत सहकारी चळवळीचे नेते असा प्रयत्न करणार नसतील, तर सत्तेने या नवीन निर्माण होऊ पाहत असलेल्या शक्ती उघड्या डोळयांनी पाहाव्या, असे मी म्हणणार नाही.

सहकारी चळवळ ही महाराष्ट्रात इतर प्रांतांच्या मानाने दृष्ट लागावी, अशी उभारलेली चळवळ आहे. त्यामुळेच तिच्या कार्याच्या प्रगतीचे वारंवार आत्मपरिक्षणाच्या दृष्टीने मूल्यमापन पुनःपुन्हा त्या चळवळीतील नेत्यांनीच केले पाहिजे. दुर्बलांना सामर्थ्य देण्याकरिता सहकारी चळवळीचा जन्म झालेला आहे. या मूळ प्रेरणेकडे दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. सहकारी चळवळीतील एक कार्यकर्ता व त्या चळवळीचा एक जवळचा मित्र म्हणून माझे हे विचार या लेखात मी स्पष्टपणे मांडले आहेत.

शेती महामंडळाची स्थापना व कमाल जमीन धारणेचे १९६१ व १९७२-७३ चे कायदे शेतीच्या क्षेत्रातील पुरोगामी पावले आहेत. पण माझ्या मते महाराष्ट्र राज्याने मूलसूत्राशी अत्यंत सुसंगत असे उचललेले पाऊल म्हणजे रोजगार हमीची योजना. समाजवादाच्या दिशेने पडणारे महत्त्वाचे हे पाऊल सर्व भारताला मार्गदर्शक आहे. महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असे, की हा कोण्या एका पक्षाचा कार्यक्रम नाही. सर्व पक्षांनी व विधानसभेने एकमताने याची आर्थिक जबाबदारी उचलली आहे. महाराष्ट्र राज्य जनतेचे सार्थक अशा क्रांतिकारी कार्यक्रमांनी होणार आहे.

शासनाच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने १९६१-६२ मध्ये उचललेली पावले अशीच महत्त्वाची आहेत. विकासाची प्रक्रिया तळाच्या माणसापर्यंत पोहोचवायची असेल, तर विकासाची संघटना व सत्ता जनतेच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोचली पाहिजे. ही दृष्टी या विकेंद्रीकरणाच्या पाठीमागे आहे. गेल्या सोळा-सतरा वर्षांच्या जिल्हा परिषदांचा हा कार्यक्रम ही महाराष्ट्र राज्याची एक नवी शक्ती आहे, हा अनुभव आला आहे. यातून सत्ता-संघर्ष निर्माण होतात, हे खरे आहे. लोकशाही व राजसत्तेच्या विकासासाठी उपयोग करावयाचा, हा मार्ग एकदा स्वीकारला, की सत्ता-संघर्षाला टाळता येत नाही. ग्रामीण क्षेत्रात नवे नेतृत्व निर्माण होण्याची आशा या कार्यक्रमाने निर्माण केली आहे. काही ठिकाणचा अनुभव कदाचित आशादायी नसेलही; परंतु विकेंद्रीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल मागे घेता कामा नये. अनुभवांच्या प्रकाशात आत्मटीका जरूर व्हावी. मला एकदा माझे एक मित्र म्हणाले, की या विकेंद्रीकरणाने जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी तुम्ही नवे 'साहेब' उभे केलेत; पण विकासाची प्रेरणा घेतलेल्या कार्यकर्त्यांची साखळी कोठे आहे ? ही टीका कदाचित सार्थ असेलही, पण सत्तेची नवी स्थाने निर्माण केल्यानंतर प्रथमप्रथम हे अनुभव अपरिहार्य आहेत. पण त्यामुळे खचून जाण्याचे कारण नाही. पुन्हा एकदा आत्मनिरीक्षण करून पुढे-पुढेच पावले टाकली पाहिजेत, अशी माझी श्रद्धा आहे.

उद्योगधंद्यांची वाढ, नव्या शेतीचे आगमन व शिक्षणप्रसार यांनी पूर्वीची गावे व शहरे यांच्यामध्ये काही मौलिक फरक होत चालला आहे. त्याची दखल घेऊन शहरे व गावे यांच्यामध्ये एक नवा संवाद सुरू केला पाहिजे. आचार-विचारांची देवाणघेवाण वाढविली पाहिजे. हे झाले, तर एकजिनसी समाजजीवन निर्माण करण्याच्या दिशेने बरीचशी प्रगती होईल.

शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्रात गेल्या अठरा-वीस वर्षांत विद्यापीठे, कॉलेजे यांच्या संख्येत वाढ झाली असल्यामुळे प्रगती झालेली नाही, असे मी म्हणणार नाही. ग्रामीण क्षेत्रापर्यंत, सामान्य माणसापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे प्रयत्न झाले आहेत, ते तसेच वाढते ठेवले पाहिजेत. परंतु प्राथमिक शिक्षणाचा पाया ग्रामीण भागात अजून कच्चा आहे. तो दुरूस्त केल्याशिवाय माध्यमिक आणि उच्च क्षेत्रांत केलेले प्रयत्न वाया जातील, अशी साधार भीती वाटते. विदर्भ, मराठवाडा, कोकण, मुंबई यांच्यामध्ये एक भावनात्मक, सांघिक भावना बऱ्याच प्रमाणात वाढली आहे, परंतु विकासाचा असमतोल या प्रक्रियेच्या

आड येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्याच्या कार्याला सुरूवात झाली, तेव्हा पूर्वीच्या काळातील असमतोल दूर करण्याचे दृष्टीने काही वचने आम्ही दिली होती. माझ्या कल्पनेने ती बरीच पुरी करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्याच्यामधील असमतोल पूर्णतः दूर झाला, असे नाही; पण काही वचनांची पूर्तता झाली, असे मानता येईल.

कोकणच्या प्रश्नासंबंधी अनेकविध प्रयत्नांची गरज आहे. पण माझ्या मताने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, कोकणच्या मनुष्याचे कर्तृत्व कोकणात दिसून येत नाही, हा त्यांचा असलेला समज. कोकणचा मनुष्य बाहेर गेल्याशिवाय त्याचे कर्तृत्व दिसत नाही, असे काही जण म्हणतात. ते कितपत खरे आहे, हे मला माहीत नाही. कर्तृत्ववान माणसे कामासाठी तेथेच थांबली आणि त्यांना लागणारे साहाय्य आणि साधने शासनाकडून मिळत गेली, तर हा प्रश्न सुकर होईल. थळ प्रकल्पाच्या निमित्ताने मिळालेल्या मान्यतेमुळे कोकणच्या विकासाची नवी आशा निर्माण झाली आहे. परंतु या क्षेत्रात कोकणचा माणूस क्रियाशील झाल्याशिवाय याचा खरा फायदा मिळणार नाही. किनाऱ्यावरील बंदरांची वाढ व सुधारणा हा कोकणचा महत्त्वाचा प्रश्न आहे, असे पहिल्यापासून मला वाटत आले आहे व या दृष्टीने मी पश्चिम सागराच्या किनाऱ्याची जवळजवळ एक आठवडा यात्रा १९६१ साली केली आहे. नौदलाची 'त्रिवेणी' ही युद्धनौका संरक्षण खात्याने माझ्यासाठी देऊ केली होती. ॲडमिरल करमरकर यांच्याबरोबर मी किनाऱ्यावरची सर्वच महत्त्वाची ठिकाणे व महत्त्वाची बंदरे यांचे दर्शन घेतले आहे. त्या प्रवासाची आठवण आजही माझे मन भावनाशील बनविते. खरे कोकण मी त्या वेळी पाहिले. कोकण ही महाराष्ट्राच्या समृद्धीची एक महत्त्वाची भूमी आहे, ही जाणीव झाली. परंतु राष्ट्रीय शासनाच्या व साधनांच्या मदतीशिवाय एका राज्याची शक्ती या क्षेत्रातील कामात कमी पडते, हा खरा प्रश्न तेव्हा होता व आजही आहे, असे कितीतरी प्रश्न कितीतरी क्षेत्रांत आहेत, त्यांचा विचार करावा लागेल.

महाराष्ट्र राज्याची स्थापना ही एक सोन्याची घटना आहे, असे मी मानतो. प्रगतीच्या दिशेने पावले पडली आहेत व काही बाबतींत निराशा झाली आहे. परंतु प्रगतीच्या दिशेने चालेलेली ही सफर मध्येच अडून चालणार नाही. १९६० साली नव्या महाराष्ट्राला मी अत्यंत आवडीने 'जगन्नाथाचा रथ' अशी सार्थ उपमा देत असे. सर्वांचे हात लागल्याशिवाय हा रथ हालणारही नाही व चालणारही नाही. महाराष्ट्राचा जन्म होताना जी दृष्टी आणि भावना होती, ती

स्वयंस्फूर्त प्रयत्नांनी पुनरूज्जीवित केली पाहिजे. या दृष्टीने महाराष्ट्र राज्य जन्माच्या वेळी जे म्हटले होते, त्याचा येथे पुनरूच्चार करीत आहे.

'महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे.... त्या सफरीतील आम्ही प्रवासी आहोत, ही सफर तुम्हां-आम्हांला पुरी करावयाची आहे... ती सफर आज मला माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे.... ती लांबची सफर आहे.... पण ती पुरी केलीच पाहिजे... कारण त्यात जनतेचे कल्याण आहे....'



# व्यक्ती

# १५... महात्मा गांधी

महात्मा गांधींच्या जीवनाचा व विचारांचा परिणाम महाराष्ट्रावर किती झाला, असा प्रश्न काही वेळा विचारण्यात येतो. परप्रांतीय मित्रमंडळी अथवा परदेशी अभ्यासक जेव्हा हा प्रश्न विचारतात, तेव्हा त्यांच्या मनांत तुलनात्मक दृष्टी असण्याचा संभव असतो. भारताच्या इतर प्रदेशांवर गांधी-जीवन व गांधी-विचार यांचा परिणाम किती कमी-अधिक प्रमाणात झाला, त्याचा संदर्भ त्यांच्या मनांमध्ये असण्याची शक्यता असते; परंतु अशी तुलना करून पाहणे फारसे इष्टही नाही व शक्यही नाही, असे माझे मत आहे. कारण महात्मा गांधी जेव्हा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर अवतरले, तेव्हा प्रत्येक प्रांताची पार्श्वभूमी वेगवेगळी होती. त्या संदर्भातच त्या त्या प्रांतावर गांधीयुगाचा किती व कसा परिणाम झाला, हे अजमावावे लागेल, ही गोष्ट सोपी नाही. म्हणूनच महाराष्ट्राच्या बाहेरच्या किंवा महाराष्ट्रातील मंडळींनी गांधी व महाराष्ट्र असा प्रश्न उपस्थित केला, की मी त्यासंबंधी, तुलनेचा विचार सोडून देऊन, महाराष्ट्रापुरते मला काय वाटते, काय जाणवते, तेवढेच सांगतो.

लोकमान्य टिळकांच्या निधनाच्या सुमारे पाच वर्षे आधी गांधीजींनी भारतातील आपल्या कार्याची सुरूवात केली. तो काळ असा होती की, टिळक हेच भारताचे सर्वसामान्य लोकमान्य दैवत होते. मंडालेच्या सहा वर्षांच्या कारावासानंतर ते नुकतेच परत आले होते. बदललेल्या परिस्थितीचा शोध घेत होते. जागतिक स्वरूपाचे असे हे पहिलेच युद्ध होते. युद्ध सुरू होऊन दोन-तीन महिने होतात, तोच गांधी आफ्रिकेहून भारतात येऊन पोहोचले. आफ्रिकेत बावीस वर्षे राहून आणि जगातील विचारवंतांचे व मुत्सद्द्यांचे लक्ष खेचून घेईल, अशा अभिनव स्वरूपाचे क्रांतिकारक कार्य करून, गांधी भारतामध्ये कायमचे राहण्यासाठी आले होते. नामदार गोखले यांच्या सूचनेवरून, काहीशा आग्रहावरून, त्यांनी आफ्रिकेतील कार्याची अखेर केली होती व यापुढे भारत हीच आपली कर्मभूमी करावयाची, असा संकल्प त्यांनी केला होता. मात्र, ज्या गोखल्यांच्या सूचनेवरून ते भारतामध्ये आले, त्यांच्या निधनाची वार्ता त्यांना महिन्या-दीड महिन्यात ऐकावी लागली. 'गांधी व महाराष्ट्र' यांच्यांत जो एक

दुवा नियतीने निर्माण केला होता, तो गोखले यांच्या निधनामुळे एकाएकी निखळला.

१९१५ ते १९२० हा भारतीय राजकारणातला फार महत्त्वपूर्ण घडामोडींचा काळ आहे. गांधीजींचा उदय ह्या काळात व्हावा, ही गोष्ट फार अर्थपूर्ण आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्यप्राप्तीचा जो रस्ता दाखविला होता व जो वर्ग जागृत केला होता, त्यापेक्षाही पुढचे पाऊल टाकण्यासाठी गांधीजी सज्ज होत होते. १९१७ मधील चंपारण्याचा लढा हे एक उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. हा लढा देण्यासाठी गांधीजींशिवाय कोणताही नेता त्या काळात पुढे येणे शक्य नव्हते. एका सामान्य शेतकऱ्याच्या निमंत्रणावरून गांधीजी तेथे गेले. खेडुतांमध्ये मिसळले. आफ्रिकेत आपल्याला ज्या तंत्राचा शोध लागला होता, त्या सत्याग्रहाच्या अस्त्राचा वापर करण्याची त्यांनी तयारी केली. इंग्रज अधिकाऱ्यांजवळ व गोऱ्या शेतमालकांजवळ त्यांनी बोलणी केली. आत्मक्लेशाची सारी सारी सिद्धता केली... अन् काहीतरी चमत्कार झाला. इंग्रज कलेक्टरने माघार घेतली व गांधीजींचा विजय झाला. परंतु त्यातूनच गांधीजींच्या विधायक कार्याची सुरूवात झाली. आपल्या आश्रमातील अनेक मंडळी ते तेथे घेऊन गेले. कस्तुरबा गेल्या. इतर स्त्रियाही गावकऱ्यांच्या शिक्षणासाठी, सेवेसाठी गेल्या. प्रगतीसाठी नव्या तऱ्हेच्या चळवळीची मुहूर्तमेढ रचण्यात आली.

गांधीजींच्या कार्याची व व्यक्तिमत्त्वाची एक नवी झलक भारताला त्या वेळी दिसून आली. राजकीय नेता कसा असावा, याची विवक्षित कल्पना त्या वेळी लोकांपुढे होती. लोक असा शब्द जो मी वापरला, त्यात तत्कालीन शिक्षित वर्गाचा समावेश मला प्रामुख्याने करावयाचा आहे. त्या वेळचे राजकारण हे बहुतांशी शिक्षित वर्गाचेच राजकारण होते. या शिक्षित वर्गामधून दोन प्रकारचे नेतृत्व देशभर निर्माण झाले होते. एका नेतृत्वाचा घाट लोकमान्य टिळकांच्या विचारांचा होता. दुसऱ्या नेतृत्वाचा घाट नामदार गोखल्यांच्या विचारांचा होता. योगायोगाने हे दोन्ही सर्वमान्य, देशमान्य नेते मराठीच होते. परंतु या दोन्ही प्रकारांपेक्षा वेगळ्या व तिसऱ्या प्रकारचे नेतृत्व वर येईल, अशी अपेक्षा त्या काळातही कोणी केली असेल, असे वाटत नाही.

म्हणून गांधीजींच्या रूपाने एक चमत्कारच भारतीय राजकारणात घडला, असे म्हणावे लागेल. गांधीजींच्या मृत्यूनंतर आईनस्टिन म्हणाला की, 'गांधींसारखा माणूस या अवनीतलावर होऊन गेला, यावर आगामी पिढ्यांचा

विश्वासही कदाचित बसणार नाही.' आईनस्टिनला जर असे वाटले, तर गांधींचा उदय ज्या पिढीने पाहिला, त्या पिढीला काय वाटले असेल. याचा विचारच केलेला बरा !

युगपुरूष जेव्हा आपल्या युगप्रवर्तक कार्याची सुरूवात करतो, तेव्हा असेच काहीतरी होणे स्वाभाविकच मानले पाहिजे. व्याकरणाचे जुने नियम तो जणू फेकून देतो. जुनी फूटपट्टी तो मोडून टाकतो, स्वतःच्या गायकीला साजतील, असे नवीन स्वर आणि ताल बसवितो आणि नवे सूर आळवू लागतो. गांधीजी प्रथम जेव्हा भारतात कार्य करू लागले, ते नेमके कोणत्या क्षेत्रात उतरणार, याबद्दल जाणकारांनी वेगवेगळे अंदाज केले असणे शक्य आहे. कोणाला वाटले असेल, की गांधीजी सामाजिक कार्याला वाहून घेतील. कोणाला वाटले असेल की, ते राजकीय कार्याला प्राधान्य देतील. 'आधी सामाजिक सुधारणा, की आधी राजकीय चळवळ' असा एक मोठा वाद महाराष्ट्रात त्यापूर्वी रंगून गेला होता व त्याचे खोल परिणाम महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या सार्वजनिक जीवनावर उमटले होते.

परंतु गांधीजींनी जो मार्ग स्वीकारला, तो अगदी वेगळा. सामाजिक, राजकीय, आर्थिक, इतकेच काय, परंतु धार्मिक, शैक्षणिक अशी वेगवेगळी क्षेत्रे त्यांनी अलग मानली नाहीत, त्यांनी असा काही तरी संकलित, मूलभूत व मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारला, की त्यामुळे सर्वजण विस्मयचकित झाले.

टिळक व गांधी यांच्या विचारांमध्ये व कार्यपद्धतींमध्ये एक प्रचंड तफावत लोकांना भासू लागली असल्यास नवल नाही. गोखले यांना गांधीजी आपले राजकीय गुरू मानीत होते. परंतु याबाबतही मला असे वाटते की, जर का गोखले आणखी जगले असते, तर अगदी थोड्या वर्षांतच गुरूशिष्यांच्या विचारधारांमध्ये कमालीचा फरक दिसू लागला असता, असो.

गांधीजींच्या रूपाने जेव्हा एक नवे, नव्या घाटाचे नेतृत्व उभे राहिले, तेव्हा गोखलेवादी किंवा टिळकवादी मंडळी गोंधळून जाणे स्वाभाविक होते. कारण तोपर्यंत राजकारणाचा व्याप हीच मंडळी सांभाळीत होती. गोखलेपंथीयांपेक्षा टिळकपंथीय जनतेच्या अधिक जवळ होते, हे जरी खरे असले, तरी त्यांच्या चळवळीची रीतभात बरीचशी शहरी होती. त्यात शब्दांना, भाषेला व भाषणांना प्राधान्य होते. लोकमान्यांच्या हयातीत त्यांनी जे तेजस्वी स्वरूप राजकारणाला दिले होते, त्याचा साक्षात्कार टिळकपंथीयांच्या कार्यात येत नव्हता.

गांधीजींनी चळवळीच्या तंत्रामध्ये क्रांती केली. त्यांनी प्रत्येकाकडून कृतीची अपेक्षा केली व प्रत्येकाला जमेल व साधेल, अशी कृतीची साधना त्याला सांगितली. त्यामुळे गांधीजींच्या चळवळीत शिक्षित - अशिक्षित हा भेदच नष्ट झाला. किंबहुना शिक्षित व्यक्तीने कोणताही अहंगंड बाळगू नये, यावर गांधीजींनी भर द्यायला सुरूवात केली. पोशाखातला थाट, इंग्रजी भाषेचा वापर, राहणीमानाचा दर्जा, इत्यादी ज्या गोष्टी सुधारणेची लक्षणे बनत होती, त्यांना गांधींनी कटाक्षाने रजा दिली. स्वतः ते इतका साधा पोशाख घालू लागले की, बॅरिस्टर असून, ते एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे पोशाख घालत. या गोष्टीमुळे गांधी व बहुजनसमाज यांच्यांतील अंतर एकदम कमी झाले. पुढे तर ते पंचाच नेसू लागले व त्यामुळे रवींद्रनाथ टागोर यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे, 'भारतातील कोट्यवधी दरिद्री बांधवांच्या हृदयाचे दार त्यांना सताड उघडले गेले.' बहुजन-समाजात व तत्कालीन राजकारणी माणसात जी दुर्लंघ्य दरी होती, ती एकदम बुजवली गेली. १९२२ साली त्यांच्यावर अहमदाबादच्या कोर्टात जो खटला झाला, त्या वेळी त्यांनी आपला व्यवसाय कोणता, हे सांगताना 'मी शेतकरी व विणकरी आहे' असे उत्तर दिले. त्या वेळी सारा भारत या उत्तराने त्यांच्याकडे खेचला गेला. भारतात परतल्यापासून गांधीजी कधीही शहरात एखादे घर घेऊन व ऑफिस थाटून राहिले नाहीत. 'माझा भारत खेड्यात राहतो व मीही खेड्यात राहणार', असे ते म्हणाले.

या साऱ्या गोष्टींचा बहुजन समाजावर फार खोल परिणाम झाला, असे मला निश्चितपणे वाटते. त्यांच्या चळवळीमुळे महाराष्ट्राचा ग्रामीण भाग ढवळून निघाला, यात मुळीच शंका नाही.

गांधींच्या विचारांचा स्वीकार करण्यासंबंधी महाराष्ट्रातील शिक्षित समाजात त्या वेळी गट पडले होते, असे दिसून येते. टिळकांच्या पक्षातील काही मंडळी गांधींकडे खेचली गेली. शिवरामपंत परांजपे, काकासाहेब खाडिलकर, गंगाधरपंत देशपांडे, इत्यादी मंडळींनी असे मानले, की गांधीजींचे नेतृत्व हे टिळकांच्या कार्याची पूर्तता आहे. परंतु सर्वसामान्यपणे असे चित्र दिसते की, १९२० ते १९३० या दशकात महाराष्ट्रात गांधीजींना विरोध करणारी पिढीच शिक्षित समाजात अग्रभागी होती. काकासाहेब गाडगीळ, शंकरराव देव, अप्पासाहेब पटवर्धन, इत्यादी मंडळींना फार प्रतिकूल परिस्थितीत कार्य करावे लागत होते.

१९३० च्या दांडीयात्रेनंतर मात्र हे चित्र बदलू लागल्याचे दिसले.

एक अशी नवी पिढी महाराष्ट्रात वर येत होती, की जिचे मन गांधीजींच्या क्रांतिकारक कल्पनांनी भारावले होते. या पिढीला गांधी-विचारांचे व तत्त्वज्ञानाचे मर्म उलगडून सांगण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या वेळी विनोबा भावे, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, काकासाहेब कालेलकर, दादासाहेब धर्माधिकारी, आदी मंडळी करीत होती व त्यात त्यांना बरेच यश आले, असे म्हणावे लागेल.

१९२९-३० नंतरच्या प्रत्येक सत्याग्रहात महाराष्ट्रात जे चैतन्य संचारत होते, ते कल्पनातीत होते. भारतातील इतर प्रांतांत गांधीजींसंबंधी जेवढे प्रेम, आदर असेल, तेवढाच त्या काळात महाराष्ट्रात निर्माण झाला होता, असे मी निश्चितपणे म्हणू शकतो. ज्या उत्कटतेने सारा देश त्यांच्या कार्यक्रमात व चळवळींमध्ये सामील होत होता, तीच उत्कटता महाराष्ट्रात दिसत होती. विशेषतः, महाराष्ट्रातील बहुजन समाजावर गांधीजींचा जो परिणाम झाला, तो अभूतपूर्वच होता. मी प्रत्यक्ष या गोष्टी पाहिल्या आहेत. 'महात्मा गांधी की जय' या गजराने गावेच्या गावे स्वातंत्र्याच्या भावनेने उद्दीपित होत असत. जात, धर्म, गरिबी-श्रीमंती, इत्यादी भेद लुप्त होऊन जात असत. गांधी हा एक सर्वश्रेष्ठ संतपुरूष आहे, अशी भावना सर्वांमध्ये निर्माण होत असे. गांधीजी ज्या प्रकारच्या त्यागाची अपेक्षा करतील, तो त्याग करण्यास हजारो माणसे पुढे येत असत.

आता हे खरे आहे, की माझ्या पिढीतील अनेक तरूणांना गांधीजींचे टकळीचे तंत्र किंवा रामनामावरचा त्यांचा जोर पटत नव्हता. परंतु हा मतभेद किरकोळ होता. परदेशी सत्तेशी झगडण्याचा जो मूलभूत दृष्टिकोन गांधीजींनी देशापुढे ठेवला होता, तो आकर्षित करीत होता. परकीय सत्तेशी सामना देता-देता एका नव्या धर्तीचा माणूस व समाज भारतामध्ये निर्माण व्हावा, ही गांधीजींची दृष्टी होती. शतकानुशतकामध्ये भारतात जसे मूलगामी कार्य झाले नव्हते, तसे ते कार्य होते. भारताच्या जागृतीचा एक नवा रस्ता प्रकाशमान केला जात होता.

सामाजिक समतेचा जो विचार गांधीजींनी मांडला, त्या वेळी तर बहुजन समाज त्यांच्याकडे फार वेगाने आकर्षित करीत होता. माझ्या समजुतीने बुद्धानंतर एवढा क्रांतिकारक समतावादी विचार मांडणारा व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणारा गांधींशिवाय कोणीच झाला नाही. समाजक्रांतीचा नुसता विचार मांडणारे अनेक जण होऊन गेले, परंतु सामाजिक समतेसाठी एवढा जबरदस्त

सामूहिक प्रयत्न करणारे आधुनिक काळात फक्त गांधीजीच होऊन गेले, हे मान्य करावे लागेल.

वृद्धत्व आल्यावरही तरूण पिढीला आकर्षित करण्याची अपूर्व शक्ती गांधींमध्ये होती. त्यामुळेच १९३० नंतर देशातील व महाराष्ट्रातील उगवती नवी पिढी जेव्हा समाजवादाकडे वळू लागली, तेव्हा तिच्या विचारांना मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे कार्य गांधीजींनी केले, असे म्हटले, तर ते अवास्तव ठरणार नाही. त्यामुळेच, टिळक व गोखले यांचे अनुयायित्व सांगणारी पिढी सोडली, तर त्यानंतर गांधीजींच्या जीवनकार्याने प्रभावित झालेली पिढीच-शहरातील व ग्रामीण भागातली महाराष्ट्रातही वर आलेली दिसत आहे.

गांधीजींचा व महाराष्ट्राचा संबंध केवळ संस्कारांच्या पातळीवर राहिलेला नाही, तर प्रत्यक्ष सहवासाच्या रूपानेही त्यांनी हजारो कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आहे, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. गांधीजींचे वास्तव्य जेवढे महाराष्ट्रात झाले, तेवढे इतरत्र कोणत्याच प्रांताच्या वाट्याला आलेले नाही. गांधी-जीवनदृष्टीचा व गांधी-विचारांचा स्वीकार करीत असताना मराठी मनाला, महाराष्ट्राच्या संतपुरूषांच्या परंपरेचे साहाय्य झाले असावे, असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. 'रक्त व तलवार' या शब्दांपेक्षा 'सत्य व अहिंसा' या शस्त्रांचा स्वीकार भारतीय जीवनात व्हावा, ही गांधीजींची तळमळ होती. त्यात त्यांना यश किती आले, हा प्रश्न वेगळा; परंतु त्यांची धडपड अपूर्व होती व सर्वसामान्य माणूस त्या धडपडीमध्ये रंगून जाऊ शकत होता; हे विसरता येणार नाही. दांडीयात्रेनंतर पराकाष्ठेचे आत्मक्लेश सहन करण्याचे जे अभूतपूर्व वातावरण देशभर तयार झाले, त्यात मराठी माणूस कोठेही मागे पडला नाही.

गांधी व महाराष्ट्र यांच्या संबंधांचा विचार करताना एक शेवटचा मुद्दा मनात येऊन जातो, तो असा, की आज गांधी-विचारांचा परिणाम कितपत उरला आहे? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक माणूस आपापल्या अनुभवातूनच देऊ शकेल. मी मात्र असे निश्चितपणे म्हणेन की, महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर, अनेक सामाजिक संस्थांवर, शेकडो, हजारो लहानमोठ्या कार्यकर्त्यांवर गांधी-विचारांचा व गांधी-जीवनाचा ठसा आजही जाणवतो. अर्थात, जुन्या पिढीचे प्रतिनिधी हयात आहेत, म्हणून असे जाणवत असावे. परंतु त्यानंतर काय होईल, हे सांगणे कठीण आहे.

मात्र एक आशा व्यक्त करणे अस्थानी ठरणार नाही. गांधी-जीवन

व गांधी-विचार यांमध्ये जो क्रांतिकारक आशय आहे, तो समजून घ्यावा, अशी एक प्रेरणा जगात पुन्हा निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. हिंसा व सांप्रदायिक राजकीय आचार यांआधारे मानवाचे प्रश्न सुटत नाहीत, ही जाणीव दृढमूल होऊ लागली आहे. गांधीजींच्या विचारांची उजळणी घडू लागली आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. गांधीजींनी जे विचार दिले आहेत, ते युगायुगांत पुरणारे विचार आहेत. एका देशासाठी, एका पिढीसाठी किंवा एका विशिष्ट समाजासाठी गांधीजी जगले नाहीत. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांपैकी प्रत्येक गोष्ट आंधळेपणाने आपण स्वीकारावी, अशी त्यांचीही अपेक्षा नव्हती. राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीशी संबंधित नसणाऱ्या अशा कितीतरी मूलभूत विषयांवर गांधीजींनी मौलिक विचार प्रदर्शित केले आहेत. त्या विचारांचा अभ्यास बदललेल्या काळात व नव्या दृष्टिकोनातून, त्या पिढीत चालू व्हावा आणि स्वतःला पटणारे विचार प्रत्यक्ष कृतीत आणणारे धाडसी प्रयोगवीर निर्माण व्हावेत, एवढीच अपेक्षा आहे. गांधीजींच्या जीवनकार्याचे यथार्थ मूल्यमापन करण्याची शक्ती आपल्याला आहे, असे समजणे धाडसाचे होईल, परंतु काळ जसजसा उलटत जाईल, तसतसा गांधी-विचारांचा आशय अधिक स्पष्ट होऊन मानवजातीचा एक अलौकिक ठेवा म्हणून त्यांची महती वाढत जाईल, अशी माझी अपेक्षा आहे.

# १६... राजर्षि शाहू छत्रपती

महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात राजर्षि श्री शाहू महाराजांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. इतर अनेक राज्यांत बहुसंख्य समाज हा दीर्घकाळ शिक्षण, राजकीय सत्ता, सामाजिक स्थान व प्रतिष्ठा यांपासून वंचित राहिला. महाराष्ट्रात हे झाले नाही. त्याबाबतची जागृती महात्मा फुले यांनी केली. त्यानंतर या समाजाचे परिवर्तन घडवून आणण्याच्या कामात महत्त्वाची कामगिरी बजावणारे म्हणजे कर्मवीर शिंदे, राजर्षि शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील. यांपैकी शाहू महाराज हे छत्रपती होते आणि आपल्या राजसत्तेचा उपयोग त्यांनी वंचित अशा समाजात जागृती निर्माण करण्यासाठी केला. यामुळे सामान्य लोकांतही जागृती झाली व म्हणून महाराष्ट्रात सरंजामशाहीचे दोष फारसे दिसत नाहीत. सामाजिक परिवर्तनाच्या या कार्यामुळेच मराठी समाज हा त्यांतल्या त्यांत देशातला आधुनिक समाज बनला आहे.

राजर्षि शाहू महाराज हे ब्रिटिशांच्या राजवटीतील संस्थानिक होते आणि याच्या मर्यादा त्यांच्या काही धोरणांना पडणे स्वाभाविक होते. पण देश-काल-परिस्थितीच्या मर्यादा सर्वांनाच पडतात. त्यांपलीकडे जाऊन ज्यांचे कार्य दूरगामी परिणाम घडवून आणते, त्यांचे नाव इतिहासात अजरामर होते. शाहू महाराजांचे नाव या कारणास्तव अजरामर झाले. तसे पाहिले, तर संस्थानिक अनेक होते, पण शाहू महाराज हे केवळ संस्थानधिपती म्हणून मोठे ठरत नाहीत. त्यांच्या राजसत्तेला सामान्य जनतेच्या कळवळ्याचे लेणे चढले होते. कोल्हापूर संस्थानात त्यांनी विद्या, कला, व्यापार, उद्योग, इत्यादी क्षेत्रांत जे नवे चैतन्य निर्माण केले, ते स्वतःचा बडेजाव वाढविण्यासाठी नव्हे, तर या अनेकविध क्षेत्रांतील गुणिजनांना प्रोत्साहन देऊन, आपल्या राज्यात विद्या, कला, व्यापार, क्रीडा यांची भरभराट व्हावी आणि त्यायोगे आपल्या प्रजाजनांचे भले व्हावे, ही प्रेरणा त्यामागे होती, त्यामुळे गुणिजनांना, अनाथ व एकाकी लोकांना फार मोठा आधार होता.

राजर्षि शाहू महाराजांनी घडविलेल्या सामाजिक परिवर्तनाचे रहस्य आणि

वैशिष्ट्य हे, की त्यांनी जे विविध उपक्रम केले, ते चिरस्थायी ठरतील, अशी त्यांची बांधणी केली. कित्येक वेळा मोठी माणसे काही उपक्रम सुरू करतात आणि त्यांच्यानंतर त्यांचे कार्य नष्ट होते. आपल्याकडे कोणत्याही कार्याला संस्थारूप देण्यात आपण अयशस्वी ठरतो. यामुळे ज्या व्यक्तीने एखादे कार्य उभारले, ती बाजूला झाली की, या कार्याचा मागमूस राहत नाही. ज्या समाजाचे संस्थात्मक जीवन भरभक्कम असते, तोच समाज पराक्रम गाजवू शकतो. शाहू महाराजांनी हे ओळखले होते. याबाबतीत त्यांची दृष्टी शास्त्रशुद्ध आणि आधुनिक होती.

एखाद्या व्यक्तीच्या गरजेतून एखादा उपक्रम शाहू महाराजांनी सुरू केला असेल, पण त्यालाही चिरस्थायी संस्थारूप देण्याची दक्षता त्यांनी घेतली. या संदर्भात मराठा वा इतर बोर्डिंगांची कल्पना उल्लेखनीय ठरेल. श्री. पी.सी. पाटील यांनी आपल्या आत्मचरित्रात मराठा बोर्डिंगची कल्पना कशी साकार झाली, याची हकीकत निवेदन केली आहे. पी.सी. पाटील हे कोल्हापूर संस्थानामधील मराठा समाजातील पहिले व वरच्या क्रमांकाने मॅट्रिकमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी. महाराजांना हे कळताच त्यांनी पी.सी. पाटलांना बोलावणे धाडले आणि खानावळ कोठे होती, याची चौकशी केली. आपण व आपला मित्र असे एका ब्राह्मणाच्या खानावळीत जेवत होतो. पण आम्ही दोघे मराठा म्हणजे वेगळी पंगत असे आणि ताट-वाटी नंतर धुवावी लागे, म्हणू खोलीवरच जेवण करीत होतो, असे पी.सीं.नी सांगितले. लगेच महाराजांनी मराठाच नव्हे, तर निरनिराळ्या समाजांतील विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंगांची व्यवस्था केली, व्यक्तीच्या गरजेतून संस्थेचा जन्म झाला आणि कोल्हापूर संस्थानच्या या विद्यार्थी बोर्डिंगांनी फार मोठी कामगिरी बजाविली. बोर्डिंगाचा लाभ घेतलेले असंख्य विद्यार्थी आहेत.

शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि त्याचा लाभ सर्व जातींच्या लोकांना मिळावा, हा महाराजांचा कटाक्ष होता. म्हणून त्यांनी अनेक सोयी व सवलती उपलब्ध करून दिल्या. परंतु केवळ शाळा, महाविद्यालये, बोर्डिंग, शिष्यवृत्त्या एवढेच करून शाहू महाराज थांबले नाहीत. त्यांनी आपल्या महाविद्यालयात उत्तमोत्तम शिक्षकवर्ग प्रयत्नपूर्वक आणला. डॉ. बाळकृष्ण यांच्यासारख्या तज्ज्ञांची त्यांनी नेमणूक केली, हेही त्यांच्या गुणग्राहकतेचे उदाहरण म्हणून सांगता येईल. या बाबतीत त्यांनी कधी जातीपातीचा विचार केला नाही. त्यांनी कै. रानडे व कै. गोपाळ कृष्ण गोखले यांचा आदर्श ठेवला होता. १९१८ च्या नोव्हेंबरमध्ये

मुंबईत ब्राह्मणेतर समाजापुढे भाषण करताना महाराज म्हणाले,

'ज्यांच्या मृत्यूमुळे जनतेला अतिशय तळमळ लागून राहिली, असे माझे मित्र न्यायमूर्ती रानडे व गोपाळराव गोखले यांनी मागासलेल्या लोकांची सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले होते. मागासलेल्या लोकांमध्ये शिक्षणप्रसार करण्यासाठी महत्प्रयास केले पाहिजेत, ही गोष्ट प्रथम मी त्यांच्यापासून शिकलो.'

तथापि, ब्राह्मण समाजाची विद्या ही फक्त मराठा समाजात आली, की आपले कार्य झाले, असे शाहू महाराजांना वाटत नव्हते. त्यांनी अस्पृश्य म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजाला विद्येचा लाभ मिळावा, त्याची सामाजिक प्रतिष्ठा वाढावी आणि अस्पृश्यतेचा कलंक घालवावा, यासाठी जे विविध प्रयत्न केले, ते विशेषच मोलाचे होते. महाराजांनी महारवतने नष्ट केली; रामोशी वगैरे जातींच्या लोकांना रोज पाटलाकडे वर्दी द्यावयास लागे, ती पद्धत रद्द केली. आपला चाबुकस्वार, मोटारचा ड्रायव्हर, माहूत हे महार असतील, अशी व्यवस्था त्यांनी केली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अस्पृश्यांच्या एका सभेत भाषण करताना शाहू महाराजांनी अस्पृश्यता-निवारणाचे महत्त्व प्रतिपादन केले होते. ते म्हणाले,

'कित्येक म्हणतात, की राजकारणाचा व स्पृश्यास्पृश्यतेचा काय संबंध आहे ? काही संबंध असल्यास, तसेही करू. पण मी म्हणतो, अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार ? ज्यांना राजकारण करणे आहे, त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशांत वागवितात, त्याप्रमाणे वागविले पाहिजे आणि तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार?....

परंतु सामाजिकदृष्ट्याच दलित नव्हे, तर आर्थिक दृष्ट्याही दलितांबद्दल शाहू महाराजांना कळवळा होता आणि अशांना मदत करण्याचे प्रयत्न ते करीत. कामगार व शेतकरी यांनी संघटित व्हावे, असे ते वारंवार सांगत. गवताच्या काडीला महत्त्व नाही, पण पेंडीला आहे, म्हणून संघटित व्हा, तिकडे इंग्लंडात मजूर संघटित झाले व त्यांचे प्रतिनिधी पार्लमेंटात बसू लागले. मजुरांची स्थिती सुधारू लागली, हे लक्षात घेऊन संघटनेचे महत्त्व ओळखा, असा त्यांचा उपदेश असे.

दिखाऊ कार्यापेक्षा चिरस्थायी व बहुसंख्य समाजाला फायदा करून देणाऱ्या कार्याला महाराज महत्त्व देत, हे जसे शिक्षणाच्या क्षेत्रात दिसून आले, त्याचप्रमाणे इतरही क्षेत्रांत आले. या शतकाच्या अगदी प्रारंभी ते युरोपच्या दौऱ्यावर गेले असता त्यांनी काही धरणे पाहिली. यातून त्यांना राधानगरी धरणाची कल्पना सुचली. राधानगरी ही महाराजांची कोल्हापूरला मिळालेली अमोल देणगी आहे. त्यांनी पुण्याला शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याच्या कामी इतर मराठा संस्थानिक, सरदार व प्रमुख व्यक्तींच्या बरोबरीने पुढाकार घेतला. पण पुतळ्याच्या बरोबरच शिवाजी मराठा प्रिपरेटरी स्कूल स्थापन करून या स्मारकाला उपयुक्त व कायमचे स्वरूप दिले.

कोल्हापुरात सहकारी चळवळीचा आणि शेतकऱ्यांच्या संघटनेचा उपक्रम फार पूर्वी सुरू झाला आणि त्याची प्रेरणा शाहू महाराजांची होती. या सहकारी चळवळीने शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले. शेतकरी संघ स्थापन करण्यास प्रेरणा देऊन, दलालांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यास महाराजांनी हातभार लावला. कोल्हापूर संस्थानातील सामान्य जनतेला महाराजांनी आधार देऊन, तिचा पुरूषार्थ जागा केला व त्यामुळे कोल्हापूरचे जीवन अधिक रगेल झाले.

या रगेल जीवनाला क्रीडा, नाट्य, संगीत, इत्यादी कलांची जोड मिळाली. शाहू महाराजांनी मल्लविद्येला प्रोत्साहन देऊन अनेक मल्लांना राजाश्रय दिला. किंबहुना कोणत्याही क्षेत्रातील ते गुणी लोक असतील, त्यांना कोल्हापुरात आणण्याची महाराजांना फार हौस होती. यामुळे अल्लादियाखांसारखा गानमहर्षी, बाबूराव पेंटरांप्रमाणे चित्रमहर्षी कोल्हापुरात आपल्या कलानंदात मग्न असत. रियासतकार सरदेसाईंविषयी महाराजांना प्रेम होते व महाराज हे कलेचे एवढे भोक्ते, की आपल्या जवाहरखान्यातील दागिनेही ते नाटक मंडळीला वापरावयास देत. गोविंदराव टेंब्यांनी कंपनी काढली, तिला महाराजांचा मोठा आधार मिळाला. गोविंदरावांच्या पेटीवादनाचे महाराजांना फार कौतुक होते अणि 'शिवसंभव' नाटकाच्या वेळी महाराजांनी आपल्या जवाहरखान्यातील खास शाही दागिने वापरण्यासाठी दिले होते.

'शिवसंभव' नाटकातील शिवजन्माचा प्रसंग येताच शाहू महाराज भर नाट्यगृहात आपल्या आसनावरून उठून उभे राहिले आणि त्यांनी नाटकातील शिवाजी महाराजांना लवून मुजरा केला. असा मोठ्या दिलाचा हा राजा होता.

महाराष्ट्राच्या समाजकारणात लोकमान्य टिळक व छत्रपती शाहू महाराज

यांचे ग्रह जमले नाहीत, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होती. पण कोल्हापूरची गादी ही शिवाजी महाराजांची गादी, यास्तव लोकमान्यांना गादीचा अभिमान व गादीवरील वारसाबद्दल आदर होता. उलट, लोकमान्य टिळकांशी वेदोक्त वगैरे प्रकरणांवरून कितीही मतभेद असले, तरी इंग्रजांशी निधडेपणाने लढणाऱ्या लोकमान्यांबद्दल शाहू महाराजांना आदर होता. महाराज भोजनासाठी पानावर बसले असता लोकमान्यांच्या निधनाची वार्ता समजली, तेव्हा त्यांनी आपल्यापुढील ताट बाजूला केले, 'असा लढवय्या पुरूष होणार नाही' असे म्हणाले व पाटावरून उठले.

कसब, गुण, कर्तृत्व यांविषयी शाहू महाराजांना अतिशय आस्था होती आणि समाजातल्या रंजल्यागांजल्यांबद्दल कणव होती. त्यांचे शरीर जसे अवाढव्य होते, तसेच त्यांचे मनही होते. यामुळे समाजातील गुणी, कर्तृत्ववान यांना महाराजांचा आधार होता. त्याचप्रमाणे लहानशा खेड्यातील लहानशा माणसालाही आधार होता. सत्ताधारी हा असा असावा लागतो. गांजलेल्यांना, पीडितांना तो अपील कोर्टासारखा वाटावा आणि कर्तृत्ववानांना त्यांचा आधार वाटावा. शाहू महाराज तसे होते आणि म्हणून ते एक केंद्रबिंदू बनले होते आणि लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात, त्यांप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत. राजर्षि शाहू महाराज हे केवळ वारसा-हक्काने राजे नव्हते, तर ते लोकांचे राजे होते.

## १७... पंडित जवाहरलाल नेहरू

पं.नेहरूंना मी १९३१ मध्ये प्रथम पाहिले कराडला. मी शाळेत शिकत होतो आणि विद्यार्थ्यांच्या चळवळीत थोडा-बहुत भागही घेत होतो. एके दिवशी आम्हांला कुणकुण लागली ! पं. नेहरू बंगलोर मेलने जाणार आहेत. बंगलोर मेल कराड स्टेशनवर मध्यरात्रीनंतर येते. अशा आडवेळी पं. नेहरूंना उठवावे, की उठवू नये, अशा द्विधा मनःस्थितीत स्थानिक नेते होते. पण या चर्चेत मला काहीच रस नव्हता. माझ्या मनाचा निश्चय केव्हाच झाला होता. पं. नेहरूंच्या दर्शनाची ओढ मला व माझ्या सहकारी मित्रांना लागली होती. आम्ही पं. नेहरूंना उठवून विद्यार्थ्यांसमोर उभे करावयाचे ठरविले होते.

ठरल्याप्रमाणे त्या मध्यरात्री आम्ही पाचशे विद्यार्थ्यांचा तांडा घेऊन कराड स्टेशनच्या फलाटावर जमलो. गाडी यावयाची वेळ जसजशी जवळ येत होती, तसतसे आमचे औत्सुक्य शिगेला पोचत होते. अखेर शेवटी तो क्षण जवळ येऊन ठेपला. बंगलोर मेल कराड स्टेशनवर उभी राहिली. पंडितजींचा डबा आम्ही शोधून काढला व डब्याच्या भोवती आम्ही उभे राहिलो. धडधडत्या अंतःकरणाने डब्याचे दार आम्ही वाजविले. क्षणार्धातच पंडितजी जागे झाले. दार उघडून बाहेर आले. काहीशा रागीट मुद्रेनेच त्यांनी आमच्याकडे पाहिले. पण हा राग लगेच मावळला. गाडी सुटण्याची वेळ होईपर्यंत या पाच मिनिटांत पंडितजी आम्हां बाळगोपाळांच्या मेळाव्यात होते. पं.नेहरू त्या गाडीने हुबळीला निघाले होते. त्यांच्याबरोबर, मला आठवते, त्याप्रमाणे हिंदुस्थानी सेवा दलाचे डॉ. हर्डीकर आणि श्रीमती कमलादेवी चटोपाध्याय ही मंडळी होती.

पं. जवाहलाल नेहरू यांचे हे पहिले दर्शन झाल्यावर प्रत्यक्षतः त्यांना पाहण्याचा योग पुढे कित्येक वर्षांपर्यंत आला नसला, तरी विचाराने त्या काळातील आम्ही तरूण मंडळी त्यांच्या आसपासच वावरत होतो. त्यांच्या व्याख्यानांचे वृत्तान्त आवडीने वाचत होतो. त्यांच्यासंबंधीचे लेख, आठवणी मिळवीत होतो. वाचत होतो.

- आणि अशा त्यांच्यासंबंधीच्या औत्सुक्याने भरलेल्या काळात आणि

संस्कारक्षम वयात त्यांची आत्मकथा माझ्या वाचनात आली. १९३४-३५ साल असेल ते. कॉलेजमध्ये असताना मी त्या ग्रंथाचे वाचन केले. आज तीस वर्षांनतर सुद्धा तो ग्रंथ, त्याचे त्या काळी केलेले वाचन या सर्व गोष्टी अजून ताज्या वाटतात. मला वाटते, आत्मकथेच्या वाचनानंतर आपला नेता हाच, ही भावना अधिक दृढ झाली. राष्ट्रीय चळवळीतील एक आकर्षक नेता म्हणून आम्ही त्यांच्या जवळ गेलो होतो, पण वैचारिकदृष्ट्या त्यांचे नेतृत्व मी आत्मकथेच्या वाचनानंतर स्वीकारले. विचाराने त्यांच्याजवळ जो गेलो, तो शेवटपर्यंत कधी दुरावा निर्माण झाला नाही. त्यांच्यासंबंधीचे वाचन, मनन पुढे चालूच राहिले. मेळावे, अधिवेशने, जाहीर सभा यांतून लाखो श्रोत्यांतील एक म्हणून त्यांना पाहतही होतो. पण त्यांची प्रत्यक्ष भेट मात्र १९५२ पर्यंत कधी झाली नाही.

पं. नेहरूंचा प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग मी मुंबई सरकारचा पुरवठा मंत्री असताना आला. रफी अहमद किडवाई केन्द्रीय पुरवठा मंत्री होते व निर्नियंत्रणासंबंधीचे धोरण ते आखत होते. त्यासंबंधीच्याच काही चर्चेसाठी मी दिल्लीला गेलो होतो. मुंबईत तेव्हा रेशनिंग चालू होते व आम्ही ते काटेकोरपणे चालवीत होतो. निर्नियंत्रणानंतर मुंबई शहराच्या धान्य-पुरवठ्यासंबंधी काही प्रश्न निर्माण होणार होते. किडवाई साहेबांशी प्रदीर्घ चर्चा केल्यानंतरही त्यातून जेव्हा काही निष्पन्न झाले नाही, तेव्हा त्यांच्याच सल्ल्यानुसार मी पंडितजींना भेटलो. जवळजवळ तास, दीडतास मी त्यांच्याशी चर्चा केली आणि मुंबई शहराला रेशनिंगच्या काळात मिळत असलेले धान्य पुढेही मिळत राहिले पाहिजे, हा माझा मुद्दा मी पंडितजींना पटवून देऊ शकलो, याचा जसा मला आनंद झाला, त्यापेक्षा त्यांच्याशी आपला परिचय झाला, याचा आनंद, नाही म्हटले, तरी माझ्या मनात भरून राहिला होता. त्या आनंदाने भरलेल्या मनानेच तेव्हा मी दिल्लीहून परतलो होतो.

१९५२ साली माझा पंडितजींशी प्रत्यक्ष परिचय झाला. पण १९५६ पर्यंत त्या परिचयाचे स्वरूप केवळ औपचारिक होते. १९५६ साली संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित झाला आणि हा परिचय अधिक वाढत गेला आणि त्यांची परिणती शेवटी १९६२ साली त्यांनी मला आपला एक विश्वासू सहकारी व तरूण मित्र मानण्यात झाली.

या सर्व कालखंडातील पं. नेहरूंच्या अनेक आठवणींची गर्दी आज माझ्या मनात उसळली आहे. धाकट्या भावावर प्रेम करावे, तसे त्यांनी माझ्यावर

प्रेम केले. माझ्यावर अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी विश्वास टाकला. ते प्रेमाचे व विश्वासाचे अनंत क्षण माझ्या स्मृतिपटलावर तेजस्वी ताऱ्यांसारखे लखलखत आहेत. १९५६ साली द्वैभाषिक राज्याची जबाबदारी मी स्वीकारली, तेव्हाचा एक प्रसंग सांगण्यासारखा आहे.

मंत्रिमंडळ बनविण्यासंबंधीची चर्चा करण्यासाठी मी दिल्लीला गेलो होतो. चर्चा संपवून, पंडितजींचा निरोप घेण्याची वेळ आली, तेव्हा मी त्यांना म्हटले,

'फार कठीण कामाची जबाबदारी मी स्वीकारली आहे. आपले आशीर्वाद मला हवेत.'

जवाहरलालजी एकदम गंभीर झाले. बरोबर चालता-चालता म्हणाले,

'माझे आशीर्वाद इतके स्वस्त नाहीत. काम कठीण तर आहेच, पण तुम्ही ते कसे करता; पाहू या.'

मी तर परिस्थितीचे आव्हान स्वीकारूनच माझे काम पार पाडत होतो. त्याचे वृत्त त्यांच्यापर्यंत पोहोचतच होते. या काळात त्यांच्या बऱ्याच भेटीगाठी होत, पण १९५७ मधील एका भेटीत जवाहरलालजींनी त्या प्रसंगाचा एकदम उल्लेख केला आणि आठवणीने मला आशीर्वाद दिले. आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. माझ्या अल्पशा कार्याला मिळालेली ती फार मोठी पावती होती. माझ्या मनाच्या संदुकीत मी ती अगदी जपून ठेवली आहे.

द्वैभाषिक राज्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची जी बोलणी झाली, ज्या वाटाघाटी झाल्या, त्यांना तर ऐतिहासिक महत्त्व आहे. मीच स्वतः जेव्हा केव्हा विस्ताराने लिहीन, तेव्हा तो इतिहास स्पष्ट होईल. पण या काळात पंडितजींच्या स्नेहपूर्ण वागणुकीचे, त्यांच्या थोर मानवी मनाचे जे दर्शन मला घडत गेले, ते केवळ अविस्मरणीय आहे आणि त्याहीपेक्षा त्यांच्यांतील पुरोगामी विचारवंताचा प्रत्यय येत होता, तोही. १९३४-३५ साली ज्या विचारप्रणालीमुळे मी पंडितजींना आपला नेता मानला, त्या विचारप्रणालीवरील त्यांची श्रद्धाही या काळात अनेक वेळा दिसून येत असे त्या वेळी मला मनातून खरोखर आनंद वाटत असे.

असाच एक प्रसंग सांगण्यासारखा आहे.

समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र स्थापन करण्याची प्रतिज्ञा करून आम्ही संयुक्त महाराष्ट्राचा कारभार हाती घेतला आणि त्या प्रतिज्ञेला अनुसरून काही कायदेही करावयाचे ठरविले. लॅण्ड सीलिंगचा कायदा हा

एक असा कायदा होता. या कायद्याच्या अंमलबजावणीत खरी अडचण होती साखर कारखान्यांकडील जमिनीच्या बाबतीतील. या जमिनींना सिलिंग ॲक्ट लागू करू नये, असे नियोजन मंडळाचे मत होते. नंदाजी तेव्हा नियोजन मंत्री होते. त्यांचे स्वतःचेही तसेच मत होते आणि प्रश्नाची तड काही केल्या लागत नव्हती. माझे सहकारी श्री. वंसतराव नाईक अनेक वेळा चर्चा करून आले होते. मीही पण संधी मिळेल, तेव्हा बोलत होतो; पण उसाचे मोठाले फार्म्स मोडू नयेत, हा पोथीनिष्ठ आग्रह सोडायला नियोजन मंडळ तयार नव्हते; आणि साखर कारखान्यांच्या जमिनी सीलिंग कायद्याखाली येणार नसतील, तर केवळ गरीब शेतकऱ्यांच्या जमिनींवर हा कायदा लावण्यात काहीच अर्थ नाही, अशी आमची ठाम भूमिका होती.

नियोजन मंडळाशी अखेरची चर्चा करण्यासाठी मी दिल्लीला गेलो होतो. दोन तास चर्चा केल्यानंतरही आम्हांला जेव्हा नकार मिळाला, तेव्हा मी पंडितजींची भेट घेतली. त्यांना आमचा दृष्टिकोन समजावून सांगितला.

माझे म्हणणे ऐकून घेऊन पंडितजी म्हणाले,

'तुम्ही परत गेल्यावर मला एक पत्र पाठवा.'

ठरल्याप्रमाणे मी लगेच पत्र पाठविले आणि चवथ्या दिवशी पंडितजींचे दोन वाक्येच लिहिलेले उत्तर मला मिळाले.

'मी तुमच्याशी सहमत आहे.'

हे त्यांनी मला कळविले होते व 'नियोजन मंडळाशी बोलणी करण्यासाठी या', असे निमंत्रणही त्यांनी दिले होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही दिल्लीला गेलो. पं. नेहरूंनी आपले मत नियोजन मंडळाला कळविलेले होतेच. फक्त दीड मिनिटातच आमची चर्चा संपली. नियोजन मंडळाने महाराष्ट्र सरकारची योजना स्वीकारली होती. दीड वर्षपर्यंत ज्या विषयाच्या चर्चेचा घोळ चालू होता, तो विषय अवघ्या दीड मिनिटातच निकाली निघाला. कमाल जमीन धारणाविषयक विधेयकास पं. नेहरूंचा पाठिंबा नसता, तर यश येऊ शकले नसते व महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर असे पुरोगामी पाऊल आम्ही टाकू शकलो नसतो. ध्येयवादी नेतृत्व असले, म्हणजे प्रगतीच्या मार्गावरील वाटचाल कशी शक्य होते, याचे प्रत्यंतर या घटनेतून आम्हांला मिळाले.

१९६२ साली पं. नेहरूंनी मला केंद्रीय मंत्रिमंडळात बोलावून घेतले,

तेव्हाची एक छोटी आठवण माझ्या मनात अगदी ताजी आहे. १९६२ सालातील नोव्हेंबरच्या २-३ तारखेला मी दिल्लीला गेलो होतो. राष्ट्रीय विकास मंडळाची ती महत्त्वाची सभा होती. या मुक्कामातच दिल्लीला निर्माण झालेल्या मेननविरोधी वातावरणाची मला कल्पना आली होती. त्या वातावरणाचे पडसाद कानांवर पडत होते, त्यांचे गांभीर्य जाणवत होते व त्या वेळी दिल्लीहून परतत असताना या परिस्थितीत आपल्याला काही जबाबदारी उचलावी लागेल, याची पुसट कल्पनासुद्धा मला नव्हती.

दि. ६ नोव्हेंबरची ती दुपार होती. सचिवालयातील माझ्या खोलीत माझी नित्याची कामे पाहत मी बसलो होतो. तेवढ्यात माझ्या चिटणीसांनी मला घाईघाईने येऊन सांगितले की,

'पंतप्रधानांना तुमच्याशी बोलायचे आहे. लवकरच यांचा फोन येईल.'

- आणि पाठोपाठ फोनची घंटा वाजलीच.

मी फोन उचलून कानाशी लावला, तोच पंडितजींचे शब्द माझ्या कानी पडले,

'मी जवाहरलाल बोलतो आहे. जवळपास कोणी बसलेले नाही ना?'

'कोणी नाही.' असा माझा निर्वाळा मिळताच पंडितजी म्हणाले,

'एक महत्त्वाची गोष्ट तुम्हांला विचारायची आहे. तिची वाच्यता किंवा चर्चा मुळीच होऊ देऊ नका. मला फक्त 'हो' किंवा 'नाही' एवढेच उत्तर हवे आहे.'

पंडित नेहरूंना हवी होती, तशी हमी मी अर्थातच दिली, तेव्हा पंडितजी म्हणाले,

'संरक्षण खात्याची जबाबदारी मी तुमच्यावर सोपवू इच्छितो. तुम्ही दिल्लीला आले पाहिजे, असे मला वाटते. येणारा ना तुम्ही? आणि फारशी चर्चा न करता 'हो' किंवा 'नाही' एवढेच उत्तर मला हवे आहे.'

पंडित नेहरूंचा तो प्रश्न मला एवढा अकल्पित होता, की मी क्षणभर स्तिमितच झालो होतो. 'हो' किंवा 'नाही' असे या प्रश्नाचे तातडीने उत्तर देणे फारच अवघड होते. त्यातून हा विषय इतर कोणाशी बोलायचा नाही, असे बंधन खुद्द पंडितजींनीच माझ्यावर घातले होते, त्यामुळे मी कोणाशी बोलूही शकत नव्हतो.

पंडितजींना मी म्हटले,

'तुमचा प्रश्न एवढा अनपेक्षित आहे, की मला चकटन निर्णय ठरविणे फारच कठीण आहे. तुम्ही ज्या आग्रहाने मला बोलवीत आहात, तो पाहून तर माझी स्थिती अधिकच अवघड झाली आहे.'

पं. नेहरू म्हणाले,

'तुम्ही आत्ताच उत्तर द्या, असा माझा आग्रह नाही. विचार करून दोन दिवसांत कळविले, तरी चालेल. पण ते पाहा, सुरूवातीला मी बोललो, ते ध्यानात ठेवा. कोणाशी बोलू नका.'

त्यांच्या सूचनेवर मी गमतीने म्हटले,

'जवाहरलालजी, ही तुमची अट पाळणेसुद्धा मला फार कठीण आहे. निदान एका व्यक्तीशी तरी मला बोललेच पाहिजे. ते टाळता येणे अशक्य आहे.'

किंचितशा रागावलेल्या स्वरात पंडितजींनी विचारले,

'अशी कोण व्यक्ती आहे, की जिच्याशी हा विषय बोलल्याशिवाय तुमचे निभणार नाही?'

मी चटकन उत्तर दिले,

'पंडितजी, मुंबई सोडून दिल्लीला यावयाचे, तर निदान मला माझ्या पत्नीला तर विचारले पाहिजे'.

अगदी मोकळ्या मनाने हसून पंडितजी म्हणाले,

'बरोबर आहे. सौ. चव्हाणांशी तुम्ही जरूर बोला. मग एक-दोन दिवसांत कळवा. तुमच्या फोनची मी वाट पाहत आहे.'

पंडितजींच्या मनाच्या मोकळेपणाच्या कितीतरी हकीकती आज माझ्या मनात दाटून येत आहेत. आणखी एक आठवण, प्रतापगडच्या मोर्च्याच्या वेळची येथेच सांगून टाकतो. पुण्याहून आम्ही प्रतापगडाकडे निघालो. राज्यपाल श्रीप्रकाशजी एका कडेला, मध्ये मी व दुसऱ्या कडेला पंडितजी असे आम्ही गाडीत बसलेलो होतो. वाई जवळ आली, तसे पंडित नेहरूंना कडेला बसू न देता मध्ये बसवावे, असे माझ्या मनात आले व मी तसे पंडितजींना म्हटले. वाईजवळ निदर्शने होणार, निदर्शकांची गर्दी रस्त्यावर असणार, तेव्हा कडेला पंडितजी असू नयेत, हा माझ्या म्हणण्यातील अर्थ त्यांच्या बरोबर ध्यानात

आला होता. पंडितजी म्हणाले,

"गैरसोयीच्या जागी आम्ही दोघे बसलो आहो. आमच्यापैकी जास्त वृद्ध कोण आहे, त्याने प्रथम सोयीच्या जागेवर बसावे,' असे म्हणून श्रीप्रकाशजींना त्यांनी कडेच्या जागेवरून मध्ये बसविले आणि आपण स्वतः त्याच जागी बसून राहिले.

प्रतापगडच्या शिव-पुतळ्याचे अनावरण झाल्यावर आम्ही परत निघालो, तेव्हाची एक आठवण पंडितजींच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीची व ऐतिहासिक उपपत्ती लावण्याच्या चिंतनशील मनाची द्योतक आहे. प्रतापगडच्या-मोर्च्याचा, निदर्शनाचा कार्यक्रम संपवून निदर्शक गटागटाने परतत होते. काही सायकलींवरून चालले होते, जवळजवळच्या गावांतील मंडळी पायीच चालली होती. पण निदर्शनांच्या वातावरणातून ती अजून बाहेर आलेली नव्हती. अशाच वेळी आमची मोटार जाताना दिसली, म्हणजे त्यांना मोठा जोश चढे आणि मोठमोठ्या घोषणांनी ते वातावरण दणाणून सोडत.

पं. नेहरू हा सगळा प्रकार न्याहाळत होते. बऱ्याच वेळाने ते म्हणाले,

'तुम्हांला गंमत सांगतो, पंजाबचे लोकही खूप संतापतात. तुमच्या मराठ्यांप्रमाणेच तेही रागीट आहेत; पण कितीही रागावले, तरी लवकर थंड होतात. मराठ्यांचे तसे नाही, ते रागावतात उशिरा व थंड व्हायलाही त्यांना वेळच लागतो. लवकर संताप विसरणे त्यांना शक्य होत नाही, असे दिसते.'

जवळूनच घोषणा देत चाललेल्या एका निदर्शकांच्या पथकाकडे बोट दाखवून ते म्हणाले,

'बघ, निदर्शने होऊन तीन तास झाले, तरी त्यांच्या घोषणांचा जोर काही कमी झालेला नाही.'

१९६२ च्या नोव्हेंबरमध्ये मी दिल्लीला गेलो आणि पंडितजींच्या नित्य सहवासाचा, विचारविनिमय, मार्गदर्शन यांचा लाभ मला झाला. १९६४ च्या मे महिन्यापर्यंत म्हणजे जवळजवळ दीड वर्ष मी त्यांना अगदी जवळून पाहिले, सहा महिने ते चांगले क्रियाशील होते, पुढे पुढे ते झपाट्याने थकत गेले, आणि घडणाऱ्या घटनांचे तटस्थ साक्षीदार म्हणून वावरताना आम्ही पाहिले.

१९३१ साली कराडच्या स्टेशनवर एक तरूण विद्यार्थी म्हणून पं. नेहरूंचे दर्शन घेतले होते. तेव्हा आपल्या या नेत्याच्या अगदी निकट, त्यांचा सहकारी म्हणून, मित्र म्हणून राहण्याची संधी आपल्याला मिळेल,

अशी कल्पना स्वप्नात सुद्धा मला शिवली नव्हती. पण त्यानंतर त्यांचा सहकारी म्हणून काम करण्याचे भाग्य माझ्या वाट्यास आले. त्यांच्यासमवेत काम करताना माझे मन धन्यता व कृतज्ञता अशा संमिश्र भावनांनी भरून येत असे. विद्यार्थी असताना आमचा नेता म्हणून त्यांना मानले, ते, त्यांचे पुरोगामी विचार, इतिहासाकडे पाहण्याची त्यांची शास्त्रीय दृष्टी, भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याची जगाच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या संदर्भात त्यांनी केलेली मांडणी या सगळ्यांचे आम्हांला आकर्षण होते, यामुळे.

आज इतक्या वर्षांनंतर, आम्ही चुकीच्या मार्गाकडे आकर्षित झालो नाही, भलत्याच राजकीय दैवताच्या मागे लागलो नाही, अशा समाधानात आम्ही आहो. अनुयायांच्या विश्वासास पात्र ठरणे ही यशस्वी नेतृत्वाची एक कसोटी मानली, तर पं. नेहरूंचे यश अलौकिकच म्हणावे लागेल.

# १८... लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे म्हटले जाते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', या मंत्रातून त्यांनी देशाला प्रेरणा दिली. या दोहोंचाही भारतीय जनतेच्या मनावर कायमचा ठसा उमटला आहे. पण त्यांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा खोलवर अभ्यास केला असता असे आढळून येईल, की या दोन्हींचा समन्वय झालेला आहे. लोकमान्य टिळक हे नुसते कल्पनावादी नव्हते, ते मुत्सद्दी राजकारणी होते. ते जनतेशी वैचारिक देवाणघेवाण करणारे जन-नेते होते. आपली वृत्तपत्रे सुरू करताना जी परिस्थिती होती, तिचे राजकीय विश्लेषण करून त्यांनी आपले राजकीय डावपेच ठरवले होते.

लोकमान्य टिळकांच्या राजकीय डावपेचांचे तीन भाग करता येतील. राष्ट्रीय शिक्षणाच्या साह्याने आणि वृत्तपत्रांतून मोहीम उघडून लोकांची आणि समाजाची वृत्ती बदलता येईल, असे त्यांचे मत होते. 'केसरी' तून लेख लिहून त्यांनी विविध विषयांवर वादविवाद केले. या लेखांमधून त्यांनी मवाळांवर कडक टीका केली. त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकारवरही प्रखर टीकास्त्र सोडले. एकदा त्यांच्या एका निकटच्या स्नेह्याने त्यांना सुचवले की, त्यांनी आपले लेख इतक्या कडक भाषेत लिहू नयेत; नाही तर त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरला जाईल. त्यावर टिळकांनी उत्तर दिले,

'माझे शब्द आत धुमसणाऱ्या अग्नीतून बाहेर येतात. त्यांचे परिणाम काहीही झाले, तरी त्याला माझा इलाज नाही.'

यावरून त्यांच्या स्वभावातील बंडखोर वृत्तीचे दर्शन होते. टिळकांचे लेख लोकांना मूलभूत विचार करायला प्रवृत्त करणारे आणि जनमत तयार करणारे होते. आपल्या लिखाणांतून त्यांनी उच्चार-स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क प्रस्थापित केला. वृत्तपत्र-स्वातंत्र्यासाठी झगडणारे पहिले पत्रकार असा टिळकांचा उल्लेख करता येईल.

काँग्रेसच्या व्यासपीठावरून राजकीय चळवळींना प्रोत्साहन देऊन

टिळकांनी दुसरी आघाडी उघडली होती. वादविवाद घडवून आणणारी संस्था असे काँग्रेसचे स्वरूप असू नये, तर राजकीय बदल घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन असे काँग्रेसचे स्वरूप असावे, असे टिळकांचे मत होते. लोकांच्या आशा-आकांक्षा आणि मते व्यक्त करणारी चळवळ काँग्रेसने करावी, असे त्यांना वाटत होते. विनंती करून आणि निषेध नोंदवून राजकीय हेतू साध्य करण्याचा काळ मागे पडला आहे, अशी टिळकांची खात्री होती. राजकीय चळवळीसाठी जनतेला तयार करण्याची वेळ आली आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

या शतकाच्या पहिल्या दशकातले त्यांचे राजकीय डावपेच याच तत्त्वावर आधारित होते. १९०७ साली त्यांनी पुढील अर्थाचे विचार व्यक्त केले होते, 'आम्ही क्रांतीच्या मार्गाचा अवलंब करीत आहोत, असे वाटण्याची शक्यता आहे, हे खरे आहे. ही एक प्रकारची क्रांतीच आहे. कारण नोकरशाहीने सरकारसंबंधी ज्या कल्पना लोकांपुढे ठेवल्या आहेत, त्यांत आम्हांला पूर्णपणे बदल घडवून आणावयाचा आहे. ही क्रांती रक्तहीन क्रांती असेल, हे खरे. पण रक्तपात होणार नसला, तरी लोकांना कष्ट करावे लागणार नाहीत, असे समजणे मात्र चुकीचे आहे. कष्ट खूप करावे लागतील. पण कष्ट केल्याखेरीज काहीही मिळवता येणार नाही. क्रांती रक्तहीन असेल; पण कष्ट करावे लागणार नाहीत किंवा तुरूंगात जावे लागणार नाही, असा त्याचा अर्थ नाही.'

१८९७ साली महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला होता, तेव्हाच टिळकांनी आपली राजकीय चळवळ सुरू केली होती. ब्रिटिश नोकरशाहीवरचा आणि ब्रिटिशांच्या कार्यक्षमतेवरचा लोकांचा विश्वास नष्ट करणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते, म्हणून ते म्हणाले होते, 'ठरवलेल्या धोरणाच्या पलीकडे जायचे नाही, असा नोकरशाहीने निर्धार केला आहे. राज्यकर्त्यांकडून काही अपेक्षा करणे अयोग्य आहे. लोकांनी कितीही तक्रारी केल्या, तरी आपले धोरण बदलावयाला राज्यकर्ते तयार होत नाहीत. तक्रारींचा काही उपयोग नाही. तक्रारींच्या जोडीला स्वावलंबन नसेल, तर तक्रारींना काहीच अर्थ नाही. विनवण्या, विनंती-अर्ज आणि तक्रारी यांना जनतेचा जोरदार पाठिंबा नसेल, तर काहीही उपयोग नाही.'

टिळक लोकशाहीवादी होते व काँग्रेसच्या मदतीने राजकीय चळवळीत मूलभूत बदल घडवून आणावा, असे त्यांचे मत होते. तरूण मंडळींना राजकारणाचे शिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय कॉलेज सुरू करावे, अशी त्यांची

कल्पना होती, काँग्रेसचे स्वरूप 'सामान्य जनतेचा पक्ष' व्हावे, म्हणून ते प्रयत्न करीत होते. मवाळांशी झगडा करण्यासाठी त्यांनी सुरत-काँग्रेसचे व्यासपीठ निवडले, त्यांत त्यांना फारसे यश आले नाही. पण त्या काँग्रेसला जे तरूण कार्यकर्ते आले होते, त्यांच्या मनांवर त्याचा जबरदस्त पगडा बसला. तेव्हापासून ते १९९६ मध्ये लखनौमध्ये काँग्रेस काबीज करीपर्यंत त्यांनी काँग्रेसच्या राजकारणात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी सतत कार्य केले.

हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेला राजकीय आघाडीवरून संघटित विरोध करावयाचा, हाच त्यांचा मुख्य हेतू होता. त्याच दृष्टिकोनातून ते सामाजिक प्रश्नांकडे बघत. समाजातील समजुतींवर आणि कल्पनांवर मतभेद झाल्याने काँग्रेसमध्ये दुफळी झाली, तर राजकीय चळवळीचे सामर्थ्य कमी होईल, असे टिळकांना वाटत होते. देशाचे राजकीय सामर्थ्य वाढविण्यासाठी सर्व प्रयत्न झाले पाहिजेत, असे त्यांचे मत होते.

समाजसुधारणेच्या बाबतीत पाश्चात्त्य कल्पनांचा आणि पाश्चात्त्य विचारसरणीचा अविचाराने स्वीकार करण्याला त्यांचा विरोध होता. 'गीतारहस्या' मध्ये त्यांनी हिंदू तत्त्वज्ञानावर जे विचार व्यक्त केले आहेत, त्यांतून त्यांचा मोठेपणा स्पष्ट होतो.

# १९... संत नामदेव

सात शतके ओलांडूनही संत नामदेवांच्या टाळमृदंगाचा व हरिनामाचा गजर आजही उत्तर भारतात ऐकू येत आहे, हीच त्यांच्या अद्वितीय कार्याची जागती खूण आहे. मराठी संतांनी बांधलेल्या भक्तिमंदिराचा कळस खरा उत्तरेत आहे, म्हणून सातशे वर्षांनी श्रीनामदेवांचे पुण्य-स्मरण करताना पुन्हा त्या कालखंडाचे समाजचित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

इ.स. १००० ते १६०० हा सगळा कालखंड एखाद्या भयाण, न संपणाऱ्या रात्रीसारखा होता, इतिहासाला पडलेले ते एक दुःस्वप्न होते. समाजाचे समाजपण हरवले होते. जातिभेदांच्या अमानुष कुचंबणेत सगळा समाज जणू श्वास रोखून बसला होता. राजकीय अस्थिरता होती. भीषण वादळात स्वतःचे घरकुल सांभाळण्यासाठी माणसे धडपड करतात, तसे भयाकुल जीवन हा देश जगत होता. महाराष्ट्रात मराठी संतांनी याच कालखंडात आपले कार्य केले; समाजाला धीर दिला; हिंदू धर्माची मिरासदारी मिरवणाऱ्या धर्मपंडितांनी देवांनाच बंदिवान करून ठेवले होते, त्या देवांना मुक्त केले. ज्ञानेश्वरांनी या ईश्वरी कार्याचा प्रारंभ केला आणि त्या भावंडांनी आपल्या जीवनात भोगलेल्या हालअपेष्टांनी व दिलेल्या नव्या विचारांनी समाजात नवी जागृती निर्माण केली. ज्ञानेश्वर ही ज्ञानाची मूर्ती होती, तर त्याचे समकालीन नामदेव ही मुमुक्षूंच्या आर्ततेची, भक्तांच्या व्याकुळतेची मूर्ती होती.

मराठी संतांच्या कार्याचा हा पाचशे वर्षांचा कालखंड राजकीयदृष्ट्या चैतन्यहीन वाटला, तरी संतांच्या कार्यामुळे भक्तिमार्गाच्या व सारस्वताच्या क्षेत्रात तो बहरलेला वाटतो. या काळाने कैवल्यवृक्षाचे अनेक बहर पाहिले. ज्ञानेश्वर-नामदेव ही याच कैवल्यवृक्षावरची उमललेली फुले होती.

नामदेवांच्या कार्याची दोन चिरस्मरणीय वैशिष्ट्ये मानता येतील. एक तर नामदेव आपला प्रदेश सोडून उत्तरेत आले. वाटेत सर्वत्र भक्तिमार्गाचा प्रचार करीत सुमारे वीस वर्षे पंजाबमध्ये राहिले. पंढरपूरपासून पंजाबपर्यंत त्यांनी केलेली ही भक्तियात्रा हे नामदेवांचे अलौकिक कार्य आहे. दळणवळणाची

साधने नसताना, स्वतःची भाषा वेगळी असताना, जवळ कोणतेही साधन नसताना नामदेवांनी केलेले हे भक्तिमार्गाच्या प्रचाराचे कार्य उत्तरेतील कबीरांसारख्या संतांना प्रेरणादायक ठरले. उत्तर हिंदुस्थानात 'जवळिकीची सरोवरे' त्या काळात नामदेवांनी निर्माण केली. नामदेवांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, चोखामेळ्यासारख्या, समाजाने अस्पृश्य ठरविलेल्या भक्ताचा, शिष्य या नात्याने त्यांनी स्वीकार केला, हे होय. 'मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्या रीती ।। असे कळकळीने सांगणारा चोखामेळा हे त्या काळच्या मानवनिर्मित सामाजिक विषमतेच्या दुःखाचे आर्त रूप होते. नामदेवांचे पंजाबमधील शिष्यही वेगवेगळ्या जातींतील होते. यावरून नामदेवांचा सामाजिक समतेचा विचार हा केवळ अभंगांत आणि कीर्तनांत राहिला नाही; तर आपल्या नामसंकीर्तनात सगळ्या जातींना सहभागी करून घेण्याची दृष्टी त्यांनी व्यवहारात दाखविली. या दोन्ही दृष्टींनी नामदेवांचे कार्य हे अविस्मरणीय व अद्वितीय आहे. म्हणूनच सातशे वर्षांनी नामदेवांचे स्मरण करताना त्यांचा वारसा हा भारताच्या एकात्मतेचा वारसा आहे, हे विसरून चालणार नाही. नामदेवांनी सातशे वर्षांपूर्वी पुरस्कारलेले समतेचे तत्त्व अजूनही समाजात रूजलेले नाही. हे शल्य दूर करण्याच्या कामी नामदेवांची शिकवणूक निश्चितच शक्तिदायी ठरेल.

नामदेवांच्या वाङ्मयात भक्तिवेड्या मनाचे उसासे, उद्रेक आहेत. ज्ञानदेवांनीच 'परि नामयाचें बोलणें नव्हे हें कवित्व । हा रस अद्‌भुत निरूपम।।' असे त्यांच्याविषयी म्हटले होते. त्यांची शब्दकळा मनोहर होती. नामदेवांची ही वाङ्मयमूर्ती गोजिरी आहे. आपल्या अभंगवाणीने व टाळमृदंगांनी परमार्थक्षेत्रात सातशे वर्षांपूर्वी मुलूखगिरी करणाऱ्या, नामामृताचा हा मेघ उत्तरेपर्यंत नेऊन, तेथे सहस्त्रधारांनी भक्तिरसाचा वर्षाव करणाऱ्या नामदेवांची आठवण आज महाराष्ट्रच नव्हे, सारा भारत करीत आहे.

# २०... कर्मवीर भाऊराव पाटील

साठ वर्षांपूर्वी त्या वेळच्या समाजपरिस्थितीचे अत्यंत सहृदयतेने परीक्षण करून गरिबांच्या शिक्षणाच्या प्रश्नाला कै. कर्मवीर अण्णांनी हात घातला. लोकांमध्ये सार्वजनिक कामाच्या आवडीचा अभाव, डोक्यावर परकीय सत्तेचा वरवंटा, साधनांची कमतरता, हे सर्व असूनही, गरिबांबद्दल वाटणारी कणव, त्यासाठी करावे लागणारे श्रम व मनाचा निर्धार हीच फक्त कै. भाऊराव अण्णांच्या हातांत साधने होती. प्राथमिक शिक्षणापासून त्यांनी या कामाची सुरूवात केली. परंतु त्यांच्या कामाची सामाजिक वैशिष्ट्ये होती. आदिवासी, हरिजन व दलित वर्गांच्या मुलांना हाती धरून त्यांच्या विकासाचे काम त्यांनी धैर्याने हाती घेतले.

आपल्या देशातील सामाजिक दोषांची मार्मिक जाणीव असलेल्या भाऊरावांचे व्यक्तित्व अत्यंत चित्रदर्शी होते. ते प्राचीन काळातील ऋषीसारखे दिसत आणि तसेच त्यांचे जीवन साधे आणि काटकसरीचे असे. बहुजनांच्या शिक्षणासाठी त्यांनी आयुष्यभर अथक परिश्रम केले.

ब्राह्मणी वर्चस्वाविरूद्ध आणि सामाजिक विषमतेविरूद्ध दंड थोपटून उभ्या राहिलेल्या सत्यशोधक चळवळीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रथम पदार्पण केले, तेव्हा ही चळवळ मुख्यतः लढ्याच्या स्वरूपाची होती. आपल्या स्वभावजन्य हिरिरीने आणि प्रामाणिकपणे भाऊराव तीत सहभागी झाले. परंतु समाजामध्ये ही जी सामाजिक आणि आर्थिक विषमता दृढमूल झालेली आहे, तिला शिक्षणाचा अभाव आणि मुलांची मने घडविण्याच्या विधायक प्रयत्नांची उणीव या गोष्टी जबाबदार आहेत, हे त्यांना लवकरच कळून आले.

अस्पृश्यतेची दरी केवळ कायद्याने बुजविली जाणार नाही. या समस्येकडे अधिक व्यापक अशा सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे आणि मुख्य म्हणजे, अस्पृश्यांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घ्यायला हवे, हे भाऊरावांनी ओळखले. या अस्पृश्य जाती कित्येक शतके समाजापासून अलग पडलेल्या होत्या. दारिद्र्य, अज्ञान आणि सामाजिक

बहिष्कार यांचे तीव्र चटके त्या जातींना अनेक शतके सहन करावे लागले. विषमता आणि सामाजिक श्रेष्ठता-कनिष्ठता यांच्याविरूद्धच्या लढ्यामध्ये आधुनिक शिक्षण हेच प्रभावी शस्त्र ठरू शकते, याची भाऊरावांना जाणीव झाली. सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये सर्व जातींच्या मुलांना प्रवेश मिळाला पाहिजे, यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न करून त्यांनी अस्पृश्यतेविरूद्ध विधायक युद्ध पुकारले. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करून त्यांनी या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. गरिबांसंबंधी भाऊरावांना किती कळकळ वाटत होती आणि ही गरिबी दूर व्हावी, यासाठी शिक्षणप्रसार व्हायला हवा, यावर त्यांची केवढी प्रगाढ श्रद्धा होती, हे या वसतिगृहांवरून दिसून आले. अस्पृश्यतानिवारण आणि मागास समाजांमध्ये शिक्षणप्रसार या दोन गोष्टींवर भाऊरावांनी शेवटपर्यंत निग्रहाने आणि निकराने भर दिला.

सुरूवातीला भाऊरावांनी स्वतःची शाळा काढली नाही. प्रथम लक्ष दिले, ते सर्व जातीजमातींची गरीब मुले एकत्र राहतील आणि स्वतः श्रम करून शिक्षणाचा खर्च भागवतील, अशी वसतिगृहे उभारण्याकडे. स्वप्रयत्न, आणि स्वावलंबन यांना पुढे अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत गेले. ग्रामीण भागापर्यंत शिक्षण पोहोचल्याशिवाय तेथे संपूर्ण परिवर्तन घडून येणे अशक्य आहे, हे भाऊरावांना लवकरच उमगले. त्यांनी जी वसतिगृहे काढली होती, ती मोठ्या गावांतच होती, कारण तेथे शालेय शिक्षणाची तोपर्यंत व्यवस्था होती. म्हणून भाऊरावांनी ज्या खेडेगावांमध्ये प्राथमिक शाळा नव्हत्या, तेथे त्या सुरू करायचे कार्य आरंभिले. पश्चिम महाराष्ट्राच्या दूरच्या आणि दुर्गम भागांमध्ये प्राथमिक शाळा काढणे हे खरोखरीच अतिकठीण काम होते. परंतु भाऊरावांना एकदा ही गरज जाणवल्यावर त्यांनी कोणत्याही अडचणीची किंचितही फिकीर केली नाही. प्राथमिक शाळा काढण्यामध्ये यश प्राप्त झाल्यावर त्यांनी माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणाकडे आपले लक्ष वळविले. अशा रीतीने क्षितिजे विस्तारत असतानाही भाऊरावांची मूलभूत श्रद्धा आणि त्यांना अभिप्रेत असलेल्या कार्याचे स्वरूप या सर्व शिक्षणसंस्थांमध्ये प्रतीत होत असे.

रयत शिक्षण संस्था या कल्पनेचा जन्म काले, ता. कराड येथील सत्यशोधक समाजाच्या संमेलनात झाला, ही मोठी अर्थपूर्ण घटना आहे. आपल्या भोवतालच्या अज्ञान आणि गरिबी, जातिभेद व त्यांतून होणारे अन्याय, अस्पृश्यता व त्याने केलेले माणसाचे गुलामीकरण या सर्व गोष्टी पाहून गेल्या शतकात महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक चळवळीचा

झेंडा रोवला आणि यासंबंधी केवळ पुस्तकात न वाचता स्वतःच्या अनुभवाने तीच परिस्थिती आपल्या आसपास आहे, हे पाहिल्यानंतर जोतीरावांनी जे केले, तेच करण्यास कर्मवीर भाऊराव पाटील उद्युक्त झाले. भाषणाने जनतेत प्रचार केला जातो, पण त्यातून कृती होत नाही, असा अनुभव आल्यामुळे सत्यशोधक चळवळीच्या प्रत्यक्ष कार्यक्रमात आपण उतरले पाहिजे, या जाणिवेने कर्मवीर भाऊरावांनी आपल्या घरी एक अस्पृश्य मुलास ठेवून आपल्या कामास सुरूवात केली आणि तोच आज पुढे मोठा वटवृक्ष झाला. खऱ्या अर्थाने महात्मा जोतीराव फुले यांचा वारसा विसाव्या शतकात चालविण्याचा ज्या चार-दोन थोर व्यक्तींनी निष्ठापूर्वक प्रयत्न केला, त्यांच्यापैकी कर्मवीर भाऊराव हे एक आहेत; हा काही सामान्य वारसा नाही; हा क्रांतिकारक वारसा आहे आणि हा वारसा घेऊन भाऊरावांनी सामाजिक विषमतेविरूद्ध व अज्ञानाविरूद्ध घनघोर लढा दिला.

कर्मवीर भाऊराव पाटील ही अशी व्यक्ती होती की, त्यांनी ज्या सामाजिक पार्श्वभूमीवर हे कार्य उभे केले आहे, ती समजली, तरच कर्मवीर भाऊरावांसारखा कर्तृत्ववान पुरूष समजू शकेल. त्यांना कोणतीच गोष्ट लढाई लढल्याशिवाय मिळाली नाही. महात्मा गांधींनी धनिणीच्या बागेला दिलेली भेट ही काही भाऊरावांच्या सहजासहजी पदरी पडली नाही; त्यासाठी एका अर्थाने भाऊरावांना सत्याग्रह करावा लागला. परंतु गांधीजींचे आशीर्वाद या थोर कार्याला लाभले होते, ही केवढी योगायोगाची गोष्ट आहे. गांधीजींच्या आशीर्वादाने उभी राहिलेली ही संस्था आज हिंदुस्थानातील एक नमुनेदार शिक्षण-संस्था म्हणून कार्य करीत आहे. मी मागे एकदा रयत शिक्षण संस्थेच्या समारंभात म्हटले होते, 'कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्था ही निव्वळ शिक्षण देणारी संस्था उभी केली, असे नव्हे, तर त्यांनी सामाजिक परिवर्तनाची एक प्रयोगशाळा उभी केली आहे.' मागासलेल्या जमातींतील असंख्य विद्यार्थ्यांना त्यांनी आईच्या मायेने जो हात दिला, त्यातून त्या व्यक्तीच्या जीवनात तर परिवर्तन झालेच, परंतु त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनाचे एक नवे वातावरण निर्माण झाले. भाऊरावांसारखा कर्तृत्ववान मनुष्य असल्याशिवाय असे वातावरण निर्माण होत नाही आणि मनामध्ये उच्च ध्येय, आदर्श ठेवून, कष्टाने का होईना, पण नवे कार्य उभे करावयाचे, हा संकेत केल्याशिवाय असे मोठे कार्य उभे राहू शकत नाही.

ग्रामीण शिक्षण हा कर्मवीरांचा जीवनध्यास होता. हे कार्य पुढे चालविण्यासाठी

समर्पित वृत्तीच्या कार्यकर्त्यांचा संच उभारण्यात भाऊराव यशस्वी झाले, हे त्यांचे मोठेच कर्तृत्व म्हटले पाहिजे. भाऊरावांच्या शेकडो विद्यार्थ्यांवर त्यांच्या आदर्शवादाचा आणि सामाजिक पुनर्घटनेच्या आव्हानात्मक निष्ठेचा एवढा परिणाम झाला की, ते भाऊरावांचे कार्य अधिक जोमाने आणि अधिक समर्पित वृत्तीने करायला मोठ्या उत्साहाने पुढे सरसावले. महाराष्ट्राने नेहमीच भौतिक यशापेक्षा बौद्धिक प्रगती, शैक्षणिक कर्तृत्व आणि आदर्श जीवन यांचाच मनःपूर्वक आदर केला आहे. भाऊरावांना महाराष्ट्राच्या इतिहासात अढळ स्थान प्राप्त झाले, ते यामुळे.

आज भाऊराव आपल्यांत नाहीत, परंतु रयत शिक्षण संस्थेमार्फत चालविली जाणारी शेकडो शाळा-महाविद्यालये या आधुनिक ऋषीच्या प्रचंड कार्याची जिवंत स्मारकेच आहेत.

# २१... महर्षि विठ्ठल रामजी शिंदे

महर्षि विठ्ठल रामजी उर्फ अण्णासाहेब शिंदे यांनी आपले सबंध आयुष्य सर्वस्वी समाजसेवेसाठी व अस्पृश्योद्धारासाठी वाहिले, अशा या थोर पुरूषाच्या आयुष्यातील आठवणी आठविल्या, की त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून आपले कार्य आत्यंतिक निष्ठेने, तळमळीने करीत राहणे हा गुण असामान्य व्यक्तींमध्ये प्रामुख्याने आढळतो. महर्षि शिंदे यांच्या बाबतीत मला त्याचे प्रत्यंतर येते. लहानपणची गरिबी, त्यात अनेक कौटुंबिक आपत्तींची भर, असे असूनही स्वाभिमान न दुखावता जेवढी मदत मिळेल, तिच्यावर त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. स्वतःच्या दारूण परिस्थितीचा व प्रेमळ मातापित्यांच्या धार्मिक प्रवृत्तीचा त्यांच्या मनावर जो परिणाम झाला, त्यामधूनच त्यांना धार्मिक शिक्षण घेण्याची प्रेरणा झाली व मँचेस्टर येथे हे शिक्षण घेऊन परत आल्यावर त्यांनी धर्मप्रचाराचे काम हाती घेतले. या कार्यातूनच पुढे त्यांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या महान कार्याचा उदय झाला.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासंबंधीची माझी एक जुनी आठवण सांगतो. १९३३ साली माझे मित्र श्री. मूळचंदभाई यांच्या सल्ल्याने मी कराडमध्ये माझ्या मित्रांच्या मदतीने अस्पृश्यांसाठी शाळा सुरू करण्याचे ठरविले. हरिजनांसाठी सुरू होणारी ही शाळा त्यांच्याच आशीर्वादाने सुरू व्हावी, यासाठी त्यांना बोलवायचे ठरले; तरी पण प्रत्यक्षात श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांच्यापर्यंत पोचायचे कसे, आणि कुणाच्या आधाराने, हा प्रश्न होता. अखेर मीच स्वतः पुण्याला जाऊन श्री. शिंदे यांना आणण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे ठरले, आणि ठरल्याप्रमाणे निघालोही.

श्री. शिंदे यांची आणि माझी पूर्वीची जानपछान नव्हती, साधी ओळखही नव्हती. तरी पण त्यांना त्यांच्या घरी जाऊन मी भेटायचे, असे ठरवले. पुण्याच्या रेल्वे स्टेशनवर मी पहाटे उतरलो होतो. तिथेच नळावर तोंड धुतले. पायजमा, कोट, टोपी हा त्या वेळचा साधा वेष. तो बदलण्याचेही कारण नव्हते. पण उजाडेपर्यंत थांबणेच आवश्यक होते. सकाळीच मग स्टेशनवरून निघून

आठ-सव्वाआठपर्यंत मी त्यांच्या घरी पोचलो. श्री. शिंदे घरीच होते. नमस्कार करून मी येण्याचे कारण सांगितले. त्यासरशी ते माझ्याकडे पाहतच राहिले. सुरूवातीला ते फारसे बोलले नाहीत. पण एकूण मनुष्य मला मोठा 'टफ्' वाटला.

'तू एक साधा पोर, तुझ्या सांगण्यावरून मी कसा येऊ?' विठ्ठल रामजी म्हणाले.

मी काही सांगण्याचा प्रयत्न करत होतो. त्यांनी मग मला तास-दोन तास ठेवून घेतले. मधून-मधून ते काही बोलत असत, काही विचारीत असत. माझ्या हालचाली बारकाईने टिपत असत.

अखेर ते म्हणाले,

'मी येईन, पण माझ्या काही अटी आहेत.'

'आम्ही सर्व अटी पाळू.' मी म्हणालो.

'कुठं उतरवणार मला?' शिंदे.

'माझ्या घरीच उतरवणार आहे.' मी म्हटले.

'घरच्या माणसांची संमती घेतली आहेस?' शिंदे.

'हो!' मी दाबून होकार दिला.

'माझ्याबरोबर जेवायला हरिजनाला आणावं लागेल. घरचे लोक मान्यता देतील?' शिंदे.

'हो.' मी पुन्हा होकार दिला.

'घरी कोण कोण आहेत?' शिदे.

'आई, थोरले बंधू आहेत; पण ते नाही म्हणणार नाहीत.' मी सांगितले.

'घरी त्यांना विचारलं आहे का?' शिदे.

'नाही!' मी म्हणालो.

'मग, हो कसा म्हणतोस ?' शिदे.

'माझे सर्व जातींचे मित्र माझ्या घरी येतात. आईची त्याबद्दल कधी तक्रार नसते.' मी सांगितले.

'पण तुझ्या घरी हरिजनांची पंगत कधी झाली आहे का?' शिंदे.

'आपल्याबरोबर ही पंगत होईल, याची मला खात्री आहे.' मी जरा

ठामपणाने बोललो.

श्री. विठ्ठल रामजी यांचा कराडला येण्याचा होकार घेऊनच मी परतलो.

हे आता सारे कसे जमावे, अशी धास्ती मनात डोकावत होती. मित्र बरोबर असणे वेगळे आणि घरात तशी पंगत होणे वेगळे. आईकडून होकार मिळण्यावरच पुढचे सारे अवलंबून होते.

कराडला आल्यानंतर मी कोणती जबाबदारी घेऊन आलो आहे, हे आईला जरा भीत-भीतच सांगितले. क्षणार्धात तिने होकार दिला. 'विठ्ठल रामजी यांना व हरिजन मित्राला आनंदाने आपल्याकडे येऊ द्या.' असे ती जेव्हा म्हणाली, तेव्हा माझ्या आनंदाला पारावार उरला नाही.

श्री. शिंदे यांनी स्वतःला तिला याबद्दल विचारले, तेव्हा ती माउली म्हणाली,

'मला सारी मुलं सारखीच. त्यात कसली जातपात?'

कराडच्या बुधवार पेठेत - त्या वेळच्या महारवाड्यात हे नाइट स्कूल श्री. शिंदे यांच्या हस्ते मग सुरू झाले.

दोन-तीन वर्षे आम्ही सर्व मित्र त्या ठिकाणी स्वतः शिकवायला जात असू.

शिंदे यांचा आमच्याकडील तो मुक्काम मोठा बहारीचा झाला. ते स्वतः खूश होऊन परतले.

महर्षि अण्णासाहेब शिंदे यांच्या सार्वजनिक आयुष्याचा परिपोष त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास, विश्वधर्मापासून सुरूवात होऊन 'समाजसुधारणा, समाजसेवा व राष्ट्रोद्धार' अशा टप्प्यांनी झाला.

तत्कालीन महाराष्ट्रात समाजसुधारणेच्या ज्या ज्या चळवळी झाल्या, त्यांत महर्षि शिंद्यांचे प्रामुख्यांने अंग होते. परंतु त्यांच्या आयुष्यातील अत्यंत मौलिक कार्य म्हणजे अस्पृश्यांची त्यांनी केलेली महान सेवा. आपले सर्व जीवन त्यांनी या कार्यासाठी वेचले. जातिनिरपेक्ष बुद्धीने त्यांनी हे कार्य सतत केले. तत्कालीन सरकारचीही या कार्यात त्यांनी सहानुभूती मिळविली. एवढेच नव्हे, तर सतत प्रयत्न करून राष्ट्रीय सभेलाही हे कार्य हाती घेण्यास त्यांनी प्रवृत्त केले. या कार्याचा पुढे महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली प्रचंड वृक्ष फोफावला.

महर्षि शिंद्यांनी आपल्या हयातीत केलेली धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक

व राजकीय क्षेत्रांतील कामगिरी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात अद्वितीय गणली जाईल. इतक्या निरपेक्ष, निरलस व तळमळीने काम करणाऱ्या एका थोर समाजसेवकाचा आदर्श तरूण पिढीपुढे सतत राहावा व त्यापासून त्यांना शक्ती व स्फूर्ती मिळावी, अशी इच्छा मी व्यक्त करतो.

# २२... डॉ. राजेंद्रप्रसाद

भावी इतिहासकार जेव्हा स्वतंत्र भारताचे वर्णन करील, तेव्हा काही विसंगतींच्या, अभावांच्या आणि अपयशांच्या वर्णनावरून तो अशा ठिकाणी येऊन थांबेल, की जेणेकरून त्याच्या लेखणीस आमचे उगवते स्वातंत्र्य म्हणजे आमची राष्ट्रीय परंपरा आणि भावी महत्त्वाकांक्षा याची दृढ आधारशिला आहे, असे लिहिणे भाग पडेल. स्वतंत्र भारताच्या प्रथम राष्ट्रपतिपदी डॉ. राजेंद्रप्रसादांची निवड होईल, त्यात तिळमात्रही शंका नव्हती. ज्याप्रमाणे नदी पर्वतमय भूभाग सोडून मैदानात अवतीर्ण होताना तिच्या पाण्याबरोबर वाहत येणारे छोटे-छोटे गोटे आणि माती खाली बसते आणि तिचे पाणी स्वच्छ व निर्मळ दिसते, त्याचप्रमाणे राजनीतीच्या दंग्याधोप्याचा काही काळ उलटल्यानंतर भूतकाळातील सतरा वर्षांचा इतिहास आणि तत्संबंधी घटना स्पष्टपणे बौद्धिक क्षितिजावर स्थिरावलेल्या दिसतील. अशा स्थितीत कोणासही समजणे अवघड होणार नाही की, बारा वर्षांपर्यंत राष्ट्रपतिपदावर विराजमान होऊन ज्या परंपरा आणि संसदीय पद्धतीचा पाया राजेंद्रबाबूंनी घातला, भारतीय स्वातंत्र्याच्या स्थैर्यासाठी ती एक सर्वांत मोठी उपलब्धी मानावी लागेल.

महात्मा गांधींच्या जीवनाची व विचारसरणीची छाप भारतातील ज्या थोड्या व्यक्तींवर बव्हंशाने पडलेली आहे व गांधीजींचे गुण ज्यांचे ठायी उत्कटत्वाने वास करीत आहेत, अशा व्यक्तींमध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे स्थान अत्यंत श्रेष्ठ होय. बहुतेक विश्वविद्यालयीन परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करून त्यांनी आपल्या प्रखर बुद्धिमत्तेची चमक दाखविली. चंपारण्यातील चळवळीत त्यांना सत्याग्रहाचे पहिले पाठ मिळाले व याच ठिकाणी त्यांनी आपल्या भावी राजकीय जीवनाची पूर्वतयारी केली. पाटणा येथील प्रमुख न्यायालयात एक नामांकित वकील म्हणून त्यांनी जे यश संपादन केले, त्याने कीर्ती व संपत्ती या दोहोंचाही लाभ त्यांना घडला; परंतु या दोहोंच्या मोहात न पडता त्यांनी देशकार्यासाठी त्यावर पाणी सोडले. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी भारताच्या राष्ट्रीय लढ्यात बजावलेली मोलाची कामगिरी, १९३४ साली बिहारमध्ये

झालेल्या प्रचंड धरणीकंपाच्या वेळी त्यांनी केलेले सेवाकार्य व दाखविलेले संघटनाकौशल्य, १९४६ साली त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये अन्न व शेतकी मंत्री या नात्याने बजाविलेली बहुमोल कामगिरी, अत्यंत कठीण काळात त्यांनी वेळोवेळी वाहिलेली कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा व स्वतंत्र लोकसत्ताक भारताचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी भूषविलेले थोर स्थान, तसेच, त्यांच्या ठायी वसत असलेल्या बुद्धिमत्ता, विद्वत्ता, कर्तृत्व, धडाडी वगैरे अनेक गुणांचे उत्कृष्ट दर्शन घडते. भारतीय संस्कृतीमध्ये जे जे थोर, उदात्त व आदर्श असे आहे, ते ते डॉ.राजेंद्रप्रसादांच्या ठायी आहे, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होईलसे वाटत नाही. त्यागमय जीवनाचे ते मूर्तिमंत प्रतीक आहेत. विद्वत्ता व विनयशीलता या दोहोंचा समन्वय त्यांचे ठायी चांगला साधला आहे.

आमच्या विद्यमान स्वातंत्र्यास आमच्या भूतपूर्व राष्ट्रपतींनी इतके महान योगदान दिले, त्याचे मुख्य कारण त्यांच्या अद्‌भुत व्यक्तिमत्त्वातून साकार होते. त्यांचा स्वभाव सरळ आणि सात्त्विक होता. हे उच्चविद्याविभूषित होते, त्यांचे विचार आदर्श होते, त्यांच्या कार्याने आणि अनुभवाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ज्या गुणांचा समावेश झाला होता, हे सर्व विलक्षणच म्हणावे लागेल. राजकीय क्षेत्रात ते कितीही महान असले, त्यांचा बौद्धिक स्तर कितीही उंच असला, तरी ते एक असाधारण महामानव होते. आपल्या प्राचीन ग्रंथांत आणि शास्त्रांत आदर्श पुरूषाची जी व्याख्या केली गेली आहे, राजेंद्रबाबू त्या व्याख्येच्या कसोटीवर पूर्णपणे उतरतात. संयम, समन्वय, सात्त्विकता, सौम्यता, इत्यादी त्यांच्या स्वभावाचे अविभाज्य घटक होते. त्यांच्या उच्चशिक्षणाने यात अधिकच भर टाकली. त्यांच्यांतील तपी आणि त्यागी वृत्तीने जीवनाला अधिकच विकसित केले. यातूनच त्यांनी देशसेवेची शोभा वाढविली. ओजस्वी प्रतिभा, उदारप्रवृत्ती, नम्रता, सरळपणा, सहिष्णुता यांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण झाली, याचे प्रत्यंतर राजेंद्रबाबूंशी बोलणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस काही क्षणांतच येते. माझ्या मते त्यांचे श्रेष्ठ जीवन आणि त्यांचा राजनीतिक तथा संविधानिक दृष्टिकोन आमच्या स्वातंत्र्याच्या प्रारंभिक वर्षांतील सर्वांत मोठा उत्कर्षच मानावा लागेल.

या गोष्टींचे आश्चर्य तर वाटतेच, परंतु हे निर्विवाद सत्य आहे की, त्यांच्या सरळ स्वभावाने, त्यांच्या स्वाभाविक महिमामयी प्रवृत्तीने आणि सहज स्वाभाविक बुद्धीने त्यांच्यांतील असाधारण मावनतेस आणि सखोल द्रष्टेपणास पुष्टी दिली होती. या गुणांमुळे कोणत्याही समस्येच्या निवारण-प्रसंगी त्याचा

नीरक्षीरविवेक-स्वभाव स्पष्ट होतो. ही गोष्ट वेगळी आहे, की आम्ही त्यांच्यापासून किती लाभ घेतला. परंतु हे निर्विवाद आहे, की कोणत्याही समस्येचे विश्लेषण आणि परिणाम तोच असतो, जो राजेंद्रबाबू आमच्यापुढे ठेवतात.

थोड्याशा अवधीत माझा जो परिचय राजेंद्रबाबूंशी झाला, जो संबंध त्यांच्याशी आला किंवा वेळोवेळी गप्पागोष्टींच्या माध्यमातून त्यांच्या मार्गदर्शनाची जी संधी मला मिळाली, त्यातून माझी ही धारणा दृढ झाली आहे की, केव्हा केव्हा समस्यानुकूल निदान करताना, त्यांची अस्वीकृती असतानासुद्धा मी अनुभवलेले आहे, परिस्थित्यनुसार जेव्हा मी त्या उचित मार्गावरून तेज गतीने जाऊ शकत नसे, तेव्हा सुद्धा मी अनुभवले आहे की, त्यांच्या सौजन्यशीलतेने माझ्यात नवीन शक्तीचा संचार केला आहे आणि काळ व्यतीत होताच मी त्या मार्गावरून जाण्यास समर्थ झालो आहे. अशा प्रकारे त्यांची सौम्यता माझ्यातील दुर्बल तेसच नाही, तर माझ्यातील शक्तीस मजबूत बनविणारी होती. जसा एखाद्या पित्याचा आपल्या जबाबदार पुत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन असतो, तसा त्यांचा माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. असा पिता आपल्या पुत्राच्या कार्यांची दखल घेत नसतो; पण त्यास उचित मार्ग दाखवितो. सतत आपल्या आशीर्वादातून आणि शुभकामनेतून त्याच्यात हिंमत निर्माण करतो. माझ्याबद्दलचे त्यांच्यातील या प्रकारच्या प्रेमाचे प्रत्यंतर मला एक-दोन वेळा अनुभवण्यास मिळाले.

राजेंद्रबाबू अधून-मधून पुण्यात येत असत. सन १९६० मध्ये ते पुण्यास आले होते. कदाचित पुण्यातील हे त्यांचे येणे शेवटचेच होते. मी काही कारणास्तव माझ्या गावी कराडला गेलो होतो. कराड पुण्याहून अंदाजे १५० मैल आहे आणि रस्ताही घाटाचा आहे. तेथून एकदा मी वेळेअभावी अत्यंत गतीने कारने केवळ अडीच तासांत कराडवरून पुण्यास पोहोचलो. सरळ राजभवनात गेलो. राजेंद्रबाबू समोरच बसले होते. कारमधून उतरताच मी त्यांना भेटलो. बोलता-बोलता त्यांना हे कळाले, की मी इतक्या गतीने आलो आहे, तेव्हा त्यांनी मोठ्या गोड शब्दांत, परंतु चिंतेच्या स्वरात सुनावले की,

'अशा तऱ्हेचा धोका पत्करणे योग्य नाही. भले, थोडा उशीर झाला, तरी चालेल.'

त्यांचे हे प्रेमळ शब्द आजसुद्धा मी विसरू शकत नाही. राजकीय जीवनातील कर्तव्य आणि कर्म यांमधील अशी मृदुता हृदयावर अशी अवीट छाप घालते, ज्यास मी कधीच विसरू शकत नाही.

राष्ट्रपतिभवनात सुद्धा त्यांना भेटण्याचा योग मला अनेक वेळा आला. जेव्हा जेव्हा मी त्यांना भेटलो, तेव्हा तेव्हा मला त्यांच्यांतील अधिक जवळिकीचा अनुभव आला. त्यांच्या सहवासात मला जी शांती आणि समाधान मिळे, त्यांचे वर्णन करणे शब्दातीत आहे. हे मी माझे सौभाग्य मानतो, की त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या शुभेच्छा, त्यांचे आशीर्वाद त्यांचे प्रेम मला प्राप्त झाले. हे सत्य आहे, की जेव्हा जेव्हा अनौपचारिकरित्या त्यांच्याशी भेटण्याचा मला योग आला, तेव्हा तेव्हा मला वाटायचे, की आणखी काही वेळ त्यांचा सहवास मला मिळावा आणि त्यांच्याजवळ बसण्याची संधी मिळावी. त्याचे कारण केवळ मला त्यांच्यापासून समसामयिक समस्यांवर सुदृढ सल्लाच नसे, तर त्यांच्या प्रत्येक शब्दातून सहजपणे माझ्याबद्दलचे वात्सल्य ओसंडत असे.

मला आठवते की, नवीन जबाबदारी सांभाळण्यासाठी मला मुंबईवरून दिल्लीस जावे लागले. देशावर संकटांचे ढग अंधारून आले होते. या स्थितीत देशवासीयांच्या आकांक्षा मी किती फलद्रूप करू शकेन, या विचाराने माझ्या मनास घेरले होते. राजेंद्रबाबू तेव्हा पाटण्यात होते. त्यांनी तारेने माझे अभिनंदन केले, परंतु केवळ तारेने त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांनी पत्रही लिहिले. त्यांची सद्‌भावना आणि शुभाशीर्वाद माझ्यातील धैर्य वाढवितात आणि धीरगंभीरतेने कर्तव्य पार पाडण्याची मला प्रेरणा देतात. त्यांचे हे ते शब्द.

'बिघडलेल्या गोष्टी सुधारण्यास आणि त्यांना ठीक करण्यास वेळ लागतो, म्हणून बिघडलेल्या गोष्टींची लगेचच सुधारणा करण्याची आशा बाळगणे उचित नाही. धैर्याने योग्य मार्ग अनुसरून सर्वांना याप्रमाणे सुधारणे, त्यांना ठीक बनविणे आवश्यक आहे. जसे इंग्रजांनी डंकर्कच्या लढाईनंतर स्वतःस सुधारले, ठीकठाक बनविले, मला आशा आहे, की आता असेच होईल!... म्हणून मी भविष्याकडे धीराने पाहतो. तथापि, आता आमची पुन्हा परीक्षा होईल!'

राजेंद्रबाबूंच्या या शुभेच्छा आणि सद्‌भावना माझ्या जीवनाच्या आश्रयस्थान बनल्या आणि कठीण प्रसंगी माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

आज त्या महापुरूषाचे, जे केवळ राष्ट्रपतीच नव्हते, तर आदर्श मानवी पुरूष होते, त्यांच्या स्मरणाने आमच्या हृदयांत आणि राष्ट्रात चैतन्यशील जीवनाचा संचार होत आहे. अशा या महापुरूषाच्या स्मरणाने देशाबद्दलचे

कर्तव्य पूर्ण करणे, देशाची मनापासून सेवा करणे आणि त्यांचे रक्षण करणे यांसंबंधीची प्रेरणा मला निश्चितच मिळत राहील. त्या चिरंगत नेत्याच्या आत्म्यास ही माझी खरी श्रद्धांजली ठरेल.

## २३... लाल बहादूर शास्त्री

लालबहादूर शास्त्रींचे पुण्यस्मरण करताना त्यांच्या सहवासातील अनेक आठवणी जाग्या होतात. त्यांनी कधी मन मोहोरते, कधी उदासवाणे होते. शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वात एक गोडवा होता. माणसाला आपलेसे करण्याची जादू होती. त्यामुळे अगदी थोड्या सहवासाने आमची मने 'निरंतर' झाली. १९४८ मध्ये मी शास्त्रीजींना प्रथम भेटलो, ते मी पार्लमेंटरी सेक्रेटरी होतो, तेव्हा. ती अर्थातच जुजबी ओळख होती. पण पुढे मी मंत्री झाल्यावर दिल्लीला त्यांची भेट नेहरूंच्या निवासस्थानी झाली. प्रसंग साधाच आहे; पण तो आज आठवतो आहे.

नेहरूंच्या बंगल्याच्या हिरवळीवर चहापानासाठी आम्ही जमलो होतो. त्या वेळी एका बाजूला पं. पंत आणि शास्त्रीजी हिरवळीवर फेऱ्या घालीत बोलत होते, इतक्यात पंडितजी आले, त्या दोघांकडे पाहून जवळ असणाऱ्या आम्हां सर्वांना बोलावून म्हणाले

'डू यू सी दॅट लाँग अॅण्ड शॉर्ट ऑफ यू.पी.?'

त्यानंतर शास्त्रीजी केंद्रीय मंत्री असताना एकदा मुंबईत आले. १९५८ साल असावे. द्वैभाषिक मुंबई राज्य स्थापन होऊन दोन वर्षे होऊन गेली होती. शास्त्रीजी नेहरूंच्या विश्वासातले. तेव्हा माझ्या मनात आले. की शास्त्रीजींची संयुक्त महाराष्ट्रासंबंधीची मते अजमावून पाहावीत. मी त्यांना सरळच विचारले,

'ह्या द्वैभाषिकाच्या प्रयोगासंबधी आपल्याला काय वाटतं?'

तेव्हा शास्त्रीजींनी स्पष्टपणे सांगितले,

'ते मला कधीच पसंत नव्हतं. ते टिकणार नाही, असं मला वाटतं.'

शास्त्रीजींचे हे मत माझ्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

शास्त्रीजींशी खरी जवळीक होऊ लागली, ती मी दिल्लीला आल्यावर, ते गृहमंत्री होते नि मी संरक्षणमंत्री होतो. संरक्षण खात्याच्या व गृहखात्याच्या

अनेक समान प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यासाठी भेटीगाठी होत. त्यामुळे सहवास वाढत गेला. पुढे ते पंतप्रधान झाले, तेव्हापासून तर अधिकच संबंध येऊ लागला.

पहिले सहा महिने शास्त्रीजी आपली बैठक नीट मांडीत होते. पंतप्रधान म्हणून सहकाऱ्यांशी चर्चा होतात, तशा माझ्याशीही होत असत. त्यांच्या स्वभावातली अकृत्रिमता, त्यांची विश्वास देण्याची व घेण्याची पद्धत समजू लागली होती. त्यांच्याशी बोलताना त्यांच्या मनाचा ठाव घेणे सोपे नसे. ज्या विश्वासाने ते वागत, त्याच विश्वासाने, उमेदीने काम करावे, असे वाटे, पण तरीही या संबंधांत पडदा होताच. तो असतोच. ती जागाच तशी आहे.

पुढे एप्रिल, १९६५ पासून 'कच्छ प्रकरण' सुरू झाले. संरक्षण खात्याच्या धोरणाशी निगडित असे अनेक प्रश्न त्यातून उद्‌भवले. शास्त्रीजींचे मन कळावे, असे मला वाटत होते. याच काळात त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलणे होऊ लागले. ऑगस्ट १९६५ मध्ये परिस्थिती धोक्याच्या वळणापर्यंत पोहोचली होती. शास्त्रीजींशी केलेल्या विचारविनिमयातून त्यांची संरक्षणविषयक मते वास्तव आहेत, देशाच्या हितासाठी धोका पत्करण्याची त्यांची मानसिक तयारी आहे आणि त्याला लागणारी कणखर मनोवृत्ती त्यांच्याजवळ आहे, याचा अनुभव मला येऊ लागला. विचारांची देवाणघेवाण मोकळेपणाने होऊ लागली. स्वाभाविकच मी त्यामुळे निश्चिंतच झालो आणि समाधानही वाटले. कारण वेळ फार आणीबाणीची आली होती. संरक्षणमंत्री या नात्याने देशाच्या जीवनावर दूरवर परिणाम करणारे निर्णय घेण्याचे ते दिवस होते. अशा वेळी आपल्यावर पंतप्रधानांचा संपूर्ण विश्वास असणे ही त्या वेळची माझी गरज होती.

प्रत्यक्ष संघर्षाच्या काळातील आमच्या भेटीगाठी मला नेहमी आठवतात. त्या वेळी बहुधा रोज दोनदा तरी शास्त्रीजींना मी भेटत असे. त्यांना परिस्थितीची कल्पना देत असे. आलेल्या अडचणींची, प्रश्नांची चर्चाही होई. त्यांचे मार्गदर्शन मोलाचे वाटे. 'सावधपण' (सर्वांविषयी) हे शास्त्रीजींचे वैशिष्ट्य. त्यांचा माणसांचा अनुभव मोठा, पारखही तशीच अचूक. त्यामुळे शास्त्रीजींच्या अनेक बारीक सूचना उपयोगी ठरत. त्या काळातल्या सगळ्याच आठवणी सांगणे शक्य नाही. पण एक सांगतो.

काश्मीर-आघाडीवर परिस्थिती गंभीर झाली होती. मी माझ्या सचिवालयातील कचेरीत होतो. तिथे हवाई व सेना दलाचे अधिकारी माझ्याकडे

घाईने आले आणि त्यांनी सांगितले,

'प्रसंग बाका आहे, शत्रू पुढं सरकतो आहे. त्याचा वेगही काळजी उत्पन्न करणारा आहे. आता त्याला अटकाव करण्याचा मार्ग एकच आणि तो म्हणजे विमानांतून बॉंबफेक सुरू करणे. त्यासाठी आपली व पंतप्रधानांची संमती हवी आहे.'

ती वेळ संध्याकाळची होती. सेनापतींना माझा निर्णय अक्षरशः पाच-दहा मिनिटांत हवा होता.

क्षणभर विचार केला. निर्णय घेणे तर आवश्यक होते. पंतप्रधानांची भेट घेऊन, चर्चा करून सर्व करावयाचे, म्हणजे त्यात अर्धा तास तरी गेला असता. तेवढा वेळही नव्हता. शेवटी विचार केला आणि सेनापतींना सांगितले,

'गो अहेड!'

हा आदेश देऊन झाल्यानंतर काही वेळाने शास्त्रीजींना भेटायला गेलो. त्याच दिवशी सकाळी मी परिस्थिती बिकट आहे, हे सांगितलेच होते. संध्याकाळी गेलो, तेव्हा मी म्हटले,

'काश्मीर आघाडीवर परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. मी आपल्या हवाई दलाला बॉंबहल्ल्याचा हुकूम दिला आहे.' हे सांगितले आणि शास्त्रीजींची प्रतिक्रिया पाहू लागलो.

एकच वाक्य त्यांनी उच्चारले, ते म्हणाले,

'अच्छा किया!'

मला अर्थातच फार बरे वाटले, मनावरचे मोठे ओझेही हलके झाले. कारण, एक फार महत्त्वाचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मंत्रिमंडळाच्या समितीची बैठक घेऊन शास्त्रीजींनी त्यांची संमती मिळविली.

या सर्व युद्धकाळात शास्त्रीजींचे जे मला दर्शन घडले, ते खरोखर अविस्मरणीय आहे. युद्धात नेहमीच चढउतार होतात. परिस्थिती क्षणाक्षणात बदलते. पण युद्धनेत्याला आपले मन खंबीर ठेवावे लागते. शास्त्रीजींनी हा खंबीरपणा, हे मनोधैर्य या सर्व काळांत दाखविले. मनाशी त्यांनी पक्के ठरविले होते, की हा प्रसंग लेचेपेचे धोरण ठेवण्याचा नाही. प्रतिटोला हाणण्याची तयारी ठेवण्याचा आहे. त्यांचे हे मन आम्ही रोजच्या चर्चेतून पाहत होतो. त्यामुळे अनेक निर्णय घेणे सोपे गेले. पार्लमेंटला धीर आला. जनतेलाही या

खंबीरपणाचा प्रत्यक्ष प्रत्यय आला, तो लाहोरच्या दिशेने आपलै सैन्य घुसले, तेव्हा शास्त्रीजींनी जनतेला आकाशवाणीवरून आवाहन केले. त्यांचे ते भाषण, त्यांचे ते 'कम व्हॉट मे' हे शब्द म्हणजे त्यांच्या दृढ निर्धाराची, भारताच्या अशरण वृत्तीची ऋचा होती. त्यांच्या शब्दांना त्या काळी धार आली होती. युध्यमान भारताची ती प्रतिमा आणि भारतीयांना लाभलेले शास्त्रीजींचे त्या काळातील खंबीर नेतृत्व हे आपल्या आधुनिक इतिहासाचे एक सोनेरी पान आहे.

युद्ध थांबले आणि ताश्कंदच्या वाटाघाटींची तयारी सुरू झाली. शास्त्रीजींच्या कर्तृत्वाची वेगळी कसोटी आता लागणार होती. तेथेही शास्त्रीजी पूर्वीइतकेच खंबीर राहिले. वाटाघाटींचा प्रश्न परराष्ट्र खात्याच्या कक्षेतला. पण तरीही शास्त्रीजींनी मला बरोबर नेले. त्यातही त्यांची माझ्याविषयी आपुलकी दिसली, विश्वास दिसला. ताश्कंदला रात्रंदिवस चर्चा होई. एक वेगळेच पर्व सुरू झाले होते. शास्त्रीजींचे पुन्हा वेगळे दर्शन मला त्या वेळी घडले. खंबीरपणाने, पण सौम्य शब्दांत ते आपला मुद्दा मांडत!

दिवस जात होते. दि. १० जानेवारी, १९६६ ची गोष्ट आहे. रात्री थाटाचा स्वागत - समारंभ झाला होता. लोकनृत्य-संगीताच्या स्वरांनी वातावरण भरले होते. तो कार्यक्रम संपला; शास्त्रीजी परत जावयास निघाले. बाहेर कडाक्याची थंडी होती. धुक्यामुळे सारे धूसर दिसत होते. शास्त्रीजी आपल्या मोटारकडे जात असताना मला त्या धूसर प्रकाशात दिसले, तेच त्यांचे शेवटचे दर्शन. त्यांची ती मूर्ती मनश्चक्षूंनी मी नेहमी पाहतो. त्यांना त्या वेळी पाहताना कल्पनाही नव्हती, की हा मनुष्य आपणांस पुन्हा भेटणार नाही.

शास्त्रीजी गेले आणि मला वाटले, एका फार मोठ्या नेत्याला हा देश मुकला. शास्त्रीजींचे हे मोठेपण अनेकरूपी होते. ते फार कुशल संघटक होते. त्यांच्यावर काँग्रेस संघटनेतील अनेक समस्या सोडविण्याचे काम सोपविले जाई. शास्त्रीजी अवघड वाटणाऱ्या समस्या आपल्या रेशमी स्पर्शाने व मुलायम वागणुकीने सहज सोडवीत. माणसाचे मन जिंकण्याचे, ते उकलण्याचे त्यांच्याजवळ अपूर्व कौशल्य होते. तडजोडीचा मार्ग सुचवून, ती घडवून आणण्याचे कसब त्यांना साधले होते.

माणसांचा गराडा त्यांच्याभोवती सदैव असे. तासान् तास कार्यकर्त्यांशी बोलणे त्यांना जमे. त्यांच्या अडचणी, त्यांचे प्रश्न ते न कंटाळता समजावून घेत. त्यामुळे शास्त्रीजी, कार्यकर्त्यांना नेहमीच प्रिय असत. इतक्या मोठ्या

पदावर राहूनही सामान्य कार्यकर्त्याला भेटणे हे नेहमीच त्यांना आवश्यक वाटे. सहकारी मंत्र्यांशीही ते असेच वागत. त्यांच्यावर एखादे काम सोपवले, की त्यावंर पूर्ण विश्वास टाकत. त्यांना हवे ते अधिकार देत. त्यांच्या या उमदेपणाने, मोकळेपणाने कामाला हुरूप येई. माझ्यासारख्या दरबारी वृत्ती नसलेल्या माणसालाही काम करणे सोयीचे होई.

पंतप्रधान म्हणून त्यांच्याशी आलेल्या संबंधामुळे मला जे शास्त्रीजी दिसले, ते असे होते. त्यांचा माणुसकीचा गहिवर दिसला. त्यांचे खंबीर मन दिसले. पोलादी वृत्ती अनुभवली, अंतःकरणाचा पीळ पाहिला.

आता कधी सुगंधाने मन भरावे, कधी स्नेहाने ते आर्द्र व्हावे, कधी त्यांच्या सहवासाच्या आठवणींनी उमाळा यावा, अशी ही शास्त्रीजींची मला होणारी आठवण आहे. मी ती जपून ठेवतो- अत्तराच्या कुपीसारखी !

## २४... बाबू जगजीवनराम

भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात आणि स्वतंत्र भारताच्या राज्यकारभारात व जडणघडणीत बाबू जगजीवनराम यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे व मोलाचे आहे. आणखी एका दृष्टीने जगजीवनरामबाबूंचे कार्य वेगळे आहे. ते राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात सामील झाले आणि देशाच्या मुक्तीतच दलितांची मुक्ती आहे, या श्रद्धेने त्यांनी कार्य केले. आपले विचार राष्ट्रीय नेत्यांपुढे सतत मांडून व आपल्या विचारांना अनुकूल अशा दलितांच्या विविध संस्थांत सहभागी होऊन त्यांनी या प्रश्नाची संघटनात्मक बाजू सांभाळली.

भारताच्या स्वातंत्र्य-चळवळीला असलेली सामाजिक बाजूही अत्यंत महत्त्वाची होती. सामाजिक समतेविना, आर्थिक न्यायाविना स्वातंत्र्याची चळवळ ही केवळ भावनात्मक चळवळ राहील, याची जाणीव गांधी-नेहरूंना होती. पण या अन्यायाची झळ ज्यांना पोहोचते, अशा हरिजनांतून तरूण नेतृत्व यावयास हवे होते. ते जगजीवनरामबाबूंच्या रूपाने आले. १९३७ मध्ये जगजीवनरामबाबूंनी बिहार प्रांतीय दलित जाती संघाच्या अधिवेशनात जे भाषण केले, त्यात 'आमचे नव्वद टक्के शेतमजूर गुलाम आहेत. नुसती जमिनदारी नष्ट करून ते गुलाम स्वतंत्र होणार नाहीत. जमिनीचे वाटप कसणाऱ्यांतच व्हावयास हवे', ही घोषणा केली. यातच त्यांची आर्थिक-सामाजिक दृष्टी स्पष्ट होते.

१९३७ मध्ये जगजीवनराम बिहार काँग्रेस मंत्रिमंडळाचे संसदीय सचिव झाले आणि त्यानंतर पुढे १९४६ मध्ये केंद्रीय श्रममंत्री झाले. त्या वेळी ते केवळ अडतीस वर्षांचे तरूण होते. पण त्यांच्या कामातील कौशल्य व तडफ वाखाणण्यासारखी होती. बाबूजींची कर्मभूमी बिहार असल्यामुळे खाण कामगारांच्या शोषणाची त्यांना कल्पना होती. त्यांचे दुःख-कष्ट ते समजू शकत होते. यामुळे त्यांचे मन कष्टी होते. म्हणूनच श्रममंत्रिपदावर असताना कामगारांच्या हितासाठी त्यांनी अनेक कायदे केले. त्यांना न्याय दिला. श्रमिकांना एक सहकारी राष्ट्रकार्याचे भागीदार मानण्याची बाबूजींची दृष्टी समाजवादी समाजाकडे वाटचाल करणारी होती. बाबूजींनी आपल्या या

कालावधीत स्वतंत्र भारतातील कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग आखला व त्या दृष्टीने पावले टाकली. कामगार-क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे ऋण सर्वांना नेहमीच मान्य करावे लागेल.

१९५२ ते आजपर्यंतच्या कालावधीत बाबूजींनी संचार, रेल्वे, अन्न व कृषी आणि संरक्षण, आदी खाती सांभाळली, त्यांच्या अनुभवाचा व कार्यकुशलतेचा फायदा या खात्यांनी हाती घेतलेल्या योजनांना झाला. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट बाबूजींच्या कार्यात दिसून येते, ती ही, की प्रत्येक ठिकाणी देशाला स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी उचललेली पावले व त्या यशस्वी होण्यासाठी जिद्दीने व कौशल्याने केलेले प्रयत्न. त्यांच्याकडे जी जी खाती होती, त्यांत त्यांचा सुधारणेचा दृष्टिकोन होता. कार्यात व कार्यक्रमात तडफ होती.

स्वतंत्र भारताच्या सरकारात देशाच्या विकासासाठी, कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी कामे केली. परंतु हे करीत असताना हरिजनांना न्याय मिळेल, असे प्रयत्नही त्यांनी केले. एका अर्थाने शासकीय पातळीवर त्यांनी केलेले कार्य सामाजिक व आर्थिक सुधारणावादाचे प्रत्यक्ष कार्य आहे. ते करण्यासाठी लागणारी सामाजिक दृष्टी, तळमळ आणि प्रशासकीय कौशल्य त्यांच्याजवळ आहे, हे त्यांनी सिद्ध केले. १९६९ च्या काँग्रेस विभाजनानंतर त्याच वर्षी मुंबईत डिसेंबरमध्ये भरलेल्या ऐतिहासिक राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले मार्गदर्शन व १९७१ च्या बांगला देशाच्या स्वातंत्र्य-संग्रामाच्या वेळचे संरक्षणमंत्रिपद ही त्यांच्या जीवनातील दोन महत्त्वाची अभिमानस्थाने आहेत.

साधेपणा, बुद्धीची तीक्ष्णता, पण स्वभावातील गोडवा, ही बाबूजींच्या व्यक्तित्वाची लक्षणीय वैशिष्ट्ये आहेत. एका साहित्यिकाने त्यांची तुलना रानफुलाशी केली आहे. ती बोलकी आहे. त्यांच्या वाणीवर व भावपिंडावर संत वाङ्मयाचे संस्कार झालेले आहेत. पं. मदनमोहन मालवीय यांच्या तेजस्वी, पण शीतल अशा व्यक्तित्वाचा संस्कार त्यांच्यावर लहानपणी झाला. गांधीजींची महतीही त्यांनी तरूणपणी जाणली. गांधीजीही त्यांना 'अमूल्य रत्न' मानीत. या सर्वांचा बाबूजींच्या जीवनदृष्टीवर, विचारांवर, कृतीवर परिणाम झाला आहे.

# २ ५... काकासाहेब गाडगीळ

श्री. काकासाहेब गाडगीळांना आपल्यामधून जाऊन बरीच वर्षे झाली. आज त्यांच्यासंबंधीची माझी स्मृती आदरपूर्वक चाळवण्यासाठी म्हणून मी हे लिहीत आहे. या निमित्ताने त्यांच्या संगतीत काही काळ घालविल्याचा आनंद पुन्हा मिळणार आहे. काकासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू होते. उत्कृष्ट वक्तृत्व, सुबोध लोकशिक्षणात्मक लेखन, ग्रंथकर्ते, राज्यकर्ते अशा विविध स्वरूपांत त्यांचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रातील जनतेपुढे आहे आणि या सर्व क्षेत्रांत त्यांनी ज्या सहजतेने आणि कुशलतेने कार्य केले आहे, ते पाहिले, म्हणजे त्यांच्या यशस्वी जीवनाचा अर्थ समजू लागतो.

माझ्या त्यांच्यासंबंधीच्या आठवणी स्वाभाविकच राजकीय क्षेत्रातील आहेत, आणि त्या आठवणींचा काळही मोठा पल्लेदार आहे, आणि तो म्हणजे १९३० पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत. माझ्या त्यांच्यासंबंधीच्या आठवणी माझ्या विद्यार्थिदशेपासून ऐन कर्तेपणाच्या दिवसापर्यंतच्या आहेत आणि त्या आठवणी अगदी ताज्या टवटवीत आहेत. त्यांना मी प्रथम पाहिले, ती आठवण सांगतो. १९३० च्या देशभक्तीने भारलेल्या दिवसांत आमच्या कराडला नामवंत पुढारी प्रचारासाठी येऊन जात असत. अशाच एका संध्याकाळी काकासाहेबांना मी कराडच्या सभेत बोलताना प्रथम पाहिले आणि ऐकले. कृष्णा-घाटावर सभेसाठी तुडुंब गर्दी झाली होती, त्या दिवसांत ध्वनिक्षेपणाची व्यवस्था नसल्यामुळे आवाज उंचावून बोलावे लागत असे. काकासाहेब बोलावयास उठले आणि सभेला जमलेल्या समुदायाच्या शेवटच्या टोकावर नजर पोहोचेना, तेव्हा ते समोरच्या टेबलावर चढले व टेबलावर उभे राहून त्यांनी भाषण केल्याचे मला स्मरते. भाषणात देशभक्तीचे आवाहन होते, नर्म विनोद होता, खट्याळ उपरोध पण होता. ब्रिटिश राज्यावर मर्मभेदी टीका होती. एक तासभर त्यांच्या वक्तृत्वाच्या ओघात आम्ही वाहून गेलो होतो, असे म्हटले, तरी चालेल आणि मनात कुठेतरी खोलवर या शैलीपूर्ण वक्तृत्वाची व व्यक्तीची कायमची नोंद झाली.

योगायोग असा, की काकासाहेबांच्या या भाषणासाठी त्यांना परत

कराडलाच कोर्टात आरोपी म्हणून यावे लागले. स्वाभाविकच व्याख्यानामुळे भरलेला खटला ऐकण्यासाठी आम्ही सर्व तरूण मुलांनी कोर्टात खच्चून गर्दी केली होती. कोर्टाचे काम तसे फार वेळ चालले नाही. कारण प्राथमिक जुजबी स्वरूपाचा सरकारी पुरावा झाल्यानंतर काकासाहेबांना जेव्हा स्वतःचे निवेदन करण्याची वेळ आली, तेव्हा ते उठून उभे राहिले. त्यांच्या लकबीप्रमाणे त्यांनी डोळ्यांवरचा चश्मा काढला व तो पुसत-पुसत मॅजिस्ट्रेटला दोन वाक्यांत सांगितले की, 'हे भाषण मी जरूर केले आहे आणि पुन्हा प्रसंग पडल्यास हेच भाषण करीन.' त्या वेळी खटल्याची कामे यंत्राप्रमाणे चालत, काकासाहेबांच्या या निवेदनानंतर मॅजिस्ट्रेटनी त्यांना सहा महिन्यांची शिक्षा सुनावली. कोर्टात वकिलीची कामे संपल्यानंतर ते ज्या घाईगर्दीने वकील म्हणून बाहेर पडत असतील, तितक्याच घाईगर्दीने, निकाल ऐकल्यानंतर तुरूंगाच्या खोल्यांकडे, जशी काही ठरलेली अपॉईंटमेंट पार पाडायची आहे, अशा घाईने ते निघून गेले. हे सर्व माझ्या मनाने अगदी टिपून घेतले. नाही म्हटले, तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काहीसे आकर्षण तेव्हाच्या तरूण पिढीला होते. माझ्यावरही परिणाम होता, ही माझी काकांच्याबद्दलची पहिली आठवण आहे.

त्यानंतर त्यांना मी अनेक वेळा भेटलो. श्रोता, कार्यकर्ता, तरूण सहकारी आणि पुढे मित्र या सर्व परिस्थितींत काकांच्याबद्दल वाटणारे माझे आकर्षण कमी झालेले नाही, त्याला कारणेही आहेत.

भारताच्या राजकीय जीवनात जनआंदोलनांनी देशाला बरेच नवे नेते दिले. १९३० च्या आंदोलनाने काकासाहेब गाडगीळ महाराष्ट्राला मिळाले आणि त्यानंतरच्या पंधरा-वीस वर्षांत महाराष्ट्राचे ते कर्ते राजकीय नेते होते व अखेरपर्यंत एक वडिलधारे मान्यवर म्हणून त्यांची बूज राहिली. १९३० साल हे महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या दृष्टीने फार महत्त्वाचे यामुळे आहे की, या आंदोलनाच्या काळात महाराष्ट्र कॉंग्रेस खऱ्या अर्थाने ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचली. कॉंग्रेसचे नाव व गांधीजींबद्दलचा पूज्यभाव ग्रामीण जनतेपर्यंत यापूर्वीच पोचला होता, परंतु सक्रिय त्यागपूर्वक भागीदारी करण्यासाठी ग्रामीण भागातील तरूण या वेळी प्रथम फार मोठ्या संख्येने पुढे आला व एका अर्थाने कॉंग्रेसचा कायापालट झाला. हा राजकारणात झालेला महत्त्वाचा बदल ज्यांनी प्रथम हेरला, अशांपैकी काकासाहेब प्रमुख होते. जातीयवादाने पछाडलेल्या जुन्या राजकारणाला नवीन आरोग्यदायी वळण दिले पाहिजे, असा विचार व प्रयत्न करून जनमनापर्यंत पोचणाऱ्या पहिल्या पुढाऱ्यांपैकी काकासाहेब एक

आघाडीचे पुढारी होते. नागरी विभागातही महत्त्वाच्या असलेल्या तरूण वर्गाचे महत्त्व जाणून, त्यांना संघटित करण्याची दूरदृष्टी त्यांना होती. १९३० नंतर ग्रामीण शेतकरी व शहरांतील तरूण या सर्वांना हवेसे वाटणारे व्यक्तिमत्त्व काकासाहेबांच्या रूपाने साकार झाले, ही एक महत्त्वाची घटना मानावी लागेल. या पूर्वीच्या पाच-पंचवीस वर्षांच्या काळात ब्राह्मणब्राह्मणेतर चळवळीची पार्श्वभूमी महाराष्ट्राच्या राजकारणाला होती. ती पुसट करून, त्या जागी एक नवे समजुतीचे व बंधुभावाचे नवीन चित्र रेखाटण्याचे काम करावयाचे होते आणि हे काम साकार करण्याचे ऐतिहासिक श्रेय श्री. काकासाहेब गाडगीळ व केशवराव जेधे या महाराष्ट्राच्या नेतेद्वयाला द्यावे लागेल. श्री. काकासाहेब गाडगीळ व तात्यासाहेब जेधे यांची राजकारणात जोडी होती. या दोघांनी महाराष्ट्राच्या शहराशहरांतून व ग्रामीण भागातून शेकडो सभा एकत्र केल्या आणि राष्ट्रीय विचारांच्या नव्या शक्तीचे पोषण होईल, असे वातावरण महाराष्ट्रात तयार केले. महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक इतिहास पुढेमागे कोणी लिहिला, तर त्यांना तात्यासाहेब जेधे व काकासाहेब गाडगीळ या दोघांच्या कार्याची दखल घेतच पुढे जावे लागेल, इतके हे महत्त्वाचे कार्य आहे.

स्वतःच्या वाणीच्या शक्तीवर आत्मविश्वास असलेला त्यांच्यासारखा राजकीय पुढारी क्वचितच पाहण्यास मिळतो. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे १९३४ साली त्यांनी जिंकलेली मध्यवर्ती असेंब्लीची महाराष्ट्रातील निवडणूक. त्या वेळी असेंब्लीचा मतदारसंघ उत्पन्नाच्या अधिकाराने मर्यादित केलेला होता. आजच्या परिभाषेत बोलावयाचे म्हटले, तर श्रीमंत शेतकरी, सरदार, महाराजे आणि सावकार, व्यापारी यांचाच हा मतदारसंघ होता, असे म्हटले, तरी चालेल. या मतदारसंघापुढे राष्ट्रीय विचार मांडण्याच्या स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून त्यांनी ही निवडणूक लढविली. असंख्य कार्यकर्ते प्रचार करीत होते. महाराष्ट्रातील मानसिक अवस्था जातीयवादाला फारशी अनुकूल नव्हती. या दोन जमेच्या गोष्टी सोडल्या, तर निवडणूक लढविणे अवघड होते. निवडणुकीची साधने कमी होती. विरोधी शक्ती सुसंपन्न व सुसंघटित होत्या, परंतु लोकमताला कौल लावून, आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या सामर्थ्यावर लोकशिक्षण करीत-करीत त्यांनी असे एक वातावरण निर्माण केले, की त्यामुळे पारिजातकाच्या फुलांचा सडा पडावा, तसा मतांचा सडा पडला आणि त्यांनी जे भविष्य वर्तविले होते, ते खरे करून दाखविले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ही निवडणूक म्हणजे एक ऐतिहासिक लढाई होती, असे म्हणावे लागेल. कुशल सेनानी लढाईची रणनीती जशी आखतो, तशी रणनीती आखून निवडणूक कशी लढावी व जिंकावी, याचा तो एक अविस्मरणीय नमुना होता.

या निवडणुकीच्या काळात मी कोल्हापूरला कॉलेजात विद्यार्थी होतो, परंतु प्रचारासाठी मी माझ्या जिल्ह्यात काकासाहेबांबरोबर एक-दोन दिवस फिरलो आहे. त्यांची भाषणे व चर्चा मी ऐकल्या होत्या. हे अनुभव एका अर्थाने नेतृत्वाचे राजकीय शिक्षण घेण्यासारखे होते. या निवडणुकीच्या वेळी, काकासाहेबांनी, निवडून गेल्यावर, पार्लमेंटची बैठक संपल्यानंतर पुन्हा हजर होईन, असे सांगितले होते. त्याप्रमाणे ते आमच्या जिल्ह्यात पुन्हा आले होते. त्याही वेळी मी त्यांच्याबरोबर एक दिवस व रात्र काढली. त्या वेळी झालेल्या गप्पा-गोष्टी मला अजूनही स्मरतात. पार्लमेंटच्या कामाचे त्यांनी सांगितलेले अनुभव व तिथल्या गुंतागुंतीच्या प्रश्नांची केलेली सुलभ मांडणी आजही आठवते. मी त्या वेळी काकासाहेबांना सुचविले होते, की दिल्लीत चाललेल्या या संसदीय कामाची माहिती घेण्याकरिता त्यांनी ग्रामीण भागातील काही मंडळींना निवडून दिल्लीत थोड्या दिवसांसाठी बोलवावे. काकांना ही सूचना पसंत पडली होती व त्यांनी त्याच ठिकाणी दिल्लीला येण्याचे मला निमंत्रणही दिले होते. मात्र त्यांची एक अट होती. दिल्लीला तुम्हांला तुमच्या खर्चाने यावे लागेल. दिल्लीला आल्यावर तेथील व्यवस्था मी करीन. मी त्यांचे निमंत्रण स्वीकारले होते; परंतु दिल्लीला जाणे माझ्या हातून घडले नाही. त्या वेळी ते सहा वर्षे केंद्रीय विधानसभेचे काँग्रेस पक्षाचे चिटणीस होते. माझी जाण्याची इच्छा होती. परंतु जाऊ शकलो नाही, ही गोष्ट खरी आहे. पुढे त्यांनी या सहा वर्षांतील दिल्लीतील संसदीय कामाच्या संबंधाने लिहिलेले नितांत वाचनीय पुस्तक जेव्हा मी वाचले, तेव्हापासून तर, आपण जाऊ शकलो नाही, याची खंत मनाला नेहमीच राहिली.

मी त्या वेळी जरी जाऊ शकलो नाही, तरी तो शब्द मी पुढे बारा वर्षांनी पुरा केला आणि काकासाहेब मध्यवर्ती मंत्रिमंडळाचे सदस्य असताना त्यांच्या घरी दोन दिवस राहून आलो. दिल्लीत त्या वेळी माझ्याप्रमाणेच लहान-मोठे पाहुणे त्यांच्या घरी होते. तिथे असलेल्या अनेक पाहुणे मंडळीत महर्षि अण्णासाहेब कर्वेही होते. लोकसंग्रहाची भाषा टिळकांच्या परंपरेतील माणसे बोलतात खूप, परंतु त्यासाठी काढाव्या लागणाऱ्या खस्ता काकासाहेब आणि त्यांच्या पत्नी

यांना प्रत्यक्ष काढताना मी पाहिले आहे. काकांचे घर तेव्हाचे 'महाराष्ट्र सदन' होते, असे म्हटले, तरी चालेल. काकासाहेबांना कार्यकर्त्यांसंबंधी खराखुरा जिव्हाळा होता, याचा मी अनुभव घेतला आहे.

काकासाहेब गाडगीळ हे पिंडाने मूलतः लोकशिक्षक होते. त्यांची वाणी आणि लेखणी या दोन्ही माध्यमांतून त्यांनी हे कार्य पहिल्यापासून अखेरीपर्यंत अखंडपणे केले. काकासाहेबांची ग्रंथसंपत्ती विपुल आहे. काही शास्त्रीय विषयांवर पहिल्या प्रथम ग्रंथलेखन करण्याचे काम काकांनी केले. ग्यानबाचे अर्थशास्त्र, समाजशास्त्र वगैरे ग्रंथ हे त्याचाच पुरावा आहेत. वक्तृत्वाच्या बाबतीतही हीच गोष्ट होती. स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी इंग्रजांविरूद्ध शस्त्र म्हणून वाणी वापरली. परंतु ते करीत असताना त्यांनी लोकशिक्षणही केले आणि हीच प्रथा मंत्रिमंडळात असताना व नसतानाही त्यांनी कायम ठेवली होती. पंजाबचे राज्यपाल म्हणून थोडी वर्षे काम केल्यानंतर परत ते जेव्हा महाराष्ट्रात आले, तेव्हा त्यांनी पुन्हा महाराष्ट्रात गावोगाव जाऊन निर्भीडपणे आपले विचार मांडण्याची प्रथा सुरू केली. या वेळेपर्यंत मी दिल्लीत पोचलो होतो व त्यांची व माझी एकदा दिल्लीस भेट झाली, तेव्हा त्यांना मी त्यांचे हे प्रचाराचे कार्य कसे चालले आहे; असे सहज विचारले. त्यांनी वापरलेला एक शब्द माझ्या कानांत अजूनही घुमतो आहे, ते म्हणाले,

'आता प्रचारकार्याची भूमिका राहिली नाही, तर आता माझी वाणी-यात्रा चालू आहे.'

लोकशिक्षणावर श्रद्धा असणारा काकासाहेबांसारखा माणूसच अशी 'वाणी-यात्रा' करू शकतो.

ते मंत्रिमंडळात असताना अनेक राजकीय घडामोडी होत होत्या, आणि काकासाहेब त्यांतील आपला योग्य हिस्सा हुशारीने पार पाडीत होते. त्यांच्याशी त्या काळात झालेल्या संभाषणावरून त्या वेळच्या परिस्थितीत त्यांच्या मनाचा व वैयक्तिक संबंधांचा झुकता कल सरदार पटेलांकडे होता. परंतु पं. जवाहरलाल नेहरूंचे व त्यांचे संबंध आपुलकीचे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात घडलेल्या रामायणात काकासाहेबांचा म्हणून काही एक अध्याय आहेच. दिल्लीतील नेतृत्वापासून मानसिक अंतर होते आणि संघटनात्मकदृष्ट्या ते काहीसे एकाकी होते. तरी त्यांनी आपले विचार पार्लमेंटमध्ये व बाहेर अत्यंत स्वच्छपणे मांडण्यात कुचराई केली नाही. १९६० सालच्या संयुक्त महाराष्ट्राच्या रचनेच्या काळात काकासाहेबांशी

झालेली मसलत माझ्या उपयोगी पडली. ही गोष्ट मी नमूद केली पाहिजे.

काकासाहेबांची माझी शेवटची भेट अलाहाबादच्या विमानतळावर झाल्याचे स्मरते. पाकिस्तानशी १९६५ साली झालेल्या युद्धानंतरचे दिवस होते. मी अलाहाबादला आलो होतो व काकासाहेब अलाहाबाद सोडत होते. मला पाहताच, विमान सुटण्याची घाई असतानाही, बाजूला जाऊन काही मिनिटे उभे राहिले. त्या वेळी घडत असलेल्या घडामोडी काहीशा मी त्यांना सांगितल्या. काकासाहेब आनंदात होते. हिंदुस्थानच्या जवानांनी केलेल्या पराक्रमाचा त्यांना अभिमान वाटत होता.

'... असेच होईल, असे मला वाटत होते. पण झाले नसते, तर...', त्यांच्या हातातील काठी दाखवीत ते म्हणाले, 'हे तुमच्यासाठी ठेवले होते.'

हे म्हणताना त्यांचे घारे डोळे हसत होते. खांद्याची एक वैशिष्ट्यपूर्ण हालचाल होत होती.

मी मनापासून हसलो आणि म्हटले,

'काका, तुमचा तो अधिकार आहे.'

'अच्छा, आशीर्वाद. पुन्हा भेटू..' असे म्हणाले व घाईघाईने विमानाकडे चालत गेले.

मी त्यांची पाठमोरी, पण वेगाने चालणारी आकृती पाहत किंचित काळ उभा राहिलो. त्यावेळी शंकाही आली नाही, की ही त्यांची- माझी शेवटचीच भेट आहे.

काही आठवड्यांनंतर ताश्कंदहून स्व. शास्त्रीजींचा देह घेऊन आम्ही परत आलो. देशात दु:खाची एकच लाट उसळली होती. त्याच दिवसांत पुण्याहून बातमी आली,

'काका आम्हांला कायमचे सोडून गेले.'

# २६... दादासाहेब कन्नमवार

दादासाहेब कन्नमवारजींनी आपल्या या महाराष्ट्रातील जनतेची जी अहोरात्र निष्ठेने सेवा केली, तिच्याबद्दल माझ्याच काय, पण सर्वांच्या मनांत अशी कृतज्ञतेची भावना आहे. या लहानशा लेखाच्या रूपाने आपली ही भावना आपण अल्पशा प्रमाणात व्यक्त करीत आहोत, असे मी म्हणेन.

कन्नमवारजीचे नाव जरी मी अनेक वर्षांपासून ऐकत होतो, तरी त्यांचा व माझा प्रत्यक्ष असा संबंध तसा अलीकडील काही वर्षांतच आला. तथापि, या संबंधाचे गाढ स्नेहात रूपांतर होण्यास वेळ लागला नाही आणि त्याचे श्रेय मी कन्नवारजींच्या ऋजू व मनमिळाऊ स्वभावास देतो. महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी व मी सहकारी म्हणून काम केले. त्यांच्याबरोबर काम करण्याची मला ही जी संधी मिळाली, ते मी खरोखरीच माझे भाग्य समजतो. कारण सर्वार्थाने एक लोकनेता कसा वागतो, कसे काम करतो, हे पाहण्याचा योग त्यामुळे मला आला. अतिशय शांतपणे, अबोलपणे आणि कामाची थोडीसुद्धा जाहिरात न करता काम करण्याची कन्नमवारजींना जी विलक्षण हातोटी साधली होती, ती खरोखर अनुकरणीय अशीच होती. गांधीजींवर त्यांची असीम निष्ठा होती आणि गाजावाजा न करता सेवाभावाने काम करीत राहण्याची ही वृत्ती गांधीजींच्या उदाहरणानेच त्यांनी आपल्या अंगी बाणवली होती.

कन्नमवारजींच्या ठिकाणी जे अनेक गुण होते, त्यांत त्यांची लोकसंग्राहक वृत्ती हा विशेष ठळक असा गुण होता, असे मी म्हणेन. मुंगी जशी साखरेचा एक एक कण गोळा करते, तसे कन्नमवारजी अत्यंत गुणी व सेवाभावी माणसे गोळा करीत आणि अशा माणसांची एक मालिकाच त्यांनी जमविली होती. विदर्भामध्ये त्यांच्याबरोबर गेलो असताना हा अनुभव मला प्रकर्षाने आला. कार्यकर्त्या मंडळींचा गराडा त्यांच्याभोवती नेहमी पडलेला असायचा. तसेच, ते लोकांत अगदी मनमोकळेपणाने मिसळत असत आणि लोकही त्यांच्यापाशी आपली सुखदुःखे हलकी करीत. कारण लोकांच्या कल्याणाविषयी त्यांच्या अंतःकरणात अपार कळकळ होती. त्यांचे अश्रू पुसण्यात त्यांचा हात नेहमीच

पुढे असे.

महाराष्ट्र राज्य झाले आणि मार्गालाही लागले. या महाराष्ट्र राज्याच्या उभारणीत ज्यांनी फार महत्त्वाचा वाटा उचलला, त्यांच्यामध्ये मी कन्नमवारजींचा प्रामुख्याने समावेश करतो. महाराष्ट्र याबद्दल त्यांचा सदैव ऋणीच राहील. अगदी गरिबीच्या व हलाखीच्या परिस्थितीत त्यांचा जन्म झाला. त्यांनी निष्ठा व सेवावृत्ती यांच्या जोरावर राज्याच्या मुख्यमंत्रिपदापर्यंत मजल मारली, हे आमच्या तरूणांना खात्रीनेच उद्‌बोधक व मार्गदर्शक वाटेल, असा मला भरवसा वाटतो.

## २७... नाना पाटील

मी काही महिन्यांपूर्वी सांगली जिल्ह्यात गेलो होतो. तेव्हा वाळवे येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांची व माझी गाठभेट झाली. त्या वेळी, त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता व तेजस्विता पाहून मी प्रभावित झालो. आज त्यांचे शरीर दुर्बल झाले असले, तरी त्यांचे मन पूर्वीसारखे उत्साही दिसून आले.

वाळवे तालुक्यातील येडे-मच्छिंद्र या गावी त्यांचा ३ ऑगस्ट, १९०० रोजी जन्म झाला. सार्वजनिक कामाच्या ओढीमुळे त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. १९३० सालच्या असहकार चळवळीत, दांडीच्या मीठ-सत्याग्रहात, तसेच, बिळाशीच्या जंगल-सत्याग्रहात त्यांनी पुढाकार घेतला. पुढे त्यांना याबद्दल कारावासही भोगावा लागला. १९४२ चा लढा म्हणजे स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासातील एक सोनेरी पान! नानांनी हा लढाही गाजवून सोडला. चव्वेचाळीस महिने त्यांनी भूमिगत राहून ब्रिटिश सरकारला नामोहरम केले व भूमिगत चळवळ प्रभावीपणे चालविली. त्या वेळी, त्यांना ग्रामीण जनतेनेच अधिकतर सांभाळून घेतले. कारण ते दुर्बलांचे वाली आहेत. गरिबांबद्दलचा जिव्हाळा, त्यांच्या उत्कर्षासंबंधी तळमळ यांसाठी त्यांनी चळवळ सुरू केली होती. १९४२ च्या लढ्याच्या क्रांतीमागची त्यांची प्रेरणा दुर्बल लोकांच्या मुक्तीचीच होती. नुसते भारताला स्वातंत्र्य मिळावे, म्हणून ते भारले गेले नव्हते, तर त्यांना सामाजिक पुनरूत्थानाची निकड जाणवत होती आणि यासाठी ते प्रयत्नशील होते आणि आजही आहेत. राजकारणात पडण्याअगोदर ते सत्यशोधक होते. लग्नासाठी खर्च कमी व्हावा, म्हणून त्यांनी एक सामाजिक चळवळ सुरू केली होती.

१९४२ च्या लढ्यात केलेल्या उठावामुळे ते सातारा जिल्ह्यात अतिशय लोकप्रिय झाले. त्यांना पाहिले, की शेतकऱ्यांपैकी लहानापासून ते थोरापर्यंत सर्व त्यांच्या नावाचा जयजयकार करीत. परंतु त्याच वेळी गरिबांची पिळवणूक करणाऱ्या सावकारांचा मात्र थरकाप होत असे. या लढ्यातील कर्तृत्वामुळे त्यांचा महाराष्ट्रात दबदबा वाढला. त्यांच्या वक्तृत्वाची एक ढंगदार शैली आहे. ही शैली ग्रामीण जीवनातील जिव्हाळ्याच्या अनुभवांनी घडलेली आहे.

जिव्हाळा, तळमळ, निर्भयता, स्पष्टवक्तेपणा, कुणाला न झोंबणारा पण विषय स्पष्ट करणारा विनोद, हे त्यांच्या वक्तृत्वाचे गुणविशेष ! कोणतीही सभा ते सहजासहजी जिंकतात.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जीवनाचा अभ्यास, त्यांनी केलेल्या कार्याची ओळख आजच्या विद्यार्थी वर्गाला, तरूण पिढीला होणे आवश्यक आहे. आज स्वातंत्र्योत्तर काळातही नानांनी आपले जनसेवेचे व्रत अखंडपणे पुढे चालू ठेवले आहे. त्यांची जिद्द व मनाचा दमदारपणा या वयातही प्रकर्षाने जाणवतो, कर्तव्यपूर्तीचा आनंद हा एक जीवनातील महत्त्वाचा निकष मानला, तर नियतीने त्यांच्या पदरात यशाचे भरपूर माप टाकले आहे. कर्तव्यपूर्तीचा आनंद उपभोगण्यासाठी त्यांना परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो, हीच प्रार्थना !

# २८... एस्. एम्. जोशी

श्री. एस्. एम्. जोशी एक्याऐंशी वर्षांचे झाले, असे जेव्हा मला श्री. मधु दंडवते यांनी लिहिले, तेव्हा मला सानंद आश्चर्य वाटले. आनंद अशासाठी, की एक्याऐंशी वर्षांचे होऊनसुद्धा एस्. एम्. कृतिशील आहेत; आणि आश्चर्य यासाठी, की गेली कित्येक वर्षे मी एस्. एम. ना पाहतो आहे, त्यात काही फरक नाही. म्हणून ते एक्याऐंशी वर्षांपर्यंत पोहोचले, याची कल्पनाही माझ्या मनात आली नाही.

एस्. एम्. यांच्या व्यक्तित्वाचा पहिला परिचय मला झाला, तो १९३२ साली, तुरूंगामध्ये. जेव्हा जेलमध्ये मी त्यांना काम करताना, बोलताना पाहिले, तेव्हा माझ्या मनात जो ग्रह झाला. की हे एक स्फटिकासारखे स्वच्छ व्यक्तिमत्त्व आहे. तोच ग्रह आजही माझ्या मनात कायम आहे.

गेल्या पन्नास वर्षांत एस्. एम्. नी अनेक चळवळींत भाग घेतला आहे. राजकारणाच्या दिशा त्यांनी अधूनमधून बदलल्या. सुरूवातीला ते कॉंग्रेस सोशालिस्ट झाले. त्यानंतर ते प्रजा सोशालिस्ट झाले आणि नंतर ते जनता पक्षात गेले. त्यांच्या पक्षांची नावे कितीतरी बदललेली असली, तरी एस्. एम्. जे एस्. एम्. होते, तेच आज आहेत. सर्व राजकीय प्रवासात एस्. एम्. चे व्यक्तिमत्त्व कायम राहिले. ते अनुभवाने मोठे झाले असतील व आता वयानेही मोठे झाले आहेत. पण विचाराने ते पहिले मोठे होते, तसे ते आजही आहेत. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात फार थोडी माणसे अशी आहेत, की ज्यांच्याबद्दल कोणत्याही परिस्थितीत आदर वाटावा. एस्. एम्. यांमध्ये अग्रगण्य आहेत.

एस्. एम्. चा माझा प्रत्यक्ष विरोधाचा संबंध आला, तेव्हा ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत नेतृत्व करीत होते. महाराष्ट्रात त्याच वेळी झालेल्या निवडणुकीत आम्ही उभयता विधानसभेत निवडून गेलो आणि मी द्वैभाषिक मुंबई राज्याचा मुख्यमंत्री झालो, तेव्हा एस्. एम्. विरोधी पक्षाचे नेते झाले. ते संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे एका वर्षाकरिता नेता निवडले गेले होते. समितीने

दरवर्षी वेगळा वेगळा नेता विधानसभेत निवडावा, अशी पद्धत सुरू केली होती.

परंतु एस्. एम्. जेव्हा नेते होते, तेव्हा चळवळ अत्यंत तीव्र झालेली होती व काही प्रमाणात तीमध्ये कटुता आली होती. माझ्या आठवणीप्रमाणे सभागृहाबाहेरील तीव्रता व कटुता या दोन्ही सभागृहात न आणता त्यांनी केवळ तीव्रता आणली व कटुता बाहेरच ठेवली. त्यामुळे माझ्या मनात त्यांच्याबद्दल मूलतःच असलेला आदर अधिकच वाढला आणि पुढे ते जेव्हा विरोधी पक्षाचे नेते राहिले नाहीत, तेव्हा माझ्यासाठी तेच विरोधी पक्षाचे नेते आहेत, असे समजून चाललो होतो.

संयुक्त महाराष्ट्र मिळावा, याबाबत दोघांचे एकमत होते, मार्ग भिन्न होते. त्यामुळे त्यांच्याशी संबंध ठेवण्याची मला कसलीच अडचण वाटत नव्हती. मी काही प्रसंगी त्यांना मुद्दाम बोलावून त्यांच्याशी चर्चा केली व त्या चर्चेचा मला उपयोगही झाला, असा माझा अनुभव आहे. एस्. एम्. हातचे राखून बोलत नाहीत. जे मनात असेल, ते सरळ व स्पष्ट सांगून टाकतात. त्यामुळे त्यांच्याशी झालेले संभाषण प्रसंगी हितकारकच ठरले आहे. पुढे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या कालखंडात मी अनेक खासगी गोष्टीही त्यांच्याशी बोलू शकलो आज त्यांना त्याची आठवण आहे, की नाही, मला माहीत नाही.

आम्ही एकमेकांविरूद्ध भाषणे केली, विचारांवर टीका केल्या, पण हे सर्व चळवळीच्या संदर्भात होते. सभागृहात एकमेकांविरूद्ध बोललो आहोत. परंतु ज्या वेळी संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, त्या १ मे १९६० रोजी जीपमध्ये शेजारी उभे राहून गिरणगाव, लालबाग भागांत दुतर्फा उभ्या असलेल्या सहस्त्र लोकांचे अभिनंदन आम्ही एकत्र स्वीकारले आहे. ती एक मजेदार आठवण आजही लक्षात आहे.

महाराष्ट्रात समाजवादी विचारांचा स्वीकार काँग्रेस चळवळीत ज्यांनी केला, त्या पिढीतील एस्. एम्. आहेत. त्यांनी राष्ट्र सेवा दल संघटित केले व समाजवादाचे संस्कार घडविले, अशी अनेक माणसे आज भेटतात, तेव्हा अनेक उबदार आठवणी सांगतात. विशेषतः, 'अण्णांबद्दल' - म्हणजे एस्. एम्. बद्दल ते ज्या कृतज्ञतेने व आदराच्या भावनेने बोलतात, ते पाहिले, म्हणजे असे वाटते की, एस्. एम्. च्या जीवनाचे सार्थक झाले. महाराष्ट्रात समाजवादी विचारांना प्रतिष्ठा आली. पण समाजवादी संघटना मूळ धरू शकल्या नाहीत, अशी आजची परिस्थिती आहे. कामगार-चळवळीतील संधीसाधू नेतृत्वाची

पद्धती पाहिली, म्हणजे कधी निराशा वाटते. शेतमजूर, कामगार व तरूण यांमध्ये समाजवादी निष्ठा म्हणजे निव्वळ विचारातील निष्ठा नव्हे, तर प्रत्यक्षात समाजपरिवर्तनात त्याचा शेवट झाला पाहिजे, अशा निश्चयाच्या संघटना करणे याची जाणीव समाजवाद बोलणाऱ्या मंडळींना असणे आवश्यक आहे. परंतु हे आज घडत नाही. हा कुणाचा दोष आहे, याची आज चर्चा करणे अवघड आहे.

एस्. एम्. नी जसे मुंबई असेंब्लीत काम केले, तसेच, लोकसभेतही काम केले आहे. लोकसभेच्या कामात ते अधूनमधून भाग घेत असत; परंतु त्यात त्यांनी फारसा रस घेतला, असे मला दिसले नाही. त्यांनी निवडणुका कधी जिंकल्या, कधी हरल्या, पण या यशापयशाच्या कल्पनेच्या पलीकडे ते गेले आहेत, असे मी पाहिले आहे. एस्. एम्. च्या जीवनात त्यांची साथ करणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. ताराबाई यांना त्यांच्या जीवनातील यशाचे मोठे श्रेय दिले पाहिजे.

आज एस्. एम्. एक्याऐंशी वर्षांचे झाले आहेत. प्रार्थना करू या, की ते जास्तीत जास्त जीवन यशस्वी रीतीने जगतील आणि महाराष्ट्राच्या व देशाच्या सामाजिक जीवनातील कर्तृत्ववान माणूस म्हणून प्रकाशात राहतील.

## २९... वसंतराव नाईक

श्री. वसंतराव नाईकांच्या एकसष्टीनिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन करताना गेल्या दहा वर्षांत त्यांनी ज्या कौशल्याने, धीराने व कल्पकतेने महाराष्ट्र राज्याची धुरा वाहिली, त्याची आठवण साहजिकच होते. महाराष्ट्र शासनाचा लौकिक त्यांनी सांभाळला, एवढेच नव्हे, तर वाढविला, असे निश्चित म्हणता येईल. माझे सहकारी म्हणून व महाराष्ट्र शासनाचे प्रमुख म्हणून माझा जो निकटचा संबंध आला, त्या अनुभवावरून मी हे म्हणत आहे.

माझे स्नेही आणि सहकारी श्री. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्र राज्याची धुरा गेली बारा वर्षे अत्यंत कार्यक्षमतेने, समर्थपणे आणि शक्यतो सर्वांना बरोबर घेऊन यशस्वीपणे सांभाळली आहे. वसंतरावांच्या आजवरच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात देशावर आणि विशेषतः महाराष्ट्रावर अनेक नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटे आली, अगदी 'न भूतो' अशाही आपत्ती आणि विपत्ती आल्या. परंतु या सर्वांवर वसंतरावांनी झुंजारपणे, मोठ्या जिद्दीने व यशस्वीपणे मात केली आणि महाराष्ट्राला सुखरूपपणे त्यातून निभावून नेले.

एक यशस्वी शासनकर्ता या नात्याने आवश्यक असलेले गुण तर त्यांच्या अंगी आहेतच; पण शिवाय एक माणूस म्हणूनही त्यांच्या अंगी जी मनाची ऋजुता, सहृदयता, उमदेपणा, शौर्य, चिकाटी, जिद्द, व्यवहारी दृष्टी आणि कष्ट उपसण्याची तयारी आहे, त्या त्यांच्या गुणांचाही त्यांच्या शासकीय यशस्वितेत फार मोठा वाटा आहे, असे मला वाटते. वसंतरावांच्या लेखी सर्व राजकीय व सामाजिक सुधारणेचा केंद्रबिंदू मनुष्य हा राहिला आहे. म्हणूनच वसंतरावांनी महाराष्ट्रातील जनतेवर अपार प्रेम केले. या महाराष्ट्राचा, त्यातील जनतेचा वसंतरावांना अत्यंत सार्थ असा अभिमान आहे. ते एके प्रसंगी म्हणतात, 'महाराष्ट्रातील जनता, मग ती कुठल्याही भागातील असो, अत्यंत प्रेमळ आहे, अत्यंत कर्तृत्ववान आहे, देशभक्त आहे, अत्यंत स्वाभिमानी आहे आणि आलेल्या कोणत्याही संकटाशी आत्मविश्वासाने मुकाबला करण्यास समर्थ आहे.' महाराष्ट्राने आपली सर्व सुप्त शक्ती उपयोगात आणली, तर महाराष्ट्रासारखे संपन्न असे दुसरे कोणतेही राज्य राहू शकणार नाही, असा

त्यांचा दुर्दम्य विश्वास आहे.

श्री. वसंतरावजींचा पिंड शेतकऱ्याचा आहे. मातीचा सुगंध किंवा पिकांचा बहर त्यांना सर्वांत अधिक सुखद वाटतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सुज्ञता व समयज्ञता आहे. राजकारणातही त्यांच्या या गुणांचा उपयोग झाला आहे. उच्च शिक्षणाच्या संस्कारामुळे प्रशासनात लागणारी सफाई त्यांच्याजवळ आहे. ग्रामीण प्रश्नांची त्यांची जाणीव सखोल आहे. तसेच, नागरी जीवनाचे प्रश्नही ते चपखलतेने समजतात आणि सोडवितात. उत्तम गृहस्थ व शहाणा शासक या शब्दांनी मी त्यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटेन. वसंतरावांमध्ये असलेली निरहंकारी वृत्ती, हाती घेतलेल्या कार्यासंबंधी त्यांना सदोदित लागून राहणारी तळमळ आणि कोणत्याही परिस्थितीत ते कार्य पार पाडण्यासाठी लागणारा मनाचा खंबीरपणा यांमुळे त्यांचा जनतेशी निकटचा संपर्क आहे; आणि या गुणांमुळे ते जनतेच्या सुखदुःखांशी किती समरस होतात, ते दुष्काळाचे वेळी प्रकर्षाने दिसून आले.

श्री. वसंतरावजी जसे एक राजकारणी पुरूष आहेत, तसेच, ते आपल्या वैयक्तिक जीवनात एक प्रेमळ पिता, सहृदय मित्र व चोखंदळ रसिक आहेत, वसंतरावजींच्या आजच्या लोकप्रियतेत व यशात त्यांच्या सुविद्य, प्रेमळ व कर्तबगार पत्नी सौ. वत्सलाबाई यांचा मोठा वाटा आहे.

राज्यकर्ता या नात्याने त्यांनी विविध प्रसंगी, विविध परिस्थितींत व विविध थरांतील जनतेसमोर वेळोवेळी आपल्या भाषणात व लेखनात जे विचार प्रकट केले, त्या सर्वांचा केंद्रबिंदू म्हणजे महाराष्ट्रीय माणूस हाच आहे. त्याच्यातील आत्मविश्वास, कर्तृत्व, स्वाभिमान, जिद्द जागृत करून, त्याला कार्यप्रवृत्त करावयाचे व तसे करताना सर्व थरांतील जनतेमध्ये स्नेहभाव व बंधुभाव कसा जागा होईल, हे पाहावयाचे, सामाजिक सत्तेच्या प्रस्थापनेला त्याला प्रवृत्त करावयाचे, हे उद्दिष्ट वसंतरावांनी आपल्यासमोर सदैव ठेवलेले होते. त्यांचे विचार अगदी स्पष्ट आहेत व ते तितक्याच रोखठोकपणे, परंतु कोणाला न दुखविता व्यक्त करतात. आडवळणाने बोलणे त्यांना जमतच नाही. कारण त्यांच्या स्वभावातील सरळपणा, कोणालाही हेवा वाटावा, अशी ऋजुता! महाराष्ट्रातील जनता सुविचारी, सुसंस्कृत, संपन्न कशी होईल आणि महाराष्ट्र अवघ्या देशालाच कसा मार्गदर्शक होऊन राहील, याचाच निदिध्यास वसंतरावांनी सदैव बाळगला आहे. जनतेच्या भौतिक कल्याणाच्या विविध बाजूंचे त्यांनी सदैव चिंतन आणि मनन केले आहे. महाराष्ट्र संपन्न आणि सुखी

करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यक्रमाचा आराखडाच जणू त्यांच्या मनश्चक्षूंसमोर सदैव तरळत आहे, असे दिसते.

१९७१ ते १९७३ या तीन वर्षांतील निरनिराळ्या प्रसंगी श्री. वसंतराव नाईक यांनी केलेली भाषणे आणि लेख संगृहीत केलेले 'समृद्धीच्या वाटा' हे पुस्तक माझ्या वाचनात आले. महाराष्ट्र राज्याचे सूत्रधार या नात्याने वसंतरावांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा किती बारकाईने आणि आत्मीयतेने विचार केला आहे, हे या भाषणांवरून दिसून येते. ही भाषणे विविध प्रसंगी केलेली असल्यामुळे त्या त्या काळच्या विशिष्ट परिस्थितीचा संदर्भ अर्थातच त्यांना लाभला असला, तरी त्यांतून व्यक्त झालेले विचार केवळ प्रासंगिक महत्त्वाचे नसून, वसंतरावांच्या प्रगल्भ मनाचा आणि चिंतनशीलतेचा परीसस्पर्श लाभलेले ते सुवर्णकण आहेत.

'समृद्धीच्या वाटा' वसंतरावांनी आपल्यापरी दाखविल्या आहेत. आता त्यांचा मागोवा घेऊन, त्यांत अधिक भर घालण्याचे काम जनतेचे आहे आणि या जनतेवर वसंतरावांप्रमाणेच माझाही संपूर्ण विश्वास आहे.

# ३०... तुळशीदास जाधव

श्री. तुळशीदासजी जाधव हे, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य-सैनिकांत अग्रगण्य मानले जावे, या तोलाचे कार्यकर्ते आहेत. १९३० साली सोलापूर येथे मार्शल लॉ पुकारला होता, त्यावेळी गांधीटोपी घालून रस्त्यावर येणे म्हणजे साक्षात मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे होते. हे धैर्य तुळशीदासांनी सोलापुरात दाखविले आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या बलिष्ठपणाचे आव्हान स्वीकारले. हे मी त्या वेळी माझ्या शाळकरी जीवनात वर्तमानपत्रात वाचले होते. तेव्हापासून या माणसाच्या धैर्य व देशभक्तीबाबत आदर व कुतूहल निर्माण झाले.

पुढे त्यांची माझी भेट १९३३ साली जेव्हा आम्हांला येरवडा कँप जेलमधून विसापूरला नेण्यात आले, तेव्हा तिथे झाली, जेलमध्ये राजकीय बंद्यांच्या काही रास्त मागण्या जेलचे अधिकारी मान्य करीत नव्हते. अशा काही प्रसंगांवरून तुळशीदासांनी अन्नसत्याग्रह सुरू केला होता. त्या वेळी एक सामान्य कार्यकर्ता राजबंदी म्हणून मी त्यांना त्यांच्या बरॅकमध्ये जाऊन भेटलो. ही माझी त्यांची पहिली भेट. उपोषणाने थकलेले, पण मनाने निर्धारी अशी त्यांची वृत्ती पाहून मी सादर परत आलो.

त्यानंतरच्या राजकीय जीवनात त्यांचे-माझे अनेक कारणांनी जवळ येण्याचे प्रसंग आले. कधी कधी मतभेदही झाले. टीका झाल्या. अर्थात मी कधीच प्रतिटीका करीत नाही, म्हणून त्या वेळीही केली नाही. त्यांचा माझा जाहीर वाद सुरू झाला. शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेच्या वेळी श्री. तुळशीदासजी शेतकरी पक्षाच्या स्थापनेतील एक अग्रगण्य पुढारी होते आणि त्यांनी त्या वेळी आपल्या पक्षाचा प्रचार धूमधडाक्याने सुरू केला. तुळशीदासजी तसे जबरदस्त प्रचारक आहेत. लोकांना समजणाऱ्या भाषेत तासन् तास ते बोलू शकतात. महाराष्ट्रात त्या वेळी सर्वश्री काकासाहेब वाघ, तात्यासाहेब जेधे, नाना पाटील, तुळशीदासजी, शंकरराव मोरे या मंडळींनी एक तुफान उभे केले होते. काँग्रेस कार्यकर्त्यांना एक प्रकारचा धसका बसेल, असे वातावरण त्यांनी निर्माण केले होते. त्या वेळी मी आमच्या सहकाऱ्यांसह - विशेषतः, श्री.नाना कुंटे यांच्यासह महाराष्ट्राचा लांबलचक दौरा केला व

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रचाराला आवर घालण्याचा प्रयत्न केला. तुळशीदासजींचे शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वामध्ये मतभेद झाल्यानंतर १९५५ साली त्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्या वेळेपासून पुन्हा त्यांचे - माझे सहकार्य पुनश्च सुरू झाले. ते अलीकडे काँग्रेस दुभंगण्याच्या वेळेपर्यंत कमी-अधिक प्रमाणात चालू आहे.

त्यांचे - माझे मतभेदांचे प्रसंग जरी आले असले, तरी त्यांचे स्वार्थत्यागी जीवन, रात्रंदिवस कष्ट करण्याची तयारी, लोकशिक्षण करण्याची हातोटी यांमुळे हा मनुष्य एका अर्थाने असामान्य वाटतो. पराभव हा शब्द त्यांना माहीत नाही. प्रवासाने ते कधी थकणार नाहीत. विचार मांडण्याचा कधी कंटाळा आला नाही. सर्वांना भेटून आपले विचार सांगण्याची टाळाटाळ नाही. त्यांच्या स्वभावातील हे महत्त्वाचे गुण आहेत.

श्री. तुळशीदासजी आपल्या राजकीय जीवनात मोठ्या अधिकार-पदावर पोहोचले नव्हते. तरी स्वातंत्र्य-चळवळीतील व त्यानंतरचे त्यांचे कार्य महाराष्ट्र कधी विसरू शकणार नाही. आता उतारवयात त्यांनी सोलापूर जिल्ह्यात साखर कारखाना उभारून जे नवीन काम हाती घेतले व त्यासाठी त्यांनी जे कष्ट उपसले, ते पाहिल्यानंतर त्यांच्याबद्दल आदर व अभिमान वाटतो. साखर कारखान्याचे काम पूर्ण होऊन तो सुरू झाल्यामुळे त्यांच्या विधायक कार्याला यश मिळाले आहे व त्यामुळे त्यांच्या मनाला एक आनंद लाभला आहे.

मध्यंतरी दिल्लीत ते भेटले, तेव्हा कारखान्याच्या प्रगतीचा इतिहास सांगत होते. त्यावेळी त्यांच्या डोळ्यांतील विजयाचे तेज पाहून माझ्याही मनाला हुरूप आला.

आज त्यांचा गौरव करण्यासाठी ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. अशा वेळी माझ्या त्यांच्यासंबंधीच्या सद्भावना पाठवीत आहे व त्या पाठविताना आनंद वाटत आहे.

श्री. तुळशीदासजी शतायुषी होवोत !!

# ३१... रत्नाप्पाअण्णा कुंभार

कोल्हापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध नेते श्री. रत्नाप्पाअण्णा कुंभार यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार-समारंभ होत आहे, ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे, त्यांचे सर्व आयुष्य प्रजा परिषदेच्या चळवळीत आणि विविध विधायक कार्य करण्यात खर्च झाले आहे.

स्वातंत्र-लढ्याच्या वेळी मी कोल्हापुरात विद्यार्थी म्हणून राहत होतो. त्या वेळी प्रजा परिषदेने चालविलेली चळवळ अधिक संघटितरीतीने बांधण्याचे काम तिची नेते मंडळी करीत होती. त्यामुळे मला त्यांत प्रमुखपणे काम करणाऱ्या माणसांची माहिती होती. अर्थात यांत प्रामुख्याने माझ्या दृष्टीने श्री.माधवराव बागल, रत्नाप्पाअण्णा कुंभार, वीर माने ही मंडळी होती. परंतु या सर्वांमध्ये जिद्दीने बसून संघटना बांधण्याचे काम रत्नाप्पाअण्णांनी विशेष प्रकारे केले, हे स्पष्ट आहे. त्या काळात त्यांना मी एक-दोन वेळा भेटल्याचे मला आठवते. आलेल्या मंडळींशी शांतपणे बोलून त्यांना मार्गदर्शन करणे, वेळोवेळी परिपत्रके काढणे ही संघटनेतील महत्त्वाची कामे आहेत. श्री. रत्नाप्पाअण्णांनी ही कामे फार कष्टाने व कुशलतेने केली. त्यामुळे श्री.माधवराव बागल यांच्यानंतर कोल्हापूर प्रजा परिषदेमध्ये रत्नाप्पांचे नाव डोळ्यांपुढे येत असे.

श्री. माधवराव बागल यांची राजकीय उंची फार मोठी होती. स्वाभाविकपणे ते कोल्हापूरबाहेरही माहीत होते. उत्तम वक्ते व लेखक म्हणूनही त्यांचे नाव होते. प्रजा परिषदेच्या संघटनेच्या क्षेत्रात रत्नाप्पांचे विशेष असे मानाचे स्थान होते व त्या दृष्टीने महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांशी त्यांचे संबंध वाढत होते. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून रत्नाप्पाअण्णांनी केलेले काम सुप्रसिद्ध आहे. त्याच्या तपशिलात मी जाण्याचे कारण नाही.

भूमिगत लढा संपल्यानंतर बराच काळ ते भूमिगतच राहिले व त्यानंतर त्यांनी अतिशय नाट्यमय पद्धतीने पुन्हा उघड राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी स्वतःला विधायक कार्यांत गुंतवून घेतले. विशेषतः, त्यांनी

पंचगंगा सहकारी साखर कारखाना संघटित केला. त्याचा सर्व तपशील मला माहीत आहे. मला आठवते, की त्या कारखान्याच्या तयारीसाठी ते जेव्हा मुंबईत येत, तो काळ साधारणतः १९५५-५६ चा होता. त्या काळात ते व त्यांचे मित्र व श्री. तात्यासाहेब कोरे व त्यांचे मित्र हे दोन्ही गट दोन साखर कारखान्यांकरिता प्रयत्न करीत होते. मुंबईत त्यांचा मुक्काम मी राहत असलेल्या चित्रकूट बंगल्यावर असलेल्या जागेत असे, याची मला आठवण आहे. श्री. तात्यासाहेब कोरे यांचे व माझे जुने संबंध होते. या निमित्ताने श्री.रत्नाप्पाअण्णांशी पण जिव्हाळ्याचे व निकटचे संबंध आले.

याच संदर्भात एक मजेदार गोष्ट मला आठवते. ती म्हणजे, जेव्हा त्यांच्या कारखान्याची तयारी पूर्ण होऊन त्यांचे मॅनेजमेंट बोर्ड तयार करण्याच्या स्तरापर्यंत काम आले, तेव्हा एका रात्री मला निरोप आला, की श्री. तात्यासाहेब कोरे व रत्नाप्पाअण्णा कुंभार मला भेटू इच्छितात. रात्र बरीच झाली होती. त्यामुळे मला काहीसे आश्चर्य वाटले. तरीपण मी त्यांना बोलावून घेतले. त्यावेळी त्यांनी मला खरोखरच आश्चर्यचकित करणारी गोष्ट सुचविली. ते म्हणाले, या दोन्ही कारखान्यांच्या चेअरमनशिपसाठी मी मान्यता द्यावी. अर्थात त्या वेळी मी पुरवठा मंत्री म्हणून काम करीत होतो व सहकारी चळवळीच्या भविष्यासंबंधी काळजी वाहणारा होतो. त्यामुळे मी त्यांच्याशी याबाबत बारकाईने चर्चा केली. या कारखान्यांना मंत्री या नात्याने माझ्याकडून मी इतर सहकार्य देईन, परंतु कारखान्याच्या दैनंदिन कामात कोण्या मंत्र्याने सामील व्हावे, हे मला मंजूर नसल्याचे मी त्यांना सांगितले. त्यांची समजूत काढताना मला फार श्रम घ्यावे लागले. परंतु शेवटी त्यांनी माझे म्हणणे मान्य केले. आज तीस वर्षांनंतर या गोष्टीची आठवण येते, जेव्हा ही चळवळ सुरू झाली, तेव्हा तिच्या पाठीमागचा उद्देश हा सत्ता-संपादनाचा नव्हता, तर सेवेचा होता, हे लक्षात येते. हा जुन्या काळचा अनुभव पाहिला, म्हणजे आता काळ किती बदलला आहे, हे लक्षात येते.

श्री.रत्नाप्पाअण्णांनी आपला कारखाना गेली अनेक वर्षे आपल्या मार्गदर्शनाखाली ठेवला आहे, ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. आजही ते अनेक विधायक कार्ये करीत आहेत. राजकारणात ते एक महत्त्वाचे नेते म्हणूनही अजून मानले जातात. ते आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी (आय्) चे उपाध्यक्ष आहेत. ते विधान सभेचे सदस्य राहिले आहेत, संसद सदस्य राहिले आहेत. अनेक निवडणुकांमध्ये त्यांनी भाग घेतला आहे. पुष्कळदा ते जिंकले

आहेत, कधी हारले आहेत. पण पराजयामुळे ते कधी नाउमेद झाले नाहीत. तसेच, आपला विधायक कार्याचा ध्येयवादी मार्ग सोडला नाही. संपूर्ण जीवन त्यागाने व काही निश्चित कामासाठी वाहून घेणाऱ्या महाराष्ट्रातील जुन्या कार्यकर्त्यांत श्री.रत्नाप्पाअण्णा हे महत्त्वाचे गृहस्थ आहेत.

श्री.रत्नाप्पाअण्णा यांचा व माझा फार जुना स्नेह आहे. अधून-मधून मतभेद होतात, परंतु त्याचा वैयक्तिक स्नेहावर परिणाम झाला नाही. हा रत्नाप्पांचा मोठेपणा आहे. ७५ व्या वर्षात प्रवेश करणे ही आयुष्यातील अमृतयोगाची गोष्ट आहे आणि तरी रत्नाप्पा आजही क्रियाशील आहेत, हे महत्त्वाचे आहे. त्यांचे कार्य सुफलित होवो, हीच एका त्यांच्या मित्राची प्रार्थना इथे नोंद करू इच्छितो.

# ३२... भाऊसाहेब वर्तक

गेल्या वीस वर्षांच्या काळात महाराष्ट्रात अपेक्षा निर्माण करणारे जे कार्यकर्ते उदयास आले, त्यांत श्री. भाऊसाहेब वर्तकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी भाऊसाहेब ठाणे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांनी दाखविलेली धडाडी, जिद्द आणि स्वीकृत कार्याला वाहून घेण्याचा त्यांचा गुण या गोष्टी माझ्या नजरेत विशेष भरल्या. भाऊसाहेब हे अण्णासाहेब वर्तकांचे थोरले चिरंजीव. ठाणे जिल्ह्यातील काँग्रेसची संघटना एकसंध ठेवण्यात अण्णासाहेबांनी जे यश मिळविले व त्यासाठी त्यांनी जी कार्यपद्धती स्वीकारली, त्यातून एक कार्यपरंपरा निर्माण झाली. या कार्यपरंपरेचा वारसा भाऊसाहेबांना मिळाला. परंतु वारसा मिळणे निराळे आणि वारसा टिकवून त्यात भर घालणे निराळे. या वारसा पुढे चालविण्यासाठी लागणारा सुज्ञपणा आणि दूरदृष्टी भाऊसाहेबांत असल्याचे त्यांनी सिद्ध केलेच; परंतु जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदावरून आपल्या अंगी असलेल्या आगळ्या कर्तृत्वाची झलकही त्यांनी दाखविली. कर्तृत्व हे माणसाला चिकटविता येत नाही. चिकटविलेले कर्तृत्व फार वेळ टिकत नाही. कर्तृत्व हे कार्यातून फुलावे लागते. ते तसे फुलत असल्याचा प्रत्यय यावा लागतो. भाऊसाहेबांच्या बाबतीत मला हा प्रत्यय प्रकर्षाने आला आणि महाराष्ट्रात एक जिद्दीचा, प्रखर कार्यनिष्ठा असलेला कार्यकर्ता उदयास येत आहे, अशी भाऊसाहेबांचे त्या वेळचे कार्य पाहून माझी खात्री झाली; आणि म्हणूनच गृहनिर्माण मंडळाच्या अध्यक्षपदाचे फार मोठे काम, भाऊसाहेबांना त्या क्षेत्रातला विशेष अनुभव नसतानाही, मी मोठ्या विश्वासाने त्यांच्याकडे सोपविले. अनुभव या कार्यातून मिळवावयाचा असतो. त्यासाठी मनाची एक विशिष्ट बैठक, तो ग्रहण करण्याची पात्रता व कार्यपद्धतीची निश्चित दिशा असावी लागते. या गुणांनी युक्त असलेले व्यक्तिमत्त्व मला भाऊसाहेबांत दिसले आणि त्यांच्यावर मी टाकलेला विश्वास अनाठायी नसल्याचे त्यांनी आपल्या कार्याने सिद्ध केले. गृहमंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी बजावलेली कामगिरी स्पृहणीय ठरलीच. परंतु विशेष म्हणजे, प्रशासकीय क्षेत्रात त्यांनी

आपल्या कामगिरीने स्वतःचे असे एक विशिष्ट स्थान निर्माण केले. मंत्री म्हणून पुढे त्यांनी केलेले कार्य नजरेखालून घालताना पहिल्याने त्यांच्या कोणत्या गुणाचे दर्शन होत असेल, तर ते त्यांच्या त्या प्रशासकीय कौशल्याचेच. भाऊसाहेबांच्या शासकीय कामातील हीच त्याची मोठी ताकद आहे.

राजकीय क्षेत्रात कार्यकर्ता उभा राहू शकतो, तो पक्षसंघटनेच्या जोरावर आणि पक्षसंघटनेसाठी त्याने केलेल्या कार्यावर. पक्षसंघटनेचे काम हे कार्यकर्ते तयार करण्याचे काम आहे. कार्यकर्त्यांत विश्वास आणि निष्ठा निर्माण करूनच पक्षसंघटनेचे कार्य विस्तारत जाते. संघटनेच्या कार्यातील ही विधायक दृष्टी भाऊसाहेबांना असल्यामुळे ठाणे जिल्ह्यात ते प्रभावी पक्षसंघटना उभी करू शकले व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून त्यांनी केलेले कार्य मान्यता पावले. अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन असो अगर महाराष्ट्र प्रदेशाचे एखादे शिबिर असो किंवा विधानसभा वा लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका असोत, त्यासाठी लागणारी यंत्रणा अल्पावधीत उभी करण्यात भाऊसाहेबांचे संघटना-चातुर्य कसोटीस लागले. साऱ्या जबाबदाऱ्या त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने आणि धडाडीने पार पाडल्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कोषाध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी अशीच उत्तम रीतीने सांभाळली आहे.

नागरी खात्याचे पुरवठा मंत्री म्हणून अत्यंत बिकट परिस्थितीत भाऊसाहेबांनी सहा-सात वर्षे दक्षतेने काम पाहिले. हे काम पाहत असताना त्यांना अनेक वेळा कठोर विपर्यस्त टीकेला तोंड द्यावे लागले. पुरवठा खात्याला पडणाऱ्या परिस्थितीच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचे भाग्य कोणत्याही पुरवठा मंत्र्याला अलीकडच्या काळात लाभलेले नाही. भाऊसाहेबही याला अपवाद नाहीत. अशा परिस्थितीत ज्या कर्तव्यबुद्धीने त्यांनी या खात्याचा व्याप दीर्घकाळ सांभाळला, त्याचे मूल्यमापन सहानुभूतीने व समजुतदारपणे होण्याची गरज आहे. तसे ते झाले नाही, हा एक दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या वेळीही त्यांनी असेच मोलाचे आणि त्यांच्या कर्तृत्वशक्तीची प्रचीती आणून देणारे काम केले आहे. परिस्थितीची अनुकूलता दुर्दैवाने भाऊसाहेबांना लाभली नाही, म्हणून केवळ त्यांनी नेटाने केलेल्या कार्याचे महत्त्व कमी ठरत नाही.

गेल्या तीस-पस्तीस वर्षांच्या काळात भाऊसाहेबांनी विविध क्षेत्रांत केलेले विधायक काम महाराष्ट्रातील थोर, निःस्वार्थी समाजसेवकांच्या परंपरेत शोभणारे असेच आहे. त्यांच्या षष्ट्यब्दपूर्तीच्या निमित्ताने भाऊसाहेब

षष्ट्यब्दपूर्ती सत्कार समितीने 'जीवनधारा' हा गौरवग्रंथ प्रकाशित करून त्यांच्या कार्याचे आणि त्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे जे एक सुंदर दर्शन घडविले आहे, त्याबद्दल सत्कार समितीचे मी अभिनंदन करतो. भाऊसाहेबांनी केलेले कार्य हे राष्ट्राच्या प्रगतिपथावरील एक पाऊल आहे. अशा एक एक पावलाने राष्ट्राच्या प्रगतीचा गाडा पुढे सरकत असतो आणि म्हणून 'जीवनधारा' च्या रूपाने भाऊसाहेबांच्या महत्त्वपूर्ण कार्याची नोंद घेण्यात समितीने मोठे औचित्य साधले आहे.

भाऊसाहेबांची आजही काम करण्याची तडफ पाहिली, त्यांचा दुर्दम्य उत्साह पाहिला, म्हणजे भाऊसाहेबांच्या वयाला साठ वर्षे पुरी झाली आहेत, यावर विश्वास बसत नाही. कर्तव्यपूर्तीचा आनंद हा एक जीवनातील महत्त्वाचा निकष मानला, तर नियतीने भाऊसाहेबांच्या पदरात यशाचे भरपूर माप टाकले आहे, असे मी म्हणेन. असे यश ही पुढच्या यशाची पायरी असते. भाऊसाहेबांनी आतापर्यंत मिळविलेले यश त्यांना अधिक समृद्ध यशाप्रत नेवो आणि त्यांचे पुढील जीवन दीर्घायुरारोग्यसंपन्न होवो, अशी सदिच्छा मी या शुभ प्रसंगी व्यक्त करतो.

## ३३... उद्धवराव पाटील

महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील एका आघाडीचे कार्यकर्ते म्हणून श्री.उद्धवराव पाटील यांना गेली जवळ जवळ तीस वर्षे मी पाहतो आहे. १९४८-४९ मध्ये शेतकरी कामकरी पक्ष त्याच्या पहिल्या उमेदीत पक्षबांधणीचे व वाढीचे काम मोठ्या नेटाने करीत होता, तेव्हा श्री. उद्धवराव त्या पक्षाचे तरूण कार्यकर्ते होते व मराठवाड्यातील जिल्ह्यांत त्यांनी आपल्या कामाचा पसारा बराच वाढविला होता. त्या पहिल्या काळात शेतकरी कामकरी पक्षाला तोंड देण्याची गरज आम्हां मुंबई राज्यातील कार्यकर्त्यांना वाटली नाही. पण उद्धवराव मुळचे सोलापूर जिल्ह्याचे. त्यामुळे त्यांचा परिणामकारक प्रचार सोलापूर जिल्ह्यापर्यंत येऊन पोहोचला होता. या एका प्रादेशिक पक्षाशी मुकाबला करण्याचे काम कॉंग्रेस पक्षातर्फे आम्ही महाराष्ट्रातील मंडळी करीत होतो. त्या संदर्भात उद्धवरावांचे नाव व कीर्ती ऐकली होती.

श्री.उद्धवरावांचा व माझा वैयक्तिक संबंध संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी ते द्वैभाषिक राज्यात आपल्या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून आले, त्या वेळी आला. मी माझ्या पक्षाचा पुढारी होतो व उद्धवराव विरोधी पक्षाचे नेते होते. खरे म्हणजे, ते एक मैत्रीचे नाते आहे. विरोधी पक्षाचा नेता व राज्यकर्त्या पक्षाचा नेता यांचे संबंध लोकशाहीत वैयक्तिक विरोधी भावनांच्या कक्षा ओलांडून पुढे गेले नाहीत, तर लोकशाही नीट चालणार नाही. त्या वेळी विधानसभेचे काम मोठ्या अटीतटीने चालत असे. श्री. उद्धवराव आपल्या पक्षाचे नेतृत्व परिणामकारक करताना मी पाहिले आहे. तसा त्यांचा स्वभाव अतिरेकी नाही. आपल्या म्हणण्याला काही तात्त्विक बाजू आहे, अशा पद्धतीने ते आपले विचार मांडीत असत. ते परखड बोलत असले, तरी त्यात कडवटपणा व वैयक्तिक टीकेचा भाग दिसून आला नाही. या निमित्ताने त्यांच्याशी सभागृहाबाहेर भेटण्याचा व चर्चा करण्याचा प्रसंग काही वेळा आला. त्यावेळी त्यांची मित्रत्वाची भावना ठेवण्याची वृत्ती उत्कटतेने पाहिली.

त्यांच्या अंतरंगात शिरून त्यांचे मित्र होणे इतके सोपे नव्हते. कारण त्यांच्या राजकीय मतांच्या रेषा इतक्या स्पष्ट असत, की त्या ओलांडून त्याचे

वैयक्तिक स्वरूपात रूपांतर करणे फार कठीण असे. मी त्यांच्यावर ते ठसविण्याचा प्रयत्न करीत असे, की आमच्या पक्षातील मराठी माणसे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या विचाराची आहेत, परंतु राजकीय वास्तविकता लक्षात घेऊन, मुंबईचा प्रश्न किती कुशलतेने सोडविला जाईल, याच्यावर त्याचे यश अवलंबून आहे. उद्धवराव म्हणायचे, की तुमच्या या गोड शब्दांमध्ये आम्ही गुंतून जाऊ इच्छीत नाही आणि राजकीय मुद्द्यांची चर्चा सोडून इतर खासगी गोष्टी सुरू करीत.

अत्यंत नेकीचा आणि पक्षाच्या कार्याला वाहून घेतलेला कार्यकर्ता व नेता हे उद्धवरावांचे वर्णन उचित ठरेल. राजकारण सोडून इतर गप्पांचा अड्डा असला, तर त्यात ते रमून जातात. पान-तंबाखू खाऊन झाले, की ते इतके रंगून जातात, पण राजकीय प्रश्न आला, की त्याच्याशी अंतराय निर्माण होऊ देत नसत. पुढे ते दिल्लीलाही राज्यसभेचे सभासद म्हणून निवडून आले. माझ्या आठवणीने ते लोकसभेतही निवडून आले होते. पण दिल्लीच्या संसदीय कामात त्यांनी फारसा रस घेतला नाही.

मी त्यांना एकदा विचारले की, मुंबई गाजवीत होता, दिल्लीत दुर्लक्ष का? ते म्हणायचे मन, लागत नाही, रस येत नाही. खरे म्हणजे, त्यांची प्रश्नांची जाण इतकी चांगली आहे, की ज्या निष्ठेने त्यांनी महाराष्ट्राचे प्रश्न हाताळले, त्याच जाणिवेने राष्ट्राचे प्रश्न हाती घेतले असते, तर देशवासीयांना त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव झाली असती. पण त्यांनी असे केले नाही, याचे कोडे मला अजून उलगडले नाही. राजकीय पक्षाचे काम किती निष्ठेने करावे व आपले व्यक्तिमत्त्व मागे ठेवून, पक्षाच्या कामाला प्राधान्य द्यावे, अशा प्रकारचे समर्पित जीवन जगणारे ते नेते आहेत. उद्धवरावांची शेतकरी व कामगारांसंबंधीची मानसिक ओढ मोठी तीव्र आहे.

आज जो उद्धवराव पाटील यांचा गौरव करण्यात येत आहे, याचा मला अतिशय आनंद आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी व नेतृत्वासंबंधी या निमित्ताने चार शब्द लिहिता आले, याचा मला आनंद आहे.

श्री. उद्धवरावांना माझ्या शुभेच्छा.

# ३४... भाऊसाहेब बांदोडकर

कै. भाऊसाहेब बांदोडकरांची आठवण झाली, की त्यांचे हसरे, उमदे व राजबिंडे व्यक्तित्व डोळ्यांसमोर येते. माझ्या-त्यांच्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री असताना आणि नंतर दिल्लीतही अनेक वेळा गाठी-भेटी झाल्या. अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा झाल्या. राजकारणातही विरोधी भूमिकांत आम्ही वावरलो. पण भाऊसाहेबांच्या व्यक्तित्वाविषयी वाटणारा आदर, जिव्हाळा कायम राहिला. कारण मला वाटते, की त्यांच्यांत महाराष्ट्राच्या आणि गोव्याच्या मातीच्या गुणांचा मिलाफ होता. जिद्द, करारीपणा, स्पष्टवक्तेपणा आणि गरिबांविषयीची आस्था या गुणांत ईश्वरभक्ती, कला-साहित्यप्रेम, संगीत-नाटक यांचे वेड आणि अनौपचारिक जिव्हाळा यांचे इतके बेमालूम मिश्रण झाले होते, की त्यामुळे त्यांचे वेगळेपण नजरेत भरे.

भाऊसाहेबांचा दानशूरपणा हा सुविख्यात आहे. ते आयुष्यभर गरजूंना देतच राहिले. त्यामुळे त्यांच्याभोवती गरजूंची गर्दी असे. अर्थात त्या दानाचाही त्यांना अहंकार किंवा गर्व नव्हता. अगदी सहजतेने ते हजारो रूपयांचे दान करीत. गरीब विद्यार्थी, कलावंत, गरीब शेतकरी, आदी सर्वांना त्यांनी उपकृत करून ठेवले आहे. ते धनवान होते, पण धनलोभी नव्हते. आपली बाग एखादा रसिक मनुष्य ज्या आस्थेने आपुलकीने व कल्पकतेने, विविधतेने फुलवितो, त्यातील फळाफुलांना वाढवितो, तसेच भाऊंनी गोव्याच्या आर्थिक विकासासाठी केले. आपल्या मायभूमीमध्ये सर्व काही आधुनिक सोयी असाव्यात, सौंदर्य असावे, कला बहरावी, असे त्यांना वाटे, आणि म्हणून त्यांनी गोव्याविषयीची आपली स्वप्ने साकार करण्याचा आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रयत्न केला.

भाऊसाहेब राजकारणात आले आणि यशस्वी झाले, ते या त्यांच्या दीनदलितांच्या विषयीच्या कळकळीनेच, ते श्रीमंत होते, तरी त्यांना दारिद्र्याच्या दुःखाची कल्पना होती, गरिबांच्या प्रश्नांची जाण होती. त्यामुळे सत्तेवर ते आले, ते गरिबांच्या सुखाची चिंता वाहण्यासाठीच. म्हणून सत्ताधीश होऊनही ते नम्र राहिले. सत्तेविषयीची एक प्रकारची बेफिकिरी त्यांच्यांत होती, ती त्यामुळेच, त्यांचे जनतेशी असलेले नातेही थोरल्या भावाचेच होते. ते जनतेचा विचार

करीत, तोही याच भावनेने. गोव्याची देखभाल करीत, जनतेत मिसळत, तेही याच भावनेने. त्यामुळे भाऊ हे त्यांचे नाव सार्थ झाले. त्यातील जिव्हाळा आणि कौटुंबिक आस्था हे त्यांच्या नेतृत्वाचे विशेष होते. राजकीय मतभेद त्यांच्या आड आले नाहीत. त्यामुळे विरोधकांना आणि मित्रांनाही भाऊ हा आधार वाटत राहिला. असे हे एकछत्री नेतृत्व गोव्याच्या राजकारणाला भाऊसाहेबांनी दिले. ते गोव्याच्या मुक्तिलढ्यात जसे उपयोगी पडले, तसे गोवा स्वतंत्र झाल्यानंतर निर्माण झालेल्या विविध प्रश्नांतही उपयुक्त ठरले. राजकारणाने भाऊसाहेबांना मोठे केले नाही, तर भाऊसाहेबांच्या मोठेपणाचा राजकारणाला उपयोग झाला.

भाऊसाहेब हे रसिक होते, जिज्ञासू ग्रंथप्रेमी होते आणि विद्याप्रेमी सरस्वतीभक्त होते. पुस्तकांप्रमाणेच शिकारीवर त्यांचे प्रेम होते. ईश्वरावरील त्यांची श्रद्धा नितांत होती. गोव्यात त्यांनी मंदिरेही बांधली, गोव्याबाहेरच्या अनेक चळवळींत भाऊसाहेबांनी लक्ष घातले होते. त्यांना महाराष्ट्रात बहरत असलेल्या साहित्याविषयी, नाट्याविषयी किंवा संगीताविषयी नेहमीच ओढ वाटत असे. त्यामुळे अनेक कलावंत, साहित्यिक व विद्वान यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध असत. अनेकांना त्यांनी पुढे आणले, मदतीचा हात दिला. त्यामुळे भाऊसाहेबांचे कार्यक्षेत्र नुसते गोव्यात राहिले नव्हते. त्याचा लाभ महाराष्ट्रातही अनेकांना झाला. दिल्लीतही राजकीय श्रेष्ठींशी ते जो संपर्क ठेवीत असत, त्यामुळे भाऊसाहेब हे छोट्या राज्याचे मुख्यमंत्री असूनही त्यांच्या कर्तृत्वाला, नेतृत्वाला व दातृत्वाला प्रादेशिक मर्यादा कधीच आड आली नाही. त्यामुळे आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांची आठवण गोव्यातील व गोव्याबाहेरील जनतेला जाईच्या फुलांसारखी सुगंधी व ताजी राहिली आहे.

# ३५... यशवंतराव मोहिते

श्री. यशवंतराव मोहिते आज महाराष्ट्राचे अर्थमंत्री आहेत. यापूर्वी बरीच वर्षे त्यांनी महाराष्ट्राचे सहकारमंत्री म्हणून काम केले आहे. गेली सोळा-सतरा वर्षे ते राज्यकारभाराच्या क्षेत्रात कुशलतेने क्रियाशील आहेत. या सर्व कारणांमुळे यशवंतरावांचे व्यक्तित्व मोहरून आले आहे. परंतु यशवंतराव मोहिते यांचा मूळ पिंड हा विचारवंताचा आहे. लोकशिक्षण करावे, अशी मनीषा असलेल्या कार्यकर्त्याचा आहे. ते पट्टीचे, तसेच दमदार वक्ते आहेत. आपल्या विषयाची पूर्ण माहिती घेतल्याशिवाय ते बोलत नाहीत आणि बोलताना विषयाची मूलग्राही, तर्कशुद्ध मांडणी करण्याची त्यांची सवय आहे. यामुळे वक्तृत्व व विषयमांडणी यांमध्ये त्यांचे एक विशिष्ट व्यक्तित्व व त्यांची शैली यांचे दर्शन होते.

श्री. यशवंतराव मोहिते हे राजकारणाच्या प्रांगणात उतरले, ते शेतकरी-कामकरी पक्षाचे नेते म्हणून आणि तेही अगदी तरूण वयात. त्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या सहवासात त्यांना राहावे लागले असले, तरी त्यांनी स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व घडविले आहे. स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेण्याची शक्ती त्यांच्यामध्ये आहे, हे त्यांनी त्या पक्षातही सिद्ध केले होते व ज्या वेळी, ज्या समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना झाली, त्याची खरी पूर्तता काँग्रेस पक्षात गेल्यावरच होईल, असे वाटले, त्या वेळी त्यांनी काँग्रेस पक्ष स्वीकारला. आज त्यांनी समाजवादावर निष्ठा असलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरापुढे केलेले भाषण प्रबंधरूपाने प्रसिद्ध झाले आहे. ते मी नुकतेच वाचले. श्री. यशवंतराव मोहिते आपल्या भाषणात जसे बोलले, तसेच या ग्रंथात उतरविले आहे. त्यांनी कदाचित लिहिण्याचा प्रयत्न केला असता, तर हाच प्रबंध वेगळ्या पद्धतीने मांडला गेला असता, असे मला वाटते. भाषणात, विषय मांडण्यात काही मर्यादा असतात, त्या स्वाभाविकपणे यात स्पष्ट होतात, परंतु हे अपरिहार्य आहे.

काँग्रेस हा प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा बांधील पक्ष (Cadre Based Party) व्हावा, अशा दृष्टीने काही केले पाहिजे, या जाणिवेतून हे शिबिर व हे भाषण यांचा जन्म झाला आहे. काँग्रेस याच स्वरूपाचा पक्ष होईल, की नाही, हा

चर्चेचा व वादाचा प्रश्न आहे. परंतु काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांचे वैचारिक शिक्षण झाले पाहिजे, यासंबंधी मतभेद नाहीत. आज अखिल भारतीय काँग्रेस कमिटीही असे संघटित प्रयत्न फार मोठ्या प्रमाणात करीत आहे. काँग्रेसचे मूळ स्वरूप जनआंदोलनाचे आहे. माझ्या मताने हिंदुस्थानच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या संदर्भात त्याचे स्वरूप आणखी कित्येक वर्षे असेच राहील आणि तसेच राहणे आवश्यकही आहे. जनआंदोलनाच्या स्वरूपाची मीमांसा स्वीकारली, म्हणजे मग केडर (Cadre) बद्ध पक्षांशी काँग्रेसची तुलना करण्याचा मोह आवरावा लागतो. या दृष्टीने मी याचा इथे उल्लेख करीत आहे.

श्री. मोहिते यांची राजकीय वाढ ही डाव्या राजकारणाच्या हवेमध्ये झाली आहे. त्यामुळे स्वाभाविकच मार्क्सवादाची चर्चा त्यांच्या भाषणात अपरिहार्य होते. मार्क्सवादाच्या मर्यादा या शतकाच्या उत्तरार्धात सुस्पष्ट होऊ लागल्या आहेत. तरीही ही गोष्ट कबूल केली पाहिजे, की मार्क्सवादाच्या आधाराने अनेक प्रश्नांची मीमांसा, राजकीयदृष्ट्या स्पष्ट व्हायला मदत होते आणि त्यामुळे मार्क्सवाद हा आजच्या जगातील राजकीय विचार, जीवनाचा बऱ्याच अंशी अंगभूत असा भाग झाला आहे. मार्क्सवादाचा अभ्यास माझ्या राजकीय जीवनात मला उपयोगी पडला आहे. मार्क्सवादाच्या अध्ययनामुळे आज त्याच्या मर्यादाही समजण्यास मदत होते. वर्गसंघर्षावर आधारित अशा विकासवादावर मार्क्सवाद आधारलेला आहे. या नजरेने परिशीलन केले, म्हणजे मानवजातीच्या इतिहासाच्या घडामोडीचे स्वरूप स्पष्ट होऊ लागते. हिंदुस्थानच्या राजकारणातील संघर्ष समजण्यास या विचारसरणीची मदत घेतली जाणे स्वाभाविकच आहे. ज्या जनआंदोलनाचे ध्येय समाजवाद आहे, अशा काँग्रेसला या विचाराने थोडी-फार वाट पुसावी लागली, तर त्यात आश्चर्य नाही. मात्र हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत गांधी व नेहरू यांच्या विचारदर्शनाने निर्माण झालेल्या या नव्या युगात मार्क्सवादाच्या मर्यादाही समजू लागल्या आहेत. हिंदुस्थानचा समाजवाद हा हिंदुस्थानच्या परिस्थितीला पोषक असा भारतीय चेहऱ्या-मोहऱ्याचाच असला पाहिजे, अशी इतरांप्रमाणे माझीही श्रद्धा आहे आणि श्री. यशवंतराव मोहितेही हाच विचार मांडतात.

श्री. यशवंतराव मोहिते यांनी आपल्या या प्रबंधात अनेकविध प्रश्नांचा विचार केला आहे आणि आपली विचारपूर्वक बनविलेली मते मांडलेली आहेत. महाराष्ट्रीय कार्यकर्ते व विचारवंत यांना या पुस्तकाची दखल घ्यावी लागेल,

इतक्या मोलाचे ते आहे, असे मी जरूर म्हणेन. असे महत्त्वपूर्ण विचारप्रधान पुस्तक जनतेच्या हाती दिल्याबद्दल मी श्री. यशवंतराव मोहिते यांचे पुन्हा अभिनंदन करतो.

# ३६... मधुकरराव चौधरी

मधुकररावांचे व्यक्तित्व राजकारणाच्या क्षेत्रात त्यांच्या विधायक कर्तृत्वाने सुप्रसिद्ध झाले आहे. परंतु त्याची तयारी ते त्यापूर्वीपासून करीत होते, असे म्हटले, तरी चालेल. मधुकररावांना मी प्रथम भेटलो, तेव्हा ते जळगाव जिल्ह्यातील सर्वोदय क्षेत्रात प्रमुख म्हणून कार्य करीत होते. त्यांची कामाची तळमळ, त्यात जीव ओतून रममाण होण्याचा त्यांचा स्वभाव मी पाहिला होता. सामान्य माणसाच्या शक्तींना उत्थान देऊन, त्याचे कर्तृत्व क्रियाशील करावे, अशी विलक्षण तळमळ त्यांच्या बोलण्या-वागण्यांतून निश्चित पाहिली होती. घराण्यात वडिलांची देशसेवेची आणि स्वातंत्र्यप्रेमाची परंपरा, यामुळे माझ्या मनावर जो परिणाम झाला, तो असा, की महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मोलाची भर घालणारा हा उमदा तरूण आहे आणि त्याला महाराष्ट्राच्या सेवेसाठी केव्हातरी निमंत्रण द्यावे. हा योगायोग १९५७ साली ज्यावेळी मी मुख्यमंत्री या नात्याने द्वैभाषिक मुंबई राज्याचे मंत्रिमंडळ बनवीत होतो, त्या वेळी आला. गेल्या बारा-तेरा वर्षांत त्यांनी क्रमशः आपल्या कर्तृत्वाची प्रभा वाढवत नेली आणि एका अर्थाने माझी अपेक्षा पूर्ण केली, याचे मला समाधान वाटते.

गेली पाच-सहा वर्षे महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणविभागाचे नेतृत्व श्री. मधुकरराव चौधरी यांचेकडे आहे. या काळात महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्रात नवे विधायक वातावरण निर्माण करण्यात ते निश्चितपणे यशस्वी झाले आहेत. आतापर्यंत, गेल्या बारा-तेरा वर्षांत मंत्री या नात्याने विविध विभागांत त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. तथापि, मधुकररावांच्या कर्तृत्वाला सुयोग्य संधी शिक्षणविभागात लाभलेली दिसत आहे.

शिक्षण हे मानव जीवन सर्वार्थाने संपन्न करण्याचे महत्त्वाचे साधन आहे आणि या साधनाचा अभाव ही भारतीय इतिहासाची गेल्या अनेक शतकांची शोकांतिका आहे. लोकजीवन या साधनाने संपन्न व शक्तिशाली करण्याची अपूर्व संधी स्वातंत्र्यप्राप्तीमुळे मिळाली आहे व लहानसहान तांत्रिक विचारांची व अडचणींची पर्वा न करता धैर्याने शिक्षणाची लाट समाजाच्या शेवटच्या

थरापर्यंत पोहोचविली पाहिजे. ही माझी श्रद्धा आहे. शिक्षणक्षेत्रातील सर्व कार्यक्रमांकडे पाहताना मी माझी ही कसोटी मानली आहे.

शिक्षणक्षेत्रात नवे कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी व नवे विचार व्यवहार्य पातळीवर समाजापुढे ठेवण्यासाठी अभ्यासपूर्वक सखोल तयारी करावी लागते. महाराष्ट्रासारख्या शिक्षणाची थोर परंपरा-व तीही शासनाबाहेरील कामाची असलेल्या राज्यात शिक्षण मंत्र्याचे काम स्वाभाविकपणेच अवघड झालेले आहे. परंतु या अवघड क्षेत्रातही मधुकररावांनी अवघ्या पाच-सहा वर्षांत लहानमोठ्या असंख्य कामांना चालना दिली आहे. कृतिशीलता हा त्यांचा मनोधर्म बनलेला दिसत आहे.

गुंतागुंतीच्या शैक्षणिक समस्यांची उकल श्री. चौधरी सहजतेने करतात. त्यांची वक्तृत्वशैली दमदार आहे. मराठी भाषेचा वापर ते अत्यंत समर्थपणे करतात. शिक्षणाचे तत्त्वज्ञान असो, कार्यक्रमांचा तपशील असो, शिक्षकांचे अगर शिक्षणसंस्थांचे प्रश्न असोत अगर शिक्षणाच्या आर्थिक जबाबदारीचा प्रश्न असो- या कोणत्याही बाबीवर मधुकरराव सारख्याच अधिकारवाणीने बोलताना दिसून येतात. तत्त्वज्ञान व तपशील यासंबंधी त्यांना सारखेच आकर्षण वाटते, असे आढळून येते. शिक्षणाचे धोरण ठरविण्याची जबाबदारी ज्या व्यक्तीवर आहे, त्या व्यक्तीमध्ये जो समतोलपणा असावा लागतो, तो मधुकररावांमध्ये आहे, ही समाधानाची बाब आहे. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय विकासाशी व सामाजिक परिवर्तनाशी शिक्षणाचा जो घनिष्ठ संबंध आहे, त्याची तीव्र जाणीव मधुकररावांना झालेली आहे. त्यामुळे वर ज्या कसोटींचा मी उल्लेख केला आहे, ती ते दृष्टीआड होऊ देणार नाहीत, अशी आशा आणि विश्वास मला आहे.

मधुकररावांनी संसदीय राजकारणाच्या धकाधकीच्या क्षेत्रात १९५७ साली प्रवेश केला, त्या वेळी त्यांचे वय अवघे सव्वीस-सत्तावीस असावे. स्वातंत्र्योत्तर काळात, नव्या समस्यांची जाणीव असणारे व त्या सोडविण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करणारे जे विचारी व कर्तृत्वसंपन्न तरूण महाराष्ट्राच्या नव्या पिढीतून वर येत आहेत, त्यांत श्री. चौधरी यांचे स्वतःचे म्हणून एक स्थान आहे. महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राला नवा आकार देण्यासाठी त्यांची जी धडपड चालू आहे, ती लक्षणीय आहे.

# ३७... डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्

भारत स्वतंत्र झाल्यानंतर ज्या कर्तृत्ववान बुद्धिमंतांना पं. नेहरूंनी प्रारंभीच्या काळात एकत्र आणले, जवळ केले, त्यांत डॉ. राधाकृष्णन् यांचे स्थान स्वतंत्र होते. डॉ. राधाकृष्णन् यांनी पूर्वायुष्यात केलेली अखंड ज्ञानोपासना, भारतीय तत्त्वज्ञानाचे भाष्यकार व मीमांसक म्हणून असलेली त्यांची ख्याती, विद्यापीठाच्या शिक्षण क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून त्यांची असलेली कीर्ती ही सर्व पार्श्वभूमी त्यांच्यामागे होतीच. पण भारताच्या नवरचनेच्या प्रारंभ-पर्वातील प्रश्न सोडविताना अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांना सामोरे जावयाचे होते. याची जाणीव राष्ट्रीय नेत्यांना होती. भारत म्हणजे नुसता भौगोलिक मर्यादा असलेला किंवा राजकारणाच्या गरजेतून निर्माण झालेला देश नव्हता, तर राष्ट्र म्हणून त्याच्यामागे प्राचीन समृद्ध सांस्कृतिक व्यक्तित्व होते. अशा वेळी त्या परंपरेची डोळस जाण असलेल्या, त्यातील सनातन मूल्यांचा वेध घेण्याची बौद्धिक क्षमता असलेल्या, पण आधुनिकतेचे भान असलेल्या व त्या परंपरेचा आधुनिकतेशी मेळ घालू शकणाऱ्या दार्शनिकाची देशाला गरज असते.

डॉ. राधाकृष्णन् यांच्याकडे स्वतंत्र भारताच्या नेत्यांनी याच अपेक्षेने पाहिले. डॉ. राधाकृष्णन् यांची कामगिरी या दृष्टीने फार मोलाची आहे. राधाकृष्णन् यांचे जीवन प्रशांत होते, त्यात खळाळ नव्हता. पण त्याला आतूनच एक ओढ होती. त्यामुळे ते गतिमान होते. इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटनांनी किंवा डोळे दिपविणाऱ्या नाट्यमयतेने त्यांचे जीवन भरलेले नव्हते. ते सामान्य माणसांना सहजासहजी आकर्षित करणारे जीवन नाही. म्हणूनच त्याचे महत्त्व मुद्दाम समजावून सांगितले पाहिजे. दार्शनिक मुत्सद्दी, स्वतंत्र भारताच्या ध्येयधोरणाचे मार्मिक भाष्यकार म्हणून देशात आणि परदेशांत डॉ. राधाकृष्णन् यांनी केलेली कामगिरी भारत विसरणार नाही.

डॉ. राधाकृष्णन् यांनी परदेशांतील भारतीय राजदूत म्हणून केलेली कामगिरी किंवा वेळोवेळी परदेशांत दौरे काढून निर्माण केलेली भारताविषयीची सदिच्छा यांना राजकीय महत्त्व आहे. रशियातील त्यांची कारकीर्द यशस्वी ठरली होती. विशेषतः, त्यांनी स्टॅलिनशी जोडलेले आपुलकीचे संबंध म्हणजे

डॉ. राधाकृष्णन् यांच्या ऋजू, अनौपचारिक व्यक्तित्वाचा विजय होता. त्यांची ही अनौपचारिकता राष्ट्रपतिभवनातही त्यांनी संभाळली. सर्वांशी ते मनमोकळेपणाने, अनौपचारिकतेने वागत. त्यामुळे कोणालाही ते जिंकत असत. पण हा त्यांचा साधेपणाही शोभिवंत होता.

डॉ. राधाकृष्णन् यांच्या वक्तृत्वाची त्यांची स्वतःची अशी खास शैली होती. ते मंत्रमुग्ध करणारे होते. संमोहक होते. वक्त्याचे कोणतेही हावभाव नाहीत. आवाजाची फेक नाही. त्यातील नाटकी चढ-उतार नाहीत. मनाला स्पर्श करणारे भावनापूर्ण शब्द नाहीत. अशी कोणतीही रूढ लक्षणे त्यांच्या वक्तृत्वात नव्हती. तरीही ते प्रभावी ठरे. कारण त्यांच्या भाषणात भावनांपेक्षा बौद्धिकतेला आवाहन असे. सरस्वती तर त्यांचेवर सदैवच प्रसन्न असे.

त्यांची इंग्रजी भाषा इंग्रजांनाही मोहित करणारी होती. किमान शब्दांत जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे त्यांचे कसब विलक्षण होते. विचारमौक्तिकांच्या सरी डोळ्यांसमोर येत आहेत, असे वाटे. त्यांची शब्दकळा दार्शनिकाची होती. वाणी 'सुभाषित' होती. संस्कृतमधील अर्थपूर्ण व समयोचित वचने हे तर त्यांचे खास वैशिष्ट्य होते. पण त्यांची ही उद्‌धृते बाहेरून जोड लावल्यासारखी वाटत नसत. विचारांच्या विणीत बसविलेली असत. डॉ. राधाकृष्णन् यांचे शब्दलावण्य विचारगांभीर्य व अर्थघनता आणि या सर्वांना आपल्याबरोबर खेचून नेणारा त्यांचा ओघ ही त्यांच्या वक्तृत्वाची वैशिष्ट्ये प्राध्यापकीय नव्हती; खरे तर, ते ईश्वरी देणे होते.

- आणि या ओघवती वाणीवरून जन्मभर लक्षात राहील, अशी एक आठवण सांगण्यासारखी आहे.

काही वर्षांपूर्वी मी जागतिक बँकेच्या बैठकीसाठी वॉशिंग्टनमध्ये होतो. बैठकीच्या एका संध्याकाळी अधिकृत स्वागत-समारंभ होता आणि या समारंभात अक्षरशः शेकडो माणसे होती. भरलेले ग्लास घेऊन इतस्ततः हिंडणारे वेटर्स, हास्यविनोदाची खळखळ, गटागटाने चाललेल्या संभाषणाच्या आवाजाने, खरे म्हणजे, काही ऐकावयासही येणे अवघड. अध्यक्षांना भेटून हस्तांदोलनाने हजेरी देऊन मी अधून मधून भेटणाऱ्या ओळखीच्या चेहऱ्यांना मानेने दाद-देत बाहेर पडणाऱ्या दरवाज्याकडे निघालो होतो.

- आणि इतक्यात वाटेत पासष्ट-सत्तरच्या दरम्यानच्या एका गृहस्थाने मला अडविले आणि त्याने आपले नावही सांगितले. परंतु मला त्या गोंगाटात

ते स्पष्ट ऐकू आले नाही. त्याने मोठ्या आवाजात सांगितले,

'मला तुम्हांला एक प्रश्न विचारावयाचा आहे.'

मी त्या गृहस्थाचा हात हातात घेतला व प्रवेशद्वाराजवळ त्याला नेले. तेथे गोंगाट कमी होता. संभाषण शक्य होते. मी त्यांना म्हटले,

'जरूर विचारा तुमचा प्रश्न'

मी सुटाबुटात होतो. परंतु डोक्यावर गांधी टोपी होती. त्या टोपीकडे किंचितसे पाहत त्यांनी विचारले.

'तुमचे ते तत्त्वज्ञानी प्राध्यापक प्रेसिडेंट डॉ. राधाकृष्णन् सध्या कुठे असतात?'

मी सांगितले,

'आता ते निवृत्त झाले आहेत व वृद्धापकाळामुळे आजारी अवस्थेत मद्रासमध्ये असतात.' मी विचारले, 'आपले काही काम, काही निरोप आहे त्यांच्यासाठी?'

'नाही, नाही, निरोप वगैरे काही नाही. माझी त्यांची ओळखही नाही. तीस वर्षांपूर्वी लंडनमध्ये माझ्या तरूणपणी मी त्यांचे एक व्याख्यान ऐकले आहे. अशी ओघवती वाणी मी पुन्हा ऐकलेली नाही. मी तुमचा हिंदुस्थान पाहिलेला नाही. पण त्या भाषणामुळे, I can well imagine what the flow of Ganges must be like. Oh! What a pity- he is old and ill.'

सचिंत चेहऱ्याने माझ्याशी हस्तांदोलन करून तो गृहस्थ स्वागत - समारंभाच्या गर्दीत मिसळूनही गेला.

मी मात्र काही क्षण तेथेच उभा होतो. ज्याने कधी गंगा पाहिली नाही, त्याला, डॉ. राधाकृष्णन यांच्या ओघवती वाणीने गंगौघ कसा असेल, याचे दर्शन झाले. या अनुभवाने मी काहीसा अंतर्मुख झालो आणि हृषीकेशजवळ पर्वतराजीतून खाली उतरून हरिद्वारकडे जाणारा गंगेचा प्रशान्त प्रवाह आणि बोलण्यासाठी उभी राहिलेली डॉ. राधाकृष्णन् यांची मूर्ती माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली.

दिल्लीतील यांच्या वास्तव्यात उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपती ही दोन सर्वोच्च पदे त्यांनी भूषविली. या सर्व काळात अनेक महत्त्वाच्या राजकीय घटना घडल्या. अनेक वादळी प्रसंगांतून देशाला जावे लागले. या प्रसंगी त्यांचे

मौलिक मार्गदर्शन राज्यकर्त्यांना लाभले. त्यांच्याशी चर्चा करणे ही एक बौद्धिक मेजवानी असे. राष्ट्रपती झाल्यानंतर भारतीयांना एका अर्थाने पितृछत्रच मिळाले होते. तत्त्वज्ञ राज्यकर्ते व्हावेत, अशी ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोची मनीषा होती. भारतात ती पूर्ण झाली. डॉ. राधाकृष्णन् राजकारणात वावरत होते. त्यांच्यांत स्थितप्रज्ञता होती, ती तत्त्वज्ञाची होती. पण त्याचबरोबर त्यात पित्याची आस्था होती, आणि जिज्ञासा होती, ती प्राध्यापकाची. राज्यसभेचे सभापती म्हणून त्यांनी आपला दबदबा निर्माण केला, तो त्यांच्या समतोलपणामुळे.

डॉ. राधाकृष्णन् यांचे विचारधन फार मोठे आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून त्यांनी लिहिलेले ग्रंथ जगन्मान्य झाले आहेत. युरोप-अमेरिकेत गांधीजी, रवींद्रनाथ टागोर यांच्याइतकेच डॉ. राधाकृष्णन् यांचे नाव या त्यांच्या विचारधनामुळेच लोकांना माहिती आहे. डॉ. राधाकृष्णन् हे आस्तिक होते. त्यांची आस्तिकता शास्त्रपूत होती. भारतीय संस्कृती हा सर्व समावेशक असा गतिमान प्रवाह आहे, अशी त्यांची धारणा होती.

परिवर्तनशीलता व गतिशीलता ही नव्या विश्वसंस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत. या संस्कृतीशी भारतीय संस्कृती आपला सांधा बेमालूमपणे जोडू शकेल, असा त्यांचा विश्वास होता. डॉ. राधाकृष्णन् यांचे विचारमंथन याच सूत्रानुसार चालत असे. त्यामुळे ते सतत काळाबरोबरच राहिले. प्राचीनतेवर श्रद्धा ठेवूनही आधुनिक राहिले, ते आधुनिक भारतीयतेचे सूक्तकार होते. म्हणूनच राजनैतिक क्षेत्रात त्यांना मान होता; आणि तत्त्वज्ञांच्या व बुद्धिमंतांच्या जगामध्ये क्रियावान पंडित म्हणून त्यांच्याकडे सारे जागतिक दर्जाचे बुद्धिवंत पाहत असत. असे दुहेरी श्रेष्ठत्व क्वचितच मिळते. तो मान डॉ. राधाकृष्णन् यांना मिळाला. म्हणून त्यांच्याबद्दल भारतीयांना अभिमान वाटत राहील.

# ३८... तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

महाराष्ट्रातील प्रसिद्ध विद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा या महिन्यात ऐंशीवा वाढदिवस साजरा होत आहे, याबद्दल त्यांचे मनः पूर्वक अभिनंदन ! या निमित्ताने त्यांच्यासंबंधी गेली पन्नास वर्षे माझ्या मनात वसत असलेला आदरभाव व्यक्त करण्याची महत्त्वपूर्ण संधी मला मिळालेली आहे.

मी तर्कतीर्थंना प्रथम पाहिले, ते १९३० च्या कायदेभंगाच्या आंदोलनात. कराड येथील कृष्णेच्या घाटावर भरगच्च गर्दीच्या एका सभेत, वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचा एक तरूण शास्त्री महात्मा गांधींच्या असहकाराच्या चळवळीत आपले प्रेरणादायक विचार मांडीत होता. उघड्या अंगावर बंगाली पद्धतीने घेतलेली खादीची शाल, चेहऱ्यावर विद्वतेचे प्रखर तेज, अशी त्यांची मी पाहिलेली मूर्ती मला आजही आठवते; आणि त्यांच्या त्या दिवशीच्या व्याख्यानातील एक वाक्य माझ्या मनात कायमचे घर करून राहिले आहे. ते सांगत होते,

'मी माझ्या गुरूंच्या पायांशी बसून सहा शास्त्रांत पारंगत झालो आहे; आणि आता मला या शास्त्रांचे रूपांतर शस्त्रांत करावयाचे आहे. ही मोठी शास्त्रे आता शस्त्रे बनली नाहीत, तर हिंदुस्थानात कायमची गुलामगिरी राहील.'

भारताच्या पारतंत्र्याची कारणमीमांसा इतक्या थोड्या व नेमक्या शब्दांत केलेली मी पूर्वी ऐकली नव्हती.

त्या चळवळीत त्यांचा - माझा परिचय झाला. पुढे क्रमाक्रमाने परिचयाचे रूपांतर राजकीय सहकार्य व हळूहळू गाठीभेटींत व पुढे मैत्रीत झाले.

गेल्या पन्नास वर्षांच्या या काळात त्यांच्याशी माझा निव्वळ राजकीय संबंध आला, असे नव्हे, तर त्यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक कार्यांशीही माझा संबंध येत गेला. शास्त्रीबुवांचे व्यक्तिमत्त्व हे एक स्वतंत्र आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा जसा भारतीय संस्कृती, इतिहास, साहित्य व तत्त्वज्ञान यांचा गाढा व्यासंग आहे, तसाच मार्क्सवाद व इतर पाश्चिमात्य तत्त्वज्ञान व इतिहासाचा खोल अभ्यास आहे. या सर्व व्यासंगातून जे व्यक्तिमत्त्व उभे राहते; ते एक प्रकारचे अपूर्व असे व्यक्तिमत्त्व आहे. त्या व्यक्तिमत्त्वाला तीक्ष्ण बुद्धिमत्तेची

व समतोल विचारशक्तीची झालर लागली आहे.

त्यांच्या जीवनामध्ये राजकीय विचारांची वाढ एक विशिष्ट पद्धतीने झाली आहे. १९३० साली ते गांधीजींच्या सत्याग्रहाचे सैनिक होते. १९४० च्या आधीच मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मानवतावादी आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा त्यांनी स्वीकार केला. १९५० नंतर राजकारणाचा समतोल त्यांनी साधला, असे मला वाटते. पण ह्या सर्व कालखंडात त्यांची जीवनदृष्टी सुसूत्र अशीच राहिली. करूणा आणि मानवतावाद यांवर आधारलेली राष्ट्रीयता व वैचारिक क्रांतीची तितिक्षा, त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक समतेसाठी मनात उठलेला कल्लोळ ही त्यांची वैशिष्टये आहेत. विद्वत्तेमुळे कधी कधी येणारा एकांगीपणा शास्त्रीजींच्यामध्ये कधीच दिसला नाही; त्याचे कारण त्यांची बौद्धिक निष्ठा वैचारिक प्रामाणिकपणावर अवलंबून आहे. जे विचाराने स्वीकारले, ते पडेल ती किंमत देऊन त्यांनी आचरिले आहे. आपल्या विचारश्रद्धेसाठी त्यांनी अनंत कष्ट सोसले आहेत. १९३०-३२ च्या आंदोलनात भोगलेला कारागृहवास, रॉयवादाचा अत्यंत कठीण काळात पुरस्कार करताना सहन करावी लागलेली अप्रियता त्यांनी आनंदाने सहन केली आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या वैचारिक क्रांतिकार्याची महनीयता महाराष्ट्राच्या बुद्धिमंतांना मानावयास लावण्यात त्यांचा महत्त्वाचा पुढाकार होता. ते आपल्या विचारांतील भिन्नता व्यक्त करतात; परंतु त्यात कटुता कधीच नसते.

गेली वीस वर्षे त्यांनी साहित्य संस्कृति मंडळाचे अध्यक्ष व विश्वकोश कार्याचे प्रमुख संपादक म्हणून जे कार्य केले आहे, ते मराठी भाषेच्या विकासाच्या इतिहासातील एक प्रमुख कार्य म्हणून गणले जाईल. विश्वकोश व साहित्य - संस्कृति मंडळाचे कार्य सुरू करावे, असा निर्णय मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र सरकारने घेतला. त्या वेळी हे काम कोणावर सोपवावे, असा प्रश्नच माझ्यापुढे उभा राहिला नाही. कारण तेव्हा तर्कतीर्थांसारखी सुयोग्य व्यक्ती माझ्या नजरेपुढे उभी होती. आणि वीस वर्षांनंतर मी मागे वळून पाहतो, तेव्हा ती एक अतिशय उचित अशीच गोष्ट झाली; असे मला नेहमी वाटते. त्यांचे धर्मकोशाचे कार्य तर सर्व भारतीय विद्वानांना विदित आहे.

तर्कतीर्थ एक उत्तम गृहस्थी आहेत. तसेच प्रेमळ मित्रही आहेत. त्यांच्या घरी अनेक वेळा जाण्याचा मला प्रसंग आला आहे. त्यांच्या कै. पत्नी हयात असताना त्यांच्या संसारातील आतिथ्यशील पाहुणचार मी अनेकदा घेतला आहे. ते गृहस्थी असले, तरी त्यांचे मन खालच्या पातळीवर कधीच नसते. ते

नेहमीच तत्त्वचिंतनात गर्क असलेले दिसतात.

शास्त्रीजींशी झालेले संभाषण म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच असते. म्हणून अशी संधी वारंवार उपलब्ध करण्याचा प्रयत्न करतो. माझ्या या सवयीमुळे काही मंडळी ते माझे गुरू व मी त्यांचा शिष्य, असे सुचविण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु त्यांचे माझे गुरूशिष्याचे नाते नाही; तर ते आहे एक थोर विद्वानाच्या चाहत्याचे व जिव्हाळ्याच्या स्नेहाचे.

महाराष्ट्राला आज अभिमान व आनंद आहे, की तर्कतीर्थांच्या कर्तृत्वाचा विद्वान आमच्यांत अजून क्रियाशील आहे. आज आपल्या प्रिय पत्नीच्या निधनानंतर ते थोडेसे एकाकी वाटतात; परंतु त्यांनी आपले मन कामात व्यग्र ठेवले आहे आणि एका अर्थाने आपल्या गुरूदेवांसारखेच जीवन ते व्यतीत करीत आहेत, असे वाटते. मी स्वतःला एका अर्थाने भाग्यशाली समजतो, की अशी तोलामोलाची विचारवंत व्यक्ती सहकारी व मित्र म्हणून मला लाभली, या मैत्रीबद्दल मी कृतज्ञ आहे.

## ३९... कृ.भा. ऊर्फ अण्णासाहेब बाबर

कै. कृ.भा. ऊर्फ अण्णासाहेब बाबर ही महाराष्ट्रातील, ज्यांनी शिक्षण व सार्वजनिक क्षेत्र, तसेच, सार्वजनिक जीवनाला आपले म्हणून काही देऊ केले, अशा बोटांवर मोजण्याइतक्या थोड्या लोकांपैकी एक व्यक्ती आहेत. त्यांच्या जीवनासंबंधी हा लेख लिहिताना मला माझ्या लहानपणची आठवण येते.

मी मराठी शाळेत शिकत असताना आमच्या सातारा जिल्ह्यात एक नवी चळवळ सुरू होती. शिक्षणाचा प्रसार व्हावा, गोरगरिबांच्या मुलांनी खूप शिकावे, काही महत्त्वाकांक्षा धरून काम करीत राहावे, असे एक वातावरण बहुजन समाजात पसरविण्याचे कार्य काही प्रमुख शिक्षक मंडळी करीत होती. त्या वेळच्या सातारा जिल्ह्यात (म्हणजे आजचा सातारा-सांगली जिल्हा ) जे जे क्रियाशील शिक्षक होते, त्यांत अग्रेसर कै.अण्णासाहेब बाबर होते. त्यांना सर्व शिक्षक-वर्गात अतिशय आदराने वागविले जात असे. आम्ही ज्या मराठी शाळेत शिक्षण घेत होतो, तिथे त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्या वेळी गुरूजी बाबरांचे विद्यार्थ्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत सुरेख भाषण ऐकल्याचे मला आजही स्मरते.

त्यांनी शिक्षकांची एक जागृत संघटना उभी केली. त्यांनी हे काम भाषण करून, लेख लिहून सुरू केले आणि त्यामुळे लेखनाचे व भाषणाचे काम त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत चालू होते. ती त्यांची एक महत्त्वाची सवय झाली होती. सातारा जिल्ह्यात सर्वत्र माहिती असलेली ती दहा-पाच नावे होती, त्यांत कै. कृ. भा. बाबर हे नाव प्रमुख होते.

एक उत्तम शिक्षक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला होता. परंतु बहुजन समाजाचे आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या कामांतही त्यांनी मार्गदर्शन केले होते. तरूण मुलांना उच्च शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, शिकलेल्यांना नोकरी मिळवून देण्याकरिता साहाय्य करणे, नवीन काय काय वाचावे, याची माहिती आग्रहपूर्वक मुलांना पुरविणे, आपले आचार-विचार कसे संस्कृतिसंपन्न असले पाहिजेत, हे शिक्षकांना पटवून त्यांच्या मार्फत ते

विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. मला आठवते, त्यांनी शिक्षक असताना 'विद्यार्थी सीताराम' ही छोटीशी पुस्तिका लिहून प्रकाशित केली होती. श्री. सी.रा.तावडे यांचे ते चरित्र होते. श्री. सीताराम तावडे यांनी गरिबीची परिस्थिती असतानाही परिश्रमपूर्वक अभ्यास करून विद्वत्ता संपादन केली व उच्च पदाच्या नोकरीपर्यंत ते पोहोचले. याची त्यांनी सोप्या व मनोरंजक भाषेत ओळख करून दिली होती. त्यांनी लहान मुलांमध्ये एक महत्त्वाकांक्षा निर्माण केली, याचा साक्षीदार मी आहे. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वामुळे एक उत्तम शिक्षक व सामाजिक नेता ही त्यांची भूमिका तयार झाली.

त्यांचा-माझा प्रत्यक्ष परिचय पुढे मीही सार्वजनिक कामात पडल्यानंतर वाढत गेला. त्यांच्या मुलीही शिक्षण घेत होत्या. विशेषतः, त्यांची थोरली कन्या डॉ. सरोजनी बाबर या शरीराने अधू आहेत. परंतु शिक्षणाच्या बाबतीत त्यांना अधू ठेवावयाचे नाही, ही अण्णांची प्रतिज्ञा होती, ती त्यांनी पुरी पण केली, कु.आक्कातार्इंना त्यांनी आपले सर्व संस्कार पूर्ण दिले होते. पुण्यात घरात करून राहिल्यानंतर त्यांचा पुण्यातील विद्वान मंडळींमध्ये राबता सुरू झाला आणि या परिचयाच्या संस्काराची आक्कातार्इंना मदत झाली. त्यांनी आक्कातार्इंना लेखनास प्रवृत्त केले, मदत केली आणि संशोधनात्मक विषय त्यांनी घ्यावा, असा आग्रह धरला. त्याचेच परिणत स्वरूप म्हणजे आजच्या डॉक्टर सरोजिनी बाबर या आहेत.

शैक्षणिक क्षेत्रातील सुसंस्कृत विचारांना त्यांनी आपल्या जीवनात महत्त्व देऊन, ते संस्कार त्यांनी आपल्या कुटुंबीयांत पसरविले. ते निवृत्त झाल्यानंतर व त्याआधीही त्यांचा राजकारणाकडे ओढा होता. त्यांचे राजकारण कोणत्या एका पक्षाचे नव्हते. बहुजन समाजात कार्य करणाऱ्या कर्त्या-सवरत्या मंडळींना मदत करणे, सल्ला देणे, चर्चा करणे या प्रकारचे सहकार्य करून त्या कामाला ते एक नवी बैठक देण्याचा प्रयत्न करीत होते. त्या वेळी सांगली जिल्ह्यात काम करणारे आजचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांचे त्यांच्याशी संबंध याच कारणाने आले आणि कै. अण्णासाहेबांचे घर वसंतरावांचे घर झाल्यासारखे झाले होते. १९४८ नंतर श्री. भाऊसाहेब हिरे महाराष्ट्राच्या राजकारणात काम करू लागले. त्या वेळी त्यांच्याशी कै. अण्णांचा मोठा राजकीय घरोबा तयार झाला. श्री. भाऊसाहेब हिरे अण्णासाहेबांची नुसती विचारपूस करीत नसत, तर ते त्यांचा अधून-मधून सल्लाही घेत असत, हे मला माहिती आहे. पुढे त्यांच्याच आग्रहाने डॉ. सरोजिनी बाबर यांनी निवडणुकीच्या

राजकारणात प्रवेश केला व त्या बरीच वर्षे विधानसभा व राज्यसभा यांत काम करीत होत्या. अर्थात आम्ही सर्व मंडळी त्यांना याबाबत मदत करीत होतो. विशेषतः, मी कै. अण्णांना अतिशय आदर देत असे. ते कधी आपुलकीने मुद्दाम घरी चहाला किंवा जेवावयास बोलावून घेत असत. मग त्यांच्याशी तास-दोन तास चर्चा व गप्पा होत असत. त्यांतून काही तरी महत्त्वाचे बरोबर घेऊन गेल्यासारखे वाटत असे. कारण अशा चर्चेतून ते चांगल्या वाचलेल्या पुस्तकांची माहिती देत. पुण्यातील सर्व ज्ञानी विद्वानांत ऊठ-बस असल्यामुळे त्यांच्या मताचीही ते माहिती देत. म्हणून कै. अण्णांचा सहवास म्हणजे एक विचारांची उत्तम शिदोरी होती.

आज अण्णा नाहीत. परंतु अण्णांनी सुरू केलेली समाज शिक्षण माला आजही चालू आहे. अण्णांचे काम ती पुरे करीत आहे. साक्षरांमध्ये ज्ञानप्रसारही व्हावा. ही त्यांची या कामातील प्रेरणा आहे. हा माझ्या मताने त्यांनी ठेवलेला फार मोठा वारसा आहे. आक्काताईंनी तो पुढे चालू ठेवला आहे, ही त्यांची पितृभक्ती अभिनंदनीय आहे.

कै. अण्णांच्या स्मृतीस माझे अभिवादन.

# ४०... डॉ. धनंजयराव गाडगीळ

कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या जीवनाला कृतार्थ जीवन म्हणता येईल. एकोणिसाव्या शतकात आपले विशिष्ट ध्येय निवडून, त्याला जीवन वाहून घेऊन निग्रहाने सेवा करणाऱ्या ध्येयवादी पुरूषांची जी परंपरा महाराष्ट्रात सुरू झाली, त्याच परंपरेचे डॉ. गाडगीळ हे प्रतीक होते. डॉ. गाडगीळांवर न्या. रानडे, लो. टिळक व गोपाळराव गोखले या तिघांचे संस्कार झाल्यामुळे त्यांना समग्र व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले होते. न्या. रानड्यांची शास्त्रीय दृष्टी, गोखल्यांची सखोल व चौफेर व्यासंगी वृत्ती व टिळकांची लोकाभिमुखता, कठोर व निग्रही बाणा यांच्या संस्कारांतून गाडगीळांचे व्यक्तित्व घडविले गेले होते. त्यामुळे गाडगीळ महाराष्ट्रातील व भारतातील राजकीय स्थित्यंतराबरोबर जी तितकीच महत्त्वाची सामाजिक व आर्थिक क्रांती होत होती, तिचे द्रष्टे पुरूष ठरले.

पण केवळ बौद्धिक सखोलता किंवा द्रष्टेपणा एवढेच गाडगीळांचे वैशिष्ट्य नव्हते. गाडगीळांनी केवळ तत्त्वचिकित्सा किंवा बौद्धिक काथ्याकूट केला नाही. गाडगीळांची प्रतिभा व प्रज्ञा सर्जनशील होती. एखाद्या प्रश्नाची मूलगामी चिकित्सा ते करीत आणि त्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एखादी योजना व आराखडा सुचवत, सैद्धांतिक आग्रह व त्याला जोडून कार्यक्रम असे त्यांचे नियोजन असे, त्यातूनच त्यांची सामाजिक समीक्षा, व्यवहारी दृष्टी यांचा प्रत्यय येत असे. या सर्व चिंतनाची मूळ प्रेरणा समाजहित ही होती. दरिद्री बहुजनसमाजाच्या हितासाठी, सुखासाठी गाडगीळांनी काही आग्रह धरले. एका अर्थाने गाडगीळ 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' या थोर तत्त्वाचे प्रतीक होते. त्यांच्या उपाययोजनेशी मतभेद झाले, तरी त्यांची जी आधारभूत सामाजिक दृष्टी होती, तिच्याबद्दल कधीच कोणाला शंका वाटली नाही. हे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कारण आर्थिक व सामाजिकदृष्ट्या ज्या वर्गात आपण जन्मतो व वावरतो, त्याच्या पलीकडे जाऊन बहुजनसमाजाच्या सुखदुःखांशी समरस होणे किंबहुना त्याच्याच दृष्टिकोनातून सर्व प्रश्नांकडे पाहणे, त्यासाठी कार्यशील होणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. म्हणूनच

गाडगीळांनी महाराष्ट्रातील व भारतातील बुद्धिमंतांत स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण करून ठेवले आहे.

डॉ. गाडगीळांच्या जीवनाची व व्यक्तित्वाची ही जी बैठक होती, तीतूनच त्यांचे जीवनकार्य साकार झाले, हे करत असताना गाडगीळांच्या संघटनकौशल्याची प्रचीती महाराष्ट्राला आली. गाडगीळांमध्ये एक प्रकारची अलिप्तता होती, पण त्या अलिप्ततेत अलगपणाची भावना नव्हती. म्हणून निरक्षर लोकांशी, अडाणी समजल्या गेलेल्या शेतकऱ्यांशी किंवा सर्वसाधारण कार्यकर्त्यांशीही ते समरस होऊन वागत. त्यांनी सहकारी संस्था उभारल्या, चालविल्या व त्यांसाठी लागणारे सुजाण नेतृत्व स्वतःच निर्माण केले व आपले आर्थिक विचार व सिद्धान्त यांची एक प्रयोगशाळा महाराष्ट्रात निर्माण केली. म्हणून गाडगीळ हे नुसते आर्थिक तज्ज्ञ नव्हते, तर ते निर्माते होते. कोणतीही निर्मिती करण्यासाठी लागणारे चातुर्य, कौशल्य, दूरदृष्टी व संघटनकौशल्य गाडगीळांनी दाखविले. म्हणून गाडगीळ आधुनिक महाराष्ट्राचे द्रष्टे पुरूष, तत्त्वचिंतक व रचनाकार होते, हे निःसंशय आहे.

गाडगीळांनी आयुष्यभर अनेक समित्यांवर काम केले. त्या सर्वांचे मूल्यमापन तज्ज्ञ करतीलच. ते एक आदर्श अभ्यासक असल्याने कोणत्याही समितीवर काम करताना हाती घेतलेल्या विषयाचा सखोल अभ्यास करीत. दोन-तीन उदाहरणे देता येतील.

ग्रामीण अर्थकारण हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय. त्यातील अनेक समस्यांचा विचार व त्यांवर उपाययोजना त्यांनी वेळोवेळी केली. ग्रामीण पतपुरवठा, लहान उद्योगधंदे, सहकारी अर्थव्यवस्था, पाटबंधाऱ्याचे प्रश्न या सर्व विषयांवर त्यांनी केलेल्या सूचना वेळोवेळी सरकारी धोरणात समाविष्ट झाल्या. ग्रामदानाच्या कल्पनेतही त्यांनी असाच सखोल अर्थ पाहिला आणि त्याचा पुरस्कार केला. लहान शेतकऱ्यांचा प्रश्न, भूमिहीन मजुरांची समस्या यासंबंधीही त्यांची भूमिका अतिशय जिव्हाळ्याची व सहानुभूतीची होती.

गाडगीळांच्या अर्थकारणाचा संकलित व समग्र विचार कोणत्याही सरकारला अपरिहार्य ठरेल. गाडगीळांची नियोजनाविषयीची मते १९५० पासून त्यांनी सातत्याने, कठोरपणे व निर्भीडपणे मांडली. त्यामागेही त्यांची भारताच्या ग्रामीण अर्थकारणासंबंधीची भूमिका हीच प्रभावी होती. किंबहुना गाडगीळांनी जिल्हा हा घटक मानून नियोजन केले पाहिजे, हा विचार अत्यंत प्रभावीपणे दिल्लीला आल्यावरही मांडला व त्याची अंमलबजावणी करण्याचा

प्रयत्न केला. वर्धा जिल्हा योजना हे त्यांच्या जिल्हा नियोजनाच्या कल्पनेचे मूर्त रूप होते. अखिल भारतीय आर्थिक समस्यांची त्यांची उकलही केवळ सैद्धान्तिक नसे. प्रत्यक्ष व्यवहाराच्या मर्यादा, आपली सामाजिक, राजकीय स्थिती यांचा समग्र विचार करून नियोजन मंडळांचे मार्गदर्शन त्यांनी केले. त्यामुळे अत्यंत कठीण काळात भारतीय नियोजनाला त्यांची मदत झाली.

हे सर्व आकड्यांचे अर्थकारण करीत असताना डॉ. गाडगीळांना बदलत्या सामाजिक व राजकीय प्रवाहांचे भान असे. त्यांचे सामाजिक प्रक्रियांकडे, दैनंदिन जीवनात घडणाऱ्या क्रांतीकडे लक्ष असे. त्यामुळे गाडगीळ हे कधीही स्थितिशील झाले नाहीत. लोकशाहीवर ठाम निष्ठा, गरिबांच्या प्रश्नांची कणव आणि लोकहिताची साक्षेपी जपणूक करण्याचे त्यांचे धोरण या गाडगीळांच्या जीवनकार्याच्या मूलभूत निष्ठा मानता येतील.

या सर्व निष्ठांमुळेच गाडगीळांचे जीवन व्रतस्थ झाले. त्यामुळे कडक आचरण व स्वनियमन आले. म्हणूनच लौकिक अर्थाने प्रसिद्धीच्या प्रकाशात न वावरता गोखले अर्थसंशोधन संस्थेचे काम सतत छत्तीस वर्षे एकाग्रतेने त्यांनी केले.

सहकारी चळवळीप्रमाणेच गाडगीळांचे शैक्षणिक कार्य व त्यांचे संयुक्त महाराष्ट्राचे वेळी झालेले अमोल साहाय्य महत्त्वाचे आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेचे गाडगीळ कार्याध्यक्ष झाले आणि आपल्या नेहमीच्या निष्ठेने, शिस्तीने व पद्धतशीरपणे त्यांनी ते काम केले. शिक्षण-प्रसाराच्या क्षेत्रात गाडगीळांची ही कामगिरी मोलाची आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला जी तात्त्विक व शास्त्रशुद्ध बैठक गाडगीळांनी दिली, ती फार मोलाची म्हणावी लागेल. ज्या वेळी भाषिक प्रश्नात लक्ष घालण्यास उच्च कोटीचे विद्वान तयार नव्हते, त्या वेळी गाडगीळांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत आपले विचार मांडले. किंबहुना गाडगीळांची भारतीय संघराज्याविषयीची संकल्पना स्पष्ट असल्याने त्यांनी संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा दिला.

डॉ. गाडगीळ यांचे महाराष्ट्राच्या व भारताच्या राष्ट्रीय जीवनातील स्थान स्वयंनिर्मित होते. त्यांचे कार्य अनेक विचारवंतांना व कार्यकर्त्यांना स्फूर्ती देत राहील, यांत शंका नाही.

# ४१... किसन वीर

१९३०-३२ च्या चळवळीच्या वेळी 'किसन वीर' हे नाव मी प्रथम ऐकले. कराड शहर व आसपासच्या खेड्यांत स्वातंत्र्य-चळवळीत काम करणारा मी एक कार्यकर्ता होतो. या वेळी वाई भागात काम करणाऱ्या या प्रमुख कार्यकर्त्याचे नाव मी साहजिकच ऐकत होतो. माझी त्यांची प्रत्यक्ष अशी भेट ३४-३५ च्या सुमारास झाली. उंच व बांधीव शरीर, मिशांचे आकडे आणि हसरा चेहरा ही त्यांची तीन वैशिष्ट्ये प्रथम मी जेव्हा पाहिली, तेव्हाच माझ्या मनात खिळून राहिली. हळूहळू आमच्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत होऊ लागले व १९४० ते ४२ च्या तीन वर्षांच्या काळात या ओळखीचे रूपांतर गाढ मैत्रीत झाले.

सातारा जिल्ह्याच्या स्वातंत्र्य-चळवळीत १९३० पासून किंबहुना त्याही पूर्वीपासून, ते आजपर्यंतच्या पस्तीस-चाळीस वर्षांच्या काळात आबांनी फार मोठी कामगिरी केली आहे. आपल्या वैयक्तिक संसाराची हानी तर त्यांनी सहन केलीच, तसेच, त्यांचा चांगला चाललेला व्यापार-धंदा डबघाईस आला. खेळलेले, कसलेले शरीर दुबळे झाले. कौटुंबिक प्रश्नांकडे लक्ष देण्यास सवड सापडली नाही. एक ना अनेक गोष्टी. पण जनमनाची शक्ती मिळविण्याचे काम मात्र त्यांनी चांगले साधले, कवठ्याच्या आबांच्या त्या छोटेखानी घरात कधी कधी मी त्यांना न कळविताच गेलो आहे व जेव्हा जेव्हा मी गेलो, तेव्हा तेव्हा पाच-पंचवीस कार्यकर्त्यांच्या घोळक्यात आबा सापडले नाहीत, असे कधीच झाले नाही. या त्यांच्या लोकसंग्राहक वृत्तीमुळे स्वाभाविकच उभ्या सातारा जिल्ह्यात आणि आजतर संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांना असंख्य मित्र आहेत.

किसन वीरांचे व्यक्तिमत्त्व खऱ्या कसोटीस उतरले, ते १९४२ साली. ९ ऑगस्ट, १९४२ रोजी क्रांतीचा श्रीगणेशा भारतभर झाला. मी मुंबईहून जो परतलो, तो भूमिगत कार्यकर्ता म्हणून, आणि त्यानंतरच्या आठवड्यात मी कवठे, वाई भागात गेलो. आबांची - माझी पुष्कळ चर्चा झाली. ही चळवळ नव्या तऱ्हेने कशी आखावी, त्यासंबंधी काही योजना झाल्या व भूमिगत राहण्याचा ठाम निर्णय घेऊन आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. मला आठवते,

मी त्या भूमिगत अवस्थेत असतानाही आबांनी कवठ्यास जाहीर सभेत माझे भाषण करवलेच. निघण्यापूर्वी आबांनी मला सांगितले, की काही काळजी करू नका, मी सहजासहजी पोलिसांच्या हाती सापडत नाही. मीही पुढचे मोठे काम करण्याची आशा मनात ठेवून कवठ्याहून निघून गेलो.

त्यानंतर थोड्याच दिवसांत वार्ता ऐकली, की किसन वीरांना पोलिसांनी पकडले. माझी निराशा झाली व माझी खात्री आहे, की आबांचीही निराशा झाली असेल. आबा जेलमधून निरोप पाठवीत असत. 'भूमिगत कार्य करण्याची इच्छा अतृप्त राहिली आहे. संधीची वाट पाहत आहे.' स्वाभाविकच माझा प्रथम प्रथम या निरोपांवर विश्वास बसत नसे. नंतर काही महिन्यांनंतर मला वाळवे तालुक्यातील एका गावी असताना निरोप मिळाला, की आबा त्यांच्या इतर साथीदारांबरोबर येरवडा जेल फोडून बाहेर पडले आहेत. या रोमांचकारी घटनेची वार्ता ऐकून माझ्या मनाला नवा हुरूप आला.

आबा जेलच्या बाहेर आले व त्यामुळे सातारा जिल्ह्याच्या भूमिगत चळवळीचा एक वेगळा इतिहास घडत गेला. बेचाळीसच्या क्रांतीचा जेव्हा खरा इतिहास लिहिला जाईल. तेव्हा इतिहासकारांना कबूल करावे लागेल, की किसन वीरांनी ही येरवड्याच्या भिंतीवरून मारलेली साहसी उडी म्हणजे सातारा जिल्ह्यातील त्या चळवळीचे नवे पाऊल होते. जेलच्या बाहेर उडी घेतलेल्या त्या क्षणापासून तो स्वातंत्र्य-प्राप्तीपर्यंतच्या सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य-चळवळीत आबांचे एक स्वतंत्र असे स्थान आहे आणि हे स्थान निर्माण करीत असताना त्यांनी जो लोकसंग्रह केला, जे संघटनाचातुर्य दाखविले, जी तत्त्वनिष्ठा व वैयक्तिक धैर्याची पराकाष्ठा दाखविली, त्या गुणांमुळे माझ्या अंतःकरणात आबांचे एक निश्चित असे मोठे स्थान निर्माण झाले आणि ते स्थान आजही कायम आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात अनेक घडामोडी झाल्या. निवडणुका झाल्या. मंत्रिमंडळे बनली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. काही निवडणुका ते हरले, तर काही जिंकले. मीही माझ्या राजकीय जीवनात क्रमाक्रमाने वाढत गेलो. कधी संकटात सापडलो व त्या संकटातून बाहेरही पडलो. हा जो अनेक घडामोडींचा संसार उभा राहिला, या सर्व घडामोडींच्या प्रपंचामध्ये मी ज्या थोड्या मित्रांवर निर्धास्तपणे अवलंबून होतो, त्यांमध्ये आबांचे स्थान फार वरचे आहे. त्यांनी जे मित्रप्रेम दिले, ते निव्वळ वैयक्तिक कारणाकरिता नाही. त्यामध्ये तत्त्वाची तपासणी होती. माझ्याशी आबा जेवढा वाद घालतात, तेवढा

फार थोडी माणसे घालत असतील; परंतु त्या वाद घालण्यात प्रांजळपणा असतो. किती लोकांना माहीत आहे, की वरून दिसणारी कणखर मूर्ती हृदयाने कोमल आहे. मित्रांसाठी व गरिबांसाठी कारूण्याचे अश्रू त्यांच्या डोळयांत उभे राहतात. संग्रामातील साथी म्हणून व खासगी जीवनातील मित्र म्हणून शोधू गेलात, तरी किसन वीरांसारखा माणूस मिळणार नाही. माझे भाग्य एवढे, की त्यांची ही साथ व मैत्री कुठेही शोधण्यासाठी न जाता माझ्या जीवनाच्या प्रवासात मला सहजासहजी मिळाली.

सहकारी चळवळीत त्यांनी मनापासून भाग घेतला. सातारा जिल्हा सहकारी बँक उभारण्याच्या कामात पुढाकार घेऊन त्यांनी महत्त्वाचे काम केले. अनेक कार्यकर्त्या-सवंगड्यांना भोवती जमा केले व नव्या कामाच्या दिशेने प्रयत्न सुरू केले. राजकीय क्षेत्रातही सर्व प्रश्नांबाबत प्रांतिक पातळीपासून तालुक्याच्या पातळीपर्यंत आबा सदैव जागरूक असत. सर्वांशी चर्चा करीत असत. कार्यकर्त्यांचे विचार स्पष्ट असले पाहिजेत व त्यांच्यापुढे ध्येयवादी दृष्टी असली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. त्यासाठी त्यांनी सातारा जिल्ह्यात कार्यकर्त्यांची अनेक शिबिरे संघटित केली. पुणे, मुंबई येथून विद्वान माणसांशी संबंध ठेवून या शिबिरांमध्ये ते व्याख्यानासाठी त्यांना घेऊन येत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सहकार्य ते याबाबत नेहमी घेत असत. लहान शेतकऱ्यांचे काम असो, हरिजनांचे काम असो, शिक्षणाचे काम असो, की इतर विकासासंबंधी काही काम असो, या सर्व कामांत त्यांनी पुढाकार घेतला, आणि ग्रामीण जीवनाची नवी बांधणी करण्याचा महाराष्ट्रात १९५० नंतर जो प्रयत्न झाला, त्यातील आबांचा हिस्सा जरूर कबूल करावा लागेल.

१९८० च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या पूर्वतयारीत ते संपूर्ण सहकारी चळवळीत गुंतले असताना त्यांना आजाराने गाठले. मृत्यूशी असा अचानक सामना करावा लागेल, याची त्यांनाही कल्पना नव्हती व मलाही नव्हती. निवडणुकीच्या तयारीसाठी मी एकदा साताऱ्यास जाऊन आलो, तेव्हा आबांचा निर्धार व निष्ठा पाहून मी स्तिमित झालो. त्यानंतर मी परत दिल्लीस आलो आणि काही दिवसांनी परत निवडणुकीच्या तयारीसाठी साताऱ्यास जाण्यासाठी मुंबईस पोहोचलो. तेव्हा तिथे समजले, की आबा अतिशय आजारी असून, हॉस्पिटलमध्ये आहेत. मी त्यांची चौकशी करण्याकरिता गेलो, तेव्हा आपल्या तब्येतीसंबंधी बोलण्याऐवजी माझ्या निवडणुकीच्या तयारीसंबंधी ते बोलत राहिले. त्यांना भेटण्यास जाण्यापूर्वी डॉक्टरांशी माझे बोलणे न झाल्यामुळे

त्यांच्या आजाराची मला कल्पना नव्हती. म्हणून मीही त्यांच्याशी बोलत राहिलो.

आबांची भेट घेऊन मी जेव्हा बाहेर आलो, तेव्हा डॉक्टरांना त्यांच्या तब्येतीबाबत विचारले, तेव्हा त्यांनी माझ्या कानात सांगितले,

'आजार कठीण आहे. कॅन्सर आहे.'

डॉक्टरांचे हे शब्द ऐकताच मला जबरदस्त धक्का बसला. मला कळून चुकले, की हा आबांचा शेवटचा आजार आहे.

माझ्या निवडणुकीस एक आठवडा राहिला असताना ते आम्हांला सोडून गेले. कार्यकर्त्यांनी माझ्यावरील व आबांवरील निष्ठेने काम केले आणि आम्ही ती निवडणूक जिंकली. या निवडणुकीच्या यशाचे श्रेय मी आबांच्या स्मृतीस देतो.

सामान्य माणसाबद्दलची कणव, विधायक कार्याची आवड आणि गतिमानतेने नवीन कार्य करण्याची दृष्टी, असे आबांचे व्यक्तित्व होते. त्यासाठी ते कार्यकर्त्यांशी बोलत व वेळप्रसंगी रागावतही. लोकसंग्रह करण्याचा यातून त्यांना छंद निर्माण झाला. सातारा जिल्ह्यातील गावोगावच्या लोकांना ते व्यक्तिशः नावाने ओळखत व त्यांच्या स्वभावांची व मर्यादांची आबांना पूर्ण कल्पना असे. त्यामुळे कामाकरिता कोणती माणसे कुठे योजावी, याबाबत त्यांचा निर्णय कधी चुकत नसे.

आबांच्या जीवनाचे अनेक पैलू आहेत. त्यासंबंधी अनेक गोष्टी लिहिता येतील. परंतु छोटेखानी लेखात ते शक्य नाही. मी आज एवढेच म्हणेन, की कार्यकर्त्यांनी मला विचारले, की आदर्श कार्यकर्ता कोण, तर मी त्यांना निःसंकोचपणे सांगेन, की किसन वीर यांचा आदर्श त्यांनी आपल्या नजरेसमोर ठेवावा. ज्याने स्वतःच्या आयुष्यात स्वतःसाठी काही मिळविले नाही; परंतु इतरांना मिळत राहावे, यासाठी प्रयत्न केले, कष्ट केले, अखेरपर्यंत ज्याने आपले राहण्याचे ठिकाण व घर सोडले नाही, असे कार्यकर्ते देशात हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. त्यांत आबांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते.

जन्मले खेड्यात, वाढले खेड्यात, संसार व जीवन घालविले खेडयात- म्हणजे कवठ्यात. अशा एका थोर एका बंधुवत मित्राची आठवण करून, त्यांच्या स्मृतीस नम्र अभिवादन करतो.

# ४२... वसंतरावदादा पाटील

श्री. वसंतरावदादांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या वेळी ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा वाहत आहेत. या निमित्ताने दादांना द्यावयाच्या शुभेच्छा एका अर्थाने महाराष्ट्राला द्यावयाच्या शुभेच्छा ठरणार आहेत. हा आनंदाचा सोहळा दिवाळीला जोडून येत आहे, हा सुद्धा मंगल योगायोग नाही का? दादांना या महत्त्वाच्या क्षणी मी माझ्या अंतःकरणापासून शुभेच्छा देतो.

मी वसंतरावदादा यांच्यासंबंधाने लिहावयास बसलो, तेव्हापासून मी विचार करीत होतो, की त्यांची माझी पहिली गाठ कधी पडली ही मैत्री इतकी दाट व इतकी जुनी आहे, की मला पहिल्या भेटीचा प्रसंग स्पष्टपणे आठवत नाही. पण केव्हातरी १९३७ नंतर व ४० च्या दरम्यान तासगाव तालुक्यातील या मनस्वी तरूणाची ओळख झाली आणि ती पुढे पुढे हळूहळू वाढत गेली.

१९४२ च्या लढ्यात दादांनी आपला स्वतःचा एक संच बनविला व धडाडीची कामे आपल्या नेतृत्वाखाली सुरू केली. त्यामुळे त्यांचा लौकिक जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेरही पोहोचला. सांगली जेलमधून हत्यारे घेऊन किल्ल्याच्या भिंतीवरून केलेले उड्डाण हा दादांच्या कर्तृत्वाचा श्रीगणेशा होता. किंबहुना त्यांच्या सर्व जीवनाचे व पुढे घडलेल्या सर्व कर्तृत्वाचे ते एक प्रतीक होते, असे म्हटले, तरी चालेल. १९४२ च्या संग्रामानंतर १९४६ साली काँग्रेस पक्षाची सरकारे सर्व राज्यांत प्रस्थापित झाली आणि संघटनेला कार्यक्षम रूप देण्याचे काम सुरू करून, नव्या दिशेने कामाची बांधणी करण्याचे प्रयत्न सुरू केले, त्या वेळी त्या वेळच्या सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे (ज्यात हल्लीच्या सातारा व सांगली जिल्ह्यांचा समावेश होता) चिटणीस म्हणून श्री. आबासाहेब वीर व दादा या दोघांनी ही कामगिरी आपल्या हाती घेतली, या चिटणीस-द्वयामुळे सातारा जिल्हा काँग्रेसच्या कर्तृत्वाला त्या वेळी एक प्रकारचे उधाण आले होते. ते दिवस आज आठवले, म्हणजे मन मोहरून जाते. मी नुकताच पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मुंबई मंत्रिमंडळात दाखल झालो होतो. हा काळ दादांच्या व माझ्या स्नेहसंबंधांच्या बांधणीचा महत्त्वाचा काळ मी मानतो. आमचे काही समज-गैरसमज होते. परंतु विधायक कार्याच्या प्रवाहात

ते धुऊन निघाले. विकास कार्याचे निखळ प्रेम व मित्रभाव या दोन गोष्टी असे संबंध जडण्या-वाढण्याला महत्त्वाचे ठरतात; आणि हे दोन गुण दादांमध्ये विपुल प्रमाणात आहेत. त्यामुळे आमचे संबंध वाढत गेले आणि एकमेकांकडे आम्ही आकर्षित होत गेलो.

सामान्य माणसाच्या उत्थानाला प्रथमतः साथ द्यायची, त्यासाठी जिवाची पाखड करून काम करायचे, हा दादांच्या स्वभावाचा स्थायिभाव आहे. ग्रामीण जीवनाला आधुनिक रूप प्राप्त झाले पाहिजे. त्यामध्ये समानतेच्या आधुनिक संस्कृतीची भर पडली पाहिजे, आणि जे आपल्याला मिळू शकले नाही, त्याची कमतरता नव्या पिढीला असता कामा नये, हे दादांच्या प्रेरणचे प्रमुख सूत्र आहे. दादांनी त्यांच्या कर्तेपणाच्या काळात अनेक विधायक कामांची साखळी गुंफली आहे. त्यासाठी अनंत कष्ट घेतले आहेत; असंख्य कार्यकर्त्यांचा संच आपल्या अवतीभोवती उभा केला आहे.

तीस वर्षांपूर्वी त्यांनी प्रथम त्यांच्या गावात, पद्माळ्याला, लिफ्ट इरिगेशनच्या कामाला हात घातला, तेव्हाची आठवण माझ्या मनात ताजी आहे. या सर्व कल्पना तेव्हा लोकांना नव्या व अनोख्या वाटत असत व लोक काहीसे बुजत-बुजत या कल्पनांकडे पाहत. दादांवर त्यांच्या गावातील सर्व लोकांचा जीव व विश्वास होता. त्यांनी त्यांना त्या कामात पाठिंबा द्यावयाचे मान्य केले व हे अवघड काम त्यांनी सुरू केले व शेवटी ते पूर्णही केले. मला आठवते, की दादा या कामाच्या शुभारंभासाठी अगत्याने मला घेऊन गेले. भारताच्या उज्ज्वल भविष्यकाळाची चित्रे पाहणाऱ्या माझ्यासारख्या स्वप्नाळू माणसाच्या भावना व विचारांना असे काम पाहून उधाण येत असे. त्या समारंभाच्या भाषणात तेव्हा मी बोलून गेल्याचे मला आठवते की, 'नदीच्या पात्रातून वाहणाऱ्या कृष्णेच्या पाण्याला शतकानुशतक आपल्या काठांवर असलेल्या व तहानलेल्या काळ्या बहिणीची आठवण आज झाली. कृष्णा-कोयनेचा प्रीतिसंगम हा निसर्गाने दिलेला संगम आहे. पण काळी जमीन व कृष्णा नदी यांचा झालेला आजचा संगम हा माणसाच्या कर्तृत्वाने घडलेला संगम आहे आणि म्हणून याला जास्त महत्त्व आहे. या कर्तृत्वाचे प्रतीक आमचे वसंतराव आहेत. दादांसारखी पाच-दहा माणसं साथीला असली, तर महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला सोन्याचे पीक येईल.' त्या वेळी भाषणाच्या ओघात मी हे बोललो, हे जरी खरे असले, तरी मला वाटते, माझ्या अंतर्मनाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे केलेले हे मूल्यमापनच मी अनपेक्षितपणे बोलून गेलो होतो.

गेल्या तीस-पस्तीस वर्षांत अशी अनेक विकासाची कामे त्यांनी बांधण्याचा प्रयत्न केला. कधी त्यात अडचणी आल्या, संकटे आली, पण दादांनी विकासाची लढाई सोडली नाही. एकापाठोपाठ नवे प्रकल्प, नवे संकल्प ते करीत राहिले व केलेले संकल्प पूर्ण करणे हा तर दादांचा खरा बाणा. मी याआधी उल्लेख केला, तो मित्रभाव दादांच्या स्वभावाचा पैलू आहे. दादांची माणसांची पारख आणि पारखून मित्र केलेल्या माणसांची ते जी जपणूक करीत असतात, ते संघटनेतील अनेकांना शिकण्यासारखे आहे. माणसाबद्दल मूलतःच प्रेम व जिव्हाळा असल्याशिवाय ते धोरण अमलात आणता येणार नाही, हा जिव्हाळा दादांच्याजवळ आहे. आज मुख्यमंत्री म्हणून शेकडो माणसांच्या गराड्यात ते नित्य असतात. त्यांची चौकशी करण्यात, त्यांचे प्रश्न समजावून घेण्यात ते रममाण झालेले असतात. त्याचे मुख्य कारण हा जिव्हाळा.

गेल्या सहा महिन्यांच्या काळात महाराष्ट्रासारख्या दर्जेदार राज्याचा कारभार कुशलतेने चालविण्यात जे यश त्यांनी मिळविले, त्याच्या पाठीमागे माणसांची पारख करण्याची त्यांची शक्ती, त्याचप्रमाणे, बिकट व कितीही गुंतागुंतीचा प्रश्न असला, तरी तो शांतपणे समजावून घेऊन, त्या प्रश्नाच्या मुळाशी भिडण्याची त्यांची कुवत ही आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न असू द्या. बिकट औद्योगिक प्रश्न असू द्या. तो ते शांतपणाने ऐकून घेतील. त्यानंतर त्याबाबतीत चौकसबुद्धीने व गंभीरपणे प्रतिप्रश्न करतील व मग स्वतःचे मत बनवतील. एकदा ते मत बनले, की ते इतके पक्के व शहाणपणाचे असते, की ते मत स्वतःला फार शहाण्या म्हणणाऱ्या किंवा तज्ज्ञाला मान्य करून पुढे जावे लागेल. हे जे सर्व घडते, त्याचे कारण जे जीवनातील प्रत्यक्ष अनुभवांतून सर्व काही शिकले आहेत. ग्रंथांतून शिकविण्यासारखे पुष्कळ असते; पण जे जीवनातील ग्रंथांतून शिकतात, ते इतके पक्के शिकतात, की त्यांच्यापासून इतरांना पुष्कळ वेळा शिकावे लागते. दादा अशा शिक्षकांपैकी आहेत.

दादांचा स्वभाव विधायक असल्यामुळे ते राजकारणातही नित्य विधायक वृत्तीनेच काम करीत असतात. स्वभावाचे निर्धारी, पण योग्य तडजोडीचे वावडे नाही, असा त्यांच्या राजकारणातील वागण्याचा स्वभाव मी पाहिला आहे. मतभेद असले, तरी कर्त्या माणसाच्या आड येऊ नये, म्हणून अनेक वेळा ते बाजूला होण्याचा प्रयत्न करतात. ते करण्यापाठीमागे त्रागा नसतो. कामाच्या आड न येण्याची वृत्ती असते. परंतु ते काम अडणार आहे, असे पाहिले, की ते तितक्याच निर्धाराने त्या कामाची तड लावण्यासाठी परत येतात.

सत्तेसाठी त्यांनी मुद्दाम कधी प्रयत्न केला नाही. सत्तेत असणाऱ्या आपल्या पक्षाला शक्ती व सहकार देण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. १९७२ साली अनपेक्षितपणे सत्ता हाती आली, तेव्हा ती अतिशय कर्तबगारीने सांभाळली. तितक्याच अनपेक्षितपणे त्यातून १९७६ साली त्यांना जावे लागले, तेव्हा त्यांनी मनाचा तोल जाऊ दिला नाही. नंतरचे सर्व व्यावहारिक सोपस्कार अलिप्तपणाने व शांतपणाने पार पाडले. ज्या मंत्रिमंडळातून आपल्याला गाळले होते, त्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीला हजर राहून सार्वजनिक जीवनाची प्रतिष्ठा कशी राखावी, त्याचे उदाहरण त्यांनी घालून दिले होते. दादांचे हे सर्व वर्तन पाहिले, म्हणजे त्याचा सार्थ अभिमान वाटावयास लागतो.

आपले आसू कुणाला सांगू नयेत; पण आज ते शक्य नाही. दादा ७६ साली मंत्रिमंडळातून काढले गेले, त्यानंतर प्रथम दिल्लीला आले. जेव्हा त्यांची -माझी भेट झाली, तेव्हा का, कोण जाणे, माझे डोळे भरून आले आणि पुष्कळ प्रयत्न करूनही मला ते आवरता आले नाहीत. १९६५ साली आई गेली, तेव्हाही असेच आवरणे अवघड झाले होते. पण तरीही मी ते सावरले होते. पण आज असे का होत आहे, हे माझे मला सांगणे शक्य होईना. मी माझ्या मनाशी विचारले, की हे असे का घडते? त्यामध्ये माझ्या मनाला एकच खंत होती. दादा तर सर्व काही शांत मनाने घेत होते. ते दुःखी-कष्टी नव्हते. परंतु माझ्या मनाला यातना होत्या, की महाराष्ट्रातील सोन्यासारख्या या माणसाचा असा अवमान का झाला व कशासाठी? आणि मी हे थांबवू शकलो नाही, यात आमच्या सर्वांच्या कामाचा पराभव आहे, अशी एक प्रकारची असहायतेची भावना मनात तयार झाली होती.

पक्षनिष्ठेच्या श्रद्धेमुळे पक्षावर रूसता येत नव्हते. घडलेल्या गोष्टींचा खुलासा माझा मलाच करता येत नव्हता आणि या असहायतेच्या पोटी हे सर्व होत होते. दादांपासून हे आसू लपवू शकलो नाही, याची नंतर मला एकसारखी खंत वाटत राहिली.

ही अगदी निव्वळ खासगी गोष्ट प्रगट करण्याच्या पाठीमागचे कारण एवढेच, की मला वाटत असलेला हा अन्याय जसा माझ्यासारख्या त्यांच्या असंख्य मित्रांना अमान्य होता, तसा नियतीलाही अमान्य होता. मुख्यमंत्रिपदाची नवी जोखीम त्यांनी घ्यावी, अशी त्यांच्या मित्रांनी इच्छा दाखविताच आणि प्राणापेक्षा ज्याच्यावर जास्त प्रेम केले, तो पक्ष संकटात आहे, हे चित्र पाहताच त्यांनी आपला निर्णय बदलला आणि राजकारणाच्या आवाहनचा स्वीकार केला. तो

वैयक्तिक प्रतिष्ठेसाठी नाही, तर देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात आलेल्या एका महत्त्वाच्या कठीण प्रसंगी आपले निर्धारी नेतृत्व देऊन, तो प्रसंग निभावून न्यावा, यासाठी त्यांनी तो स्वीकार केला आहे.

प्राणांपेक्षा ज्याच्यावर प्रेम केले, त्या काँग्रेस पक्षाचा मी वर उल्लेख केला आहे, त्यासंबंधी दोन शब्द. महाराष्ट्रातील काही शहाण्यासुरत्या व जाणत्या माणसांनाही आमची ही पक्षनिष्ठा कधी कधी समजत नाही. आमच्या पक्षनिष्ठेला ते 'सत्तेचे राजकारण' म्हणून नाके मुरडीत असतात. हीन समजतात. हा पक्ष सत्तेवर आल्यानंतर त्यात सामील झालेल्यांपैकी आम्ही नव्हेत, हे त्यांच्या ध्यानी येत नाही. सत्ता येण्याची अपेक्षाही नव्हती, त्या काळात ओळीने दहा-वीस वर्षे त्या पक्षात राहून अनंत कष्ट उपसलेल्या त्या पिढीचे आम्ही प्रतिनिधी आहोत, आणि आज सत्ता गेल्यानंतरही त्या पक्षातील दोष दूर करून पूर्ववत त्याला जनमानसात स्थान मिळावे, त्यासाठी प्रयत्नशील आहोत. ज्यांनी कशावरच कधी निष्ठा ठेवल्या नाहीत; स्वतःखेरीज इतरांसाठी ज्यांनी कधी कशाचा विचारच केला नाही, त्यांना या निष्ठांचा अर्थ समजणार कसा? अहंकाराच्या पोटी - मग तो बुद्धीचा, जन्माचा, किंवा आणखीन कशाचा असो, इतरांकडे तुच्छतेने पाहण्याची सवय झाल्यानंतर दुसरे घडणार काय? पक्षापेक्षाही देश मोठा असतो, हे आम्ही जाणतो. काही मूल्ये इतकी महत्त्वाची असतात, की त्यांसाठी प्रसंगी त्या पक्षालाही गौण मानावे लागते. पण हे उठल्या बसल्या, सकाळ-संध्याकाळी, मर्जीनुरूप, लहरीखातर करता येत नाही. त्यात वर्षानुवर्षाचे हजारो कार्यकर्त्या मित्रांचे स्नेहभाव गुंतलेले असतात. एकमेकांसाठी कष्ट घेतलेले असतात. राग, लोभ सांभाळलेले असतात. हे ज्यांनी अनुभवलेय, त्यांना ही पक्षनिष्ठा समजते. पण ज्यांनी निष्ठेने कधी कुठल्याच पक्षात वा कसलेच काम केलेले नसते किंवा जे दर पाच-दहा वर्षांनी एक नवा पक्ष शोधीत वा स्थापीत असतात, त्यांना ही गोष्ट कशी समजणार? त्यांच्या आवाक्याबाहेरचे हे काम आहे. श्री. वसंतदादासारख्यांना समजावून घ्यावयाचे असेल, तर हेही प्रथम ध्यानात घ्यावे लागेल.

श्री. वसंतरावदादा पाटील हा शहाणा कर्ता पुरूष आज महाराष्ट्राच्या जनतेचे नेतृत्व करीत आहे. महाराष्ट्राचे भविष्य त्यांच्या हाती सुरक्षित आहे. त्यांच्या नेतृत्वाला साथ देऊन, त्यांचा पाठपुरावा करण्यामध्ये महाराष्ट्रातील जनतेची सार्थ परीक्षा होणार आहे. माझा असा विश्वास आहे, की आजपर्यंत ज्या सहजतेने आणि कुशलतेने अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांमध्ये दादांनी

यशस्वीपणे मार्ग काढला, तसे, आजच्या बिकट काळात महाराष्ट्राला आणि महाराष्ट्र कॉंग्रेसला ते यशस्वी नेतृत्व देतील. महाराष्ट्रातील जनताही तितक्याच निर्मळ मनाने त्यांना साथ देईल, त्यासंबंधी माझ्या मनात शंका नाही.

# ४३... नरूभाऊ लिमये

सामान्यतः मी कमी बोलतो, असा प्रवाद आहे. त्यात काही सत्यांशही आहे. वस्तुस्थितीचा विपर्यास होऊ लागला, माणसे राखण्यापेक्षा दुरावली जातील, असे वाटू लागले, कार्यसिद्धीऐवजी कार्यनाश होईल, अशी शंका येऊ लागली, की शब्दांवरचा माझा विश्वास फार फार कमी होतो. माझ्या कमी बोलण्या-लिहिण्याचे हे एक कारण असू शकेल. पण आज नरूभाऊ लिमये ह्यांच्याबद्दल लिहायला बसलो आहे. तेव्हा माझ्या लेखणीच्या वाटेत नेहमीचे ते अडथळे मुळीच नाहीत. नरूभाऊंचे व माझे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. त्यांची-माझी मैत्री मोलाची आहे. क्वचित मतभेद झाले, पण माणूस म्हणून असलेले आमचे संबंध गंगेच्या पाण्याप्रमाणे निर्मळ राहिले आहेत. तेव्हा शक्य तेवढ्या मोकळेपणाने मला आज नरूभाऊंबद्दल लिहायला काही हरकत जाणवत नाही.

मी मागे वळून पाहू लागलो, की बत्तीस वर्षांपेक्षा जास्त काळ टिकून राहिलेल्या वृद्धिंगत होत असलेल्या नरूभाऊंच्या व माझ्या संबंधांबद्दल मला समाधान वाटते. लांबलचक मैत्रीचा हा काळ सुखदु:खांच्या अनेक आठवणींनी मन भरून यावे, असा आहे. नरूभाऊ व मी तसे निराळ्या वातावरणांत वाढलोत. त्यांची व माझी पार्श्वभूमी निराळी. ते शहरात वाढले. सातारा-पुणे या शहरांच्या वातावरणात त्यांचा पिंड पोसला. मी वाढलो खेड्यात, एका गरीब कुटुंबात. तीस-चाळीस वर्षांपूर्वीचे शहर व खेडे यांतले अंतर आपण विचारात घ्या. पुष्कळदा मैत्रीला छंदांच्या क्षेत्रातून बाळसे येते. पण वयाच्या सतरा-अठरा वर्षांच्या सुमारास माझ्या जीवनातून तालीम, आखाडा, खेळणे, पोहणे निघून गेले. आम्ही माणसे लवकर कामाला लागलो. जिल्ह्यातील तरूण कार्यकर्त्यांच्या बैठकी होत, चर्चा होत, मला चांगले आठवते, की सातारा जिल्हा काँग्रेसच्या अशाच एका बैठकीच्या वेळी झालेल्या चर्चेत नरूभाऊंची आणि माझी चकमक उडाली. आम्ही एकमेकांवर भडकलो. पण त्याच वेळी माझ्या ध्यानात आले, की ह्या माणसात तल्लख बुद्धी, तळमळ, संघटना-चातुर्य आणि जिद्द आहे. आणखी एक गोष्ट ध्यानात आली, ती ही, की तात्त्विक

मतभेदांच्या गदारोळात स्नेहाचे निर्मळ झरे न ढवळले जाण्यासाठी, मैत्रीचे नाजूक बंध सुरक्षित राखण्यासाठी आवश्यक तो हळुवारपणाही ह्या माणसात आहे. साहजिकच मी त्यांच्याकडे अधिकाधिक आकर्षिलो गेलो. मैत्री एकांगी, एकेरी, एकतर्फी असू शकत नाही. नरूभाऊंनीही माझ्यात काही तरी पाहिले असणार, पण मी त्याबद्दल काय आणि कसे बोलणार ? मी फक्त बाजू तुमच्यासमोर खुली करण्याच्या प्रयत्नात आहे. मला एवढेच आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, ह्या मैत्रीला नरूभाऊंचीही बाजू आहे.

मी मागे एकदा लिहिले होते, 'दक्षिण साताऱ्यामध्ये आणि उत्तर साताऱ्यात गावोगाव पसरलेले जे माझे साथी आणि सहकारी आहेत, त्यांच्याशी कधी मी झगडलो, कधी भांडलो, कधी प्रेमाने वागलो, सगळे काही केले, पण त्यांनी मला नेहमी प्रेम दिलेले आहे. त्यांच्या प्रेमातून माझी शक्ती वाढलेली आहे.' जिल्हा पातळीवर अशा तऱ्हेने वावरत असताना जे माझे संबंध जडले, त्यांत नरूभाऊंच्या मैत्रीचा क्रमांक खूप वरचा आहे. त्यांनी व मी खिशात पैसे नसताना लाखांची नाही, तरी हजारो रूपयांची स्वप्ने साकार करण्याची स्वप्ने एकत्र बसून पाहिली आहेत. काँग्रेसच्या कार्यक्रमांचा, धोरणाचा, कल्पनांचा प्रसार झाला पाहिजे, ह्याचा ध्यास नरूभाऊंनी घेतला, हे लोकांना कळले पाहिजे, हा त्यांचा मंत्र. वाणी-लेखणी राबवताना, कृती करताना ह्याच एका मंत्राचा आविष्कार त्यांनी चालू ठेवला. साताऱ्याच्या 'समर्थ' मध्ये सेवा ह्याच भावनेने केली. खिशात पैसा नसताना, दारिद्र्याचे चटके सहन करीत, कर्जाचे डोंगर डोक्यावर घेऊन 'प्रकाश' चालविले. हालअपेष्टांना सीमा नव्हती; पण त्यांची तमा नरूभाऊंनी बाळगली नाही. काँग्रेसचे किंवा काँग्रेसवादी दैनिक असावे, हा नरूभाऊंचा अट्टहास. 'अट्टहास' हा शब्द मी मुद्दाम वापरीत आहे. तो एक केवळ ध्यास नव्हता. ह्या अट्टहासामागे असीम खटाटोप होता, कष्टांची उपसण होती, ध्येयवादाची बेहोशी होती. 'लोकांना हे कळले पाहिजे' हा महामंत्र वारंवार हे घोकीत होते, उच्चारीत होते. आचार्य जावडेकरांनंतर 'लोकशक्ति' चे संपादन हाती घेताना घमेंड नव्हती, पूर्वसूरींचा अनादर करण्याची भावना नव्हती, स्वतःबद्दलचा अनाठायी विश्वास नव्हता, तर 'लोकांना हे कळले पाहिजे' आणि त्यासाठी झीज सोसून राबण्याची गरज आहे, अशी मनोधारणा होती. तीच मनोधारणा आजही आहे. काळाचे आव्हान नरूभाऊंनी स्वीकारले आणि आपल्या शक्त्यनुसार झुंज दिली. माझ्या नजरेतून हा एक त्यांचा जीवनविशेष आहे.

स्वर्गीय काकासाहेब गाडगीळांच्या जीवनाचा नरूभाऊंच्या जीवनावर झालेला परिणाम मला स्पष्ट दिसतो. नरूभाऊ काकांप्रमाणेच आपल्या सहधर्मचारिणीबाबत भाग्यवान आहेत. काकांच्या व नरूभाऊंच्या पिढीत अशा स्त्रिया ह्या भूमीत जन्मल्या, वाढल्या, वावरल्याचे आपल्याला सर्वांना माहीत आहे. घरात चूल पेटविण्याची पंचाईत असे कधीकाळी, पण गृहिणीने आल्या अतिथीचे प्रसन्न मुखाने स्वागत केले नाही, असे कधी झाले नाही. ध्येयाच्या धुंदीत पुष्कळ आधिव्याधींचा विसर पडतो, पण ध्येयधुंद माणसांची घरे सांभाळणे फार अवघड गोष्ट आहे, ती एक कला आहे. ते एक व्रत आहे. घरात असेल-नसेल, त्याची व स्वसुखाची आहुती ध्येयपूजेच्या यज्ञकुंडात देणे सोपे नाही. नरूभाऊंच्या पत्नीने, सौ.मीरावहिनींनी, नरूभाऊंच्या जीवनयज्ञात सर्वस्व ओतले. त्यांनी अमाप सहन केले. घराचा अखेरचा आधार, स्त्रीचा अखेरचा आधार स्त्री-धन! त्याला पावित्र्याचे कुलूप लावून अडीअडचणीलाही हात घालता येऊ नये, अशी आपल्या परंपरेने व्यवस्था करून ठेवली आहे. पण दागिने विकूनही पत्रासाठी पैसे उभे करण्यास वहिनींनी आपला हातभार लावला. समाजाच्या सेवेसाठी ह्या दोघांनी त्यागाची ही सीमा गाठली. 'त्याग' हा शब्द फार गुळगुळीत झाला आहे. तो जपून वापरायला हवा. त्याचे वजन जाता उपयोगी नाही. व्यक्ती व प्रसंग ह्यांच्या अनुषगांने त्या शब्दाला योग्य ते वजन देण्याची कला आपल्याला शिकायला हवी. एरव्ही फसगत व्हायची!

'मारूनि ज्यांना जगणें न इच्छूं । झुंजावया तेचि उभे समोर' असे भगवद्गीतेत वर्णिल्यासारखे प्रसंग माझ्या आयुष्यात पुष्कळ उभे राहिले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी तर अशा घटनांची पुनरावृत्ती झाली. त्या वेळी तात्त्विक मतभेदाने माझ्या समोर दुसरी बाजू घेऊन पुष्कळ संबंधी उभे होते. पण त्यांच्यांतही माझ्या बाजूला असलेल्यांपेक्षा प्रेमात तसूभरही कमी नसलेले पुष्कळ होते. अडचणीच्या वेळी तात्त्विक मतभेद बाजूला ठेवून मंडळींनी मला मदत केली. माझ्यावर वैयक्तिक हीन हल्ले केले नाहीत. नरूभाऊ तर आमचेच होते. सहमती असेल, तर सर्व सामर्थ्यनिशी झटून त्यांनी मला साहाय्य दिले. क्वचित माझा निर्णय, दृष्टिकोन त्यांना पूर्णांशाने पटला नसला, तरी तो माझा दृष्टिकोन आहे, यासाठी जाणीवपूर्वक त्याची कदर केली आणि ते सतत पाठच्या भावासारखे माझ्या मागे उभे राहिले. त्यांच्या मनातील माझ्यासंबंधीचा जिव्हाळ्याचा झरा ऐन उन्हाळ्यातही कधी सुकला नाही.

पुनरावृत्तीचा थोडासा दोष पत्करूनही मी म्हणेन, की नरूभाऊंची मी बुद्धिमत्ता पाहिली, जनकल्याणाची तळमळ पाहिली, पटल्या गोष्टी साकार करण्यासाठी लागणारी जिद्द पाहिली, स्वतःच्या मताशी इमान राखण्याची हिंमत पाहिली, जुटून काम करण्यासाठी वृत्ती पाहिली आणि प्रयोग करून पाहताना धोके झेलण्याची शक्ती पाहिली. मग प्रश्न मनात येतो, तो हा, की या गुणी माणसाच्या सर्व गुणांचे चीज झाले का? समाजाच्या सेवेत आपल्या अंगचे सारे गुण राबविण्याची संधी नरूभाऊंना मिळाली का? या प्रश्नाचे माझे उत्तर 'नाही' असे आहे. या जाणिवेने मला हळहळ वाटते. पण त्या हळहळीचे स्वरूप समजून घेण्याचा मी यत्न करतो. लौकिक अर्थाने पुढे सरलेल्याने लौकिक अर्थाने तेवढे पुढे सरायला न मिळालेल्या व्यक्तींबद्दल स्वतःचा मोठेपणा वाढविण्यासाठी यत्नपूर्वक वाढीला लावलेली माझी हळहळ नाही. आपला इतरांनी हेवा करू नये, निदान त्याच्या कडक कडा घासल्या जाव्यात, ह्यासाठी जतन केलेली ती हळहळ नाही. तसे या घटनेचे स्वरूप नाही, असे माझे प्रांजल मत आहे. संघर्षाच्या राजकारणात काळ व परिस्थिती असे काही पेचप्रसंग निर्माण करतात, की क्वचित स्वतःच्या स्वभावामुळे , क्वचित धोरणासाठी, क्वचित स्वतःपेक्षा अधिक महत्त्वाच्या मानलेल्या ध्येयांच्या सिद्धीसाठी माणसे बाजूला राहतात आणि ती तशीच बाजूला राहतात. मधले अंतर कापून, उभा अडथळा ओलांडून प्रवाहाच्या मध्यावर पुन्हा येणे घडतच नाही. हा काळाचा आणि परिस्थितीचा बनाव असतो. प्रामुख्याने तो परिस्थितीचा बनाव होता. यामुळे नरूभाऊंच्या यत्नांची धार बोथट झाली नाही, की त्यांच्या साधनेत खंड पडला नाही.

आयुष्यात माणसे भेटतात, पांगतात, काहींची तर पुन्हा गाठभेटही होत नाही. पण काही पुनः पुन्हा भेटतात. त्यांच्याशी संबंध निर्माण होतात आणि ते संबंध शक्तिशाली बनतात. परस्परांच्या जीवनाचा सहारा बनतात. ते जीवन समृद्ध आणि संपन्न बनवतात. अशा नरूभाऊंच्या व माझ्या संबंधांचे ओझरते दर्शन घडविण्याचा माझा हा यत्न आहे. माणसामाणसांतले संबंध नाजूक असतात. ते शब्दांनी वर्णून सांगायचे समर्थ यत्नही पुष्कळदा मागे असमाधान ठेवून जातात. तरीही प्रसंगानुरूप माणसांना माणसांबद्दल बोलावे लागते, लिहावे लागते. हे अवघड असते, पण म्हणून ते टाळावे, हे काही खरे नाही. मिळालेली भावव्यक्तीची संधी आपल्याला नीट वापरता आली, तर समाधान वाटते. त्यांच्याबद्दल आपण बोलतो, त्यांनाही त्यातल्या प्रामाणिकपणाचा प्रत्यय

आला, तर बरे वाटत असावे, असा अंदाज मी माझ्या अनुभवावरून बांधतो.

नरूभाऊंच्याबद्दल म्हणून लिहिण्याचा जो मी यत्न केला, त्यातून मीच जास्त आविष्कृत झालो, असे मला आता वाटू लागले आहे. पण आमची मने इतकी जुळली-मिळली आहेत, त्यांत असा संवाद निर्माण झाला आहे, की एकाचे दर्शन घडविताना दुसऱ्याचे दर्शन घडणे अपरिहार्य आहे. हा मनांच्या संगमाचा प्रभाव आहे. मला असे घडल्याबद्दल संकोच वाटत नाही, हाही आमच्या मैत्रीचा विशेष आहे. माझ्या जीवनातल्या यशाला माझ्या इतर सहकारी मित्रांप्रमाणे नरूभाऊंचाही हातभार लागला आहे. प्रतिकूल परिस्थितीतही नरूभाऊंनी मूल्ये जतन केली, त्यांसाठी ते झुंजारपणे लढले. या झुंजार वीराच्या जीवनापासून इष्ट व आवश्यक गोष्टीसाठी जिद्दीने झिजण्याची ताकद आम्हां मंडळींना, आपणां सर्वांना मिळत जाईल, असे मला वाटते.

ह्या शुभप्रसंगी नरूभाऊंना त्यांच्या आवडत्या जनताजनार्दनाची सेवा करण्यासाठी, राजशक्तींनी नीट राबवून घेण्यासाठी, लोकशक्तीचे संवर्धन करण्यासाठी दीर्घायुरारोग्य, विपुल साधने व संधी लाभोत, अशी इच्छा मी व्यक्त करतो.

# ४४... विठ्ठलराव विखे पाटील

श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र म्हणजे ग्रामीण नेतृत्वाची जडण-घडण कशी व्हावी, याचे एक प्रात्यक्षिकच आहे, असे म्हटले, तरी चालेल. विखे पाटील यांच्या जीवनाची चार वेगवेगळी पर्वे आहेत, असे दिसते; व जशी ती कालदर्शक आहेत, तशीच ती विखे पाटील यांच्या कार्यप्रणालीच्या विकासाची द्योतक आहेत. पहिला सहकारी साखर कारखाना काढणारे म्हणून विखे पाटील यांचे कार्य मोठे, हे एका अर्थाने खरे असले, तरी त्यांच्या चरित्राचे सर्व वैशिष्ट्य यातच नाही. ग्रामीण नेतृत्वाचे एक प्रातिनिधिक व्यक्तिमत्त्व या दृष्टीने जर त्यांचे जीवनचरित्र समजावून घेण्याचा प्रयत्न केला, तर त्यात अनेकविध सूत्रे पाहण्यास मिळतील. पंडित नेहरूंच्या हजेरीत लोणी येथे १९६१ साली मी एक भाषण केलेले होते. त्या भाषणात जो विचार मी मांडला होता, तोच या लेखात उद्धृत करू इच्छितो.

‘लहान लहान माणसे काय काम करतात, त्याकडे हिमालयाएवढे उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या थोर माणसांचेही लक्ष असते, ते आज आपणांस कळून आले असेलच आणि लोकशाहीत हाच खरा आनंद आहे. महाराष्ट्रात छोट्या नद्या, छोटी शेते, डोंगराळ जमीन व छोटी माणसे आहेत; पण ही माणसे प्रामाणिक व कष्टाळू आहेत. विशिष्ट क्षेत्रात आमचा छोटा शेतकरी संघटितपणे मोठी कामे करू शकतो, ही येथील परंपरा आहे.’

या भाषणातील विचाराचे सूत्र हेच या लेखाच्या विवेचनाचेही मुख्य सूत्र राहील.

एका लहानशा गावातील थोडी-फार शेती असलेल्या छोट्या शेतकऱ्याचा हा मुलगा. १९२० ते ३० च्या दरम्यान महाराष्ट्रात व भारतात जी परिस्थिती होती व प्रेरणा काम करीत होत्या, त्या प्रेरणांशी समरस होण्याइतकी मानसिक शक्ती शिक्षणाशिवायही विखे पाटलांमध्ये पाहण्यास सापडते. ग्रामीण भागात, विशेषतः शेतीच्या धंद्यात, एक विलक्षण संकटाची स्थिती निर्माण झालेला तो काळ होता. कर्जबाजारीपणा व त्यातून निर्माण होणारी दैन्यदुर्दशा यांच्या

कचाट्यात महाराष्ट्र किंबहुना भारताचा शेतकरी सापडला होता, असे म्हटले, तर ते चूक होणार नाही. अशा कठीण परिस्थितीचा गैरफायदा घेणारी सावकारशाही व नोकरशाही यांचा खेळ स्वाभाविकपणे अनिर्बन्धपणे चालू होता. अशा काळात व वातावरणात विखे पाटील वयात आले व त्यांच्या कुटुंबाचे कर्तेपणही त्यांच्याकडे आले. समाजाच्या प्रश्नांमध्ये लक्ष घालण्यापूर्वी स्वतःच्या संसाराचे प्रश्न हाताळत असताना त्या तरूण वयातही त्यांनी भोवतालच्या परिस्थितीची जी समज दाखविली आणि अचूक निर्णय घेण्याची जी शक्ती दाखविली, ती तगाईच्या कर्जाची तहकुबी मिळण्याची शक्यता असतानाही आपला कर्जाचा हप्ता भरल्याशिवाय अन्न घेणार नाही, अशी प्रतिज्ञा करून ते काम त्यांनी पूर्ण केले, यात स्पष्ट होते. या एका गोष्टीत विखे पाटील यांच्या पुढच्या कर्तृत्वाची बीजे दिसून येतात. अनुत्पादक कर्ज दुर्लक्ष करून वाढत ठेवण्याने शेती व शेतकरी - दोन्ही संकटात येतात. यासाठी त्याला शिस्तीने वागणाऱ्या मनाची व निर्धारी स्वभावाची गरज असते, हे प्रथमतः यात दिसून येते. त्या सुमारास त्यांच्या गावी पहिली सहकारी सोसायटी सुरू झाली, तिचे श्रेयही त्यांच्या या जाणिवेत आहे, असे स्पष्ट होते.

दुसरा जो एक महत्त्वाचा गुण नेतृत्वाला आवश्यक असतो, तो म्हणजे अवतीभोवती अडचणी असलेल्या कष्टकरी माणसांबद्दलची सहानुभूती. हा गुण त्यांच्यांत प्रथमपासूनच विपुलतेने वास करीत आहे. त्याचप्रमाणे निःपक्षपातीपणा, निःस्वार्थीपणा हे गुणही त्यांच्या लहान-सहान गोष्टींत दिसून येतात. छोट्या-छोट्या प्रश्नांत मार्गदर्शन करून, त्यातून लोकांचा विश्वास व चांगुलपणा प्राप्त करून घेणे हे फार मोठ्या प्रश्नांमध्ये नेतृत्व करण्यापेक्षा कठीण काम आहे, याचा अनुभव ग्रामीण जीवनाचा मामला ज्यांना माहिती आहे, त्यांनाच कळेल.

या वर सांगितलेल्या गुणांमुळे विखे पाटील स्वाभाविकच नैसर्गिकरीत्या आपल्या अवती-भवतीच्या लोकांचे व आपल्या गावाचे नेते बनले आणि हळूहळू हे नेतृत्व अधिक विकसित होऊ लागले. आपल्या गावाचे नेतृत्व करीत-करीत गावाच्या परिसरात असलेल्या इतर मंडळींना ते ओळखू लागले. त्यांच्या प्रश्नांमध्ये ते लक्ष घालू लागले आणि यामुळे त्यांच्या रूपाने एक प्रौढ व्यक्तिमत्त्व नव्याने निर्माण होणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यास उभे राहिले.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी आणि त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे

मर्म त्यांनी पुरेपूर जाणले होते. राष्ट्रांमध्ये नव्या राजकीय विचारांचे वारे वाहू लागले होते. नवीन जाणती माणसे शेतकऱ्यांच्या जीवनातील आर्थिक प्रश्नांत व्यासंगपूर्ण लक्ष घालू लागली होती. सहकारी बँकांसारख्या नवीन संस्थांचा ग्रामीण जीवनात व शेतकी व्यवसायात प्रवेश झाला होता. भविष्यात जे कर्तृत्व करावयाचे होते, त्यासाठी लागणारा सर्व मालमसाला प्रत्यक्ष परिस्थितीत उपलब्ध झालेला होता. साखरव्यवसायाने चांगलीच प्रगती केली होती. परंतु तो खासगी मालकीच्या दावणीत असल्यामुळे त्याची आरोग्यदायी वाढ होईल, अशी परिस्थिती दिसत नव्हती. आरोग्यदायी वाढ याच्यासाठी म्हणतो की, उसाचा पुरवठा करण्याकरिता शेतकऱ्यांची पिळवणूक होईल, अशा तऱ्हेची धोरणे आखली जात होती आणि व्यवहारात शेतकऱ्यांची शेतीची मालकी त्यांच्याकडून काढून खासगी कारखानदारांच्या मालकीची केली जात होती. यामध्ये एका नव्या पिळवणुकीची साथ सुरू होण्याची धास्ती होती. शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिल्यानंतर चांगला ऊस व्हावा, हे स्वाभाविकच, आणि तोच क्रम पुढे चालवून चांगल्या उसाचा पुरवठा झाला, तर औद्योगिक तज्ज्ञतेच्या मदतीने विपुल साखर काढणारा साखरधंदा वाढावा, हेही तितकेच स्वाभाविक होते. कृषिऔद्योगिक विकासाची ती अपरिहार्य अशी प्रक्रिया होय. परंतु  हे सर्व शक्य असतानाही नव्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहणाऱ्या नेतृत्वाचा अभाव यामुळे शेतीच्या प्रगतीसाठी उपलब्ध झालेली ही नवी संधी फुकट जाणार, की काय; व प्रगतीच्या ऐवजी पिळवणुकीचा एक नवा संघर्ष महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांत उभा राहतो, की काय, अशी परिस्थिती नैसर्गिकरीत्या कृषि-औद्योगिक समाजाची वाढ करण्यास पोषक अशी होती. परंतु याची जाणीव परकीय राज्याला नव्हती. समाजधुरीणांमध्ये त्यासंबंधीचा पूर्ण विश्वास निर्माण झालेला नव्हता. परिस्थितीचा हा संदर्भ लक्षात घेतला, म्हणजे विखे पाटलांनी पहिल्या सहकारी कारखान्याबाबत तयारी करताना जे धोरण आणि दृष्टी दाखविली, ती गुणात्मक दृष्टीने कशी विशेष प्रकारची आहे, याचे महत्त्व लक्षात येते.

सहकारी साखर कारखाना काढण्याचा निर्णय ज्या बागायतदार परिषदेमध्ये झाला आणि ज्या परिषदेचे मार्गदर्शन डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी केले, त्या परिषदेतही छोटा खातेदार शेतकरी हा भागीदार असावा, हा विचार आग्रहपूर्वक मांडून विठ्ठलरावांनी आपली दूरदृष्टी सिद्ध केली. आज पाठीमागे वळून पाहत असताना त्यांच्या या जाणिवेबद्दल आश्चर्य वाटते व मन

त्यांना धन्यवाद देते.

पहिला सहकारी साखर कारखाना आपल्या क्षेत्रात सुरू करून तो चालविण्याकरिता स्वतः पाठीमागे राहून त्यांनी गाडगीळांसह इतर सहकाऱ्यांना फार मोठी मदत केली आणि त्या कारखान्याच्या यशाला या त्यांच्या स्वभावाची फारच मोठी मदत झाली असली पाहिजे, असे मला वाटते. किंबहुना शक्यतो पाठीमागे राहून इतरांकडून काम करून घ्यावे, हाही विठ्ठलरावांचा स्वभावविशेष आहे. आपल्या तरूणपणी आपल्या गावात काढलेल्या सोसायटीचे अध्यक्षपदही त्यांनी इतरांना दिले होते आणि त्यांच्याकडून काम उत्तम पार पडेल, याची ते काळजी घेत होते. सार्वजनिक जीवनात शंकेचे वातावरण उभे राहू नये, यासाठी ग्रामीण जीवनात काळजी घ्यावी लागते, याचे उत्कट उदाहरण विखे पाटील यांच्यांत पाहण्यास सापडते. ऐन उमेदीच्या दिवसापासून परान्न घ्यावयाचे नाही, हा त्यांचा विशेष नियम आहे. तो आजपर्यंत चालू आहे. ते कोणाच्याही घरी किंवा कोणत्याही समारंभास जावोत, आपल्या खिशातून फडक्यात बांधून आणलेली चटणी-भाकरच ते खातील. मिष्टान्नाच्या पंगतीलाही माझी भाजी-भाकरी, असे म्हणून समाधानाने दोन घास खाऊन ते मोकळे होतात. ग्रामीण भागात काम करावयास लागणाऱ्या स्वभावाची त्यांनी या तऱ्हेने अत्यंत काळजीपूर्वक जपणूक केलेली आहे.

१९४५-५५ नंतर महाराष्ट्रात साखर कारखाने वेगाने वाढत आहेत. त्यातून काही नवे नवे सामाजिक व आर्थिक प्रश्नही उभे राहिले आहेत. प्रयत्नपूर्वक त्यांची सोडवणूक करावी लागेल, हे जरी खरी असले, तरी या सहकारी साखर कारखानदारीची वाढ कृषि-औद्योगिक समाजाच्या वाढीच्या दृष्टीने एक अपरिहार्य व स्वागतार्ह घटना आहे, असे माझे मत आहे. विखे पाटील यांचे वैशिष्टय असे की, त्यांनी या घटनेचा श्रीगणेशा केला. सहकारी कारखानदारीप्रमाणे ग्रामीण भागात अद्ययावत शिक्षण हुशार मुलांना मिळावे, याची त्यांना फार चिंता आणि त्यासाठी त्यांनी योजना केल्या व अमलात आणल्या. त्यात श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या सहकाऱ्यांची त्यांना त्या वेळी चांगली साथ मिळाली. लहान लहान माणसे समाजाच्या विकासाच्या कामाची जी साखळी संघटनेच्या शक्तीवर बांधतात, त्याला मदत करणे, त्याची वाढ होईल, असे पाहणे, पितृहृदयाने या वृत्तीची व ही वृत्ती असणाऱ्या माणसांची जोपासना करणे हे लोकशाहीतील राज्यशक्तीचे काम आहे. लोकशाहीत हे करता येते, असा माझा अनुभव आहे; आणि म्हणून मी त्या

वेळच्या माझ्या भाषणात म्हटले होते की, 'लोकशाहीत हाच खरा आनंद आहे. छोट्या माणसांच्या संघटनाशक्तीला साथ देण्यात, त्यांच्या कामांची गुंफण करण्यात, अडल्या वेळी त्यांना हात देण्यात व त्यांची झालेली वाढ पाहण्यात जो आनंद आहे, तो आनंद अवर्णनीय आहे.'

आज कदाचित परिस्थिती त्या काळापेक्षा वेगळी असेल, परंतु आजच्या काळातही प्रगतीची पावले टाकावयाची असतील, तर त्या काळात घडलेल्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या व्यक्तींच्या जीवनांत काय घडले, हे समजावून घेतले पाहिजे, आज असंख्य नवीन कार्यकर्ते महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात धडपडणाऱ्या मुलांप्रमाणे काम करीत आहेत. त्यांना मार्गदर्शक होईल, असे जीवनचरित्र त्यांच्या हाती पडण्याची गरज आहे.

श्री. विखे पाटील यांचे नाव आज सर्वसामान्य व सर्वपरिचित असे आहे. परंतु ते जेव्हा कुणाला माहिती नव्हते, तेव्हा त्यांनी ज्या गुणांच्या, विचारांच्या व स्वभावाच्या बळावर आपले व्यक्तिमत्त्व घडविले, ते गुण, विचार व स्वभाव यांची जोपासना करण्याची नित्यच गरज राहील, असे मला वाटते.

# ४५... दादा उंडाळकर

१९३० मध्ये व त्यानंतर कराड तालुक्यात व सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्य संग्रामात कार्य करताना बाळकृष्ण ऊर्फ दादा उंडाळकरांचा व माझा संबंध आला. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एक नवा तडफदार तरूण सार्वजनिक कार्यकर्ता जिल्हा बोर्डाचा सदस्य म्हणून, दादांचा तेव्हा वाढता नावलौकिक होता. स्वातंत्र्य-संग्रामात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांचा मोठा आधार असे. ग्रामीण भागातील प्रश्नांसंबधी तळमळ व त्या प्रश्नांसंबंधी त्यांची मते ते अगदी स्पष्ट, परखडपणे मांडीत असत.

१९३७ नंतर ते काँग्रेस संघटनेत सामील झाले व त्यामुळे त्या वेळच्या दक्षिण सातारा जिल्ह्यात काँग्रेसची शक्ती वाढविण्यास फार मोठी मदत झाली. दादांच्याबरोबर त्यांचे थोरले चिरंजीव व माझे मित्र कै. शामराव एक क्रियाशील, एकनिष्ठ कार्यकर्ते होते. दादांचा सर्व परिवार काँग्रेसमय झाला होता. विशेषतः, दादांनी माझ्यासंबंधी जो जिव्हाळा दाखविला व वेळोवेळी कामाचे कौतुक केले, ती गोष्ट मी कशी विसरू ? सार्वजनिक कामांतील दैनंदिन सहवासाने त्या परिवाराविषयी माझा जिव्हाळा वाढला गेला. ज्या जुन्या गोष्टींनी दादांची व शामरावांची आठवण झाली, म्हणजे आजही मन भरून येते.

१९४२ च्या चळवळीत दादांनी स्वतःला मनापासून झोकून दिले होते. या चळवळीच्या काळातील त्यांचा निर्धार विलक्षण होता. १९४२ च्या ऑगस्टपूर्वी देशाच्या घडामोडी कशा होतील, यासंबंधी त्यांची-माझी सहज चर्चा झाल्याचे मला आठवते. दादा त्यांच्या शैलीत म्हणाले होते,

'यशवंतराव, म्हातारा (महात्मा गांधी) अखेरची भाषा बोलू लागला आहे. मला ब्रिटिशांची धडगत दिसत नाही. काय जे ठरेल, ते नेटाने करू'.

ऑगस्टमध्ये भूमिगत राहून कार्य करण्याचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी अशा अनेक प्रमुख कार्यकर्त्यांचा निर्धार ही एक मोठी शक्ती होती. कराड तालुक्याच्या मामलेदार कचेरीवरील मोर्च्याचे नेतृत्व करण्याचा दादांनी निर्धार

केला आणि ज्या निर्धाराने प्रचंड मोर्चा त्यांनी नेला, तो दिवस आजही माझ्या डोळ्यांसमोर तसाच दिसतो आहे.

दादा तसे मोठे वक्ते नव्हते. पण खासगी बैठकीत मात्र ते तासन् तास चर्चा करीत. मुद्देसूद, स्पष्ट आणि परखड. चांगल्यांना चांगले व वाइटाला वाईट म्हणण्यास ते कधी मागे-पुढे पाहत नव्हते. पण अंतःकरणात कोणाबद्दलही वैराची भावना कधी नव्हती.

४२ च्या चळवळीतील कारावासातून परत आल्यानंतर त्या वेळी चाललेल्या उठावाच्या चळवळीला त्यांचा मोठा आधार होता. दक्षिण कराडमधील त्यांच्या भागातील जनता त्यांना फार मानीत असे.

१९६० नंतर ते प्रत्येक कार्याच्या व्यापातून काहीसे बाजूला झाले आणि आपले गाव व आपला विभाग यांत विधायक प्रवृत्तीने काम करू लागले. त्याचे कारण त्यांचे थोरले चिरंजीव शामराव त्यांच्या आधी गेले होते. दुर्दैवाने, त्यांना मृत्यूने ओढून नेले होते. घरातील कामे व शेतीच्या कामाकडे लक्ष देण्यासाठी त्यांची गरज होती व त्यांचे दुसरे चिरंजीव विलासराव यांनी त्यांच्या सार्वजनिक कामाचा बोजा उचललेला होता. आपल्या सार्वजनिक कार्याच्या व्रताची व काँग्रेसच्या कामाची परंपरा त्यांनी आपल्या चिरंजीवांच्या हाती दिली. ग्रामीण भागातील शेतीच्या व शिक्षणाच्या विकासाचा त्यांना शेवटपर्यंत ध्यास होता आणि त्यांनी त्या विभागात अनेकविध संस्था चालवून त्या कार्याचा भक्कम पाया घातला आहे.

बाळकृष्ण ऊर्फ दादा उंडाळकर हे सातारा जिल्ह्यातील आमच्या पिढीला ज्येष्ठ भावासारखे व्यक्तित्व होते. आज ते आमच्यांत नाहीत; पण त्यांचे काम त्यांचे सतत स्मरण देत राहील आणि म्हणूनच कृतज्ञतापूर्वक आज ही श्रद्धांजली वाहत आहे.

## ४६... शंतनुराव किर्लोस्कर

मराठी माणसाच्या मनासमोर 'किर्लोस्कर' शब्द उच्चारताच कृषि-क्रांतिकार्यातील कै. लक्ष्मणरावजींच्या 'किर्लोस्कर' नांगराचा सिंहाचा वाटा उभा राहतो. श्री. शंतनुरावजी किर्लोस्कर यांनी हा सिंहाचा वाटा नुसता पितृगत वारसा म्हणून न सांभाळता, आपल्या पराक्रमाने तो वाढीस लावून एक नवी औद्योगिक परंपरा निर्माण करून ठेवण्यात यश मिळविलेले आहे.

उद्योग, उत्साह व उत्कर्ष ही त्रयी कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी मराठी मनासमोर ठेवली. हा आदर्श कित्ता गिरवून, श्री. शंतनुरावांनी जे कार्य उभे केले आहे, ते त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहे. ते स्वतः एक अनुभवी तंत्रज्ञ आहेत. तसेच, आपल्या गोड स्वभावाने अनेक कर्तबगार माणसे आपल्याभोवती संघटित करणारे ते कुशल संचालकही आहेत.

सातारा जिल्ह्याची सीमा ओलांडूनही शंतनुरावांच्या कर्तृत्वाने भारताच्या विभिन्न क्षेत्रांत, प्रदेशांत प्रवेश केला, एवढेच नव्हे, तर साता समुद्रांपलीकडेही पदार्पण करण्याची धमक आज त्यांच्यांत निर्माण झाली आहे.

मराठी मनाच्या आशाआकांक्षांना, संयुक्त महाराष्ट्र स्थापनेपासून एक वेगळेच वैशिष्ट्यपूर्ण वळण लागले. अशा समयी, संस्कृती व काळाचा संकेत समजून घेऊन श्री. शंतनुरावांनी सहजपणे पाऊल टाकून, लघु व मध्यम दर्जाच्या उद्योगांनाही साह्य केले, यामुळे महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासाला हातभार लागला, हे विसरून चालणार नाही.

जेट युगातला मराठी माणूस कसा असावा, याविषयीच्या त्यांच्या कल्पना, त्यांचे विचार खरोखरीच विचार करण्याजोगे आहेत. कर्तृत्ववान माणसासारखे मोलाचे जगात दुसरे कोणतेही अन्य भांडवल नाही. आम्ही परदेशांतून अत्याधुनिक यंत्र, तंत्र व व्यवस्थापन - पद्धतीचे आराखडे आयात करू शकतो. पण कर्तृत्ववान माणसे या देशातच तयार व्हायला पाहिजेत. प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक कुटुंबात त्यांची गरज आहे. अशी माणसे मिळाली, तर सर्वच कामे यशस्वी होतील.

नव्या पिढीने श्री. शंतनुरावांच्या जीवनापासून आत्मविश्वासाची प्रेरणा घेऊन, पावले टाकली, तर देशाच्या विकासाला निश्चितच हातभार लागेल, असा विश्वास मला वाटतो. यापुढच्या काळात, पारिवारिक उद्योगसमूह ही कल्पना कालविसंगत ठरणार आहे. आर्थिक शक्तीच्या विकेंद्रीकरणाचा नवा विचार आज समर्थपणे उभा राहिला आहे. तो विचार यशस्वी करण्यासाठी, विधायक प्रयत्नांची गरज राहील. या प्रयत्नांना पूरक असे कार्य करण्याची शक्ती व दीर्घायुष्य श्री. शंतनुरावांना लाभो, अशी हार्दिक इच्छा त्यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त मी व्यक्त करतो.

# ४७... बाबूराव शेटे

श्री. बाबूराव शेटे यांचा, मुंबईतील पन्नासांहून अधिक संस्थांनी सत्कार-समारंभ आयोजित केला होता. १९८० च्या एप्रिल महिन्यात हा समारंभ झाल्याची माझी आठवण आहे. मानपत्र अर्पण करण्याच्या या समारंभात श्री. बाबूराव यांचा उल्लेख मी 'सार्वजनिक बाबूराव' असा केला होता.

श्री. बाबूराव शेटे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आहेत. सार्वजनिक कार्यकर्ता कसा घडतो किंवा घडावा, याचे प्रात्यक्षिक म्हणजे बाबूरावांचे जीवन आहे.

ते आमच्या कराड तालुक्यातील येळगाव हे त्यांचे जन्मगाव सोडून, वयाच्या पंधराव्या वर्षी मुंबईला नशीब काढायला म्हणून निघाले. या मुलामध्ये मुळातच नव्या कामाची हौस, कुतूहल आणि परिश्रम करण्याची जबरदस्त तयारी होती. या गुणांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा श्रीगणेशा झाला. मुंबई ही एक विराट नगरी. या शहरात स्वतःचे व्यक्तिमत्त्व दाखवायचे म्हटले, तर तसे अवघड काम आहे. परंतु सेवाबुद्धीने काम करणाऱ्या माणसाला अपूर्व संधी देणारे हे बहुरंगी शहर आहे.

मुंबईतल्या वरच्या श्रेणीतल्या माणसाला स्पर्धेतून नाव कमावणे अवघड ठरत असेल कदाचित; परंतु सामान्य माणसाला सेवा-भावातून व्यक्तित्व बांधता येते. श्री. बाबूराव शेटे मुंबईत पोहोचल्यावर आपले स्वतःचे व्यक्तित्व बांधावे, म्हणून त्यांनी काम केले, असे नाही; ते काम करीत गेले आणि त्यातूनच त्यांचे व्यक्तित्व वाढत गेले.

मी व्यक्तिशः त्यांना कमीत कमी पंचवीस वर्षांहून अधिक काळ ओळखतो. ते मला प्रथम भेटले, तेव्हाच मला असे वाटले की, या माणसात काही विशेष चमक आहे. मुख्यमंत्री असताना अनेकविध कामांसाठी माझ्याकडे येणाऱ्यांत बाबूराव नाहीत, असे कधी झाले नाही. त्यामुळेही माझ्या लक्षात आले, की या माणसात काही विशेष गुण आहेत.

श्री. बाबूराव शेटे यांनी मुंबईसारख्या शहरात अनेक संस्था उभ्या केल्या.

सामान्य माणसांना साथीला घेऊन संस्था उभारल्या. संस्था बांधण्याचे काम करताना वैयक्तिक जीवनात शाश्वती यावी, असे प्रयत्न करायला बाबूराव चुकले नाहीत. जीवन-चरितार्थासाठी नोकरी करायची आणि संस्था बांधण्याचे कामही करायचे, असे सुरू राहिले. बाबूरावांनी आपल्या जीवनाला संस्थात्मक घाट दिला आहे. एका व्यक्तीचा संस्थांशी किती आणि कसा क्रियाशील संबंध असू शकतो, हे त्यांचे कार्य पाहिल्यावर लक्षात येईल. संस्था-बांधणीचे काम करण्यासाठी बाबूरावांना आपले जीवन नियमित करावे लागले. वैयक्तिकदृष्ट्या त्यांच्या जीवनाची पार्श्वभूमी खेड्याची असल्याने आणि नशीब काढायला म्हणून स्वतः मुंबईस आलेले असल्याने, नशीब काढायला मुंबईत येणाऱ्यांबद्दलची त्यांची सहानुभूती जिवंत आहे.

करूणेच्या पोटी काम केले पाहिजे, अशा उपदेशाची त्यांना गरज नाही. गरिबीच्या दाहकतेचा अनुभव त्यांनी स्वतः घेतलेला असल्याने ते ही कामे करण्यात आणि त्यासाठी निर्माण केलेल्या संस्था, यांच्याशी ते ताबडतोब एकरूप होऊन जातात. त्यांना कसल्याही तऱ्हेचा न्यूनगंड नाही. मुंबईतल्या कार्यक्षेत्रातल्या सर्व स्तरांवरील मंडळींशी बरोबरीच्या नात्याने बोलून चर्चा करण्यात आणि काम यशस्वी करण्यात त्यांचा हातखंडा आहे. ते मुंबईचे महापौर झाले, तेव्हा निदान मला तरी आश्चर्य वाटले नाही. याच्याहीपेक्षा मोठ्या जागा शोधण्याची त्यांची कुवत आहे, अशी माझी भावना आहे. आज तर ते सार्वजनिक कार्याच्या उमेदीच्या काळात आहेत. त्यांच्या समोर अजून वीस-पंचवीस वर्षे आहेत. त्यात ते आणखी नावलौकिक मिळवतील, असा विश्वास वाटतो.

मुंबई शहर हे संमिश्र लोकवस्तीचे शहर आहे. श्री. बाबूराव शेटे यांनी या शहरातील विविध थरांतील आणि कमी-अधिक प्रमाणात विविध धर्मीयांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले आहेत. मराठी, गुजराती समाज, कामगार-वर्ग, सरकारी कर्मचारी, सर्व राजकीय पक्षांतील कर्ती माणसे यांच्याशी त्यांचे वैयक्तिक संबंध आहेत. राखावी बहुतांची अंतरें! हा समर्थांनी केलेला उपदेश बाबूरावांच्या रक्तात आहे. बहुतांची अंतरे त्यांनी राखली, पण त्याचा उपयोग सार्वजनिक संस्थांच्या कार्यासाठी केला आहे, वैयक्तिक कामासाठी नाही. अशा या कर्तबगार माणसाचे जीवन मुंबईतल्याच नव्हे, तर महाराष्ट्रातील मोठ्या शहरांतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरणारे आहे.

श्री. बाबूराव शेटे यांचे जीवन वैयक्तिक यशाची कथा नव्हे. सार्वजनिक

कार्यकर्ता कसा बनतो, त्याची ही कहाणी आहे. अशा या गुणी माणसाचे चरित्र जीवन नवतरूणांना खचितच प्रेरणा देईल.

# ४८... धों.म. मोहिते

श्री. धों. म. मोहिते यांच्याबद्दल माझ्या अंतर्यामी एक प्रकारचा जिव्हाळा आहे आणि या जिव्हाळ्याचे मुख्य कारण म्हणजे, मोहित्यांचे वडगाव आणि माझे आजोळ देवराष्ट्रे ही सख्ख्या भावंडांसारखी एकमेकांशेजारी खेटून बसलेली गावे आहेत. मोहित्यांचे वडील महादू मास्तर मुंबईला गिरणगावात जाऊन नाव काढलेले कर्तबगार गावकरी होते. त्यांची 'मास्तर' ही पदवी शिक्षकाच्या पेशाची नव्हती. गिरणी-कामगारांमध्ये म्होरकेपण घेऊन जॉबर किंवा चीफ-जॉबर होणाऱ्याला मास्तर ही पदवी प्राप्त होते. महादू मास्तर अशा नाव काढलेल्या कर्तबगारांतील प्रमुख होते. आपल्या पंचक्रोशीतील शेकडो लोकांना मुंबईला नेऊन रोजगार देण्याची किमया त्यांनी केली असल्यामुळे त्यांचा तसा दबदबाही त्या भागात होता. ग्रामीण जीवनात प्रस्थ असलेल्या महादू मास्तरांचे आमचे लेखक मोहिते हे चिरंजीव. घराची परिस्थिती तशी बऱ्यापैकी. गावात-भागात तसा थोडा-फार नावलौकिक. माझा अंदाज होता, की ठरावीक चाकोरीतील चळवळीत भाग घेऊन धोंडीराम आता कोणत्याही एका राजकीय पक्षाचा आपल्या भागातील 'पुढारी' होणार आणि त्या मैदानात त्यांची -आमची मुलाखत होणार; पण घडले उलटेच!

श्री. मोहिते आजही आपल्या शेतीचे काम करतात; गावातील सहकारी सोसायटीकडे लक्ष देतात. इतर सार्वजनिक कामांतही आपल्या शक्त्यनुसार आपला वाटा उचलीत असतात. परंतु राहिलेल्या वेळात ते अवती-भोवतीच्या जीवनात ऐकले, पाहिले, अनुभवले, ते सारे शब्दांकित करावे आणि इतरांना सांगावे, या त्यांच्या ऊर्मीतून लेखक मोहिते निर्माण झाला आहे. अनपेक्षितपणे काही वर्षांपूर्वी त्यांचा एक लेख मी 'किर्लोस्कर' मध्ये पाहिला, वाचला आणि तो मला आवडलाही. माझी भेट झाल्यानंतर त्यांना मी हे बोलूनही दाखविले. नंतर ते वारंवार लिहू लागले. आज त्यांच्याबद्दल लिहिताना मला खरोखरीच आनंद होत आहे.

'मुलाखतीच्या मैदानातून' ते पुस्तक नुकतेच मी वाचले. त्या पुस्तकामध्ये श्री. मोहिते यांनी आपल्या लेखांत जो परिसर रेखाटला आहे व जी प्रातिनिधिक

व्यक्तिचित्रे रंगविली आहेत. त्या ग्रामीण जीवनासंबंधी माझ्या मनात तीव्र जिव्हाळा आहे.

कृष्णा-कोयना आणि वारणा-वेरळा या नद्यांच्या खोऱ्यांतील जनजीवनाच्या प्रवाहात, नाही म्हटले, तरी एक प्रकारचा अवखळपणा आहे. या अवखळपणाचे काही नमुने धोंडीराम मोहिते यांनी आपल्या लेखांद्वारे वाचकांपुढे ठेवले आहेत. हा अवखळपणा कधी पराक्रमी बंडखोरीची झेप घेतो, तर कधी गुन्हेगार फरारीपणाचे वळसे घेतो; कधी रंगेलपणाचे, तर कधी रगेलपणाचे रूप घेतो. पिऱ्या मांग, पठ्ठे बापूराव, मोहन मोहिते ही व्यक्तिचित्रे हे स्पष्ट करतात. की जशी अवखळ चित्रे येथे आहेत. तशीच नदीच्या संथ डोहाप्रमाणे समाजजीवनाला सतत शक्ती देणाऱ्या पुरूषार्थी जीवनाचे रेखाटनही यात आपल्याला सापडेल, कृषिपंडित, भीमगोंडा, मणिभाई देसाई, भाऊसाहेब साळुंखे यांची व्यक्तिचित्रे म्हणजे याचे नमुने आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात ग्रामीण जीवनात विधायक बदल करणाऱ्या ज्या प्रेरणा क्रियाशील झाल्या आहेत, त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या तऱ्हेने या पुस्तकात दिसते. त्यांनी आपल्या निवेदन-कौशल्याने व सहृदयतेने ही व्यक्तिचित्रे रंगविली आहेत. मला विश्वास आहे, की मराठी वाचकही या ग्रामीण लेखकाचे तितक्याच सहृदयतेने स्वागत करतील.

# ४९... सुधांशु ( ह.न.जोशी)

श्री. सुधांशु हे आमच्या कृष्णाकाठचे संवेदनशील प्रसिद्ध कवी आहेत. आपल्या साध्या, पण संवेदनशील जीवनात रममाण असणारा हा कवी अवतीभोवतीच्या समाजजीवनात सहानुभूतीने समरस होणारा खराखुरा साहित्यिक आहे. त्यांच्या कवितांचे प्रसिद्ध झालेले छोटे छोटे काव्यसंग्रह यापूर्वीच मराठी वाचकांपुढे आलेले आहेत, आणि त्या सर्व कविता मी पहिल्यापासून अत्यंत आवडीने वाचीत आलो आहे. त्यांच्याबद्दल व त्यांच्या कवितांबद्दल मला वाटणारा जिव्हाळा मी येथे व्यक्त करीत आहे. काव्याच्या क्षेत्रात जाणता वाचक या नात्याखेरीज अकारण प्रवेश करण्याचा मला फारसा अधिकार नाही, हे मी जाणतो.

कल्पनाशक्ती शापही आहे आणि वरही आहे. अतितरल कल्पनाशक्ती असल्याशिवाय सरस साहित्यनिर्मिती होणे कठीणच. परंतु हा शाप जीवनातल्या अनंत वेदना शब्दरूप करणारा आहे. स्वतःच्याच नव्हे, तर सहसंवेदनेने अनेकांच्या भावनांना शब्दरूप देऊन निर्भेळ आनंदाची निर्मिती करणारा असा हा शाप एखाद्या भाग्यवंतालाच पूर्वपुण्याईने लाभतो.

सूर्य जे पाहू शकत नाही, ते कवी पाहू शकतो. जीवनातल्या अशा काही खाचाखोचा असतात, की त्या सुसह्य व्हायला जगातले पांडित्य, सारे तत्त्वज्ञान अपुरे ठरते. कवीच्या मुखातल्या एका आर्त शब्दात ह्या साऱ्या अनुभवातून एक निराळे भव्य-दिव्य स्वप्न दाखवायची शक्ती असते, समवेदनेचा दिलासा असतो. सुख वाढवणारी, दुःखे हलकी करणारी, आशेच्या नवजीवनाने नवजीवन जगण्याची उमेद देणारी ही संजीवनी मुक्त हस्ताने सर्वांना देण्याचे औदार्य कविमनालाच असते.

कवी 'सुधांशु' कल्पनाशक्तीचे हे असेच वरदान घेऊन वाचकांपुढे 'स्वर' रूपात आले आहेत. 'दत्त दिगंबर दैवत माझे' या भक्तिमधुर गीताने सर्वांनाच परिचित झालेले. 'सुधांशु' रसिकांच्या भावमनाला अनेक स्वरमधुर गीतांनी रिझवीत आहेत. घराघरांतून नित्य नव्या भावोन्मेषाने त्यांची गीते

आबालवृद्धांच्या ओठांतून उमटतात.

कृष्णाकाठचा हा मराठमोळा कवी प्रीती, भक्ती, कारूण्य, उद्वेग, दु:ख, तृप्ती अशा नवविध स्वररसांची उत्कटता घेऊन वाचकांच्या भेटीला येत असतो. भावनोत्कटतेने रंगलेले त्यांचे काव्य रसिकांना निश्चितच आवडते.

कवी 'सुधांशू'चे काव्य कधी रडवील, कुठे हसवील, तर कुठे वाचकांना अभिमानाने आनंदाचे नवे स्फुरणही देईल.

'सुधांशूं' च्या कविता सहज-सोप्या प्रसादयुक्त शब्दरचनेने विलोभनीय असतात. या स्वराला 'माउलीच्या ओव्यांचा ठेवा' मिळाल्याचा सार्थ अभिमान आहे. जन्मग्रामाबद्दलच्या-जन्मठिकाणाबद्दलच्या, परिसरासंबंधी, संस्कारासंबंधीच्या-समृद्धीविषयीच्या भावना त्यांच्या कवितांतून व्यक्त झालेल्या दिसून येतात. मातृप्रेम, देशप्रेम, प्रीती, समाजजीवन, आकांक्षा, शल्ये यांविषयी जितक्या उत्कटतेने, आर्ततेने हा स्वर गात आहे, तितक्याच व्यथित आर्त भावनेने चांद्रवीर, रवींद्र सरोवर, गंधर्व गीतांची चंदनी रजनी ही उजळून निघालेली आहे. 'पोरबंदरीची ज्योत' सुद्धा या भावस्वरांना उजळून राहिलेली आहे. या स्वरांचे हे वैशिष्टय मनाला आगळे समाधान देते. ज्याला जे हवे आहे, ते या 'स्वरा'ने शब्दरूपात पुढे केलेले आहे. या पाथेयाच्या विविध रूपांचे कौतुक करायचे आहे रसिकांनी!

आजकाल कवितांना व्यवहारी जगात बाजारभाव नसला, तरी अजूनही कविता आवडीने वाचणारे आणि ऐकणारे रसिक संख्येने कमी नाहीत. किंबहुना कवितांना स्वरबद्ध करून गुणगुणायचा छंद वाढताच आहे. गेय कवितांची ही मागणी व्यवहारात भावगीत म्हणून खपते. कविता, खरे तर, मूळचेच भावगीत असते. या भावगीतांचा 'स्वर' सुधांशूंना नैसर्गिकपणाने सहज, स्वाभाविक सुरेल व माधुर्याने मनोहर होऊन लाभला आहे. अशा या अवीट स्वरमाधुर्याची ओढ मराठी रसिक माणसाला हवीहवीशी वाटेल, यात शंका नाही.

## ५०... नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर

श्री. काकासाहेब खाडिलकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे स्मरण करीत असताना साहजिकच मराठी रंगभूमीचा सारा वैभवशाली काळ डोळ्यांसमोर उभा राहतो. वस्तुतः पारतंत्र्याच्या काळात एक घनघोर राष्ट्रीय संघर्षाच्या प्रांरभकाळीच खाडिलकर पत्रकार म्हणून आपले विचार 'केसरी' च्या द्वारे लोकांसमोर मांडू लागले होते. पण त्याच काळात खाडिलकरांनी 'स्वयंवर' 'मानापमान' सारखी ललित नाटके लिहिली आणि आपल्या रसिक प्रवृत्तीचा परिचय महाराष्ट्राला करून दिला. ते स्वतः म्हणाले होते, की 'मी प्रथम नाटकी आहे, नंतर पत्रकार आहे.'

खाडिलकर हे ध्येयवादी होते. उदात्त गुणांचे त्यांना आकर्षण होते. काही जीवनमूल्यांवर त्यांची निष्ठा होती. एक प्रकारे त्यांच्या मनाची घडण आध्यात्मिक होती. त्यांच्या नाटकांतील अनेक पात्रे या गुणांचे दर्शन घडवितात. तसेच, खाडिलकरांच्या सगळ्या नाटकांत कै. तात्यासाहेब केळकरांनी म्हटल्याप्रमाणे 'ओज हा गुण आहे', त्यांचे शृंगार आणि करूण रससुद्धा ओजगुणान्वित असतात; व त्यामुळे त्या रसाभोवती एक प्रकारचे उदात्त वातावरण निर्माण होते. मला वाटते की, महाभारतातील व्यक्तिरेखांना हीच युद्धाची पार्श्वभूमी आहे. त्यातील शृंगार हा वीरांचा आहे. त्यातील कारूण्यही युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घटनांचे आहे आणि त्या युद्धामुळे व्यक्तींच्या जीवनांत निर्माण झालेल्या तणावांचे महाभारतात वर्णन आहे. मराठयांच्या इतिहासातही हेच कारूण्य-नाट्य आहे. खाडिलकरांनी 'स्वयंवर', 'भाऊबंदकी' किंवा 'सवाईमाधवराव यांचा मृत्यु' या नाटकांचे विषय निवडले, ते याच आकर्षणामुळे असावेत. एका युयुत्सू व प्रतिभाशाली नाटककाराला जो शृंगार, जे कारूण्य दिसले, ते युद्धाच्या पार्श्वभूमीवरचेच होते. राजकारणातील कारस्थाने व त्यांचे पर्यवसान दाखविणारे 'भाऊबंदकी' आनंदीबाई-राघोबा यांचा शृंगारही दाखविते किंवा 'स्वयंवरा' तील 'खडा मारायचा झाला, तर माझ्या हातावर नाही, घागरीवर मारायचा, तसंही नको... खड्यानं घागर फुटून मी ओलीचिंब झालेली मला नाही आवडायचं... ही रूक्मिणीची वाक्ये शृंगारिक

पोताचीच आहेत. 'मानापमान'तही मदनबाधा झालेली भामिनी धैर्यधराकडेच आकर्षित होते. नव्हे, त्याचा ती ध्यास घेते. शूरांचा शृंगार, त्यांच्या कौटुंबिक जीवनातील नाट्य, त्यांचे खलपुरूषाशी येणारे संबंध व त्यांतून निर्माण होणारे तणाव हे खाडिलकरांचे आवडते विषय आहेत.

अर्थात आता आपले विषय साहजिकच बदलले आहेत. ज्या अर्थाने आज आपली नाटके सामाजिकदृष्टया वास्तव वाटतात, तशी खाडिलकरांची नाटके वाटत नाहीत. निदान आज पाहताना तरी तशी ती वाटत नाहीत. किंबहुना ती रोमँटिक वा कल्पनारम्यच वाटतील. गेल्या सत्तर-ऐंशी वर्षांत मानवी मनाचे अंतरंग उकलून दाखविणारी नाटके लिहिली जात आहेत. कारण त्याचे अंतरंगच बदलत आहे. त्याची सामाजिक व व्यक्तिगत मूल्ये बदलत आहेत. त्यामुळे आजचे सामाजिक नाटक पाहताना त्यातील संघर्षांनी मन व्याकूळ होते. खाडिलकर किंवा त्या काळातील सर्व नाटककार यांनी जे समाजदर्शन घडविले आहे, ते एका अर्थाने अत्यंत ढोबळ आहे. चांगले आणि वाईट या दोन गडद रंगांनी रंगविलेली 'एकच प्याला' सारखी नाटके किंवा 'मानापमान' सारखी काल्पनिक संघर्ष रंगविणारी नाटके आता चिकित्सक मनाची पकड घेतीलच, असे सांगता येत नाही.

असे असले, तरीही आपण जीवनाची सध्या इतकी गुंतागुंत पाहत आहोत, व भयानक पोकळी अनुभवीत आहोत, की त्यामुळे कधी कधी ही जुनी नाटके फँटसीसारखी आल्हादायक वाटतात. मला वाटते, त्या नाटकांचे वाङ्मयीन मूल्य मोठे आहेच, पण हे सामाजिक मूल्यही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण विरंगुळा म्हणून या नाटकांचे महत्त्व फार मोठे आहे. खाडिलकरांचे 'स्वयंवर' किंवा किर्लोस्करांचे 'सौभद्र' यांची गोडी अवीट राहते, याचे हेही एक कारण असावे.

खाडिलकरांच्या नाटकातील संगीत हा दुसरा बहारदार विशेष आहे. आपल्या नाटकांतील संगीतामुळे काही अंशी अभिनय दुय्यम मानला गेला, हे खरे आहे. पण नाट्यसंगीतासारखा एक अपूर्व संगीतप्रकार त्यामुळे जन्माला आला आणि आजही त्याची गोडी टिकून आहे, हे विसरता कामा नये, गद्य नाटकांचा रूक्षपणा घालवून नाटक हे मन गुंतवून ठेवणारे कलामाध्यम झाले. हे निर्विवाद आहे. ऑर्गनचे सूर ऐकले, की आजही मराठी प्रेक्षागृहात जे वातावरण निर्माण होते, त्यासाठीच संगीत नाटक हे कायम टिकले पाहिजे, असे प्रेक्षक म्हणून मला वाटते. नाटकात थोडी कृत्रिमता अपरिहार्य आहे. पण किर्लोस्कर,

खाडिलकर, देवल यांच्या नाटकांत जे संगीत आले, ते त्या कथानकातील काही भावनिक धागे जुळविणारे होते, हेही निर्विवाद आहे. तसेच, कै. अण्णासाहेब किर्लोस्करांनी समर्पक रीतीने म्हटल्याप्रमाणे, गायनरस आळविणे हे संगीत नाटकाचे उद्दिष्ट आहे. खाडिलकरांच्या नाटकांत 'स्वयंवर', 'मानापमान' ही दोन नाटके मराठी नाट्यसंगीताची लयलूट करतात, आणि तरी आजही मराठी रसिकांना रिझवितात. पण केशवराव भोसले- बालगंधर्व, आदींची जी संगीत परंपरा निर्माण केली, ती टिकविण्यासाठी तितक्याच ताकदीची व तपश्चर्येची नटमंडळी लागतात. नाही तर नाट्यगीते ही भावगीते होतील आणि त्यांतील गायनरस नाहीसा होईल. म्हणून मराठी रंगभूमीचा हा वारसा टिकवावयाचा असेल, तर ही तपश्चर्या चालू ठेवावी लागेल.

खाडिलकरांच्या नाट्यसेवेचे समीक्षण करताना त्यांच्या एका वैशिष्ट्याचा उल्लेख केलाच पाहिजे. तो हा की, ते स्वतः नाटक मंडळीच्या कारभारात लक्ष घालून त्यांना आधार देत, मार्गदर्शन करीत. किंबहुना महाराष्ट्राच्या सर्व प्रमुख नाटककारांना 'कंपनीचे बिऱ्हाड' हे स्वतःचे घरच वाटत असे. त्या काळच्या त्या नाट्यशिक्षणसंस्थाच होत्या आणि त्यांत हे नाट्यशिक्षण शिकविण्याचे काम करीत होते. ही संस्थाच आता बंद पडल्यासारखी वाटते. साहित्यिकांचा व नटांचा सहवास घडला, तर नटांची नाटकाविषयीची समज वाढते, त्यामुळे अभिनयाचा दर्जा वाढतो. मराठी साहित्यिकांनी व नव्या नाटककारांनी ही परंपरा पुन्हा चालू करण्यासारखी आहे. आज मराठी रंगभूमीचा पिसारा शोभिवंत दिसतो आहे. त्याचा कस वाढवावयाचा असेल, तर असे नाट्यजीवनाशी समरस झालेले नाटककार हवे आहेत. नाट्यनिर्मात्यांनी किर्लोस्कर, खाडिलकरांचे याबाबत अनुकरण करण्यासारखे आहे.

खाडिलकरांची नाट्यप्रतिभा देशसेवेला वाहिलेली होती. त्या काळच्या वातावरणाने ती ओजस्वी झाली. खाडिलकरांच्या त्या सामाजिक जाणिवेचे व त्यांच्या कलात्मक गुणांचे मनोज्ञ व सर्वांगसुंदर दर्शन त्यांच्या नाटकांत दिसते. म्हणूनही त्यांचे मराठी रसिकाला सतत स्मरण होत राहील.

# ५१... वि.स. खांडेकर

मी आज कृतज्ञतेचे भाषण करणार आहे. ज्यांनी आमच्यावर काही संस्कार जर केले, विचार दिले आणि मराठी भाषेची थोर सेवा केली, अशा एका थोर विचारवंतासंबंधीची कृतज्ञता आहे. आज हा समारंभ पाहून मराठी माणसाबद्दल आणि मराठी भाषेबद्दलचा अभिमान पुन्हा अगदी उंचावून जातो. मराठी माणूस ज्या खुशीने आणि हौसेने खासबाग मैदानात कुस्ती बघतो, त्याच खासबाग मैदानामध्ये चांदण्याच्या आणि फुलांच्या कथा सांगणाऱ्या श्री. भाऊसाहेब खांडेकरांचा हा मानसन्मानाचा समारंभ आज आपण अक्षरशः हजारोंच्या संख्येने एकत्र येऊन साजरा करीत आहोत, हे कुणालाही आनंद देणारे असे चित्र आहे. महाराष्ट्रातल्या साहित्यिकांना मी सांगेन की, तुम्ही तुमच्या लेखणीच्या द्वारे आणि मराठी माउलीच्या द्वारे जी ज्ञानाची आणि सरस्वतीची सेवा करीत आहात, तिची पोच तुम्हां सर्वांना आज खासबाग मैदानावर जनतेने या सोहळ्याच्या रूपाने दिली आहे. या अर्थाने हा प्रातिनिधिक सत्कार-समारंभ आहे.

मी कृतज्ञतेचे भाषण करणार आहे, ते अशासाठी, की भाऊसाहेब हे गेली चाळीस-पन्नास वर्षे महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या साहित्याच्या प्रकारांमध्ये लिहीत आलेत. मी लहानपणापासूनच, म्हणजे मराठी शाळेत जात असताना, मी परवा त्यांना त्याची दिल्लीला आठवण करून दिली होती. - त्यांचे लेख वाचीत आलो आहे. ते शिरोड्याला असताना एका लहानशा साप्ताहिकात लिहीत असत. त्या साप्ताहिकाचे नाव होते ‘वैनतेय’ आणि आमच्या गावच्या लायब्ररीमध्ये जी छोटी पत्रे येत होती, त्या पत्रांमध्ये एकदा मी एक अनपेक्षित मथळा पाहिला. मथळ्याचे नाव होते : ‘गाढवाची गीता’ मी मनाशी म्हटले, ‘गाढवाची गीता’ लिहिणारा हा कोण माणूस आहे आणि खाली नाव पाहिले, तर वि.स.खांडेकर ! हे नाव प्रथम वाचले, ते तेव्हा, आणि ते मनात बसले. त्यानंतर ‘किर्लोस्कर’ मध्ये, ‘यशवंत’- मध्ये आणि इतर जी मासिके आहेत, त्यांत आपण अनेकांनी वाचल्या असतील, तशा मीही त्यांच्या कथा वाचीत आलो. कथांमागोमाग कांदबऱ्या आल्या. टीकात्मक निबंध आले. सर्व काही आले.

त्यांच्या शब्दचमत्कृती, त्यांच्या कल्पनाचमत्कृती यांच्यामुळे त्यांचे लिहिणे मला आकर्षित करीत होते. भाऊसाहेबांच्या कथा-कादंबरीतील नायकाला आठवण झाली, म्हणजे ती वाऱ्याच्या झुळकीसारखी आल्हाददायक असायची. भाऊसाहेबांच्या नायिकेला भीती वाटली, तर ती भीती म्हणजे संध्याकाळच्या वेळी अंधारामध्ये जसे काहीसे विळविळले, म्हणजे वाटते, तशी ती भीती असायची. भाऊसाहेबांच्या नायकाने एखाद्या तरूणीच्या उजव्या गालावरची खळी पाहिली, म्हणजे आपण लहान असताना तळ्यात खडा मारल्यानंतर जे पाण्यात भोवरे फिरत-फिरत जातात, त्यांची त्यास आठवण व्हावयाची. भाऊसाहेबांचे वाङ्मय वाचायला घेतले. म्हणजे बीजेची कोर आली नाही किंवा चवथीचे चांदणे आले नाही, असे कधी व्हायचे नाही. भाऊसाहेबांच्या वाङ्मयात निदान मी कधी अमावास्या पाहिली नाही. ती बीजेची कोर असेल किंवा चवथीचा चांद असेल किंवा अष्टमीचा चंद्रमा असेल, किंवा पुनवेचा चंद्र असेल. असा हा चांदण्याचा लेखक आहे. प्रकाशाचा लेखक आहे. सहृदय लेखक आहे. पण नुसता सहृदय लेखक नाही, तर भाऊसाहेबांच्या लेखामध्ये स्वप्नाळू सहृदयतेबरोबर निर्धारित क्रियाशीलताही आहे. भाऊसाहेबांना फुले व चांदणे फार आवडते. पण पुढे ते जसे जसे लिहीत गेले, तसे तसे त्यांचे वाढते वाङ्मय सातत्याने १९४० पर्यंत मी नियमाने वाचले.

मी आपणां सगळ्यांची माफी मागून एक गोष्ट सांगणार आहे. बऱ्याच शतकांनंतर मराठी 'ययाति' ने दिल्ली आपलीशी केली. मी 'जिंकली' म्हणत नाही. यामुळे भाऊसाहेबांची कीर्ती अमर झाली. हे सर्व जरी खरे असले, तरी माझ्या वैयक्तिक मताने भाऊसाहेबांच्या दुसऱ्या काही कलाकृती 'ययाति' पेक्षाही मोठ्या आहेत. अर्थात भाऊसाहेबांना कोणी विचारले की, तुमची आवडती कांदबरी कोणती? तर आईला, तुझा लाडका मुलगा कोणता, हे विचारण्यासारखे होईल. म्हणून मी त्यांना तसे विचारू इच्छीत नाही. पण इतरांना, काय आवडते, हे सांगण्याचा अधिकार आहे, असे मी मानतो. 'ययाति' तर आता श्रेष्ठ ठरली आहेच, पण भाऊसाहेबांनी १९३० ते १९४० या काळात जे लेखन केले आहे, त्यात मराठी जीवनाचे आणि विशेषतः, मध्यमवर्गीय जीवनातील संघर्षाचे जे चित्रण आहे, ते सामान्यतः मराठी मनाचे प्रतीक आहे. तो संघर्ष ज्या जाणिवेने भाऊसाहेबांनी त्या काळामध्ये मांडलेला आहे, त्यामुळे त्या कालखंडातील भाऊसाहेबांची पुस्तके अजूनही माझी आवडती आहेत, असे मी नम्रतेने सांगू इच्छितो.

मी इथे येण्यापूर्वी भाऊसाहेबांच्या संदर्भात बोलायचे, तेव्हा त्यांच्या लेखनातील आपल्याला काय आवडते, ते पुन्हा एकदा चाळले पाहिजे, म्हणून चौकशी करायला गेलो, तेव्हा समजले की, त्यांची 'दोन ध्रुव' ही कादंबरी प्रकाशकांनी पुन्हा प्रसिद्ध केलेली नाही. यासंबंधीची तक्रार मला जाहीरपणे करायची आहे. बाजारात ते मिळत नाही. एका प्रकाशक मित्राच्या मदतीने लायब्ररीतून मी आणून ती पुन्हा एकदा चाळली. 'दोन ध्रुवां' सारखीच त्यांची 'पांढरे ढग' ही माझी अतिशय आवडती कादंबरी आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांचीही आवडती आहे. आता 'ययाति' आणखी जास्त आवडती झाली असेल, तर ते योग्य आहे. हे सर्व सांगतो आहे, ते अशाकरिता की, माझ्या मते 'दोन ध्रुव' व 'पांढरे ढग' हे मराठी मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे अत्यंत समर्पक असे चित्रण आहे. कोणत्याही देशामध्ये आणि समाजामध्ये मध्यमवर्ग हा एक महत्त्वाचा, तसाच एक विशिष्ट वर्ग मानला जातो. या संबंधाने काही चांगल्या इंग्रजी ग्रंथकारांनी केलेले मोठे अर्थपूर्ण विश्लेषण माझ्या वाचनात आले आहे. आपल्याही मध्यम वर्गाचे असेच आहे. मध्यमवर्गामध्ये काही उच्च मध्यमवर्गीय भाग आहे, गरीब मध्यमवर्गीय भाग आहे. त्याचे भाऊसाहेबांनी फार सुरेख वर्णन केले आहे. मध्यमवर्गातला हा जो वरचा भाग असतो, तो, त्याच्यापेक्षा जे वरचे लोक असतात, त्यांच्याकडे वळायच्या नादात, पळायच्या नादात असतो. जो हजार-पंधराशे रूपयांच्या वरच्या उत्पन्नाचा वर्ग म्हणा, फार तर त्यात पंधराशेचे दोन हजार आणि दोन हजारांचे अडीच हजार कसे होतील, या नादात असतो. परंतु मध्यमवर्गाचा जो लहान मध्यम म्हणून ज्याला गरीब मध्यमवर्ग म्हणतात, त्याची नजर वरती नसते, तर त्याची नजर खाली असते, जो आपल्यापेक्षा गरीब आहे, दुबळा आहे, जो दलित आहे, त्याच्या दु:खांना वाणी देण्याचा किंवा वाचा फोडण्याचा तो प्रयत्न करीत असतो.

भाऊसाहेबांच्या या काळामधल्या ग्रंथांमध्ये, कथांमध्ये, विचारांमध्ये मी हे सामाजिक सत्य पाहिले. त्यांच्या 'पांढऱ्या ढगा' तला, स्पेनची लढाई आणि रशिया पाहून आलेला नरेंद्र, नायकाला पत्र लिहितो आणि त्यात जन्मभर लक्षात ठेवावे, असे एक वाक्य आहे. आठवणीने सांगतो, माझी आठवण पक्की आहे. ती कादंबरी १९३०-४० च्या सुमारास, मला वाटते, प्रसिद्ध झाली होती. माझ्यासारखी अनेक तरूण माणसे या लढ्यात हिंदुस्थान काय करणार, या वेडाने उगीचच अस्वस्थ झाली होती. आपल्याही परीक्षा हुकल्या, तरी चालतील, असे धोके पत्करायला मन उत्सुक होते. मी कांदबरीतील

नरेंद्रासंबंधी बोलत होतो, तो नरेंद्र म्हणजे सामान्य तुमच्या-आमच्यामधलाच मनुष्य आहे. म्हणजे तुम्ही-आम्ही स्वतःलाच प्रश्न विचारतो आहोत, असे समजा. त्याने असा प्रश्न विचारलाय् की तत्त्वज्ञानाची अनेक पुस्तके तोंडपाठ करूनसुद्धा मनुष्य चुका करतो, याचे कारण काय? आणि उत्तरही तोच देतो की, याचे कारण एकच आहे की, तो एक पुस्तक वाचायचे अजिबात विसरलेला असतो आणि ते पुस्तक म्हणजे मानवी जीवन; आणि माझ्या मते ते खरे आहे. ज्याला माणसाच्या जीवनातील सुखदुःखे व पाठीमागच्या त्या प्रेरणा, त्यांच्या यातना-वेदना समजल्या नाहीत, तो पांढऱ्यावरती कदाचित काळे करू शकतो. पण शेकडो वर्षे टिकून राहील, असे जिवंत वाङ्मय निर्माण करू शकणार नाही. मराठी साहित्यक्षेत्रात पुष्कळ वाद झाले. कलेकरिता कला, की जीवनाकरता कला आणि अशा तऱ्हेचे वाद झाले. पण भाऊसाहेब खांडेकर हा एक माणूस असा आहे की, ज्याने आग्रहाने सांगितले की, तुम्ही नुसत्या काल्पनिक आनंदाच्या गोष्टी बोलून भागणार नाही. तुमच्या लेखनाला जर काही विचारप्रेरक असा दृष्टिकोन नसेल, तुमच्या लेखनाला जर काही सामाजिक आशय नसेल, तर तुमचे लेखन हे खरे साहित्य होऊ शकणार नाही. कोल्हापूरसारख्या शहरामध्ये बसून या माणसाने लिहिलेले लेखन उत्तर प्रदेशाच्या, बिहारच्या व उंच पहाडावरील काश्मीरच्या लोकांच्या मनापर्यंत जाऊन पोहोचले. याचे खरे कारणच हे आहे की, शेवटी माणूस हा एक आहे. तो कोल्हापुरात राहत असेल किंवा श्रीनगरमध्ये राहत असेल, कदाचित तो तामिळनाडूच्या एखाद्या कोपऱ्यात राहत असेल; पण त्याच्या काही मूलभूत भावना या एकसूत्र आहेत. त्या भावनांना स्पर्श करण्याचे सामर्थ्य ज्या लेखणीत आहे, ती लेखणी ही खरी साहित्यिक लेखणी आहे. मघाशी कुणी तरी म्हटले, ते खरे आहे. खांडेकरांना आपण महाराष्ट्रीय म्हणतो. तामिळनाडूची माणसे म्हणतात की, हा आमचा लेखक आहे. त्यांना माहीत नाही, ते कोण आहेत. मराठीमध्ये जेवढ्या 'दोन ध्रुवा'च्या आवृत्त्या निघालेल्या आहेत, त्याच्यापेक्षा जास्त आवृत्त्या तामिळमध्ये निघाल्या आहेत.

मला समजलेली खांडेकरांची भूमिका मी आपल्याला सांगत होतो. दोन स्वरूपांच्या मध्यमवर्गीय समाजाचे चित्रण करीत असताना त्यांनी असा मध्यमवर्गीय रंगवला आहे की, जो स्वतः गरीब आहे आणि त्याच्याहून लहान, पण बंधनात अडकलेला जो समाज आहे, त्याला वर उचलून घेण्याचा प्रयत्न करण्यामध्ये ज्याला आनंद आहे. स्वतःच्या जीवनातील रंगेल खेळ मांडण्यापेक्षा

शिकार करावयाची असेल, तर सामान्य जनांकरिता आपल्या जिवाची शिकार केली पाहिजे, हे आवाहन करणारा हा माणूस आहे. मला आठवते, त्यांची 'दोन ध्रुव' कादंबरी मी प्रथम कोल्हापूरमध्ये वाचली. १९३४-३५ साली मी कोल्हापूरला प्रथम आलो होतो. ही नवीन कादंबरी हातांत आली, तेव्हा आषाढ-श्रावणाचा पाऊस धो धो पडत होता. कॉलेजमध्ये गेले नाही, तरी चालेल, असे मनाने ठरविले होते आणि खोलीमध्ये थंडी जाणवते, म्हणून निमित्त करून हलकेसे पांघरूण ओढून मी त्यांची 'दोन ध्रुव' ही कांदबरी पाहिल्यांदा वाचली, असे मला आठवते.

तुम्हांला एक गंमत सांगू ? जर पुस्तक वाचण्याचा तुम्हांला नाद असेल, तर आपल्याला आवडलेले पहिले पुस्तक पहिल्यांदा कसे आणि केव्हा वाचले, याची आठवण मनात ताजी असते. ते पुस्तक आपल्या हातांत घेऊन कसे कुरवाळले, हे आईला आपले पहिले मूल झाल्यावर कुरवाळताना कसे वाटले असेल, हे विचारा, म्हणजे कळेल. कोल्हापुरातील भुसारी वाड्यातील खोलीत त्या पावसाळी दुपारी मी कादंबरी कशी वाचली, हे आजही माझ्या लक्षात आहे. नव्याकोऱ्या पुस्तकाला येणारा सुरेखसा वास कसा येत होता, याची सुद्धा मला आठवण आहे. मला तर असे वाटते की, भाऊसाहेबांनी जेव्हा 'दोन ध्रुव' हे पुस्तक लिहिले, तेव्हा फार मोठे काम केले. त्यानंतर काही लोकांनी टीका केली की, भाऊसाहेबांचे हे दोन दोन काय आहे? दोन मनं, दोन ध्रुव, हे जे दोन दोन आहे, हे या लोकांना समजले नाही. पण 'दोन ध्रुव' हे शब्द वाङ्मयीन मराठीत प्रथम लिहिले गेले, त्याच वेळी आज जे घडत आहे आणि जे घडले पाहिजे, असे आग्रहाने सांगितले जाते आहे, त्याची जाणीव या द्रष्टया लेखकाला तेव्हाच झाली होती. दोन ध्रुवां सारखे अंतर असणारी माणसाची जीवने आहेत. शब्दांचे सामर्थ्य फार आहे. मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यांत अस्त्रांचे सामर्थ्य आहे, तसेच प्रकाशाचे तेज आहे, एखादा शब्द कोणी, अशा वेळी उच्चारतो की, त्यामध्ये एक विलक्षण सामर्थ्य येते. गांधीजींनी 'क्विट इंडिया!' हे शब्द उच्चारले. केवढे सामर्थ्य या दोन शब्दांत होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या रामायणाचे सर्व सार आहे या शब्दोच्चारात.

केव्हा केव्हा काही शब्द उच्चारले की, सर्व समजल्यासारखे वाटतात. तसेच, माझ्यापुरते माझ्या विद्यार्थिदशेत प्रश्न सुटले. ज्या वेळी मी 'दोन ध्रुव' हे शब्द नव्या सामाजिक संदर्भात ऐकले व खांडेकरांच्या कादंबरीच्या मुख्यपृष्ठावर वाचले, तेव्हा हिंदुस्थानातील सर्व प्रश्नांचा मूळ आवाज मी त्या

शब्दांत ऐकला. पृथ्वीचे दोन ध्रुव एकत्र येतील, की नाही, हे माहीत नाही. अर्थात येणार नाहीत. पण समाज-जीवनात निर्माण झालेले हे विषमतेचे दोन ध्रुव नाहीसे करणे हे मानवतेचे आजचे काम आहे. खांडेकरांनी हा विचार आपल्या साहित्यात मांडण्याचा त्या वेळी प्रयत्न केला, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक रूपे आहेत. लेखक हा बुहरूपी आहे, असे त्यांनीच म्हटले आहे. हे ललित साहित्य म्हणजे काय? ते कशासारखे आहे? त्यांनी आपल्या एका भाषणात सांगितले आहे की, ललित साहित्य अनंत व गंभीर अशा समुद्रासारखे आहे. सागर केव्हा, कशी रूपे घेतो, हे कळत नाही. कधी ओसरलेला असतो, तर कधी उफाळलेला, तर कधी शांत, तर कधी रौद्ररूप धारण केलेला. पण त्याच्या पोटात काय असते? पोटात कधी रत्ने असतात, तर कधी शार्क मासे. पोटात तळाशी तेलही असते. रत्ने असतात, म्हणून त्याला रत्नाकर म्हणतात. अशा अनेकविध रूपांत तो असतो.

लेखक या नात्याने भाऊसाहेब तसे बहुरूपी आहेत. त्यांनी गुजगोष्टी लिहिल्या आहेत. कथा लिहिल्या आहेत. भाषणे केली आहेत. टीकाकार म्हणून ते प्रसिद्ध आहेत. त्यांची किती रूपे आहेत! कादंबरीकार ते नंतर झाले. कादंबरीकार म्हणून, 'ययाति'कार म्हणून, आज ते आमच्या डोळ्यांपुढे आहेत. मानवतावादी कलाकार हे जे त्यांचे रूप आहे, ते माझ्या मताने अतिशय महत्त्वाचे असे रूप आहे.

त्यांचे एक स्वप्न, जे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले होते, ते आठवते. त्यांनी सांगितले की, त्यांना एकदा स्वप्न पडले, 'स्वप्नात मी मंदिरात गेलो नाही, तर ग्रंथालयात गेलो, ग्रंथागारात मजला काही वाचायचे होते.' त्यांच्या मनात होते की, भासाचे 'उत्तर-रामचरित' वाचावे व व्हिक्टर ह्यूगोची 'ला मिझरेबल' वाचावी. 'हे ग्रंथ शोधण्यासाठी मी चाललो असताना पाठीमागून मला आवाज यायला लागला. पाठीमागे वळून पाहतो, तो राज्यशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे अनेक शास्त्रे मला त्यांच्याकडे बोलावू लागली. मागे न फिरता तसाच पुढे गेलो. मला जे ग्रंथ हवे होते, ते शोधले.' त्यांनी सांगितले की, त्यांना फडक्यांचा आवाज ऐकू आला, अत्र्यांचा आवाज ऐकू आला. आचार्य अत्रे व प्रा. फडके बोलले, पुष्कळ हशा व टाळ्या झाल्या. त्यामुळे एकाएकी ते जागे झाले. त्यांनी पुढे विचार मांडला, तो असा की, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र कमी महत्त्वाचे नाहीत.

पण राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि ललित वाङ्मय यांना एकाच तराजूने तोलू नका. प्रत्येकाने वेगवेगळे महत्त्व आहे.

मला वाटते, त्यांनी हा एक महत्त्वाचा विचार सांगितला आहे. प्रत्येक शास्त्राचे एक वेगळे महत्त्व आहे. व्यक्तिशः मी असे मानतो, की शेवटी माणुसकीचे शास्त्र समजल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे. त्याशिवाय लेखकाला आपल्याच अनुभूतीचा अर्थ समजणार नाही. मग अभिव्यक्ती कसली करणार? समाजजीवनाच्या आधाराशिवाय सर्व शास्त्रे अधुरी राहतील आणि म्हणून सामाजिक आशय असल्याशिवाय वाङ्मय परिणामकारक होत नाही, चिरस्थायी होत नाही व अक्षयही होत नाही.

खांडेकरांचा आज इथे सन्मान करण्यात जो आनंद व अभिमान वाटत आहे व ज्या कृतज्ञतेचा उल्लेख केला, ती कृतज्ञता यासाठी. कला ही जीवनाभिमुख असली पाहिजे, हा विचार तीस-पस्तीस वर्षांपेक्षा अधिक काळापासून हा थोर पुरूष आपल्यापुढे बोलतो आहे. कधी कुणी त्यांचे ऐकले, कधी ऐकले नाही; आणि आज एका अर्थाने त्या विचारांना मान्यता प्राप्त झाली आहे. ललित लेखकाजवळ भवितव्याचा वेध घेणारी प्रतिभा असली पाहिजे. ज्याला ही वेध घेणारी दृष्टी नाही, त्याला ललित लेखन कसे म्हणावयाचे ? हा खरा प्रश्न आहे.

खांडेकरांच्या रूपाने साहित्याला ही भविष्यवादी दृष्टी आहे, हे स्पष्ट झाले आहे. जर या प्रतिभावान लेखकाचे विचार तामिळनाडूच्या माणसाला समजतात, काश्मिरी माणसाला समजतात, तर ते जगातील कुठल्याही भाषेतील माणसाला समजणे शक्य आहे. या प्रतिभावान लेखकाचे विचार इंग्रजीसारख्या भाषेत मांडले गेले असते, तर कदाचित त्यांना 'नोबेल प्राइज' मिळाले असते. आणि नोबेल प्राइज मिळविणारा फार मोठा लेखक मानण्याची प्रथा आहे. उगीचच बोलावयाचे, म्हणून मी बोलत नाही. पण नोबेल प्राइज मिळविणाऱ्या कोणत्याही साहित्यिकापेक्षा खांडेकर योग्यतेने एक तसूभरही कमी नाहीत, असे मला वाटते. आम्हांला अतिशय अभिमान व आनंद आहे, की मराठीतील एवढ्या तोलामोलाचा हा थोर प्रतिभावान लेखक निर्माण झाला आणि आज तो आमच्यांत हजर आहे. आज त्यांचा सत्कार आम्ही आमच्या हातून करीत आहोत. डोळ्यांनी पाहत आहोत. यापेक्षा आणखी आनंदाचे क्षण काय असू शकतील?

छत्रपती प्रतापगडावरील संकटावर मात करून जेव्हा परत आले, तेव्हा

जर आपण त्यांना भेटलो असतो. तर तेव्हा आपणांस कसे वाटले असते? कर्तृत्ववान माणसाचे पोवाडे ऐकण्यापेक्षा त्याला प्रत्यक्ष पाहण्यात एक वेगळा आनंद असतो. आजचा प्रसंग तसाच आहे. 'ययाति' च्या रूपाने मराठी प्रतिभेने उच्चारलेले विचार भारताने सन्मानला आणि ती प्रतिभा मूर्तिमंत आज आमच्यासमोर बसली आहे. हा प्रसंग अनुभवायला मिळतो आहे, यापेक्षा आणखी आनंदाचा दुसरा क्षण कोणता?

भाऊसाहेब, आपण वयामुळे शरीराने दुबळे झाला आहात, आपल्याला दिसत नाही. पण तुम्हांला दिसत नाही, असे कोण म्हणेल? तुमच्या शारीरिक डोळ्यांना आज कदाचित दिसत नसेल. पण जे अनेकांना दिसले नाही, ते कित्येक वर्षांपूर्वीपासून तुम्ही आम्हांला सांगितले, हे तुमचे आमच्यावरचे ऋण आहे. तुमचे शारीरिक डोळे पाहू शकत नसतील, पण तुमची प्रतिभा कदाचित आता आणखी दूरचे पाहू शकेल, असा आम्हांला विश्वास आहे. उघड्या डोळ्यांना फार आकर्षणे असतात, त्यामुळे कधी कधी खरेखरे त्यांना दिसत नाही. तुम्ही आता तपाला बसला आहात. तुमच्या तपातून पुढच्या पिढीला आशीर्वाद आणि मराठी भाषेला तुमचा कृपाप्रसाद मिळाला पाहिजे.

# ५२... सोन्याचा सोहळा कवी यशवंत

कवी यशवंत यांच्या ‘छत्रपती शिवराय’ या महाकाव्याच्या प्रकाशन-समारंभाचे जेव्हा मला निमंत्रण आले. तेव्हा माझे मन काहीसे संकोचले. कारण साहित्यिकांच्या या व्यासपीठार आपण बसल्याने त्याची शोभा तर कमी होणार नाही ना, अशी शंका माझ्या मनात आली. पण यशवंतांबद्दल माझ्या मनात जो जिव्हाळा आहे आणि त्यांनी व प्रकाशकांनी ज्या प्रेमाने मला या प्रकाशन-समारंभासाठी निमंत्रण दिले, त्या जिव्हाळ्यामुळे आणि प्रेमामुळे त्यांना नाही म्हणणेही माझ्या जिवावर आले, आणि म्हणून मी आज येथे आलो आणि डोळ्यांचे पारणे फेडणारा हा सोहळा पाहिला.

यशवंतांच्या पिढीतली बहुतेक सर्व माणसे आता सत्तरीच्या घरात आहेत. आम्ही शाळकरी मुले होतो, तेव्हा रविकिरण मंडळाची पुस्तके आम्ही पाहत होतो, आणि त्यांची नावे ओळीने वाचीत होतो. त्या रविकिरण मंडळाचे अनेक प्रकाशमान तारे आज येथे उपस्थित आहेत. कवी यशवंत आहेत, कवी गिरीश आहेत, घाटे आहेत, रानडे आहेत, त्याचप्रमाणे खांडेकरही आहेत. ज्यांच्या हातांखाली आम्ही शिकलो आणि जे रविकिरण मंडळाचे एक प्रमुख आधारस्तंभ होते, ते माधव ज्यूलियन आज हयात असावयास पाहिजे होते. त्यांच्या आठवणीने माझे हृदय भरून येत आहे. त्यांच्याच थोडेसे आधीचे प्रा. फडके हेही येथे आहेत. नव्या पिढीतले शिरवाडकर आहेत, पु.ल.देशपांडे आहेत, रणजित देसाई आहेत. अशी ही सगळी प्रथितयश मंडळी साहित्यिकांच्या दरबारात आज येथे बसली आहेत, आणि या सगळ्यांच्या साक्षीने या ग्रंथाचे प्रकाशन करून मराठी भाषेच्या संसारातला एक सोन्याचा सोहळा आज आपण साजरा करीत आहोत.

काव्यसंबंधाने बोलण्याचा माझा अधिकार नाही. पण मघाशी खांडेकरांनी सांगितल्याप्रमाणे सगळीच तरूण माणसे आपापल्यापरी छोटे छोटे कवी असतात. कोणी कविता लिहितात, कोणी लिहीत नाहीत, एवढाच फरक असतो. मला आठवते की, आम्ही कॉलेजमध्ये होतो, तेव्हा म्युझिक सर्कल्स असत, साहित्य मंडळे असत, तसेच कवींचे हुरहुर क्लबही असत. मनामध्ये

कविता यावयाची, पण पुष्कळदा ती कागदावर उतरत नसे. पण ज्याच्या मनांमध्ये कविता डोकावून जात असे, असे पुष्कळच विद्यार्थी त्या वेळी असावयाचे. ज्या तरूणांच्या मनांमध्ये काव्य येत नसेल, तो तरूण, तरूण नसला पाहिजे, असे म्हटले, तरी चालेल. हे सगळे आता महाकवीच्या पदाला पोहोचलेले कवी, त्या वेळच्या आमच्या हुरहुर क्लबचे आणि आमच्या सर्वांच्या डोळ्यांपुढेच एक मोठे स्वप्न होते.

कवी यशवंत आणि मी एक जिल्ह्यातले आहोत. हे तर त्यांचे माझे नाते आहेच. पण त्यांचे माझे दुसरे नाते म्हणजे, त्यांचे व माझे नाव एक आहे. त्यांच्या व माझ्या नावांतले हे साम्य, त्या काळी माझ्या अभिमानाचा एक विषय होता. मला आठवते, त्यांच्या कवितांमध्ये मनाला नित्य ओढ लावणाऱ्या अशा कितीतरी कविता होत्या. मला चांगला आवाज असता, तर त्यांतल्या काही मी आज म्हणूनही दाखविल्या असत्या. आईवर प्रेम न करणारा माणूस दुनियेमध्ये कुठे सापडेल? पण कवी यशवंतांना आईची आठवण झाली. आणि घराघरांतली आई जागी झाली. देशभक्तीवरही त्यांनी अनेक कविता लिहिलेल्या आहेत. त्या वेळच्या संसारातल्या बारीकसारीक दुःखांची त्यांनी आपल्या कवितेतून इतक्या नाजूकपणे मांडणी केली आहे की, जणू काही या माणसाला आपले मन कळले होते, की काय, तो आपलेच दुखणे रस्त्यावर मांडतो आहे, की काय, आपली कहाणी त्याला कोणी जाऊन सांगितली, की काय, असे घराघरांतल्या स्त्री-पुरूषांना वाटावे. जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेली अनेक अति सुरेख चित्रे त्यांच्या कवितेमध्ये आपल्याला पाहावयास सापडतात. ही सगळी गीते वाचीत असताना मनाला एक आगळा आनंद होत असे. काव्याची आवड असणाऱ्या त्या पिढीतल्या माणसांना आजही त्या आनंदाची आठवण येईल. पण आताच्या पिढीवर या गीतांचा किती संस्कार झाला आहे, याची मला कल्पना नाही.

काव्यातली गेयता ही रविकिरण मंडळाने, मला वाटते, जास्त स्पष्टपणे लोकांपुढे मांडली, नाटकांना अलीकडे जशी गर्दी होत असते, तशी यशवंतांच्या कविता ऐकण्यासाठी लोक त्या काळी हजारोंच्या संख्येने गर्दी करीत. काव्यगायन ऐकण्यासाठी पुण्या-मुंबईला तर माणसे जमतच असत. पण मला आठवते की, कवी गिरीशांची आणि यशवंतांची गीते ऐकण्यासाठी त्या काळी आम्ही मोठ्या संख्येने आमच्या लहानशा गावीही जमलो होतो. त्यांतल्याच एका ज्येष्ठ कवीने महाराष्ट्राच्या जीवाला आज एक वेगळी ओढ

लावली आहे.

शिवाजी महाराजांच्या रूपाने अति भव्य असे एक चरित्र इतिहासाने आम्हांला दिले आहे. त्या चरित्राची मांडणी करण्याचे काम इतिहासकार आपल्या शब्दांनी करीत आहेत आणि कादंबरीकारही आपल्या शब्दांनी करतील. पण प्रतिभावान कवीच्या शब्दांमध्ये ते चरित्र रंगल्याशिवाय त्यातला खरा जिव्हाळा आपल्याला समजणार नाही; आणि म्हणून हे एवढे सुंदर चरित्र एका महाकवीची वाट पाहत उभे आहे, असे मी नेहमी म्हणत असे. यशवंतांनाही मी एकदा म्हणालो होतो की, अतिशय उत्कंठेने तुमच्या महाकाव्याची हे चरित्र वाट पाहत तिष्ठत उभे आहे. या ग्रंथाच्या पुरस्काराच्या छोट्याशा चार ओळींमध्ये माझी एक जुनी आठवण मी सांगितली आहे. १९६२ साली काही कामानिमित्त यशवंत मला भेटण्यासाठी मुंबईस आले होते. त्या वेळी त्यांनी आपल्या मनातली पहिली हुरहुर मला सांगितली. यशवंत प्रकृतीने थकलेले होते. पण इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलता-बोलता, ईश्वराने आयुष्य आणि आरोग्य दिल्यास शिवरायांचे चरित्रगीत रचण्याची आपली मनीषा त्यांनी मजजवळ प्रकट केली. त्यानंतर जेव्हा जेव्हा त्यांची -माझी गाठभेट होत असे, तेव्हा तेव्हा मी त्यांना त्यांच्या शिवकाव्यासंबंधी विचारीत असे. खरे म्हणजे, माझे हे विचारणे अन्यायाचे होते. परंतु जीव राहत नसे, म्हणून मी विचारीत असे, आणि तेही मोठ्या जिव्हाळ्याने झालेली प्रगती मला सांगत असत; आणि काही आठवड्यांपूर्वी जेव्हा त्यांचे हे ग्रंथलेखन पुरे झाले, असे त्यांनी मला लिहिले आणि त्याच्या प्रकाशनासाठी मला प्रत्यक्ष निमंत्रण दिले, तेव्हा त्यांचा जीव तर मोठा झालाच, पण माझाही जीव फार मोठा झाला. फार मोठा आनंद झाला त्या वेळी. आपले काव्य पुरे झाल्याबद्दल कवीला आनंद व्हावा, हे तर स्वाभाविकच आहे. परंतु माझ्यासारख्या त्यांच्या एका मित्रालाही अतिशय आनंद झाला. तो अशासाठी की, शिवाजीमहाराजांचे जीवन हे आपल्या मराठी जीवनातले जे एक भव्य आणि विशाल असे शिल्प आहे. ते आता महाकाव्याच्या रूपाने आमच्यासमोर उभे राहणार आहे.

बाबासाहेब पुरंदरे आणि कुसुमाग्रज यांनी मघाशी जे सांगितले, ते खरे आहे. शिवचरित्राने आम्हांला इतिहास दिला. या सह्याद्रीच्या डोंगखोऱ्यातून आम्ही राहत होतो, शेती करीत होतो, कसबसे जीवन जगत होतो. आमच्यापैकी कोणी पांडित्य करीत होते, तर कोणी भाऊबंदकीच्या भांडणामध्ये गुंतले होते. हे सगळे चाललेले होते. परंतु इतिहासामध्ये मराठ्यांचा म्हणून जो इतिहास

गाजला, त्याचा श्रीगणेशा ज्या जीवनातून लिहिला गेला, ते अति विशाल असे शिल्प होते. त्या शिल्पामध्ये सर्व काही आहे. त्यामध्ये एक प्रकारचे उत्तुंग यश आहे, त्यामध्ये शौर्य आहे, त्यामध्ये त्वेष आहे, त्यामध्ये प्रेम आहे आणि त्यामध्ये कारूण्यही आहे. कवीच्या मनाला जे जे गुण वेडावून सोडतात. ते ते सगळे गुण त्या जीवनामध्ये भरलेले आहेत.

सरदाराच्या पोटी जन्म होऊनही पित्यापासून वंचित झाल्यामुळे आईच्या मायेखाली जवळ जवळ एकाकी असे जीवन महाराजांना लहानपणी काढावे लागले, कर्तृत्ववान माणसे त्यांना आपल्या भोवताली उभी करावी लागली आणि फार मोठ्या अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागले. पण एका विशाल सत्तेशी लढण्याचा विडा उचलून ते बसले होते, लढत होते, पण मनाने ते कधीच हरले नाहीत. अधूनमधून संकटे आली, तरीही नवे राज्य उभे करण्याचा ते प्रयत्न करीत होते. गडामागून गड घेतले, पण पित्याचा रोष होईल, ही भीती मनामध्ये निर्माण झाली. त्यांनाही सावरावे, आईलाही सावरावे, साऱ्यांना सावरावे, आणि आपल्या नव्या राज्याच्या संसाराचे काम पुढे पुढे नेत राहावे, असे सारखे चालले होते. क्षणाक्षणाला ज्या महापुरूषाने हे काम केले, त्याच्या जीवनात किती संकटे आली असतील, किती निराशा आली असेल? पण हे सगळे सहन करीत-करीत त्या महापुरूषाने एक नवा इतिहास आम्हांला दिला. आज तुम्ही-आम्ही सगळी माणसे आपल्या कृतज्ञतेची फुले शिवाजीमहाराजांना वाहत असतो. पण महाराज जेव्हा इतिहासाचे जीवन जगत होते, इतिहास घडवीत होते, तेव्हा त्यांच्या जीवनाचा अर्थ सहानुभूतीने समजून घेणारी जाणती माणसे महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्राबाहेर फार थोडी होती, असे म्हटले पाहिजे. त्यांच्या अभिषेकासाठी त्यांना महाराष्ट्राच्या सीमेबाहेरून गागाभट्टांना आणावे लागले, आणि त्यांच्या गुणांची गाथा गाण्याकरिता बुंदलेखंडातल्या भूषणांना येथे यावे लागले. ज्याला महाराजांचे गुण समजले होते, असा एक प्रतिभावान पुरूषमात्र या महाराष्ट्रात होता आणि तो म्हणजे समर्थ रामदास. पण महाराष्ट्रातील सामान्य माणसे, मावळे, लंगोट्या घालून जीव देण्यासाठी महाराजांच्या पाठीमागे लक्षांनी उभी होती. एका कठीण परिस्थितीत महाराज दिल्लीला गेले आणि राजकारणातला डाव फसून अंगावर येतो, की काय, असा प्रसंग आला. आग्र्यामध्ये कैदी झाले. तेथूनही पार झाले. राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकानंतर त्यांच्या जीवनात अनेक करूण प्रसंग आले. चंद्राचा प्रकाशमान भागच जसा आपल्याला दिसतो, तसेच कर्तृत्ववान माणसाचे जे

प्रकाशमान जीवन असते, तेच फक्त दुनियेला दिसते, पण त्यांच्या वैयक्तिक जीवनतील व्यथांची आपल्याला कल्पना नसते. नव्याने स्थापन कलेले हे राज्य राहील कसे, टिकेल कसे, कौटुंबिक वादातून त्याला शाप लागेल, की काय, अशा प्रकारच्या अनेक चिंता महाराजांच्या मनाला लागून राहिल्या असतील. त्यांची आपल्याला कल्पनाही येणे शक्य नाही. परंतु ते जे तेजस्वी, पराक्रमी, कर्तृत्ववान असे जीवन जगले, त्याने आपल्या मनाला विलक्षण ओढ लागली. त्या जीवनातून एक तेजस्वी शक्ती आमच्या मनामनांमध्ये, घराघरांमध्ये सतत तेवत राहिली आणि अद्यापिही ती तेवत आहे. तिला व्यक्त स्वरूप कवीने देण्याची फार गरज होती; आणि ते व्यक्त स्वरूप कवी यशवंतांनी आज तिला या महाकाव्याच्या रूपाने दिले आहे.

महाराष्ट्राबाहेर रवींद्रांनी आणि इतर अनेक कवींनी शिवाजीमहाराजांची गीते गायली आहेत. शिवाजीमहाराजांचे नाव महाराष्ट्राबाहेर हिंदुस्थानातील सगळ्या जाणत्या माणसांना ठाऊक आहे. बंगालमध्ये आपण गेलो, म्हणजे तेथील माणसे शिवाजी महाराजांचे नाव मोठ्या आदराने आपल्यासमोर काढतात. शिवाजी महाराजांसंबंधी रवींद्रनाथांनी लिहिलेल्या ओळी घडाघड म्हणून दाखविणारी शेकडो माणसे आज आपणास बंगालमध्ये पाहावयास मिळतात. बुंदलेखंडात, हरियानात, राज्यस्थानात, उत्तर प्रदेशात किंवा बिहारमध्ये तुम्ही गेलात, की तुम्ही शिवाच्या मुलाखतले ना, असे म्हणून तेथील खेड्यांतली माणसे शिवासंबंधीच्या ओव्याच्या ओव्या तुम्हांला सहज म्हणून दाखवितील. हे मी माझ्या गेल्या सहा वर्षांच्या प्रवासात अनुभवले आहे. तेथील माणसे महाराजांना महाराज म्हणत नाहीत, तर ते त्यांना शिवा म्हणून संबोधितात. शिवाजीमहाराजांचे नाव हे असे सर्वत्र पोहोचले आहे. महाराष्ट्रात अनेक कवींनी, शाहिरांनी त्यांची गीते गायिली आहेत. परंतु त्यांचे गीत एखाद्या प्रतिभासंपन्न कवीने महाकाव्याच्या रूपाने गाण्याची फार आवश्यकता होती ते काम आज यशवंतांनी घडवून आणले आहे. म्हणून मला आनंद होतो आहे.

राम आणि कृष्ण हे अवतारी पुरूष होते, असे आपण मानतो. पण व्यासांनी आणि वाल्मीकींनी मनात आणले नसते, तर राम आणि कृष्ण हे महापुरूषसुद्धा आज कुठे असते, परमेश्वरालाच माहीत. त्यांचे उत्तुंग जीवन शब्दबद्ध करण्यासाठी व्यासांची आणि वाल्मीकींची प्रतिभा फुलावी लागली. शिवाजीमहाराजांचे जीवन विशाल आहे, रोमहर्षक आहे, पण ते पिढ्यान् पिढ्या गायिले जाण्यासाठी प्रतिभावान कवीच्या स्पर्शाची गरज होती. आम्हांला

आनंद हा आहे, अभिमान हा आहे, की आमच्या पिढीतले कवी यशवंत हे आज शिवरायाचे गीत गात आहेत. त्यांचे अभिनंदन करण्याचा माझा अधिकार नाही. त्यांचे कौतुक करण्याचा तर मुळीच नाही. माझा अधिकार फक्त त्यांच्याबद्दल अभिमान बाळगण्याचा आहे.

मला आज आठवते की, कवी यशवंत जेव्हा बडोद्याच्या साहित्य संमेलनास गेले होते, तेव्हा त्यांनी तेथे स्वतःची 'दऱ्याखोऱ्यांतून आला कवी हा खास दरबारी' ही कविता म्हणून दाखविली होती. या कवितेत त्यांनी जे म्हटले आहे, ते खरे आहे. चाफळच्या मांडवीच्या काठी भटकत असताना 'न्यारीचा वकुत' झाल्याची मनातील गोड ओढ टिपणारा हा कवी आज शिवजीवनाच्या दरबारामध्ये महाकवी म्हणून प्रवेश करतो आहे, याचा आम्हांला खरोखरीच अभिमान आहे. यापेक्षा अधिक काय बोलावे मी या प्रसंगाला?

कवी यशवंतांचे सर्व साथी आज येथे उपस्थित आहेत. गिरीशांचे डोळे पाण्याने भरलेले पाहिले आणि आम्हां सर्वांचे डोळे भरून आले. घाट्यांसारखी, रानड्यांसारखी एका पिढीतील ही कर्तबगार माणसे येथे बसून आपल्या मित्राचे कौतुक पाहत आहेत. यशवंतांनी नव्याने हे जे काम हाती घेतले होते, त्याला आलेली ही सुंदर, सुगंधित फुले पाहून त्यांना आज अतिशय आनंद वाटत असेल. हे काव्य आता महाराष्ट्रातील जनतेच्या हातांत जाईल. सहित्यिक त्याचे समीक्षण करतील, विद्वान त्याचे कदाचित खंडनही करण्याचा प्रयत्न करतील. परंतु आम्ही सामान्य रसिक माणसे ते गात राहू, आवडीने गात राहू, एवढेच मी यशवंतांना सांगतो आणि माझ्या शुभेच्छा मी त्यांना देतो; आणि भाऊसाहेब खांडेकरांनी अतिशय उत्कटतेने म्हटल्याप्रमाणे संध्याकाळची सांजवात वाऱ्याच्या झुळकेने मालवू नये, म्हणून जशी एखादी सौभाग्यवती तिला आपल्या पदराखाली घेऊन जाते, तशीच महाराष्ट्रातील जनता तुमच्या प्रतिभेची ही सांजवात आपल्या पदराखाली धरून राहील, असा विश्वास व्यक्त करून मी माझे भाषण पुरे करतो.

# ५३... वा.सी.बेंद्रे

काही महिन्यांपूर्वी श्री. बेन्द्रे हे दिल्लीस आपल्या चिरंजीवांकडे विश्रांतीसाठी आले असताना त्यांनी 'मालोजीराजे आणि शहाजी महाराज' या ग्रंथाची मुद्रितावस्थेत असलेली काही प्रकरणे माझ्याकडे ठेवून देऊन, ती वाचून पाहण्याची मला विनंती केली. त्यावेळी या ग्रंथाचे प्रकाशन माझ्या हस्ते व्हावे, अशी त्यांची फार इच्छा दिसली. माझ्या फुरसतीच्या वेळात मी ही सगळी प्रकरणे चाळून पाहिली. काही आठवड्यांपूवी, ग्रंथ तयार झाला असून, त्याच्या प्रकाशनासाठी मी आलेच पाहिजे, असे त्यांच्याकडून आग्रहाचे पत्र आले. त्यांच्यासंबंधी मला जो आदर आहे. त्या आदरामुळेच मी या प्रकाशन-समारंभासाठी येण्याचे मान्य केले. या समारंभास येण्याबाबत मला थोडासा संकोच वाटत होता. कारण इतिहासावरील चर्चात्मक असे हे पुस्तक असल्यामुळे त्याचे प्रकाशन एखाद्या नामवंत इतिहास-पंडिताकडून झाले असते, तर ते अधिक उचित झाले असते. परंतु श्री. बेन्द्रे यांचा आग्रह मला मोडवेना, म्हणून येथे आज उपस्थित झालो.

श्री. बेन्द्रे यांचा या विषयाचा अभ्यास बऱ्याच वर्षांचा आहे, हे मला आठ-दहा वर्षांपूर्वी समजले. त्या वेळी ते संभाजीमहाराजांच्या चरित्राची तयारी करीत होते. अधिकृत शिवचरित्र लिहिले जावे, अशी त्या वेळी महाराष्ट्रातून मागणी होती, म्हणून या बाबतीत मी त्यांच्याशी बोललो. परंतु संभाजी महाराजांच्या काळाचा त्यांचा अभ्यास चांगला असल्यामुळे संभाजीमहाराजांच्या चरित्रलेखनावरच आपले लक्ष केंद्रीभूत करण्याचा त्यांचा मनोदय दिसून आला. तरीही अधूनमधून मी त्यांना भेटतच असे. विद्वानांना भेटावे, त्यांच्या विचारांना चालना द्यावी आणि त्यांचे बोलणे ऐकत बसावे, असे मला नेहमीच वाटते. त्यामुळे पुष्कळसे न वाचताच बहुश्रुत होण्याचे समाधान लाभते. मी जेव्हा बेन्द्रे यांना भेटत होतो, त्या वेळी माझ्या असे लक्षात आले की, शहाजीराजे आणि मालोजीराजे यांच्या काळातील इतिहाससंबंधीचाही त्यांचा व्यासंग बराच आहे. एवढेच नव्हे, तर आजपर्यंत जो इतिहास लिहिला गेला आहे, आणि जो आम्ही परंपरेने स्वीकारला आहे, त्यापेक्षाही काही वेगळे असे त्यांना सांगावयाचे आहे,

हेही त्या वेळी माझ्या लक्षात आले; आणि म्हणून त्यानंतर मी त्यांना जेव्हा जेव्हा भेटत असे, तेव्हा प्रत्येक वेळी शहाजीराजांवर व मालोजीराजांवर कधी ग्रंथ लिहिणार आहात, अशी मी त्यांच्याकडे आग्रहाने विचारणा करीत असे. शेवटी त्यांनी या विषयावर ग्रंथ लिहिण्याचे माझ्याजवळ कबूल केले. अर्थात माझ्यापाशी अनेक माणसे याप्रमाणे गोष्टी कबूल करतात. पण बेन्द्रे यांचे कबूल करणे हे एक वचन होते, हे आज माझ्या लक्षात आले. त्यांच्यासारख्या विद्वान माणसांचा व्यासंग हीच महाराष्ट्राची खरी दौलत आहे. अशा माणसांची आपण बूज राखली पाहिजे. त्यांच्याशी आपण सतत संपर्क ठेवला पाहिजे. श्री. बाळासाहेब देसाई यांच्यावर या बाबतीत मी सोपविलेली कामगिरी त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली आहे. श्री. बेन्द्रे यांचा हा जो ग्रंथ आज प्रकाशित होत आहे, त्याबद्दल मला फार आनंद वाटतो आणि त्याच्या प्रकाशनाचा मान त्यांनी मला दिला. त्याबद्दल मला जरूर अभिमानही वाटतो.

श्री. बेन्द्रे यांचा संभाजीराजांवरील ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर त्यासंबंधी जी चर्चा झाली, ती मी थोडी-फार ऐकली आहे, आणि त्यावर झालेली टीकाही मी वाचली आहे. त्या ग्रंथासबंधीचा खुलासा त्यांनी त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केला आहे. त्यांचे म्हणणे असे की, त्यांनी जी चरित्र लिहिले, ते सर्वसामान्य अर्थाने आपण ज्याला चरित्र म्हणतो, तशा अर्थाचे चरित्र नाही. चरित्रनायकासंबंधी अथपासून इतिपर्यंतच्या सगळ्या गोष्टी एका सूत्ररूपाने शैलीदार भाषेत सांगण्याचा जो एक चरित्रलेखनाचा उद्देश असतो, तशा प्रकारचा उद्देश हा ग्रंथ लिहिण्यात त्यांचा नव्हता. संभाजीमहाराजांवरचा हा ग्रंथ आणि त्याचप्रमाणे मालोजीराजे आणि शहाजी महाराज हाही ग्रंथ, मला वाटते, तशा अर्थाने चरित्रग्रंथ नव्हे, चर्चात्मक अशा तऱ्हेची जी माहिती त्यांना होती, ती माहिती देण्याचा त्यांनी या चरित्रग्रंथात प्रयत्न केला आहे. मी तर असे म्हणेन की, त्या सगळ्या ऐतिहासिक पुरूषांची चरित्रे लिहिण्यासाठी जी साधने एका अर्थाने उपलब्ध व्हावयास पाहिजेत, अशा प्रकारची साधने पुरविणारा प्रस्तुत मालोजीराजे आणि शहाजीमहाराज हा एक साधनग्रंथ आहे. या अर्थाने हा ग्रंथ अधिकृत चरित्र आहे, असा श्री. बेन्द्रे यांचाही दावा नसावा. कारण हिंदुस्थानच्या सगळ्याच इतिहासासंबंधी एक मोठी अडचण आहे. आपल्या देशाच्या इतिहासाची, मधली हजारो वर्षे अगदी अंधारासारखी गेली आहेत. आम्हांला राम आणि कृष्ण माहीत आहेत. पण त्यानंतर एकदम अलीकडचे अशोक किंवा त्याच्यासारखे इतर सम्राट. नंतर पुन्हा सर्वत्र अंधार. त्यानंतर

मग मोगलांच्या अमदानीपासूनचा थोडा-फार इतिहास उपलब्ध आहे. पण मधल्या शतकानुशतकाच्या इतिहासाचे धागेदोरे आम्हाला मिळतच नाहीत. काय घडले. कसे घडले, त्यासंबंधीची जवळ जवळ काहीच माहिती आपल्याजवळ उपलब्ध नाही. तेव्हा ही माहिती प्रथम गोळा करणे हे मला अत्यंत महत्त्वाचे काम वाटते.

मी काही इतिहासाचा पंडित नाही, पण इतिहासाचा एक अभ्यासू जरूर आहे. वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे सतत चिंतन करावे लागते. कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल, तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू शकणार नाही, आणि म्हणून त्यासाठी इतिहासाचा थोडा-फार अर्थ समजून घ्यावा लागतो. इतिहासाच्या अर्थासंबंधीचा असाच एक प्रश्न माझ्या मनात पुष्कळ दिवस होता. म्हणून मी. श्री. बेन्द्रे यांना शहाजीमहाराजांचे चरित्र लिहिण्याचा आग्रह केला. तो अशाकरिता की, शिवाजीमहाराजांसारखी जी एक अद्वितीय व्यक्ती सतराव्या शतकात महाराष्ट्रात निर्माण झाली. ती काय अगदी एकाएकी निर्माण झाली ? माझे स्वतःचे असे मत आहे की, महापुरूष, आकाशात विद्युल्लता चमकावी आणि निमिषार्धात अन्तर्धान पावावी, तसे एकाएकी येतात आणि निघून जातात, असे कधीही घडत नाही. महापुरूषांच्या निर्मितीला, त्यांच्या कार्याला, त्यांच्या पराक्रमाला काही सामाजिक कारणपरंपरा असावी लागते. त्यांच्या कार्याला, त्यांच्या पराक्रमाला काही सामाजिक कारणपरंपरा असावी लागते. त्यांच्या पाठीमागे हळूहळू समाजजीवनाची शक्ती निर्माण व्हावी लागते. शिवाजीमहाराज म्हणजे फक्त भवानी देवीचा प्रसाद, असे मी मानीत नाही. शिवाजी महाराजांचे जीवन हे मराठी जनतेच्या जीवनाचा प्रसाद आहे, अशी माझी स्वतःची भावना आहे, आणि ही गोष्ट खरी असेल, तर त्यांच्या पित्याचे जीवन, त्यांच्या आजोबांचे जीवन, त्यांच्या भोवतालच्या महाराष्ट्राचे जीवन म्हणजे त्या वेळचा महाराष्ट्र कसा होता, मराठी समाज कसा होता वगैरे गोष्टी आपल्याला समजल्या पाहिजेत. ही कारणपरंपरा जर आपल्याला समजली नाही, तर शिवाजीमहाराज आपल्याला समजणार कसे? आजही, आम्ही आहोत, असे का आहोत, याची कारणपरंपरा आम्हांला समजली पाहिजे. मराठी माणसाच्या मनात थोडासा अहंकार आहे आणि तो कदाचित रास्तही असेल. पण याचे कारण काय? याचे कारण हे आहे की, हे सर्व इतिहासातून घडत आलेले आहे, बनत आलेले आहे. आजही आम्ही बदलतो

आहोत. सतराव्या शतकात आम्ही जसे होतो, तसेच आज विसाव्या शतकात आम्ही राहिलेलो नाही. पण आम्ही बदललेले असलो किंवा बदलत असतो, तरीसुद्धा, मूळ पिंड आहे, त्याला धरूनच बदलत राहणार, हेही तितकेच खरे आहे. तेव्हा हा जो आपला स्वभावधर्म घडला आहे, त्याची आपल्याला माहिती असणे आवश्यक आहे, आणि म्हणून शहाजीमहाराज आणि मालोजीराजे यांच्या  जीवनाचा इतिहास म्हणजे त्यांच्या काळाचा इतिहास असला पाहिजे, त्या वेळच्या समाजाचा इतिहास असला पाहिजे, त्या वेळच्या परिस्थितीचा इतिहास असला पाहिजे.

अमक्याने अमक्यापासून प्रेरणा घेतली आणि अगदी त्याच्या पायांशी बसून धडे घेतले. अशा प्रकारचा समज आमच्याकडे फार आहे. हा अमक्याचा गुरू आणि तो तमक्याचा शिष्य. गुरू भेटला आणि शिष्याला साक्षात्कार झाला आणि मग तो शहाणा झाला, अशाच प्रकारच्या आमच्याकडे कल्पना आहेत. मी असे मानीत नाही; आणि हा ग्रंथ वाचण्यापूर्वी शहाजीमहाराजांपासून शिवाजीमहाराजांनी साक्षात प्रेरणा घेतली. असे मी मानीत नसे आणि हा ग्रंथ वाचल्यानंतही त्या माझ्या मतात बदल झालेला नाही. परंतु त्याबरोबर मला असेही वाटते की, शहाजी महाराजांनी जे केले, ते त्यांनी केले नसते आणि त्याच्याही पूर्वी मालोजीराजांनी जे केले, ते त्यांनीही केले नसते. तर शिवाजीमहाराजांनी जे केले, ते त्यांना सुद्धा करता आले नसते. कारण कोणत्याही महत्कार्याला काही परंपरा असावी लागते. शहाजीमहाराजांच्या काळामध्ये त्यांना असलेले महत्त्व राधामाधवविलासचंपूत वर्णन केलेले आहे. या राधामाधवविलासचंपूला राजवाड्यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली. प्रस्तावनेतील काही भाग श्री. बेन्द्रे यांनी आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत उद्धृत केला आहे. त्यामुळे राधामाधवविलासचंपूच्या प्रस्ताावनेची कैक वर्षांनी माझी पुन्हा उजळणी झाली. फारसे कळत नव्हते, म्हणून वाचले पाहिजे, या आग्रहाने, या हट्टाने ही प्रस्तावना मी पूर्वी वाचली होती. आज जरा समजले आहे, म्हणून ही प्रस्तावना मी पुन्हा वाचली. या प्रस्तावनेत महाराष्ट्राची रचना कशी झाली, महाराष्ट्रात वसाहत कशी झाली, येथला मनुष्यस्वभाव कसा बनला, तो तसा का बनला वगैरे गोष्टींचे राजवाड्यांनी अतिशय चांगले विवेचन केले आहे. त्यात काही अर्थपूर्ण वाक्ये आहेत. त्या प्रस्तावनेत त्यांनी असे लिहिले आहे की, येथला मूळ जो बहुसंख्य समाज होता, राजवाड्यांच्या शब्दांत बोलावयाचे, म्हणजे येथले मूळचे जे मराठा क्षत्रिय, मराठा कुणबी,

शूद्र कुणबी आणि नागवंशी महार होते, त्यांच्याा गुणदोषांचा परिणाम त्या काळच्या अल्पसंख्याक महाराष्ट्र क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्यावर म्हणजे त्या काळच्या बुद्धिमंतांवर आणि विचारवंतांवरही पडला. एवढेच नव्हे, तर त्या काळच्य महाराष्ट्राचा गुरूत्वमध्य त्यांनी निर्देश केलेल्या ह्या बहुसंख्य समाजात होता, हा विचार राजवाड्यांनी मोठ्या आग्रहाने या प्रस्तावनेत मांडला आहे. परंतु या वातावरणात त्या काळी एक फरक पडला, तो असा की, त्या वेळी ज्या मुसलमानी राजवटी येथे होत्या, त्या शहाजीमहाराजांसारख्या कर्तृत्वान सरदारांची आणि माणसांची मदत घेतल्याशिवाय चालूच शकल्या नसत्या. अशी काहीशी परिस्थिती त्या काळात निर्माण झाली होती. शहाजीमहाराजांना बोलवल्याशिवाय निजामशाही वाचविणे अवघड आहे. आदिलशाही वाचविणे अवघड आहे, कर्नाटकात पराक्रम करणे अवघड आहे. थोडक्यात म्हणजे, येथल्या जनतेवर आधारलेले सरदार, सेनापती उभे केल्याशिवाय राज्य चालविणे अवघड आहे, असे वातावरण त्या वेळी निर्माण झाले होते; आणि याच वातावरणातून, आपल्या शक्तीने जर आपण त्यांची राज्ये चालवितो आहोत, वाचवतो आहोत, तर त्याच शक्तीच्या जोरावर आपण आपलेही राज्य उभे करू शकतो. स्वातंत्र्य उभे करू शकतो, असे विचार करणारे शिवाजी महाराज पुढच्या काळामध्ये तयार झाले. अशीही एक मीमांसा शक्य आहे, आणि म्हणून शहाजीमहाराज आणि मालोजीराजे यांच्या काळातला हा इतिहास माझ्या समजुतीने अतिशय महत्त्वाचा असा इतिहास आहे. या विचाराचा अभ्यास होण्याची अद्यापिही गरज आहे; आणि बेन्द्रे यांचे वैशिष्ट्य हे आहे की, त्यांनी या दृष्टीने या इतिहासाकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

मी जेव्हा बेन्द्रे यांना आग्रह करीत होतो, तेव्हाही आता ते जसे थकलेले दिसत आहेत, तसेच मला ते थकलेले वाटत होते. मी त्यांना सांगत असे की, त्यांनी मिळविलेले सर्व ऐतिहासिक ज्ञान, त्यांनी केलेली असंख्य टाचणे आणि नोंदी हे सर्व ग्रंथरूपाने प्रकाशित न झाल्यास त्यांच्यानंतर व्यर्थ जाणार आहे. ज्यांच्याजवळ सांगण्यासारखे ईश्वराने काही दिले आहे, ते त्यांनी सगळ्यांना सांगितले पाहिजे. आपल्याजवळ सांगण्यासारखे असेल, ते सांगून सगळ्यांना शहाणे करावे, असे आमच्या महाराष्ट्रातल्या संतांनी आम्हाला शिकविले आहे. वाद घालणारे वाद घालणारच, आणि असे वाद झाले नाहीत, तर महाराष्ट्रात जीवन ते काय राहणार ? तेव्हा असे वाद झाले पाहिजेत. परंतु बेन्द्रे यांच्यासारख्या विद्वानाने त्यांच्या पाठीमागे राहील, असे काहीतरी

लिहावे, असा माझा फार आग्रह होता; आणि मला अतिशय आनंद वाटतो की, त्यांनी या वयातही हा ग्रंथ लिहिला. आपल्याला काहीतरी सांगावयाचे आहे, ते मनात इतके अधिरेपणाने बसले आहे की, अक्षरांद्वारे ते कागदावर उतरविल्याशिवाय मोकळेच वाटणार नाही, अशी जेव्हा स्थिती होते, तेव्हाच माणूस लिहू शकतो. आजही श्री. बेन्द्रे यांची अशी स्थिती आहे अजूनही सांगण्यासारखे त्यांच्याजवळ पुष्कळ आहे. त्यांनी जसा मालोजी आणि शहाजी लिहिला, संभाजी लिहिला; शिवाजीमहाराजानंतरच्या काळाचा इतिहास लिहिला आणि त्यांच्या अगोदरच्या काळाचा इतिहास लिहिला, त्याचप्रमाणे, मी त्यांना प्रार्थना करीन की, शिवकालीन खरा पराक्रमाचा महाराष्ट्रातला जो काळ आहे, त्यासंबंधीही त्यांनी आता लिहावे, आणि तेसुद्धा शिवाजीमहाराजांच्या वैयक्तिक जीवनावर नुसते नव्हे. तशा प्रकारचे आतापर्यंत पुष्कळ लिहिले गेले आहे. परंतु माझ्या मते त्या काळाचा इतिहास ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या थोर माणसाचे जे जीवन आहे, ते जनतेच्या कर्तृत्वाचे प्रतीक असे जीवन आहे. माझी ती स्वतःची श्रद्धा आहे. मराठ्यांच्या सगळ्या इतिहासाचा सर्वांत मोठा पैलू जर कोणता असेल, तर तो जरूर शिवाजीमहाराजांचा काळ आहे. त्या काळात शिवाजीमहाराजांनी जे देदीप्यमान कर्तृत्व केले, ते प्रत्येक मराठी माणसाच्या अभिमानाचा विषय आहे, त्याच्या स्फूर्तीचा तो जिवंत झरा आहे.

मराठ्यांच्या इतिहासात असाच दुसरा एक अति स्फूर्तिदायक काळ आहे. त्या काळासंबंधीही मला जबरदस्त आकर्षण आहे, आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या काळासंबंधीसुद्धा मी म्हणतो, तसे लिहिले गेले पाहिजे. तो काळ म्हणजे संभाजीमहाराजांच्या मृत्यूनंतरचा जवळजवळ पंचवीस वर्षांचा काळ होय. लौकिक अर्थाने ज्यांना नेते म्हणतात, राज्यकर्ते म्हणतात, ते कोणीही नसताना या पंचवीस वर्षांच्या काळात सतत चालू असलेल्या आक्रमणाला मराठी जनतेने अफाट धैर्याने तोंड देऊन आपले सामर्थ्य उभे केले. तुम्ही त्या काळामध्ये जाण्याचा प्रयत्न करा. शिवाजीमहाराज गेलेले, लोकांचे मन हटून जावे, अशा तऱ्हेने संभाजीमहाराजांचा वध झालेला, संभाजीमहाराजांचा विच्छेद करून माळावर टाकलेले त्यांचे प्रेत शिवावयाचे कोणी, इतकी धास्ती लोकांच्या मनामध्ये भरलेली. असा विलक्षण काळ होता तो! छिन्नविछिन्न झालेला तो देह शिवण्यात स्वतःवर मोठी आपत्ती ओढवून घेण्यासारखी परिस्थिती असतानाही ज्या गावातल्या लोकांनी प्रथम जाऊन ते

प्रेत शिवले, त्या गावातील लोकांनी त्या काळी तो मोठाच पराक्रम केला. त्या गावातील पाटलांनी हे काम केले. म्हणून लोक त्यांना आजही शिवले पाटील म्हणतात. असा हा क्रूर अमानुष वध झाला होता. राजपत्नी येसूबाईसाहेब यांना छोट्या शाहूमहाराजांसह अटक करून दिल्लीला नेण्यात आले होते. महाराष्ट्रात राहणे अशक्य, म्हणून राजारामहाराज उठून जिंजीला गेले होते. राज्यकर्ता पुरूषच नाहीसा झाला. अशी विचित्र परिस्थिती त्या काळात महाराष्ट्रात निर्माण झाली होती. महाराष्ट्रातल्या या अति बिकट काळामध्ये भागाभागांतून अनेक व्यक्तींनी विलक्षण पराक्रमी नेतृत्व केले. कोणी धनाजी झाला, तर कोणी संताजी झाला. पण हे लोकांतून उठलेले नेतृत्व होते. ते जुळवून तयार केलेले नेतृत्व नव्हते. जनमनामध्ये जे सामर्थ्य निर्माण झाले होते, त्यातून ठिकठिकाणी अनेक सुभेदार, सरदार आणि सेनापती निर्माण झाले, आणि अशा या जनतेच्या नेत्यांनी सतत पंचवीस वर्षे परकीयांशी निकराने लढा दिला. महाराष्ट्राच्या सगळ्या इतिहासामध्ये महाराष्ट्रावर एवढे जबरदस्त आक्रमण कधी झाले नव्हते. स्वतः दिल्लीचा पातशहा औरंगजेब आपल्या सर्व सैन्यनिशी पंचवीस वर्षे महाराष्ट्रात तळ देऊन बसला होता. पण याला धडाडीने तोंड देणारे कर्तृत्व निर्माण करण्याचे काम या छोट्याछोट्या नेत्यांनी केले, अणि या नेत्यांना निर्माण करण्याचे काम जनतेने केले. जनमनामध्ये अशी तयारी व्हावी लागते. परिस्थितीतून जनतेचे असे सामर्थ्य उभे रहावे लागते, तेव्हाच असा हा प्रचंड पराक्रम घडून येतो. जनतेतून असे नेते निर्माण होतात.

जनता आणि नेते यांचे असे हे माता आणि पुत्र यांचे नाते आहे. जनता हीच शेवटी माता. तिच्या आशीर्वादातून, तिच्या सर्वस्वातून, तिच्या भावनेतून, तिच्या परंपरेतून नेतृत्व उभे राहते. जनता व नेतृत्व यांचे हे नाते निर्माण होण्याचे काम इतिहासकाळात घडावे लागते. हे सर्व समजून घेणे हा इतिहास समजण्याचा एक उद्देश असला पाहिजे. हे काम महाराष्ट्रात कोणीतरी जिद्दीने करावयास पाहिजे होते. इतिहाससंशोधक हे काम करीत नाहीत, असे मला सुचवावयाचे नाही. पुण्यातली, नागपुरातली व इतर ठिकठिकाणची पुष्कळ मंडळी हे काम आपापल्यापरीने करीत आहेत. परंतु अगदी एकाकी परिस्थितीत, ज्या तऱ्हेने बेन्द्रे यांनी हे काम आज अनेक वर्षे केलेले आहे, त्याचे नुसते कौतुकच नव्हे, तर त्याचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार महाराष्ट्राकडून व्हावयास पाहिजे.

या ग्रंथाच्या निर्मितीसंबंधी बेन्द्रे यांच्याबरोबर मी अनेक वेळा बोललो

होतो, असे मी सुरूवातीस सांगितले. पण अधिकारावर असणारा मनुष्य जेव्हा बोलतो. तेव्हा त्याचा थोडासा तरी परिणाम घडून येतो, ही गोष्ट मला आज समजली! सरकारतर्फे मागण्याची माझी सवय असली, तरी मी त्यांच्याशी सरकार म्हणून बोललो नव्हतो. कारण इतिहास हा माझा वैयक्तिक आवडीचा विषय आहे. परंतु सहज बोललेल्या शब्दांतूनही मोठे काम घडू शकते. असा आज मला अनुभव आला. श्रम त्यांचे, माझे फक्त बोलणे होते. पण त्या बोलण्यातून हे काम घडले, यात मला अतिशय आनंद आहे. त्यांच्या गुणांचे व कर्तृत्वाचे चीज महाराष्ट्र शासन करील आणि अशाच तऱ्हेची कामे महाराष्ट्रात चालू राहतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि श्री. बेन्द्रे यांना दीर्घायुष्य लाभो व त्यांचा प्रत्येक क्षण या कामाकरिता मिळो, अशी मी प्रार्थना करतो.



# विचार

# ५४... संयुक्त महाराष्ट्राचे साध्य

संयुक्त महाराष्ट्र हे मी साध्य कधीच मानले नाही, ते एक साधन आहे' असे माझे मत आहे. मराठी मने एकसंध करणे हे पहिले साध्य आहे, असे मी मानले आहे. विदर्भाच्या प्रश्नावरून ही गोष्ट ध्यानात येईल. विदर्भाची मागणी आपण तपासून पाहिली, तरी तिच्यामागे दोन प्रवृत्ती दिसतात. एकतर विदर्भातील मराठी मनास अजून इकडच्यांप्रमाणे जाग आलेली नाही; केवळ अशा अर्थानेच, की इकडे मराठी माणसांचे मन ज्या घटनांनी, ज्या प्रतीकांनी उचंबळून आले, तसे ते तितक्या प्रमाणात तिकडे आले नाही. एकजुटीचे जे Emotional Appeal इकडे दिसले, ते तिकडे तितक्या प्रमाणात दिसत नाही. त्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. दुसरी गोष्ट, आपल्याबद्दल तिकडे संशय आहे. त्यांना असे वाटते की, ही मंडळी आपल्यावर डॉमिनेट करतील किंवा आपल्याकडे दुर्लक्ष करतील. भौगोलिक दृष्ट्या एकत्र आले, म्हणजे मनातला हा संशय दूर होईल. असे मुळीच नाही. त्यासाठी खटपट केली पाहिजे. या प्रश्नाला शासनयंत्रणेच्या दृष्टीनेही एक बाजू आहे. आमचे अधिकारी तेथे राज्य किंवा वरचढपणा गाजवण्याच्या भूमिकेत जातात. त्यांनी मिशनरी वृत्तीने गेले पाहिजे, नाही तर मित्रांपेक्षा शत्रूच उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीत. यातही आणखी एक पथ्य पाळले पाहिजे. तिकडे कारभार करताना जसा अहंगंड असता कामा नये, त्याचप्रमाणे उपकाराची भावनाही (पॅट्रनेज) मनातून काढली पाहिजे. ही दोन टोके सोडून तेथील कारभार मध्यममार्गाने होणे आवश्यक आहे. हे मी नेहमी अधिकाऱ्यांना सांगतो. मला असा विश्वास वाटतो की, आपण विदर्भ-मराठवाड्याचे मन जिंकू व सगळा मराठी समाज एकसंध करू शकू. त्या भागातही असा विश्वास हळूहळू उत्पन्न होत आहे. तेथील अनेक मंडळी आता तसे बोलतात. पण मी किंवा आणखी काही थोडी माणसे यांच्या विश्वाससंपादनाने हे काम पुरे होणार नाही. माझ्याबद्दल चांगुलपणाची भावना वाटली, तरी Men Succeed but Missions Fails अशी स्थिती होणे हितावह नाही. आपले कार्य यशस्वी झाले पाहिजे.

मराठी मन एकसंध करावयाचे, तर जातिवादाचाही निरास केला पाहिजे. या बाबतीत केवळ ब्राह्मणब्राह्मणेतर प्रश्नच आहे, असे नाही. अस्पृश्यतेचा, नवबौद्धांचा प्रश्न घ्या. या बाबतीत नव्या मराठी राज्याने खटपट केली पाहिजे. दलित समाजाच्या बाबतीतील उपेक्षा आपण सोडली पाहिजे. महारवतनाचा कायदा आपण अगदी अलीकडे केला. ते वतन नष्ट करण्यासंबंधीची मागणी न्याय्य होती. कूळकायदा, जमीनविषयक कायदे, इत्यादी कायदे आपण करीत आलो, तेव्हाच प्रथम दहा वर्षांपूर्वी महारवतनाचा कायदा केला असता, तर त्या समाजात विश्वास निर्माण झाला असता, असे मला आज वाटते. ही चूक आपण दुरूस्त करू या. 'गेले ना नवबौद्ध आपल्यांतून, जाऊ द्यात', असली उपेक्षाबुद्धी एकसंध समाजनिर्मितीच्या आड आल्याशिवाय राहणार नाही. किंबहुना त्यांच्या प्रश्नाला योग्य तो अग्रक्रम द्यावयास हवा. समाजातील विविध गटांतील लोकांचे प्रश्न वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून समजावून घेऊन सोडविण्याचे व्रत नव्या राज्याने घेतले पाहिजे. सामाजिक उदारता अंगी बाणल्याशिवाय हे व्रत पार पाडणार नाही, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे. पूजा गुणाची, जातीची नाही, असे मी म्हणतो, ते याचकरिता. बहुजनसमाज म्हणजे काय, याविषयीची आपली भावनाही व्यापक बनवून, त्यात सर्व कष्ट करणारांचा समावेश व्हावयास हवा.

दुसरे साध्य समतेच्या भूमिकेवरून आर्थिक विकास, असे मी मानतो. हे साध्य महाराष्ट्रात लवकर साधले जाईल, असा माझा विश्वास आहे. आपली भूमी समाजवादाला अधिक अनूकूल आहे, असे मला वाटते. उदाहरण द्यावयाचे, तर स्वतंत्र पक्षाचे घ्या. या पक्षाला महाराष्ट्रात नाव घेता येईल, असा कोणीही नेता मिळाला नाही. महाराष्ट्रातील भौतिक परिस्थितीच (Objective Conditions) अशी आहे, की येथे समाजवाद अधिक लवकर रूजावा. महाराष्ट्रातील राजकीय जागृतीची पार्श्वभूमीही याला विशेष अनुकूल आहे. आज देशातील निरनिराळ्या समाजवादी विचारसरणीच्या पक्षांचे ठळक नेते महाराष्ट्रीय आहेत.

आमचा काँग्रेस पक्ष जुना आहे आणि काँग्रेसचा राजकीय पिंड तयार करण्यात महाराष्ट्राचे नेतृत्वच अग्रभागी होते. न्या. रानडे, लो. टिळक व श्री.गोखले यांनी ते काम केले. आजसुद्धा व्यक्ती म्हणून नेतृत्वाचा प्रश्न बाजूला ठेवला. तरी महाराष्ट्राची 'प्रोग्रॅमॅटिक लीडरशिप' आपण अखिल भारतात निर्माण करू शकू, असा माझा आत्मविश्वास आहे. नव्या महाराष्ट्र-

राज्याचे ते एक वैशिष्ट्य ठरेल. असे वाटते.

महाराष्ट्र विद्येच्या उपासनेची एक थोर परंपरा आहे. आपले शैक्षणिक जीवन समृद्ध आहे. अगदी अलीकडच्या इतिहासातसुद्धा अखिल भारताची राज्यघटना तयार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विद्येच्या उपासनेचा व बौद्धिक गुणवत्तेचा ध्वज फडकावला आहे. केवळ दुष्कीर्तीचे व अपयशाचे आसन ठरलेले केंद्रीय अर्थमंत्रीपद यशस्वीपणाने भूषविले, ते श्री. चिंतामणराव देशमुख यांनीच. त्यांच्या राजीनाम्यामुळे केवळ भारतातच हळहळ व्यक्त झाली, असे नाही, तर जगभर खेद व्यक्त झाला. मला वाटते, नव्या महाराष्ट्र राज्यासमोर विद्येच्या उपासनेचे हे आदर्श असावेत. अशा विद्येच्या उपासनेला आपण प्रोत्साहन द्यावे. थोर संशोधक व कल्पक तंत्रज्ञ पुरवून आपण भारताच्या विकासाला हातभार लावला पाहिजे.

विद्येची उपासना महाराष्ट्रात टिकली पाहिजे. वाढली पाहिजे. उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थांतील प्रवेशनिर्बंधाबाबत माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या उपसमितीने दिलेल्या एका अहवालात कॉलेजमधील वाढत्या गर्दीबाबत उपाययोजना सुचविताना असेच प्रवेशनिर्बंध घालण्याची सूचना केली आहे. मी काँग्रेस कार्यकरिणीत या सूचनेचा विरोध केला. आपल्या देशात शिक्षणाच्या सोयी फार मोठ्या प्रमाणात वाढविण्याची आवश्यकता असताना. त्यासंबंधी काही करण्याऐवजी आपण उच्च शिक्षणाच्या सोयी मर्यादित करण्याची भाषा बोलता कामा नये, असे मला वाटते. शिक्षणाचे संस्कार करून घेण्यासाठी सिद्ध झालेल्या हजारो युवकांना शिक्षण नाकारण्याचा आपल्या अधिकार काय ? आर्थिक क्षेत्रात Rich gets richer ही प्रक्रिया जशी योग्य नाही, त्याचप्रमाणे Cultured gets more cultured अशी स्थितीही सामाजिक समतोलाच्या दृष्टीने होणे योग्य नाही. यामुळे शिक्षित आणि अशिक्षित यांच्यामध्ये पडलेले अंतर अधिकच वाढत जाते. सर्वसामान्यतः उच्च शिक्षणावरील निर्बंधाबाबतचे माझे हे विचार आहेत.

उच्च शिक्षणातील गुणवत्तेचे स्थान अर्थातच मी जाणतो. कोणत्याही परिस्थितीत त्याला धक्का लावावा, असे माझ्या मनातसुद्धा येत नाही. शास्त्रीय विषयांच्या अभ्यासातील त्याचे महत्त्व विसरणे म्हणजे आत्मघातच होय, याची मला जाणीव आहे. शिक्षणप्रसाराच्या उत्साहाने त्याकडे दुर्लक्ष केले, तर सर्व डोलारा एके दिवशी कोसळल्याशिवाय राहणार नाही.

शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या माझ्या काही कल्पना आहेत. मला असे वाटते, आपल्या माध्यमिक शिक्षणाची फार मोठ्या प्रमाणात पुनर्घटना केला पाहिजे. माध्यमिक शाळेतच विविध प्रकारची तंत्रज्ञाने शिकण्याची संधी आपण विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी उपलब्ध करून दिली पाहिजे. म्हणजे अगतिकतेने उच्च शिक्षण-संस्थांत केली जाणारी गर्दी टळेल. अनेक सामाजिक प्रश्न या शिक्षणाशी संबंधित आहेत, असे थोडा विचार केला, तर दिसून येते. उच्च शिक्षणाच्या सोयी काही थोड्या ठिकाणी - म्हणजे मोठाल्या शहरांतून केंद्रित झालेल्या असल्या, म्हणजे विद्यार्थी त्या ठिकाणी येतात आणि तेथे शिक्षण घेताना. त्यांचा दृष्टिकोन, आवडीनिवडी आणि विचारसरणी यांत बदल होतो. हा मुलगा कॉलेजातून गावी जाण्याची भाषाच बोलत नाही. या स्थितीचा सामाजिक दृष्टीने विचार केला पाहिजे. अशा या 'शहरी' विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व इतके बदलते, की तो आईवडिलांना पारखा होतो. आपल्या खेड्याच्या परिसराशी त्याचा संबंध तुटतो. सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने हा एक मोठा तोटा आहे. उच्च शिक्षणाच्या सोयींचे विकेन्द्रीकरण करून व माध्यमिक शिक्षणाची पुनर्घटना करून या प्रश्नावर तोड काढता येईल. या समस्येचा शिक्षणतज्ज्ञांनी अधिक विचार केला पाहिजे.

महाराष्ट्राचा औद्योगिक व आर्थिक विकास हा खरोखर तज्ज्ञांनी चर्चा करून ठरवावयाचा विषय आहे. पण राज्यकारभार करताना महाराष्ट्राच्या औद्योगिक नकाशाचे जेव्हा मी निरीक्षण करीत असे. तेव्हा मला एक गोष्ट वरचेवर खटके. ऊस, कापूस यांसारख्या पिकांपासून पक्का माल उत्पन्न करण्याचे कारखाने येथे निर्माण झाले, आणखीही होतील. पण आपल्या राज्यात पायाभूत भारी उद्योगधंदे (Basic Industries) सुरू झाले पाहिजेत, असे मला वाटते. रसायने, पोलाद यांसारखे औद्योगिक व संरक्षणविषयक दृष्टीनेही महत्त्वाचे उद्योग येथे निघण्याची शक्यता मला दिसते. भिलईसारखा कारखाना खरोखर नागपूरजवळ का निघाला नाही? यापुढे अशा कारखान्यात अधिक हिस्सा आपल्या राज्याकरिता मिळाला पाहिजे.

औद्योगिक विकासाच्या दृष्टीने आणखी एक विचार माझ्या मनात येतो. तो म्हणजे, शहरे व खेडे यांतील विषमता नष्ट करण्यासंबंधीचा. एकंदरीने औद्योगिकीकरणामुळे या देशात आपल्या समाजजीवनात शहरे व खेडी यांच्यामध्ये जी खोल दरी पसरलेली आहे. तिच्यामुळे अनेक नवे प्रश्न निर्माण होतात. माझ्या मनात असा विचार येतो की, ग्रामीण जीवनाचे नागरीकरण

(Urbanisation of rural life) करण्याच्या दृष्टीने आपल्या आर्थिक विकासाचे धोरण आखलेले असावे. शहरांत उपलब्ध असलेल्या सोयी आणि उत्कर्षाची विविध प्रकारची संधी जर खेड्यांतील जनतेला सुलभतेने मिळाली, तर समाजातील हा एक जाचक संघर्ष नाहीसा झालेला दिसेल. बहुजनसमाजाचे प्रश्न म्हणून आजच्या राज्याला जे अनेकविध प्रश्न भेडसावतात, ते वर उल्लेखिलेला संघर्ष नष्ट झाला, म्हणजे आपोआप सुटतील, अशी माझी कल्पना आहे. वरवर दिसणारा हा आर्थिक प्रश्न सुटला, म्हणजे समाजात भावनात्मक समरसताही निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

ग्रामस्वराज्याच्या ज्या कल्पना मांडल्या जातात, त्यांच्याशी वर व्यक्त केलेले विचार कुणाला विसंगतही वाटण्याची शक्यता आहे. कदाचित ते, सर्वोदयाचे काय, असाही प्रश्न विचारतील, माझे मत स्पष्ट आहे. आर्थिक समता, ग्रामोद्धार या गोष्टीचा मी ध्येय म्हणून स्वीकार केला आहे खरा, पण औद्योगिकीकरण, नागरीकरण या गोष्टी मला निषिद्ध वाटत नाहीत. त्या अर्थाने मी सर्वोदयवादी नाही!

रचनात्मक कार्यासाठी सर्वपक्षीय संघटना निर्माण व्हावी, असे सुचवले जाते. सर्वपक्षीय संघटना व्यवहार्य नाही, असे माझे मत आहे, मात्र आर्थिक विकासाच्या क्षेत्रात, लोककल्याणाच्या नियोजनांतर्गत कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सर्वपक्षीय सहकार्याचा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. एक नवे वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने अशी काही लोकहिताची रचनात्मक कामे सर्वपक्षीय सहकार्याने घडवून आणली पाहिजेत. उदाहरण घ्यावयाचे, तर 'कंटूर बंडिंग'चे घेता येईल. महाराष्ट्राच्या फार मोठ्या भागात कंटूर बंडिंग हे एक अत्यावश्यक असे कार्य आहे. कोणाच्या प्रेरणेने व कोणत्या पक्षाच्या झेंड्याखाली हे काम गावात होते, त्याला महत्त्व नाही. या कार्यक्रमाची अंमलबजावणी महत्त्वाची आहे. परंतु सर्वपक्षीय सहकार्याची काही संघटनात्मक ठाम चौकट असावी, असे म्हणणे कठीण आहे. सहकार्यांचा प्रयोग करून पाहिला पाहिजे.

महाराष्ट्राची स्वदेशरक्षणाची उज्ज्वल परंपरा अधिक उजळ करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सैनिकी शिक्षणाचा. भारतीय संरक्षण दलांतून महाराष्ट्रीय तरूणांची निवड अगदी अत्यल्प प्रमाणात होते. महाराष्ट्रीय परंपरेशी सुसंगत असा हा पेशा तरूण पिढीला अधिक प्रमाणात उपलब्ध व्हावा, म्हणून नव्या महाराष्ट्र राज्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी उमेदवार विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याचे काम ठिकठिकाणी व्हावयाला हवे.

पुण्याच्या महाराष्ट्र सैनिकीकरण मंडळाचे कार्य मला मोलाचे व अनुकरणीय वाटते. असे पूर्व शिक्षणाचे वर्ग ठिकठिकाणी निघावेत, म्हणून खटपट झाली, तर त्याला सरकारने साहाय्य केले पाहिजे.

# ५५... भारतसेवक महाराष्ट्र

महाराष्ट्राची सेवा करण्यात मी रंगून गेलो असतानाच मला दिल्लीचे बोलावणे आले. तसा असंख्य वेळा मी दिल्ली आलो असेन. दिल्ली काही मला अनोळखी नव्हती. पण कुठल्याही गावचा होणे ही एक वेगळीच भावना आहे. महाराष्ट्रात असताना मी त्याच्या आशा-आकांक्षाशी समरस झालो होतो. त्याच्या रागा-लोभाचा मी अनुभव घेत होतो. स्वतःच्या मनातील काही निश्चित ध्येयवादानुसार महाराष्ट्राची घडण व्हावी. या भावनेने नवे नवे बेत रचीत होतो. तसे करतानाही भारतीय जीवनाचा, भारतीय दृष्टीचा विसर पडला नव्हता. किंबहुना असा दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे थोडीशी नाराजीही निर्माण केली होती.

पण मी आता येथे आलो आहे. भारताच्या भवितव्याशी अत्यंत निगडित असलेल्या अशा प्रश्नांची उकल चालू असताना मी येथे आलो आहे. राजकारणाचे सगळे रंग दिसत आहेत. विविध वर्तुळांत वावरणारी दिल्ली ही तशी मोठी उद्बोधक नगरी आहे. इथल्या प्रशस्त आणि आलीशान इमारतींकडे पाहताना किंवा येथे वावरणाऱ्या विविध भाषकांच्या हालचाली पाहतानाही अनेकदा महाराष्ट्रासंबंधीचे विचार मनात येत असतात. या विचारांची गर्दी झाली, की मी कोठेतरी ते बोलतो. तसे केले, म्हणजे मोकळे वाटते, शेवटी माणसाच्या व्यक्तिमत्त्वात त्याच्या विचारांनाही महत्त्व आहेच. महाराष्ट्राशी माझे नाते कृत्रिम नाही. म्हणून त्याच्यापुढे प्रकट चिंतन करणे मला आवडते. ही देवाण-घेवाण आहे. उपदेशाचा आव नाही. तसा त्यात खोटा विनय नाही आणि खोटी अदबही नाही.

मी आता महाराष्ट्राबाहेर हिंडतो. अन्य भाषकांत वावरतो. हिमालयात जातो. पूर्वेच्या आसामच्या टेकड्या पाहतो. सारा देश हिंडत असताना भारताच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते; पण त्याच वेळी न कळत महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार मनात येतो, भारताच्या प्रश्नांचा विचार करीत असताना महाराष्ट्राच्या प्रश्नांची पार्श्वभूमी नेहमीच डोळ्यांपुढे येते.

माझा अनुभव असा आहे, की महाराष्ट्राबद्दल बाहेरच्या लोकांत खूप अपेक्षा आहेत. या अपेक्षा आपण पुऱ्या करू का, असे अनेकदा मनात येते. महाराष्ट्राबद्दल या अपेक्षा का निर्माण झाल्या? याचे कारण असे, की महाराष्ट्राने या राष्ट्राच्या जीवन-संग्रामात अत्यंत हिरिरीने भाग घेतला आहे. इतिहासकालात आणि अगदी अलीकडच्या काळातही महाराष्ट्राने राष्ट्रीय जीवनातील उदात्त ध्येयवादासाठी तादात्म्याने प्रयत्नांची शर्थ केली. पराक्रम केला. त्याग केला. शिवाजी, टिळक, रानडे, गोखले, फुले-आंबेडकर ही त्यांची प्रतीके. मी परवा बिहारमध्ये गेलो होतो. तेव्हा अगदी घरच्या माणसांची चौकशी करावी. तशी टिळकांची आठवण लोकांनी काढली. हाच अनुभव सर्वत्र येतो. उत्कट देशभक्ती म्हणजे महाराष्ट्र, असे जणू समीकरण त्यांच्या मनांत असते. अशा विविध भावना भारतीयांच्या मनांत आपल्याविषयी आहेत.

या ठिकाणी पं. नेहरूंची आठवण सांगण्यासारखी आहे. प्रतापगडाच्या निदर्शनांच्या वेळची ही गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या रागाचे नि अनुरागाचे ते प्रदर्शन होते. कारण जशी उग्र, शिस्तबद्ध प्रदर्शने त्या वेळी झाली. तसा प्रतापगडच्या डोंगर-कपारींत भरलेल्या नेहरूंच्या दर्शनार्थ जमलेल्या हजारो लोकांचा प्रचंड मेळावाही त्या वेळी झाला होता. तो कार्यक्रम आटपून आम्ही परत येत होते. निदर्शक परतत होते. कोणी सायकलवर, कोणी पायी, नेहरूंची मोटार पाहिली, की निदर्शक पुन्हा घोषणा करत. नेहरू हसतमुखाने त्यांच्याकडे पाहून हात हालवीत. असे हे वीस मैल चालू होते. न कळत पंडितजींच्या मनात महाराष्ट्राच्या जनतेसंबंधी विचार येत होते. थोडेसे विचारमग्न असताना एकदम ते मला म्हणाले,

'मी विचार करतो आहे - तुमच्या लोकांबद्दल... पंजाबी लोकही रागावतात; पण ते रागावले, तर एकदम थंडही होतात. मराठी लोकांचे तसे नाही. ते लवकर रागवत नाहीत; पण एकदा रागावले की, लवकर शांत होत नाहीत.'

मीही म्हटले,

'खरे आहे.'

लगेच मला आठवण झाली लोकमान्यांची. या महापुरूषाने असंतोषाची लाट भारतात पसरविली आणि साम्राज्याशाहीला धक्के दिले. ती महाराष्ट्रात जन्मली याचे कारण हेच असावे. अशा या इतिहासातील अनेक घटनांनी हे अनुकूल पूर्वग्रह निर्माण होतात. बाहेरच्या लोकांच्या अपेक्षा वाढतात.

सर्वत्र पूर्वग्रह अनुकूल असतात, असेही नाही. प्रतिकूलही असतात. पण मला वाटते, की महाराष्ट्राने प्रतिकूल पूर्वग्रहांचा विचार अवश्य करावा. हे काढून कसे टाकता येतील, यासाठी पद्धतशीर प्रयत्न करीत रहावे. पण त्यामुळे गोंधळून जाऊ नये. केवळ त्यांचाच विचार करून मनातल्या मनात कुढत बसू नये.

मग महाराष्ट्राने काय करावे ? संयुक्त महाराष्ट्र झाला, त्या वेळी मी म्हणालो होतो, की महाराष्ट्र-निर्मितीसाठी शिवशक्ती निर्माण झाली आहे. तर ती कायम टिकवली पाहिजे. ते आनंदसोहोळ्याचे दिवस साजरे करीत असतानाही माझ्या मनात हे विचार होते. कारण मला मनापासून वाटते की, महाराष्ट्राला राष्ट्रसेवेचे वेड होते. म्हणून तो मोठा झाला. ते वेड, ती जिद्द, तो कणखरपणा, ते शुद्ध चारित्र्य, ती विद्वत्तेपुढे नमणारी राजकीय नम्रता या देशाला हवी आहे आणि या गोष्टी महाराष्ट्राच्या परंपरेत आहेत. कसदार जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला आपल्या शेतीचा अभिमान असतो, तसा मला महाराष्ट्राचा अभिमान आहे. हे सारे गुण देशात सर्वत्र असावेत, असे मला वाटते. म्हणून महाराष्ट्राने या गुणांची जोपासना करावी - त्या गुणांना अनुकूल असे वातावरण सरकारने निर्माण करावे, असे मला वाटते. महाराष्ट्राने कोण व्हावे, असे मला कुणी विचारले, तर मी म्हणेन, भारताचा पुरोगामी व कणखर ध्येयवाद असलेला नम्र सेवक व्हावे. कारण अशा सेवकांची आज देशाला गरज आहे. आपण सध्या फार मोठ्या संक्रमणकाळातून जात आहोत. गेल्या तीन वर्षांत देशाला धक्के बसले. देशाने उराशी बाळगलेल्या मूल्यांना आव्हान दिले गेले. आपले अस्तित्व धोक्यात आणण्याचे प्रयत्न झाले व भविष्यकाळातही तसे होईल. म्हणून अशा वेळी केवळ सरकार नव्हे, तर सारे राष्ट्र, कणखर व ध्येयवादी व्हावयास हवे.

भारताच्या सध्याच्या संक्रमणकाळातही काही मूलभूत ध्येयावर त्याला ठामपणे उभे राहावे लागणार आहे. भारताला राष्ट्र म्हणून मानाने जगायचे असेल, तर दोन ध्येयसूत्रांवर त्याची उभारणा करावी लागेल. एक स्वावलंबी व समाजवादी अर्थव्यवस्था व दुसरे राष्ट्रीय स्वाभिमानावर व मानवतेच्या मूल्यांनी सिद्ध झालेला प्रखर राष्ट्रवाद. या दोन्ही ध्येयवादांची साधना वाटते तेवढी सोपी नाही. त्यात अडचणी आहेत. काही भक्कम विचार व त्यासाठी लागणारी लोकांवरील श्रद्धा असल्याविना आर्थिक समता येणार नाही. मला वाटते, महाराष्ट्रात या दृष्टीने अनुकूल वातावरण आहे. समाजवादाची ती

आदर्श प्रयोगभूमी ठरण्याची शक्यता आहे. तेथील सहकारी चळवळ, तेथील मध्यमवर्गीय जनतेची, कामगारांची, शेतकऱ्यांची राजकीय जागृती व त्याचा कार्यक्षम कारभारासाठी होणारा उपयोग हे लक्षात घेता, तेथे समाजवादी विचार प्रबळ होईल.

दुसरे ध्येयसूत्र राष्ट्रीय ऐक्याचे. महाराष्ट्राला राष्ट्रवादाचे बाळकडू आहे. शिवाजी महाराजांच्या काळापासून ही राष्ट्रीय प्रेरणा, ते राष्ट्रीय चैतन्य आपल्या जीवनात सळसळत आहे. अगदी अलीकडे हिंदीच्या प्रश्नांवर भारतात एवढा वादविवाद झाला. पण महाराष्ट्राने याबाबत मुळीत शंका व्यक्त केली नाही. महाराष्ट्राने हे केले, ते राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीतून आणि तेही स्वयंस्फूर्तीने - एक राष्ट्रीय भाषा हे राष्ट्रैक्याचे महत्त्वाचे साधन आहे, या श्रद्धेने महाराष्ट्राने हिंदीला पाठिंबा दिलेला आहे. ही त्याची उपजत राष्ट्रीय वृत्ती ही भारताची आजही मोठी निवड आहे.

पण हे राष्ट्रीय किंवा सांस्कृतिक ऐक्य हे केवळ घोषणांनी होणार नाही, त्यासाठी नित्य संस्कार हवेत. तसे संस्कार करणाऱ्या व त्यासाठी विविध उपक्रम करणाऱ्या संस्था हव्यात. महाराष्ट्राच्या भूमीत आंतरभारतीसारखा ध्येयवाद आणणारे साने गुरूजी किंवा दुसऱ्या प्रांतात जाऊन काम करणारे बाबा राघवदास, बाबूराव पराडकर किंवा सखाराम देऊसकर यांच्यासारखे देशभक्त ही अशा महाराष्ट्राच्या विशाल दृष्टिकोनाची प्रतीके आहेत. पण हे कार्य आता व्यक्तीचे नाही. अशा संस्था निर्माण केल्या पाहिजेत. त्यांच्याभोवती बुद्धिमंतांचे जाळे विणले पाहिजे. महाराष्ट्रातील बुद्धिमंतांनी या कामी पुढाकार घेतला, तर पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या बुद्धिवादी राष्ट्रनिष्ठ परंपरेचा प्रभाव पडू लागेल.

भारताच्या राष्ट्रीय ऐक्याची ही भावनिक बाजू सांभाळणे हे महाराष्ट्राला शक्य आहे. तसेच, त्याची सामाजिक बाजूही महत्त्वाची आहे. सामाजिक विषमता कायम राहिली, तर कोणतीही राजकीय वा आर्थिक रचना टिकणार नाही. कधीतरी या विषमतेतून असंतोष निर्माण होईल आणि त्या असंतोषाचा स्फोट होऊन ती रचना उडवली जाईल. म्हणून सामाजिक समता आणि सामाजिक न्याय यांची काळजीपूर्वक जोपासना या देशाला करावी लागणार आहे. म. फुले-आगरकर-आंबेडकर अशी पुरोगामी सामाजिक विचारांची परंपरा असणाऱ्या महाराष्ट्राला आता ते पुरोगामी विचार राष्ट्रीय जीवनात आणले पाहिजेत. आपली संतांची आणि आधुनिक समाज-सुधारकांची परंपरा

ही काही केवळ महाराष्ट्रासाठी नाही. त्यांचे विचार मानव्याचे होते. त्यांची स्वप्ने विश्वव्यापी होती. त्यांची तळमळ, त्यांची करूणा सगळ्या मानवतेतील दीन-दुःखितांसाठी होती. आता हे सर्वच आपण भारताच्या या विचारप्रवाहात आणून सोडले पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्राने समाजसुधारणेची आपली परंपरा जागृत ठेवली पाहिजे.

अर्थात महाराष्ट्राला या दोन ध्येयसूत्रांचा पाठपुरावा करावयाचा असेल, तर केवळ उपदेशकाची भूमिका घेऊन चालणार नाही. अहंतेने स्वतःच्या भूतकाळाची किंवा श्रेष्ठत्वाची स्तोत्रे गाऊन भागणार नाही; उलट, त्यामुळे गैरसमज वाढतील. आता भारतापुढे महाराष्ट्राने यावयाचे, ते नम्रतेने, परंतु कणखर पुरोगामी ध्येयवाद घेऊन. हा ध्येयवाद स्वतःच्या जीवनात महाराष्ट्राने बाणला, तर सारे राष्ट्र त्याच्या प्रगतीकडे उत्सुकतेने पाहील. नव्हे, त्याची अनुकरण करण्याची इच्छा निर्माण होईल. पण जे कित्ता घालून देतात, त्यांचे वर्तन व प्रेरणा निर्विवाद पाहिजेत, लोकशाहीमध्ये, विशेषतः अप्रगत देशांतील लोकशाहीमध्ये राज्यसंस्थेच्या कल्पकतेवर व तिच्या कार्यक्षमतेवर जनतेची सर्वांगीण प्रगती अवलंबून असते. महाराष्ट्राने असा ध्येयवाद स्वीकारला, तर त्याचे शासनही तो पार पाडायला बद्धपरिकर राहील.

शासनाची कसोटी केवळ कार्यक्षम कारभार ही नाही. तसेच, राज्य ही काही उपभोग्य वस्तू नाही. ती समाजपरिवर्तनाची यंत्रणा झाली पाहिजे. केवळ नियोजनातील आकडेवारीने हे होणार नाही. पैसा खर्चून समाजनिर्मिती होत नाही. त्याला सर्वांगीण व जनतेच्या हृदयाला हात घालणारा ध्येयवाद लागेल व तो पेलणारे तळमळीचे नेतृत्व लागेल. राजकारण हा सत्तास्पर्धेचा आखाडा करणे हे या दरिद्री असलेल्या देशात महापातक आहे. ही अवस्था फार काळ टिकू शकणार नाही. म्हणून कोणत्याही शासनाला लोकाभिमुख राहावेच लागेल. या ध्येयवादामुळे चारित्र्यशुद्धी होईल. नवी ईर्ष्या निर्माण होईल. क्षुद्र आकांक्षा वितळून जातील.

महाराष्ट्राच्या भविष्यकाळातील त्याचे हे कार्य आहे. कार्य ठरले, की त्याचा क्रम ठरला पाहिजे. त्याविना सगळी घोषणाबाजी ठरेल. महाराष्ट्र परिपूर्ण नाही. त्याच्या सामाजिक जीवनात काही उणिवा आहेत. पण माझी श्रद्धा आहे, की त्या उणिवा भरून काढण्यासाठी हा ध्येयवाद आपल्याला उपयोगी पडेल. एका महाकवीची काव्यपंक्ती मला आठवते : 'महत्कार्याचें कंकण धरिलें ! आता महत्तमत्वचि पाहिजे बाणिलें !'

असे होईल, हे नक्की, महाराष्ट्र या शब्दातच राष्ट्रीयत्वाचा सत्त्वांश आहे. तो शब्दच आपल्याला या ध्येयवादाकडे ओढीत राहील.

# ५६... नव्या प्रेरणांना साथ देऊ या

मुख्यमंत्री म्हणून दररोज मला अनेक माणसांना भेटायची संधी मिळते. काहीजण माझ्याकडे कामासाठी येतात; त्याचप्रमाणे समारंभाच्या, दौऱ्याच्या किंवा कामकाजाच्या निमित्ताने मीही लोकांच्या भेटीगाठी उत्सुकतेने घेत असतो. त्यामुळे महाराष्ट्रातील जिल्ह्या-जिल्ह्यांतून व लहानसहान खेड्यापाड्यांतून सध्या काय चालले आहे, हे विविध थरांतील नागरिकांकडून समक्ष ऐकण्याचा योग मला वारंवार येत असतो.

गेली सहा वर्षे किंवा थोडा अधिकच काळ हा क्रम अखंडितपणे चालला आहे. या काळात महाराष्ट्रातील शेकडो-हजारो बंधुभगिनींचे व माझे प्रत्यक्ष बोलणे होऊ शकले आहे. विविध थरांतील व विविध वयांचे हे नागरिक मजजवळ मनमोकळेपणे बोलले आहेत. आपली गाऱ्हाणी, आपल्या अपेक्षा, आपल्या आशानिराशा त्यांनी मजपुढे मांडल्या आहेत. शासनाचा एक प्रतिनिधी या नात्याने मला जेवढे करता येईल, तेवढे त्यांच्यासाठी करण्याचा शक्यतो प्रयत्नही केला आहे. तथापि, येथेच त्यांचा माझा संबंध संपत नाही. ही मंडळी परत जाताना माझ्याजवळ काहीतरी मागे ठेवून जातात. एखादा बरा-वाईट अनुभव, एखादी भावना, ईर्ष्यायुक्त शब्द किंवा असेच काहीतरी मागे राहते आणि त्याचा माझ्या मनावरील संस्कार लवकर पुसला जात नाही.

तथापि, या प्रक्रियेतील एक फरक अलीकडेच माझ्या मनाला नव्यानेच जाणवू लागला आहे. विशेषतः, गेल्या एक-दोन वर्षांत तर त्याचा सुस्पष्टपणा अधिक लक्षात येऊ लागला आहे; आणि हा जो वेगळेपणा किंवा अनुभवांतील फरक मला जाणवू लागला आहे, त्याबद्दलचे माझे विचार किंवा माझे चिंतन म्हणा, या लेखात थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

हा वेगळेपणा निर्माण करणारी जी प्रमुख गोष्ट मला दिसते, ती अशी की, मराठी माणूस नवमहाराष्ट्राच्या संस्थापनेमुळे निर्माण झालेल्या वेगळ्या प्रकारच्या प्रेरणांना अलीकडे विशेष उत्कटतेने साथ देऊ लागला आहे. महाराष्ट्रात या पिढीत आपण एका नवा इतिहास घडवीत आहोत, याची

ईर्ष्यायुक्त जाणीव त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागली आहे; विशेषतः, तो जर तरूण असेल - चाळीशीच्या आत-बाहेर असेल, तर त्याच्या नजरेतून ती जाणीव अधिकच उत्कटतेने व्यक्त होऊ लागली आहे.

एखाद्या समाजात नवी ईर्ष्या निर्माण होणे ही अवघड गोष्ट समजण्यात येते. समाजातील सर्व थरांना जागृत करणारी, साऱ्या समाजाची अशी, सामुदायिक महत्त्वाकांक्षा किंवा ईर्ष्या निर्माण झाल्याशिवाय कोणताच समाज आपला उद्धार करून घेऊ शकत नाही. ब्रिटिशांशी झुंज देण्याच्या कालखंडात भारतभर समान प्रेरणा निर्माण करण्यासाठी त्या वेळच्या लोकाग्रणींना केवढे सायास पडले, हे आपल्याला माहीत आहे. केवळ राजकीय पुढाऱ्यांना हे काम करता आले नसते. कादंबरीकार, नाटककार, कवी शाहीर, इत्यादी कलाकारांनी नवे शब्द निर्माण केले व विविध क्षेत्रांतील कृतिवीरांनी त्या शब्दांमध्ये धृतीचा व कृतीचा नवा अर्थ ओतला. आज आपल्या देशात कशाची पुन्हा एकदा गरज असेल, तर ती अशा बलिष्ठ, शक्तिशाली इतिहास घडविणाऱ्या नव्या समाजप्रेरणांची होय. आपला देश स्वतंत्र झाल्यापासून गेली पंधरा-सोळा वर्षे आपण ध्येयनिष्ठेने व चिकाटीने प्रगतीच्या रस्त्यावरून जी वाटचाल केली, ती जणू या प्रेरणांचीच निर्मिती करण्यासाठी होय. आतापर्यंतचा काळ हा एका प्रकारे जमिनीची मशागत करण्यात व योग्य तऱ्हेचे बी-बीयाणे पेरण्यात गेला. परंतु आता नवप्रेरणांचे नवअंकुर फुटू लागलेले स्पष्टपणे दिसत आहेत.

वरील विवेचनात 'प्रेरणा' (urges) हा शब्द मी हेतुतः वापरीत आहे. 'भावना' असा शब्द मी येथे योजीत नाही. 'भावना' ही महत्त्वाची गोष्ट आहे. मानवी स्वास्थ्य, संरक्षण व विकास यांच्याशी भावनांचा संबंध निकटचा आहे. परंतु 'प्रेरणा' हा शब्द त्यापेक्षा वेगळा आहे. जगण्याशी, जीवनाशी, कृतीशी, कृतीच्या उद्दिष्टांशी व ध्येयपूर्ततेशी, त्याच्या बऱ्या-वाईट परिणामांशी 'प्रेरणा'चा संबंध पोचतो, असे मला वाटते; आणि त्या तशा विशिष्ट अर्थाने या ठिकाणी 'प्रेरणा' हा शब्द मी योजीत आहे. असो.

मला भेटणाऱ्या मंडळींच्या मनोरचनेत सध्या मला जो फरक जाणवत आहे. त्याबद्दल मी सांगत होतो. भारतात व महाराष्ट्रात सध्या ज्या नव्या प्रेरणा निर्माण झाल्या आहेत, त्यांच्याशी समरस होणारी व त्या प्रेरणांना प्रतिसाद देण्यासाठी उत्सुक असणारी माणसे वाढत्या संख्येने मला भेटत आहेत. आणि त्या वेळी मजजवळ बोलताना ते जी भाषा वापरत आहेत, तीही पूर्वीपेक्षा कितीतरी वेगळी असते, असा माझा अनुभव आहे.

महाराष्ट्रात आपण यंदापासून पंचायत-राज्याचा प्रयोग सुरू केला असल्याने ग्रामीण भागातही वेगळी अस्मिता निर्माण झाली आहे. नव्या जबाबदारीची जाणीवही तेथे निर्माण झाली आहे. ही जबाबदारी किती अवघड व सर्वगामी आहे, हे वारंवार समजून देण्यासंबंधी मी व माझे सहकारी जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहोत. अनेक पत्रकारांनी, समाजातील विचारवंतांनी व जबाबदार नागरिकांनी याबद्दल योग्य शब्दांत आपले विचार मांडले आहेत. परंतु हे करीत असताना ग्रामीण भागातील नवनिर्मित आकांक्षांना, उर्मींना किंवा प्रेरणांना धक्का लागता कामा नये, अशी सावधगिरी बाळगली पाहिजे. 'तुम्हांला पेलण्यासारखे नाही, इतके हे जबाबदारीचे ओझे फार मोठे आहे', असे प्रत्येकजण जर सांगायला लागला, तर ग्रामीण विभागातील आपले बांधव खचून जाण्यास उशीर लागणार नाही.

म्हणून जपायचे आहे, ते प्रेरणांना- महाराष्ट्राच्या सर्व थरांत निर्माण झालेल्या विकासाच्या व नवनिर्मितीच्या नाजूक प्रेरणांना. या नव्या प्रेरणा हेच महाराष्ट्राचे आजचे बल आहे; आजची धनदौलत आहे. समाजमानसात निर्माण होणाऱ्या या प्रेरणा नाजूक असतात; त्यामुळे त्यांची प्रसन्नता व शुद्धता प्रयत्नपूर्वक मुद्दाम टिकवावी लागते. कारण शुद्ध प्रेरणांची शक्तीही अफाट असते. तळहातावर शिर घेऊन या प्रेरणाच निधड्या छातीने शत्रूशी लढतात; साधनांच्या अपुरेपणाची तमा न बाळगता या प्रेरणाच रात्रंदिन काबाडकष्ट करू शकतात. संशोधकांच्या प्रयोगशाळेत या प्रेरणाच त्याची साथ करतात अन् त्याला अवचितपणे नवा शोध हस्तगत करून देतात. प्रतिभाशाली साहित्यिकांच्या व कलावंतांच्या हृदयांत या प्रेरणा, स्फूर्तीचा दीप केव्हा प्रज्वलित करतात, याचा तर नेमच नसतो.

या प्रेरणा कुठे नसतात ? सर्वत्र असतात. जेथे जेथे ईर्ष्या आहे, भावना आहे, श्रद्धा आहे, आनंद आहे, तेथे तेथे या प्रेरणा नवे व अद्‌भुत सामर्थ्य निर्माण करतात. मानवाच्या पुरूषार्थाला चालना देतात, नवनिर्मितीला बहर आणतात.

मला भेटणारे मराठी बांधव प्रतिदिनी माझ्याकडे नवमहाराष्ट्राच्या या नव्या प्रेरणा घेऊन येत असतात. विजयादशमीच्या दिवशी जसे सोने घेऊन मंडळी येतात, तसे जणू दररोज घडत असते. मला वाटते, जसे ते मला थोडे देतात, तसे मी पण त्यांना देतो. ज्ञान जसे देऊन संपत नाही, तसे त्या प्रेरणांचे होते. एखादे सुंदर चित्र चुकीच्या पर्स्पेक्टिव्हमधून जो पाहतो, त्याच्या पदरी दुर्दैवाने

निराशा येते. 'हे कसले सुंदर चित्र? यामुळे तुम्हांला कसली स्फूर्ती मिळते ?' असे तो म्हणतो. याच न्यायाने आजही महाराष्ट्रात व देशात जे घडत आहे, त्याची वेगळी बाजूच जो पाहील, त्याच्या हृदयात कोठून नव्या प्रेरणांचा जन्म होणार ? तो म्हणणार की, भारतात व महाराष्ट्रात काहीच चांगले घडत नाही. परंतु आपल्या सुदैवाने असा निराशावादी दृष्टिकोन घेणारी माणसे आपल्या देशात फार कमी आहेत.

आपल्या महाराष्ट्रापुरतेच बोलायचे, तर गेल्या वर्षभरापासून सर्व पक्षांच्या व विचारसरणींच्या मंडळींनी महाराष्ट्रविकासाच्या नव्या प्रेरणांना साध देण्यास सुरूवात केली आहे. पक्षीय दृष्टिकोन म्हणून काही वेगळेपणा किंवा अलगपणा क्वचित दिसतो; पण त्याबद्दल मी तक्रार करणार नाही. मुख्य प्रश्न आहे, तो समान प्रेरणांचे नेतृत्व मान्य करण्याचा; 'आपला महाराष्ट्र आपल्याला कोणत्या दिशेने न्यावयाचा आहे?' याबद्दलचा उत्साह, ईर्ष्या सर्वांजवळ असण्याचा. चळवळ करून एकसंध महाराष्ट्र निर्माण करण्यापाठीमागे काही प्रेरणा होत्या. त्या वेळी त्या काही प्रमाणात अस्पष्ट होत्या; परंतु महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर या प्रेरणा व काही इतर प्रेरणा प्रभावी व सुस्पष्ट झाल्या आहेत. या सर्व प्रेरणा लोकांच्या अंतःकरणांत व हृदयांत मूळ धरू लागल्या आहेत; शब्दांतून व्यक्त होऊ लागल्या आहेत; प्रयत्नांतून व धडपडीतून आकार धारण करू लागल्या आहेत.

भाग्याची गोष्ट अशी की, जी अनेक मंडळी मला भेटतात, त्यांच्या नजरेपुढे काही ना काही स्वप्ने तरळताना मला दिसतात. काहीतरी नवे करून दाखविण्याची त्यांची तळमळ हाच नवमहाराष्ट्राचा आधार आहे. सर्वांची सर्वच स्वप्ने साकार होण्याचा संभव नसतो; त्यांतील काही स्वप्ने आपल्या नव्या प्रेरणांशी सुसंवादी अशीही नसतात. परंतु महत्त्वाची गोष्ट अशी की, त्यांच्या मनापुढे काही स्वप्ने उभी असतात. कोणी नोकरी सोडून देऊन आपल्या पायांवर नवा कारखाना काढण्याच्या उद्योगात आपण असल्याचे मला सांगतो. मागासलेल्या विभागात नवी शाळा काढण्याची योजना दुसरा समजावून देत असतो. शेतीच्या उत्पादनातील नवी पद्धती शोधून काढल्याचे तिसरा अभिमानपूर्वक सांगत असतो. परदेशी मालाच्या तोडीचा विशिष्ट माल येथे तयार करण्याची सर्व सिद्धता झाल्याचे चौथा सांगत असतो. अशा अनेकविध नवनव्या गोष्टी करण्यासाठी आतुर झालेली माणसे मला भेटतात, तेव्हा माझा उत्साह शतगुणित होतो, यात काय नवल ?

अर्थात महाराष्ट्रापुढे आजही अडचणी उभ्या नाहीत, असे नाही. भारतापुढेही व प्रत्येक राज्यापुढेही अनेक अडचणी आहेत. पंरतु चढावाचा रस्ताच आपण सांप्रत चालत आहोत. मग हा रस्ता सोपा कसा असणार ? अडचणी, संकटे, निराशा यांना तोंड देऊनच हा रस्ता आक्रमावा लागणार आहे. देशाच्या सीमा आज धोक्यात आहेत; विविध भाषकांतील बंधुभाव वाढविण्याची तातडीची गरज आहे; जातीयवादासारख्या संकुचित प्रवृत्तींना मूठमाती द्यावयाची आहे; औद्योगिकीकरणाची व शेती - उत्पादनाची गती वाढवावयाची आहे. या अशा वेळी आपला उत्साह व आपली श्रद्धा जर कोणी टिकविणार असेल, तर त्या म्हणजे आपल्या प्रत्येकाच्या हृदयातील नवनिर्मितीच्या मंगल प्रेरणाच होत. या मंगल प्रेरणाच नवनिर्मितीचा आपला ध्यास कायम राखतील. अडचणी किंवा मतभेद निर्माण झाले, तर त्या प्रसंगी, व्यापक संदर्भ न विसरता चातुर्याने व खेळीमेळीने कसे वागावयाचे, हे प्रेरणाच आपल्याला सांगतील. म्हणून मी सर्वांना एवढीच प्रार्थना करीन की, नवमहाराष्ट्र - निर्मितीमुळे निर्माण झालेल्या प्रेरणांचे मांगल्य असेच टिकवा व वाढवा.

## ५७... आज आणि उद्या

आजचा दिवस हा हिंदुस्थानच्या स्मृतीत अमर होऊन इतिहासात सोन्याचा दिवस ठरला आहे. आजच्या या दिवसाला तसाच अभिमानास्पद इतिहासही आहे. हा दिवस उगीच एकाएकी आणि अकस्मात आलेला दिवस नाही. गेल्या काही दिवसांच्या अविश्रांत श्रमांचे, त्यागाचे आणि अढळ श्रद्धेचे मधुर असे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे आजचा दिवस आहे. या 'आज' चा भूतकाळ जितका तेजस्वी आहे, तसाच त्याचा भविष्यकाळही उज्ज्वल आहे. परंतु तो भविष्यकाळही आपोआप येणार नाही. ज्या निष्ठेने हा दिवस उजाडावा, म्हणून रखडावे-झगडावे लागले, त्याच निष्ठेने या देशाला अजून काही वर्षे विधायक स्वरूपाचे प्रयत्न करावे लागणार आहेत.

या विधायक प्रयत्नांचे स्वरूप कोणते राहील. असा स्वाभाविक प्रश्न पुढे उभा राहतो, अणि त्याचाच विचार आपणांस करावा लागणार आहे. या देशात परसत्तेचे साम्राज्यशाही स्वरूपाचे अधिराज्य होते, ते नाहीसे करून राष्ट्रवादी लोकसत्ता या देशात स्थापावी, या एकाच सूत्रावर भर देऊन गेल्या पासष्ट वर्षांत या देशाने विराट स्वरूपाचे जागतिक प्रयत्न केले. हे प्रयत्न करीत असता काही वैचारिक व भावनात्मक श्रद्धा आपण देशात निर्माण केल्या होत्या. अखंड भारताची श्रद्धा ही त्यापैकीच एक होती. देशाच्या फाळणीच्या योजनेने या श्रद्धेस धक्का दिल्यामुळे थोडासा गोंधळ व किंचितशी उदासीनता निर्माण झाली आहे. ही गोष्ट खरी. परंतु नवीन इतिहास निर्माण करण्यासाठी बाहेर पडलेल्या राष्ट्राने अशा धक्क्याने गोंधळून जाऊन किंवा उदास होऊन चालणार नाही. हे शोकपर्व केव्हातरी संपविलेच पाहिजे आणि बदलत्या कालानुसार नवीन श्रद्धा निर्माण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे.

राष्ट्रीय उत्थापनाच्या या इतिहासात आपण जशी काही श्रद्धा उत्पन्न केल्या, तशी काही अस्त्रेही निर्माण केली आहेत. 'कॉंग्रेस संघटना' हे जनतेचे असेच एक महान अस्त्र आहे. जनतेने आपले सर्वस्व वाहून या अस्त्राचे सामर्थ्य वाढविले व टिकविले आहे. राष्ट्रीय सरकार प्रस्थापित झाल्यानंतर या अस्त्राचे

कार्य संपते, असा लोकभ्रम काही पंडित निर्माण करू पाहत आहेत. माझ्या मते ती एक भयंकर चूक किंवा लबाडी आहे. ब्रिटिश सत्ता या देशातून गेल्यानंतर ते स्वतंत्र सरकार या देशात स्थापन होत आहे, त्याचे स्वरूप काय आहे, ते आपण समजून घेतले पाहिजे. ब्रिटीश सत्ता येथे येण्यापूर्वी ज्या प्रकारची स्वतंत्रता या देशात होती, त्या प्रकारची स्वतंत्रता आता या देशात आलेली नाही किंवा आपणांस आणावयाचीही नाही. छोटे छोटे एकतंत्री राजे आता या देशात निर्माण करावयाचे नाहीत, तर अखिल जनतेच्या विश्वासाने जनतेच्या हितासाठी व जनतेच्या संमतीने राज्य चालविणारी लोकसत्ता या देशात प्रस्थापित होत आहे, व ती आपणांस टिकवावयाची आहे. तिचा अधिक विकास व विस्तार आपणांस करावयाचा आहे. आजच्या या दिवशी स्वतंत्रतेचीच प्रस्थापना आपण करीत नसून, लोकशाहीचीही प्रस्थापना आपण करीत आहोत. ही महत्त्वाची गोष्ट आपणांस विसरून चालणार नाही. ही लोकशाहीची प्रस्थापना 'काँग्रेस संघटने'सारखे जनतातंत्र आपण निर्माण केल्यामुळेच होऊ शकली, हा इतिहासाचा आपणांस मोठा धडा आहे.

राजकीय स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरचा पुढचा मोठा टप्पा अजून गाठावयाचा आहे. देशातील दारिद्र्य आणि दैन्याचा महाबिकट प्रश्न आपणांस सोडवावयाचा आहे. आर्थिक विषमतेवर आधारलेली समाजरचना बदलून आर्थिक लोकशाही निर्माण करावयाची आहे, आणि हे कार्य आपल्या हातून यशस्वी व्हावयाचे असेल, तर काँग्रेस संघटनेचे अस्त्र ज्या आत्मविश्वासाने जनतेने आतापर्यंत पेलले, त्याच आत्मविश्वासाने ते अस्त्र अजूनही पेलणे जरूर आहे. ज्या प्रमाणात काँग्रेस-संघटना जनतेच्या वर्चस्वाखाली राहू शकेल, त्या प्रमाणात व वेगात आर्थिक समानतेचे तत्त्व या देशात प्रस्थापित होणार आहे, काँग्रेस संघटना अधिक जनतामय ठेवणे हे यापुढचे आपले खरे कार्य आहे. काँग्रेसपासून पराङ्मुख होण्यात किंवा काँग्रेसमध्ये छोटे-मोठे गट-उपगट निर्माण करण्यात जनतेच्या सामर्थ्याचा विनाश आहे.

आजही प्रांतिक सरकारे स्थानिक स्वरूपाचे वा तात्पुरते प्रश्न कितपत यशस्वी रीतीने सोडवू शकतात, या गोष्टीवर काँग्रेस संघटनेबाबत आपले काय धोरण असावे, हे अवलंबून ठेवणे चूक आहे. काँग्रेस-संघटना व तिचे उद्याच्या हिंदुस्थानच्या राजकीय वादळातील स्थान हा एक मौलिक स्वरूपाचा मूलगामी प्रश्न आहे. त्याचा विचार आजच्या काही तात्कालिक स्वरूपाच्या तपशिलाच्या गोष्टीवरून करणे आत्मघाताचे आहे. युद्धोत्तर आर्थिक संकट आंतरराष्ट्रीय

स्वरूपाचे आहे व त्याचे काही अपरिहार्य परिणाम आपल्या देशालाही भोगावे लागणार आहेत. अशा परिस्थितीत काँग्रेसनिष्ठेचा प्रश्न तात्कालिक स्वरूपाचा राहू शकत नाही. या देशाचे मूलभूत स्वरूपाचे जे आर्थिक प्रश्न आहेत, ते प्रश्न सोडविण्यासाठी लागणारे क्रांतिकारक आर्थिक कार्यक्रम स्वीकारण्यास काँग्रेस बांधली गेली आहे. काँग्रेसची तशी परंपरा आहे आणि काँग्रेसनिष्ठा ठेवण्यास एवढी एकच गोष्ट पुरेशी आहे, असे मला वाटते.

# ५८... राष्ट्रीय ऐक्याची समस्या

येणारा प्रत्येक दिवस एक प्रश्नचिन्ह घेऊन येत आहे, अशी आज भारताची परिस्थिती आहे. जातीय दंगली वाढल्या आहेत. भाषिक तंटे आहेतच. प्रादेशिक समस्या सुटलेल्या नाहीत. काही राज्यांतील राजकीय अस्थिरतेमुळे शासनाला स्थैर्य राहिलेले नाही. हे सारे दृश्य आव्हानात्मक आहे. बाह्य आक्रमणांशी सामना देणे सापे असते; पण हे अंतर्गत कलह सोडविणे अत्यंत कठीण जाते. आपण एका बाजूला विकासाच्या अर्थकारणात स्वतःच्या पायांवर उभे राहावे, म्हणून झगडतो आहोत. आर्थिक स्वावलंबनाची धोरणे आखीत आहोत. पण ही सगळी धोरणे यशस्वी करण्यासाठी आवश्यक ते अंतर्गत वातावरण आपण तयार केले नाही.

ही परिस्थिती का निर्माण झाली, त्याची प्रत्येकाची कारणमीमांसा वेगळी असेल. गेल्या वीस वर्षांत जे घडले, त्यासंबंधी अगदी टोकाची मते मांडली जातील. दोषारोप केले जातील. नेतृत्वाला जाब विचारला जाईल. ही आत्मटीका व आत्मसंशोधन आजही आवश्यक आहे. पण मला वाटते, सर्वांचा हेतू हे प्रश्न सोडविण्याचा असावा. राष्ट्रीय उद्दिष्टांच्या एकतेवर आधारलेले क्रियाशील, समंजस व एकसंध राजकीय व सामाजिक नेतृत्व ही आजची गरज आहे.

अंतर्गत कलहाची ही बीजे आपल्या राष्ट्रीय जीवनात नवी नाहीत. किंबहुना जातीय द्वेष, भाषिक-प्रादेशिक आकांक्षा हे आपले नित्य चिंतेचे विषय आहेत. जातीय कलहांचा इतिहास आपल्या सर्वांसमोर आहे. भारत स्वतंत्र होताना जे घडले आहे, ते आपण सर्वांनी पाहिले आहे. जातीय ऐक्याची आपण भारी किंमत त्या वेळी दिली आहे. पण तरीही निष्ठा म्हणून आपण सर्व धर्मसहिष्णुतेचा स्वीकार केला आहे. लोकशाहीत परस्पर धर्मविद्वेष व जातीय कलह यांना वाव नाही. असा भेदभाव लोकशाहीशी सुसंगत नाही. तसा भेदभाव बाळगला, बहुसंख्य जमातीने अल्पसंख्यांकांना दहशतीखाली ठेवण्याचा प्रयत्न केला, तर त्यांचा असंतोष भूमिगत होईल. तो धुमसत राहील. म्हणून लोकशाही व सर्वधर्मी समानभाव ही आधुनिक संस्कृतीची मूल्ये म्हणून आपण स्वीकारली आहेत. हे हिंदूंनी लक्षात ठेवले पाहिजे. मुसलमानांसारख्या अल्पसंख्याकांनीही

या दोन मूल्यांचा स्वीकार हिंदूंइतक्याच निष्ठेने केला पाहिजे. ती निष्ठा जशी महत्त्वाची, तशीच भारतनिष्ठाही मूलभूत आहे. इतिहासात घडलेल्या दुर्दैवी घटनांना कधीतरी जाणीवपूर्वक विसरले पाहिजे. शेवटी भारतीय ऐक्याचा मूलाधार भारताची आजची राज्यघटना व तिने सर्वांना दिलेले समान नागरिकत्व हाच आहे. या देशातील सर्व जातींनी हे नागरिकत्वाचे नाते, लोकशाहीची ती प्रात्यक्षिक कसोटी आहे, असे समजून जोपासले पाहिजे ! 'मी या प्रचंड सार्वभौम लोकशाही राज्याचा नागरिक आहे' हा अहंभाव, ही अस्मिता हीच आपल्या राष्ट्रजीवनाची भावनिक शक्ती आहे.

व्यवहारात वैवाहिक बंधनाने जोडलेले पतिपत्नी जसे क्षणिक, तात्कालिक संघर्ष समंजसपणाने, पडते घेऊन सोडवितात, तसेच समान नागरिकत्वाचे हे बंधन सर्व जातींनी निष्ठेने मानले, तर अंतर्गत कलह, रक्तपात न होता, सोडविले जातील. ते सोडविण्यासाठी भारतात न्यायासनासमोर कोणालाही जाता येईल. केंद्रीय व राज्य सरकारे, राज्यघटनेने दिलेले अधिकार नागरिकांना उपभोगता यावेत, यासाठी कटिबद्ध आहेत. किंबहुना जातीय विद्वेष पसरविणाऱ्यांना कडक शासन करण्यासाठी लागणारे सर्व अधिकार सरकारांना दिलेले आहेत. तेव्हा न्यायासन व शासन ही दोन्ही अल्पसंख्याकांना समान वागणूक देणारी आहेत, यापेक्षा अधिक मोठे आश्वासन हवे, ते हे सर्व क्रियाशील करण्याचे !

म्हणून आता गरज आहे, ती जातीजमातींतील परस्परविश्वास दृढ करण्याची! यासाठी सर्वांनाच पूर्वग्रह सोडावे लागतील, सामाजिक पूर्वग्रह नाहीसे करणे कठीण असते. तरीही शिक्षणाची सारी आखणी योग्य रीतीने केली. नव्या पिढीला पूर्वग्रहाची शिकवण न देता नव्या राष्ट्रीय आकाक्षांची, उद्दिष्टांची दीक्षा राजकीय पक्षांनी दिली, तर भारताची समाजाची घडण योग्य रीतीने होईल. सामाजिक तणाव कमी होतील. राष्ट्रीय धोरणे राष्ट्रीय दृष्टीनेच आखली जातील. मग त्याची अंमलबजावणीही तितक्याच राष्ट्रीय भावनेने होईल.

आपल्या राष्ट्राचा दुसरा भाग म्हणजे, आपली भाषिक-प्रादेशिक भांडणे, भाषिक तंट्यांचाच प्रादेशिक भांडणे हा एक भाग आहे, असे मी मानतो. भाषावर राज्यरचना ही सोयीची, लोकशाही राज्यकारभारासाठी आवश्यक, म्हणून आपण स्वीकारली; पण त्याला आता धार आली आहे. माझे असे मत आहे, की आर्थिक विकासाची आकांक्षा वाढल्यामुळे व आर्थिक गरजा भागविण्याइतकी आपली आर्थिक सुस्थिती नाही, त्यामुळे संकुचित निष्ठा

वाढीस लागल्या आहेत. यावर उपाय काय, हा खरा प्रश्न आहे. आपले राज्य एका अर्थाने संघराज्य आहे आणि भारताचा सांस्कृतिक विकास भाषिक समाजांच्या कर्तृत्वाने झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. धर्म, भाषा, प्रदेश यांची भिन्नता व विविधता हे आपल्या राष्ट्रजीवनाचे वादातील स्वरूप आहे. ते मान्य करूनच आपल्याला आपली धोरणे आखावी लागतात. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे पलायनवाद आहे.

पण भाषिकता व प्रादेशिकता यांना या समान नागरिकत्वाच्या चौकटीतच बसावे लागेल, हेही तितकेच निर्विवाद सत्य आहे. प्रादेशिकता हे अंतिम मूल्य असणार नाही - असता कामा नये. स्वहित दृष्टी व संकुचित भावना ही जन्मजात असते. विशालता व उदारता ही शिकवावी लागते. भारताला ही विशालता शिकवावी लागेल. राष्ट्र म्हणून त्याला जगावयाचे असेल, समर्थ व स्वावलंबी व्हावयाचे असेल, तर संघराज्याची घटना, समान भारतीय नागरिकत्व हीच आपली अंतिम श्रद्धास्थाने झाली पाहिजेत.

यासाठी दोन गोष्टींची गरज आहे. धार्मिक सहिष्णुतेप्रमाणे प्रत्येक नागरिकाला भाषिक सहिष्णुता अंगी बाणवावी लागेल. 'आसामी ही भाषा मला येत नसली, तरी ती भारतीय भाषा आहे, म्हणून ती माझी भाषा आहे.' असे मला वाटू लागले, तर भाषिक तंट्याचे मूळ उखडले जाईल. 'गंगा माझ्या प्रदेशात नसली, हिमालय माझ्या गावाजवळ नसला, तरी त्यांचा मला अभिमान आहे.' असे सर्व भारतीयांना वाटते. तसेच ममत्व सर्व भाषांविषयी व सर्व भाषिक प्रदेशांविषयी भारतीय नागरिकांत निर्माण झाले पाहिजे व ते संस्कारांनी निर्माण करता येईल. असे झाले, तर बहुभाषी भारत हा शाप न ठरता, ते वैभव ठरेल. दुसरी गोष्ट प्रादेशिक आकांक्षांची व प्रादेशिक विकासाची आहे. प्रादेशिक विकासाचा विचार राष्ट्रीय नियोजनाचा संदर्भ विसरून करणे हे चुकीचे आहे. भारतीय नियोजनाचे उद्दिष्ट संतुलित विकासाची प्रक्रिया सुरू करणे हे आहे. तेव्हा प्रादेशिक समतोलता व तत्त्व त्यातच गृहीत धरले आहे. येथेही संघराज्याचे मूलभूत अर्थकारण एक आहे आणि त्याचा एक भाग म्हणून प्रादेशिक विकासाच्या योजना आखल्या जातात, हे विसरता कामा नये.

अर्थात भाषिकता व प्रादेशिकता यांच्यासंबंधीचे हे विवेचन सर्वमान्य होणारे असले, तरी त्याचा आचार हीच कठीण गोष्ट आहे. मला वाटते, राजकारणी पुढाऱ्यांना याबाबत आचारसंहिता ठरवावी लागते. जातिनिष्ठ राजकारण हे जसे

आपण त्याज्य मानले, त्याला राजकीय प्रतिष्ठा आपण मिळू दिली नाही, तसेच, आता प्रदेशनिष्ठ राजकारणाबाबत करावे लागेल. राजकीय पक्षांना प्रादेशिक भावना चेतवून आपले सामर्थ्य वाढविण्याच्या, लोकमत प्रक्षुब्ध करण्याचा तात्कालिक यश देणारा व भारताला घातक ठरणारा मार्ग सोडावा लागेल. राजकारणाचे स्वरूप प्रदेशनिष्ठ झाले, तर भारतीय राजकारणात भयानक परिस्थिती निर्माण होईल. प्रदेशांच्या हितासाठी राष्ट्रहिताचा बळी देणारी, त्याला धोका निर्माण करणारी पक्षबाजी शेवटी या राष्ट्राचे तुकडे करील. आपणांला एक प्रचंड राष्ट्र समर्थ व समृद्ध करावयाचे आहे आणि त्यासाठी आपले विविध राजकीय पक्ष आहेत, ही राजकारणाची अखिल भारतीय निष्ठा नाहीशी होऊन, तेथे प्रदेशनिष्ठ पक्षांची सरकारे येतील.

म्हणून राजकीय पक्षांनी आपले लक्ष अखिल भारतीय प्रश्नांवर केंद्रित केले पाहिजे. त्यांत घडलेल्या चुका व दोष यांवर अवश्य टीका करावी. पण संकुचित भावना चेतविणारे, सत्तास्पर्धेत कदाचित तात्कालिक यश देणारे राजकारण करू नये.

राष्ट्रीय ऐक्याची जोपासना करण्यासाठी काय करावे, याचाही विचार व्हावयास हवा आहे. राष्ट्रीय ऐक्याला पोषक अशा शक्ती भारतात. कोणत्या आहेत, याचा शोध घ्यावयास हवा. त्या ऐक्याची प्रचीती प्रत्येकाला येईल; या ऐक्याचा अनुभव सर्वांना येईल. असे राष्ट्रव्यापी कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. आधुनिक स्वरूपातील एकराष्ट्रीयत्वाचा हा आविष्कार ब्रिटिश राजवटीत झाला, हे निर्विवाद आहे. याच राजवटीविरूद्ध झालेल्या स्वातंत्र्य-संग्रामातील नेतृत्वाने आधुनिक भारतातील तीन पिढ्यांना राष्ट्रवादाची शिकवण दिली. दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व पं. जवाहरलाल नेहरू अशी ही नेत्यांची परंपरा या काळात मार्गदर्शन करीत होती. आपल्या राष्ट्रीय जीवनात निर्माण झालेल्या ऐक्यभावनेला, या राष्ट्रीय नेतृत्वाला फार महत्त्वाचे स्थान आहे.

याच काळात भारतीय समाजाला अखिल भारतीय दृष्टी आली. आपण एका प्रचंड देशाचे नागरिक आहोत, हे त्याच्या प्रत्ययाला आले. हे विशाल नागरिकत्व हा आपल्या अभिमानाचा विषय झाला. केशवसुतांनी वर्णिलेला 'नवहिंदचा शिपाई' या नव्या युगाची 'तुतारी' फुंकत आला. राष्ट्रीय भावनेचा हा उन्मेष त्या काळातला आहे. या राष्ट्राला एकच बांधणारा तो भावनेचा सेतू आहे. त्याचे मोठेपण आपण समजावून दिले पाहिजे.

या नागरिकत्वाचा कळस म्हणजे आमची सार्वभौम संसद आहे. स्वातंत्र्यलढ्यात आम्ही ज्यासाठी लढलो, त्या उदात्त तत्त्वांची ती प्रतिनिधिक संस्था आहे. नागरिकत्वाच्या हक्कांची, स्वराज्याच्या शासनाची, ती संसद ही निशाणी आहे. एकदेशीय भावना येथेच सदैव प्रज्वलित राहील.

समान संकटातून एकत्वाची जाणीव अधिक स्पष्ट होते. त्या संकटापासून संरक्षण करण्यासाठी ऐक्य कायम ठेवले पाहिजे, हे प्रचार न करता पटते. १९६२ व १९६५ साली जी परकीय आक्रमणे झाली, त्यांमुळे राष्ट्रीय संरक्षणाची ही निकड अनुभवावयास मिळाली. मला वाटते, आपल्या राष्ट्रीय ऐक्याचे फार उत्साहजनक दृश्य या काळात पाहवयास मिळाले. विशेषतः,भारत-पाकिस्तान संघर्षाच्या वेळी व देशात सैन्याबद्दल आढळलेले प्रेम हृदयस्पर्शी होते.

पंजाबमध्ये सैन्याच्या हालचाली चालू होत्या. त्या वेळी लोकांनी त्यांना असंख्य प्रकारांनी मदत केली. तेथे तर प्रत्येक कुटुंबातला कोणी ना कोणी सैन्यात असतो. तेव्हा सैन्याबद्दल एक प्रकारची कौटुंबिक भावनाच तेथे आढळते. हीच भावना सैन्यविषयी सर्वत्र निर्माण झाली. सैन्य व जनता यांच्यांत उभी असलेली अलिप्ततेची भिंत कोसळली. नवे नाते जोडले गेले. 'माझे घर संकटात आहे आणि त्याचेच रक्षण सैन्य करीत आहे.' ही भावना सर्वत्र आढळली. हे दृश्य साऱ्या भारतात दिसले. उदात्त भावनांचा तो कल्लोळ रमणीय होता. त्या संघर्षात मिळालेल्या विजयाइतकेच झालेले हे उत्कट भावदर्शन राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. युध्यमान भारताची ती प्रतिमा खरोखरच अपूर्व होती.

आपले सैन्य या दृष्टीनेच राष्ट्रीय ऐक्याचा महत्त्वाचा आधारस्तंभ ठरेल. स्वातंत्र्य-काळातील नवी पिढीच मोठ्या प्रमाणात आता सैन्यात आहे. आपल्या सैन्याचा दृष्टिकोन निकोप आहे. त्याची देशभक्ती ज्वलंत आहे. त्याचा पराक्रम कसोटीस उतरलेला आहे. त्याचे साहस जगाने पाहिले आहे. जाती, धर्म, प्रदेश यांच्या पलीकडे जाऊन देशसेवा करणारे आपले सैन्य हे राष्ट्रीय एकात्मतेचे संस्कारकेंद्र आहे. प्रादेशिक सेना, सैनिक विद्यालये, छात्रसेना, गृहरक्षक दले येथेही अशाच राष्ट्रीयतेचे संस्कार होत राहिले, तर येत्या दहा वर्षांत येणारी नवी पिढी जी स्वप्ने पाहील. ती फक्त भारताच्या उत्कर्षाची !

राष्ट्रीय संरक्षणाप्रमाणे राष्ट्रीय नियोजन हा राष्ट्रीय ऐक्याचा परिणामकारक बंध ठरेल. कोणत्याही प्रदेशाची आर्थिक समृद्धी भारतीय नियोजनाच्या यशावर

अवलंबून आहे, याची जाणीव सर्वत्र निर्माण झाली, तर राष्ट्रीय ऐक्याची ती पोषक शक्ती ठरेल. हा अखिल भारतीय नियोजनाचा दृष्टिकोन हे आपल्या प्रचाराचे सूत्र असले पाहिजे. राष्ट्राच्या विकासाप्रमाणे त्याची शिक्षणपद्धती हेही आपल्या ऐक्यभावना निर्माण करण्याचे एक माध्यम ठरण्याची शक्यता आहे. पाश्चात्त्य शिक्षणपद्धतीतून आलेल्या वैचारिक मंथनातून आधुनिक भारताची विचारधारा निर्माण झाली. जिला विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'वाघिणीचे दूध' म्हटले, त्याच्या पोषक द्रव्यातून नव्या जाणिवा आल्या. नव्या विश्वसंस्कृतीचे दर्शन भारताला झाले. आता भारतात अशीच शिक्षणपद्धती आली, तिने बालपणापासून भारतीय ऐक्याचे संस्कार केले, तर नवी पिढी राष्ट्रवादाचे बाळकडूच घेऊन वाढत जाईल. हिंदीचा आज जो आपण अवास्तव बाऊ करतो आहोत. तोही वाटणार नाही. थोडासा निर्धार, स्वाभिमान व काळजीपूर्वक केलेली आखणी यांच्या आधारे हिंदी या राष्ट्राची समर्थ भाषा होईल. राष्ट्रीय ऐक्याचे बोल ती बोलत राहील.

भारतीय वृत्तपत्रांचा या दृष्टीने उपयोग होण्यासारखा आहे. स्वातंत्र्य-लढ्यात वृत्तपत्रांनी केलेले कार्य सर्वश्रुत आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या या रचनात्मक कार्यात वृत्तपत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. अनिष्ट प्रवृत्तींचा प्रसार त्यांना टाळता येईल. प्रेस कौन्सिलसारख्या नव्या संस्थेने हे विधायक कार्य अंगावर घेतले, तर रोज कोट्यवधी लोकांपर्यंत एकात्मतेचा हा संदेश जाऊन पोहोचेल. दुष्प्रवृत्तींना आळा घालण्यास मदत होईल.

राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी काय करावयास हवे, यासंबंधी विचार करण्यासाठी १९६२ साली राष्ट्रीय एकात्मता परिषद भरली होती. अशी परिषद पुन्हा भरवावी, असा आमचा विचार आहे. मला वाटते, की अशा परिषदांमुळे पुन्हा एका समान व्यासपीठावर एकत्र येऊन, या देशाच्या भवितव्याची खुली चर्चा होते. सरकारला मार्गदर्शन होते. आज देशात निराशेचे वातावरण पसरले आहे. ते नाहीसे झाले पाहिजे. फुटीरपणाची हिंसात्मक चळवळींची हवा पसरली आहे. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याचा पायाच उखडला जाण्याची भीती आहे. अशा वेळी सर्व राजकीय नेत्यांनी एकत्र आले पाहिजे. राष्ट्राच्या आयुष्यात असे अनेक क्षण येतात की, ज्या वेळी राजकीय प्रतिष्ठा व पक्षहित यांना बाजूला काही निर्णय घेतले पाहिजेत. आज असाच एक निर्णायक क्षण आलेला आहे, असे मला वाटते.

# ५९... भारतीय राष्ट्रवादाला आव्हान

भारतीय राष्ट्रवाद हा आज संक्रमणकाळातून वाटचाल करीत आहे. आपल्या राष्ट्रवादाला अनेक प्रकारची गुंतागुंतीची आव्हाने या काळात येत आहेत. भारतीय राष्ट्रवादाचा धर्मनिरपेक्ष विचाराचा पाया गेल्या काही वर्षांत कच्चा होत आहे, की काय, अशी शंका किंवा भीती मनाला अस्वस्थ करू लागली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही या देशातील जातीय दंगे कमी झालेले तर नाहीतच, उलट, ते अधिक वाढत आहेत, असे आढळून येत आहे. प्रादेशिक निष्ठा भारतीय निष्ठेला छेदून जात आहेत, की काय, अशी शंका मनाला चाटून जाते. भाषिक अहंकार व्यापक अशा राष्ट्रनिष्ठेपेक्षाही अधिक प्रभावी किंवा बलशाली बनत आहे, अशी भीती मनात आल्यावाचून राहत नाही. गेल्या काही वर्षांत ही आव्हाने एकाच वेळी येत असल्याने भारतीय राष्ट्रवादासंबंधी सर्व देशभर नव्याने चिंतन सुरू झाले आहे. विचारवंतांच्या मनामध्ये भारतीय राष्ट्रवादाच्या भवितव्यासंबंधी चिंता, काळजी निर्माण झाली आहे.

भारतीय राष्ट्रवादाला पहिले आव्हान जे आहे, ते आमच्या धर्मनिरपेक्ष विचाराच्या संदर्भात आहे. गेल्या काही वर्षांत देशातल्या निरनिराळ्या भागात हिंदू-मुस्लिम, हिंदू-बौद्ध, बौद्ध-मुस्लिम यांच्यामध्ये जे दंगे झाले, त्यावरून येथील लोकशाहीचा धर्मनिरपेक्षतेचा पायाच दुबळा होत आहे, की काय, अशी शंका प्रदर्शित होऊ लागली आहे. धर्मनिरपेक्षता हा भारतीय लोकशाहीचा कणा आहे. हा कणा ज्या दिवशी दुबळा होईल, त्या दिवशी येथील लोकशाही आणि राष्ट्रवाद धोक्यात आल्यावाचून राहणार नाही, हे तर खरेच.

भारताच्या धर्मनिरपेक्षतेसंबंधी दोन-तीन गोष्टी प्रामुख्याने लक्षात ठेवल्या पाहिजेत. भारताची लोकशाही धर्मनिरपेक्ष आहे. याचा अर्थ ती सर्व धर्मांना विकासाची समान संधी देत आहे. स्वतःला नास्तिकवादी म्हणविणाऱ्या राष्ट्रातील धर्मनिरपेक्षता व भारताची धर्मनिरपेक्षता यांमध्ये मूलभूतच फरक आहे. त्यांची धर्मनिरपेक्षता नास्तिकवादावर, धर्मविरोधावर उभारलेली असते. उलट, येथे धर्मावर नितान्त श्रद्धा आहे. पंरतु सर्व धर्मांना विकासाची समान संधी द्यावी, सर्व धर्मांप्रत समभाव या अर्थाने आमची लोकशाही धर्मनिरपेक्ष

आहे. धर्मश्रद्धा ही सर्वच धर्मांना सामावून घेणारी असली पाहिजे, असा हा प्रयत्न आहे, खरे असे की, धर्म ही व्यक्तिगत बाब आहे. राज्यसंस्थेचे या व्यक्तिगत श्रद्धेशी काहीही कर्तव्य असण्याचे कारण नाही. महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे सार्वजनिक हिताची आणि भौतिक समृद्धीची कार्ये पार पाडणे ही राज्यसंस्थेची कामे आहेत. अध्यात्म व धर्मशास्त्र यांमध्ये राज्यसंस्थेने हस्तक्षेप करू नये, अशी त्यामध्ये तात्त्विक भूमिका आहे. शिवाय आम्ही आमचे स्वातंत्र्य जे मिळविले, ते या देशातील सर्व धर्मीयांनी, जाती-जमातींनी खांद्याला खांदा लावून, आत्मयज्ञ करून मिळविले आहे. या स्वातंत्र्यसंग्रामात सर्व धर्मीयांचे रक्त सांडले आहे. त्यामुळे या देशातील स्वातंत्र्यावर व लोकशाहीवर सर्वांनाच हक्क आहे. अशा या व्यापक भूमिकेवरून आम्ही धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्वीकारलेली आहे. मला वाटते, व्यावहारिक भूमिकेवरून तर त्याची आज भारताला अधिक गरज आहे.

भारताचा राष्ट्रवाद हा बळकट करावयाचा असेल, तर धर्मनिरपेक्ष विचारावरच तो उभा करावा लागेल. धर्माधिष्ठित राष्ट्रवाद हा या देशातील राष्ट्रवादाचे तुकडे करणारा विचार ठरेल. राज्यसंस्थेने एका धर्माचा आश्रय करून येथे चालणार नाही. कित्येक कोटी लोक येथे इतर धर्मांचेही राहत आहेत. या अनेक धर्मांच्या, अनेक जातींच्या, अनेक वंशांच्या समाजांमध्ये सर्वांना एकत्र बांधणारी मोठी शक्ती म्हणून धर्मनिरपेक्ष राज्याच्या विचाराचाच स्वीकार अपरिहार्य ठरतो आणि तसा तो करावा लागेल. म्हणूनच मी असे म्हणेन, की ज्या दिवशी आमचा हा विचाराचा पाया भुसभुशीत होईल, त्या दिवशी आमचा राष्ट्रवाद व लोकशाही धोक्यात येईल.

भारतीय राष्ट्रवादाचे दुसरे वैशिष्ट्य असे, की तो आपल्या राष्ट्राचा विचार आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात करीत असतो. उलट, या देशातील जे कोणी आक्रमक कडवे राष्ट्रवादी आहेत, ते राष्ट्रवादाचा हा आंतरराष्ट्रीय संदर्भ लक्षात घ्यावयासच तयार नाहीत. भारतीय राष्ट्रवाद हा एका दृष्टीने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा मागोवा घेत-घेत प्रगती करणारा राष्ट्रवाद आहे. एका दृष्टीने हा फरक एकोणिसाव्या शतकातील राष्ट्रवाद आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील राष्ट्रवाद यांमधीलच आहे. राष्ट्रवादाचे हे स्वरूप पहिल्या महायुद्धानंतर बदलण्यास प्रारंभ झाला व दुसऱ्या महायुद्धानंतर ते आणखीनच बदलले. ॲटम बॉंब, हैड्रोजन बॉंब यांच्या शोधामुळे तर राष्ट्रवादाचा विचार आता आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात करणे आवश्यक होऊन बसले

आहे. या काळात जगाचा विचार न करता फक्त आपलाच विचार करणारा राष्ट्रवाद हा प्रसंगी आत्मघातकी ठरण्याचाही संभव अधिक आणि त्यामुळेच भारतीय राष्ट्रवाद हा आक्रमक कडव्या राष्ट्रवादापेक्षा वेगळा असण्याची गरज वाटते.

राष्ट्रवादाचा विचार करताना एक तात्त्विक विचारही आपण नजरेआड करून चालणार नाही. मानवजातीचा प्रवास हा प्राथमिक अवस्थेतील लहान-लहान रानटी टोळ्यांकडून तो जगाच्या विशाल कुटुंबाकडे चालला आहे. प्रत्येक वेळी वरवरच्या पातळीवर मानवजातीचे एकत्रीकरण झाले आहे. मानवजातीच्या या प्रदीर्घ प्रवासातील एक टप्पा म्हणून राष्ट्रवादाचा उल्लेख करता येईल. मात्र राष्ट्रवाद हे मानवजातीच्या मुक्कामाचे ठिकाण नव्हे. त्याच्या प्रवासातील तो एक मैलाचा दगड आहे. याचाही विवेक आम्हांला सतत ठेवला पाहिजे. राष्ट्रवादाचा हा व्यापक आशय आम्हांला न्या. रानडे, गोखले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्या विचारसंपत्तीतून मिळाला आहे. रवींद्रनाथ टागोर यांनी तर शुद्ध मानवतावादी राष्ट्रवादाचाच पुरस्कार केलेला आढळतो.

तेव्हा भारतीय लोकशाही बलशाली करावयाची, तर तिच्या राष्ट्रवादाचा पाया जसा भक्कम केला पाहिजे, तसा राजकीय जीवनातील धर्मनिरपेक्षतेचा पायाही खंबीर केला पाहिजे. एका दृष्टीने आमची परंपरा ही धर्मनिरपेक्ष राज्याची परंपराच आहे. सम्राट अशोक, अकबर आणि छत्रपती शिवाजी हे आमच्या भारतीय परंपरेचे तीन उत्तम प्रतिनिधी मानले, तर त्यांनी त्यांच्या काळात राज्यसंस्था व धर्म यांची कधीही गल्लत होऊ दिलेली आढळत नाही. मात्र व्यक्तिगत जीवनात धर्मकारण आणि धर्मकल्पना यांना श्रेष्ठ स्थान देणारे असे हे तीन थोर पुरूष होऊन गेले. अगदी अलीकडच्या काळातही हीच परंपरा महात्मा गांधींनीही चालवली.

स्वतंत्र भारताने आपल्या राजकीय जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून या धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केल्यानंतर अलीकडे अशी टीका ऐकू येते, की सार्वजनिक समारंभाच्या वेळी काही धर्मकृत्ये, धर्मविधी केल्यास धर्मनिरपेक्षतेचा पाया खऱ्या अर्थाने रोखला जात नाही का? परंतु या टीकेबाबत एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, धर्मनिरपेक्षता म्हणजे निधर्मीपणा नव्हे. शिवाय देशातल्या ध्येयधोरणांवर किंवा कायद्यांवर जोपर्यंत कोणत्याही एका धर्मातील कल्पनांचा प्रभाव पडत नाही, तोपर्यंत त्या देशातील धर्मनिरपेक्षतेचा पाया कच्चा झाला, असे मला वाटत नाही. धर्मविधी, धर्मकृत्ये, धर्मसंस्कार

व देशातील कायदे यांमध्ये फरक हा केलाच पाहिजे, व्यक्तिगत जीवनातील श्रद्धा सामाजिक ध्येयधोरणांवर या कायद्यावर जोपर्यंत अंमल गाजवीत नाहीत, तोपर्यंत तक्रार करण्याचे काही कारण नाही, असे मला वाटते

भारतीय राष्ट्रवादामधील आजच्या घडीची आणखी एक समस्या ही प्रदेशाप्रदेशांमधील वादाच्या संदर्भातील होय. गेल्या काही वर्षांत या वादाने अनेक वेळा अनेक तऱ्हेने डोके वर काढले आहे. परंतु या वादामागेदेखील आपल्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाची जबरदस्त प्रेरणा आहे, हे विसरून चालणार नाही. प्रत्येक प्रदेशाला वाटते, की आपला आर्थिक विकास झपाट्याने व्हावा आणि यातूनच दोन राज्यांतील तणातणी निर्माण होत आहे. काही प्रमाणात हे स्वाभाविकही मानले पाहिजे. सर्वच विकसनशील राष्ट्रांतील संक्रमणकाळातील ही समस्या आहे. परंतु आर्थिक विकासाची ही प्रेरणा व्यक्त करताना लोकशाहीच्या संदर्भात आपण काही लक्ष्मणरेषा आखून घेतल्या पाहिजेत, असे मला जरूर वाटते. आपल्या आर्थिक विकासाच्या उत्कट इच्छेमुळे, भारतीय राष्ट्रवादाला तडा जाणार नाही, एवढा विवेक, संयम पाळलाच पाहिजे. हा विवेक जर पाळला, तर मग आपल्या प्रदेशाची झपाट्याने आर्थिक प्रगती व्हावी, ही प्रेरणा संकुचित म्हणता येणार नाही. प्रश्न आहे, तो संयमाचा, विवेकाचा, राष्ट्रनिष्ठेचा. तो संयम पाळला, तर या प्रवृत्तीतूनही आर्थिक विकास पूर्ण करून आपल्याला राष्ट्रवाद शाबूत ठेवता येईल.

जातिनिरपेक्ष, धर्मनिरपेक्ष असे सामाजिक ऐक्याचे नवे पर्व निर्माण करून समाजात समता, स्नेहभाव वाढविण्याचा, समाजपुरूष हा येथून तेथून एक आहे, ही भावना निर्माण करण्याचा भारतीय राष्ट्रवादाचा मूलतः प्रयत्न आहे.

धर्मभावनेतून निर्माण झालेल्या, धर्माने दिलेल्या विषमतेची निरपेक्षता राष्ट्रवादामध्ये अनुस्यूत आहे. हिंदू समाजापुढे यामुळे एक पुरोगामी विचार आला आहे. सामाजिक क्रांतीचा विचार सांगणारा पुरोगामी राष्ट्रवाद हेही या राष्ट्रवादाचे स्वरूप आहे. आपल्या लोकशाही राज्याची उभारणी ही स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूलभूत पायावरच झाली आहे. ही लोकशाही राज्यव्यवस्था सुरळीत चालावयाची, तर समाजाची तशी वृत्ती निर्माण होणे अगत्याचे ठरते. त्यातही ही वृत्ती समाजाच्या सर्व थरांत निर्माण होणे हे अधिक महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यसंपादनासाठी म्हणून समाज ध्येयाने धुंद बनला होता. राष्ट्रवादाच्या जोपासनेसाठी आताही खऱ्या अर्थाने तो धुंद बनून गेला पाहिजे. समाजांतर्गत जिव्हाळा, परस्पर सहानुभूती,

परस्परांसाठी करूणा, परस्परांसाठी पराक्रम ही सर्व स्तरांत निर्माण झाल्यानेच हे घडू शकेल.

हे घडावयाचे, तर यासाठी भारतीयांना आपली मते केवळ भूतकाळातील पराक्रमावर बांधून न ठेवता, ती उज्ज्वल भविष्यकाळासाठी उघडी ठेवावी लागतील. बहुसंख्य भारतीय नागरिक भूतकाळातच अधिक वावरतात. इतिहासातील वीरकथा, वीरगाथा राष्ट्रसेवेची स्फूर्ती जरूर देतात, परंतु नव्या युगातील लोकशाहीचे संगोपन होईल, अशासाठीही त्या वीरकथांचे संदर्भ वापरले पाहिजेत. आज गरज आहे, ती केवळ वीरश्रीचे पोवाडे गाण्याचे, ऐकण्याचे नव्हे - सर्जनशील कौशल्य दाखविण्याची. तरूण मन हे त्यासाठी धावले पाहिजे, पण आज येथे वाण आहे, ती नेमकी याचीच. नव्या कौशल्यांना तर कवटाळायचे आणि जुनी रूढिप्रियता सोडावयाची तर तयारी नाही, अशा संभ्रमी स्थितीत येथील सुशिक्षित म्हणविणारा वर्गच जखडून पडला आहे आणि त्यामुळे येथे अनेक विधायक कार्ये साकार होताना अडखळतात. विधायक कार्यक्रमांची सफलता हा तर स्वराज्याचा सिद्धांत आहे. पण केवळ लोकशाही सरकार अस्तित्वात येण्याने ही सफलता पदरी पडू शकत नाही. किंबहुना त्यातून अनेकविध समस्याच वर येतात. आज निर्माण झालेल्या समस्या यासुद्धा लोकशाहीची, राष्ट्रवादाची एक प्रक्रियाच म्हणावी लागेल.

देशात आज विकासाची भूक वाढली आहे. पण त्याचबरोबर या विकासासाठी वेगळेपणाची भावनाही वाढत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भावनात्मक एकतेची उणीव पावलोपावली भासावी, असा स्वतंत्र भारताच्या जीवनातील एक संक्रमणकाळ आहे. सरकार किती सबल आहे, याहीपेक्षा समाजमनाची दुर्बलता भयानक बेचैनी निर्माण करणारी आहे. कोणत्याही उपक्रमशीलतेसाठी सरकारवर विसंबण्याची, सकारण व अकारण सरकारला दोषी ठरविण्याची वृत्ती वाढली आहे. लोककल्याणाची भाषा उच्चारत असताना पक्षोपक्षांत लोकशाहीबाबत बेपर्वाईची वृत्ती जोम धरून उठत आहेत. लोकशाहीच्या नावाखाली व्यक्तिस्वातंत्र्याचा विपरीत अर्थ लावला जात आहे. ही स्थिती चिंताजनक आहे; आणि म्हणून येथे 'राष्ट्रवाद' आहे, असे म्हणत असतानाही येथे खरेखुरे 'ऐक्य' आहे, असे गृहीत धरता येत नाही. देशाला या चिंतेतून, या संक्रमणकालातून बाहेर काढावयाचे आहे. मला वाटते, की राष्ट्रवादी अशी सर्व शक्ती आणि समाज एकवटल्याने, एकरस झाल्यानेच हे घडेल. भारताचा राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष राहिला, तरच तो 'राष्ट्रवाद' म्हणून राहील; एरवी त्याला प्रांतवादाचे, जातीयवादाचे किळसवाणे स्वरूप प्राप्त होईल.

# ६०... आजच्या राजकारणातील माझी भूमिका

हिंदुस्थानची सर्वांगीण बांधणी करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध असलेल्या काँग्रेस पक्षाचे सध्याचे स्वरूप हे निश्चित धोरण आणि निश्चित कार्यक्रम स्वीकारलेला, अखिल भारतीय असा एकसंध पक्ष असे बनलेले आहे. संसदेत आणि बाहेर काँग्रेस पक्ष आज विरोधी पक्षाची भूमिका बजावीत आहे.

स्वातंत्र्यसंपादनानंतर, धोरणाची आणि कार्यक्रमाची दिशा निश्चित करून, काँग्रेसने गेली तीस वर्षे राज्यकारभार केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रेरणा आणि अनुभव यांतून पक्षाची धोरणे आणि दिशा निश्चित झालेल्या आहेत. जनतेच्या संदर्भात काँग्रेस पक्षाची काही वचनबद्धता आहे. संसदेत हा पक्ष आज विरोधी पक्ष म्हणून काम करीत असला, तरी धोरणे आणि कार्यक्रमाची दिशा यांपासून तो मुळीच विचलित झालेला नाही. होऊ शकणार नाही.

स्वातंत्र्य-लढ्याच्या काळात काँग्रेस ही जनतेची प्रतीक होती. कार्यक्रमाच्या दृष्टीने नंतरच्या काळातही बव्हंशी हीच भूमिका टिकून राहिली. कार्यक्रमावर आधारलेल्या कार्यामुळे गेली पन्नास-पाऊणशे वर्षे, एकजीव, प्रवाहित पक्ष असे या पक्षाचे स्वरूप बनलेले आहे. या पक्षाच्या पिढ्यांमागून पिढ्यांचा जो इतिहास आहे, त्यामध्ये प्रत्येक पिढीनंतर नवा विचार उदयाला येत राहिलेला असून, विचाराचा नवा धागा पकडून पक्षाने देशाला नवा कार्यक्रम दिला आहे. माणसांची मने उज्ज्वल भवितव्याकडे खेचण्याचे कार्यच या पक्षाने केले आणि त्याच्या जोडीला धोरणांचा आणि कार्यक्रमाचा पक्का पाया तयार केला.

विरोधी पक्ष म्हणूनही काँग्रेसला जिद्दीने, आत्मविश्वासाने हेच ऐतिहासिक कार्य करावयाचे आहे. याच भूमिकेतून संसदेत हा पक्ष कार्य करीत आहे. माझी मूलभूत धारणा अशी आहे की, धोरणाच्या आणि कार्यक्रमाच्या निश्चित दिशा असलेल्या काँग्रेस पक्षाने संसदेत आणि संसदेच्या बाहेरही विधायक 'पर्यायी पक्ष' म्हणून काम केले पाहिजे. जिद्दीने, आत्मविश्वासाने आणि लोकशाहीला शोभायमान ठरणाऱ्या प्रतिष्ठेने हे काम करावयाचे आहे.

'पर्यायी पक्ष' म्हणून काँग्रेसची लोकमानसात प्रतिमा तयार व्हावयाची, तर पक्षाची एकजीव संघटना भक्कम करणे, लोकशाहीची प्रतिष्ठा व शक्ती वाढेल, अशा विचारानुरूप प्रत्यक्ष कृती करणे आणि त्यासाठी येणाऱ्या सर्व अडचणी ओलांडून डोळ्यांसमोर फक्त सामान्य माणूस आणि त्याचे हित व राष्ट्राचे भवितव्य एवढीच उद्दिष्टे ठेवून प्राणपणाने कार्य करीत राहणे हेच विरोधी पक्ष म्हणून, काँग्रेसचे कार्य राहील. देशहित, सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करणे, परराष्ट्रीय धोरणात अलिप्ततेचा अवलंब करणे आणि देशांतर्गत स्वयंपूर्णता प्रस्थापित करणे अशा कोणत्याही कसोटीवर काँग्रेस पक्ष हा 'पर्यायी पक्ष' बनू शकतो, हे मान्य करावे लागेल. योग्य क्षण येताच स्वतः सरकार बनविणे आणि आपल्या धोरणाची मांडणी त्या पद्धतीने करणे हे काम विरोधी पक्षाला करावेच लागते. संसदीय प्रथांची प्रतिष्ठा ठेवून, पण काहीशा आक्रमक पद्धतीनेच हे काम पक्षाला करावे लागणार आहे.

पर्यायी भूमिका यथायोग्य रीतीने पार पाडावयाची, तर त्यासाठी विरोधी पक्षाजवळ संसद, राज्यकारभार, प्रशासन, इत्यादी विषयांवर अभ्यासपूर्ण आणि नेमकेपणाने विचारांची मांडणी करू शकतील, असे विशेष प्रवक्ते असावे लागतात. ब्रिटनमध्ये असे विशेष प्रवक्ते नियुक्त करण्याची त्यांची नवी पण परिणामकारक प्रथा आहे. भारताचा विचार करताना अलीकडील काळात या देशातील प्रश्नांची गती आणि गुंतागुंत वाढलेली असल्याचे आढळते. यांतील काही प्रश्न स्वतंत्रपणे हाताळावे लागणार असून, त्यासाठी म्हणून केवळ अभ्यास् प्रवक्ते तयार करावे लागतील. पर्यायी पक्षाचे कॅबिनेट तयार व्हावयाचे, तर असा अभ्यासू प्रवक्त्यांमधूनच ते आकाराला येऊ शकते.

देशांतर्गत प्रश्न सोडविण्याची ताकद या पक्षामध्ये आजही शाबूत आहे. हे प्रश्न सुटण्यासाठी काँग्रेसने आजवर जी धोरणात्मक वाटचाल केली, तीतून ही ताकद पक्षाला मिळालेली आहे. या ताकदीचा वापर पुढच्या काळात करीत राहून, लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे आणि त्यासाठी जनतेशी असलेला जागता व जिव्हाळ्याचा संपर्क कायम ठेवणे, वाढवीत राहणे, यालाच मी काँग्रेसचा कार्यक्रम म्हणेन.

देशासमोर महत्त्वाचे, मूलभूत असे प्रश्न आर्थिक आणि सामाजिक असे आहेत. वर्षानुवर्ष या प्रश्नांशी काँग्रेस झुंज घेत आहे आणि यापुढेही घ्यावी लागणार आहे. आर्थिक प्रश्नांच्या संदर्भात देशाच्या धोरणात अग्रक्रम दिला गेला, तो आर्थिक रचनेत, उत्पादन-पद्धतीत क्षमता वाढवून बहुसंख्य लोकांना

रोजगार मिळण्याची व त्यांच्या किमान गरजा भागविण्याची व्यवस्था करणे याला आहे. आर्थिक क्षेत्र, तंत्रज्ञानाचे क्षेत्र, उद्योग, शेती, आधुनिक विज्ञान, शिक्षण अशी जी महत्त्वाची क्षेत्रे आहेत, त्यांमध्ये कोणत्याही कारणासाठी परावलंबन राहणार नाही आणि त्याचबरोबर देशाच्या ज्या गरजा आहेत, त्या पूर्ण करून प्रगतीसाठी आवश्यक असणारी शक्ती आपण निर्माण करू शकतो, याचे प्रत्यंतर काँग्रेस पक्षाच्या गेल्या तीस वर्षांतील धोरणात्मक निर्णयाने आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीने आणून दिले आहे. देशांतर्गत प्रश्न सोडविण्याची ताकद काँग्रेस पक्षात आहे, अशी खात्री मी त्यामुळेच व्यक्त करू शकतो.

मूलभूत विचार असा आहे की, ज्या राष्ट्राजवळ आधुनिक तंत्रज्ञानाची भरभक्कम सामग्री असते, तेच राष्ट्र जगात श्रेष्ठ ठरते. बदलत्या गतिमान दुनियेत ज्या राष्ट्राने ही तंत्रज्ञानाची अमोघ शक्ती संपादन करण्याचे, वाढविण्याचे सामर्थ्य संपादन केलेले असेल, तेच राष्ट्र, तो देश, संरक्षणदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर राहतो. ही आत्मनिर्भरता निर्माण होण्यासाठी सरकारला तसे धोरण ठरवावे लागते. कार्यक्रमाची दिशा निश्चित करावी लागते. जनता पक्षाच्या सरकारवरची टीका या संदर्भात ही आहे की, या सरकारला काही दिशाच नाही.

आर्थिक रचनेप्रमाणेच, सामाजिक रचनेचा प्रश्नही माझ्या दृष्टीने तितकाच, किंबहुना, अधिक महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक कालापासूनचा मागोवा घेतला, तरी दिसते, ते असे, की सामाजिक विषमता ही रोमरंध्रांत भिनलेली आहे. या सामाजिक विषमतेचे खरे कारण आर्थिक विषमता हे आहे. या दोन्हींची सरमिसळ इतकी झाली आहे की, आर्थिकदृष्ट्या वरचढ असणारा हा पुढे - पुढे सामाजिक अर्थानेही वरचढ ठरत राहिला आहे. शतकानुशतक येथे हे असेच सुरू आहे. हा उच्च, हा कनिष्ठ, हा पहाडात राहणारा हा समुद्रकाठी राहणारा, हा, म्हणे, मैदानात राहणारा, एक स्पृश्य, तर दुसरा, म्हणे, अस्पृश्य असे फरक इतिहासाच्या सर्वत्र कालखंडांत पाहावयास मिळतात. कोण, कुठे, कसा राहतो, यावरूनच त्याची सामाजिक प्रतिष्ठा जोखावयाची, ही परंपरागत पद्धती, सामाजिकदृष्टया समाज एकजिनसी असल्याचे चित्रच उपलब्ध नाही.

सामाजिक समतेचे अपेक्षित चित्र त्यासाठी कायदे करून निर्माण करता येईल का? मला वाटते, कायदा यासाठी फार तर साहाय्यभूत ठरेल. सामाजिक एकजिनसीपणाचे चित्र खऱ्या अर्थाने निर्माण करावयाचे, ते माणसांनी आपल्या

कृतीने, विचारानेच निर्माण केले पाहिजे. सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत सारख्याच निष्ठेने प्रतिज्ञापूर्वक प्रयत्न केले, तरच हे होणार आहे.

काँग्रेस कार्यकर्त्यांना हाच एक कार्यक्रम आता स्वीकारावा लागेल. कारण हरिजनांना आता पुन्हा वेठबिगार म्हणून बांधले जात आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी हरिजनांना जमिनीचे वाटप केले, परंतु जमिनी ताब्यात आल्यावर त्या जमिनींचे संरक्षण करणे त्यांना अशक्य होऊ लागले आहे. बेघराला घर दिले, भूमिहीनांना, दलितांना, हरिजनांना जमीन दिली, तरी घराचे आणि जमिनीचे रक्षण करण्यासाठी त्यांना कसलेही साधन नाही, कुणाचे सहकार्य नाही. हरिजन व गरीब शेतकरी याला जीवन जगता येणार नाही, जिवंत राहता येणार नाही, असे वातावरण वरिष्ठ वर्ग म्हणविणारे तयार करीत आहेत. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये तर या वरिष्ठवर्गाच्या विरोधाचा कडेलोट होत आहे. अन्न, पाणी आणि हवा या माणसाच्या कमीतकमी गरजा. यांपैकी गरिबांना, हरिजनांना जमिनीवरून हुसकावून लावून अन्नापासून त्यांना वंचित केले जात आहे. पाणी हे तर निसर्गाने दिलेले साधन. परंतु माणसांत, जाती-जातींत फरक करून हरिजनांना पिण्याच्या पाण्यापासून दूर ढकलले जात आहे. माणूस म्हणून जगण्याचे पाणी हे एक साधन; परंतु त्याचे वाटप करताना माणसा-माणसांत, जाती-जातींत फरक केला जात आहे. निसर्गाची कृपा की, त्याने हवा मोकळी ठेवली! हवेची सुद्धा मर्यादित पुरवठ्याची व्यवस्था राहती, तर हरिजनांना जगणेच कठीण होते !

लोक मला विचारतात, काँग्रेससाठी नवा कार्यक्रम काय ? माझे त्याला उत्तर आहे की, गरिबांवर, मग ते शेतकरी असो वा शेतमजूर असो, हरिजन असो किंवा आदिवासी असो, यांपैकी कोणावरही अन्याय होऊ नये, यासाठी तरूणांनी, कार्यकर्त्यांनी कंबर बांधून उभे राहिले पाहिजे. गरिबांची संघटना उभी करून, गरिबांचे, दलितांचे प्रश्न हाती घेऊन, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांविरूद्ध उभा राहिलेला पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष असे प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले पाहिजे. हे सिद्ध करावयाचे, तर गरिबांचे शोषण करणारे जे असतील, त्यांना जाब विचारणारे कोणी नाहीत, असे चित्र दिसू देता उपयोगी नाही. कार्यकर्त्यांनी याची जाण ठेवली पाहिजे की, शोषकांच्या मागे, जातीची, पैशाची, परंपरेची शक्ती उभी असते. त्याच्या बळावरच तो जमिनदार शोषक गरिबाला, हरिजनाला जमिनीवरून दूर ढकलण्यास सिद्ध असतो. अशा वेळी कार्यकर्त्यांनी संघटनेची, काँग्रेसची शक्ती गरिबांच्या, दलितांच्या पाठीशी उभी

करावयास हवी.

गरिबांच्या पाठीशी शक्ती उभी करावयाची, ती त्यांचे शोषण होऊ नये, यासाठी तर खरेच, परंतु त्याचबरोबर आर्थिक विषमता हे या सर्व अन्यायांचे मूळ आहे, हे लक्षात घेऊन विषमतेचे ते मूळ छाटण्याचा प्रयत्न काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. विषमतेचे मूळ छाटावयाचे, याचा अर्थ, विकासाच्या नवनवीन कार्यक्रमांत गरिबांना, दलितांना सहभाग दिला जाईल, यासाठी धोरणात्मक जपणूक करावयास हवी. म्हणजे असे की, विकासाकरिता नवीन कार्यक्रम हाती घेतला जाईल, त्यासाठी नवीन संस्था निर्माण होतील. अशा वेळी गरीब व मागासलेल्या वर्गांच्या प्रश्नांना प्राथम्य द्यावे लागेल. सहकारी चळवळीवर तर त्याची विशेष जबाबदारी आहे. छोट्या जमातींच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन, विधायक दृष्टिकोनातून सहकारी चळवळीने त्यांचे प्रश्न हाताळले पाहिजेत. गावात नवी संस्था सुरू होत असली, किंवा गावातील जुन्या संस्थेचे कार्यक्षेत्र वाढविण्याची संधी प्राप्त झाली असेल किंवा विकासाच्या प्रगतीतून रोजगाराची नवी संधी सुरू होत असेल, तर अशा वेळी रोजगाराची संधी उपलब्ध करून देताना एक पथ्य जरूर पाळले गेले पाहिजे की, त्या गावातील ज्या घरात मिळवता कोणी नसेल, अशा घरातील तरूणाला अग्रक्रमाने ही संधी दिली जाईल. जागरूकपणे याकडे लक्ष ठेवले पाहिजे. अशी संधी देत असताना जात-पोटजात, रक्ताचे नाते, असा विचार चुकून सुद्धा करता कामा नये. ग्रामीण भागात किंवा नागरी विभागात काय, गरिबी ही अमुकच एक जातीपुरती मर्यादित नाही. या देशातील साठ टक्के जनता दारिद्रय-रेषेखाली आहे, अशी आकडेवारी जेव्हा आपण उद्धृत करतो, त्याचा अर्थच हा की, गरिबीला जात-पोटजात-धर्म-पंथ असे काही नसते.

अन्यायाविरूध्द उभे राहण्याची शिकवण लो. टिळक व म. गांधींनी काँग्रेसला आणि कार्यकर्त्यांना दिली, याचे कारण अन्याय हा गरिबांविरूद्ध, मागासलेल्यांच्या विरूद्धच होत असतो, हे त्यांनी देशात आणि परदेशांतही पाहिले होते, अनुभवले होते. म्हणूनच ते लहानमोठ्या अन्यायांविरूद्ध सातत्याने उभे राहिले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी या शिकवणुकीची कसोशीने पाळणूक केली पाहिजे. समाजाला एकजिनसी बनवावयाचे, तर कार्यकर्त्यांनी व्रत म्हणून हे स्वीकारणे अत्यावश्यक आहे. आपल्या गावापासूनच कार्यकर्त्यांनी याचा प्रारंभ करावा. गावातले कोणते घर, कोणते कुटुंब दारिद्र्याच्या पेचात सापडले आहे, कोणत्या घरातले हात मिळवते नाहीत, याची माहिती, त्या गावातल्या

कायकर्त्यांना असलीच पाहिजे. तरच गावात नव्याने उदयास येणाऱ्या संस्थेत कोणाला आग्रक्रमाने सामावून घ्यावयाचे, याचा आग्रह ते धरू शकतील.

सामाजिक, आर्थिक संधी ज्या उपलब्ध होत आहेत, त्यांचे रक्षण करणे, त्या वाढविणे, गरीब शेतकऱ्यांना, शेतमुजरांना, हरिजनांना रोजगार मिळवून देणे, जाती-पोटजातीची प्रतिबिंबे कामात पडू न देणे, 'एक गाव, एक पाणवठा' यासारखे प्रतीकात्मक कार्यक्रम प्रामाणिकपणे राबविणे, गावागावांतून त्याची कसोटी लागते, की नाही, हे पाहणे, आणि जेणेकरून समाज एकजिनसी बनेल, आर्थिक विषमता दूर होईल, हाच स्वतंत्र भारतासमोरचा प्रमुख कार्यक्रम आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर गेल्या तीस वर्षांत काँग्रेसने याच कार्यक्रमाचा पाठपुरावा केला. देशात निर्माण झालेल्या नव्या परिस्थितीत तर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हा एक नवा कार्यक्रम म्हणून जिद्दीने, आत्मविश्वासाने, कसोशीने त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावयाची आहे. गावागावांत ज्यांच्या शब्दाला वजन आहे, प्रतिष्ठा आहे, असा कार्यक्रम राबविण्याची ज्यांच्याजवळ साधनांची अनुकूलता आहे, किमानपक्षी हा कार्यक्रम राबविण्याची ज्यांची इच्छा आहे, त्या सर्वांनी हे काम अग्रक्रमाने हाती घेणे उचित ठरेल. काँग्रेससाठी कार्यक्रम काय, अशी विचारणा करणाऱ्यांना माझे हे आवाहन आहे.

काँग्रेससमोर, देशांतर्गत नव्या परिस्थितीने उभे केलेले आणखी एक महत्त्वाचे कार्य आहे, ते विशिष्ट विचाराने बांधलेल्या कार्यकर्त्यांची फळी उभी करणे हे होय. एका विचाराने बांधलेले कार्यकर्ते असल्याशिवाय पक्ष बनत नाही, हे खरे, परंतु राजकीय पक्ष हा जेव्हा जन-आंदोलनाच्या स्वरूपाचा, लोकांचा पक्ष बनतो (मास पार्टी), त्या वेळी एकाच विचाराने बांधलेल्या कार्यकर्त्यांचा पक्ष म्हणून त्याचे स्वरूप मर्यादित करणे अवघड ठरते, तसे ते आवश्यकही नसते. कारण सर्वच कार्यकर्ते समान अनुभवाचे राहतील, याची शाश्वती नसते.

'मास-पार्टी' आंदोलनाच्या रूपाने काम करीत असते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेस पक्ष आंदोलनाच्या रूपाने कार्य करीत राहिला. सर्व समाजाचे प्रश्न हाती घेऊन या पक्षाला काय करावयाचे असल्याने, काँग्रेस पक्ष हा बांधीव पक्ष बनू शकला नाही. पक्षाचे व्यापक स्वरूप हे त्याचे एक कारण आहे. कम्युनिस्टांप्रमाणे किंवा रा. स्व. संघासारखी या पक्षाला आपली बांधणी करणेही परवडले नाही. आवश्यक वाटले नाही.

लोकशाही खऱ्या अर्थाने शक्तिशाली करावयाची, तर लष्करबंद, झापडबंद कार्यकर्त्यांच्या टोळ्या बनवून चालणार नाही 'केडर-पार्टी' ही झापडबंद होण्याची शक्यता असते. विचार करण्याचे यंत्र बंद करून, कान व हात मोकळे ठेवावयाचे आणि फक्त 'आज्ञा' पाळावयाच्या, आज्ञा अमलात आणीत राहावयाचे, एवढेच 'केडर-पार्टी' करू शकते.

काँग्रेस पक्ष अशा स्वरूपाचा असावा काय? माझे उत्तर असे, की एका विचाराने बांधलेले कार्यकर्ते पक्षाच्या संग्रही असलेच पाहिजेत. परंतु एका विचाराने म्हणजे काय? तो विचार कोणता? माझ्या मते, तो विचार हाच असला पाहिजे की, सामाजिक, आर्थिक नव्या उभारणीचे जे काम करावयाचे आहे, त्यामध्ये सामाजिक, आर्थिक न्यायावर अव्यभिचारी निष्ठा आणि दारिद्र्याविरूद्ध, अन्यायाविरूद्ध, विषमतेविरूद्ध पोटतिडीक हे दोन महत्त्वाचे गुण ज्या कार्यकर्त्याच्या ठिकाणी आहेत, तो पहिल्या प्रतीचा कार्यकर्ता होऊ शकेल. विचाराच्या या दोन बाजू पक्क्या व्हाव्यात, यासाठी जरूर 'केडर' निर्माण करावे. त्यासाठी कार्यकर्त्यांना आवश्यक ते शिक्षण द्यावे. पूर्वीच्या काळात या विचाराने बांधलेले कार्यकर्ते तयार करण्याची, प्रशिक्षित कार्यकर्ते घडविण्याची प्रक्रिया अवलंबिली जात असे.

परंतु भारतासमोरील प्रश्नांचे स्वरूप आता वेगाने बदलत आहे. १९६० मध्ये तयार झालेला कार्यकर्ता १९७० मध्ये, १९७७ मध्ये निकामी ठरेल, की काय, अशी ही स्थिती. सारेच झपाट्याने बदलत आहे. सार्वजनिक कामाची सुरूवात मी केली, ती त्या काळात कार्यकर्त्यांची बांधणी करण्याचा मनस्वी छंद होता, म्हणून ते काम केले. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेच्या राजकारणात आल्यानंतर, सत्तेच्या मदतीने कार्यकर्त्यांच्या फळ्या निर्माण केल्याचा आरोप माझ्याविरूद्ध करण्यासाठी जे सरसावतात, त्यांना याची जाणीव नसावी की, काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणूनच मी सत्तेत वावरतो, वागलो आणि कार्यकर्त्यांची बांधणी करण्याचे प्रारंभापासून स्वीकारलेले कामच करीत राहिलो. महाराष्ट्रात अगदी प्रारंभी, मी स्वतः सत्तेत नसताना आणि नंतर सत्तेत असताना, कार्यकर्त्यांच्या बांधणीच्या कामाचा ध्यास मी नित्य ठेवला आहे.

महाराष्ट्रासंबंधी लोक मला विचारतात, त्या वेळी मी त्यांना हेच सांगत आलो आहे की, महाराष्ट्र काँग्रेसची शक्ती ही तेथील असंख्य कार्यकर्त्यांची शक्ती आहे. हे कार्यकर्ते चळवळीत वाढले. शेकडो गावांतून ते विखुरले आहेत. काँग्रेसबरोबर ते सातत्याने उभे राहिले आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेस

पक्षाने सरकारमार्फत व इतरही क्षेत्रांत, पुढाकार घेऊन नागरी व ग्रामीण जीवनांत नवीन आशा, उत्साह निर्माण केला. समाजातल्या सर्व वर्गांतले, जाती-जमातींचे, सर्व धर्मांतील लोक त्यात आहेत. शेतकरी आहेत, कामगार आहेत, मध्यमवर्गीय आहेत. खेड्यांतील आहेत आणि शहरांतले आहेत. सदा सर्वकाळ जागरूक न राहिल्याने कामात काही अपुरेपणा निर्माण झाला असेलही, परंतु या सर्वांतून निर्माण झालेली शक्ती ही महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये संमीलित झाली आहे. ही शक्ती आणखी वाढवावी लागणार आहे. त्याची गरज आहे.

गरज अशासाठी आहे की, देशातील प्रमुख सत्तेचे, कारभाराचे तारू दिशाहीन असलेल्यांच्या हाती गेले आहे. लोकांची गाऱ्हाणी वाढत आहेत. गरीब, हरिजन, शेतकरी, कामगार, मजूर अस्वस्थ आहेत. या सर्वांना दिलासा देण्याचे आणि त्यांची गाऱ्हाणी ही आपली स्वतःची गाऱ्हाणी समजून उभे राहण्याचे काम करावे लागणार आहे. लोकांच्या दैनंदिन गाऱ्हाण्यांनुसार कामगारांत, मजुरांत, शेतकऱ्यांत, आदिवासींत प्रत्यक्ष जाऊन कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना काम करावे लागेल. त्यासाठी कामाची शिस्त सांभाळून कार्यक्रमाची मांडणी केली पाहिजे. अशिक्षितांच्या रोजगारीचा प्रश्न आहे, तसा सुशिक्षितांच्या रोजगारीचा प्रश्न तितकाच तीव्र असल्याने त्यासाठी वेगवेगळे काम सातत्याने करावे लागेल. जसा काळ जाईल, तसे हे प्रश्न अधिक सूक्ष्म बनतील. त्यामुळे कॉंग्रेस कार्यकर्त्याने आपल्या वागण्यात आणि बोलण्यात टोकदारपणा आणण्याची गरज आहे. विचारांचे वेगवेगळे संस्कार माणसावर होत राहतात. परंतु कार्यकर्त्याने पक्षासाठी एकदा दिलेल्या निष्ठा त्या विचाराधिष्ठित असतील, तर विचलित होऊ द्यावयाच्या नसतात. राजकीय बदलत्या परिस्थितीमुळे वैचारिक संघर्ष व वादळे अधूनमधून उठतात. त्यांपासून काही शिकावेही लागते. पण त्यांच्या दडपणाखाली मी स्वतः माझ्या पक्षावरील निष्ठांपासून कधी ढळलो नाही. कॉंग्रेस पक्षातच आहे आणि अखेरपर्यंत असेन. माझी ती उमेद आजही अभंग आहे.

देशातील नव्या परिस्थितीच्या संदर्भात कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी निश्चित कार्यक्रमाचे बोट धरून ठामपणे उभे राहावे, असे मी सुस्पष्टपणे सांगतो आणि त्याच वेळी त्याची कारणमीमांसा करताना आजच्या सत्ताधाऱ्यांच्या उणिवांचा परखडपणे समाचार घेतो, तेव्हा या आक्रमकतेचा, स्वतःला विचारवंत मानणारेही चुकीचा अर्थ लावून लोकांची मने कलुषित बनविण्याच्या प्रयत्नात

असतात, याची मला जाणीव आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याखेरीज मी काय करणार! जनता पक्षासारख्या एका दिशाहीन असलेल्या पक्षाविरूद्ध जनतेला जागे करणे, या देशाचे तारू जनता पक्षाच्या हातांत राहणे कसे धोक्याचे आहे, याची कारणमीमांसा मांडणे यात चूक काय? मी आक्रमक भूमिका स्वीकारतो, याचा अर्थ जनता पक्षाच्या उणिवा, स्पष्टपणे, कोणाचा मुलाहिजा न ठेवता बोलून दाखवतो. परंतु माझ्या या कृतीचा राजकीय पातळीवरून प्रतिवाद करण्याचे टाळून, ज्यांच्या मनांत माझ्याविषयी पूर्वग्रह आहेत, लिहिण्या-बोलण्यांत विकृतता आहे, त्यांनी माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ लावला, तर त्यांची कीव न करावी, तर काय!

या संदर्भात काँग्रेस पक्ष आणि जनता पक्ष यांचे स्वरूप पुन्हा एकदा समजून घेण्याची गरज आहे, असे मला वाटते.

काँग्रेस पक्षाचे स्वरूप हे राष्ट्रीय आंदोलनाच्या चळवळीचे स्वरूप राहिलेले आहे. राष्ट्रीय चळवळीत सर्वच समाज सामील होता, हे त्याचे कारण आहे. या पक्षाचा जो कार्यक्रम आहे, संघटनेची आजची रचना आहे, वस्तुस्थिती आहे, ती पहिल्यावर काँग्रेस पक्षाला राष्ट्रीय पक्ष संबोधणेच सयुक्तिक ठरते.

काँग्रेस पक्षाला कोणी बहुजन समाजाचा पक्ष म्हणूनही संबोधतात. 'बहुजन' हा शब्द मी 'मासेस्' या अर्थाने वापरतो. बहुसंख्य समाज म्हणजे अमुक एका जातीचा समाज, असा त्याचा अर्थ नव्हे. परंतु महाराष्ट्रासारख्या प्रांतात बहुजनसमाज या शब्दाला एक विशिष्ट, मर्यादित अर्थ प्राप्त करून दिला गेला आहे. काही विचारवंतांना या शब्दांतून तसा मर्यादित अर्थ काढण्याची खोड आहे, एवढेच फार तर त्या संदर्भात मी म्हणू शकेन. परंतु मी स्वतः तरी 'बहुजन' शब्दाचा अर्थ 'मासेस्' असाच केला आहे आणि आजही तोच अर्थ कायम आहे.

एखाद्या पक्षाला बहुजनसमाजाचा पक्ष म्हणून राहावयाचे असेल, तर त्या पक्षाला, राष्ट्रीय आंदोलनाचे स्वरूप द्यावे लागेल. भारतात काँग्रेस पक्षाला राष्ट्रीय आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे, याचे कारण बहुसंख्य समाजाला लागू असलेले दारिद्र्याचे, सामाजिक सांस्कृतिक उत्थापनाचे जे प्रश्न आहेत, ते आणि असे कितीतरी प्रश्न काँग्रेस पक्ष आजवर स्वतःचे म्हणून हाताळीत राहिला आहे. दलित समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे कार्यक्रमच या पक्षाने आजवर स्वीकारले. बहुजनसमाजाचा पक्ष म्हणून राहायचे असेल, तर हेच कार्यक्रम पक्षाच्या कार्यकर्त्यांना द्यावे लागतील, हे उघड आहे.

बहुजनसमाजातील दारिद्र्याचा प्रश्न पाहा. हा प्रश्न ग्रामीण भागात आहे, तसा नागरी भागातही आहे. नागरी भागात तर श्रीमंत आणि गरीब यांच्यांतील दरी स्पष्टपणे जाणवत असल्यामुळे नागरी भागातील दारिद्र्याचा प्रश्न अधिक बोचक ठरतो. ग्रामीण भाग असो, तेथील बहुजनसमाजाचे आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्पृश्य-अस्पृश्य यांसारखे प्रश्न सोडवावयाचे, तर ते एक राष्ट्रीय आंदोलन म्हणूनच पक्षाने त्याचा स्वीकार केला पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांचा आजही हा एक कार्यक्रम होऊ शकतो, समाज हा कोणत्याही जाती-जमातीचा असो, त्या ठिकाणी दारिद्र्य हे असतेच असते. महाराष्ट्रात तर सामाजिक दृष्ट्या स्वतःला जे वरच्या थरातील समजतात, त्यांच्यांतही दारिद्र्य आहे आणि इतर समाजातही आहे, याचा अर्थ दारिद्र्याचा प्रश्न हा बहुसंख्य समाजाचा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाने दारिद्र्याच्या या प्रश्नांशी मुकाबला करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले, त्यामुळेच तो बहुजनसमाजाचा पक्ष बनला आहे.

जनता पक्षाचा विचार करताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते, की मूलतः शक्तीच्या हिशेबाने, हिंदी प्रांतापुरत्या एक विभागीय पक्षासारखे त्याचे स्वरूप दिसते. ग्रामीण भागापर्यंत या पक्षाची मुळे खरी रूजलेली नाहीत. जनता पक्षाची कमजोरी ही त्यांची पक्ष बनण्याची जी अभावात्मक कारणे आहेत, त्यांत सामावलेली आहे, काँग्रेस पक्षाला विरोध करण्यासाठी सात्त्विक रागाची जी मनोभूमिका तयार झाली, तीवर ज्यांचा कार्यक्रम एक नाही, अशांनी एकत्र येऊन काही प्रांतांच्या जोरावर निवडणूक जिंकली व मग सरकार बनविले, हीच खरी जनता पक्षाची कमजोरी आहे.

निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेस-विरोध, सात्त्विक राग जनता पक्षाला उपयोगी पडला. परंतु सरकार चालवावयाचे, तर धोरण हवे, निश्चित कार्यक्रमाची दिशा हवी. केंद्रीय शासनात त्या दृष्टीने अजून तरी ना सरकार, ना पक्ष अशी 'नॉन-गर्व्हमेंट','नॉन-पार्टी' स्थिती आहे. जनता सरकारचा काही ठोस कार्यक्रम आहे, अशी भावना लोकांच्या मनांतही नाही. त्यामुळे सर्वत्र चलबिचल आहे. जनता पक्षाबद्दल एकूणच भ्रमनिरास वेगाने व्हायला लागला आहे. जो लहान समाज आहे, गरीब समाज आहे, हरिजन समाज आहे, त्यांच्यांत हा भ्रमनिरासाचा वेग जबरदस्त आहे. ज्या वेगाने हा भ्रमनिरास होत राहिला आहे, त्याची कल्पना खुद्द जनता नेत्यांना तरी आहे, की नाही, माहीत नाही.

कोणत्याही सरकारला आपली यशस्वी प्रतिमा जनमानसात उभी

करावयाची, तर त्यासाठी निश्चित कार्यक्रमाची, विचाराची चौकट बनवावी लागते. आर्थिक उद्दिष्टांची अशी जाणीव आज जनता सरकारच्या बोलण्यात, वागण्यात आढळत नाही. जनता पक्षाला मी 'नॉन-पार्टी' म्हणून संबोधतो, याचे कारण या पक्षात निरनिराळे पक्ष सामील झाले. पण ते एकजीव झालेलेच नाहीत. प्रत्येक पक्ष स्वतंत्रपणे बोलतोय्, वागतोय्, हे पक्ष जनता पक्षातून फुटणार, असेही लोक बोलतात; परंतु वस्तुतः जनता पक्षातील विविध पक्ष फुटण्याचा प्रश्न आहेच कुठे? एकतर ते एकजीव झालेच नाहीत, मुळात ते फुटलेले होते. आजही तसेच आहेत.

यावर काँग्रेस पक्षात दुफळी नाही काय, असा कोणी सवाल करतील, काँग्रेससारख्या जुन्या व मोठ्या पक्षाला दुफळीचा, मतभेदाचा प्रश्न नेहमीच भेडसावीत असतो. परंतु गेल्या नव्वद वर्षांचा हा पक्षाचा इतिहास पाहिला, तर अशा प्रसंगोपात्त निर्माण होऊ पाहणाऱ्या दुफळ्या पचवून, कार्यक्रमाच्या बांधीवपणाने आणि जनतेच्या पाठिंब्याने पक्षाचे सातत्य कायम राहिले आहे. हा इतिहास आहे.

असे असले, तरी पक्षाच्या कार्यकर्त्यांना चिंता करावी लागेल, ती मतभेदाचा परिणाम पक्षाने स्वीकारलेल्या कार्यक्रमावर होणार नाही, याची. आर्थिक विषमता दूर करण्याचा, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा किंवा राजकीयदृष्ट्या निवडणुकीचा कार्यक्रम असो, अंतःस्थ मतभेदाचा यत्किंचितही परिणाम या कोणत्याही गोष्टीवर होणार नाही, याची काळजी पक्ष-कार्यकर्त्यांनी घेतलीच पाहिजे. महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांना तर अधिकच जागरूक राहावे लागेल. नजीकच्या काळातच आता काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रातील निवडणुकीला सामोरे जावे लागेल. त्या वेळी तर कार्यकर्त्यांनी अन्य कशाचाही विचार न करता सर्वांनी एकजुटीने आपापली सारी शक्ती काँग्रेसच्या पाठीशीच उभी केली पाहिजे.

कार्यकर्त्यांना मी जेव्हा असे आवाहन करतो आणि जनता पक्षाच्या उणिवा सांगतो, त्या वेळी शहाणीसुरती, विचारवंत मंडळीही माझ्यावर जातीयवादाचा आरोप करण्यासाठी चढाओढ लावतात. जागती माणसे असे काही बोलतात, तेव्हा मला खेद होतो. वाईट वाटते, खूप कष्टी होतो. राजकारणातल्या वादात विचारावर टीका करण्याचे जमत नाही, म्हणून जातीयवादांची शिवी करण्याचा या मंडळीचा प्रयत्न असावा काय ? मला तरी तसेच वाटते.

माझा नम्र दावा असा आहे की, महाराष्ट्रात, राजकारण हे जातीयवादापासून

अलिप्त राहावे, यासाठी मी मनस्वी कष्ट घेतले आहेत. महाराष्ट्रात असताना तेथील माझ्या कर्तेपणाच्या दिवसांत आणि नंतरही मी त्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. मनातून स्वतः मी कधी जातीयवादी भावनेला बळी पडलो नाही. समाजात एकजिनसीपणा आणण्याचेच ध्येय मी निरंतर बाळगले.

महाराष्ट्रात कोणत्या पक्षाचे सरकार करावयाचे, हे अखेरीस जनतेच्या स्वाधीन आहे. काँग्रेसचे सरकार यावे, यासाठी अर्थातच मी शर्थीचे प्रयत्न करीन. परंतु याचा अर्थ महाराष्ट्र समाज फुटावा किंवा तेथे जातीयवादाने डोके वर काढावे, असा नव्हे. राजकारण करण्यासाठी म्हणून जातीयवाद या विचारापासून मी नेहमीच अलिप्त राहिलो आहे. माझ्यावर जातीयवादाचा आरोप करणारांना मला असं विचारायचंय्, की माझे कोणते विधान जातीयवादाला आवाहन देणारे आहे? जनता पक्षावर टीका करताना जनसंघावर आणि रा. स्व. संघावर मी जरूर टीका करतो आणि यापुढेही करीन. परंतु मी ही टीका करतो, त्या वेळी माझ्यासमोर एक विशिष्ट वर्ग असतो, अशी शहाण्यासुरत्या पुढाऱ्यांची टीका ऐकतो, तेव्हा निराशा वाटते. जनसंघावर आणि रा.स्व. संघावर टीका करताना मी काय एकटाच आहे? टीकाकारांना अभिप्रेत असणाऱ्या वर्गात संघ-जनसंघाचे टीकाकार नाहीत, असे त्यांना म्हणावयाचे आहे काय?

जनसंघ, रा. स्व, संघावर मी टीका करताच, श्री.एस्.एम्.जोशी यांच्यासारखे राजकारणी विचारवंत 'म्हणजे ब्राह्मण समाजावरच ना ही टीका?' असे स्वतःचे विधान त्याला जोडून पुढे सरसावतात. याला काय म्हणावे ! श्री. एस्. एम्. जोशी यांच्याबद्दल मला नेहमीच आदर वाटत आला आहे. परंतु माझ्या भाषणावरचे असे हे भाष्य जोशीबुवा वा त्यांचे सहकारी करीत आहेत. यातल्या वैयक्तिक बदनामीची मला चिंता वाटत नाही. पण या मंडळींनाच महाराष्ट्रातील निवडणूक-प्रचाराला जातीय स्वरूप द्यावयाचे आहे, की काय, अशी चिंता मनात निर्माण होते आणि खेद वाटतो.

वस्तुतः महाराष्ट्रातले सार्वजनिक जीवन गेल्या पाच शतकात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादापासून मुक्त झाले आहे. माझ्या थोर मित्रांना मी विनंती करेन की, मी जे उच्चारले नाही. माझ्या मनात जे नाही, त्याचा आरोप करून कृपया माझ्यावर अन्याय करू नका, माझी शक्ती कमी व्हावी, ही त्यांची इच्छा मी समजू शकतो. परंतु त्यासाठी या मार्गाचा अवलंब कशाला? एका चांगल्या पद्धतीने सार्वजनिक जीवन पुढे जात असताना, ते जीवन निवडणुकीच्या स्वार्थासाठी म्हणून मलिन करू नका, एवढेच मी म्हणेन.

जातीय विचार हा माझ्या जीवनात अशक्य आहे, हे काय या मंडळींना माहिती नाही? खरे म्हणजे, माझ्या खासगी जीवनातल्या गोष्टींची सार्वजनिकरित्या वाच्यता मी करू नये. तसे सांगण्याची माझ्यावर कोणी वेळही आणू नये. परंतु आरोप केले जातात, तेव्हा खंत वाटते.

महाराष्ट्रातल्या जनतेला माहिती आहे की, मी अगदी गरीब स्थितीत असताना शिक्षण घेतले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी गाव सोडून बाहेर जावे लागले. परंतु जेथे गेलो, तेथे राहण्यासाठी वसतिगृह निश्चित करताना मी दहा वेळा विचार केला. जातीय नावावर चालणारी वसतिगृहे तेथे होती. सर्व सोयी-सवलती तयार होत्या. परंतु जातीय नावावर चालणाऱ्या वसतिगृहात शिक्षणासाठी राहायचे काय, असा सवाल माझ्यासमोर निर्माण झाला आणि अखेरीस असा वसतिगृहात राहायचे माझ्या मनाने नाकारले. जिथे कुठे लहान खोली मिळाली, तिथे राहिलो आणि शिक्षण घेतले. योगायोग असा, की त्या लहान खोलीत मला जोडीदार मिळाला, तो एक माझा ब्राह्मण मित्र.

गरीब घरातल्या शेतकऱ्यांशी, हरिजन वर्गातल्या मंडळींशी माझे जेवढे जिव्हाळ्याचे संबंध आहेत, तेवढेच पुढारलेल्या ब्राह्मण वर्गातल्या लोकांशी आहेत. जनसंघ आणि रा. स्व संघ यांच्याशी राजकीयदृष्ट्या मतभेद असले, तरी त्यांच्यापैकी अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. इतकेच कशाला, मनातले दुःख कुणाला सांगायचे ठरवले, तर चारांतले तीन ब्राह्मण असतात. हरिजन, मुसलमान, लिंगायत, ब्राह्मण अशा साऱ्याच जाती-जमातींबद्दल माझ्या मनात जिव्हाळ्याच्या भावना आहेत. अशा स्थितीत महाराष्ट्रात कोणी जातीय वाद फैलावण्याचा प्रयत्न करणार असतील, तर जीव पणाला लावून महाराष्ट्रातील जातीयवादाविरूद्ध मी उभा राहीन, असा माझा पण आहे.

थोडे मागे वळून पाहिले, इतिहासाची पाने उलटली, तर रा.स्व. संघावर टीका करणारे कोण आढळतात? रा. स्व. संघ ही ब्राह्मणांची संघटना आहे, ही टीका प्रथम सेवा दलाच्या गोटातून केली गेलेली आहे. सेवा दलाच्या मार्गदर्शकांना ही माहिती असावी, असलीच पाहिजे.

याउलट, रा.स्व. संघाचे महाराष्ट्रातले आणि बाहेरचे स्वरूप मी पाहिले आहे. त्यामुळे या संघटनेत एकाच जातीचे लोक आहेत, असे मी म्हणू शकत नाही. जनसंघातही तेच आहे. समाजातले निरनिराळे वर्ग त्यात आहेत, याचीही मला माहिती आहे. व्यक्तिगत उल्लेख करायचा, तर पुण्यात मी जेव्हा वकिलीचा अभ्यास करायला आलो. त्या वेळी लॉ कॉलेजसमोर, जिथे मी

राहत असे, तेथे माझा 'रूम पार्टनर' हा रा. स्व. संघाचा सचोटीचा कार्यकर्ताच होता. माझ्या मित्रमंडळींतही अशांचा भरणा होता. तेव्हा संघ -जनसंघावरील माझी टीका म्हणजे ब्राह्मण वर्गावर, एका जातीवर टीका, असे भासविण्याचा प्रयत्न जेव्हा माझ्या बाबतीत होतो, तेव्हा मला त्याचे हसू येते.

कारण माझी टीका असते, ती विचारसरणीवर. सामाजिक - सांस्कृतिक अलिप्तपणाच्या त्यांच्या निष्ठांवर. परंतु याची जाणीव टीकाकार ठेवीत नाहीत.

खरे तर, जनता पक्षातलेच प्रमुख कर्ते लोक संघ-जनसंघाबाबत टीकात्मक बोलत आहेत. महाराष्ट्रातल्या टीकाकार मंडळींनी, वस्तुतः या टीकांचा अंतर्मुख होऊन विचार करावा, हे बरे. आमच्या शहाण्या-सुरत्यांनी अगोदर जनता पक्षातल्या टीकाकारांचे समाधान करावे आणि मगच काही शिल्लक उरल्यास टीकेचे हत्यार परजून माझ्या रोखाने धाव घ्यावी. संघ-जनसंघाला खडे बोल ऐकवणारा एक गट जनता पक्षांतर्गत आहेत ना? माझ्यावर जातीयतेचा आरोप करणारांनी या गटावरील आरोपाचाही उच्चार एकदा केलेला बरा.

वैचारिक श्रद्धांतून काम करणारा मी माणूस. अनेकविध विचारांच्या मंडळींशी संबंध. विविध प्रकारच्या वाचनाची, व्यासंगाची सवय. असा मी, इच्छा झाली, तर जातीयवादी बनणार कसा? सहज ओघात आले, म्हणून हा प्रपंच.

१९७८ च्या प्रारंभाचा हा काळ राजकीय इतिहासाचा, महत्त्वाचा काळ आहे. चार-सहा राज्यांत निवडणुका होणार असून, या निवडणुकांमध्ये, जनता पक्षाच्या राज्यकारभाराच्या, धोरणांच्या अनुभवानंतर जनमताची कसोटी लागणार आहे. काँग्रेस पक्षाला आपल्या ध्येय-धोरणाचा, कार्यक्रमाचा पाठपुरावा करीत-करीत गेल्या वर्षभरातल्या इतिहासाला कलाटणी द्यायची आहे. आपल्या मूळ प्रेरणा आणि काँग्रेसला इतिहासाने दिलेले काम, मनातली तीव्र जाणीव यांच्या आधारावर पक्षाने अधिकाधिक एकसंध बनून जनतेपर्यंत पोहोचावयाचे आहे आणि आव्हान पूर्ण करावयाचे आहे.

काँग्रेस पक्षावर, पक्षाच्या नेत्यांवर टीका या होत राहणारच. परंतु या टीकांचे परिमार्जन करण्यासाठी, लोकांना वस्तुस्थिती पटविण्यासाठी पाच-दहा माणसांच्या संख्येपासून हजारोंच्या संख्येपर्यंत कार्यकर्त्यांनी पोहोचून नवे वायुमंडळ बनवण्याचे काम केले पाहिजे. खेड्यांपासून शहरांपर्यंत करावयाचे हे काम आहे.

महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी म्हणत असत. म. गांधींनी महाराष्ट्राला जो कॉंग्रेसचा मंत्र दिला, त्याच्या परीक्षेची, कसोटीची ही वेळ आहे. माझे मन ग्वाही देत आहे की, या परीक्षेत महाराष्ट्र चांगल्या गुणाने उत्तीर्ण होईल.

# ६१... लोकसाहित्याच्या भावगंगेत

लहानपणी मी कराडला संगमावर बसत असे. कोठून तरी येणारे आणि कोठेतरी जाणारे ते 'जीवन' मी रोज पाहत असे. कोणासाठी तरी ते धावत होते. त्यात खंड नव्हता. या 'जीवना'ला एक लय होती. पण ते लयाला गेलेले मी कधीच पाहिले नाही. ते जीवन नित्य नवीन होते. त्याचा जिव्हाळा कधी आटला नाही.

जीवन पराकोटीचे समर्पित असेल, तर ते कधीच जीर्ण होत नाही, चंद्र कधी जुना होत नाही. सूर्याला म्हातारपण येत नाही. दर्या कधी संकोचत नाही. यांतील प्रत्येकाच्या जीवनात पराकोटीचे समर्पण आहे; पण अनंत युगे लोटली, तर विनाश त्यांच्याजवळ पोहोचलेला नाही. काळाने त्यांना घेरलेले नाही. त्यांचा कधी कायापालट नाही, स्थित्यंतर नाही. ते निःश्वसन अखंड आहे.

शास्त्रज्ञ म्हणतात, 'सूर्याभोवती ग्रहमाला फिरते,' अध्यात्मी सांगतात, 'सूर्य जगाचा आत्मा आहे.' नियती म्हणते, 'पंचमहाभूतं माझे दास आहेत,' दृश्य व अदृश्य जगत निर्माण करण्यात नियतीचा लीलात्मक आनंद आहे, असेही कोणी म्हणतात. मला वाटते, जग हे कलात्मक आनंदाकरिता निर्माण केलेली शक्ती आहे. या कलेत स्फूर्ती आहे, माणुसकी आहे. केवळ वैज्ञानिक हिशेब म्हणजे जग नव्हे. कला आणि पावित्र्य यांचा हा सुरेख संगम आहे.

मातीच्या आणि मातेच्या सान्निध्यात मला या सर्वांचा साक्षात्कार घडतो. तिच्या अंतःकरणाच्या अवकाशात मी स्थिरावतो; प्रशांत मनोभूमीवर पहुडतो, आत्मतेजाने तेजाळून निघतो, प्रेमामृताने ओलाचिंब होतो आणि श्वासात श्वास मिसळून जातो.

कन्याकुमारीच्या प्रशांत परिसरात, कृष्णामाईच्या सान्निध्यात, गंगा-यमुनेच्या सहवासात, हिमालयाच्या कुशीत, माझी अशी भावसमाधी लागते. अधूनमधून लोकसाहित्याच्या भावगंगेत डुंबताना देखील मी हाच अनुभव घेतो.

लोकसाहित्य या शब्दामध्ये किती किती गोष्टींचा अंतर्भाव होऊ शकेल,

याची चर्चा आजवर अनेकदा झालेली आहे. परंतु म्हणी, गाणी, ओव्या म्हणजेच केवळ लोकसाहित्य नव्हे. लोकसाहित्याचा संगीताशी संबंध आहे, नृत्याशी संबंध आहे, गीताशी संबंध आहे, कथांशीही संबंध आहे, किंबहुना लोकजीवनाची जी विविध तऱ्हेची स्वरूपे आहेत व त्यांचे स्वरूप वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये व्यक्त होत असेल, ती सगळी लोकजीवनाची व्यक्त दर्शने म्हणजे लोकसाहित्य, असे आपणांला मानावे लागेल; आणि या दृष्टीने, मला वाटते, आम्हांला अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. निव्वळ आमच्यांतलेच शोधून काढावयाचे, असे नव्हे. मी या संदर्भात निव्वळ महाराष्ट्रापुरतेच मर्यादित अर्थाने सांगतो, असेही नव्हे. हिंदुस्थानातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोकगीतांशी त्याचा काही संबंध आहे किंवा कसे, याचा विचार करण्याची गरज आहे. बाहेरच्या देशांतील त्या त्या काळातील लोकसाहित्याचा आमच्या लोकसाहित्याशी काही संबंध जुळतो का, हेही पाहण्याची गरज आहे. कारण मला वाटते, भाषेचा अलंकार वेगळा असला, तरी त्या त्या काळातील लोकजीवनामध्ये बरेचसे साम्य असण्याची शक्यता आहे. कारण लोकसाहित्याचा महत्त्वाचा गाभाच असा की, लोकांनी त्यामध्ये स्वीकारण्यासारखे म्हणून काही जिंवत असे जरूर असते.

आमची अशी एक समजूत आहे की, खेडेगावामध्ये लिहिलेले, बोललेले ते लोकसाहित्य, अशी काही तरी ढोबळ चुकीची व्याख्या केली जाते. फार तर असे वर्णन करीन, की ज्या लोकजीवनाने त्यातील काहीतरी सौंदर्यस्थळांमुळे, त्यातील काहीतरी शहाणपणामुळे जे स्वीकारले आणि जे सर्वांनी मान्य केले, असा त्यातील जो गाभा, तेच शेवटी लोकसाहित्य होऊन बसले. लोकसाहित्यामध्ये एकतर गाण्याचा अगर नृत्याचाही भाग असतो. लोकगीत हे थोड्या लोकांनी गायचे आणि जास्त लोकांनी ऐकायचे, असे नसते. लोकसाहित्यामध्ये, लोकगीतामध्ये किवा लोकनृत्यामध्ये एक सेन्स ऑफ ऑडिटोरिम ज्याला आपण म्हणू, त्याची आवश्यकता असते; म्हणजे सर्वांनी त्यात भाग घ्यावा. अशी परिस्थिती असणे-म्हणजेच ऐकणारे कुणीच नाही. पाहणारे कुणीच नाही, सगळे काम करणारे, सगळे गाणारे, सगळे नाचणारे, हा त्यातला महत्त्वाचा भाग आहे. मला वाटते. नंतर त्यातील निपुणता (स्पेशलायझेशन) वाढत गेली आणि गाणारे थोडे व ऐकणारे जास्त, तर समजणारे कमी, असे शेवटी-शेवटी व्हावयाला लागले असावे. हा कदाचित या स्पेशलायझेशनचा दोष असेल. तेव्हा लोकसाहित्यातील हा एक विचारात

घेण्यासारखा भाग आहे. लोकसाहित्याबाबत हा वेगळा असा अभ्यासाचाही विषय होऊ शकेल. मला वाटते, महाराष्ट्रामध्ये त्या दृष्टीने अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

नृत्याच्या क्षेत्रात, मला कबूल केले पाहिजे की, महाराष्ट्राने आपल्या जीवनामध्ये काहीतरी आखले पाहिजे. अजूनही काहीतरी आमच्याजवळ आहे, असे बाहेरच्या लोकांना पटविण्याकरिता आम्ही दाखवू शकलो नाही, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. या कामी कोणा तरी दोन-चार माणसांची कमिटी नेमून सगळेच काम त्यांनी केले पाहिजे, असे म्हणणेही बरोबर होणार नाही. आमचे लोकजीवन जर आम्हांला समजावून घ्यायचे असेल, आमचे जीवन इतरांना समजावून द्यायचे असेल, इतरांच्या लोकजीवनाशी आमचे काही तर साधर्म्य आहे, याची आम्हांला आणि इतरांना प्रचीती यायची असेल, तर त्यातला चांगला भाग आम्हांला शोधला पाहिजे. तो शोधायचा प्रयत्न आम्ही केला पाहिजे. आज त्याची गरज आहे. त्या दृष्टीने काही माणसे प्रयत्न करीत आहेत. पण कुठेतरी अजून अपुरेपणा वाटतो आहे. कुठेतरी काही तरी चुकतेय् ते पाहण्याची गरज आहे, मी आपणांस सांगू इच्छितो. कारण या प्रयत्नामध्ये आणखी मूलग्राही असा विचार करण्याची गरज आहे. या प्रयत्नांमध्ये अजूनही कुठेतरी कमतरता आहे, असे वाटत असेल, तर ती कमतरता तपासून पाहण्याची गरज आहे; हे अंगीकृत काम जे होत असते, ते काम पाच-दहा वर्षांची असेसमेंट करून तपासून घेण्याची जी आपणांमध्ये प्रवृत्ती आहे, ती फार महत्त्वाची आहे.

मी तर नेहमीच सांगतो की, निव्वळ राजकारणात त्या गोष्टीची गरज आहे, असे नव्हे, तर ते नेहमीच्या व्यक्तिगत जीवनामध्येही त्याची गरज आहे; आणि ती गोष्ट म्हणजे आत्मटीका, सेल्फ क्रिटिसिझम, आज तिची गरज आहे. ही गरज अशासाठी की, आपण पाच-दहा वर्षे खपून जे काम केले, त्या कामाने प्रगती किती केली, किती क्षेत्रांत ती झाली, त्याची पाहणी करण्याची गरज आहे. त्याशिवाय आमचे काम अधिक प्रगतीने आम्हांला पुढे नेताच येणार नाही. मी या क्षेत्रात काम करणाऱ्या सगळ्या मंडळींना धन्यवाद देतो. विशेषतः, डॉ.सरोजिनी बाबरांना. त्या पीएच्.डी. झाल्यापासून त्यांनी त्या क्षेत्रामध्ये स्वतःला वाहून घेतले आहे. फार थोडी माणसे इतक्या ध्येयवादाने काम करतात. त्यांना धन्यवाद दिलेच पाहिजेत. या क्षेत्रात काम करणारी आणखी पुष्कळ माणसे आहेत. त्यांच्या नावाचा मी उल्लेख केला नाही, तर त्याचा अर्थ

त्यांचे काम कमी महत्त्वाचे आहे, असे वाटता कामा नये. परंतु त्याचबरोबर या क्षेत्रात काम करणाऱ्या सगळ्या मंडळींनी बाहेरच्या माणसांच्या मदतीने परत एकदा पाहणी केली पाहिजे. असे मला फार वाटते. कारण आपले जीवन शेकडो वर्षे, हजारो वर्षे चालले आहे, आणि माझ्या कल्पनेप्रमाणे आमच्या भारताच्या जीवनामध्ये काहीतरी फार जबरदस्त असे सामर्थ्य आहे. आम्हांला याची प्रचीती बाहेरदेशामध्ये गेल्यानंतर येते. चारशे-पाचशे वर्षांची ज्यांची संस्कृती आहे, अशी राष्ट्रे आज पहिल्या प्रतीची राष्ट्रे म्हणून दुनियेमध्ये मोठ्या मानाने जगत आहेत. पण तीही माणसे मोठ्या अगत्याने आमच्या जीवनाकडे पाहतात. ज्यांना सेन्स ऑफ हिस्ट्री आहे, ज्यांना इतिहासासंबंधी काही जाणीव आहे, ती मंडळी आमच्या जीवनाकडे मोठ्या आपुलकीने पाहत असतात. त्यांना अशी भीती वाटते की, आपले तीन-चारशे वर्षांचे जीवन आज तरी उच्च कोटीला जाऊन पोहोचले असले, तरी काही धोके निर्माण झाले, तर आपले हे टिकेल का ? आणि समजा, हे जर टिकले नाही आणि त्यातून काही धोके निर्माण झालेच, तर पुनः आम्ही आमचे जीवन कोणत्या तऱ्हेने सुसंबद्ध व सुसंस्कृत करू शकू, याला कोणती कारणे आहेत, ती शोधली पाहिजेत, आणि ती पाहण्याकरिता म्हणून ते हिंदुस्थानच्या इतिहासाकडे मोठ्या आपुलकीने पाहत असतात.

किती संकटे आमच्या हिंदुस्थानच्या इतिहासावरती आली, किती राज्ये आली आणि किती साम्राज्ये गेली. किती दौलती आल्या आणि किती काळाच्या उदरात गडप झाल्या; पण भारताची संस्कृती अभेद्यच राहिली. हिंदुस्थानचे जीवन साधेसुधे नाही. अनेक धर्मांचे हल्ले येथे आले नि गेले; परंतु जीवनामध्ये स्वतःचे संरक्षण करण्याकरिता म्हणून काही मूल्ये आहेत, काही सामर्थ्ये आहेत. या सामर्थ्यांचा शोध या लोकसाहित्याच्या मार्गाने घेतला पाहिजे, असे माझे स्वतःचे मत आहे. संशोधनातून जे जमवायचे, ते कशासाठी, हे पाहिले पाहिजे, त्याला काहीतरी नजर असली पाहिजे. आपल्या सामर्थ्याची जाणीव या अभ्यासाने, या चिंतनाने, या संशोधनाने जर आली, तर मला वाटते, ती जास्त महत्त्वाची गोष्ट आहे. त्यांनी ह्या दृष्टीने या सगळ्या प्रयत्नांकडे पाहिले पाहिजे. मी काही त्यातला अभ्यास केलेला व्यासंगी माणूस नाही; पण या क्षेत्रातील मी एक नादी माणूस आहे. जर ह्याच्यातले कोणी काही सांगितले, तर ते मला ऐकावयाला बरे वाटते. रसिक श्रोत्याची भूमिका मी चांगली करीन. याच्यामधील प्रश्नांची चर्चा करायला लागलात, तर ऐकायला बरे वाटते. परंतु

या संबंधाने काही मूलग्राही विचार जरूर माझ्या मनामध्ये आहेत. ते विचार अगत्याने आपल्यापुढे मांडले आहेत. या क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींनी पुन्हा आणखीन काय प्रयत्न करण्याची गरज आहे, हे पाहावे. तसेच, लोकसाहित्य हे भूतकाळात झाले आहे आणि तसे ते आता काही घडत नाही किंवा काय, हेही पाहिले पाहिजे. हा मी एक विचार मांडला आहे. मला वाटत नाही, हा किती बरोबर आहे. पण पाहा, विचार करा. लोकसाहित्य म्हणजे अशीच गोष्ट आहे, की फक्त जुन्या कहाण्या आणि गीते शोधणे म्हणजेच लोकसाहित्य ! कदाचित आजही घरोघरी या संदर्भात शोधले, तर तुमच्या -आमच्या जीवनाचे प्रतिबिंब जास्त चांगले पाहावयास सापडेल, असे मला वाटते. निव्वळ लिहिलेल्या आणि प्रकाशित केलेल्या पुस्तकात समाजजीवनाचे प्रतिबिंब पाहण्याचा प्रयत्न टीकाकार करीत असतात, बाहेरचे पाहत असतात. अप्रकाशित अनुभव आणि निव्वळ उच्चारित वाङ्मय असे कितीतरी वाङ्मय, कितीतरी साहित्य आमच्या लोकजीवनामध्ये अजूनही असेल. ते शोधण्याचा प्रयत्न केला, तर आजचे आमचे जीवन कसे आहे, याचा अनुभव येण्याची शक्यता आहे. अर्थात हे काम कठीण आहे. पण कोणी तरी हे सुद्धा काम केले पाहिजे. हे जे फोकलोअर कमिटीने काम अंगीकारले आहे, ते गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये आहे. दहा-बारा वर्षांमागे जुन्या मुंबई सरकारने, मला वाटते, ना. बाळासाहेब खेरांच्या वेळी या कामाला सुरूवात झाली आणि आस्ते आस्ते काम वाढत चालले आहे; फार प्रमाणात वाढत चालले आहे. तरीसुद्धा या कामाची यापुढची प्रगती आम्हाला कोणत्या दिशेने केली पाहिजे, याचा पुन्हा एकदा विचार करण्याची गरज आहे, असे मला या निमित्ताने सुचवायचे आहे.

# ६२... माझी साहित्याची रूची

मी साधारणपणे सर्वच साहित्यप्रकार आवडीने वाचीत असतो. अर्थात अलीकडे विषयांची विविधता व ग्रंथांची विपुलता इंग्रजी भाषेत जास्त असल्यामुळे या भाषेतील पुस्तके अधिक वाचण्यात येतात. परंतु वाचनाचा खरा आनंद व जिव्हाळा मराठीतील उत्तम पुस्तके वाचण्यात आहे. जाणत्यांनी शिफारस केलेली, उत्तम परीक्षण आलेली पुस्तके मी मिळवतो व पुष्कळदा खरेदीही करतो. काही लेखक आपुलकीने आपली पुस्तके भेटीदाखलही पाठवितात. अधून-मधून मराठी वाचण्यासाठी दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या वाचनालयाचीही मदत घेतो. ही वस्तुस्थिती आहे. गेल्या पाच-सहा वर्षांत माझे पुष्कळसे वाचन प्रवासातच होते. प्रवासात नित्याच्या कामाच्या कागदपत्रांच्या वाचनासोबत साहित्याचे वाचन हा एक उताराच असतो, असे म्हटले, तरी चालेल.

सर्वच पुस्तके अथपासून इतिपर्यंत वाचणे शक्य होत नाही. अर्थात आवडणारी पुस्तके संपूर्णच नव्हे, तर चिंतनपूर्वक वाचतो. सामान्यतः एकाच वेळी माझे चार-पाच तऱ्हेच्या पुस्तकांचे वाचन चालू असते, असे म्हटले, तरी हरकत नाही, गंभीर, विचारप्रधान ग्रंथ, चरित्र वा आत्मचरित्रे, कथा-कविता संग्रह आणि कादंबरी अशी या प्रवाहाची वाटणी प्रसंगानुसार असते. गंभीर व विचारप्रधान ग्रंथांत माझे आवडीचे विषय राजकारण आणि इतिहास हे आहेत. चरित्रे व आत्मचरित्रे मी वाचतो. अर्थात चरित्रनायक कोण आहे, याच्यावर निवड निश्चित अवलंबून असते. विद्यार्थिजीवनात महापुरूषांची चरित्रे वाचण्यास आम्हांला मुद्दाम सांगितले जाई. केळकरांनी लिहिलेले टिळकचरित्र, अण्णासाहेब लठ्ठे यांनी लिहिलेले शाहू महाराजांचे चरित्र, केळुसकरांनी लिहिलेली शिवाजी महाराज, त्याचप्रमाणे नेपोलियन, मॅझिनी, डी-व्हॅलेरा, गॅरिबाल्डी यांची चरित्रे मी विद्यार्थिजीवनातच वाचली.

याच काळातील एक छोटी आठवण सांगितली पाहिजे. योगायोगाने जोतीराव फुले यांचे पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेले छोटेखानी चरित्र मी वाचले. ते चरित्र आज, ज्याला चोपडे म्हणता येईल, अशा आकाराचे होते.

परंतु या छोटेखानी चरित्रग्रंथाने माझ्या जाणिवेच्या कक्षा रूंदावल्या, हे मला कबूल केले पाहिजे.

बी.ए.ला आम्हांला चरित्रवाङ्मयाचा एक साहित्यप्रकार म्हणून अभ्यास करावयाचा होता. त्यावेळी लिटन स्ट्रॅची लिखित क्वीन व्हिक्टोरिया आणि इतर काही प्रसिद्ध चरित्रे मी अभ्यासिली, चरित्र हा वाङ्मयप्रकार म्हणून वाचण्यातला खरा आनंद या वेळी अनुभवला.

१९३४-३५ साली पंडित जवाहरलाल नेहरूंचे आत्मचरित्र नुकतेच इंग्रजीत प्रसिद्ध झाले होते. त्या वेळी या पुस्तकाला फार मागणी होती. या ताज्या पुस्तकाची एक प्रत कोल्हापूरच्या माझ्या मित्राकडून मिळवून ती कशी वाचली, याची आठवण माझ्या मनात ताजी आहे. आम्हांला ते पुस्तक चार दिवसांसाठीच मिळाले होते आणि वाचणारे तर पाच-सहा जण. मग आम्ही एकत्र बसलो. एकाने ते मोठ्याने वाचायचे आणि इतरांनी ऐकायचे, असा कार्यक्रम सुरू झाला. उन्हाळ्याचे दिवस, कराडचे आमचे घर खूप तापायचे, पण आमचा उत्साह इतका अमाप होता, की आम्ही ते पुस्तक तीन दिवसांतच संपविले. ते दिवसच मंतरलेले होते! स्वातंत्र्य-चळवळीने आमची मने भारून टाकलेली होती. काही नव्या प्रेरणा घेऊन, देशाच्या आकांक्षांची क्षितिजे उंचावणाऱ्या विचारांची झेप असलेल्या एका तरूण नेत्याचे जीवन समजून घेण्याची ओढ होती.

चाळिशीनंतर माणसे चरित्रवाचनाकडे वळतात, असे एका सुप्रसिद्ध टीकाकाराने म्हटल्याचे माझ्या वाचनात आहे. आमची पिढी पंधराव्या-सोळाव्या वर्षापासूनच या वाचनाकडे वळली होती. असे म्हटले, तरी चालेल.

आता या वयात मात्र चरित्रे व आत्मचरित्रे वाचण्यामागे माझी भूमिका बदलली आहे, असे मला वाटते. १९३४-३५ पासूनच्या महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकीय व सामाजिक जीवनातील बऱ्याच घटना मी कमी-अधिक जवळून पाहिल्या आहेत. त्यांतल्या काहींमध्ये भागही घेतला आहे. त्या घटनांबद्दल इतर समकालीन लोकांना काय म्हणावयाचे आहे, हे जाणून घेण्याची आता मला उत्सुकता वाटते. एखाद्या घटनेच्या विविध बाजू, तिच्याबद्दलचे विविध दृष्टिकोन समजावून घ्यावेसे वाटतात. त्या दृष्टीने काकासाहेब गाडगीळ, आचार्य अत्रे, ना.सी.फडके इत्यादींची मराठी आत्मचरित्रे, त्याचप्रमाणे वेव्हेलच्या आठवणी, मौलाना आझादांचे 'इंडिया विन्स फ्रीडम', राजेंद्रबाबूंचे आत्मजीवन, इत्यादी पुस्तके मी वाचली आहेत. बर्ट्रांड रसेलचे आत्मचरित्र मला वेगळ्याच

कारणामुळे स्पर्श करून गेले. एखादा माणूस प्रामाणिक आत्मचरित्रलेखनाची कोणती मर्यादा गाठू शकतो, हे रसेलच्या पुस्तकात दिसते. रसेलच्या उत्तरायुष्यातील चीन-भारत संघर्षविषयक धोरणाशी मी सहमत होऊ शकत नसलो, तरी रसेल ही चालू शतकातील एक लोकोत्तर व्यक्ती होऊन गेली, यात शंका नाही. आपल्या प्रत्येक अनुभवाचे बुद्धिवादी दृष्टिकोनातून विश्लेषण व परीक्षण करीत त्याने आपले आयुष्य घडवले. त्याच्या आत्मचरित्राचा शेवटचा परिच्छेद म्हणजे तर गद्यात लिहिलेली एक सुंदर कविता आहे. गांधीजींचे आत्मचरित्रही सत्यकथन व सत्य-अहिंसेचा शोध या सूत्रांनी वेढलेले असे एक अविस्मरणीय आत्मचरित्र आहे. आपले आत्मचरित्र थोडे अधिक साफसूफ करण्याची संधी काकासाहेब गाडगीळांना मिळायला हवी होती, असे राहून-राहून वाटते. 'पथिक' वाचनीय आहे, पण त्यातले काही भाग खडबडीत राहून गेले आहेत. अत्र्यांचे 'कऱ्हेचे पाणी' साहित्यिक गुणांनी श्रीमंत आहे; पण मला त्यांचे 'मी कसा झालो' हे पुस्तक अधिक आवडले होते. ते अधिक व्यक्तिगत होते. 'कऱ्हेचे पाणी' मध्ये आपण एक ऐतिहासिक महत्त्वाच्या व्यक्ती झालो आहोत, ही जाणीव सतत जागी असल्याचे जाणवते. पण हा काही दोष नाही. ना. सी. फडके यांचे आत्मचरित्रही मी आवडीने वाचले. ते माझे आवडते प्राध्यापक आहेत. कमलाबाई तर आमच्याच वर्गात होत्या. त्यामुळे ते आत्मचरित्र वाचताना काही Nostalgia ची भावना येऊन जाते. अलीकडच्या आत्मचरित्रांपैकी हंसा वाडकर, आनंदीबाई शिर्के, स्नेहप्रभा प्रधान, आनंदीबाई विजापुरे, आनंद साधले, जागीरदार, इत्यादींची आत्मचरित्रे मी वाचली किंवा चाळली आहेत. कमी-अधिक प्रमाणात ती सर्वच मला आवडली. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'शी जरी त्यांची तुलना करता आली नाही, तरी ती अधिकाधिक प्रामाणिक होऊ पाहत आहेत, असे मला वाटते. उदाहरणार्थ, डॉ. शिरोडकर व स्नेहप्रभा प्रधान या दोघांचाही चांगला परिचय असूनही, त्या दोघांमधील निष्कलंक, पण मनस्वी स्नेहाची कल्पना नव्हती. तशीच ती कदाचित इतरही लोकांना नसणार. पण स्नेहप्रभाबाईंनी मोकळेपणाने लिहिलेले आहे. आत्मचरित्र वाचताना ती व्यक्ती व तिची घडण सहानुभूतीने समजून घेण्याच्याा भूमिकेने ती वाचत आलो. आत्मचरित्रे वाचताना वाचकांनी नैतिक न्यायाधीशाची भूमिका न घेणे बरे, या विचाराचा मी आहे.

अलीकडच्या आत्मचरित्रांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, आपले बालपण व तरूणपण यांबाबात ती अतिशय पारदर्शक, प्रामाणिक असतात.

पण अलीकडच्या चालू काळाबाबत मात्र ती अतिशय सावध असतात. अर्थात याबद्दल मी त्यांना दोष देत नाही. कारण ही सावधानता समजण्यासारखी आहे. शिवाय एखाद्या माणसाच्या अगदी खासगी जीवनात डोकवावयाची उत्सुकता मला वाटत नाही. तो माणूस खासगी जीवनात कसा होता, याच्याशी वाचक म्हणून माझा काही संबंध आहे, असे मला वाटत नाही. तो ज्या वैशिष्ट्यांमुळे नावारूपाला आला, याबद्दल त्याने तपशीलवार लिहावे एवढीच माझी अपेक्षा असते व ती पूर्ण झाली, की मला समाधान वाटते. सगळीच माणसे गांधीजी, रसेल यांच्याइतकी महान कशी असू शकतील? तशी अपेक्षाच करणे चूक आहे, असे मला वाटते.

शिवाय सगळ्यांनाच घडलेल्या घटनांचे सूक्ष्म विश्लेषण करता येणे शक्य नसते. त्यासाठी कलावंताची - विशेषतः साहित्यिकाची -स्वयंविश्लेषणाची व आविष्काराची सवय असावी लागते. म्हणूनच कलाकारांची आत्मचरित्रे अधिक अंतर्मुख, तर राजकीय-सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांची आत्मचरित्रे सामान्यतः अधिक बहिर्मुख असतात, असा अनुभव येतो. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आत्मचरित्रांतून खूप माहिती मिळाली, तरी कलावंतांची आत्मचरित्रे चटका लावून जातात. उदाहरणार्थ, 'हंसा वाडकरांचे आत्मचरित्र'. विशेषतः, मराठवाड्यातील एका खेड्यात त्यांनी काढलेली दोन-तीन वर्षे व एका मॅजिस्ट्रेट महाशयांनी त्यांच्यावर आणलेले निर्लज्ज संकट याची स्मृती मनाला अस्वस्थ करून जाते.

आत्मचरित्रांमधून सत्य लपविले जाणे, आत्मगौरव व आत्मसमर्थन होणे याला आपले सामाजिक जीवनातील दुहेरीपण बऱ्याच प्रमाणात जबाबदार असावे. म्हणजे आपले आदर्श, आपली तत्त्वे आणि व्यवहार यांत फरक असतो, विरोध असतो. या आजच्या सामाजिक वास्तवतेचा- हवे तर दांभिकतेचा म्हणा -आविष्कार आत्मचरित्रलेखनातही अपरिहार्यपणे होतो. म्हणून आत्मचरित्रांचे मोठेपण, मी, ती संपूर्ण सत्य सांगतात, की नाही, या कसोटीवर ठरवत नाही, आणि खरे म्हणजे, संपूर्ण सत्य हे शेवटी आकाशपुष्पासारखेच नाही काय?

राजकीय-सामाजिक कार्यक्षेत्रातील-किंबहुना सार्वजनिक जीवनात भाग घेणाऱ्या व्यक्तीने आत्मचरित्र लिहिणे आवश्यक आहे; ते तिचे एक कर्तव्य आहे, असे मला वाटते. कारण त्यामुळे ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनांचे धागेदोरे उलगडणे सुलभ होईल. आपल्याकडे वस्तुनिष्ठ, विश्लेषणात्मक

इतिहासलेखन न होण्याचे एक कारण म्हणजे अशा सामग्रीचा अभाव, असे मला वाटते.

मी आत्मचरित्र लिहिणार का, अशी बऱ्याच वेळा मला विचारणा करण्यात येते. मी नियमितपणे डायरी लिहावी, असेही अनेक मित्र वेळोवेळी सुचवतात. पण ते काही मला आजवर जमलेले नाही. काही वेळा महत्त्वाच्या प्रसंगाच्या नोंदी मी करून ठेवतो, नाही, असे नाही. पण डायरी लिहिणे मात्र धावपळीच्या जीवनामुळे जमत नाही. गेल्या चार-सहा वर्षांत मी काही निवडक आत्मचरित्रे मुद्दाम मिळवून वाचीत आहे. ती निवड अशा चरित्रनायकांची आहे, की ज्यांचे आपल्यावर काही वैचारिक, बौद्धिक व भावनात्मक ऋण आहे. अलीकडे अधूनमधून माझ्या मनाला शंका चाटून जाते, की या वाचनाद्वारे मी माझ्याच आत्मचरित्र - लेखनाची तयारी तर करीत नाही ना? मी ज्या घटनांतून गेलो, त्याबद्दल इतरांना काय म्हणावयाचे आहे, याबद्दल मला उत्सुकता वाटण्याचेही कदाचित हेच कारण असावे. पण आतापर्यंत प्रसंगोपात्त लेखनाशिवाय अन्य लेखन मी केलेले नाही; करू शकलो नाही. आत्मचरित्र लिहायला मला आवडेल. पण त्यालाही कदाचित अवकाश आहे. मनाला तटस्थता आल्याशिवाय असले लेखन करणे शक्य नसते. मी जर कधी काळी आत्मचरित्र लिहिले, तर त्यात अभिनिवेश नसेल, माझे तेच खरे, असा हट्टाग्रह नसेल, अशी मला आशा आहे.

## ६३... बांधिलकी कलम करता येत नाही.

मला बांधिलकी हा शब्द तसा फारसा पसंत नाही. या शब्दाला बांधून घेणे मला रूचत नाही. इंग्रजीतील 'कमिटमेंट' ला 'बांधिलकी' हा शब्द वापरला जातो. राजकीय क्षेत्रात मी 'कमिटमेंट' ला 'वचनबद्धतेचं राजकारण' असा शब्दप्रयोग वापरतो. राजकारणात तुम्ही काही आश्वासने देता, किंवा देऊ इच्छिता. त्यांच्याशी तुम्ही प्रामाणिक आहात का? त्यांप्रमाणे वागता का? एकदा सत्तेत गेल्यावर ही कसोटी अधिक कसोशीने लावावी लागते. 'बांधिलकी' हा शब्द आशयाला रोखतो, 'रिस्ट्रिक्ट' करतो. वचनबद्धतेची कल्पना त्यात व्यक्त होत नाही. तुम्ही काहीतरी स्वीकारलेले आहे, ते तुमचे आहे, तुम्ही मानलेले आहे; पण 'बांधिलकी' शब्दात बांधून घेण्याची जी कल्पना आहे, ती आशयाला मर्यादित करते.

अर्थात शब्दांशी मला भांडण करायचे नाही, प्रश्न असा आहे की, साहित्यिकाने बांधिलकी मानावी काय? तर ती मानावी, असे मी म्हणेन. लेखकाला लिहिताना माणसांच्या प्रश्नांचे भान, जाण आहे, की नाही; समाजातील जे शोषित, दलित, उपेक्षित वर्ग आहेत, त्यांच्या भवितव्याबद्दल लेखकाला ओढ आहे का? त्यांच्यावरील अन्यायाची चीड आहे, की नाही, हे पाहिले पाहिजे. मी तरी साहित्य वाचताना ही कसोटी लावतो. आपल्या देशात विषमतेचे, दारिद्र्याचे प्रश्न आहेत, शतकानुशतक उच्चवर्णीयांचे वर्चस्व आहे. या परिस्थितीच्या निर्मूलनाची प्रतिज्ञा लिखाणामागे आहे, की नाही, ही मी मूलभूत कसोटी मानतो. ज्याला समाजाचे, सामान्य माणसाचे प्रेम आहे, अशा लेखकाच्या साहित्यातून समाज येणारच. खरा साहित्यिक समाजापासून दूर असू शकत नाही, असे मला वाटते.

'कलेसाठी कला', की 'जीवनासाठी कला' हाही वाद पूर्वी फार गाजलेला आहे. मराठी साहित्यात अजूनही त्याचे पडसाद अधून मधून उमटत असतात. माझ्यापुरते बोलायचे झाले, तर माझा कल 'जीवनासाठी कला' या तत्त्वाकडे झुकलेला आहे. केवळ शब्दलालित्य आणि प्रतिमांचे सौंदर्य हीच चांगल्या साहित्याची कसोटी आहे, असा 'कलेसाठी कला' याचा अर्थ असला, तर ही

स्वतःची फसवणूक करून घेणे होय. अर्थात शक्तिशाली, सुंदर शब्दांची निवड व वापर हे साहित्याचे महत्त्वाचे अंग आहे, याची मला जाणीव आहे. सुंदर प्रतिमांशिवाय असे शब्द वाया जातात. याचाही मला अनुभव आहे. तेव्हा शब्दलालित्य व प्रतिमांचे सौंदर्य यांची गरज असली, तरी हे शब्द व प्रतिमा यांच्या पाठीशी असलेल्या प्रेरणा या जीवनाच्या अनुभवांवर अधिष्ठित आहेत, की नाहीत, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. मी ज्या अर्थाने बांधिलकी म्हणतो, ती 'ही' आहे.

मराठी साहित्यात अधूनमधून मला अशी बांधिलकी दिसते. शंकरराव खरात यांचे वाङ्मय हे याचे एक ठळक उदाहरण. सर्वच दलित साहित्याबद्दल मी हे बोलत नाही. खरातांच्या पुस्तकांत ही बांधिलकी मला दिसते. भालचंद्र नेमाडे हे बांधिलकी मानतात, की नाही, हे मला ठाऊक नाही, परंतु त्यांच्या कादंबऱ्यांतून मला ही बांधिलकी मोठ्या प्रमाणावर जाणवली. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या कादंबऱ्यांतूनही अशी बांधिलकी मला आढळली.

काही वर्षांपूर्वी दिवंगत झालेले अप्रसिद्ध लेखक प्रभुदेसाई यांची 'नायक' ही छोटेखानी कादंबरी अलीकडेच मी वाचली. लेखक दलितेतर लेखक असूनही कोकणच्या पार्श्वभूमीवरील दलित जीवनाचे प्रभावी चित्रण फार थोड्या पृष्ठांत त्यांनी केले आहे. मी याला उत्कृष्ट वाङ्मय म्हणतो.

राजकारणाचे मराठी कादंबऱ्यांतील चित्रण अतिशय अपुरे व फसवे आहे. काही उदाहरणे सांगायची, तर अरूण साधूंच्या 'सिंहासन' या कादंबरीत मला प्रचाराचा वास येतो. राजकीय कादंबऱ्या लिहिण्याचा साधूंचा प्रयत्न आहे. पण त्यांचा थाट प्रचारकी आहे. 'सिंहासन' कादंबरीपेक्षा 'रिपोर्टिंग' वाटते.

'जनांचा प्रवाहो चालिला...' हे पुस्तक निकृष्ट (थर्ड ग्रेड) आहे.

देशामधील राजकारणातील महत्त्वाच्या प्रेरणांबद्दल सहानुभूती नसलेले, जागतिक राजकारणातील वेगवेगळे प्रवाह ठाऊक नसलेले, केवळ आपले गाव किंवा आपली गल्ली यांतच रममाण होणारे, अशा लेखकांच्या बऱ्याचशा राजकीय कादंबऱ्या या पूर्वग्रह व गैरसमज यांवर आधारलेल्या आहेत.

मराठीत राजकीय कादंबऱ्या लिहायला कै.ग.त्र्यं.माडखोलकर यांनी सुरूवात केली. या संदर्भात त्यांच्या 'मुक्तात्मा'चा मी उल्लेख करीन. पण त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांत बांधिलकी आहे, असे मी म्हणणार नाही. जयवंत दळवी यांना बांधिलकी मंजूर आहे, की नाही, हे मला ठाऊक नाही. मला

त्यांच्या नाटकांतून ही बांधिलकी अनुभवाला येते. विशेषतः, त्यांची बांधिलकी विशिष्ट असूनही, त्यांच्या कलेच्या आविष्कारात त्यामुळे न्यून आले आहे, असे म्हणता येणार नाही.

विजय तेंडुलकरांच्या नाटकांतही मला बांधिलकी दिसते. तर वसंत कानेटकर हे अत्यंत यशस्वी नाटककार, पण मला अभिप्रेत असलेली बांधिलकी त्यांच्या लिखाणात दिसत नाही. तेव्हा यशापयशाच्या कसोटीवर बांधिलकी अवलंबून नसते.

केशवसुतांच्या काळात बांधिलकी असावी, की नाही, असा काही वाद नव्हता. पण उत्स्फूर्त बांधिलकी असलेला मराठीतील तो पहिला आधुनिक कवी म्हणायला हवा. त्यांच्या कित्येक कवितांचे संदर्भ हे आजही नवे वाटतात, भावी काळातही वाटत राहतील. राजकारणात गटबाजीचा बुजबुजाट झाला आहे. त्याचे चित्रण कादंबऱ्यांत येणारच, हे ठीक. पण गटबाजी ही केवळ राजकारणातच आहे, असे नाही. ती साहित्यिकांत आहे, प्रकाशकांत आहे, जीवनाच्या सर्व क्षेत्रांतच आहे. तेव्हा गटबाजीचे चित्रण दाखवायला माझी हरकत नाही, पण जीवन निव्वळ त्यानेच भरले आहे, असा संभ्रम निर्माण करणे म्हणजे साहित्याच्या मूळ प्रेरणाशी प्रतारणा होय.

बांधिलकीची माझी कल्पना अशी : कोणत्याही गटाला, राजकीय पक्षाला, व्यक्तीला बांधून घेणे म्हणजे बांधिलकी नव्हे. ते प्रचारवाङ्मय होते. हे साहित्यच नव्हे, असे मला वाटते. मार्क्सवाद, गांधीवाद, समाजवाद यांबद्दल लिहिले जाणारे वैचारिक वाङ्मय याची आवश्यकता आहे. मनाची प्रौढता, उंची वाढण्यासाठी अशा वाङ्मयाची गरज आहे. पण त्याला आपण ज्या अर्थाने 'बांधिलकी' म्हणतो, त्याची कसोटी लावण्यात अर्थ नाही, कारण हे शेवटी प्रसारवाङ्मय आहे.

वैचारिक बांधिलकी ललित लेखकाच्या लिखाणातून उतरावीच, असा माझा आग्रह नाही. परंतु लेखकाची वैचारिक बांधिलकी खरीखुरी असेल, तिच्याशी तो प्रामाणिक असेल- चांगले साहित्य निर्माण करणारा स्वतःशी प्रामाणिक असतोच, तेव्हा ही बांधिलकी त्याच्या लिखाणात स्पष्ट रूपाने व्यक्त झाल्याशिवाय राहीलच कशी?

बांधिलकी ही लादून घेण्याचा प्रश्न नाही, तर ती असण्याचा प्रश्न आहे, आतून येण्याचा प्रश्न आहे. बांधिलकी ही उत्स्फूर्त असावी लागते. उत्स्फूर्त

वाङ्मयाच्या निर्मितीला जी प्रेरणा कारणीभूत होते, तीत बांधिलकीची बीजे असतातच. तेव्हा बांधिलकी ही 'कलम' करता येत नसते. प्रतिभेइतकीच ती उपजत असावी लागते. विशिष्ट राजकीय पक्ष, राजकीय विचार, धार्मिक निष्ठा यांच्या प्रेरणेतून होणारे लिखाण याला बांधिलकी म्हणता येणार नाही, संपूर्ण समाजजीवनाशी प्रामणिक असण्याशी बांधिलकीचा पुष्कळ संबंध आहे. देशात धार्मिक, सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाची गरज आहे, या विचाराशी लेखकाची बांधिलकी आहे काय? हे महत्त्वाचे आहे. 'स्टेटस-को' स्थितीचे वर्णन शाब्दिक फुलोऱ्याने करत राहणे म्हणजे चांगले साहित्य मानता येणार नाही. विचार बदलत असतात, स्थिती बदलत असते. जो थांबतो, तो विचार नव्हे व जी वाहत नाही, ती नदी नव्हे. तेव्हा बदलत्या समाजस्थितीचा, बदलत्या वास्तवाचा शोध लेखकाने घ्यायला हवा. बाकी बांधिलकी, की सामिलकी वगैरे हा शब्दच्छल झाला, तो मला महत्त्वाचा वाटत नाही.

उदाहरणार्थ, लेखकांनी मुंबईत दीर्घकाळ चाललेल्या गिरणी कामगारांच्या संपाला पाठिंबा द्यावा, की विरोध करावा, हा त्यांचा प्रश्न आहे. त्या अर्थाने त्यांनी बांधिलकी प्रकट करावी, असे मी म्हणत नाही. पण या संपामुळे कामगारांची परवड होत आहे, हाल होत आहेत, जीवनातील यातना-वेदना त्यातून प्रकट होत आहेत, केवळ पन्नास हजार कामगारच नव्हे, तर त्यांच्यावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अवलंबून असणारे आणखी हजारो लोक आहेत, याची अभिव्यक्ती होणारे साहित्य कोणी लिहिलेले दिसत नाही. मराठी लेखक याबाबत अलिप्त असावा, असे दिसते.

अर्थात संप हे निमित्त झाले. अशा परिस्थितीतही जगण्याची जी प्रेरणा असते, ती शाश्वत असते. तेव्हा त्या प्रेरणेचा आविष्कार करणारे साहित्य तात्कालिक कसे ठरेल ?

मार्क्सवादाची बांधिलकी ही साहित्यिक बांधिलकी नव्हे, ती पक्षाची बांधिलकी आहे. माझ्या मनातला बांधिलकीचा अर्थ त्यापलीकडचा आहे, अधिक व्यापक आहे, अधिक मूलभूत आहे. नारायण सुर्वे हे मानवी दुःखाने व्यथित झालेले आहेत, त्यांच्या मनात त्वेष आहे.

मार्क्सवादी असूनही, प्रचारकी नसलेले साहित्य म्हणून मॅक्झिम गॉर्कीच्या 'मदर' या कादंबरीचे उदाहरण देता येईल. मार्क्सवादाच्या निष्ठेतून निर्माण झालेली ही एक उत्कृष्ट कांदबरी. तिच्यातून मार्क्सवादाचा अप्रत्यक्ष प्रचार होत असेलही. तरूणपणी मी ही कादंबरी वाचली. मला काही तसा त्यातून

प्रचाराचा अनुभव आला नाही. साहित्यातले सारे गुण या कादंबरीत आहेत. टॉलस्टॉयच्या 'वॉर अँड पीस' या कादंबरीतून लेखकाच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते. रशियातील राजकीय जीवनाचे प्रामाणिक व वास्तव चित्रण त्यात असल्याने लेखकाची बांधिलकी स्पष्ट होते.

आपल्याकडे आणीबाणीच्या काळात काही लेखकांना वाटले, की लेखनस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य यांत व्यत्यय आलेला आहे. लेखनस्वातंत्र्याच्या कल्पनेशी बांधिलकी असलेले लेखक बंडाची भाषा करू लागले व सर्वांनी असेच करावे, अशी त्यांची अपेक्षा होती. व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य यांची बांधिलकी असण्यावर माझा विश्वास आहे. लेखनस्वातंत्र्याची कल्पना मला मान्य आहे. आणीबाणीच्या काळात सरकारावर टीका करणाऱ्या साहित्य संमेलनाचा (कराड, अध्यक्ष, श्रीमती दुर्गा भागवत) मी स्वागताध्यक्ष होतो. लेखकांनी टीका केली नसती, तर मला आश्चर्यच वाटले असते! अर्थात त्या काळात अमुक चळवळ केली, तरच ती बांधिलकी होईल, असे जे सांगितले जात होत, ते देखील योग्य नव्हे. कारण तो मग फक्त प्रचार झाला.

मी स्वतः बांधिलकी मानणारा मनुष्य आहे. सामाजिक विषमता, वर्णाश्रमावर आधारित समाजपद्धती, जातीयवाद यांचे निमूर्लन करणे व समाजातील सर्व घटकांना प्रगतीच्या दिशेने वाव देणारी, संपूर्ण संधी असलेली समाजरचना निर्मिण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत राहणे ही माझी वैयक्तिक जीवनातील बांधिलकी आहे. त्याकरिता राजकारण हे 'माध्यम' आहे, असे मी मानतो. मी राजकारणात पडलो, तो या वैयक्तिक संघर्षातून, सत्तेत मी जाईन, असे मला स्वप्नातदेखील वाटले नव्हते. मी सत्तेत गेलो व प्रदीर्घ काळ सत्तेत राहिलो. या काळात मला माझ्या वैचारिक बांधिलकीची जाण, भान निखळ होते, असे मला प्रामाणिकपणे वाटते.

# ६४... आवड-निवड

मी १९७६ साली काय वाचले नि त्यात महत्त्वाचे वा आवडलेले असे काय होते, हे पुन्हा एकदा मागे वळून पाहणे हा या लेखाचा उद्देश आहे. तसे म्हटले, तर विषय मनोरंजक आहे; पण सोपा नाही. माझ्याबाबतीत तो सोपा नाही, याचे कारण मी एकाच वेळी वेगवेगळ्या विषयांवरील चार-पाच पुस्तकांचे अदलून-बदलून वाचन चालू ठेवतो. त्यांतील सर्वच पुस्तके पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत एकसूत्र वाचतोच, असे नाही. आवडलेले विभाग वा प्रकरण संपूर्ण वाचतो, तर काही प्रकरणे चाळून होतात. कथेचे सूत्र धरून शेवटपर्यंत पोहोचावयाचे, हा हेतू! ज्या विषयाची किंवा विचाराची चर्चा पुस्तकात असेल, त्याची धावती धार सुटणार नाही, याची मात्र काळजी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे काही पुस्तके अक्षर न् अक्षर वाचून होतात. किंबहुना मधूनमधून पुन्हा पाठीमागे जाऊन, त्यातील विचाराचा धागा तपासून पाहून, चिंतन करावेसे वाटते. काही पुस्तकांचे वाचन संथपणे होते, तर काही भरवेगात संपून जातात. नित्य वाचणे हा ज्यांचा स्वभाव किंवा काम असेल, त्या सर्वांना कदाचित असेच करावे लागत असेल, असे मला वाटते, इतरांचा अनुभव वेगळाही असेल. पण माझे वाचन मात्र असे चालते, हे कबूल केले पाहिजे.

पुस्तकांच्या विषयाबाबत बोलावयाचे झाले, तर मी म्हणेन, की विषयांची आवड नि निवड ही त्या त्या वाचकांच्या व्यक्तित्वाचा अविभाज्य भाग आहे. इतिहास, राजकारण व वाङ्मय हे माझ्या व्यासंगाचे विषय आहेत. पुस्तकांची निवड या मूळ जिव्हाळ्यातून निर्माण होते. या विषयांशी संबंधित व्यक्तींची चरित्रे त्यामुळे माझ्या वाचनाचा हटकून विषय असतो. याचमुळे की काय, दुसरे महायुद्ध हा एक माझा असाच आवडता वाचनाचा विषय आहे. दुसऱ्या महायुद्धाने जगाच्या राजकीय नकाशाची पुनर्रचना केली. त्यामुळे अनेक राजकीय, आर्थिक व लष्करी प्रश्नांचा विचार सुरू झाला, की त्यांची मीमांसा करणाऱ्यांना दुसऱ्या महायुद्धापासून आपल्या विषयाची सुरूवात करावी लागते. त्यामुळे हे युद्ध संपून तीस वर्षे पूर्ण झाली, तरी अजूनही त्याच्या विविध अंगांचा विचार करणारी व नवी माहिती सांगणारी नवी नवी

पुस्तके प्रसिद्ध होतच असतात आणि ती शोधण्यात मला आनंद वाटतो. या युद्धाचा इतिहास, त्याच्याशी संबंधित नेत्यांचे स्मृतिग्रंथ, लष्करी घडामोडींच्या पाठीमागचे रोमहर्षक प्रयत्न, या युद्धाच्या सुरूवातीची व शेवटाची अनेकांनी केलेली वेगवेगळी मीमांसा हे सर्व अत्यंत वाचनीय वाङ्मय आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर कितीतरी कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या आहेत. पुन्हा पुन्हा ज्यांची आठवण होते, अशा नितांतसुंदर कादंबऱ्यापैकी काही या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या आहेत.

इतिहास आणि राजकारण हे एकमेकांच्या हातात हात घालून चालणारे विषय आहेत. राजकारणाच्या रामरगाड्यात उभे जीवन गेले. त्यामुळे आवड म्हणून आणि काम म्हणूनही या विषयावर सतत वाचीत असतो आणि वाचत राहावे लागले. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी व वैचारिक आंदोलने यांबाबतीत अद्ययावत राहावयाचे असेल, तर 'नित्य वाचीत जावे' हा मंत्र स्वभाव बनावा लागतो. या वाचण्यात लेख असतात, छोट्या पुस्तिका असतात आणि मोठे ग्रंथही! पुष्कळ वेळा एखादा लेख ग्रंथाचे समाधान देऊन जातो. कधी कधी ग्रंथ वाचल्यानेही जे हवे ते मिळत नाही, ते दहा-पंधरा पानांच्या लेखाद्वारे क्वचितच, पण सहज मिळून जाते.

या वर्षाचा माझा अनुभव सांगावयाचा झाल्यास मी 'समर १९७६' च्या 'फॉरिन पॉलिसी' या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेल्या ब्रेझेझिन्स्कीच्या 'अमेरिका इन ए होस्टाइल वर्ल्ड' या लेखाचे उदाहरण देईन. अमेरिकन परराष्ट्र-धोरणावर ग्रंथरूपानेही विपुल लिहिले जाते. हे निवडणुकीचे वर्ष म्हणून विरोधी दृष्टिकोन मांडणारे ग्रंथ व लेखही बरेच लिहिले गेलेत. परंतु माझ्या वाचनात आलेल्या 'डिप्लोमसी फॉर ए क्राऊडेड् वर्ल्ड' हे जॉर्ज बॉल यांचे पुस्तक व ब्रेझेझिन्स्कीचा हा छोटा लेख लक्षात राहण्यासारखे आहेत. ब्रेझेझिन्स्कीने थोड्या शब्दांत काही मूलगामी विचार मांडले आहेत. दोनशे वर्षांपूर्वी स्वतंत्र अमेरिकेने जेव्हा आपल्या सार्वभौम जीवनाची वाटचाल सुरू केली, तेव्हा स्वातंत्र्य आणि समानता या परवलीच्या दोन ध्येय-संकल्पना होत्या. आज जेव्हा तिसरे शतक सुरू होत आहे, तेव्हा जगात जवळजवळ सर्वत्र राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित झाले आहे आणि काळाजी गरज आहे. 'समानते'ची अमेरिका व नवोदित जग यांमध्ये विसंवाद व संघर्ष आहे, याचे कारण मानवतेची मागणी समानतेची असताना अमेरिकेची विदेश - नीती मात्र फक्त व्यक्तिस्वातंत्र्याची घोषवाक्ये देत आहे. अमेरिका व नवे जग यांत

सहकार्याचे वातावरण निर्माण व्हावयाचे असल्यास समानतेच्या प्रस्थापनेसाठी नव्या जगाने चालविलेल्या प्रयत्नांशी प्रथमतः अमेरिकेने सुसंवाद निर्माण केला पाहिजे. लेखाचे मूलसूत्र, हा विचार आहे. या लेखाचे महत्त्व यासाठीही आहे, की हे विचार मांडणारे श्री. ब्रेझेझिन्स्की हे नवे नियुक्त अध्यक्ष कार्टर यांचे महत्त्वाचे सल्लागार म्हणून नुकतेच नेमले गेले आहेत.

चरित्रवाचनाची आवड मराठीने मला लावली. अगदी लहानपणापासून ! ती कायम राहिली, असे नव्हे, तर वाढतच गेली आहे. जिज्ञासेची क्षेत्रे जशी वाढत गेली, तशी त्या क्षेत्रांची संबंधित स्त्री-पुरूषांच्या जीवनांविषयी औत्सुक्य वाढले आणि चरित्रग्रंथांची त्यांत-आत्मचरित्रे व आढवणीही (मेमॉयर्स) आल्या, आवड कायम राहिली. या वर्षी मी वाचलेल्या चरित्रग्रंथांत मुद्दाम उल्लेख करण्यासारखा ग्रंथ म्हणजे श्री. नीरद चौधरी यांची सुप्रसिद्ध जर्मन पंडित मॅक्समुलर यांचे 'स्कॉलर एक्स्ट्रॉऑर्डिनरी' या नावाने प्रसिद्ध केलेले चरित्र. श्री. नीरद चौधरी हे इंग्रजीत ग्रंथलेखन करणाऱ्या प्रसिद्ध हिंदी लेखकांपैकी प्रमुख आहेत. त्यांचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना लेखक म्हणून नावलौकिक मिळाला त्यांच्या आत्मचरित्राने. त्यांच्या इंग्रजी लेखनात सौष्ठव आहे. पण त्यांच्या दृष्टिकोनात भारतासंबंधी काही विकृती आहे, अशी माझी धारणा असल्यामुळे मी त्यांचे हे पुस्तक काहीशा साशंकतेनेच वाचावयास घेतले. पण पुस्तक वाचून झाल्यानंतर एक उत्कृष्ट चरित्रग्रंथ वाचल्याचे समाधान झाले. जन्मभर संस्कृत भाषेची सेवा करणारे युरोपियन पंडित असा मॅक्समुलर यांचा लौकिक असल्यामुळे भारतात अनेकांना त्यांच्याबद्दल आदराची भावना आहे. संस्कृतचे अध्ययन व पुढे संशोधन करण्यासाठी आपला देश सोडून इंग्लंडमध्ये त्यांनी कायमचे वास्तव्य केले. त्यांची प्रखर ज्ञाननिष्ठा, ऋग्वेदाच्या संशोधित आवृत्तीचे इंग्लंडमध्ये प्रकाशन करण्यासाठी त्यांनी केलेली यातायात, भाषाशास्त्रीय आवृत्तीचे इंग्लंडमध्ये प्रकाशन करण्यासाठी त्यांनी केलेली यातायात, भाषाशास्त्रीय संशोधनात त्यांनी टाकलेली मौलिक भर व त्यांच्या वैयक्तिक जीवनातील सुखदुःखे; यांचे चित्रण या ग्रंथात श्री. नीरद चौधरींनी अत्यंत सहृदयतेने व सुबकपणे केले आहे. विद्वान मॅक्समुलरच्या बरोबरीने माणूस मॅक्समुलर अधिक जवळून या ग्रंथात पाहिल्यामुळे आदराच्या जोडीला त्यांच्या बाबतीत नवे आपुलकीचे नाते निर्माण झाल्यासारखे वाटू लागले आहे.

'युद्धकाळी सत्य हे इतके मौल्यवान असते, की त्याच्या शरीररक्षकाचे

काम असत्याला करावे लागते.' हे कोणा तत्त्वज्ञान्याचे नीतिशास्त्रावरील विचार नसून, ब्रिटनचे युद्धकालीन नेत चर्चिल या मुत्सद्द्याचा तो युद्धकालीन निर्णय होता. हेरगिरीला किती विविध तऱ्हेचे काम करावे लागते, याचा नवा तपशील देणारा एक ग्रंथराज नुकताच प्रसिद्ध झाला आहे. 'बॉडीगार्ड ऑफ लाइज्' हे या ग्रंथाचे नाव आहे. त्याचे लेखक आहेत श्री.अँथनी ब्राऊन. दुसऱ्या महायुद्धावरील अगदी वेगळ्या प्रकारचे हे पुस्तक ९०० पानांचे असून, गेल्या काही वर्षांत जे जर्मन, इंग्लिश, अमेरिकन नवे सरकारी कागदपत्र उपलब्ध झालेले आहेत, त्यांच्या संशोधनावर आधारित आहे. युद्धाच्या इतिहासाचे हे एक नवे दालन आहे. हेरगिरीचे किती विविध प्रकार असू शकतात व युद्धाच्या लहान-मोठ्या योजनांना त्यांची किती आवश्यकता असते, याची काहीशी कल्पना या पुस्तकावरून येऊ शकेल. युद्धाच्या प्रगतीवर व वेगवेगळ्या आघाड्यांवर घडलेल्या अनेक घटनांवर नवा प्रकाश यामुळे पडेल. उत्तम कादंबरी वाचताना जी तन्मयता येते, तिचा अनुभव हा ग्रंथ वाचताना वारंवार मला आला. एका-दोन बैठकींत मात्र हे पुस्तक संपणारे नव्हे. आवडणारी वस्तू राखून ठेवून वापरावी, तसे हे पुस्तक मी सावकाशपणे, पण चवीने, चार-पाच आठवडे वाचत होतो.

युद्ध जिंकण्यासाठी नव्या-नव्या आधुनिक शस्त्रास्त्रांची जशी आवश्यकता आहे, तशीच, किंबहुना त्याहीपेक्षा अधिक आवश्यकता आहे, शत्रूच्या गोटात काय शिजत आहे, हे समजण्याची! युद्ध जिंकण्यासाठी ही एकच कसोटी मानली, तर इंग्लंडने, बाहेर जेव्हा ते लढाया हरत होते, त्याच वेळी त्यांनी ते युद्ध जिंकले होते, असे आता दिसते. कारण युद्धाच्या प्रारंभ-पर्वाच्या अखेरीस त्यांनी जर्मन गुप्त संदेशाची लिपी हस्तगत केली होती. ज्या यंत्राद्वारे ते त्या संदेशाची उकल करीत होते, ते 'अल्ट्रा' या नावाने संबोधले जात होते. जर्मन हायकमांड व खालचे सेनानी यांच्यामध्ये येणारे-जाणारे सर्व संदेश 'अल्ट्रा' फोडत असे व त्याचा तजुर्मा त्याच दिवशी ब्रिटीश उच्च सेनानी व प्रत्यक्ष चर्चिलच्या टेबलावर जाऊन पोहोचत असे. पुढे अमेरिकेस ॲटमबॉम्ब हस्तगत झाला. पण त्यापूर्वी तितकाच महत्त्वाचा इंग्लंडचा विजय म्हणजे 'अल्ट्रा'ची 'रचना'; पण त्यांना सगळ्यांत चिंता होती, ती याची, की जर्मनांना आपली गुप्त लिपी फुटली, याची शंकाही येऊ न देण्याची. कारण या गुप्त लिपीचा सर्वोत्तम उपयोग युरोपवर अखेरची जी चढाई करावयाची, त्या वेळी होणार होता. त्यामुळे 'अल्ट्रा'चे अस्तित्व कुणाला कळू न देणे हे त्यांचे महत्वाचे एक

काम बनले. पुष्कळ वेळा 'अल्ट्रा'च्या माध्यमातून मिळालेली माहिती अत्यंत महत्त्वाची असूनसुद्धा जर्मनांना गुप्त लिपी फुटल्याची शंका येऊ नये, म्हणून त्या महत्त्वाच्या माहितीचा उपयोग करावयाचे टाळावे लागले.

यासंबंधीचा एक नमुनेदार किस्सा सांगण्यासारखा आहे. १९४० च्या नोव्हेंबरमध्ये ज्याला 'ब्रिटनची लढाई' म्हणतात, ती हिटलरची वैमानिक हल्ल्याची चढाई शिगेला पोहोचत चालली होती. या वेळी 'अल्ट्रा' च्यामार्फत माहिती मिळाली, की एक ठरावीक दिवशी, ठरावीक वेळी 'काव्हेंट्री' या इतिहासप्रसिद्ध व औद्योगिक शहरावर व तेथील प्रसिद्ध कॅथीड्रलवर पाचशेहून अधिक जर्मन विमाने हल्ला करणार आहेत. चर्चिलपुढे ही माहिती निर्णयासाठी ठेवली, की या माहितीचा उपयोग करून, त्या शहराच्या रक्षणासाठी जय्यत वैमानिक तयारी करावयाची, की नाही ? चर्चिलने सर्व बाबींचा विचार करून निर्णय घेतला, की हल्ला व त्यातून होणीरी हानी स्वीकारावयाची; परंतु रक्षणाची तयारी करून, 'अल्ट्रा' च्या अस्तित्वाची शंका जर्मनांना येऊ द्यायची नाही आणि तसेच घडले. एक जुने महत्त्वाचे शहर उद्ध्वस्त झाले. पण अल्ट्राचे शत्रूच्या शंकेपासून रक्षण केले.

उत्तर आफ्रिकेत रोमेलचा पाडाव करण्यासाठी फसवणुकीचे टाकलेले डावपेच असेच मनोवेधक आहेत. युद्धाच्या रक्षणाच्या रणनीतीमध्ये फसवणुकीच्या डावपेचांना (डिसेप्शन) मानाचे स्थान असते. असे 'कात्रजचे घाट' घातल्याशिवाय निव्वळ शौर्याच्या बळावर लढाया जिंकता येत नाहीत. उत्तर आफ्रिकेच्या लढाईत जनरल रोमेल शौर्यात हरला नाही, तर डावपेचांत फसला.

दोस्त राष्ट्रांमध्ये दुसरी आघाडी केव्हा व कुठे उघडावयाची, याबाबतीत १९४२ ते ४४ पर्यंत सतत संघर्ष आणि वादविवाद चालू होते. या वादविवादाची हकीगत रोमहर्षक आहे. लष्करी मूलभूत निर्णय कसे घ्यावे लागतात, याचे प्रात्यक्षिकच या पुस्तकात पाहावयास मिळते. शेवटी ६ जून १९४४ रोजी सहा हजार जहाजांचा तांडा, लक्षावधी सैन्य, शस्त्रास्त्रे यांच्यासह फ्रान्सच्या किनाऱ्यास पोहोचतो व जगाच्या इतिहासात अजोड असे एक समुद्रमार्गे केलेले आक्रमण सुरू होते.

हेरगिरीचे व डावपेचांचे जे अनेक पवित्रे वर्षानुवर्षे टाकले जात होते, त्यांचे हे फलित या ग्रंथात तपशिलाने दिले आहे.

या ग्रंथाच्या संगतीत गेलेला वेळ माझ्या दृष्टीने संस्मरणीय आहे.

आत नुकतेच मी वाचून संपविलेले दुसरे नवे पुस्तक अमेरिकन 'बेस्ट सेलर्स' - पैकी एक आहे. 'रूट्स' हे पुस्तकाचे नाव. लेखक अलेक्स हॅली आहे. पुस्तक उत्तम कादंबरीसारखे रसाळ आहे. पण कादंबरी नाही. ग्रंथकार हॅली यांनी आपल्या कुटुंबाचा दोनशे वर्षांचा इतिहास दिला आहे. त्यांच्या कुटुंबाचा आफ्रिकन मूळपुरूष कुंटा कुंटे हा अमेरिकेत आला कसा व कुठून, या प्रश्नाने त्याची जिज्ञासा जागी झाली; आणि वर्षानुवर्षाच्या संशोधनानंतर हा काळ्या अमेरिकेचा प्रतिनिधी लेखक एक दिवस पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील गॅम्बिया देशातील जुफुरे या गावी आपल्या रक्ताच्या नात्याच्या सात पिढ्यांनंतरच्या भाऊबंदांना भेटला. त्यांच्याशी बोलला. लेखक अलेक्स हॅलीने आपल्या लहानपणी आपल्या आजीच्या तोंडून पिढ्यान् पिढ्या चालत आलेली आफ्रिकन मूळपुरूषाची कहाणी ऐकली होती. आपण समुद्राच्या पार असलेल्या मुलखातून आलो. वयाच्या सोळाव्या वर्षी एक दिवस जंगलात आपल्या ढोलासाठी (ड्रम) बांबूच्या झाडाच्या बुंधा तोडून आणण्यासाठी गेलो असता आपली शिकार झाली. गुलाम म्हणून साखळदंडाने बांधलेल्या स्थितीत या देशात आलो. 'आपला मुलुख समुद्रपार असून कॅनिबोलोंगोच्या शेजारी आपली वस्ती होती.' त्या कहाणीचा एवढाच सारांश हॅलीच्या सातव्या पिढीपर्यंत पोहोचला होता. पंरतु अलेक्स हॅलीने हा धागा पकडून आपल्या कुटुम्बवृक्षाच्या  मुळ्या शोधून काढण्यासाठी प्रयत्नांचे पर्वत रचले. पाच लाख मैलांचा प्रवास केला. लागोपाठ दहा वर्षे याच गोष्टीचा ध्यास घेऊन संशोधन केले. पण त्याचे फलित त्याला मिळाले. त्याने ऐकलेली माहिती, मिळालेल्या कागदपत्रांचा आधार, मुलाखती घेऊन जमा केलेला तपशील यांचा एक मेळ घालून त्याने सात पिढ्यांचा हा इतिहास रचून उभा केला. लेखक म्हणूनही ते अप्रतिम काम पार पाडल्याबद्दल तो अभिनंदनास पात्र आहे. पण त्यापेक्षाही अडीच कोटी काळ्या अमेरिकन मानवांचा हा प्रतीकात्मक इतिहासच मानला, तर माणूस म्हणून त्याने इतिहासाची फार मोठी सेवा केली आहे. त्याबद्दल सर्वांवरच त्याचे ऋण आहे. हा अमेरिकेतील काळ्या लोकांपुरता मर्यादित प्रश्न नाही.

भारतातील शेकडो कुटुंबे अनेक देशांत विखुरली गेली आहेत. दक्षिण पॅसिफिकमधील फिजी बेटापासून ते दक्षिण अमेरिकेतील गियाना व सुरीनाम या देशापर्यंत शे-दीडशे वर्षांपूर्वी सक्तीने मजुरीसाठी  हे लोक दंडेलीने नेले

गेले. त्यांतील कित्येकांच्या घरांत या ग्रंथातील मूळ आफ्रिकन पुरूषासारख्या सांगितलेल्या कहाण्या आज आजीबाई नातवाला सांगतील, की -

'आपला मूळ पुरूष साता समुद्रांपलीकडून आला आणि तो तिथे कोठेतरी गंगेच्या शेजारी रहात होता.'

सतत गेली जवळजवळ दोन वर्षे माझ्या मनाला बोचत असलेला एक अनुभव नमूद केला पाहिजे. १९७५ च्या सुरूवातीला मी गियानाला परराष्ट्रमंत्री म्हणून अधिकृत भेटीसाठी गेलो होतो. गियानामध्ये अर्ध्याहून अधिक लोक भारतीय वंशाचे आहेत. भेटीचे पहिले दोन दिवस औपचारिक सरकारी चर्चा, गाठीभेटींमध्ये गेल्यानंतर जॉर्जटाऊन या राजधानीच्या शहरापासून दीड-दोनशे मैलांवर असलेल्या बॉक्साइटच्या खाणी पाहण्यासाठी हेलिकॉप्टरमधून गेलो. तेथे मार्गदर्शक म्हणून एक तरूण अधिकारी बरोबर होता. तरतरीत नाका-डोळ्यांचा व सावळ्या वर्णाचा हा तरूण हुशार व कार्यतत्पर वाटला. तो माझ्याशी अधिक आपुलकीने वागत होता. सर्व काम संपले व तेथून निघण्यापूर्वी मी कारणाशिवाय त्याला तो प्रश्न केला, 'तुझे पूर्वज भारताच्या कोणत्या प्रदेशातून आले?'

तो एकदम शांत झाला. काही क्षण बोललाच नाही. त्याचे डोळे माझ्याकडे होते. परंतु नजर कुठेतरी दुसरीकडे काही तरी शोधीत होती.

बऱ्याच वेळानंतर तो उत्तरला.

'माहीत नाही, कुठे तरी गंगेच्या काठावरून, बहुधा-बिहारमधून'.

त्याच्या शून्य नजरेत क्षणभर पाहिलेले कारूण्य मला अजून सतावत असते. मग अलेक्स हॅलीने आपल्या 'रूट्स'मध्ये जीव ओतून आपल्या कुटुंबाच्या मुळाचा शोध केला, त्याला काही एक नवा अर्थ माझ्या दृष्टीनेही प्राप्त होतो.

## ६ ५... हिंदीची प्रगती कशी होईल ?

सध्या हिंदी भाषा एका मोठ्या संक्रमणावस्थेतून जात आहे. यापूर्वी हिंदी साहित्याच्या इतिहासात अशा प्रकारच्या संक्रमणावस्थेचा काळ कधी आला नसेल. दुसऱ्या प्रांतिक भाषांशी तुलना करता, हिंदी भाषा बोलणारे लोक देशाच्या निरनिराळ्या भागांत अधिक प्रमाणात असल्यामुळे या भाषेला राष्ट्रभाषा बनण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे. तथापि, या थोर मानाची जिम्मेदारी चांगल्या प्रकारे पार पाडण्याचे काम विशेषतः हिंदी साहित्यिकांचे आहे. आज देशाच्या कोनाकोपऱ्यांतून हिंदी भाषेचा प्रसार करण्याची आवश्यकता तर आहेत. परंतु त्याहीपेक्षा हिंदी भाषेतील शब्दसंपत्ती आज अशा प्रकारे वाढविली पाहिजे की, ज्यामुळे आधुनिक विचारप्रवाह, शास्त्रीय व तांत्रिक विषय आणि त्याचप्रमाणे राज्यकारभार यांची संपूर्ण गरज ती चांगल्या प्रकारे भागवू शकेल. या दिशेने केंद्रीय सरकारतर्फे उच्च पातळीवर बरेच कार्य चालू आहे. तथापि, हे महान कार्य त्वरित पूर्ण होण्यासाठी सर्वच हिंदी साहित्यिकांच्या हार्दिक सहकार्याची विशेष आवश्यकता आहे.

इतर प्रांतिक भाषांशी हिंदी भाषेचे अधिक प्रमाणात साहचर्य व्हावयास पाहिजे. तसे झाल्यास, सगळ्या प्रांतिक भाषांबरोबर हिंदीचीही खऱ्या अर्थाने प्रगती होऊ शकेल. प्रांतिक भाषांतील चांगल्या व मौलिक साहित्याचा हिंदी भाषेत अनुवाद व्हावयास पाहिजे, त्याचप्रमाणे हिंदी भाषेतील मौलिक साहित्याचाही प्रांतिक भाषांतून अनुवाद झाला पाहिजे. साहित्याच्या या देवाणघेवाणीबरोबर शब्दसंपत्तीचीही देवाणघेवाण झाल्यास परस्परांमधील जिव्हाळा वाढविण्याच्या दृष्टीने बरीच मदत होईल. जितक्या अधिक प्रमाणात प्रांतिक भाषांतील शब्द हिंदी भाषेत रूढ होतील, तितकी हिंदी भाषा त्या त्या प्रांतातून अधिक सहजगत्या समजू शकेल. त्याचप्रमाणे हिंदीतील शब्द व वाक्यप्रचार यांचा इतर प्रांतिक भाषांतून अधिक प्रमाणात समावेश झाल्यास त्या त्या भागातील लोकांना हिंदी शिकणे अधिक सोपे जाईल. संस्कृत भाषेचा फार मोठा प्रभाव हिंदीसहित सर्व प्रांतिक भाषांवर पडला आहे. त्यामुळे चांगल्या संस्कृत कलाकृतींचा हिंदी अनुवाद देशात सर्वत्र लोकप्रिय

होऊ शकेल. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन वगैरे प्रमुख परदेशी भाषांमध्ये फार मोठे ज्ञानभांडार भरलेले असून, त्या भाषांतील निवडक ग्रंथांचा संक्षिप्त रूपाने हिंदीत अनुवाद झाल्यास हिंदी साहित्य अधिक संपन्न होऊ शकेल. अशा प्रकारच्या अनुवादित साहित्याबरोबरच नवीन विचारप्रवाहास स्फूर्ती देणाऱ्या मौलिक साहित्याचीही हिंदी भाषेत निर्मिती होणे आवश्यक आहे. अशा नवीन साहित्यात पौर्वात्य जीवनातील चांगल्या गोष्टींसंबंधीचेही ज्ञान त्यात असले पाहिजे. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर जीवनमूल्यांतही आश्चर्यकारक असे बदल होत असून, त्यांचे यथोचित मूल्यमापन नव्या हिंदी साहित्यात होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नवीन हिंदी साहित्यिकांना योग्यतेनुसार प्रोत्साहन मिळाले पाहिजे आणि त्यांच्या कलाकृती सुलभरीत्या प्रकाशित होण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

सामान्य लोकांना हिंदी भाषा समजण्यास अडचण पडू नये, म्हणून ही भाषा शक्य तितकी सरळ व सोपी ठेवण्याचे जाणूनबुजून प्रयत्न झाले पाहिजेत. साहित्यिक हिंदीमध्ये संस्कृत आणि इतर शब्दप्रयोगांचा वापर होणे काही अंशी अपरिहार्य असले, तरी हा वापर शक्यतो मर्यादित ठेवणे हिंदी भाषेच्या भावी प्रगतीच्या दृष्टीने उचित होईल. खडी बोलीसारख्या हिंदीच्या बोलीभाषेतून सर्वसाधारण लोकांस समजण्यास कठीण अशा संस्कृत शब्दांचा उपयोग अजिबात टाळता येणे शक्य आहे. भारतामध्ये भौगोलिक विविधता असूनसुद्धा, अनादिकालापासून आश्चर्यकारक सांस्कृतिक ऐक्य अस्तित्वात आहे. परंतु पारतंत्र्याच्या काळात आपापसांतील मतभेद वाढले आणि धर्म, जाती, भाषा, प्रांतीयता वगैरे निरनिराळ्या कारणांमुळे आमच्यांत असलेली फूट वाढवून परकीय सत्तेने आम्हांला गुलामगिरीच्या शृंखलांत जखडून ठेवले. परंतु स्वातंत्र्याच्या आंदोलनातून आमच्या राष्ट्रीय ऐक्याचे खरे स्वरूप प्रखरपणे प्रकट झाले. तथापि, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही ठिकाणी संकुचित स्वार्थामुळे मतभेद तीव्र होत गेले. बऱ्याच कालावधीनंतर आपल्या देशास संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे. पण राष्ट्रीय ऐक्य कायम टिकविण्यात आपण अयशस्वी झालो, तर आपले स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. इतिहासात प्रथमच आपला संपूर्ण देश जनतेने चालविलेल्या शासनाखाली प्रजासत्ताक बनला आहे. तेव्हा त्याचा गौरव वाढावा, म्हणून देशातील निरनिराळ्या लोकांमध्ये संपूर्ण ऐक्याची भावना असणे अत्यंत आवश्यक आहे. आपले मतभेद समजुतीने मिटवून अभेद्य अशा एकजुटीच्या भावनेने आपण राष्ट्रीय विकासकार्याला

वाहून घेतले पाहिजे. हिंदी भाषा ही राष्ट्रीय ऐक्याची वाढ करणारी एक फार मोठी शक्ती आहे, म्हणून हिंदीच्या प्रगतीबरोबरच देशाच्या एकतेतही वाढ होत जाईल.

महाराष्ट्र सरकारकडून हिंदी भाषेच्या अध्ययनास व अध्यापनास योग्य ते प्रोत्साहन दिले जाते. महाराष्ट्र शासनाच्या नोकरवर्गाला हिंदीचा चांगल्या प्रकारे परिचय व्हावा, म्हणून हिंदीच्या काही परीक्षा उत्तीर्ण होणे त्यांच्या बाबतीत आवश्यक करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे काही हिंदी परीक्षांना इतर शैक्षणिक परीक्षांच्या बरोबरीची मान्यताही देण्यात आली आहे. शाळांतून हिंदी शिक्षणाची योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे.

आमच्यासमोर प्रत्यक्ष लोकमान्य टिळक व विनोबाजी भावे यांचे आदर्श आहेत. लोकमान्यांना सुरूवातीस हिंदी येत नव्हते. परंतु आपल्या देशभक्तीमुळे आणि आपल्या स्वदेशाभिमानामुळे राष्ट्रभाषा हिंदीचे त्यांनी ज्ञान करून घेतले आणि पूर्ण विचारांती हिंदी हीच सबंध देशाची भाषा होऊ शकेल, या निर्णयाप्रत ते आले. त्यानंतर त्यांनी हिंदीच्या प्रसारकार्यामध्ये लक्ष घालण्यास सुरूवात केली. राष्ट्राचे संघटन व ऐक्य साधण्यासाठी सगळ्या ठिकाणी समजली जाईल, अशा भाषेची फार आवश्यकता असून, हिंदी हीच अशा प्रकारची भाषा आहे, असे ते नेहमी म्हणत असत. महात्मा गांधीच्या विचारानुसार हिंदीला त्यांनी राष्ट्रभाषा म्हणून मानली होती. हिंदी भाषेच्या प्रसारकार्यामागे याप्रमाणे महात्मा गांधी व लोकमान्य टिळक यांच्या विचारांची प्रेरणा आहे. महाराष्ट्रात हिंदीचा प्रसार सुव्यवस्थित रीत्या चालू असून, येथे या भाषेचा जो व्यापक स्वरूपात प्रसार झालेला आहे, त्या प्रसाराची पार्श्वभूमी या प्रांतातील या महान नेत्यांनीच तयार केली आहे, ही आमच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद अशी बाब आहे. सर्वश्री बाबुराव विष्णु पराडकर, माधवराव सप्रे, लक्ष्मण नारायण गर्दे, दुगवेकर आणि काका कालेलकर या मराठी विद्वानांनी तर हिंदी भाषेची अविस्मरणीय अशी सेवा केली आहे. अशा तऱ्हेची सेवा करण्याची महाराष्ट्रात एक परंपरा निर्माण झाली आहे, ही परंपरा कायम राखणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे.

महाराष्ट्रात हिंदीच्या प्रचारासाठी अतिशय अनुकूल असे वातावरण आहे, विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुसंख्य लोकांना हिंदी चांगले येते. पश्चिम महाराष्ट्रातील मोठ्या शहरांतून हिंदीच्या प्रसाराकडे योग्य तऱ्हेने लक्ष देण्यात येत आहे. तथापि, महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला काही ठरावीक कालावधीत

हिंदीचा चांगला परिचय होईल, अशा दृष्टीने या राज्यात हिंदीच्या प्रसाराचे योजनाबद्ध कार्य जोमदार होण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात मराठी व इतर दुसऱ्या भाषा यांच्या प्रगतीबरोबरच हिंदीचीही द्रुतगतीने प्रगती होईल, याबद्दल मला बिलकूल संदेह वाटत नाही.

# ६६... सामाजिक जबाबदारी

चाळिशी म्हणजे जीवनाची माध्यान्ह. बालपण केव्हाच संपलेलं असतं. तारूण्य संपत आलेलं असतं. एकीकडे म्हातारपणाची चाहूल लागत असते, तर दुसरीकडे तारूण्यातील गोड, आनंदी, जिद्दीची, उमेदीची वर्षे अजूनही सकाळीच खुडलेल्या फुलांसारखी ताजी असतात. त्याचबरोबर आता सुकून जाण्याची वेळ आली आहे, ही खंतही मनात जन्म घेत असतेच. एकीकडे जीवनाबद्दल प्रचंड अभिलाषा, तर एकीकडे संपत चाललेल्या प्रवासाचं टोक नजरेसमोर येऊ लागलेलं !

अशा वयात केलेल्या गोष्टींचा हिशेब होतो. जे भोगलं, जे उपभोगलं, त्याच्या अनुभवाबरोबरच, पुढच्या प्रवासाची थकवा आणणारी वाट पायांखाली असते. केलेल्या चुका, चुकलेले आडाखे, दाखविलेले स्वार्थ यांतून केलेली आयुष्याची वाटचाल आठवत राहते. तर आलेले कडवट अनुभव गाठीशी बांधून 'जग गेलं खड्ड्यात' असं म्हणून पुढचा प्रवास सुरू होतो. त्यातून आणखीनच कडवटपणा वाढत जातो.

आयुष्याची संध्याकाळ सुखासमाधानानं, खऱ्या अर्थानं निवांतपणात, निरोगी मनानं घालवायची असेल, तर त्याची तयारी चाळिशीतच करायला हवी. कडवट आठवणी, कटू अनुभव, दुःखद प्रसंग-सगळं बाजूला ठेवून, नव्या उमेदीनं पुढच्या प्रवासाची तयारी करायला हवी.

माणूस चाळिशीत यायला लागला, की तो काहीसा स्वस्थ होतो. त्याला आयुष्यात स्वास्थ्य लाभतं. आयुष्यात काहीतरी वेगळं करायचा हाच खरा काळ असतो. ज्या माणसांना काहीतरी करावंसं वाटतं, ते करतात. पण ज्यांना मिळालेल्या स्वास्थ्यातच आनंद वाटतो, ते काहीही करीत नाहीत. फक्त स्वतः बद्दल विचार करीत राहतात. नव्या पिढीबद्दल आकस आणि जुन्या वृद्ध माणसांबद्दल त्यांना तुच्छता वाटत राहते. मग बेकार तरूणांचे प्रश्न असोत किंवा वृद्धांच्या समस्या असोत, त्यांबद्दल त्यांना काहीही वाटत नाही. हे लोक आपल्या सुखदुःखांत मश्गुल असतात. आपल्या कुटुंबाचीच फक्त त्यांना

काळजी वाटत असते. आपला बँक-बॅलन्स कसा वाढेल. याबद्दल रात्रंदिवस ते विचार करीत राहतात. यामध्ये ते आयुष्याची फार महत्त्वाची वर्षे वाया घालवीत असतात. समाजाला त्यांचा काय उपयोग होतो? काहीच नाही. ज्या समाजात, ज्या देशात आपण जन्मलो, त्या देशाला, समाजाला आपला काहीतरी उपयोग व्हायला नको का? माणूस हा 'सामाजिक प्राणी' असं म्हणतात. तेव्हा सामाजिकत्व हे त्याच्या सामाजिक बांधिलकीवरच अवलंबून असतं.

आतापर्यंत आयुष्यात केलेल्या धडपडीचं थोडं फार फळ माणसाला या वयापर्यंत मिळालेलं असतं. त्यांच्या मुलाबाळांची शिक्षणं होत असतात. त्यानं थोडी-फार बचतही केलेली असते. नोकरीतून निवृत्त झाल्यावर काय करायचं, याचा विचार त्यानं आत्तापर्यंत केलेला असतो. घर सुरळीत चालत असतं, बायको, मुलं आणि तो. त्याचं घर आणि तो.

नेमक्या या स्वास्थ्यातून कळत-नकळत त्याच्या जीवनात एक प्रकारचा रूक्षपणा येत असतो. आजूबाजूच्या वातावरणाशी तो एकरूप होऊ शकत नाही. त्याचं लक्ष घरातच राहतं. मग बाहेरच्या, आजूबाजूच्या प्रत्येक गोष्टीला नावं ठेवायची सवय लागते आणि त्यांच्याकडे दुर्लक्षही होत जातं.

या वयात भरपूर वेळ मिळत असतो; पण तो वेळ आपण कारणी लावतो का? पत्ते, क्लब, गप्पा, झोप यांतच बराचसा वेळ जातो. मनाला उगीचच थकल्यासारखं वाटत राहतं. कंटाळा, दमल्याची भावना, अशक्तपणा, किरकोळ आजार यांचं कौतुक करता-करता वर्षामागं वर्ष निघून जातात.

हा रूक्षपणा घालविण्यासाठी मिळत असलेला वेळ आणि स्वास्थ्य यांचा चाळिशीच्या उंबरठ्यावर आलेल्या व्यक्तीनं फायदा करून घ्यायला हवा. त्याला घरापासूनच सुरूवात करता येईल. नव्या-जुन्या पिढींतलं अंतर तुम्ही घरातच नाहीसं करण्याचा प्रयत्न केलात, तर घर आहे त्यापेक्षा कितीतरी आनंदी, समाधानी दिसू लागेल आणि म्हातारपणी तुम्हांला समजून घेण्याचीही वृत्ती मुलांमध्ये निर्माण होईल.

पण तुमचं घर म्हणजे संपूर्ण जग नव्हे, हेही तुम्ही जाणून घ्यायला हवं. ते तुम्हांला आता या चाळिशीत जाणवलं नाही, तर पुढं कळूनही वळणार नाही. म्हातारपणी एकाकी पडू नये, असं वाटत असेल, तर समाजात मिसळण्याची सवय आतापासून अंगी बाळगायला हवी.

आपणही समाजाचे घटक आहोत. समाजाचं आपल्यावर ऋण आहे, ही

भावना मनात आणली, तर तुम्हांला या समाजासाठी कितीतरी गोष्टी करता येतील. समाजऋण हे केवळ पैसा देऊनच फेडायला लागतं, असं नाही, तर काही प्रेमाचे शब्द, आपुलकीची भावना, थोडे-फार कष्ट आणि याबरोबरच समाजाविषयीची तळमळ असली, तरी कितीतरी कामं करता येणं सहज शक्य आहे.

तेव्हा या वयात आपण आपल्या कुटुंबाचा दीपस्तंभ तर बनायला हवंच, पण त्याच वेळी समाजासाठीही आपल्या आयुष्यातला काही काळ द्यायला हवा, विशेषतः, आर्थिक दृष्टीनं कमकुवत असलेल्या समाजासाठी, अपंगांसाठी, अशिक्षितांसाठी आपल्याला घरबसल्या कितीतरी गोष्टी करता येतील, या करण्यातूनच पुढं मोठ्या संस्था उभ्या राहत असतात. चळवळी फोफावतात, सामाजिक बदल दृष्टिपथात येतात. बाबा आमट्यांची कुष्ठरोग्यांची संस्था, अनाथ बालगुन्हेगारांसाठी चालविलेल्या महाराष्ट्रातल्या शेकडो संस्था, मूकबधिर, अंध, मतिमंद पंगू मुलांसाठी उभ्या केलेल्या संस्था - किती म्हणून उदाहरणं द्यावीत! अशिक्षित, आदिवासी दलितांसाठी उभ्या केलेल्या चळवळीही काही कमी नाहीत. ज्यांच्यासाठी या संस्था उभ्या केल्या, ती माणसं संस्था उभारणाऱ्यांची कोणी नातेवाईक होती का? कोणीही नव्हती. रक्ताची नाती नव्हती - पण माणुसकीची नाती होती! या संस्थेच्या पायाचा दगड असणारी मंडळीही तशी कोणी श्रीमंत, राजकारणी होती का? नाही. सर्वसाधारण माणसं, श्रीमंती त्यांच्या विचारात आणि कर्तृत्वात होती. म्हणूनच त्या त्या व्यक्ती म्हणजे संस्था झाल्या.

आपल्या भारतीय संस्कृतीत मातृऋण पितृऋण हा अत्यंत उच्चकोटीचा संकेत आहे. ज्यांनी जन्म दिला, ज्यांनी वाढवलं, लहानाचं मोठं केलं, जगात राहायला, चालायला, संकट झेलायला शिकवलं, त्या आईवडिलांचं ऋण आपण मानतो. आपण कितीही मोठे झालो, तरी आईवडिलांना आपण लहानच असतो. ते आपल्यावर सतत प्रेमाचाच वर्षाव करतात. त्यांच्यासाठी आपण काही करणं हे आपलं कर्तव्य असतं, प्रेमापोटी आपण ते करतो.

समाजऋणाचंही तसंच असतं, आपल्याला जरी वाटत असलं की, समाजानं आपल्याला काहीही दिलं नाही, तरी तसं नसतं, आईवडील संस्कार देतात. समाज संस्कृती देतो. आईवडील प्रेम देतात. मायेची पाखर घालतात. समाज आपल्याला सामाजिक रूप देतो. बरे-वाईट अनुभव देतो. त्या समाजाचं आपण ऋणी असायला हवं.

आपल्या तारूण्यात, बालपणात आपल्याला बरंच काही वाईटही भोगायला लागलेलं असतं. प्रत्येकजण काही फुलांत वाढलेला नसतो. काट्याकुट्यांतच बऱ्याच जणांचं बालपण-तारूण्य गेलेलं असतं. परंतु मोठेपणी आपल्या मुलाबाळांच्याही वाट्याला तसे वाईट दिवस येऊ नयेत, आपण जे लहानपणी भोगलं, तसं मुलांना तरी भोगायला लागू नये, अशी कोणत्याही आईवडिलांची इच्छा असतेच ना! त्यासाठी कष्ट उपसायला त्यांची तयारी असतेच ना! तसंच इतरांच्याबद्दलही वाटायला हवं! आपण जे दुःखद अनुभव घेतले, आपल्याला त्या काळात  समाजाकडून जो त्रास, मनस्ताप झाला, तो आता समाजातल्या इतरांना तरी होऊ नये, यासाठी आपण पुढं व्हायला हवं. ते समाजऋण फेडणं नाही का? ते जर फेडण्याची  आपण चाळिशीला सुरूवात केली, तर खऱ्या अर्थानं आपण कृतार्थ जीवन जगत आहोत, असं म्हणता येईल. स्वतःबद्दलचा विचार बाजूला करून, आजूबाजूच्या दीनदुबळ्यांच्या प्रश्नाचा विचार करायची चाळिशीच्या उंबरठ्यावर सवय लावायला हवी. आता जर काही करायची इच्छा मनी आणली नाही तर पुढं काहीच करता येणार नाही. कौटुंबिक समस्या वाढत जातात. मुख्य म्हणजे, शरीर साथ देत नाही. त्यामुळं मनही वृद्ध होत जातं. वेळ टळून जाण्यापूर्वीच सुरूवात करायला हवी. विचारांना गती द्यायला हवी. समाजासाठी कोणत्या रीतीनं काय करू शकू, याचा वेध घ्यायला हवा, आणि तसं केलं, तर दोन गोष्टी साध्य करता येतील. नव्या-जुन्या पिढ्यांमधील दुरावा कमी होण्याचा मार्ग सुकर होईल. समाजात विश्वास, रस निर्माण होईल आणि त्याचबरोबर आपलं व्यक्तिमत्त्व फुलविण्याला, उर्वरित आयुष्यात चैतन्य निर्माण व्हायला मदत होईल ! आपण चाळीशीतही तरूण होऊ शकू. ही पुढल्या आयुष्याची शिदोरी आहे. आयुष्यातल्या संध्याकाळची एकाकी, दुःखी वृद्धावस्था टाळण्यासाठी या शिदोरीचा खूपच उपयोग होऊ शकेल.

यावर कोणी म्हणेल, संसाराचा वाढता व्याप सांभाळता-सांभाळता महागाईला तोंड देता-देता इथं माणसं बेजार होत आहेत, त्यांना जीव नकोसा होतोय, सर्वत्र निराशा दिसते आहे. अशा वेळी समाजकार्य कसं होणार त्यांच्या हातून?

एका अर्थानं हे खरं आहे. पण हे झालं स्वतःच्या संसारापुरतं. समाजपुरूषाचा संसार चालविण्यासाठी, ज्यांना समाज आपला वाटतो, त्यांनी स्वतःच्या अडीअडचणी बाजूला ठेवून पुढं यायला नको का? अशी पुढं येणारी

माणसंच समाज घडवू शकतात, राष्ट्र उभं करू शकतात, हे नाकारता येणार नाही.

आम्ही लहानपणापासूनच सामाजिक, राजकीय चळवळीत होतो, तेव्हा स्वातंत्र्यप्राप्ती हेच ध्येय होतं. आता ध्येय आहे सुराज्याचं, समाज बलशाली, एकसंध बनविण्याचं. यात तरूणांनी भाग जरूर घ्यावा. पण एवढं लक्षात ठेवावं, स्वतःचा पाया बळकट असायला हवा. आता आपल्याला विचारांचं आंदोलन उभं करायचं आहे आणि अशी वैचारिक आंदोलनं करण्यासाठी भक्कम वैचारिक बैठकही हवी असते.

माणसानं पस्तिशी ओलांडली, म्हणजेच असा नवा दृष्टिकोन तयार होतो, असंही नाही. तारूण्यातही त्याला खतपाणी मिळालेलं असतं. चाळिशीत व्यक्तीच्या विचारांमध्ये परिपक्वता येते. ती मॅच्युअर्ड होते. आवडीनिवडींविषयी तिची मतं पक्की होत जातात. हीच वेळ, हेच वय समाजाला काहीतरी देण्याचं असतं.

काही काही वेळी चाळिशीत नव्या पिढीला सतत नावं ठेवण्याची प्रवृत्ती दिसून येते. 'हल्लीची पोरं वाहवलीत.. त्यांना काहीच ताळतंत्र राहिलं नाही... त्यांना स्वतःपुढं दुसरं काहीच दिसत नाही... त्यांचे कपडे बघून लाज वाटते. ... आमच्या वेळी आईवडिलांबद्दल, गुरूजनांबद्दल आम्हांला आदर होता. आता मोठ्यांच्या समोर खुशाल तरूण पोरं सिगारेटी ओढतात. मित्रमैत्रिणींबरोबर गुलगुलू बोलतात ...' ही अशी वक्तव्यं ऐकली, की वाटतं, जगबुडी जवळ आली, की काय! आपण कोणत्याही गोष्टीत पराचा कावळा करीत असतो. एखादं वाईट उदाहरण आपल्यासमोर आलं, की आपण 'सगळेच तसले' असे खुशाल म्हणत राहतो.

हे चुकीचं आहे. काळानुसार माणसं बदलणारच. तो दोष त्यांचा नाही. परिस्थितीच त्यांना तसं बनविते. जग सध्या इतक्या झपाट्यानं बदलत आहे, इतक्या वेगानं जवळजवळ येतं आहे, पन्नास वर्षांपूर्वीच्या कल्पनाच ढासळून पडत आहेत. सध्याचं जीवनच इतकं वेगवान झालं आहे की, त्यातील सामील न होणारा बाजूला फेकला जातो. तेव्हा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच या वयात बदलायला शिकलं पाहिजे, तरच जीवन सुसह्य होईल. एकदा का माणसानं पन्नाशी ओलांडली, की मत, विचार, स्वभाव, कल्पना बदलताच येत नाहीत. त्यामुळं, आपलं तेच खरं, ही वृत्ती अधिक कणखर, अधिक घट्ट बनत जाते. जगात असलेली सुसंगती, विसंगती पाह्यला शिकलं पाहिजे.

दोन पिढ्यांमधील जी दरी आहे, ती कशा तऱ्हेने दूर करता येईल, त्याचाही प्रत्येकानं विचार करायला लागलं पाहिजे.

शहरात आणि खेड्यात झपाट्यानं होत चाललेल्या बदलाची चाहूल जाणीवपूर्वक घेण्याची वेळ आता आलेली आहे. चाळिशीच्या माणसानं आताच ती चाहूल घ्यायला हवी.

देश पारतंत्र्यात होता, तो काळ मला आता पुन्हा आठवतो. तो काळ कसा भारावलेला होता! हजारो -लाखो तरूण, स्त्रीपुरूष, वयोवृद्ध, प्रौढ, स्वातंत्र्याच्या प्रेरणेनं ब्रिटिशांविरूद्ध लढायला उभे होते. कितीतरी जणांनी आपल्या प्राणांच्या आहुती स्वातंत्र्यसंग्रामात दिल्या . त्या काळात स्थापन झालेल्या प्रत्येक संस्थेच्या पुढे स्वातंत्र्यासाठी चळवळ हा प्रमुख हेतू होता. स्वतःच्या घराला, शिक्षणाला, संपत्तीला तिलांजली देऊन विविध वयांतले, विविध जातिधर्मांचे स्त्री-पुरूष स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडत होते. .. तो काळच मंतरलेला होता.

आताच्या पिढीसमोर तो विषय नाही. स्वातंत्र्यप्राप्ती हे ध्येयही नाही. स्वातंत्र्य मिळालं. त्या काळातले अनुभव आम्हाला मिळाले. ते आमचं रिवॉर्ड आहे. आताच्या पिढीला, मिळालेले स्वराज्य टिकवायचं, वाढवायचं, समृद्ध करायचं ध्येय समोर ठेवता येईल.

कोणीतरी म्हणतं, सगळा समाजच नीतीभ्रष्ट झाला आहे. प्रत्येकजण मग तो लहान-मोठा, कोणत्याही वयाचा असो, स्वार्थी झाला आहे. समाजमूल्यं बदलली आहेत, पण यात संपूर्ण सत्य नाही आणि बदल हा अटळच असतो. पिढीपिढीत नीति-अनीतीच्या कल्पना बदलत जाणारच, या सगळ्याचे परिणाम आता दिसतात. पण म्हणून संपूर्ण समाजच सडला आहे, असं म्हणणं अत्यंत चुकीचं आणि अन्यायाचं होईल.

या पिढीला- विशेषतः, ज्यांना आता स्वास्थ्य लाभत आहे, त्यांना देश-विकासासाठी, सामाजिक सुधारणांसाठी निश्चितपणे भरीव असं कार्य करता येईल. समाजाला एकत्र बांधून ठेवण्यासाठी, तो एकरूप व्हावा, यासाठी खूप करता येण्याजोगं आहे.

पुरूष असो किंवा स्त्री असो, चाळिशीत कोणालाही समाजासाठी बरंच काही करता येतं. मात्र एक गोष्ट नक्की, पुरूष चाळीशीत आला, की कुटुंबापासून काहीसा दूर राहू शकतो. त्याला इच्छा असेल, तर कुटुंबाव्यतिरिक्त समाजासाठी काही करण्यासाठी वेळ मिळू शकतो. पण

स्त्री मात्र चाळिशीत घरामध्ये आणखीनच अडकत जाते. आई म्हणून तिच्यावर खूपच जबाबदाऱ्या पडत राहतात. घरातला तीच महत्त्वाचा घटक असते. घरावर तिचा खूपच प्रभाव पडत असतो आणि यातूनही वेळात वेळ काढून हल्ली कितीतरी स्त्रिया समाजकार्यासाठी बाहेर पडत असतात. मग ती कोणतीही समस्या असो. झोपडपट्टीतलं आरोग्य, बालवाडी, यांपासून मतिमंद, अंध, मूकबधिर मुलांच्यासाठी ज्यांनी काम करायला सुरूवात केली, त्यांत जवळजवळ सगळ्याच स्त्रिया आहेत. घरच्या अडचणी बाजूला ठेवून त्यांनी या कामाला सुरूवात केली. अजूनही करताहेत.

जेव्हा स्त्री बदल होत जातो, तेव्हा समाजातही बदल होणं अटळ असतं. समाजबदलाची प्रक्रिया ही स्त्रीच्या बदलात प्रतिबिंबित होत असते. समाजबदलाची ती इंडेक्स असते. कोणत्याही समाजात बदल होतो आहे, की नाही, होत असेल, तो किती, कसा होतो आहे, हे जर अभ्यासायचं असेल, तर स्त्रीमधील बदल लक्षात घेतला, तरी कळू शकतं.

म्हणून म्हणावंसं वाटतं, भारतीय समाजात निश्चितपणे बदल घडू पाहताहेत, कारण भारतीय स्त्री बदलते आहे. हुंडाविरोधी, बलात्काराविरोधी आंदोलन करायला घरातील स्त्री आता रस्त्यावर येत आहे. समाजात बदल घडवायला, समाजातील दीनदुबळ्यांना प्रेम द्यायला ती हिरिरीनं पुढं सरसावली आहे.

स्त्रीनं पुरूषाला संसारात सुखदुःखांत साथ दिली. आता पुरूषानं तिलाही साथ देण्यासाठी आपणहून पुढं यायला हवं. या कामासाठी चाळिशी ही सुवर्णसंधीच नाही का?

# ६७... लोकशाहीतील प्रशासन

राज्यशास्त्र व प्रशासन ह्या दोन्हींचा एकमेकांशी फार निकटचा संबंध आहे. राज्यशास्त्राचा मी विद्यार्थी होतो व अद्यापही आहे आणि प्रशासनाचा मी अभ्यास केला नसता, तरी गेल्या काही वर्षांपासून प्रत्यक्ष प्रशासनाच्या क्षेत्रात मी काम करीत आहे. लोकशाहीतील प्रशासनासंबंधी जेव्हा आपण बोलतो, त्या वेळी त्यासंबंधीच्या आपल्या कल्पना स्पष्ट असणे जरूरीचे आहे, असे मला वाटते. लोकशाहीची कल्पना हीच मुळी बदलत जाणारी कल्पना असून, तशी ती असणे अगदी स्वाभाविक आहे. लोकशाही हा शब्द शेकडो वर्षांपूर्वी ज्या मानवाने प्रथम उच्चारला, त्याने कोणत्या अर्थाने तो उच्चारला असेल, हे नक्की सांगता येणे आज अशक्य आहे. परंतु लोकांशी ज्याचा प्रत्यही संबंध येतो व जे जनमनाचे प्रतिनिधित्व करते, असे शासनाचे तंत्र म्हणजे लोकशाही, अशी लोकशाहीसंबंधी एक कल्पना पूर्वी सर्वत्र प्रचलित होती. तथापि, इतिहासाच्या ओघात लोकांच्या विचारात परिवर्तन झाले. त्याच्या सभोवतीची परिस्थिती बदलली, त्यांच्यापुढील प्रश्न बदलले आणि त्यांच्यांतील संबंधात देखील बदल घडून आला. त्यामुळे त्यांच्या राजकीय कल्पनांत उत्क्रांती होऊन लोकशाहीबद्दलच्या त्यांच्या कल्पना साहजिकपणेच बदलत गेल्या. आपण जेव्हा एखाद्या सामाजिक शास्त्राचा विचार करू लागतो, तेव्हा आपण बदलत्या जगात राहत आहोत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे, हे सत्य आपल्याला लक्षात घ्यावे लागते. ह्या परिवर्तनाच्या बरोबरीने त्या सामाजिक शास्त्राने आपली पावले टाकली पाहिजेत, हे ओघानेच आले. राज्यशास्त्र हेही एक सामाजिक शास्त्र असल्यामुळे निरनिराळ्या काळी आणि निरनिराळ्या देशांत लोकशाहीची कल्पना निरनिराळी असावी, यात आश्चर्य नाही. आपल्या देशात आपण ज्या संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे, ती सुद्धा लोकशाहीची एक विशिष्ट पद्धत असून, तिचेही स्वरूप पुढे हेच राहील, अशी खात्री मी तरी देऊ शकणार नाही. कारण भविष्यातील बदलत्या परिस्थितीत तिचे स्वरूप हेच राहिले, तर तिचे प्रातिनिधिक स्वरूप नष्ट होऊन भावी पिढ्यांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब तिच्यात पडू शकणार नाही.

लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही असे लोकशाहीचे वर्णन करता येते. परंतु ही औपचारिक स्वरूपाची व्याख्या आहे. कारण या व्याख्येवरून लोकशाही सरकारच्या कार्यपद्धतीचा नक्की बोध होत नाही. माझ्यापुरते मी असे म्हणेन की, प्रशासनातील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयाने चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टिकोन न ठेवता लोकांचे प्रतिनिधी एकत्र येऊन जेथे विचारविनिमय करतात, अशा शासनाच्या पद्धतीला मी लोकशाही म्हणतो. लोकशाहीत जनतेच्या मूलभूत प्रश्नांसंबधी एकवाक्यता व्हावी व ते सोडविले जावेत, म्हणून चर्चा करून मार्ग काढण्याचा लोकप्रतिनिधी प्रयत्न करीत असतात. पण लोकशाहीच्या ह्या किंवा आताच मी उल्लेख केलेल्या दुसऱ्या व्याख्येत, शासन आणि प्रशासन यांचाच विचार प्रामुख्याने आहे, असे आपणांस आढळून येईल. परंतु लोकशाहीचे तत्त्व ज्या वेळी आपण मान्य करतो, तेव्हा आपण शासनाचे फक्त बाह्य स्वरूपच मान्य करतो, असे मला वाटत नाही. लोकशाहीचा अर्थ, केवळ एक शासनाचा प्रकार, असा होत असेल, तर अशा लोकशाहीसंबंधी मला बिलकूल आकर्षण वाटणार नाही.

या प्रश्नाचा अधिक खोल विचार करण्यापूर्वी शासन आणि प्रशासन या दोन निराळ्या गोष्टी आहेत, हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती यशस्वी प्रशासक आहे, असे म्हटले जाते, तेव्हा शासन म्हणून जी कल्पना आहे, ती डोळ्यांपुढे उभी राहत नाही. प्रशासन म्हणजे राज्यकारभार, ही शासनाची फक्त एक बाजू आहे. शासनाची दुसरी बाजू राजकीय आहे. राजकीयदृष्ट्या म्हणजे जनतेच्या दृष्टिकोनातून आपण जेव्हा लोकशाहीसंबंधी बोलतो आणि हुकुमशाहीपासून ती निराळी आहे, असे आपण मानतो, तेव्हा राज्यकारभाराच्या यशापयशाचे मूल्यमापन एक विशिष्ट कसोटी लावून आपण करतो. सकृद्दर्शनी हे एक साधे सूत्र वाटते; परंतु लोकांचे समाधान कशात आहे, हे शोधणे अत्यंत कठीण असते. लोकांना आज ज्यात समाधान आहे, त्यात काही दिवसांनी त्यांना समाधान वाटेलच, असे नाही. परंतु लोकशाही सरकार जे काही करीत असते, त्यापासून लोकांना समाधान मिळाले पाहिजे, ही गोष्ट निःसंशय. म्हणून लोकांचे समाधान हा लोकशाही राज्यकारभाराचा एक निकष म्हणून आपण मानतो. तेव्हा त्याच्या मुळाशी कोणते तत्त्व आहे, हे आपण पाहिले पाहिजे. लोकशाही म्हणजे शासनाची केवळ एक पद्धत, असे पूर्वी समजले जात असे, परंतु शासनाची अशी पद्धत निर्माण करणे

हा राजकीय लोकशाहीचा अंतिम हेतू आहे, असे आता कोणी मानीत नाही. केवळ मतदानाचा औपचारिक स्वरूपाचा हक्क सर्वांना मिळणे व आपले प्रतिनिधी लोकसभेत पाठविता येणे म्हणजेच लोकशाही, इतका मर्यादित अर्थ लोकशाहीचा असेल, तर समाजाच्या दृष्टीने यापेक्षा अधिक हानिकारक अशी दुसरी गोष्ट असू शकणार नाही.

केवळ राजकीय लोकशाहीस लोकशाही म्हणता येणार नाही, हे आता सर्व तत्त्वज्ञांनीदेखील मान्य केले आहे. राजकीय लोकशाहीस सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे. तशी जोड ज्या वेळी मिळेल, तेव्हाच तिला खऱ्या लोकशाहीचे स्वरूप प्राप्त होईल. 'सामाजिक व आर्थिक लोकशाही' या शब्दप्रयोगात काही वादग्रस्त प्रश्न उद्‌भवतात, हे मी जाणतो, राजकीय हक्कांच्या बाबतीत सर्वांना समान संधी मिळणे हा राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल, तर या राजकीय हक्कांबरोबरच, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतही प्रत्येक व्यक्तीला ज्यायोगे समान संधी मिळेल, अशी आर्थिक व सामाजिक परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. लोकशाहीच्या या व्यापक दृष्टिकोनातून भारताच्या राज्यकारभाराकडे आपण पाहिले, तर आपणांस अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही.

आणखी एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो, ती म्हणजे लोकशाहीच्या कल्पनेत हा जो बदल झाला आहे, त्यामुळे प्रशासनाच्या कल्पनेत देखील बदल होणे अपरिहार्य आहे. गेल्या शतकात पुढारलेल्या व प्रगतिशील राष्ट्रांमध्ये प्रशासनाची जी कल्पना होती, ती आता बदलली आहे. 'कार्यक्षम प्रशासन' हा शब्दप्रयोग आता सरकार, खासगी व्यापारी संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे किंवा स्थानिक स्वराज्य या सर्वांच्या बाबतींत उपयोगात आणला जातो. कोणत्याही संदर्भात आपण हा शब्द वापरला, तरी कार्यक्षमतेसंबंधीच्या कसोट्या आता बदलल्या आहेत, हे आपणांस नाकारता येणार नाही. त्याचप्रमाणे कार्यक्षमतेविषयीच्या कल्पना व ती वाढविण्याच्या पद्धती यांत देखील बदल झाला आहे. याचे कारण सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल हे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, लोकशाहीच्या आणि प्रशासनाच्या कल्पनेत हा जो बदल झाला आहे, तो बदललेल्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचाच एक भाग आहे. म्हणून मला स्वतःला असे वाटते की, सामाजिक व आर्थिक विकासामुळे निर्माण होणारी शक्ती हीच लोकशाही व प्रशासन यांची प्रेरक शक्ती आहे. 'सामाजिक परिस्थिती'

याचा अर्थ फार व्यापक असून, त्या आर्थिक परिस्थितीबरोबरच समाजाच्या बहुतेक सर्व अंगोपांगांचा समावेश होतो, हे मला स्पष्ट करावेसे वाटते.

प्रशासन हे लोकशाहीचे आजच्या काळात एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. एका राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मला रोज नाना तऱ्हेचे प्रश्न हाताळावे लागतात. दर पाच मिनिटांनी माझ्यापुढील विषय बदलत असतो. मुख्यमंत्री या क्षणी वैद्यकांसंबंधी चर्चा करील, तर दुसऱ्याच क्षणी तो विजेसंबधी बोलू लागेल आणि यानंतर लगेच शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या तांत्रिक प्रश्नावर तो आपले मत देईल आणि पुढे ताबडतोब जंगल खात्याकडे तो वळेल आणि यांपैकी एकाही विषयांसंबंधी काहीही माहिती नसताना तो या सर्व गोष्टी करील. वैद्यक, शिक्षण, जंगल किंवा वीज या विषयांचा मी काही तज्ज्ञ नाही. पंरतु निरनिराळे प्रश्न सोडविण्यासाठी कोणते अंतिम निकष लावावेत, या बाबतीत मुख्यमंत्री तज्ज्ञ समजला जातो. एखाद्या धोरणाचे राज्यातील लोकांवर कोणते परिणाम होतील आणि शासनाच्या निरनिराळ्या शाखांकडून लोकांच्या कोणत्या अपेक्षा आहेत, यासंबंधीची जाणीव मुख्यमंत्र्याला असावी लागते. मुख्यमंत्री केवळ एवढ्याच बाबतीत तज्ज्ञ असतो. परंतु जे धोरण ठरेल, त्याला व्यवस्थित आकार देऊन, त्याची अंमलबजावणी करण्याचे काम इतर तज्ज्ञांचे असते. यालाच आपण शासनतज्ज्ञ म्हणतो, मुख्यमंत्र्यास अशा तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो.

धोरण ठरविणे हे अशा धंदेवाईक प्रशासकाचे काम नसून, एक प्रकारे व्यक्तिनिरपेक्ष राहून ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे एवढेच त्याचे काम असते, असे पूर्वी समजले जात असे. परंतु प्रशासन हे आजच्याही काळात केवळ धोरणाची अंमलबजावणी करणारे एक व्यक्तिनिरपेक्ष माध्यम बनणार असेल, तर त्या प्रमाणात प्रशासनाचे लोकशाही स्वरूप नाहीसे होईल. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. मी असे म्हणतो, याला दोन कारणे आहेत. पहिली गोष्ट अशी की, प्रशासक लोकशाही शासनाचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असल्यामुळे ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी त्याला कुशलतेने करावी लागते. म्हणून व्यक्तिनिरपेक्षतेने आपण विचार करतो व सल्ला देतो, असे तो म्हणूच शकत नाही, आणि दुसरी गोष्ट म्हणजे, लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये राजकीय पुढारीच फक्त निर्णय घेतो किंवा धोरण ठरवितो, हे खरे नाही, आणि हे माझ्या व्यक्तिगत अनुभवावरून आपणांस सांगू शकतो. स्पष्टच सांगावयाचे म्हणजे, अलीकडील राज्यांच्या दैनंदिन प्रशासनाचे गुंतागुंतीचे

स्वरूप लक्षात घेता. सध्याच्या काळात मंत्री राज्य करीत नाहीत. तर तज्ज्ञच राज्य करतात, असे मी म्हणेन, कारण ते जो सल्ला देतात, तो तांत्रिक स्वरूपाचा असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणे कठीण असते आणि म्हणून एखादे विशिष्ट धोरण ठरविण्यात या तज्ज्ञांचा मोठा भाग असतो.

परवाच आपल्या राज्यातील एक वरिष्ठ पोलिस अधिकारी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्काराला उत्तर देताना त्यांनी एक उत्कृष्ट सल्ला दिला. हा सल्ला त्यांच्या वडिलांकडून त्यांना मिळाला होता. डॉक्टरने दिलेले सर्टिफिकेट, पोलीस अधिकाऱ्याने केलेली चौकशी व इंजिनिअरने तयार केलेला अंदाज या तीन गोष्टींखेरीज जगातील इतर कोणतीही गोष्ट तुम्ही बदलू शकता, असे त्यांनी सांगितले. कारण या तीन गोष्टींविरूद्ध कोठेही दाद मागता येत नाही. यातील विनोदाचा भाग सोडला, तर तांत्रिक बाबींसंबंधी सध्याची परिस्थिती अशाच प्रकारची आहे. जेव्हा धंदेवाईक प्रशासक सल्ला देतो, तेव्हा तो नव्याण्णव टक्के धोरण ठरवीत असतो. तेव्हा प्रशासकाचे काम निव्वळ ठरलेले धोरण अमलात आणण्याचे असते, असे समजणे या काळात तरी सयुक्तिक होणार नाही.

धंदेवाईक राजकारणी आणि धंदेवाईक प्रशासक निरनिराळ्या पातळ्यांवर कार्य करीत असले आणि त्यांच्या कार्याची पद्धती व त्यांची साधने भिन्न असली, तरी लोकशाहीमध्ये त्यांना मार्गदर्शन करणारी शक्ती व तत्त्वे एकच असतात. जो निवडून येतो, तोच लोकशाहीचे प्रतिनिधित्व करतो. परंतु लोकशाही यंत्रणेचा कायम स्वरूपाचा घटक असणारा मात्र ते करीत नाही, असे म्हणणे रास्त होणार नाही. अशा प्रकारच्या कल्पनांनी लोकशाही कधीच यशस्वी होणार नाही, कारण त्यामुळे लोकशाहीत सतत मतभेद व अडथळे निर्माण होऊन राज्यकारभारात लोकशाही नाममात्र देखील शिल्लक राहणार नाही. म्हणून लोकशाहीशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत देखील, लोकांचे समाधान हेच आपले अंतिम उद्दिष्ट मानले पाहिजे. राजकारण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांतील लोकांचे हेच उद्दिष्ट असले पाहिजे. कारण या दोन्ही क्षेत्रांतील व्यक्ती शेवटी जनतेतूनच आलेल्या असतात आणि त्यांना जनतेचे भवितव्य घडवून आणण्याचे कार्य करावयाचे असते. राज्यशास्त्र आणि लोकशाहीतील प्रशासन यांना साधणारा दुवा हाच आहे, असे मला वाटते.

लोकशाहीतील प्रशासनात जे जाऊ इच्छितात, त्यांनी ही गोष्ट

सुरूवातीपासून नीट समजावून घ्यावी. मी म्हणतो, त्याचप्रमाणे त्यांनी ही गोष्ट समजावून घेऊन आपल्या दैनंदिन कामांत सतत नजरेसमोर ठेवली, तर आपले पुष्कळसे प्रश्न आपोआप सुटतील. एका ज्येष्ठ प्रशासकाने एकदा असे उद्‌गार काढले होते की, मंत्र्यांना 'नाही' म्हणण्याचे आणि प्रशासकाना 'होय' म्हणण्याचे शिक्षण मिळाले, तर बरे होईल. यात पुष्कळच अर्थ आहे. कारण हे घडून आले, तर लोकशाहीतील आणि लोकशाहीच्या प्रशासनातील पुष्कळशा प्रश्नांसंबंधी चिंता करण्याचे आपणांस कारणच राहणार नाही.

या सर्व गोष्टी आपल्याला मी हेतुपूर्वक सांगत आहे. प्रशासनाच्या कोणत्याही शाखेत तुम्ही प्रवेश करा, परंतु मी सांगितलेल्या गोष्टी कृपा करून विसरू नका, एखाद्या खासगी संस्थेत किंवा एखाद्या कारखान्यात तुम्ही काम करणार असला, तर तेथेही हीच कसोटी तुम्हांला दृष्टीसमोर ठेवावी लागेल. प्रशासकाकडून अखेरीस हीच अपेक्षा असते. खासगी व्यापारी संस्थेत देखील ग्राहकाचे समाधान ह्याच न्यायाचे त्याला पालन करावे लागते. प्रयोगशाळेत काम करणारा शास्त्रज्ञ असो किंवा रंगभूमीवर काम करणारा नट असो किंवा समाजसेवेच्या क्षेत्रात गाजावाजा न करता काम करणारा कार्यकर्ता असो, त्याने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती ही, की आपण जे काही काम करतो, त्याचा अंतिमतः जनतेच्या जीवनावर परिणाम होत असतो.

लोकशाही ही केवळ विधानसभेपुरतीच नसते, किंवा तो केवळ प्रशासनाचेच कार्य करीत नाही. अधिक खोल अर्थाने पाहिले, तर सध्याच्या आधुनिक समाजात प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर लोकशाहीची तत्त्वे आपला प्रभाव पाडीत असतात, ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट तुम्ही समजावून घेतली पाहिजे. लोकशाही ही केवळ राजकीय कल्पना नाही, असे मी जे म्हणतो, ते याच अर्थाने. लोकशाही आता एक सामाजिक आणि आर्थिक कल्पनाही बनली आहे. जो विद्यार्थ्यांचे खरे समाधान करतो, तो चांगला शिक्षक. तो निवडणुकीसाठी उभा राहत नाही, तरीही त्याला मान्यता मिळते. माझ्या विद्यार्थिदशेत एक प्राध्यापक होते, त्यांच्या कॉलेजातील विद्यार्थीच नव्हे, तर दुसऱ्या कॉलेजातील विद्यार्थीही त्यांचा अतिशय मान राखीत असत. शेक्सपिअर शिकविणारे दुसरे एक अत्यंत नामवंत प्राध्यापक होते, त्यांच्या व्याख्यानासाठी भिन्नभिन्न विद्यापीठांचे विद्यार्थी येत. अंतिम दृष्ट्या ही लोकशाहीच नव्हे काय ? पण निवडणुकीच्या दृष्टिकोनातूनच पुष्कळ वेळा लोकशाहीमध्ये निवडणुकीला फार महत्त्वाचे स्थानही आहे, यात शंका नाही. परंतु निवडणुकीला किंवा

लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाला जनतेच्या समाधानापेक्षा अधिक महत्त्व नाही. तुम्ही लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाला जनतेच्या समाधानापेक्षा अधिक महत्त्व नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करीत असा. जनतेचे समाधान हीच अंतिम कसोटी राहील. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात हाच मूलभूत तत्त्वाचा ठसा उमटलेला तुम्हांला दिसेल आणि म्हणून ह्याच कसोटीवर सर्व गोष्टींबद्दलचे निर्णय तुम्हांला तावून-सुलाखून घ्यावे लागतील.

'लोकशाहीतील प्रशासन' या विषयावर चर्चा करताना प्रशासनातील लोकशाहीच्या या मूलभूत प्रश्नांचीच चर्चा करण्याचा माझा उद्देश होता. आपल्या दैनंदिन कामात, मग ते प्रशासनातील असो, राजकारणातील असो अगर अन्य कोणत्याही क्षेत्रातील असो, आपण या मार्गदर्शक तत्त्वाचा स्वीकार केला, तर समाजातील अनेक गोष्टींत द्रुतगतीने सुधारणा होईल, आणि सरकार व जनता यांच्यांतील संबंधही सुधारतील. एवढेच नव्हे, तर विशिष्ट परिस्थितीत आपले कर्तव्य कोणते, हेही त्यामुळे तुम्हांला समजेल. अशा प्रकारे समाजात केवळ लोकशाहीच नव्हे, तर खरीखुरी स्वतंत्रता नांदू लागेल.

लोकशाहीमुळे ज्या वेळी समाजातील महान शक्ती मोकळ्या होतात आणि व्यक्तीला खऱ्या स्वातंत्र्याचा लाभ होतो, त्याच वेळी लोकशाहीचे खरे स्वरूप आपणांस पाहावयास सापडते. हे जेव्हा घडते, तेव्हाच समाज सामर्थ्यवान बनतो. अशा समाजात केवळ व्यक्तीच स्वतंत्र होते, असे नाही, तर सर्व समाजच बौद्धिक दृष्ट्या व अन्य प्रकारे स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास समर्थ बनतो.

## ६८... आजचे तरूण व सैनिकी शिक्षण

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारतमाता दास्याच्या शृंखलेतून मुक्त झाली, अनेक वर्षे चालू असलेल्या स्वातंत्र्य-संग्रामाचा शेवट झाला. स्वातंत्र्य-संग्रामात नेत्यांनी व भारतीय जनतेने केलेल्या आवाहनाला भारतीय तरूण-तरूणींनी प्रतिसाद दिला आणि त्याग व बलिदानाने एक अविस्मरणीय कामगिरी करून दाखविली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्ही आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी पावले उचलली. सोळा वर्षांच्या कालावधीत भारताचा बराच कायापालट झाला. शेतीचा विकास झाला. विद्युत केन्द्रे निर्माण करण्यात आली. अनेक कारखाने उघडले. परंतु ही आमची प्रगतीची वाटचाल चालू असतानाच २० ऑक्टोबर, १९६२ रोजी आमच्या शेजाऱ्याने आमच्या पवित्र भूमीवर आक्रमण केले. ज्या हिमालयाने आजपर्यंत आमचे शत्रूपासून संरक्षण केले, तोच हिमालय स्वतःच्या संरक्षणासाठी भारतीय पुत्रांना बोलावू लागला. आमच्या जवानांनी या आक्रमणाला त्याग व बलिदानाने सहर्ष तोंड दिले. भारतीय तरूण देशाच्या रक्षणार्थ वेळेचा क्षण व धनाचा कण वाया न जाऊ देता तयार झाले.

युद्धबंदी झाली. चिनी सेना मागे परतली. पण जणू काही आम्हांला सदैव तयार राहण्याचा संदेश देऊनच, ते आक्रमण एक वरदान ठरले. भारताचे संरक्षण करण्याचा विचार चिनी आक्रमणामुळे राष्ट्रव्यापी झाला.

सैन्य हा जीवनाचा एक आवश्यक भाग झाला. तरच एवढ्या विशाल देशाचे संरक्षण होऊ शकेल. म्हणून आम्ही शत्रूमध्ये धडक भरविणारी सामर्थ्यसंपन्न आधुनिक सेना उभारीत आहोत. तरूण विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनापासून सैनिकी प्रशिक्षण मिळावे. म्हणून भारत सरकारने १५ ऑगस्टपासून एन्.सी. सी.- चे शिक्षण अनिवार्य केले आहे. देशरक्षणाच्या शिक्षणशिवाय विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण आहे. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपणहून एन.सी.सी. चे शिक्षण घेण्यासाठी पुढे आले पाहिजे. एन.सी.सी. ही एक सैनिक योजना आहे. तसेच, ती शैक्षणिक योजना पण आहे. हे शिक्षण सैनिक अधिकाऱ्यांकडून दिले जाते, म्हणून ती सैनिक योजना आहे. तसेच, ती शिक्षणाची पूर्ती करते, म्हणून शैक्षणिक योजनाही आहे. एन.सी.सी. च्या

शिक्षणामुळे तरूणांमध्ये चारित्र्य, बंधुभाव, आदर्श सेवावृत्ती व नेतेपणाची शक्ती यांची जोपासना व वाढ होते.

शत्रूशी सामना देण्यासाठी आपण आपला देश आर्थिक व वैज्ञानिकदृष्ट्या प्रबळ बनविला पाहिजे. देशात नुसते मोठे सेनापती असून भागत नाही, तर शत्रूवर विजय मिळविण्याच्या कामी महान शास्त्रज्ञांची जरूरी असते. म्हणून शालेय जीवनात विद्यार्थ्याने आपले जास्त लक्ष वैज्ञानिक विषयांकडे दिले पाहिजे. त्या विषयांचा अभ्यास केला पाहिजे. युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही, तर ते शेतात, कारखान्यातही लढवावे लागते. यासाठी कुशल तंत्रज्ञांची पण आवश्यकता आहे. याची पूर्ती शाळेतून व महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या तरूणांकडूनच होऊ शकेल. समाजातील तरूणांचे मन व मनगट बळकट पाहिजे. ही सुद्धा लष्करी शिक्षणाची प्राथमिक गरज आहे.

युवतींनाही देशाच्या संरक्षण-कार्यात भाग घेता येईल. समाजातील क्षात्रधर्माची वृत्ती व निरंतर तयारीही ईर्ष्या जागृत ठेवण्याचे कार्य त्या गावोगावी जाऊन कुशलतेने करू शकतात. सैनिकांची शुश्रूषा करण्याची जबाबदारीही त्या सुलभतेने उचलू शकतात. या कार्यासाठी त्यांनी पुढे आले पाहिजे.

आज देशात अनेक क्षेत्रे तरूण-तरूणींच्या कर्तृत्वाचे स्वागत करण्यात सिद्ध आहेत. भारताचे रक्षण करण्याची व स्वातंत्र्य चिरकाल टिकविण्याची जबाबदारी देशातील तरूण रक्तावर आहे. स्वतःचे रक्षण करू न शकणारा देश स्वाभिमानाने व स्वतंत्र कधीच राहू शकत नाही. म्हणून आपल्या कर्तृत्वाचा उपयोग प्रथम देशरक्षणासाठीच झाला पाहिजे. हे ध्येय देशातील प्रत्येक तरूणाने आपल्यासमोर ठेवले पाहिजे.

# ६९... विकसित आणि अविकसित राष्ट्रांचे आर्थिक संबंध

युद्धोत्तर काळात मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लक्षणीय बदल झाले आहेत. हे बदल केवळ गुणात्मकच नाहीत, तर ज्या वेगाने ते घडत आहेत, तो वेगही विलक्षण आहे. या प्रकारची मूलभूत स्थित्यंतरे होत असताना अनेक नवीन प्रश्नही त्यातून उपस्थित होत आहेत. अशा जागतिक समस्यांमध्ये आज सर्वांत महत्त्वाची समस्या आहे, ती नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक रचना उभी करण्याविषयीची चलनवाढ. औद्योगिक मंदी, परराष्ट्रीय व्यापारातील समतोल हे प्रश्न तर सर्वच राष्ट्रांपुढे आहेत. आपल्या देशातही या प्रश्नांनी काही काळापूर्वी उग्र स्वरूप धारण केले होते. परंतु गेल्या एक-दोन वर्षांत भारत सरकारने केलेल्या खंबीर उपाययोजनेमुळे चलनवाढीचा प्रश्न आटोक्यात आला आहे. विकसनशील राष्ट्रांपुढे सामाजिक व आर्थिक विकासाचा सर्वंकष व मूलगामी प्रश्न उभा आहे. तसेच, औद्योगिक प्रगती जीवर आधारित आहे, ती साधनसंपत्ती अखेरीस मर्यादित आहे, याचा प्रकर्षाने प्रत्यय साऱ्या जगाला आला आहे. त्याचबरोबर अनिर्बंध औद्योगिकीकरणामुळे प्राकृतिक संतुलनाचे गुंतागुंतीचे प्रश्न नव्याने जाणवत आहेत. गेल्या काही वर्षांतील घडामोडींमुळे आर्थिक क्षेत्रातील दृढमूल असलेले काही सिद्धांत व संस्था यांचे अपुरेपणही आता स्पष्ट झालेले आहे. समाजातील सर्व घटकांचे जीवनमान एका विशिष्ट दर्जाचे व्हावे, ही विकसनशील राष्ट्रांची इच्छा आहे. पण त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांत अनंत अडथळे येत आहेत. आज सधन व कमी विकसित राष्ट्रांतील लोकांच्या राहणीमानांत दिवसेंदिवस तफावत वाढतच आहे. गरीब राष्ट्रांतील दरडोई उत्पन्नापेक्षा सधन राष्ट्रातील माणसाचे उत्पन्न १३ पटींनी अधिक आहे. असा अंदाज १९७० साली व्यक्त करण्यात आला होता. जगातील सर्व राष्ट्रे परस्परावलंबी होत असताना, भीषण दारिद्र्य व अफाट श्रीमंती यांचे हे सह-अस्तित्व शांतता, न्याय व मानवी प्रतिष्ठा यांच्या दृष्टीने उपकारक नाही.

जगातील विविध देशांतील दारिद्र्य-निर्मूलनासाठी, सधन व गरीब राष्ट्रांतील जीवनमानांतील अंतर कमी करण्यासाठी व समाजातील अत्यंत दुर्बल समाजघटकांचे राहणीमान सुधारण्यासाठी नवी अर्थरचना निर्माण

केली पाहिजे, ही मागणी काही नवीन नाही. राजकीयदृष्ट्या नुकतेच स्वातंत्र्य मिळविलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांचा तो एक भाग आहे. त्यामुळेच आपल्या देशातील आशा-आकांक्षा सफल होतील, असे त्यांना वाटते. सध्याच्या विषय अर्थरचनेशी ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत, त्या राष्ट्रांना अर्थातच नवीन अर्थरचनेचे वावडे आहे. पण सामान्यतः आता स्थित्यंतराची अनिवार्यता मान्य झाली आहे. सर्वांना संधी दिली पाहिजे, याची जाण आता वाढली आहे. आर्थिक विकासाची फळे न्याय्य रीतीने सर्वांना उपभोगता आली पाहिजेत, हे आता सर्वांना पटले आहे. अलीकडच्या काही घटनांवरून विकसित राष्ट्रांची समृद्धी व विकसनशील राष्ट्रांचा विकास व वाढ यांचे जवळचे नाते आहे, हे आता सिद्ध झाले आहे. सर्व जनतेचे राजकीय, सामाजिक व आर्थिक हित सर्व राष्ट्रांच्या समृद्धीवर अवलंबून आहे. विकसित व विकसनशील राष्ट्रांतील राहणीमान, संपत्ती, तंत्रविज्ञान वगैरेंतील प्रचंड भेद कमी करावयाचा असेल, तर आर्थिक व्यवहारात, उत्पादनक्षमतेत, किंबहुना आंतरराष्ट्रीय अर्थरचनेत मूलगामी व प्रगतिपर बदल केल्याशिवाय भागणार नाही. उदाहरणार्थ, विकसनशील राष्ट्रांनी कच्चा माल पुरवावा, स्वस्त मजूर मिळवून द्यावेत आणि भांडवल, तयार माल व तंत्रविषयक गरजा यांबाबत विकसित राष्ट्रांवर अवलंबून राहावे, ही परिस्थिती आता बदलली पाहिजे. म्हणजेच नव्या अर्थरचनेमध्ये जागतिक आर्थिक व सामाजिक विकासाचा लाभ सर्वांना समानरीत्या होईल व विकसनशील राष्ट्रे अधिक स्वावलंबी होतील, असे प्रयत्न झाले पाहिजेत.

आंतरराष्ट्रीय व्यापारसंबंध न्याय व समानता या तत्त्वांच्या आधारावर प्रस्थापित व्हावेत, अशी विकसनशील राष्ट्रांची मागणी आहे. विकसनशील राष्ट्रे कच्चा माल निर्यात करून परदेशी भांडवल मिळवितात. पण आता परदेशी चलन मिळविण्यासाठी कच्चा माल व तयार माल या दोघांचीही निर्यात व्हावयास पाहिजे. परंतु परिस्थिती अशी आहे, की आज कच्च्या मालाला तर बाजारभाव फारसा येत नाही; उलट, तयार मालाचे भाव सतत वाढत आहेत. त्यामुळे विकसनशील राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रतिकूल अटी पत्कराव्या लागतात. मालाच्या देवाणघेवाणीचे करार करण्याचे प्रयत्न अनेकदा होऊनही त्याचे परिणाम निराशाजनक ठरले आहेत. सतरा वर्षांच्या वाटाघाटीनंतर कोकोसंबंधीचा करार १९७२ साली करण्यात आला. अलीकडेच आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेने (UNCTAD) अनेक वस्तूंबद्दल

एक सुसंबद्ध कार्यक्रम तयार केला आहे. त्या कार्यक्रमात मालाचे संरक्षित साठे करून किमतीची पातळी कायम राखण्याचा प्रयत्न करणे, तसेच, पुरवठा व खरेदी यांचेही विविध पातळ्यांवर करार करणे यांचा समावेश आहे. कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था तो माल उत्पादन करणाऱ्या देशातच असाव्यात, असेही त्यांनी सुचविले आहे. एक विशिष्ट वेळापत्रक ठरवून या कार्यक्रमाची अंमलबजावणी नजीकच्या काळात केली जाईल, अशी आशा आहे.

वर सांगितल्याप्रमाणे तयार मालाच्या व्यापाराबद्दलही एक सर्वंकष योजना आखण्याची गरज आहे. हा प्रश्न इतर अनेक बाबींशी निगडित आहे. उदाहरणार्थ, निर्यात मालाची बहुविधता, बाजारपेठेमध्ये सुलभ प्रवेश, व्यापाराच्या विकासाच्या दराची वाढ यांसारख्या गोष्टींची चर्चा आंतरराष्ट्रीय संघटनेतर्फे व्यापारविषयक वाटाघाटी करीत असताना केली जाते. या प्रश्नांकडे विविध दृष्टिकोनांतून पाहण्याची गरज आहे. तयार मालाच्या औद्योगिक क्षेत्रात विकसनशील राष्ट्रांना फक्त ७ टक्के वाटा असावा, ही गोष्ट सर्वथा असमर्थनीय आहे, म्हणूनच हा वाटा इ.स. २००० पर्यंत २५ टक्क्यांपर्यंत वाढावा, अशी शिफारस मार्च १९७५ मध्ये भरलेल्या (UNCTAD) च्या परिषदेत करण्यात आली होती.

विकसनशील राष्ट्रांना आपल्या विकासाचा भार स्वतःच उचलावा लागणार आहे. परदेशी मदतीचा उपयोग केवळ दुय्यम समजला पाहिजे. आज विकसनशील देशांची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या ७० टक्के आहे. पण जागतिक उत्पन्नातील त्यांचा वाटा मात्र फक्त ३० टक्के आहे. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. विकसित राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नांपैकी एक टक्का रक्कम विकसनशील देशांना आर्थिक साहाय्य म्हणून द्यावी, हे उद्दिष्ट सामान्यतः स्वीकारण्यात आलेले आहे. या तत्त्वाचा स्वीकार फार संथ गतीने झाला आहे; पण त्याची अंमलबजावणी त्याहीपेक्षा निराशाजनक आहे. १९७३ मध्ये आपल्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी ०.५ टक्के रक्कम श्रीमंत राष्ट्रांनी दिली. तर १९७४ मध्ये ही रक्कम ०.३ टक्के होती. आर्थिक साहाय्याचे केवळ प्रमाणच कमी झाले, असे नाही, तर त्यांच्या अटीसुद्धा अधिक प्रतिकूल झाल्या आहेत. तसेच, विकसनशील देशांना कर्जफेडीसाठी अधिक प्रतिकूल अटी मान्य कराव्या लागत आहेत. याचा अर्थ असा, की गेल्या काही वर्षात विकसित राष्ट्रे अधिक श्रीमंत होऊनही त्यांनी दिलेल्या आर्थिक मदतीचे प्रमाण कमी

झाले आहे. अनेक बाबतींत विकसनशील राष्ट्रांच्या गरजा भागविण्यासाठी सधन राष्ट्रांनी केलेले प्रयत्न त्यांच्या क्षमतेच्या मानाने पुष्कळच कमी आहेत. आज पेट्रोलच्या किमतीतील वाढ, अन्नधान्य रासायनिक खते, यंत्रसामग्री यांच्या भाववाढीमुळे विकसनशील राष्ट्रांपुढे परराष्ट्र - व्यापारातील परकीय चलनाच्या तुटवड्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून गरीब राष्ट्रांच्या प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन साधने पुरविण्यासाठी नवी अर्थव्यवस्था तयार करणे अगत्याचे झाले आहे. पण ते वाटप श्रीमंत राष्ट्रांच्या लहरीवर अवलंबून राहता कामा नये.

जागतिक अर्थकारणाला, विशेषतः, उद्योगप्रधान राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेला वैज्ञानिक व तंत्रविषयक प्रगतीमुळे नवी गती प्राप्त झाली आहे. यात शंका नाही. या क्षेत्रातील संशोधन व विकास याबाबतीत विकसनशील व विकसित राष्ट्रांत फार फरक आहे. आवश्यक औद्योगिक रचना विकसनशील राष्ट्रांत पुरेसी प्रगत झालेली नसल्यामुळे आपले औद्योगिक उत्पादन कसे वाढवावे, हा फार गंभीर प्रश्न आज निर्माण झालेला आहे. हे तंत्रविषयक ज्ञान किंवा तंत्रकौशल्य विकसनशील राष्ट्रांना विकासासाठी उपयोगी पडेल. इतक्या विपुल प्रमाणात उपलब्ध होत नाही. त्यामुळे प्रगत उद्योगप्रधान राष्ट्रांत विकसित झालेले तंत्रविषयक ज्ञान किंवा त्यांच्या प्रक्रिया विकसनशील राष्ट्रांना उपलब्ध करून देण्यासाठी ही राष्ट्रे उत्सुक नसतात. अधिक सवलतीच्या मार्गांनी हे तंत्रज्ञान विकसनशील राष्ट्रांना मिळवून देण्यासाठी मार्ग काढणे आवश्यक आहे. विकसित उद्योगप्रधान राष्ट्रे विज्ञानाचा उपयोग आपली उत्पादनक्षमता वाढवून अधिक श्रीमंत होण्यासाठी करतात. तर विकसनशील राष्ट्रे विज्ञानाचा उपयोग उत्पादनक्षमता व त्याचबरोबर रोजगार वाढविण्यासाठी करू इच्छितात. तंत्रविषयक विकासाचा विचार विकसनशील देशांचा दीर्घकालीन आर्थिक व सामाजिक उद्देश लक्षात घेऊन केला गेला पाहिजे. याचबरोबर अशा देशांनी आपल्याला उपयोगी पडणारी संशोधनक्षमता वाढविली पाहिजे. विकसनशील राष्ट्रांचे हे विविध प्रश्न लक्षात घेऊन, त्यांच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर योजना व कार्यक्रम आखला गेला, तर ते अधिक योग्य ठरेल.

हे प्रश्न सोडविण्यासाठी आज गरज आहे, ती ही नवीन अर्थरचना लवकरात लवकर स्वीकारण्याची. आता आर्थिक प्रश्न स्वतंत्र किंवा अलग करता येणार नाहीत. हे सर्व प्रश्न परस्परनिगडित आहेत; आणि ही अर्थरचना

उभी करावयाची असेल, तर केवळ त्याविषयी काही प्रस्ताव मांडून, त्यावर केवल भाष्य करून चालणार नाही. त्यामुळे हा प्रश्न सुटणारही नाही. आज आवश्यकता आहे, ती प्रत्यक्ष आचरणाची; प्रस्तावांना, भाषणांना जोड हवी आहे, ती क्रियेची. विकसित राष्ट्रे व विकसनशील राष्ट्रे यांची समृद्धी, यांचे कामकाज एकमेकांशी निगडित आहे, याची वाढत्या प्रमाणात जाणीव झाली आहे. पॅरिसमध्ये सुरू असलेली आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार परिषद यांचे उदाहरण आहे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, विकसनशील राष्ट्रांनी याबाबतीत टिकवून ठेवलेले ऐक्य, आणि याचमुळे या गुंतागुंतीच्या प्रश्नांमध्ये सर्वांच्या सहकार्याने काही पुढची पावले पडतील, अशी आशा करण्यास जागा आहे, परंतु याचबरोबर एक गोष्ट मनाशी निश्चित बाळगली पाहिजे, की हे प्रश्न लवकर सोडविले नाहीत, तर ते अधिक गुंतागुतींचे तर होतीलच. परंतु त्याचबरोबर ते अधिकाधिक स्फोटक होतील. विकसनशील देशांतील जनतेच्या आशा-आकांक्षा आज वाढलेल्या आहेत. त्या जर पुऱ्या करावयाच्या असतील, तर आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याच्या या वेगवेगळ्या प्रश्नांवर समाधानकारक तोड लवकर काढणे आवश्यक आहे, एका दृष्टीने असेही म्हणता येईल, की एके काळी वसाहतवाद व साम्राज्यवाद त्यांच्याविरूद्ध जगातील राष्ट्रे राजकीय स्वातंत्र्यासाठी लढली. त्याच लढ्याची, नव्या अर्थरचनेसाठी होणारे प्रयत्न, ही पुढची पायरी आहे. नवीन आंतरराष्ट्रीय अर्थरचनेसाठी होणारे प्रयत्न, ही पुढची पायरी आहे. नवीन आंतरराष्ट्रीय अर्थरचना प्रस्थापित करणे हाच विकसनशील राष्ट्रांतील लोकांचा विकास करण्याचा, त्यांची आर्थिक व सामाजिक प्रगती, शांतता, न्याय व सहकार्य यांच्या वातावरणात साध्य करण्याचा उत्कृष्ट मार्ग आहे.

# ७०... आर्थिक निरगाठीची उकल

रूपयाच्या अवमूलनामुळे आपल्या अर्थव्यवस्थेतील निरगाठी सुटतील, तसेच उत्पादनात अधिक वाढ होईल. अवमूलनास विलंब लागला असता, तर आर्थिक प्रगतीचा गाडा रेंगाळत राहिला असता आणि त्यामुळे जनतेचे अतिशय हाल झाले असते.

अवमूलनाचा हा निर्णय का घ्यावा लागला, त्याबद्दल कुणाचीही खात्री पटावी, अशी सुस्पष्ट कारणमीमांसा माझे सहकारी अर्थमंत्री सचिन्द्र चौधरी यांनी केली आहे. त्यांनी जे सांगितले आहे, त्यापेक्षा अधिक असे काही मला सांगायचे नाही.

मात्र एवढे निश्चित सांगतो की, ह्या उपायाची अत्यंत निकड होती आणि प्रखर कर्तव्यनिष्ठा व राष्ट्रीय जबाबदारी ह्यांना जागूनच आम्हांला हा निर्णय घेणे भाग पडेल. या उपाययोजनेमुळे आपले तात्कालिक व दीर्घकालीन कोणते लाभ होणार आहेत, ते येथे स्पष्ट करणे मला आवश्यक वाटते.

वस्तुतः अशा प्रकारचा महत्वपूर्ण निर्णय घेणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. व्यवहार राष्ट्रीय असोत अथवा खासगी असोत, त्यांबाबतचे निर्णय शंभर टक्के बरोबर किंवा शंभर टक्के चूक ठरत नाहीत. प्रत्येक उपाययोजननेचे फायदे-तोटे हे असतातच. दोहोंचे स्पष्ट पृथक्करण आणि योग्य मूल्यमापन झाले पाहिजे. रूपयाच्या अवमूलनाच्या तोट्यांच्या संबंधात सांगण्यात येते, की त्यामुळे किमती वाढतील, आपल्या प्रतिष्ठेत भर पडणार नाही, सरकारच्या प्रतिष्ठेला जबरदस्त धोका बसेल आणि निवडणुकीचे हे वर्ष असल्यामुळे पक्षाच्या हितसंबंधांनाही बाध येईल. असे असूनही आम्ही हा निर्णय घेतला, याचे कारण, ज्या संबंधात ही भीती व्यक्त करण्यात आलेली आहे, ती एक तर अस्थानी आहे किंवा अतिशयोक्तिपूर्ण आहे, असे मला वाटते. इतकेच नव्हे, तर या निर्णयामुळे होणारे फायदेच तोट्यापेक्षा अधिक आहेत. फायद्यांचे पारडे जड कसे आहे, हे पाहण्यातच शहाणपण असते. निणर्यातील धोक्याची जाणीव ठेवून त्यांची अंमलबजावणी करण्याला धडाडी लागते आणि कार्यरत

झाल्यामुळे धोके येतात, हे जर खरे असेल, तर निष्क्रिय राहिल्याने त्याहून मोठे धोके पत्करावे लागतात, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

एक मंत्री म्हणून या देशाच्या संरक्षणाची जोखीम माझ्यावर आहे. आजच्या या स्थानावर असताना, किंबहुना स्वातंत्र्य-लढ्यात उडी घेतल्यापासूनच राष्ट्राची खरीखुरी ताकद कशात असते, यासंबंधी मी विचार करीत आलो आहे. या विचारमंथनातून राष्ट्राची खरीखुरी शक्ती केवळ त्याच्या सशस्त्र दलांच्या शक्तीवर आणि संख्येवर अवलंबून नसते, तर ती त्या राष्ट्राच्या मजबूत अर्थव्यवस्थेमध्ये सामावलेली असते, या त्रिकालाबाधित निर्णयाप्रत मी आलो आहे. जे राष्ट्र आर्थिकदृष्ट्या आधुनिक आणि ताकदवान नाही, हे राष्ट्र लष्करीदृष्ट्याही समर्थ असू शकणार नाही, आणि म्हणून विकास हा आपल्या संरक्षणाचा कणा आहे.

विकास म्हणजे तरी काय ? विकास याचा अर्थ प्रथमतः आपल्या गरजा भागविण्यासाठी आपल्या अर्थव्यवस्थेची माल आणि साधनांची उत्पादनक्षमता तयार करणे. त्याचप्रमाणे लोकांच्या कल्याणासाठी व समाधानाकरता जरूर ती साधनसामग्री उपलब्ध करून देणे होय. अशा तऱ्हेने स्वयंपूर्णता हे विकासाचे अपरिहार्य ध्येय ठरते. नुकताच हा जो निर्णय घेण्यात आला, तो आपल्याला अधिक प्रमाणात स्वयंपूर्णता आणि अधिक ताकद कमाविण्याच्या दृष्टीने साह्यभूत ठरेल.

विकासासाठी भांडवल - गुंतवणुकीची गरज असते. त्यामध्ये देशी, तसेच, परदेशी चलनाचा समावेश असतो. निर्यातीतून किंवा परदेशी कर्जातून परदेशी चलन मिळते. निर्यातीतून अधिक परदेशी चलन मिळविणे हा या दोहोंतील उत्तम मार्ग. कारण आपल्या स्वतःच्या प्रयत्नातूनच ते साध्य होते; एवढेच नव्हे, तर ह्या मार्गाने वर्तमान आणि भविष्यकाल अशी दुहेरी तरतूद होते. शिवाय, परदेशी कर्जापेक्षा हा मार्ग अधिक खात्रीलायक असतो. ज्या प्रमाणात आपले निर्यात-उत्पन्न वाढते, त्या प्रमाणातच आपण अधिक व खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वावलंबी बनत असतो. आपली निर्यात वाढावी, यासाठी आपण सर्व काही करणे अगत्याचे आहे.

अलीकडील काही वर्षांत निर्यातवाढीत आपण थोडी-फार प्रगती करू शकलो असतो, तरी किमतीच्या बाबतींत इतरांबरोबर आपण स्पर्धा करू शकलो नाही, ही मुख्य अडचण होती, निर्यातीला पोषक ठरतील, अशी उत्तेजने देऊन आपला माल स्पर्धेत टिकविण्याचे आम्ही प्रयत्न केले. परंतु

ह्यापेक्षा कडक शक्तिवर्धकांची गरज असल्याचे आपल्याला प्रत्ययाला आले. किमती कमी करण्याचे दोन मार्ग आहेत. देशांतर्गत किमती उतरविणे किंवा आंतरराष्ट्रीय व्यापारातील किंमत बदलणे.

अंतर्गत किमतीत घट केल्याने प्राप्तीचा, रोजगाराचा संकोच होतो. आमची ध्येये आणि आमच्या आकांक्षा यांच्याशी हे अगदी विसंगत आहे. कारण गेल्या अठरा वर्षांप्रमाणेच, उत्पादकांनी आणि कामगारांनी अधिककाधिक कमाई करावी, अशी आमची इच्छा आहे; आणि रोजगारात वाढ होत जावी, असे आम्हांला वाटते. हुकुमशाही राजवटीत किमती आणि पगार कमी केल्याने किती दैन्यावस्था पसरते, याचा विचार न करता बहुधा देशांतर्गत किमती उतरविण्यात येतात. परंतु आमचे राष्ट्र हुकुमशाही नाही. अवमूलनामुळे देशातील किमती आणि उत्पन्न आहे तसेच राहते, परंतु आंतरराष्ट्रीय बाजारातील आपल्या मालाच्या किमती मात्र उतरतात.

याचसाठी एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे की, अवमूलन ही एक आर्थिक बाब आहे. प्रतिष्ठेच्या कल्पना उराशी बाळगून व्यर्थ वादविवाद करण्यात काहीच अर्थ नाही. विनिमयाच्या अधिकृत दराकडे दुर्लक्ष करून एका डॉलरला दहा-बारा रूपये मोजण्यात अधिक मानहानी आहे. आपण काय करणार आहोत, ह्या आश्वासनापेक्षा आपण प्रत्यक्ष कृती काय करतो, यावरूनच जग आपली किंमत करते.

अलीकडेच रशिया, युगोस्लाव्हिया आणि फ्रान्स या देशांनी अवमूलन करून आपली आर्थिक स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारली. आपल्याप्रमाणेच त्यांची प्रगती खुंटली होती. तेव्हा त्यांनी प्रगतीच्या मार्गातील अडचणी बाजूला सारल्या.

आपला निर्यात व्यापार वाढावा, या दृष्टीने आपण टाकलेले व विश्वासपूर्ण पाऊल आपल्याला परकीय मदत मिळवून देण्याच्या बाबतीतही अत्यंत उपयुक्त ठरेल. आजची आपली आत्यंतिक गरज शेतकी आणि औद्योगिक क्षेत्रांत उत्पादनवाढ ही आहे. हा हेतू साध्य करण्यासाठी आपल्याला अधिक आयातीची गरज आहे; आणि हा आयात-व्यापार आपल्याला परकीय मदतीनेच साध्य करता येईल. जेव्हा आपण देशविकासासाठी सज्ज झालो तेव्हाच आपल्याला अशा मदतीची किती गरज आहे, याची खरी कल्पना आली. नजीकच्या भविष्यकाळात आपल्याला अशा स्वरूपाच्या मदतीची गरज लागणार नाही, इतपत आपण अवश्य प्रगती करू. पण ती मजल

गाठण्यासाठी आज आपणांस अशा मदतीची अत्यंत आवश्यकता आहे.

जोपर्यंत आपले उत्पादन आणि कर्जफेडीची ताकद वाढते आहे, तोवर आपल्याला परकीय मदतीचा भार वाटणार नाही विकास पावणाऱ्या व सतत वाढणाऱ्या उद्योगासाठी उधार-उसनवार ही करावीच लागते, ही गोष्ट जगमान्य आहे. महत्त्व कशाचे असेल, तर ते उत्पादनाचे व वर्धिष्णू उत्पादनक्षमतेचे.

देशांतर्गत रूपयाचे मूल्य बदलत नाही. दैनंदिन व्यवहारात बाजारात एका रूपयाला ज्या गोष्टी मिळतात, त्या तितक्याच मिळतील. फरक फक्त होईल, तो परदेशांतून आयात केलेल्या मालाच्या बाबतीतच. आयात केलेल्या वस्तूंच्या किमती साहजिकच वाढतील, पण भारतातच तयार झालेल्या वस्तूंच्या किमती मात्र वाढणार नाहीत. रोजच्या जीवनात लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या किमती वाढू देण्यात येणार नाहीत. अत्यावश्यक वस्तूंचा विचार केला, तर आयातीत त्यांचे प्रमाण मर्यादित आहे आणि अन्नधान्ये, खते, रॉकेल आणि सार्वजनिक वाहतुकीसाठी लागणारे इंधन यांच्या किमतींत अवमूलनामुळे वाढ होणार नाही, असे सरकारने यापूर्वीच जाहीर केले आहे. या वस्तूंच्या आयातीसाठी जी जादा रक्कम लागेल. ती सरकार सोसणार आहे.

इतर काही प्रकारच्या मालांत आयात वस्तूंचे प्रमाण थोडे अधिक असते. अशा मालाचा खप साधारपणे सधन असलेल्या वर्गात होतो. चैनीच्या आणि चैन या सदरात मोडणाऱ्या तत्सम वस्तू अधिक महाग करणे समर्थनीय ठरेल. आजही आपल्या ग्राहकांना ज्या वस्तूंसाठी जी किंमत द्यावी लागते, ती त्या वस्तूंची जी आयात किंमत असते, तीपेक्षा दुर्मिळतेमुळे अधिकच मोजावी लागते. अवमूलन ज्या प्रमाणात होईल, त्या प्रमाणात व्यापाऱ्यांचा जादा नफा कमी होतो. त्याचबरोबर आयात मालाच्या किमती वाढल्याने देशात अतिशय महत्त्वाच्या व औद्योगिक स्वरूपाच्या मालाचे उत्पादन सुरू केलेल्या उद्योगधंद्यांना यामुळे एक प्रकारे संरक्षणच मिळेल.

रूपयाचे अवमूलन करण्याबरोबरच आम्ही इतर उपाय योजले आहेत आणि योजीत आहोत. औद्योगिक उत्पादन-वाढीसाठी आवश्यक असलेल्या साहित्यावरील निर्बंध आम्ही सैल करीत आहोत. उत्पादनाचा वेग वाढवण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत आहे. उत्पादनाचे कार्यक्रम आखडते घ्यावे लागलेल्या सर्व कारखानदारांना आवश्यक तो माल पुरविण्याच्या दृष्टीने त्यांच्या गरजा त्यांनी कळवाव्यात, असे आम्ही ताबडतोब जाहीर केले होते, ही गोष्ट तुमच्या लक्षात आलीच असेल. आर्थिक क्षेत्रातील चणचणीची झळ

मोठ्या उद्योगधंद्यांपेक्षा छोट्या उद्योगधंद्यांना विशेष लागली आहे. या नवीन निर्णयामुळे छोट्या उद्योगधंद्यांचा विशेष लाभ होईल. अलोहित धातू मुक्तपणे मिळावेत, म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत.

या प्रश्नांचा आम्ही अत्यंत काळजीपूर्वक व साधक-बाधक विचार केला आहे आणि खऱ्याखुऱ्या अडचणीविरूद्ध सावधगिरीचे, उत्कृष्ट उपाय योजले आहेत. आयात अन्नधान्य, खते रॉकेल व इतर पेट्रोलजन्य पदार्थ हे ग्राहकांना अधिक महाग पडू नयेत, अशी दक्षता आम्ही घेतली आहे. मी वर सांगितल्याप्रमाणे दैनंदिन गरजेच्या वस्तूंत आयात मालाचे प्रमाण अत्यल्प असते. म्हणून गरीब जनतेच्या खर्चात कुठलीही वाढ व्हावयास नको. समाजाच्या कल्याणाला महत्त्वाच्या अशा औषधे आणि पुस्तकांसारख्या काही वस्तू आहेत. निर्बंध सैल करण्यात आले, याचा अर्थ या गटातील वस्तू अधिक प्रमाणात उपलब्ध होतील. काही का असेना, या साऱ्या प्रश्नांचा आम्ही सांगोपांग विचार करीत आहोत व पुढील दोन आठवड्यांत सरकार निर्बंध सैल करण्याचे अनेक उपाय जाहीर करणार आहे. त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेतील आणखीही अनेक निरगाठी सुटतील व उत्पादन वाढून अर्थव्यवस्था मजबूत होईल, अशी माझी खात्री आहे.

जादा उत्पादन हीच किमतीतील वाढीविरूद्धची सर्वोत्तम हमी आहे. या धाडसी नवीन उपायांमुळे जे नवीन उपप्रश्न निर्माण होतील, त्यांचा अभ्यास करून ते सोडविणे हेही महत्त्वाचे आहे. जनतेचे कल्याण व्हावे, अर्थव्यवस्था निकोप व्हावी आणि राष्ट्र सामर्थ्यशाली व्हावे, यासाठी ही शिस्त अमलात आणण्याचा सरकारचा निर्धार आहे.

## ७१... भाषण म्हणजे संवादच

गेली पन्नास वर्षे माझ्या विद्यार्थिदशेपासून आजपर्यंत मी एकसारखी भाषणं करीत आलो आहे. त्यामुळे कोणत्या कालखंडासंबंधाने लिहावे, असा प्रश्न आहे. सुरूवातीला श्रोतृवर्गासमोर उभे राहताना धडधडणारी छाती व कापणारे पाय यांची आठवण आजही मनात आहे. पण पुढे पुढे भाषणांचा सराव झाला. आजच्या काळात माझी होणारी वेगवेगळी भाषणे यांचे तीन-चार प्रकार करावे लागतील. राजकीय विषयावरची पक्षासाठी केलेली भाषणे, सामाजिक प्रश्नांसबंधी केलेली भाषणे, व्याख्यानमालेसाठी केलेली भाषणे, साहित्यविषयक सभांतून केलेली भाषणे व लोकसभेमध्ये केलेली भाषणे अशा प्रकारचे भाषणांचे वेगवेगळे गट होतील. या प्रत्येकाचा उद्देश वेगळा असतो व त्याच्यासाठी स्वीकारल्या जाणाऱ्या शैलीतही फरक असतो. आता शैलीत फरक आहे, असे जरी मी म्हणत असलो, तरी या वेगवेगळ्या शैलींत भाषण करणारा मी एकच माणूस असल्यामुळे माझ्यामधली शैली सर्वच ठिकाणी असते. परंतु विषय मांडण्याच्या पद्धतीत फरक असतो.

मी असे पाहिले आहे, की सर्व विषयांवरील वाचन व चिंतन असले, तर अनपेक्षितपणे एखाद्या विषयावर बोलण्यास सांगितले, तर मी आज बोलू शकतो, असा माझा अनुभव आहे. याच्या पाठीमागे आयुष्यभर केलेला विविध वाचनाचा संग्रह हेच शक्तिस्थान आहे. लहानपणी शाळेच्या विविध स्पर्धांत मी भाग घेतला. त्या वेळी मुद्दे टिपून घेऊन त्या अनुषंगाने मी बोललो आहे. पण पुढे ती माझी सवय मोडली.

आता हातामध्येच मुद्द्याचे टिपण घेऊन बोलणे हे मी क्वचितच करतो. मात्र बोलण्यासाठी जो विषय निवडला असेल, त्यासाठी चिंतन करण्याची आवश्यकता असते. या विषयाचे महत्त्व, त्या विषयाची ऐतिहासिक वाढ, त्यांच्यासंबंधी आजचे प्रश्न व त्यांवरील उपाय अशा तऱ्हेने मी त्या विषयाचा विचार करून ठेवतो व मग तो मी मांडू लागतो. पहिल्या दहा-पंधरा वर्षांत माझी काही निश्चित मते बनली नव्हती. मला वाटते की, त्या नंतरच्या काळात राजकीय, आर्थिक, सामाजिक साहित्यविषयक अशी माझी स्वतःची म्हणून

काही मते झाली. स्वतःमध्ये एक आत्मविश्वास निर्माण झाला.

मंत्री म्हणून चर्चेला उत्तर द्यायची भाषणे ही अगदी वेगळ्या प्रकारची असतात. त्या वेळी उपस्थित केलेल्या टीकांची जंत्री समोर ठेवावी लागते व त्यांतील महत्त्वाचे निवडक मुद्दे घेऊन त्यांना उत्तर द्यावे लागते. तसेच, आपल्या धोरणाची दिशा स्पष्ट करावी लागते. माझ्या मताने, ज्याला पार्लमेंटरी फोरम म्हणता येईल, त्यासाठी वेगळ्या तयारीची आवश्यकता असते. अधूनमधून भाषणात अडथळे येतात, त्या वेळी तर हजरजबाबीपणा व मन शांत ठेवून, आलेल्या अडथळ्यांना विनोदाने परतविण्याची मनात तयारी लागते. माझ्या लांबलचक संसदीय जीवनात याची आवश्यकता मला मी मुख्यमंत्री असताना व गृहमंत्री असताना जास्त भासली. ज्या काळात मी गृहमंत्री होतो, तो काळही मोठा वादग्रस्त होता. पार्लमेंटमध्ये काँग्रेस पक्षाचे बहुमत होते, परंतु ते काठावरचे होते. उत्तर भारतातील आठ-नऊ राज्यांत विरोधी पक्षांची मिश्र मंत्रिमंडळे काम करीत होती. त्यामुळे पार्लमेंटमध्ये असा एखादाही दिवस गेला नाही, की ज्या दिवशी मला दोन-चार वेळी तरी चर्चेत भाग घेऊन भाषण करावे लागले नाही.

त्या वेळी सर्वच प्रश्न वादग्रस्त होते, म्हणून मनाचा समतोलपणा ठेवण्याची नितांत गरज होती. त्या वेळच्या विरोधी पक्षांच्या लोकांनीही मला सांगितले की, तुम्ही मनाचा समतोलपणा सोडत नाही, ही आनंदाची गोष्ट आहे. महत्वाचे भाषण लोकसभेत किंवा विधानसभेत करताना ज्या प्रश्नांबद्दल बोलावयाचे आहे, त्या प्रश्नांची सर्व साधकबाधक माहिती जवळ असल्याशिवाय बोलणे योग्य नसते, म्हणून यासंबंधी टाचण व मुदे यांची गरज भासते. मी भाषण करताना ही सर्व कागदपत्रे भाषणापूर्वी काळजीपूर्वक वाचतो. परंतु भाषण करताना अशा टाचणांकडे पाहण्याची गरज भासत नाही. मुख्य मुद्दे कसे सांगावयाचे, सुरूवात कशी करावयाची व शेवट कसा करावयाचा, यासंबंधी मी मनात विचार करीत असे.

भाषणाची सुरूवात व शेवट यांसंबंधी मी इतर क्षेत्रांतील भाषणाचा विचार करून ठेवतो. पुष्कळ वेळा मला समारंभात भाग घ्यावा लागतो. त्या वेळी अनेक वक्त्यांपैकी मी पण एक वक्ता असतो. त्या वेळी मोठी जबाबदारी वाटते. आपला एखादा नवा विचार व दृष्टिकोन सांगितला नाही, तर मला समारंभात जावेसे वाटत नाही. माझ्या निष्ठेप्रमाणे मी हे आतापर्यंत करीत आलो आहे. माझे मित्रही मला हे सांगत असतात.

भाषण रंगविण्यासाठी काही प्रसंगी काही आडाखे जरूर बांधावे लागतात. परंतु मला त्याची पूर्वतयारी करावी लागत नाही. आडाखे मी भाषणाला उभा राहिलो, म्हणजेच मला सुचतात, हा दैवी योग आहे. याबाबात प्रमुख गोष्ट म्हणजे, भाषणास उभे राहिले, म्हणजे मनात विचारांची स्पष्टता असायला पाहिजे, आत्मविश्वास असायला हवा. अशा आत्मविश्वासाने भाषणासाठी उभे राहिल्यानंतर भाषणातील सर्व रंग व सर्व कल आपोआप येऊ लागतो, हा माझा अनुभव आहे. मी विशेष आरडा-ओरडा करून बोलणारा वक्ता नाही किंवा जीवघेणी टीका करणे हा माझा स्वभाव नाही. पण कोणी जर अकारण माझ्यावर टीका करण्याचा प्रयत्न केला, तर मात्र त्याच्यावर उलटण्याकरिता मागे-पुढे पाहत नाही. पण असे प्रसंग थोडे आहेत.

माझ्या भाषणांची शैली ही संभाषणाच्या पद्धतीची आहे. कारण वक्ता व श्रोते यांच्यामध्ये संवादाचे वातावरण निर्माण झाल्याशिवाय भाषण यशस्वी होत नाही, असा माझा अनुभव आहे. फार लांबलचक भाषण करण्याची माझी सवय नाही. महत्त्वाच्या समारंभांतून दहा-पंधरा मिनिटांपेक्षा मी जास्त भाषण करीत नाही आणि जाहीर सभेतील भाषण चाळीस-पंचेचाळीस मिनिटांपेक्षा जास्त लांबत नाही. लोकसभेत महत्त्वाच्या वादविवादावर बोलताना कधी कधी तास, दीड तास बोलावे लागले. परंतु दीड तासापेक्षा लांब भाषण मी कधीच केलेले नाही.

श्रोते व वक्ते यांच्यामध्ये मनमिलाफ असला, म्हणजे काय होते, याची मोठी खास आठवण सांगू इच्छितो. एक वेळ पार्लमेंटमध्ये गृहमंत्री म्हणून कम्युनिस्ट पक्ष व नक्षलवादी यांच्यासंबंधी मला बोलावयाचे होते आणि त्या बोलण्याच्या ओघात मी सभागृह इतके ताब्यात घेतले, की एक वेळ अशी आली, की माझ्या वाक्याची सुरूवात झाल्यानंतर त्यातील पुढचे शब्द कोणते असतील, याची कल्पना विरोधी व माझ्या पक्षातील सदस्यांना येत होती. तसेच वाक्याचा शेवट कसा करणार, याचे शब्द ते बोलू लागले. हा अनुभव विशेष आहे.

कधी कधी वादग्रस्त भाषणे करावी लागली; पण केवळ निरूपाय होता, म्हणून एक आठवण पुण्याचीच आहे. मी एक ग्रंथ-प्रकाशनासाठी पुण्यात गेलो होतो. त्या ग्रंथाचे संपादन प्रा. दांडेकर यांनी केले होते. त्यांनी आपल्या भाषणात राज्य-सरकार, काँग्रेस पक्ष व माझीसुद्धा खिल्ली उडविण्याचा मोठ्या कुशलतापूर्वक प्रयत्न केला. त्या समारंभात मी गप्प बसून चालण्यासारखे

नव्हते, असा निर्णय मनात घेतला व मी त्या सर्व प्रश्नांना माझ्या परीने फटकन उत्तरे दिली. दांडेकरांचा व माझा हा वाद पुष्कळ दिवस वर्तमानपत्रांत चालला. पुढे ते व मी मिळून समझोता केल्यानंतर यावर पडदा पडला. परंतु आजही प्रा. दांडेकर व मी भेटलो, तर एकमेकांना आदराने भेटतो. अर्थात फक्त ही एक आठवण म्हणून मी इथे उल्लेख केला आहे.

मी अनेकांची उत्कृष्ट व्याख्याने ऐकली आहेत. मी असे पाहिले आहे, की कोणाचे अनुकरण करणे मला शक्य नाही व मी ते केलेले नाही. उत्कृष्ट इंग्रजी वक्तृत्व असलेले वक्ते सर्वश्री सर्वपल्ली राधाकृष्णन, श्रीनिवास शास्त्री, भुलाभाई देसाई यांची अतिशय प्रभावी विचारपरिपूर्ण भाषणे मी ऐकली आहेत. त्यांच्यासारखे आपणांस इंग्रजी बोलता यावे, असे वाटले, तरी त्यांचे अनुकरण करणे सुतराम् शक्य नव्हते. मी इंग्रजी वाचन बरेच करीत होतो व त्यातूनच माझी एक देशी शैली निर्माण केली.

पुण्यात वंसत व्याख्यानमालेतील एक गोष्ट आठवते. श्री. भुलाभाई देसाई वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यासाठी आले होते आणि विषय होता, 'फंडामेंटल्स ऑफ नॅशनॅलीजम.' १९३५-३६ चा काळ असावा. मी त्या वेळी पुण्यात होतो, म्हणून हे व्याख्यान ऐकण्यास गेलो. त्यांनी मूलभूत विषयावर अतिशय सुरेश शैलीत चाळीस-पंचेचाळीस मिनिटे भाषण केले. त्यानंतर पुण्याच्या पद्धतीप्रमाणे उपवक्त्यांनी भाषणे सुरू केली. त्यांमध्ये श्री. के. एन. फडके पुण्याचे प्रसिद्ध वकील हेही होते. त्यांनी श्री. भुलाभाई देसाईंच्या इतके लांबलचक भाषण केले. आम्हां ऐकणाऱ्यांना त्याचा मूळ विषयाशी काही संबंध आहे, असे वाटले नाही. उपवक्त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी श्री. भुलाभाई देसाई उभे राहिले, तेव्हा त्यांनी श्री. फडके यांच्या भाषणाचा उल्लेख करून सांगितले की, 'प्रोफेशन इन विच आय ॲम ब्रॉट अप, रेलेव्हन्सी इज ए ग्रेट व्हर्च्यु' या एका वाक्यात श्री. फडके यांची बोळवण करून त्यांनी टाळ्या घेतल्या.

मी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. काकासाहेब गाडगीळ, ना.सी. फडके यांची भाषणे मन लावून ऐकली आहेत. श्री. ना.सी. फडके यांच्या मराठी भाषेच्या उच्चाराचा परिणाम आजही माझ्या मनावर आहे. इतके स्वच्छ मराठी बोलणारा माणूस मी क्वचितच पाहिला असेल. श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या भाषणात खट्याळपणा, चिमटे-चपाटे असत. परंतु विचाराने परिपूर्ण भाषण ऐकावयाचे असेल, तर ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे.

आजही मी जेव्हा त्यांचे भाषण ऐकतो, तेव्हा त्यात नवीन विचार आढळतात. म्हणून नीट मांडणी केलेले विचार ऐकण्यात आनंद येतो.

एकंदरीत प्रत्येक भाषणाची थोडी-फार तयारी, चिंतन करणे आवश्यक असते. अनेक विषयांवरील अनेक व्यक्तींची संभाषणे, विचार यांच्या वाचनाचीही आवश्यकता असते. वक्तृत्वासाठी वक्तृत्व मी कधी केलेले नाही. त्यामुळे कधी माझी भाषणे चांगली होतात, तर कधी सामान्य होतात. पण ती कधी पडत नाहीत. मी मूळचा राजकीय वक्ता आहे व त्याचा अनुलक्षून ज्या विषयात रस आहे, त्यासंबंधी मी बोलत असतो. परराष्ट्र - संबंध, आर्थिक व सामाजिक परिवर्तन हे माझे अति आवडीचे विषय आहेत. पण मला खरा आनंद होतो, मी जेव्हा साहित्यविषयक प्रश्नासंबंधी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत असतो, तेव्हा. त्या क्षेत्रातील मी अधिकारी माणूस नाही; परंतु बहुश्रुत आहे, असा माझा दावा आहे. त्यामुळे त्या विषयांवर बोलण्याचा मला नेहमीच आनंद वाटतो. पन्नास वर्षे भाषणे केल्यामुळे आता भाषणे करावयाचा कंटाळा येतो. म्हणून मी भाषणांची फारशी निमंत्रणे स्वीकारीत नाही. परंतु याचा अर्थ भाषणाची हौस संपली, असा मात्र नव्हे.

# ७२... मराठी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य - लढ्यातील कार्य

भारताचा स्वातंत्र्याचा लढा अनेक मार्गांनी व अनेक आघाड्यांवर लढविला गेला. त्यासाठी सशस्त्र युद्ध झाले, परकीय राज्याच्या दडपणापुढे आम्ही नमणार नाही, हे जगाला सांगण्यासाठी क्रांतिकारकांनी अनेक प्रयत्न केले. ब्रिटिश सरकारला युक्तिवादाने आपले म्हणणे पटवून देण्याचेही सनदशीर प्रयत्न झाले. जनतेला आपल्या हक्काची जाणीव करून देऊन असंतोष सतत धगधगत ठेवणे व त्यातूनच लढाऊ आंदोलन उभारणे हे आवश्यक आहे, म्हणून टिळक व गांधी यांनी प्रयत्न केले. भारताच्या सीमेबाहेर पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्वातंत्र्याचे सशस्त्र युद्ध लढविले गेले. पण या सर्व विविध प्रयत्नांना यशस्वी करण्यासाठी जनजागृती करणे व स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करणे आवश्यक होते. स्वतःच्या संस्कृतीवरील विश्वास पुन्हा निर्माण करावयाचा होता. नवराष्ट्र-निर्मितीची आकांक्षा प्रज्वलित करावयाची होती. हे सर्व कार्य सातत्याने भारतातील वृत्तपत्रांनी केले आहे, म्हणून भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासात वृत्तपत्रांचे कार्य फार महत्त्वाचे आहे.

मराठी वृत्तपत्रांची परंपरा अशीच तेजस्वी आहे. त्याचा जन्म बिकट परिस्थितीत झाला. त्या काळात ब्रिटिश राजवट स्थिर करण्याचे राज्यकर्त्यांचे प्रयत्न सर्वत्र सुरू झाले होते. बुद्धिमान वर्गाला वश करून घेण्यासाठी इंग्रजी शिक्षण, सरकारी नोकऱ्या, इत्यादी मार्ग अवलंबण्यात येत होते. त्याला बळी पडलेल्यांचा व पाश्चात्य सुधारणांनी हुरळून गेलेला एक वर्ग निर्माण होत होता, त्याला हाताशी धरून येथे राज्य चालविण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न होता. तो यशस्वीही होत होता.

दुसरा वर्ग ब्रिटिश राज्याविषयी साशंक असलेल्यांचा व स्वतःच्या देशाच्या परंपरेचा विचार करणाऱ्यांचा होता. आपल्या राष्ट्राच्या पराभवाची खंत त्यांच्या मनांत होती. या वर्गानेच या देशाच्या स्वातंत्र्य-चळवळीस प्रारंभ केला, असे म्हटले, तर चुकणार नाही. वृत्तपत्राकडे प्रथम लक्ष गेले, ते याच वर्गाचे. मराठीत पहिले इंग्रजी व मराठी असे ‘दर्पण’ या नावाने संमिश्र पत्र सुरू केले, ते बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन यांनी.

'दर्पण' हा हेतू सांगताना भाऊ महाजन लिहितात, 'स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी व्हावी व येथील लोकांचे कल्याण यांविषयी स्वतंत्रतेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे,' यावरून हे स्पष्ट होईल, की देशस्थितीचा सामूहिक विचार व्हावा, ही कल्पनाच पत्रव्यवसायामागे प्रारंभापासून होती. प्रथम जनतेची जागृती करणे आवश्यक आहे व त्यासाठी वृत्तपत्रासारखे नवे साधन वापरले पाहिजे, ही जाणीव यातून स्पष्ट होते.

'ज्ञानप्रकाश' व 'केसरी' या दोन पत्रांचा या दृष्टीने उल्लेख अवश्य हवा. या दोन मराठी पत्रांनी विचारवंतांवर पगडा बसविला, हे निश्चित आहे. 'ज्ञानप्रकाश' १८४९ साली सुरू झाला. त्याचे उद्दिष्ट परदेशांत काय घडते आहे, ते या देशाला कळावे, हा होता. 'छापखाना हे सुधारणांचे द्वार आहे' असे प्रारंभीच्या संपादकीयात 'ज्ञानप्रकाशा' ने म्हटले आहे. यावरून वृत्तपत्रांचे स्वरूप लोकशिक्षण देणारे व जागृती करणारे असेच लोकांच्या डोळ्यांपुढे आहे, हे निश्चित.

पण केवळ माहिती किंवा लोकशिक्षण एवढ्यापुरते वृत्तपत्रांचे उद्दिष्ट मर्यादित न ठेवता, लोकांना राष्ट्रोत्थानासाठी कार्यप्रवण करणारे पत्र निघाले, ते म्हणजे 'केसरी'. 'केसरी'मागे लोकमान्य टिळक आणि आगरकर ही दोन प्रभावी विचारसरणी असलेली माणसे होती. एका विशिष्ट विचाराने, ध्येयाने भारावून जाऊन त्यांनी हे पत्र काढले. टिळकांची विचारसरणी सर्वज्ञात आहे. इंग्रजी राज्याने आणलेली नोकरशाही जनतेची छळणूक करीत आहे, तेव्हा तिच्याविरूद्ध लोकांनी आपले हक्क मिळविण्यासाठी संघटितरीत्या उभे राहिले पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा प्रारंभ होता. पण हे विचार वृत्तपत्रांतून मांडणे सोपे काम नव्हते. कारण वृत्तपत्रीय स्वातंत्र्य ही त्या वेळी गृहीत धरण्यासारखी गोष्ट नव्हती. म्हणून टिळकांनी ते झगडून मिळविले. वंगभंगाच्या चळवळीच्या वेळी किंवा महाराष्ट्रातील प्लेगच्या वेळी टिळकांनी लिहिलेले लेख हे त्या काळच्या राजसत्तेला दिलेले आव्हान होते. सरकारला तुम्ही का खिजवत आहात? असे त्या वेळी टिळकांना विचारले होते. तेव्हा ते म्हणाले की, 'प्रत्येक राष्ट्रीय पक्षाच्या वृत्तपत्राचे एकामागून एक पाच संपादक तुरूंगात जाईपर्यंत तरी १२४ अ कलमाचा भंग करून हा राजद्रोहाचा कायदा निर्माल्यवत करून टाकण्याची आमची योजना होती. अर्थात मी पुढे होणे भाग होते. पण एक एक संपादक तुरूंगात गेल्यावर इतरांनी हातपाय गाळले.' या

टिळकांच्या उद्‌गारांवरून त्यांचा राजद्रोहाचे खटले लढविण्याचा हेतू स्पष्ट होतो. भारताच्या स्वातंत्र्येतिहासात या खटल्यांना म्हणूनच अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्रीय स्वातंत्र्य कष्ट सोसून, सरकारकडून हिसकावून घेण्याचे महान कार्य टिळकांनी केले आहे, हे निःसंशय. त्यांचेच समकालीन असलेले शिवरामपंत परांजपे हेसुद्धा याच हेतूने आपल्या तीक्ष्ण लेखणीने सरकारवर टीका करीत होते, वक्रोक्ती व उपहास ही त्यांची मुख्य शस्त्रे होती. म्हणून मराठी वर्तमानपत्रांत केवळ बातम्या किंवा माहिती यांना प्राधान्य नव्हते. तरी सारी राष्ट्रीय लढ्याची प्रेरणा व त्यातील डावपेच यांची चर्चा वृत्तपत्रांतून होई. टिळकांचे समकालीन गोपाळ गणेश आगरकर यांनी पुढे 'सुधारक' नावाचे वर्तमानपत्र चालविले. त्याच्यातून समाजाच्या सुधारणेसाठी विचार मांडण्यास सुरूवात केली. सारांश, समाजसुधारणा आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य या दोन प्रेरणा त्या काळच्या मराठी पत्रांत होत्या.

या ठिकाणी एक नवी दृष्टी घेऊन कामगारांच्या प्रश्नांकडे जनतेचे लक्ष वेधणाऱ्या 'कामगार' या वर्तमानपत्राचा उल्लेख केला पाहिजे. १८९२ मध्ये हे साप्ताहिक कामगारांच्या तक्रारींस योग्य वळण लावून, त्यांच्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठी काढले होते. अर्थात ते फार दिवस चालले नाही. पण एका विशिष्ट वर्गाच्या हितासाठी काढलेले हे वर्तमानपत्र म्हणून त्याला महत्त्व आहे. तीच गोष्ट काही जिल्हापत्रांची आहे. १८७० च्या सुमारास महाराष्ट्रात नासिकवृत, पुणेवैभव, इत्यादी जिल्हापत्रे सुरू झाली. मराठी वर्तमानपत्रांच्या परंपरेत व त्यांनी केलेल्या जागृतीच्या कार्यात या सर्व प्रकारच्या वर्तमानपत्रांना स्थान आहे.

टिळकांच्या मृत्यूनंतर मराठी वर्तमानपत्रांचा दुसरा कालखंड सुरू झाला. १९२० ते ४० अशा या कालखंडात भारतीय राजकारणातील वैचारिक संघर्ष व आंदोलने सुरू झाली. केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरे पडणार नाही. त्याला आंतरराष्ट्रीय व सामाजिक आशय दिला पाहिजे, समाजाची निश्चित आर्थिक रचना ठरविली पाहिजे, इत्यादी विचारसरणी त्या वेळेला पुढे आल्या. हिंसा-अहिंसा, सत्याग्रह, साधनशुचिता, भारतीय राष्ट्रवादाचे स्वरूप, इत्यादी प्रश्न चर्चिले जाऊ लागले. या सर्व प्रकारच्या विचारसरणींचे मंथन या काळात महाराष्ट्रात झाले. टिळकांच्या काळीच अच्युतराव कोल्हटकर यांनी भारतीय राजकारणावर सडेतोड टीका करण्यास सुरूवात केली होती. अच्युतराव कोल्हटकरांनी आंतरराष्ट्रीय प्रश्न अगदी सुबोध भाषेत मांडण्यास सुरूवात

केली. कोल्हटकरांची भाषाशैली, विचार यांमुळे 'संदेश' हे त्यांचे वृत्तपत्र अत्यंत लोकप्रिय झाले. अत्यंत तटस्थ रीतीने वृत्तपत्रांचा संपादक म्हणून राष्ट्रीय आंदोलनावर टीका करणाऱ्या संपादकांत अच्युतराव कोल्हटकर यांची गणना केली पाहिजे. त्याचप्रमाणे न. चिं. केळकर यांनी 'केसरी'तून अनेक विषय हाताळले. समाजाच्या विचारधनात उत्तम रीतीने भर टाकण्याचे कार्य केळकरांनी केले. गोपाळराव ओगल्यांच्या संपादकत्वाखाली नागपूरलाही 'महाराष्ट्र' या नियतकालिकाने असेच मानाचे स्थान जनतेत मिळविले होते. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'बहिष्कृत भारत', 'समता' ही साप्ताहिके काढली.

गांधी आणि टिळक यांच्या विचारांचा संगम घडवून समाजवादाच्या विचारसरणीचा पुरस्कार आचार्य जावडेकर यांनी केला. अनेक तरूणांना या विचारसरणीकडे त्यांनी ओढले, ही त्यांची महत्त्वाची कामगिरी होय. साने गुरूजींचाही या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे. त्यांनीही वृत्तपत्रीय लेखनातून हीच विचारसरणी आपल्या तळमळीच्या शब्दांनी मांडली. स्वा. सावरकर यांनी हिंदू समाजाच्या रूढींवर वृत्तपत्रांतून सामाजिक लेख लिहून हल्ले चढविले. 'गाय हा उपयुक्त पशू आहे, माता नव्हे' अशांसारखे प्रखर बुद्धिवादी विचार सावरकरांनी मांडले.

सारांश, सुबुद्ध मराठी समाजाच्या वैचारिक घडणीचे कार्य या काळात वृत्तपत्रांनी केले. या काळात अनेक वाद निर्माण झाले. पण त्यामुळे वैचारिक सहिष्णुता वाढली. ही सहिष्णुता व राजकीय जागरूकता लोकशाही रूजविण्यासाठी आवश्यक असते. हे कार्य मराठी पत्रांनी केले.

वृत्तपत्रांना आणखीही एका दृष्टीने महाराष्ट्रात महत्त्व आहे. त्यांनी ज्ञानाच्या खिडक्या उघडल्या. त्यांतून पुरोगामी विचार समाजापुढे आले. वैचारिक, आर्थिक, सामाजिक विचारांची मूलभूत चर्चा त्यांनी केली.

याखेरीज विष्णुशास्त्री चिपळूणकर, हरि नारायण आपटे, खाडिलकर, न.चिं.केळकर यांसारख्यांनी साहित्याच्याही चळवळींना वृत्तपत्रांतून स्थान दिले. जनतेची रसिकता व जिज्ञासा वाढविली. असा हा सर्वांगीण विकास मराठी वृत्तपत्रांनी घडवून आणला आहे.

स्वातंत्र्याच्या इतिहासात जसे असंतोषाला स्थान आहे, तसे रचनात्मक विचाराला, विधायक वृत्तीला व सर्जनशील प्रतिभेलाही आहे, नव्हे, त्याची

अत्यंत गरज आहे. हेच मराठी वर्तमानपत्रांच्या इतिहासावरून स्पष्ट होते. म्हणून स्वातंत्र्याच्या कल्पनेचा सर्वंकष व प्रगल्भ असा आविष्कार मराठी वृत्तपत्रांनी केला, हेच त्यांचे वैशिष्ट्य होय.

जेव्हा स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा केवळ राजकीय आंदोलनाचा विचार करणे एकांगी ठरेल. कारण स्वातंत्र्य ही एक भावना आहे. ती एक प्रवृत्ती आहे, तो एक जीवनाचा मूलमंत्र आहे, आणि समाजाच्या सर्व व्यवहारांतून त्यांचे दर्शन झाले पाहिजे, तरच स्वातंत्र्य ही नकारात्मक कल्पना ठरणार नाही. स्वातंत्र्य-लढ्यातील मराठी वर्तमानपत्रांच्या कामगिरीकडे याच दृष्टीतून पाहिले पाहिजे, तरच तिचे यथार्थ ज्ञान होईल.

# ७३... विदर्भ साहित्य संमेलन

(रौप्यमहोत्सवी संमेलनाच्या उद्‌घाटन-प्रसंगीचे भाषण : २६ डिसेंबर, १९६४)

साहित्य संमेलनात, कोणत्याही मराठी भाषक माणसाला भाग घेण्याची संधी मिळणे ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे. या संमेलनासाठी आपण मला आमंत्रण देऊन आपल्याशी चार गुजगोष्टी करण्याची जी संधी दिली, त्याबद्दल मी आपणां सर्वांचा हार्दिक आभारी आहे. मराठी साहित्याची मी काही महत्त्वाची सेवा केली आहे आणि म्हणून माझी या वेळी आठवण करण्यात आली आहे, असल्या कोणत्याही भ्रमात मी नाही. मी केवळ एवढेच म्हणू शकतो की, माझ्याबद्दल आपणांस वाटणारा जिव्हाळा आणि मराठी भाषा, तसेच, मराठी भाषकांबद्दल माझ्या मनात असलेली नितांत श्रद्धा यांमुळेच आजच्या ह्या प्रसंगी मला आमंत्रित करण्यात आले आहे; आणि केवळ या एकाच भावनेने मी आपल्या आमंत्रणाचा स्वीकार केला आहे.

साहित्य संमेलन भरवून आपण एका प्रकारे विस्मृत इतिहासाला उजाळाच दिला आहे. वऱ्हाड-मराठवाड्याची ही भूमी मराठी भाषेची जननी आहे, हे आपणां सर्वांना माहीतच आहे. शेकडो वर्षे येथील जनजीवनात घडलेल्या घटनांचा व संघर्षांचा परिणाम म्हणून मराठी भाषेला येथेच अंकुर फुटले, या भूमीतच तिचे पालन-पोषण झाले आणि एक स्वतंत्र भाषा म्हणून मराठी भाषेने नेत्रदीपक विकास केला. याचे कारण पण स्पष्ट आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर इतिहासाची जास्त कडक नजर राहिली आहे. आर्य आणि अनेक आर्येतर जातींची पद-चिन्हे आजही येथील भूमीवर अंकित झालेली आढळतात. नाग, अभीर, सातवाहन, यादव, मुसलमान, मराठे या सर्वांच्या राजवटींत जेवढी परिवर्तने झाली, त्या सर्वांचा परिणाम येथील बोल-भाषांवर झाला. मराठी भाषेच्या स्वरूपासंबंधी विचार केल्यास, असे म्हणता येईल की, गेल्या दोन हजार वर्षांतील सर्व घटनांचा परिणाम या भाषेच्या विकासावर झाला आणि त्यातूनच मराठीचे आधुनिक रूप साकार झाले. तेव्हा या प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या स्वभावातील सर्व गुणविशेष मराठीत दिसले, तर याबद्दल आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. साहित्यात प्रादेशिकता काही अंशी असते,असे वाटते. जमिनीचा कस वेगळा असला, की पिकाचे प्रमाण व प्रकार बदलतात,

तसेच काही अंशी साहित्यनिर्मितीचे असते. म्हणून विदर्भाच्या साहित्यात येथील मूल्यांचा, येथील परंपरेच्या संस्कारांचा अंश असणे अपरिहार्य आहे. साहित्याची समृद्धी यामुळेच वाढते. महाराष्ट्र या दृष्टीने भाग्यशाली आहे. त्यातील विविध विभागांच्या वैशिष्ट्यपूर्ण साहित्यामुळे त्याची भाषा संपन्न झाली आहे. विदर्भ साहित्य संमेलनाकडे मी याच दृष्टीने आकर्षित झालो. तेथील साहित्याचे नवे उन्मेष समजावेत, ही माझी इच्छा आहे.

महाराष्ट्राच्या भोवताली अनेक भाषांचे वर्तुळ आहे आणि या भाषांशी नेहमीच संबंध येत राहिल्याने त्याचा मराठीवर परिणाम होणे साहजिकच आहे. इ.स. पूर्वकाळात आर्यांचा दक्षिणापथ प्रदेशाबरोबरच संबंध होता. त्याचा असा परिणाम झाला की, मुसलमानांचे आक्रमण होण्यापूर्वी, महाराष्ट्रातील जनतेचा संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश ह्या आर्य भाषांशी संबंध आला व त्याचा त्यांच्यावर प्रभाव पडून त्यांना या भाषांचा परिचय झाला.

मराठी भाषेला इतिहासाने वस्त्र दिले, तर भूगोलाने ते शिवून मराठी भाषेच्या अंगावर घातले व तिच्या रूपात भर टाकली, असे म्हणावे लागेल. प्राचीन काळापासून या प्रदेशाची अशी भौगोलिक स्थिती होती की, उत्तर भारत आणि दक्षिण भारत या दोघांमध्ये एका सेतूची भूमिका या प्रदेशाने पार पाडली. उत्तरापथमधील रहिवासी ह्या प्रदेशाला दक्षिणापथ म्हणत असत. तर दक्षिणेकडील लोक या प्रदेशाला उत्तरेकडील अंतिम ठाणे समजून, ह्या प्रदेशाकडे एक जवळचा शेजारी या नात्याने पाहत असे. अशा परिस्थितीत, उत्तर आणि दक्षिणेकडील विचारप्रवाह, तसेच, बोलभाषा ह्यांचा संगम ह्या प्रदेशात होणे स्वाभाविकच होते. जवळजवळ एक हजार वर्षे असाच क्रम व उपक्रम चालू राहिल्यानंतर मुसलमानांचे पाय या भूमीला लागले. जुन्या विचारप्रवाहांत एक तिसरा प्रवाह येऊन मिळाला. महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील सागर-वाहतुकीच्या वर्दळीनेही विविध संस्कारांची भर या भाषेच्या विकासामध्ये पडत आली आहे. येथील गृहस्थाश्रमी लोकांनी आपल्या दैनंदिन जीवनात, शब्दांचा जितका उपयोग केला नाही, त्यापेक्षा कितीतरी पट कोलाहल तेथील मैदानात पर्वतश्रेणीत भटकणाऱ्या आणि संघर्ष करणाऱ्या सेनांनी केला. महाराष्ट्राच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीची ही देन आहे.

या सर्व कारणांमुळे मराठी भाषेवर आणि कालांतराने मराठी साहित्यावर असाधारण सर्वांगीणतेची, तसेच, सर्वसंग्राहकतेची छाप पडली. ह्याचा परिणाम असा झाला की, आर्य कुटुंबात निर्माण झालेल्या ह्या भाषेत काही

द्रविड भाषांतील विशेष गुणांनी, तसेच, शब्दांनी प्रवेश केला. संस्कृत तसेच, भिन्न भिन्न प्राकृत आणि अपभ्रंश भाषांशिवाय अरबी आणि फारसी भाषांना मराठीत स्थान मिळाले. ह्या प्रक्रियेची कारणमीमांसा आणि त्याचा परिणाम यांवर विशेष प्रकाश टाकणे हे भाषाशास्त्रज्ञांचे काम आहे. मी एवढेच म्हणेन की, मराठीच्या ह्या सर्वसंग्राहक स्वरूपाचा मला खरोखरच अभिमान आहे आणि मराठी भाषेच्या ह्या विशेष गुणांमुळेच ह्या भाषेबद्दलची माझी श्रद्धा आहे.

भाषेच्या ह्या स्वरूपाचा प्रभाव मराठीच्या साहित्यावर पडणे स्वाभाविकच होते. गेल्या सात-आठ वर्षांपासून, ज्या विचारमंथनातून मराठी साहित्याने मार्ग काढला आहे, त्याची पार्श्वभूमी मराठी भाषेच्या इतिहासात सापडते. एकीकडे ही मराठी भाषा साधुसंत आणि धर्मप्रचारकांच्या उपदेशाचे माध्यम बनली आहे, तर दुसरीकडे हीच भाषा युद्धक्षेत्रात, शत्रूला ललकारून रणभेदीचा निनाद करताना आढळते. कल्पनातील कोमलता, त्याचप्रमाणे वज्राची कठोरता हे दोन्ही भाव मराठीत सहजपणे सापडतात. जसजसा मराठी साहित्याचा विकास होत गेला, तसतसा ह्या साहित्यावर, काळ परिस्थिती आणि लोकजीवन ह्यांचा परिणाम होत गेला व त्यामुळेच, त्या त्या काळांतील सर्वत्र विचारप्रवाह, आकांक्षा आणि सामान्य जनतेच्या आवश्यकतांचे प्रतिबिंब ह्या भाषेतील तत्कालीन साहित्यात आढळते. यादवकाळ आणि मराठा युग ह्या वेळी आमच्या कवितेने पोवाड्याचे रूप घेतले आणि वीररसप्रधान साहित्य निर्माण झाले. तर पेशवाईत आणि नंतरच्या काळात, लावणीने जन्म घेतला आणि मराठी कवितेत माधुर्याने प्रवेश केला. लावणीने जन्म घेतला आणि मराठी कवितेत माधुर्याने प्रवेश केला. लावणीने मराठी भाषेला लावण्यमयी बनविले व ही लावणी स्वतः लावण्य शब्दाची प्रतीक बनली.

आधुनिक काळात, साहित्य हे मर्यादित स्वरूपात न राहता आता साहित्याने सारे लोकजीवन व्यापले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात जसजसे फेरबदल झाले, त्या अनुरोधाने मराठी साहित्यातील विचारप्रवाह पण बदलत राहिले.

देश आणि समाजातील परिस्थितीचा साहित्यावर प्रभाव पडणे स्वाभाविकच असते. महाराष्ट्रातील संतांची वाणी, त्यांचे जीवन, तसेच, शिवाजीच्या काळातील मराठी वीरांची देशभक्तीची आणि शौर्याची कामे ह्यांचा तत्कालीन साहित्यावर काय परिणाम झाला, हे सर्वांना माहीतच आहे.

आता आमचा देश राजकीय बंधनांतून मुक्त झाला असून, त्याने स्वतंत्र प्रजासत्ताकाचे रूप धारण केले आहे. राजकीय उन्नतीबरोबरच आर्थिक उन्नतीसाठी अनेक योजना आमच्यासमोर आहेत. आता वैज्ञानिक, औद्योगिक आणि तांत्रिक विषयांवरील ग्रंथरचना, ह्यांना आमच्या शिक्षणात आणि साहित्यात एक उपयोगी अंग म्हणून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. असे असले, तरी ज्याला आम्ही अक्षर वाङ्मय म्हणतो, त्याची प्रत, ह्या सर्वांपेक्षा भिन्न असते. असे साहित्य मानवाच्या मूलभूत सद्भानांना आवाहन करते, आणि मानवाला जीवन संघर्षासाठी समर्थ बनविते. अशा साहित्यामुळे समाज नित्य प्रगतीला अभिमुख राहतो.

जनतेच्या स्वातंत्र्यासाठी आणि राष्ट्राच्या उत्थानासाठी आणि भारतीय जनतेच्या महान महत्त्वाकांक्षा साकार करण्यासाठी संतांची वाणी, शिवाजीची ललकार, तसेच, आगरकर, चिपळूणकर आणि टिळक अशा विचारवंत देशभक्तांचे विचार मराठी भाषेला न मिळते, तर आज मराठी साहित्य इतक्या उन्नत स्थितीत आढळले असते का ? आपण फ्रेंच भाषेचेच उदाहरण घेऊ या. फ्रेंच भाषा पूर्वीपासूनच उत्कृष्ट होती, हे एक सत्य आहे. असे असले, तरी जर फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली नसती, तर फ्रेंच भाषेत लालित्य आले नसते आणि तेथील साहित्याचा, आज दिसतो, तसा विकास झाला नसता.

बुद्ध आणि महावीर ह्यांच्या वाणीने एक प्रकारे लोकभाषांना पंखच दिले, असे म्हणावयास हरकत नाही. संस्कृत भाषेचा विशाल तट ओलांडून प्राकृत आणि पाली ह्या भाषा जैन आणि बौद्ध भिक्षुकांच्या मदतीने सर्व देशभर पसरल्या. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संतांच्या वाणीचा प्रवाह केवळ महाराष्ट्राच्या सीमेतच मर्यादित राहिला नाही. ह्याचा पुरावा पण आपणांस आढळतो, शीखांच्या गुरू ग्रंथसाहेबात नामदेवाचे पासष्ट अभंग आढळतात. अशाच प्रकारे नवे विचारप्रवाह भाषेच्या मदतीने देश, काळ आणि नैसर्गिक सीमेची बंधने पार करीत असतात.

कोणत्याही भाषेच्या माध्यमाने जे विचार प्रगट होत असतात, त्या विचारप्रवाहांवरच तिची प्रगती अवलंबून असते. कशीही परिस्थिती असो, जर त्या विचारप्रवाहात प्राण असेल आणि गती असेल, तर असले विचारप्रवाह जनतेपर्यंत पोहोचल्याशिवाय राहत नाहीत. म्हणूनच लोकजीवनातूनच साहित्य निर्माण होते, असे मानण्यात येते. लोकजीवनाचे प्रतिबिंब प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे साहित्यावर पडत असते व त्यावर पुन्हा साहित्याचा लोकजीवनावर परिणाम

होतो. आवाजाच्या प्रतिध्वनीप्रमाणे ही क्रिया चालत असते. लोकजीवनाचा स्वर साहित्यात उमटतो आणि साहित्यात त्या स्वराचा असा प्रतिध्वनी निर्माण होतो, की जो पुन्हा लोकजीवनात जाऊन मिसळतो. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे संतांच्या जीवनाचा व साहित्याचा प्रतिध्वनी आजही आमच्या लोकजीवनात उमटलेला आढळतो. ह्या संतांनी लिहिलेली गीते, अभंग आणि भजनांत लोकजीवनाचे प्रतिबिंब आढळते आणि ह्या साहित्याच्या योगे सर्वसामान्य लोकांना मनःशांती मिळते. मानवी जीवन वैयक्तिक असो वा सामाजिक असो, त्यांच्या कोणत्याही पैलूची, भाषेच्या मदतीने केलेली अभिव्यक्ती साहित्याचे स्वरूप घेते. खरे म्हणजे, असल्या साहित्यात, मानव आणि मानवोपयोगी प्रवृत्ती ह्यांची अभिव्यक्ती झाली पाहिजे. ज्या साहित्यामुळे अमंगलाचा नाश होतो आणि मंगलाची स्थापना होते, असे साहित्य उदात्त गुणांची प्रेरणा देऊ शकते. अशा प्रकारे साहित्य जनतेच्या उदात्त भावनांना प्रेरणा देऊन प्रगतीच्या दिशेने समाजाला गतिमान करते.

साहित्याचा समाजजीवनासाठी आरशासारखा उपयोग होतो. कारण ह्या साहित्यात सर्वसाधारण लोकांच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब सापडते. ह्यातच साहित्याच्या उत्पत्तीचे व जनतेच्या अभिव्यक्तीचे रहस्य दडलेले आहे. हे असे सत्य आहे की, ज्याला समस्त मानवेतिहासाचा पुरावा देता येईल.

भारतीय संस्कार आणि भाव यांचा अफाट सागर भारतीय जनजीवनात साहित्याच्या रूपाने उसळत आहे. मराठी साहित्य या विशाल सागराचा एक महत्त्वपूर्ण अंश आहे, हे आम्ही विसरता कामा नये. ह्या सागरातील लाटा निराळ्या तटांवर आदळून एका तटाचा विशेष संदेश दुसऱ्या तटाला नेऊन पोहोचवितात. ह्या लाटांचा उठणारा ध्वनी केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा प्रतिध्वनी साऱ्या देशात उठतो आणि हा प्रतिध्वनी भारतीय साहित्यसागरातही उठलेला आढळतो. आजच्या स्वतंत्र भारतात, भारतीय भाषा त्या लाटांप्रमाणे आहेत, ज्या भारताच्या एकतारूपी विशाल सागरात नेहमीच उठत असतात. प्रत्येक लाटेचे सौंदर्य आगळेच आहे आणि तिला स्वतंत्र अस्तित्व आहे. पण या सर्व लाटांचा समावेश शेवटी त्या महासागरातच आहे. ह्या लाटा स्वैरसंचार करीत साहित्याला नवीन स्वर देत असतात व त्यातून भारतीय साहित्याचे मधुर संगीत निर्माण होते.

आजच्या युगात, आम्हांला अशा संगीताची आवश्यकता आहे, जे

एकतेच्या तालावर आम्हांला निरनिराळ्या स्वरांत गाता येईल. भाषांच्या ह्या स्वरांत एक नवे चैतन्य असेल, एक नवे आवाहन असेल आणि एक नवा संदेश असेल. त्यातून आम्हांला नवी शक्ती, नवी प्रेरणा आणि नवी स्फूर्ती मिळेल. असे झाल्यास जीवनात नवे चैतन्य निर्माण होईल आणि भारतातील प्रत्येक भाषा सजीव राहील.

# ७४... मराठी विज्ञान परिषद

(७ डिसेंबर, १९६८)

मराठी विज्ञान परिषदेने दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात विज्ञानसेवा व विज्ञानप्रसार संघटितरीत्या करण्यासाठी जो उपक्रम सुरू केला, तो समक्ष पाहण्याची, परिषदेच्या कार्यकर्त्यांना भेटण्याची मला इच्छा होती. वेळेअभावी मला ते जमले नाही. पण त्या परिषदेचे विविध उपक्रम, तिचे आतापर्यंतचे कार्य यांची माहिती मला सतत मिळत होती. मराठी विज्ञान परिषदेचे हे कार्य अत्यंत मोलाचे आहे. काळाची आजची गरज ओळखून, ते व्यापक करण्याचा कार्यकर्त्यांचा प्रयत्न आहे, हे पाहून मला समाधान वाटले. ते व्यक्त करण्यासाठी आणि आपणांला भेटून या विषयासंबंधी माझे काही विचार आपणांपुढे ठेवण्यासाठी मी आलो.

विज्ञानसेवेचा किंवा प्रसाराचा विचार करताना माझ्या मते त्याच्या दोन प्रमुख अंगांचा विचार केला पाहिजे. एक तर मानव जातीसमोर आज जी संकटांची परंपरा उभी आहे, ती नाहीशी करण्यासाठी, निसर्गाचे गूढ उकलून, मानवाला जास्तीत जास्त शक्ती प्राप्त करून देणारे संशोधन करणे आणि अशा प्रकारच्या संशोधनास प्रोत्साहन देणे. दुसरे, जे माझ्या मते जास्त व्यापक कार्य आहे, समाजात विज्ञान-विचाराचा प्रसार व प्रचार करून समाजच विज्ञाननिष्ठ बनविणे. हे काम करण्यासाठी मात्र आपणांस जास्त कष्ट घ्यावे लागतील, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. विज्ञानाचे मूळ स्वरूपच तर्कसंगत, बुद्धिसंमत विचार असे आहे. हा विचार जनतेच्या मनात दृढमूल झाल्यावरच आपण एक आधुनिक समाज निर्माण करू शकतो. जुन्या सनातन कल्पना समाजातून काढून टाकण्याचा हाच एक कार्यक्षम उपाय आहे. या दिशेने जितक्या जलद वाटचाल होईल, तितक्या लवकर आपला देश व समाज प्रगतिशील राष्ट्रांच्या मालिकेत जाऊन बसेल.

माझ्या या म्हणण्याचा अर्थ असा मात्र नाही, की विज्ञान परिषदा संशोधन-कार्यास उत्तेजन देण्याकरिता काही करू शकत नाहीत किंवा त्यांनी काही करू नये, या कार्यक्षेत्रात त्यांना भरीव कामगिरी करून दाखविता येईल. संशोधन-कार्यासाठी आर्थिक साहाय्य मिळवून देणे, या कार्यातील अडीअडचणी

समजावून घेऊन, त्या समाजापुढे, शासनापुढे मांडणे, वेगवेगळ्या क्षेत्रांत इतर राज्यांमध्ये कार्य करणाऱ्या व्यक्तींशी संपर्क ठेवून एकमेकांना मदत व सहकार्य करणे वगैरे अनेक कार्यक्रम संशोधकांना मदत म्हणून व त्यांच्या कार्यास उत्तेजन म्हणून विज्ञान परिषदा हाती घेऊ शकतात व त्यांनी हे कार्य हाती घेतले पाहिजे. विज्ञानसेवेस वाहिलेल्या परिषदा आज असताना जे कष्ट शं.बा. दीक्षित किंवा केरूनाना छत्रे यांना घ्यावे लागले, तसे कष्ट किंवा त्रास आजच्या संशोधकांना घ्यावा लागू नये. एवढेच नव्हे, तर त्यांनी अंगीकारलेले कार्य तडीस नेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, या दृष्टीने विज्ञान परिषदेसारख्या संस्था भरीव कामगिरी करू शकतात व त्यांनी ती करावी. आज आपले शास्त्रज्ञ देशांतर करीत आहेत, त्याचे कारण समाजाची अनास्था हेही आहे. मराठी विज्ञान परिषदेसारख्या संस्थेने शास्त्रज्ञांच्या या स्थितीची जाण दाखविली पाहिजे. दुसरे एक काम करण्यासारखे आहे. ते असे, की परदेशांत असलेले विविध शास्त्रांचे विद्यार्थी व संशोधक यांची जंत्री करून, त्यांच्याशी सतत संपर्क ठेवला, तर आपल्या संशोधन-कार्याशी आपल्या देशबांधवांचा संबंध आहे, त्यांना त्याबद्दल आस्था आहे, हे परदेशांतील संशोधकांना अशा उपक्रमामुळे समजेल. शास्त्रज्ञांचे देशांतर कमी करण्यासाठी अशा संपर्काचा जास्त उपयोग होईल. सरकारलाही अशा तऱ्हेच्या उपक्रमापासून लाभ होईल. एवढया प्रचंड देशात, शेवटी स्वहिताची जपणूक करण्यासाठी अशा सामाजिक संस्थांनाच पुढाकार घ्यावा लागेल. शासन हे काही सर्वसाक्षी नाही किंवा सर्वज्ञही होऊ शकत नाही.

गेल्या वीस वर्षांत भारतात झालेल्या स्थित्यंतराचा आपण जर विचार केला, तर एक गोष्ट ठळकपणे डोळ्यांत भरते. ती म्हणजे आर्थिक विकास व औद्योगिकीकरणासाठी आम्ही सुरू केलेली प्रचंड मोहीम. खऱ्या अर्थाने विज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच होऊ लागला आहे. असे म्हटले, तर ती अतिशयोक्ती होणार नाही. पुष्कळ प्रमाणात आपण संशोधनात्मक कार्याबद्दल पाश्चात्य प्रगतिशील राष्ट्रांवरच अवलंबून राहिलो आहोत. एक विशिष्ट मर्यादेपर्यंत हे ठीक आहे. पण आता औद्योगिकीकरणाची सुरूवात झाल्यावर आपल्याला या क्षेत्रातसुद्धा आत्मनिर्भर कसे होता येईल, याचा विचार केला पाहिजे. त्याकडे लक्ष दिले पाहिजे. जनमत निर्माण करून व संशोधन-कार्याचे महत्त्व देशातील उद्योगपतींना पटवून देण्याचे कार्य मराठी विज्ञान परिषदेसारख्या संस्थांनी हाती घेतले पाहिजे.

विज्ञान संशोधनाच्या दोन शाखा आहेत. एक मुलभूत संशोधनाची, तर दुसरी उपयोजित (अप्लाइड) संशोधनाची. देशाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी आपल्याला कोणत्या प्रकारच्या संशोधनाची नितांत गरज आहे, याचा सांगोपांग विचार वैज्ञानिकांनी व अर्थशास्त्रज्ञांनी केला पाहिजे. बऱ्याच लोकांच्या तोंडून भारतातील मूलभूत विज्ञान-संशोधनाचा दर्जा व त्याचा जागतिक दर्जा यांतील तफावत पाहून नैराश्याचे उद्‌गार ऐकू येतात. मला ही भाषा पटत नाही. या क्षेत्रात आपणांस फार मोठी मजल गाठावयाची आहे, ही वस्तुस्थिती आहे. पण ही तुलनाच मुळी युक्तिसंगत नाही. कारण आर्थिक प्रगतीच्या बाबतीत सुद्धा पाश्चात्य देशांपेक्षा आपण फार मागे आहोत. दुसरी गोष्ट म्हणजे, मूलभूत संशोधनासाठी विपुल साहाय्य लागते. ते देणे आजच्या परिस्थितीत आपणांस कितपत शक्य आहे, याचाही नीट विचार केला गेला पाहिजे. शिवाय आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती ही, की आपल्या देशातील मूठभर तंत्रज्ञांचा देशाला जास्तीत जास्त लाभ करून देण्याच्या दृष्टीने कसा उपयोग करून घेता येईल. हे तंत्रज्ञ जर आपण मूलभूत संशोधनात गुंतवून ठेवले, तर त्यांच्या कार्याचा देशाच्या औद्योगिकीकरणाला जलद गती देण्यासाठी उपयोग होण्यास फार विलंब लागेल. पण हे तंत्रज्ञ जर मूलभूत संशोधनात गुंतवून ठेवले, तर त्यांच्या कार्याचा देशाच्या औद्योगिकी◌ ◌करणाला जलद गती देण्यासाठी उपयोग होण्यास फार विलंब लागेल. पण हे तंत्रज्ञ जर मूलभूत विज्ञानाची जी प्रगती प्रगत देशांमध्ये झाली आहे, त्याचा उपयोग करून उपयोजित (अप्लाइड) संशोधन करू लागले, तर देशाच्या औद्योगिकीकरणाला व विकासाला लवकर फायदा मिळू शकेल. आज वस्तुस्थिती अशी आहे, की मूलभूत वैज्ञानिक संशोधन राष्ट्रांच्या भौगोलिक कक्षा ओलांडून पलीकडे गेले आहे. विज्ञानाचे हे आंतरराष्ट्रीय स्वरूप गेल्या वीस वर्षांत अधिक स्पष्ट झाले आहे. त्यामुळे भारताला अशा वैज्ञानिक संशोधनाचे फायदे मिळत राहतीलच. आता शेकडो विद्यार्थी परदेशांत जाऊन शिक्षण घेत आहेत. तेथे संशोधन करीत आहेत. त्यांच्यामार्फत ही शास्त्रविषयक ज्ञानाची देवाण-घेवाण होत आहे. त्याचा फायदा आपल्याला नेहमीच मिळेल. पण आज खरी गरज आहे, ती उपयोजित संशोधन (अप्लाइड रिसर्च) वाढविण्याची. आपण या देशाचे जीवनमान वाढविण्याचा अत्यंत निकराने प्रयत्न करीत आहोत. पण या देशाचे प्रश्नच एवढे गुंतागुंतीचे व प्रचंड आहेत, की तेथे आपल्याला अत्यंत आधुनिक विज्ञानाचे साहाय्य घेतल्याखेरीज पुढे जाता

येणार नाही. शिवाय हा विकास जलद रीतीने आपणांस घडवून आणावयाचा आहे. म्हणून आज गरज आहे, ती जगात विज्ञानाची जी बाजारपेठ आहे, तेथे जाऊन आपल्याला उपयुक्त असे विज्ञान मिळविण्याची व त्याचा आपल्या देशाच्या विकासास कसा उपयोग होईल, याचा अभ्यास करण्याची. एके काळी विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजी विद्येला वाघिणीचे दूध म्हटले. आता फार मोठ्या प्रमाणावर अशाच विज्ञानविद्येच्या दुधाची या देशाला फार गरज आहे.

मी असे म्हणत नाही, की मूलभूत समस्यांवर संशोधन भारतीयांनी करूच नये. जरूर करावे. पण देशाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता व औद्योगिकीकरणाची आजची गरज पाहता मला असे वाटते, देशाची आजची निकड उपयोजित संशोधनाची आहे. आज जी औद्योगिक क्रांतीची लाट भारतात आली आहे, तिच्यात जोम निर्माण करण्याकरिता व तिला आत्मनिर्भर करण्यासाठी प्रतिलिपीपासून सुरूवात करून, पाश्चात्य देशांतील शोध अनुकूल, योग्य करून शेवटी नवशोधापर्यंत मजल गाठावयाची खटपट भारतीयांनी केली पाहिजे. आज कितीतरी विज्ञान स्नातक दरवर्षी आमच्या विश्वविद्यालयांतून पदव्या घेऊन बाहेर पडत आहेत. बहुतेक हे तरूण नोकऱ्यांच्या मागे लागतात. ही जी पांढरपेशेपणाची वृत्ती आहे, त्या वृत्तीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यांच्यांतील जे हुशार विद्यार्थी असतील, त्यांना उत्तेजन देऊन त्यांच्या विशिष्ट क्षेत्रामधील औद्योगिक समस्या त्यांच्या नजरेस आणून दिल्या पाहिजेत. त्यांवर संशोधन करण्यास त्यांना उद्युक्त केले पाहिजे. उद्योगपतींनासुद्धा या बाबतीत जाणीव देऊन त्यांच्याकडून सहकार्य व आर्थिक साहाय्य या तरूण संशोधकांना मिळवून दिले पाहिजे. मराठी विज्ञान परिषदेसारख्या संस्था, विश्वविद्यालयांच्या मदतीने हे कार्य सहजपणे हाताळू शकतात. विद्यार्थिदशेत जर अशा संशोधनाचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनांवर झाले, त्यांच्यांत संशोधनाची आवड निर्माण केली, तर त्यांच्यांत एक प्रकारचा विश्वास निर्माण होईल आणि विश्वविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर ते विश्वासाने, जिद्दीने संशोधन-कार्य चालू ठेवू शकतील, अशी मला खात्री आहे. तुम्ही-आम्ही सर्वांनी जर या दृष्टीने प्रयत्न केला, व संशोधन -कार्यात जर धनार्जनाची क्षमता निर्माण केली, तर आज विज्ञान-स्नातकांमध्ये जी नोकरी करण्याची प्रवृत्ती दिसून येते, तिला आळा बसेल व संशोधकांच्या संख्येत भर पडून संशोधन-कार्य व्यापक प्रमाणावर सुरू

होईल. विज्ञान-संस्थांनी आजच्या उद्योगधंद्यांच्या विविध गरजा कशा भागवता येतील, याची पाहणी व अभ्यास सतत चालविला, निदान त्याला उत्तेजन दिले, तर भारताच्या औद्योगिक क्रांतीला अधिक वेग येईल.

भारतातील विज्ञानाच्या संशोधनात विविधता आली पाहिजे. देशातील वास्तवतेची व त्याच्या शास्त्रविषयक गरजांची त्यात जाण हवी आहे. औद्योगिक क्रांतीला विज्ञानाचे निकडीचे साहाय्य हवे आहे. जपानसारख्या देशाकडून आपल्याला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. उपयोजित संशोधनावर भर देऊन देशाचा कायापालट कसा होऊ शकतो, याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे जपान आहे.

पर विज्ञानाकडे केवळ भौतिक दृष्टीने पाहून चालणार नाही. विज्ञान ही आधुनिक काळातील संजीवनी विद्या आहे. भारताला अशा संजीवनीची नितांत गरज आहे. कारण आपल्याला नुसते यंत्र नको आहे. त्या यंत्राबरोबर येणारे आधुनिक मन हवे आहे. आधुनिक मन हे कधीही स्थितिशील राहत नाही. ते चौफेर पाहते. इतर राष्ट्रांच्या प्रगतीचा सतत अभ्यास करते. असे आधुनिक मन भारताला हवे आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या देशाच्या मनावर पुराणमतवादाचे प्रचंड ओझे आहे.

आत्मसंतुष्टता वा निष्क्रियता ही त्यातूनच येते. भारताच्या संदर्भात विज्ञान म्हणजे केवळ भौतिक सुखे निर्माण करणारी शक्ती असून, सामाजिक परिवर्तन घडविणारी ती सामाजिक शक्ती ठरणार आहे.

विज्ञानामुळे विज्ञाननिष्ठ समाज कसा निर्माण होतो, हे युरोपने सिद्ध केले आहे. युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीबरोबरच लोकशाही समाजरचना आकार घेऊ लागली. औद्योगिक क्रांतीची सामाजिक दोषस्थळे व त्यांतून येणारी आर्थिक विषमता जेव्हा विचारवंतांना दिसली, तेव्हा समाजवादाची आर्थिक विचारसरणी पुढे आली. युरोपमध्ये आज राजकीय पद्धतीत वेगळेपणा असला, तरी लोकशाही राष्ट्रे व कम्युनिस्ट राष्ट्रे आधुनिक विज्ञानाच्या साहाय्यानेच विकासक्षम झाली, हे निर्विवादच आहे. या सर्व औद्योगिक क्रांतीने तेथील समाजाच्या मनाची घडणच बदलली. चंद्रावर जाऊ इच्छिणार व अंतराळ जिंकू इच्छिणारा समाज किंवा दोन युद्धांच्या भीषण अग्निदिव्याला तोंड देऊनही, धैर्य खचू न देता पुन्हा झपाट्याने प्रगती करणारा आकांक्षी समाज हा या विज्ञाननिष्ठेतून निर्माण झाला, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. निसर्ग जिंकणाऱ्या विज्ञानालाही एक साहसी मन लागते. कल्पकता लागते. अदम्य,

अशरण व एक प्रकारची बेगुमान वृत्ती लागते. पाश्चात्त्य राष्ट्रांनी विज्ञानाच्या साहाय्याने ही निसर्ग जिंकण्याची ईर्ष्या सामान्य नागरिकांत निर्माण केली. त्यामुळे तो सारा समाजच जिवंत आहे. उत्साहाने तुडुंब भरलेला आहे. त्याला नावीन्याची ओढ आहे. काही तरी शोधणारे व धडपड करणारे मन आणि शरीर ही त्या समाजाची फार मोठी संपत्ती आहे. विज्ञान अशाच समाजात फुलते, फळते.

भारताच्या समाजाचा विचार केला, तर आपणांस या दृष्टीने किती प्रगती करावयाची आहे, हे बुद्धिमंतांना सहज पटेल. भारताला ती साहसप्रियता हवी आहे. पाण्याच्या प्रवाहाला आतून जशी ओढ असते, तशीच ओढ समाजाच्या जीवनप्रवाहात असेल, तर तो संकटांचे पहाड फोडून पुढे जातो. ती ओढ त्याला सतत पुढे नेते. समाजजीवनाचे ते गतिशील, बुद्धिनिष्ठ रूप आपणांला दिसावयास हवे आहे. हे रूप आपल्या शिक्षणामधून विद्यार्थ्यांना दिसावयास हवे.

या विज्ञानाची मूल्ये प्रयत्नपूर्वक शिक्षणातून रूजविली गेली, तर त्याचे परिणाम आमच्या राजकीय व सामाजिक विचारसरणीवर दिसू लागतील. विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करावयाचा असेल, तर बुद्धिमंतांनी विज्ञान परिषदेसारख्या व्यासपीठावर एकत्र येऊन त्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार केला पाहिजे. आपला समाज कृषिनिष्ठ असल्याने देशाचे संपूर्ण औद्योगिकीकरण होऊनच नवा औद्योगिक व विज्ञाननिष्ठ समाज निर्माण होईल, असे मानणे व्यवहाराला धरून होणार नाही. म्हणून कृषि-औद्योगिक समाजसुद्धा विज्ञानवादी कसा करावयाचा, हा आपल्यापुढील खरा प्रश्न आहे.

यासाठी बुद्धिमंतांना समाजाशी समरस होऊन ही विज्ञानवादी चळवळ चालवावी लागेल. म्हणून साहित्यात व वृत्तपत्रांत या चळवळीकडे लक्ष द्यावे लागेल. शेतकरी व कामगार यांच्यावर विज्ञानाचे संस्कार करणारे वाङ्मय निर्माण करणे ही आजची गरज आहे. मराठीत विज्ञान वाङ्मय निघू लागले आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. पण आता मोहरा ग्रामीण विभागाकडे वळविला पाहिजे. खेडुतांनाही विज्ञानाची ओळख कशी करून देता येईल, याचा विचार केला पाहिजे. आपले खेडूत नव्या साधनांचा सुजाण वापर करू शकतात, याचा पुरावा शेतकऱ्यांनी पंजाब, महाराष्ट्र वा अन्यत्र दाखविला आहे.

आपले राष्ट्र सध्या क्रांतिसदृश अवस्थेतून जात आहे. याच काळात आधुनिकतेची मूल्ये, विज्ञानवादी प्रेरणा आपण नव्या तरूणांना दिल्या, तर

त्यांची स्वप्ने आपण आपल्या लहानपणी पाहिलेल्या स्वप्नांपेक्षा भव्य व वेगळ्या क्षितिजांकडे झेप घेणारी असतील, आज प्रादेशिकताल, भाषावाद, जातीयवाद यांच्या आवर्तात आपण सापडलो, त्याच प्रगती रोखणाऱ्या या खड्ड्यात आम्ही अडकून पडलो, तर भारत हे एक प्रतिगामी राष्ट्र होईल. जग चंद्राकडे, अंतराळाकडे पाहत असताना आम्ही मात्र या क्षुद्र निष्ठा जपत आहोत, हा विसंवाद तरूणांच्यापुढे ढळढळीतपणे मांडला, तर ते बेड्या तोडतील. भारताची शास्त्रशुद्ध पुनर्रचना करण्यासाठी असे विज्ञानवादी तरूण निर्माण झाले पाहिजेत, हे स्वप्न कोणी तरी भारतीय तरूणांपुढे रंगविले पाहिजे. त्याच दृष्टीने महाराष्ट्रापुरते हे कार्य मराठी विज्ञान परिषद करील, अशी मला आशा आहे.

## ७५... अखिल भारतीय ४३ वे मराठी नाट्य संमेलन (२५ मार्च, १९६१)

सन्माननयीय राष्ट्रपती,

उपस्थित पाहुणे आणि दिल्लीमध्ये जमलेल्या नाट्यरसिकांनो,

मराठी नाट्य परिषदेच्या या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी माझी योजना करून आपण माझा जो गौरव केला, त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानतो. वास्तविक हा अधिकार एखाद्या ख्यातनाम साहित्यिकाचा किंवा मान्यवर नाटककाराचा. निदानपक्षी ज्या गावी अशी संमेलने वा परिषदा भरविल्या जातात, तेथील एखाद्या मान्यवर कलावंताकडे हे मानाचे पान जावयास पाहिजे. परंतु या वर्षी महाराष्ट्राच्या बाहेर, पण भारताच्या राजधानीत हे अधिवेशन भरत आहे. एका नामवंत मराठी अभिनेत्रीच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मराठी नाट्याच्या सोहळ्यास भारताचे राष्ट्रपती आशीर्वाद देण्यास उपस्थित आहेत. मराठी रसिक जीवनाला मिळणारे हे भारतीय आशिष नम्रपणे स्वीकारण्यासाठी मराठी जनतेचा प्रतिनिधी म्हणून स्वागताध्यक्षाच्या भूमिकेत आज मी येथे प्रवेश करीत आहे. दुसऱ्याही एका नात्याने स्वागताचे हे कार्य पत्करले आहे. नाट्यक्षेत्रात नट व नाटककार यांचा सन्मान करण्याचा अधिकार रसिक प्रेक्षकांचा आहे. आज येथे महाराष्ट्राच्या अनेक शहरांतून व गावागावांतून पसरलेल्या असंख्य मराठी रसिक प्रेक्षकांचा प्रतिनिधी म्हणून तुम्हां सर्वांचे, अध्यक्षांचे व राष्ट्रपतींचे मी मनःपूर्वक स्वागत करीत आहे.

राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासारखे रसिक, गुणज्ञ व विद्वान महापुरूष या नाट्य संमेलनाचे उद्‌घाटन करण्यास लाभले आहेत, हे आपले व मराठी नाट्य परिषदेचे महद्‌भाग्य म्हटले पाहिजे.

हे नाट्य संमेलन भारताच्या राजधानीमध्ये भरत असल्यामुळे येथील समाजात सद्‌भावना व सदिच्छा निर्माण करण्याची संधी आपल्याकडे चालून आलेली आहे. तिचा आपण परिपूर्ण उपयोग करून घ्याल, असा मला विश्वास वाटतो. ह्या नाट्य परिषदेच्या निमित्ताने मराठी नाटके दिल्लीत सादर करण्यात येणार आहेत. त्यांचा रसास्वाद मराठी भाषक तर घेतीलच; पण

अन्य भाषकांनाही त्यांचा लाभ घेता यावा, म्हणून प्रयोगाच्या आरंभी त्या त्या नाटकाची रूपरेखा इंग्रजीतूनही सांगण्याची व्यवस्था संमेलनाच्या आयोजकांनी केली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

ह्या नाट्य परिषदेच्या निमित्ताने 'राष्ट्राच्या उभारणीच्या कार्यात रंगभूमीचे स्थान' आणि 'नाट्य-शिक्षण' हे परिसंवाद व निबंधवाचन आणि चर्चा, इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. हे कार्यक्रम पाहिल्यानंतर व ऐकल्यानंतर राजधानीतील श्रोतृवर्गाला मराठी नाट्याची ओळख पटेल, त्याच्या प्रगतीची दिशा कळेल, त्याच्यापुढील समस्यांची जाणीव होईल आणि विचारमंथनाला साहाय्य होईल. ह्या विचारमंथनातूनच नाट्याचा विकास होणार आहे.

लोकरंजन आणि लोकाराधन या नात्याने नाट्याचे स्थान फार महत्त्वाचे आहे. 'नाट्यम् भिन्नरूचेः जनस्य बहुधा अपि एकं समाराधनम्' ही कालिदासाची उक्ती त्रिकालाबाधित आहे. त्यांतल्या त्यांत भारतासारख्या खंडप्राय देशाच्या राजधानीत आपल्या नाट्यकलेचा गौरव व्हावा, तिने तेथील रसिकाचे मनोरंजन करावे, यातच आपल्या कलेचा सर्वोच्च सन्मान आहे, असे प्रत्येक राज्यातील साहित्यिकांना वाटणे स्वाभाविक आहे. सन १९५४ मध्ये दिल्ली येथे अखिल भारतीय नाट्य-महोत्सव झाला. त्या वेळी मराठी, बंगाली, मणिपुरी, पंजाबी, गुजराती, तामिळ, ओरिया आणि इंग्रजी नाटकांचे प्रयोग झाले. त्या वेळी पहिले पारितोषिक 'भाऊबंदकी' नाटकाने पटकाविले. मराठी रंगभूमीच्या थोर परंपरेचा असा गौरवपूर्वक बहुमान करून भारताच्या राजधानीतील श्रोतृवर्गाने आपल्या रसिकतेची साक्ष पटविली आहे. 'भाऊबंदकी' प्रमाणेच 'शारदा' नाटकानेही रसिक दिल्लीकरांच्या आनंदात भर टाकली. शिवाय, कविकुलगुरू कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतलम् ' ह्या जगन्मान्य संस्कृत नाटकाचाही प्रयोग दिल्लीतील ह्याच उत्सवात मुंबईच्या मराठी कलाकारांनी रसिकांपुढे सादर केला. गेल्याच वर्षी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या शुभमुहूर्तावर आपण गडकरीदर्शनाच्या अभिनव प्रयोगाने एका थोर मराठी नाटककाराच्या काव्य-नाटकाचा परिचय दिल्लीच्या नागरिकांना करून दिला. उलट, 'कृष्णाकाठची कुंडले' स्वतःच दिल्लीच्या रंगभूमीवर आणून दिल्लीकरांनी आमच्यावर मात केली आहे, हे मी प्रांजळपणे कबूल करतो.

भारताच्या राजधानीतील भिन्नरूची समाजाचे अशा प्रकारे यथाशक्ति रंजन करणाऱ्या मराठी रंगभूमीची परंपरा फार जुनी आहे. 'जैसें चेष्टें सूत्राधिन

दारूयंत्र' या शब्दांत ज्ञानेश्वरांनी कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचा निर्देश केला आहे. ललितांची परंपरा उत्तर भारतातील रामलीलेइतकीच जुनी आहे. स्वराज्याच्या उत्कर्षाच्या काळात होनाजी-बाळा, राम जोशी, अनंत फंदी, सगन, प्रभाकर, परशुराम यांच्यासारख्या शाहिरांनी लोकनाट्याच्या द्वारा जनतेचे व अधिकारी वर्गाचे खूपच रंजन केले. तंजावरास भोसले राजांनी मराठी नाटके लिहिली आणि करविली. १८४३साली विष्णु अमृत भावे यांनी सांगलीकरांच्या प्रेरणेने पौराणिक नाटकांचा नवीनच प्रयोग करून दाखविला. यानंतर अनेक पौराणिक नाटक कंपन्या जन्माला आल्या. त्यांनी नाट्य व संगीत या दोहोंचाही विकास साधला. रंगभूमीवरील नाट्याची अशा प्रकारे लोकशाहिरांकडून जोपासना होत असतानाच शास्त्री मंडळी व इंग्रजी शिकलेले विद्वान लोक संस्कृत व इंग्रजीमधील उत्तमोत्तम नाटके भाषांतरित व रूपांतरित करून मराठी नाट्य-वाङ्मयात मोलाची भर घालीत होते. वि. ज. कीर्तने यांनी 'थोरले माधवराव पेशवे' हे ऐतिहासिक नाटक लिहिले व मराठी वाङ्मयात एक नवीनच दालन उघडले. संस्कृत नाटकातील कला व पौराणिक नाटकातील संगीत यांचा अपूर्व संगम अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सौभद्रा'त साधला. हे नाटक रंगभूमीवर येऊन पाउणशे वर्षांच्यावर काल उलटून गेला आहे. पण आजही ते पहिल्या दिवसाइतकेच लोकप्रिय आहे. काळ बदलला, तंत्रविषयक कल्पनांत जमीनअस्मानाचा फरक पडला. गेल्या पाऊणशे वर्षांत अनेक प्रभावी नाटके रंगभूमीवर आली, पण 'सौभद्रा' चे स्थान अढळच राहिले. किर्लोस्करांच्या नाटकाची धाटणी पूर्णपणे पौर्वात्य आहे. ती धाटणी दीर्घकाल तशीच टिकणे शक्य नव्हते. पाश्चात्य राजकारण, पाश्चात्य वाङ्मय व पाश्चात्य तत्त्वज्ञान यांचा महाराष्ट्राच्या जीवनाशी संपर्क वाढत गेला. त्यामुळे एकीकडे किर्लोस्करांची 'सौभद्र' व 'शाकुंतल' ही संगीत नाटके रंगभूमीवर गाजत होती, तर दुसरीकडे आगरकरांसारखे समाजसुधारक 'हॅम्लेट' या जगप्रसिद्ध नाटकाचे रूपांतर करीत होते. शेक्सपियरची अशी अनेक नाटके पुढील दोन तपांत रंगभूमीवर आली. १९१० ते १९१५ पर्यंत यांपैकी काही नाटकांशी रंगभूमी अक्षरशः दुमदुमवून सोडली. 'हॅम्लेट' व 'त्राटिका' ही नाटके त्या वेळी लोकप्रियतेच्या शिखरावर होती. गणपतराव जोशी व बाळाभाऊ जोग या अभिनयसम्राटांची नावे या नाटकांबरोबरच घ्यावयास पाहिजेत. महाराष्ट्रात १८८२ ते १८९८ या सोळा वर्षांच्या अवधीत नाटकांची वाढ झपाट्याने झाली, याची गंगोत्री 'सौभद्र', 'शांकुलता'सारखी नाटके आणि

वाङ्मयाची निर्मिती व प्रसार यांच्याविषयी महाराष्ट्राला वाटणारी आस्था, ही होय.

गोविंद बल्लाळ देवळ हे या काळातील नाटककारांचे मुकुटमणी! त्यांच्या सात नाटकांपैकी 'झुंझारराव', 'मृच्छकटिक', 'शारदा' व 'संशयकल्लोळ' ही चार नाटके म्हणजे मराठी रंगभूमीवरील देदीप्यमान रतनेच. सर्वस्वी स्वतंत्र असे देवलांचे 'शारदा' हे एकच नाटक. यापूर्वीही सामाजिक नाटके लिहिण्याचा प्रयत्न झाला नाही, असे नाही. पौराणिक नाटकांच्या जोडीला रूचिपालट म्हणून सामाजिक प्रहसने करण्याचा प्रघात यापूर्वीच पडला होता. पण 'शारदा' हेच पहिलेवहिले सामर्थ्यशाली सामाजिक नाटक म्हणून मान्यता पावले. या नाटकाचा महाराष्ट्रावर इतका परिणाम झाला की, पुढे कित्येक वर्षे आपल्या मुलीचे नाव शारदा ठेवायला एकही माता धजली नाही. बालावृद्ध विवाहातील घोर अन्याय समाजाला देवलांनी 'शारदे'च्या रूपाने दाखविला. जिला वाचा नाही, अशा समाजातील अबलेची कहाणी देवलांची 'शारदा' रसाळ मुकेपणाने, मराठी मनाला, चिरंतन सांगत राहील.

देवलांच्या मागोमाग श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्या प्रतिभाशाली नाटककारांनी मराठी रंगभूमी गाजविली. कोल्हटकर म्हणजे मराठीतील विनोदाचा ओनामा! मराठी रंगभूमीला संगीत व विनोद यांची अगदी नव्या पद्धतीने जोड करून देणे हेच त्यांच्या प्रतिभेचे कार्य. १९०० ते १९१० या दशकात मराठी रसिकांनी कोल्हटकरांची 'वीरतनय', 'मूकनायक', 'गुप्तमंजूष', 'मतिविकार' ही नर्मविनोदाने नटलेली नाटके मोठ्या आवडीने पाहिली. एका हातात शेक्सपिअर आणि दुसऱ्या हातात मोलिअर घेऊन त्यांनी अद्‌भुतरम्य कथानकांत हास्यरसाचा मनमुराद शिडकावा केला. कोल्हटकरांनी आपल्या नाटकांमधून सामाजिक समस्यांचे दर्शन घडविले, तर नाट्याचार्य खाडिलकरांनी आपली लेखणी आणि वाणीच नव्हे, तर प्रत्यक्ष जीवनही स्वातंत्र्याच्या चळवळीला वाहिले. साहजिकपणेच उत्कट देशभक्ती हा त्यांच्या नाट्यकृतींचा स्थायिभाव झाला. 'कांचनगडच्या मोहने' सारखे मातृभूमीकरिता सर्वस्वाचा त्याग करण्याचा संदेश देणारे प्रभावी नाटक घ्या, जुलमी इंग्रजी सत्तेमुळे मातृभूमीची होणारी विटंबना रूपकात्मक रीतीने दाखविणारे 'कीचकवध' पाहा किंवा दुफळीचे दुष्परिणाम रंगविणारे 'भाऊबंदकी' हे नाटक घ्या, सर्व नाटकांची प्रेरणा उत्कट देशभक्तीची होती, हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. सत्ताधाऱ्यांच्या दडपशाहीवरील प्रखर

टीकेमुळे 'कीचकवधा'ला सरकारच्या रोषाला बळी पडावे लागले. गडकरी हे खाडिलकरांनंतरचे लोकप्रिय नाटककार. गडकरी म्हणजे मराठी रंगभूमीवरील सर्वांत तेजस्वी तारा. 'एकच प्याला'तील सुधाकराच्या पश्चात्तापाचा प्रवेश किंवा 'भावबंधना'तील सूडाने पेटलेल्या घनश्यामाचे पाय लतिकेचा धरावे लागतात, तो प्रवेश, एकदा पाहिल्यावर विसरणे शक्यच नाही. गडकऱ्यांच्या भडक पण भावपूर्ण नाटकाने लोक वेडावून गेले. मराठी रंगभूमीचा एक वैभवशाली कालखंड म्हणून याचा निर्देश करावा लागेल. गडकऱ्यांची परंपरा माधवराव जोशी. शं.प.जोशी, टिपणीस, औंधकर, इत्यादी नाटककारांनी सामाजिक आणि ऐतिहासिक नाटके लिहून पुढे चालू ठेवली. माधवराव जोश्यांनी प्रेक्षकांना मनमुराद हसविले, तर आचार्य अत्रे यंनी गंभीर व प्रहसनवजा अशी दोन्ही प्रकारची नाटके लिहून एक प्रकारे मराठी रंगभूमीवर स्वतःचे वैशिष्ट्य प्रस्थापित केले. नाटक मंडळ्यांचा संस्थानी कारभार, चित्रपटांचे बहुरंगी आकर्षण, समाजाची आर्थिक स्थिती यांमुळे मराठी रंगभूमीला अवकळा आली, तेव्हा तिला हातभार लावून जगविणाऱ्या साहित्यिकांत श्री. अत्रे यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. विडंबन आणि अतिशयोक्ती यांवर आधारलेल्या प्रसन्न विनोदाचे आवाहन हा त्यांच्या भात्यातील रामबाण! 'घराबाहेर' व 'उद्याचा संसार' ही सामाजिक समस्येला हात घालणारी त्यांची गंभीर नाटकेही खास उल्लेखनीय आहेत. 'सरलादेवी' कर्ते श्री. भोळे, कै. वर्तक आणि १९४० ते १९५० या दशकात मराठी रंगभूमीची एकनिष्ठेने सेवा करणारे श्री. मो. ग. रांगणेकर यांचा निर्देश इथे करावा लागेल. श्री. वर्तक यांची 'आंधळ्याची शाळा' आणि श्री. रांगणेकर यांचे 'कुलवधू' ही नाटके तर फारच लोकप्रिय झाली. या संदर्भात ज्योत्स्नाबाई भोळे या अभिनेत्रीचाही उल्लेख करणे अवश्य आहे. बदलत्या काळाबरोबर सामाजिक समस्याही बदलत जातात, याची तीव्र जाणीव वरील नाटककारांच्या नाटकांत आढळते. रंगभूमीच्या पडत्या काळात इब्सेनचे नवे नाट्यतंत्र मराठीत आणून श्री. भोळे, कै. वर्तक आणि श्री. रांगणेकर यांनी रंगभूमीची फार मोठी सेवा केली आहे.

मामासाहेब वरेरकर हे आणखी एक थोर सामाजिक नाटककार! हुंड्यापासून धर्मान्तरापर्यंतचे विषय आणि गिरणीतल्या मजुरापासून साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडल्या गेलेल्या, पण टांग्याच्या भाड्याला महाग असलेल्या प्रामाणिक साहित्यिकापर्यंतची निरनिराळ्या थरांतील पात्रे त्यांनी कुशलतेने हाताळली. ताजे विषय, चुरचुरीत टीका आणि खुसखुशीत संवाद हे

त्यांच्या लेखणीचे प्रमुख विशेष. मामासाहेब वरेरकर वृद्ध झाले, तरी 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे' हा त्यांचा बाणा आहे. त्यांची कला चिरतरूण आहे, हे सिद्ध करण्यास 'भूमिकन्या सीता' या नाटकाचा उल्लेख पुरेसा होईल. अगदी अलीकडच्या काळात श्री. पु.ल.देशपांडे यांची 'तुझं आहे तुझपाशी' व 'सुंदर मी होणार', श्री. बाळ कोल्हटकर यांचे 'दुरिताचे तिमिर जावो', श्री. मराठे यांचे 'होनाजी बाळा', श्री. विद्याधर गोखले यांचे 'पंडितराज जगन्नाथ', श्री. पुरषोत्तम दारव्हेकर यांचे 'चंद्र नभीचा ढळला' इत्यादी नाटकांनी विलक्षण लोकप्रियता मिळविली. या प्रकारच्या नाट्यकृतींमुळे मराठी रंगभूमीवर एक नवीन पर्वकाळ येऊ पाहत आहे, त्याचे आपण स्वागत करू या. या ओझरत्या दर्शनावरून महाराष्ट्राचे जीवननाट्य त्यांच्या नाट्यजीवनात कसे प्रकट झाले, हे सहज स्पष्ट होईल.

स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, इत्यादी सामाजिक चळवळी, वेळोवेळी झालेली राजकीय आंदोलने, श्रमजीवी वर्गाची संघटना यांपासून मराठी रंगभूमी अलिप्त राहू शकली नाही. कितीतरी मराठी नाटककार व नाटक मंडळ्या या आंदोलनाच्या झपाट्यात सापडल्या, दडपल्या गेल्या, वरवंट्याखाली रगडल्या गेल्या. महाड येथे तर एक नाटक मंडळीच्या मंडळीच चतुर्भुज केली गेली होती.

मराठी नाटककारांच्या समाजाभिमुखतेबरोबरच त्यांच्या प्रयोगशीलतेचाही निर्देश करणे अगत्याचे आहे. कै. विष्णु अमृत भाव्यांनी कर्नाटक प्रांतातील नाटकांचे अनुकरण करून आधुनिक मराठी रंगभूमीचा पाया घातला; किर्लोस्करांनी त्याला संस्कृत नाट्यतंत्राची जोड दिली; कोल्हटकरांनी पार्शी रागदारीचे नव्या चालीवरचे संगीत, अद्‌भुतरम्य कथानके व विनोदी उपकथानके यांची जोड देऊन मराठी रंगभूमीचे स्वरूपच बदलून टाकले; खाडिलकरांनी राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यासाठी पौराणिक कथानकांचा उपयोग केला व प्रेक्षकांची संगीताची अभिरूची लक्षात घेऊन संगीताचा मुक्त हाताने उपयोग करून घेतला. बाळाकोबा नाटेक, भाऊराव कोल्हटकर, मुजुमदार, गणपतराव भागवत, बालगंधर्व, केशवराव भोसले, बापूराव पेंढारकर, इत्यादी ख्यातनाम नटांनी अभिनयाचा व संगीताचा दर्जा विकसित करण्याला फार मोठे साहाय्य केले. मराठी रंगभूमीची दुरवस्था लक्षात घेऊन इब्सेनच्या धर्तीचे एक प्रवेशी अंक, बॉक्स सीन्स् आणि अद्ययावत नाट्यतंत्र यांच्या साहाय्याने श्री. वर्तक, श्री. अत्रे, श्री. रांगणेकर, इत्यादी नाटककारांनी रंगभूमीचे नव्या थाटात

पुनरूज्जीवन केले. कै. कोल्हटकर, कै. आळतेकर, श्री. केशवराव दाते. श्री. के. नारायण काळे, यांसारख्या नटांनी नाट्यनिर्मितीला नवी दिशा दाखविली. आजही मराठी रंगभूमीवर नव्या नव्या तांत्रिक साधनांच्या साहाय्याने अभिनव प्रयोग करण्याची स्वागतार्ह प्रवृत्ती स्पष्ट दिसत आहे. यात अनुकरणाचा थोडासा भाग असल्याने, त्यातील परकेपणा जरी काहीसा जाणवत असला, तरी तो हळूहळू कमी होत जाऊन मराठी रंगभूमी अद्ययावत, कलासंपन्न, अभिरूचिसंपन्न बनेल, अशी सुचिन्हे दिसत आहेत.

दुरिताचे तिमिर जाओ। विश्व स्वधर्मसूर्यो पाहो।
जो जे वांछिल ते ते लाहो । प्राणिजात ।।

ही महाराष्ट्र राज्याची प्रेरणा आहे. राज्यातील कलात्मक आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या या धोरणानुसार महाराष्ट्र सरकार मराठी रंगभूमीच्या विकासाकरिता प्रयत्नशील आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणूनच दर वर्षी नाट्यस्पर्धा घेऊन, यशस्वी नाट्यप्रयोगांना व नटांना राज्य सरकारतर्फे पारितोषिके देण्यात येतात. या नाट्य-स्पर्धांत गुजराती, हिंदी आणि संस्कृत नाट्यप्रयोगांनाही स्थान दिले जाते. प्रारंभी या नाट्यस्पर्धा प्रमुख शहरांपुरत्याच मर्यादित होत्या, परंतु आता त्या व त्यांच्या अनुषंगाने होणारे नाट्यमहोत्सव लहान लहान गावांमधूनही करण्यात येतातः ग्रामीण विभागातील जनतेच्या सोयीसाठी नाममात्र दर आकारून त्यांना हे प्रयोग दाखविण्याची व्यवस्था केली जाते. जिल्ह्याच्या ठिकाणी महोत्सव झाल्याने स्थानिक कलावंतांनाही संधी व उत्तेजन मिळू शकते. ख्यातनाम कलाकारांबरोबरच होतकरू कलावंतांना नाट्य-महोत्सवात भाग घेण्यासाठी मुद्दाम पाचारण करण्यात येते.

नाट्य-प्रयोगाबरोबर नाट्य वाङ्मयाचाही विकास व्हावा, या हेतूने उत्कृष्ट नाटकांच्या लेखकांना प्रतिवर्षी पारितोषिके देण्यात येतात. यांत प्रौढांकरिता लिहिलेल्या नाटकांबरोबरच मुद्दाम बालकांसाठी लिहिलेल्या नाटकांचाही स्वतंत्रपणे परामर्श घेतला जातो.

याव्यतिरिक्त रंगमंदिराची सजावट आणि शिल्प यांचीही प्रदर्शने भरविण्याच्या योजनेसंबंधी विचार चालू आहे. मराठी नाट्य परिषदांच्या अधिवेशनासाठी अनुदान रूपाने आर्थिक साहाय्य केले जाते. त्याचप्रमाणे ख्यातनाम व सिद्धहस्त कलाकारांना व नाटककारांना प्रतिवर्षी आर्थिक साहाय्य देण्यात येते. नटवर्य बालगंधर्व यांना गेल्या वर्षी अडीच हजार रूपये

प्रदान करण्यात आले; आणि या वर्षापासून त्यांना मासिक तीनशे रूपयांचे मानधन देण्यात येत आहे. रंगभूमीच्या विकासाच्या मार्गातील सर्वांत मोठा अडथळा म्हणजे सोयिस्कर नाट्यमंदिरांची उणीव. मुंबईच्या रंगभवनासारखी खुली प्रेक्षागारे बांधणे किंवा बांधण्यास साहाय्य करून ती उणीव भरून काढण्याचाही महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न चालू आहे. केंद्र सरकारने राजधानीत स्थापन केलेल्या साहित्य नाट्य अकादमीच्या द्वाराही नाट्यकला व साहित्य यांच्या प्रगतीला विविध प्रकारांनी हातभार लावला आहे.

अशा तऱ्हेने राज्य सरकार आणि केंद्र सरकार आपापल्या परीने मराठी रंगभूमीच्या वैभवात भर घालण्याचा प्रयत्न करीत असली, तरी रंगभूमीच्या विकासाचे दायित्व मुख्यत्वेकरून नाटककार आणि नट यांच्यावरच पडते. त्या दृष्टीने आजच्या या महत्वाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद श्रीमती दुर्गाबाई खोटे यांच्यासारख्या अनुभवी व प्रसिद्ध अभिनेत्रीने स्वीकारावे आणि नाट्य परिषदेला मार्गदर्शन करावे, हे उचित व इष्टही आहे.

श्रीमती दुर्गाबाई खोटे यांचा मुद्दाम परिचय करून देण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. त्यांनी आजपर्यंत चित्रपटांत विविध स्वरूपाच्या इतक्या भूमिका केल्या आहेत, की त्यांची नावनिशीवार यादी स्मरणात राहणे कठीण आहे. संगीत नाटक अकादमीने उत्कृष्ट चित्रपट-कलावंत त्यांचा औचित्यपूर्ण गौरव केला आहे. १९५४ मध्ये झालेल्या अखिल भारतीय नाट्योत्सवात ‘भाऊबंदकी’ या नाटकास पहिले पारितोषिक मिळवून देण्यात फार मोठा भाग दुर्गाबाईंचा होता, हे नमूद करताना मला अतिशय आनंद होत आहे. योगायोग कसे असतात, पाहा; २५ मार्च, १९४८ साली मराठी रंगमंचावर त्यांनी प्रथमच ‘आंदोलन’ या नाटकात भूमिका केली व बरोबर तेरा वर्षांनी आज मराठी नाट्यपरिषदेच्या अध्यक्षाची भूमिका त्या करणार आहेत या संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची जी बिनविरोध निवड झाली, ही त्यांच्या अभिनय-कौशल्याची, नाट्य-साधनेची, बहुश्रुततेची साक्षच मानावी लागेल.

अनेक भाषा अवगत असलेल्या या सुविद्य अशा महाराष्ट्रीय अभिनेत्रीची मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली, हे योग्यच झाले. १९२७ साली श्रीमती गिरजाबाई केळकर यांच्याकडे हे मानाचे पान गेले होते. त्यानंतर आज नाट्य परिषदेच्या अध्यक्षस्थानी दुर्गाबाईंची निवड झाली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

ह्या मेळाव्याच्या निमित्ताने मला स्वागताध्यक्ष म्हणून पाचारण करण्यात

आले, त्याबद्दल मी चालकांचे पुन्हा एकदा आभार मानतो. तसेच, ह्या परिषदेत जे प्रतिनिधी व पाहुणे उपस्थित झाले आहेत, त्यांचे मी पुन्हा एकदा हार्दिक स्वागत करतो व या परिषदशकटाची जबाबदारी सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती दुर्गाबाई खोटे यांना स्वीकारण्याची विनंती करतो.

## ७६... अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कराड (६ डिसेंबर, १९७५)

नियोजित अध्यक्ष आणि साहित्यप्रेमी बंधुभगिनींनो,

मराठी साहित्य संमेलनाचा हा सोहळा साहित्यिक व साहित्यप्रेमी यांनी मिळून करावयाचा असतो. त्यामागे साहित्यविचार असतो व त्याचबरोबर उत्सवप्रियताही असते, हे मान्य केले पाहिजे, हा सोहळा लोकप्रिय होत आहे, हे गेल्या काही वर्षांच्या अहवालावरून दिसून येते. या सोहळ्याचे यजमानपण मराठी महामंडळाच्या वतीने यंदा कराडकरांनी केले आहे. तेव्हा त्यांचा प्रतिनिधी म्हणून सर्व मराठी साहित्यिक व साहित्यरसिकांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. कृष्णा-कोयनेच्या या प्रीतिसंगमावर तुम्हां सर्वांचे हार्दिक स्वागत करताना मला मनापासून आनंद वाटत आहे.

वाई, कराड, सांगली या कृष्णेच्या परिसरातील माती सुवर्णमय आहे. करहाटक म्हणजे सोने यापासून ते ग्रामनाम पडले, म्हणून नव्हे, तर या परिसरात जे पिकते, ते सुवर्णमय, म्हणून या मातीला मी सोन्याची माती म्हणतो. या भूमीची परंपरा तशी मोठी आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे संस्थापक संतशिरोमणी ज्ञानेश्वर हे ज्या नाथपंथाचे होते, त्या पंथाची मुळे इकडे खोल गेली होती. मच्छिंद्रनाथ काय किंवा गोरखचिंच काय, त्याचीच प्रतीके म्हणावी लागतील, रेवणसिद्ध सांप्रदाय याच बाजूला उत्कर्ष पावला आणि रामदासीबाणा या प्रदेशावर अद्यापिही प्रभाव पाडीत आहे. राजकारण आणि समाजकारण या विचारधारांचा प्रीतिसंगम ज्यांच्या जीवनात झाला, त्या आगरकरांची जन्मभूमी टेंभू येथून दीड-दोन कोसांवर आहे. येथे महाराष्ट्राच्या प्रख्यात ऐतिहासिक राजकुळांचा पायरव होता. 'नकट्या रावळा'-ची विहीर या स्थळाला ऐतिहासिक डूब देऊन गूढता आणते, तर येथील मनोरे आमच्या देशात येऊन स्थायिक झालेल्या इस्लामी संस्कृतीची साक्ष देतात. इतिहास-पुराणांच्या धुक्याने आणि कृष्णा-कोयनेच्या प्रवाहांनी त्या स्थानाला एक प्रकारची गूढता व रम्यता आली आहे.

कृष्णेचा हा सर्व परिसर मराठी साहित्याने गजबजलेला सुंदर मळा आहे.

या जिल्ह्याने समर्थ रामदास आणि त्यांचे पंचायतन यांचे प्रासादिक वाङ्मय निर्माण केले. कै. केवलानंद सरस्वती आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वास्तव्याने व कर्तृत्वाने विद्वत्तेची परंपरा इथे चालू राहिली. गिरीश-यशवंतादी रविकिरणांची प्रभा येथूनच पसरली. साधुदासांसारखे खंड-कवी, काव्यविहारींसारखे भावकवी आणि सुधांशूंसारखे भक्तिकवी याच परिसरातील श्री.पु.पां.गोखले, आळतेकर, इत्यादी विद्वानांनी जीवनस्पर्शी समीक्षा लिहून येथूनच मराठीची सेवा केली आहे. कै. कृ.भा.बाबर, डॉ.सरोजिनी बाबर यांच्या वाङ्मयाने या मातीचा सुगंध दरवळतो. मराठी साहित्याला कसदार ग्रामीण जीवनाची ओळख करून देणारे प्रतिभाशाली माडगूळकर बंधू आमच्या माणदेशाने मराठी साहित्याला दिलेली देन आहे. 'किर्लोस्कर' व 'स्त्री' या कृष्णेच्या परिसरात जन्म पावलेल्या मासिकांनी आधुनिक महाराष्ट्राला साहित्य व संस्कृतीच्या क्षेत्रात पुरोगामी दृष्टी दिली आहे. या साहित्य संमेलनाच्या या नगराला ज्यांच्या नावाने सुशोभित केले आहे, ते बाळासाहेब पंत प्रतिनिधी व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे साहित्य संमेलनाचे दोन माजी अध्यक्ष, ही साहित्य-क्षेत्रातील आमची अभिमानाची स्थाने आहेत.

साहित्याप्रमाणेच इतर क्षेत्रांतील या जिल्ह्याची परंपरा थोर आहे. आगरकरांच्या सामाजिक सुधारणावादापासून ते कर्मवीर भाऊराव पाटलांच्या बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी सुरू केलेल्या तपश्चर्येपर्यंत या सर्व परंपरेमध्ये सामाजिकतेचा एक अखंड प्रवाह आहे. राष्ट्रीय चळवळीत तर या जिल्ह्याचे सारे जीवनच स्वातंत्र्याच्या भावनेने मंतरलेले होते. संशोधन व अध्यात्म या क्षेत्रात ब्रह्मेंद्र स्वामी, गोंदवलेकर महाराज, स्वामी केवलानंद सरस्वती यांनी आपला अधिकार प्रस्थापित केला आहे. या जिल्ह्यात व सर्व परिसरात औद्योगिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांत ज्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली, त्या सर्वांचा नामनिर्देश मी केलेला नाही, याची मला जाणीव आहे. पण त्यामुळे त्यांच्या कार्याचे महत्त्व कमी आहे, असे नाही. या सर्वांची या वेळी कृतज्ञतापूर्वक मनोमन आठवण मी करीत आहे.

मी साहित्यसमीक्षक नाही. एक रसिक मराठी भाषक साहित्यप्रेमी आहे. आजच्या विद्वान अध्यक्ष ललित व समीक्षात्मक साहित्याच्या श्रेष्ठ अधिकारी आहेत. तेव्हा साहित्यविषयक प्रश्नांचा ऊहापोह त्या करतीलच. पण साहित्यप्रेमी हाही आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षक असतोच; आणि त्या दृष्टीने काही विषयांना मी स्पर्श करणार आहे. प्रथमतः एक समीक्षा

करण्यासारखी आहे, ती म्हणजे वैचारिक प्रवर्तन व प्रबोधनाच्या दृष्टीने मराठी साहित्यात काय झाले.

एका अर्थाने भारतीय प्रबोधनाची सुरूवात बंगालबरोबर महाराष्ट्रात झाली. काय घडले व काय घडावयास हवे, हेही पाहणे सयुक्तिक ठरेल. न्या.रानडे यांनी मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन १८७८ मध्ये पुण्यास भरविले. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय प्रबोधनास मराठी साहित्यिकांनी व पत्रकारांनी हातभार लावला. १९४७ मध्ये भारतीय समाजाचे स्वातंत्र्यपर्व सुरू झाले. आता रचनापर्व सुरू झाले आहे. भारतीय समाजाच्या जागृतीचा नवा काळ आला आहे. जे हक्क राज्यघटनेने आपल्या समाजातील उपेक्षितांना दिले आहेत, त्यांची जाण नव्या पिढीत आली आहे. तेव्हा ही स्वातंत्र्यजात नवी पिढी आता जुन्या समाजरचनेविरूद्ध बंड करून उठते आहे. एके काळच्या उपेक्षितांच्या अंतरंगांत असलेले भावनांचे कढ साहित्यात दिसू लागले आहेत.

साहित्य हे थर्मामीटरमधील पाऱ्यासारखे संवेदनशील असते, निदान असावे. समाजाच्या मानसामध्ये जे असते, तेच साहित्यात अवतरते. मराठी साहित्याचा इतिहास हेच सांगतो. आधुनिक काळात जो राष्ट्रवाद आला, जी राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली, जे स्वातंत्र्याचे नवे विचार आले, त्यांचे परिणाम साहित्यावर झाले. भारतीय समाजाच्या या रचनापर्वात नव्या विचारांची व सर्वांगीण ज्ञानाची बीजे टाकत राहणे हेही साहित्यिकाचे महत्त्वाचे कार्य आहे. कारण त्या विचारांनी प्रेरित झालेले व भारलेले राजकीय कार्यकर्ते समाजाला पुढे नेत असतात. यासाठी वैचारिक व चिंतनशील वाङ्मयाची महती नजेरआड करण्यासारखी नाही. मला वाटते, ही सामाजिकता, ही सामाजिक जाणीव, आपल्या सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा असते. म्हणून आता नव्या सामाजिक प्रबोधनाचे चिंतन करणारे साहित्य हेच उद्याच्या मराठी साहित्याचे स्वरूप असणार, अशी माझी धारणा आहे.

गेल्या पन्नास वर्षांत भारतात जे व्यक्तिस्वातंत्र्यवादी, मार्क्सवादी व गांधीवादी विचार आले, त्या सर्वांनी आपले व्यकिमत्त्व घडविले आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. निदान माझ्या पिढीपुरते मी हे निश्चित म्हणतो.

साहित्य कोणत्याही रंगाचे असले, तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून, समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे.

आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते, की लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे. तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणील, त्याला मार्गदर्शन करीत राहील. बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशील साहित्याची उद्दिष्टे असू शकतात. गेल्या शतकात मार्क्सने इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी सांगून एक प्रचंड विचारप्रवाह सुरू केला. या शतकातील टॉयनबीसारख्या इतिहासपंडिताने मानवी संस्कृतीचा अभ्यास करून, सर्जनशील चिंतनाचा आणखी एक नमुना आपल्यापुढे ठेवला. आज समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र अशा अनेकविध ज्ञानशाखांचा उपयोग करून आपल्या इतिहासाचे, आपल्या समाजाचे पुनरध्ययन करणे शक्य आहे. मराठीमध्ये अशा अभ्यासाची गरज आहे.

सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने ललित साहित्याची सामाजिकताही अत्यंत महत्वाची आहे. कलाबाह्य निकष लावून, हेतुवादी साहित्य श्रेष्ठ ठरवावे, अशा मताचा मी नाही. पण समाजाच्या प्रबोधनासाठी, त्याचा भावपिंड घडविण्यासाठी ललित साहित्याचा निश्चित उपयोग होतो. समाजक्रांतीविषयी अनुकूल मनोभूमी तयार करावयाची असेल, तर प्रस्थापित समाजातील विसंगती, अंतर्विरोध आणि त्यामुळे निर्माण होणारी कोंडी यांच्या कलात्मक आविष्कारातून समाजावर संस्कार करता येतात. उपहास किंवा विनोद ही शस्त्रे साहित्यिक शस्त्रक्रियेत समाज-परिवर्तनासाठी वापरली गेली आहेत, हे जगातील सर्व साहित्याच्या इतिहासाने सिद्ध केले आहे. मला वाटते, आता जे आपले सामाजिक प्रश्न आहेत, ते सर्व पुनर्रचनेचे प्रश्न आहेत. त्यांचे संशोधन करून प्रकट चर्चा व चिंतन करणारे समाजचिंतक आणि त्यांतील तत्त्वांचा व समाजक्रांतीचा ध्यास घेतलेले समर्थ ललित लेखक या दोघांचेही कार्य एकमेकांस पूरक आहे. या प्रयत्नांची गरज आहे. मला वाटते, ही अपेक्षा मराठी साहित्यिकांकडून करणे गैर होणार नाही.

या वैचारिक प्रबोधनाचे स्वरूप काय असावे, हा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतो. याबाबत मतैक्य अशक्य आहे. पण प्रकट चिंतन करणे शक्य आहे; नव्हे, आवश्यक आहे. एकोणिसाव्या व विसाव्या शतकांतील वैचारिक जागृतीचे श्रेय बरेचसे पाश्चात्त्य विचारांना आहे. इंग्रजी हा त्याचा

आधार होता. यापुढे प्रादेशिक लोकभाषा याच ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत. त्यांच्यांतच चिंतनशील साहित्य निर्माण झाले पाहिजे. ही आजची महत्त्वाची गरज आहे. दुसरे कारण आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे. आतापर्यंत आपल्या बौद्धिक जीवनावर पश्चिमेचा ठसा उमटला आहे. एक तर आशिया, आफ्रिका यांतील साम्राज्यशाही बव्हंशी गेलेली आहे; आणि त्यांच्या सामाजिक प्रश्नांचा, सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा स्वतंत्र विचार करण्याची गरज आहे. आता हे कार्य भारतीय साहित्यिकांना करता येईल.

या सर्वांना एका धाग्याने बांधणारी एक नवी जाणीव विज्ञानयुगाने निर्माण केली आहे. आजकाल याचा प्रत्यय अनेक स्वरूपांत येतो. हजारो मैल दूर चाललेल्या घटना तुमच्या-माझ्या दैनिक जीवनावर मूलग्राही स्वरूपाचे परिणाम करू शकतात, याची जाणीव आता वाढू लागली आहे. या अनुभूतीचे कलापूर्ण चित्रण श्री. सत्यजित रे यांच्या 'अशनि संकेत' (डिस्टंट थंडर) चित्रपटात परिणामकारक रीतीने चित्रित केले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात युरोपमध्ये व दूर पॅसिफिकमध्ये चाललेल्या युद्धाच्या कथा ऐकताना रम्य वाटल्या. परंतु हळूहळू त्याचा परिणाम ब्रह्मदेशापर्यंत पोहोचल्यानंतर, सकाळ-संध्याकाळ जेवताना मिळणारा तांदूळ कमी पडू लागल्यानंतर, लक्षावधींना मृत्यूच्या, भयानक दुष्काळाच्या खाईत जाण्याचा प्रसंग जेव्हा बंगालमध्ये १९४३ साली आला, त्यातून मानवतेची नियती एकाच धाग्यात गोवलेली आहे, याची जाणीव झाली. या जाणिवेचा एक स्पष्ट अर्थ असा, की सामाजिक, राजकीय व साहित्यिक मूल्यांची एकमेकांपासून फारकत करता येत नाही. आजही भारतांतर्गत समस्यांचा विचार करीत असताना हा संदर्भ तुम्हां-आम्हांला विसरता येणार नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यक्तींना स्वातंत्र्यावर आधारलेले अनेक अधिकार जसे प्राप्त झाले आहेत. तशाच काही जबाबदाऱ्याही आहेत. हे स्वातंत्र्य आणि जबाबदाऱ्या यांना एकमेकांपासून अलग करून चालणार नाही. या दोहोंचा पिळदार गोफ गुंफण्याचा निर्धारपूर्वक प्रयत्न आपल्या देशात झालेला नाही. हे घडले नाही, तर राष्ट्रीय स्वातंत्र्य कदाचित धोक्यात येण्याचा संभव आहे. हा एक विचार आपल्या चिंतनासाठी या निमित्ताने मी आपल्यापुढे मांडू इच्छितो. मुक्त विचाराचा सिद्धांत हा एक आकर्षक विचार आहे आणि मूलतः समर्थनीयही आहे. पण आजच्या सामाजिक, आर्थिक क्षेत्रांत उभे असलेले इतर राष्ट्रीय प्रश्न यांचा संदर्भ विसरून हा सिद्धांत यशस्वी होऊ

शकेल काय, याचेही चिंतन होण्याची गरज आहे.

नव्या समाजरचनेच्या दृष्टीने मूलभूत महत्त्वाचे आणि ललित साहित्याशी अत्यंत निगडित असलेले आणखी दोन विषय आहेत. ते म्हणजे दलित वर्ग व स्त्री. दोन्ही प्रश्नांना नव्या सामाजिक प्रबोधनात फार महत्त्वाचे स्थान आहे. राजकीयदृष्ट्या त्यांना जे स्थान मिळावयाचे, ते आपण दिले, असे कदाचित म्हणता येईल. आपल्याकडे राजकीय हक्क आधी मिळाले आहेत; पण अजून त्या हक्कांना सामाजिक बळ (सँक्शन) मिळवून देण्यात महत्त्वाचे काम झालेले नाही. पाश्चात्त्य देशांत ही प्रक्रिया वेगळी होती. येथे मात्र आपल्या राजकीय स्वातंत्र्य-लढ्यात आपण स्वीकारलेल्या उदारमतवादाची परिणती आपल्या राज्यघटनेत झाली. पण आपले सामाजिक मन मात्र संकुचित राहिले आहे. हा विसंवाद जितक्या लवकर नाहीसा होईल, तितके समाजातील तणाव कमी होतील. आज ते तणाव आहेत, त्यांचे स्वरूप समाजापुढे आणले पाहिजे आणि या विसंवादाचा वेध घेऊन ते मोडून काढले पाहिजेत.

एक स्त्रीच आपल्या या संमेलनाची अध्यक्ष आहे. एक स्त्री भारताच्या पंतप्रधान आहेत. इतरही अनेक क्षेत्रांत स्त्रियांना मानाचे स्थान मिळाले आहे. पण स्त्रियांना समाजात काही स्थान आहे का, यापेक्षा स्त्रीचा समान समाजघटक म्हणून समाजात किंवा आपल्या कौटुंबिक जीवनात स्वीकार झाला आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कायद्यातील समानता आणि न्यायालयातील समानता यांना महत्त्व आहेच. पण ती समानता समाजाच्या दैनंदिन व्यवहारात प्रतिबिंबित झाली नाही, तर ती विसंगती दुस्सह होते. प्रत्येक वेळा न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात जाता येत नाही किंवा कायद्यावर बोट ठेवता येत नाही. म्हणून सामाजिक हक्क हे समाजमनाच्या उदारतेवर, त्याच्या समंजसपणावर अवलंबून असतात. मला वाटते, हा तात्त्विक सामाजिक उदारमतवाद व आपल्या मनात मूळ धरून बसलेली जुनी मूल्ये यांच्यांतील संघर्षाचे पडसाद प्रत्येकाच्या जीवनात उमटतात. तुमच्या-आमच्या प्रत्येकाच्या जीवनातही हे घडते. आणखी असे, की स्त्रियांचे किंवा दलितांचे समाजातील न्याय्य स्थान केवळ मानवतेच्या किंवा कारूण्याच्या भूमिकेतून आपण स्वीकारले, तर ते एक ढोंग ठरेल. समाजघटक म्हणून या दोघांना आपण स्वीकारले पाहिजे, त्यांच्या कर्तृत्वाला स्थान दिले पाहिजे आणि या त्यांच्या नव्या सामाजिक स्थानाशी अनुकूल अशी समाजाची व व्यक्तीची मानसिक जडण-घडण झाली पाहिजे.

या दृष्टीने दलित समाजातून आलेल्या नव्या मराठी साहित्यिकांनी जे साहित्य निर्माण केले आहे, ते मराठीतील एक मोलाची भर आहे, असे मी मानतो, उच्चभ्रू साहित्याचे किंवा त्यांच्या संकल्पांचे मानदंड लावून त्याला जोखणे चुकीचे आहे. उच्चभ्रू साहित्यात पाश्चात्त्य वळणाची अश्लीलता आपणांला चालते. दलित समाजातून येणाऱ्या साहित्यिकाच्या भाषेस मात्र आपण नाके मुरडतो. हा नैतिक भेदभाव आहे, दुहेरी मानदंडाची भावना त्यामागे आहे, असे मला वाटते. म्हणून ज्या सामाजिक थरातून लेखक आलेला असेल, त्याची भाषा त्याच्या साहित्यात आली, तर ती स्वागतार्ह मानली पाहिजे. शेवटी भाषेचे माध्यम अभिव्यक्तीसाठी वापरावयाचे असेल, तर तिची सामाजिक अभिव्यक्ती हाही एक अविभाज्य भाग आहे. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या समाजाचा पहिला उद्‍गार हा रूढ कल्पनेप्रमाणे असावा, असे मानणे चुकीचे आहे. तो 'उद्‍गार' निघाला, हेच सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. तो असेल, तसा आला पाहिजे. आपण त्याचे स्वागत केले पाहिजे. मला वाटते, आपले हजारो वर्षांचे संस्कार अशा अभिव्यक्तीतून बाहेर पडले, तर ते सामाजिक दृष्टीने आरोग्यदायक ठरेल. आदिवासी व उपेक्षित जाती यांची भाषा आता मराठी भाषेत येणार आहे. हे सामुदायिक चयन किंवा देवाणघेवाण भाषेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्याने मराठी भाषा समृद्ध होईल. म्हणून दलित साहित्याची भाषा कदाचित वेगळी वाटली, तरी तिचा कस, तिच्यातील रग, जर नव्या मराठीत उतरली, तर ती हवीच आहे. पण यासाठी जाणकारांनी व सामान्य वाचकांनी स्वागतशील वृत्ती ठेवली पाहिजे.

दुसरा एका मुद्दा दलित साहित्यासंबंधी सांगण्यासारखा आहे. ती एक उपेक्षित सामाजिक स्तरांच्या भावनांची जी कोंडी इतकी वर्षे होती, ती आज फुटली आहे. त्याचा सामाजिक सुधारणेसाठी वा सामाजिक प्रक्रियेसाठी उपयोग होईल. जी समाजसंस्था जुनी झाली आहे, तिच्याविषयी संबंधित सामाजिक गटांना काय वाटत होते, तिचा जाच त्या गटांना कसा होत होता. त्यांचा सामाजिक अनुभव काय होता, याचे हे दर्शन या साहित्यातूनच घडते, हे सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. सामाजिक वास्तवता कितीही कठोर व कटू असली, तरी ती समाजसुधारकाला पाहावी लागते. एखाद्याच्या रोगाचे निदान करण्यासाठी डॉक्टरला जशी माहिती हवी असते, तसेच हे आहे. म्हणून हे साहित्य हा आरसा आहे. त्याचा सामाजिक उपयोग होण्यासारखा आहे. केवळ साहित्यबाह्य निकष लावून जरी या साहित्याचा विचार केला, तरी

ते मोलाचे आहे.

मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने साहित्यिकांनी विचार करण्यासाठी मी आणखी दोन मुद्दे मांडतो. ते म्हणजे मराठी वाङ्मयाची गुणवत्ता आणि विस्तार. दोन्ही दृष्टींनी त्याचा अन्य भारतीय भाषा आणि प्रगत जागतिक भाषा यांच्याशी सांधा जुळविणे आवश्यक आहे. पाश्चात्य इंग्रजी वाङ्मयानेच सामान्यतः आपल्यावर संस्कार केले आहेत. त्यांचे अनुकरण गेल्या दीडशे वर्षांत आपण करीत आहोत. मला वाटते, जगातील अनेक राष्ट्रे मुक्त झाली आहेत, त्यांच्या विचारधनाचा, ललित वाङ्मयाचा परिचय, त्यांचे संघर्ष आपल्या भाषेत आणणे आवश्यक आहे. विशेषतः आशिया व आफ्रिका यांतील साहित्याचा, त्यांतील विचारांचा परिचय मोठ्या प्रमाणात करून घेणे आवश्यक आहे. आपल्या मनाचे जे पश्चिमीकरण झाले आहे, ते ऐतिहासिक दृष्ट्या अपरिहार्य असले, तरी आता योजनापूर्वक इतर विश्वसाहित्याचा व्यापक व सखोल अभ्यास झाला पाहिजे.

जसे विश्वसाहित्यविषयी आपण उदासीन राहता कामा नये, तसेच, आपण भारतीय भाषाभगिनींकडे दुर्लक्ष करता कामा नये. गेल्या पंचवीस वर्षांत सर्वच भारतीय भाषा कमी-जास्त प्रमाणात विकसित झाल्या आहेत. त्यांच्यांतील नव्या प्रवाहांची ओळख आपण करून घेतली पाहिजे. भारतीय साहित्य नावाची संकल्पना त्यातून साकार होत आहे. भारतीय साहित्य म्हणजे वेगवेगळ्या भाषांतून लिहिल्या जाणाऱ्या सामाजिक अनुभवाचा आरसा असेल. मी केवळ राष्ट्रीय अस्मितेच्या दृष्टीने राष्ट्रीय साहित्य आवश्यक आहे, असे म्हणत नाही. पण ज्ञानेश्वर, तुकाराम आणि कबीर भारतीय कवी आहेत, असे मी मानतो. याचे कारण भारताच्या अंतरंगाचे दर्शन यांचे साहित्य घडविते. आधुनिक काळात शरच्चंद्र किवा ह.ना.आपटे हे जसे या राष्ट्रीय उषःकालाचे कांदबरीकार होते, तसेच आता राष्ट्रीय प्रबोधनाचे साहित्यिक निर्माण झाले पाहिजेत. भारतीय संगीत, भारतीय रंगभूमी या संकल्पना आता जशा रूढ होत आहेत, तशी भारतीय साहित्य ही संकल्पना आता रूढ झाली पाहिजे. पण असे व्हावयाचे असेल, तर मराठी वाङ्मयातील उत्कृष्ट कृतींचे रूपांतर हिंदीमध्ये व्हावयास पाहिजे. अलीकडे वि.स.खांडेकर यांच्या कादंबऱ्या मोठ्या प्रमाणात हिंदीमध्ये भाषांतरित केल्या गेल्या. तसेच, अलीकडे विजय तेंडुलकर-खानोलकर यांच्या नाटकांची रूपांतरे हिंदी रंगभूमीवर येत आहेत. त्यांत खरी प्रादेशिकता कमी असते. ती नव्या सामाजिक परिस्थितीची

प्रातिनिधिक नाटके आहेत. कारण नागरी जीवनातील मध्यमवर्गाच्या समस्या नव्या औद्योगिक संस्कृतीमुळे भारतात सर्वत्र सारख्याच आहेत. त्यांचे प्रतिबिंब त्यांत आढळते. सत्यजित रे यांचे चित्रपट हे भारतीय चित्रपट मानले जातात. कारण त्यांत आधुनिक भारतीय मनः प्रवृत्तीचे व भारतीय समाजाचे प्रतिबिंब असते. तेव्हा प्रादेशिक भाषेत लिहिले गेलेले साहित्य हे राष्ट्रीय साहित्य असते व ते केवळ भौगोलिक अर्थाने नव्हे, तर त्यातील अंतरंगावरूनही ते साहित्य भारतीय ठरावे. मला वाटते, की मराठी साहित्याला या दोन्ही दिशांनी स्वतः चा विकास करावा लागेल. भारतीयता, विश्वात्मकता व मराठीपणा हे तिन्ही गुण एकाच साहित्यात एकाच वेळी नांदले, तर ते साहित्य समृद्ध होईल. त्यात भिन्नरूचित्व येईल. इंद्रधनुष्याची प्रभा त्यावर पसरेल.

मराठी राज्याचा संसार १९६० साली सुरू झाला. पण त्यामागची मराठी भाषकांच्या एकीकरणाची ओढ अशा साहित्य संमेलनांतून निर्माण झाली. १९०८ सालच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात चिंतामणराव वैद्यांनी या एकीकरणाचा उल्लेख केलेला मला आढळला. तेव्हा महाराष्ट्राच्या एकीकरणाशी या संमेलनांचा निकटचा संबंध आहे. म्हणून आपण महाराष्ट्र निर्माण झाल्यापासून गेल्या पंधरा वर्षांत नेमके काय साध्य केले, काय करायचे आहे, याचा काहीसा आढावा या संमेलनाच्या निमित्ताने मी घेतला, तर तो उपयोगी पडण्यासारखा आहे.

पूर्वीच्या अध्यक्षांची भाषणे वाचत असता महाराष्ट्र विद्यापीठ, मराठी भाषेची ॲकॅडमी या सर्वांचा उल्लेख पूर्वीच्या अध्यक्षांनी वेळोवेळी केलेला आढळला महाराष्ट्र स्थापनेनंतर या बहुतेक सर्व संस्था अस्तित्वात आल्या आहेत. त्या कार्यरत आहेत. शासकीय पातळीवर अनेक समस्यांचा विचार होऊन, मराठीला उत्तेजन देणारे उपक्रम हाती घेऊन जवळजवळ पंधरा वर्षे झाली आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, भाषा संचालनालय, सांस्कृतिक विभाग, लोकसाहित्याचे मुद्रण, मराठी रंगभूमीला उत्तेजन, शास्त्रीय व लोकसंगीताच्या जोपासनेसाठी असे अनेक साहित्यविषयक व सांस्कृतिक उपक्रम चालू केले.

पण या सर्व उपक्रमांप्रमाणेच मराठीच्या दृष्टीने आणखी एक-दोन प्रश्न मी आपल्यापुढे मांडू इच्छितो. एक म्हणजे ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथप्रसार. अलीकडे प्रकाशकांनी केलेली भाषणे व 'मौज' प्रकाशनाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त झालेली भाषणे मी वाचली. मला वाटते, की केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण

करून भागणार नाही, तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते, की एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल. 'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य', असे समीकरण झाले आहे. हे अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गिऱ्हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथांचा प्रसार का होत नाही, याचा विचार करावयास पाहिजे. विद्यापीठांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. शासन यासाठी काय करू शकेल, याचाही स्वतंत्रपणे विचार झाला पाहिजे. ग्रंथप्रसार होण्याची खात्री असेल, तर चांगले लेखक पुढे येतील.

दुसरे म्हणजे, संशोधनासंबंधी विद्यापीठांनी अधिक समाजभिमुख व्हावयास हवे. आज अनेक सामाजिक समस्यांचे संशोधन व्हावयास हवे आहे. दलितांचे, स्त्रियांचे व शहरी लोकांचे अनेक सामाजिक प्रश्न आहेत, की ज्यांच्यावर संशोधन झाले, तर साहित्यात त्याची महत्त्वाची भर पडेल. मराठीमध्ये 'गावगाडा' किंवा 'बदलापूर' यांसारखी समाजशास्त्रीय आशय असलेली पुस्तके निर्माण झाली होती त्यांची आठवण या वेळी होते. असे अनेक ग्रंथ इंग्रजी भाषेत होतात. बदलत्या समाजाचे चित्र या संशोधनातून मिळते. तसेच आपल्या इतिहासाचे आहे. अलीकडे मराठी ऐतिहासिक कादंबरीला बहार आला आहे. इतिहासाचे सर्वांगीण अध्ययन व संशोधन झाले पाहिजे. महाराष्ट्रातील अनेक थोर पुरूषांच्या जीवनाचा सखोल अभ्यास करणारे ग्रंथ, त्यांच्या चरित्रसाधनांची जमवाजमव यांत आपल्या विद्यापीठांनी लक्ष घालावयास हवे. महाराष्ट्रात सहा विद्यापीठे आहेत. त्यांनी विषयवार वाटणी केली, त्यासाठी अध्यासने निर्माण केली, तर ही कामे योजनापूर्वक करता येतील. ललित साहित्याला, चिंतनशील साहित्याला उपयुक्त असे आधारभूत ग्रंथ निर्माण होऊ लागतील. हे सगळे योजनापूर्वक करावयाचे काम आहे.

मित्रहो, माझे भाषण संपले आहे. आता फक्त शेवट. प्राचीन काळी तपस्व्यांच्या आश्रमात शिरताना राज्यकर्ते आपली राजचिन्हे काढून साध्या वेशात जात असत. तसेच, या शारदेच्या उपवनात येताना भारत सरकारच्या

मंत्रिपदाची बिरूदावली मी बाहेर ठेवून आलो आहे. मातृभाषेवर उत्कट प्रेम करणारा एक मराठी माणूस म्हणून मी इथे आलो आहे. आमचा पाहुणचार भाजी-भाकरीचा असला, तरी तो भावमिश्रित आहे, जिव्हाळ्याचा आहे, सकस आहे, हे ध्यानात असू द्या. तो तुम्ही गोड करून घ्यावा. गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे हा आपला देश राकट आहे, तसा कोमल आहे.

***देवी ज्ञानेश्वरी करी जिथे भक्तीचा खेळ***

***तिथेच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ***

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतिमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्ये फार मोठी आहेत. पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसांतील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे. वाङ्मय सहेतुक असावे, की नाही, यात बोध असावा, की नाही, या वादात मी पडत नाही. पण एवढे मात्र मी म्हणेन, की वाङ्मयाने माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे. या विस्तारात पुष्कळ ग्रंथी सुटतात. आजच्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षात दुर्गा भागवत यांची निवड अध्यक्षपदी व्हावी, हे उचितच आहे. त्यांच्या प्रखर ज्ञाननिष्ठेबद्दल त्यांच्यासंबंधी माझ्या मनात परम आदर आहे. मतात आग्रही व निःस्पृह, पण वृत्तीत कोमल आणि रसिक अशा गुणांनी मंडित अशा दुर्गाबाईंचे मार्गदर्शन आपणांला फलदायक होईल, एवढे सांगून व आपले हार्दिक स्वागत करून, दुर्गाबाईंनी संमेलनाची सूत्रे हाती घ्यावी, अशी मी त्यांना विनंती करतो.



# चिंतन

## ७७... माझ्या आयुष्यातील आशा - निराशेचे क्षण

तशी माझी प्रवृत्ती व प्रकृती आशावादी आहे. स्वभावाने मी संकटकाळी दबून जाणारा नाही. कठीण काळ येतो, तेव्हा सहन करीत वाट पाहावी लागते आणि ते करण्यासाठी एक प्रकारचा आत्मविश्वास व त्यावर आधारलेला आशावादी दृष्टिकोन असावा लागतो. पण याचा अर्थ असा नाही, की दैनंदिन जीवनात आशा-निराशेचा पाठशिवणीचा खेळ मी अनुभवलेला नाही. मला वाटते, हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात येणारा नित्य अनुभव आहे. प्रासंगिक कारणासाठी का होईना, पण दैनंदिन जीवनात कधी आशावादी, तर कधी निराश व्हावे लागते. परंतु ते किंचित काळ टिकणारे प्रसंग असतात. परंतु आज जेव्हा मी पाठीमागे वळून पाहतो, तेव्हा आशावादाने विशेष क्रियाशील झालो आणि निराशेने, काही काळ का होईना, पण मनात चांगलेच घर केले, ते क्षण नजरेपुढे येतात. त्यांतल्या काही क्षणांची ही नोंद आहे.

माझ्या विद्यार्थिदशेतील एका कौटुंबिक प्रसंगाची आठवण मला नित्य येते. त्या वेळी मी मनाने एकदम थकून गेलो, असे मला वाटले होते. माझी आई आपला गरिबीचा संसार चालवून आमचे शिक्षण करीत होती. आपण काही विशेष कर्तृत्व करून आईला मदत केली पाहिजे, असे माझे बंधू गणपतराव यांच्या मनात वारंवार येत होते. माझे ते बंधू अत्यंत बुद्धिमान व उत्कृष्ट खेळाडू होते. माणसांची पारख करण्यात निष्णात असा त्यांचा लौकिक नंतर माझ्या भागात झाला.

एकदा इंग्रजी पाचवी-सहावीत असताना एका बऱ्यापैकी सुखी घरातील एका स्नेह्याबरोबर त्यांनी एक धाडसी प्रयोग करण्याचे ठरविले. तेव्हाच्या इंदौर संस्थानात शेती भरपूर होती. पण शेती करणारे कमी होते. शेती करण्यास उत्सुक व साधने जवळ असणाऱ्यांना भरपूर शेती देण्यात येत असे. गणपतराव व त्यांच्या स्नेह्याच्या कानांवर ही गोष्ट आली कानांवर ही गोष्ट आली. तेव्हा इंदौर संस्थानात जाण्याचा विचार सुरू केला. त्यांचे वय तेव्हा सोळा-सतरा वर्षांचे होते. माझे बारा-तेरा वर्षांचे असेल. माझ्या कुटुंबातील सर्वांना त्यांनी ही गोष्ट सांगितली. माझ्या आईला ही गोष्ट काही आवडली नाही;

पण मला मात्र त्यांच्या धाडसी निर्णयाचे कौतुक वाटले. त्या दोघांनी इंदौरकडे जाण्याची तयारी केली. स्नेह्याने आपल्याबरोबर काही साधने व थोडे-फार पैसे घेतले. गणपतरावांबरोबर आम्ही काहीच देऊ शकलो नव्हतो. लागणारे भांडवल किंवा इतर साधने आमच्या कुटुंबापाशी नव्हती. काम करण्याची हौस आणि धाडसी स्वभाव याचेच भांडवल घेऊन माझे बंधू गेले. ते गेल्यानंतर महिन्याने त्यांचे पत्र आले. इंदौर सरकारने त्यांना त्यांच्या राज्यातील गरोठ या गावी दीडशे एकर शेती कसण्यासाठी दिली होती. ही बातमी वाचून आम्हा सर्वांना आनंद झाला. आपण आता जमिनदार झालो, अशी खुळी कल्पना माझ्या मनात येऊन गेली. पुढे चार-सहा महिन्यानंतर गणपतरावांबरोबर गेलेले त्यांचे सधन स्नेही शेतीसाठी लागणारी अधिक साधने घेऊन येतो, असे गणपतरावांना सांगून गावी परत आले. परंतु परत आल्यानंतर गरोठला पुन्हा जाण्याचा त्यांचा विचार काही दिसेना. त्यांची नाती बड्या खानदानी मंडळीत असल्यामुळे त्यांनी परत जाण्याचा विचार सोडून दिला व लष्करात नोकरी धरली. माझ्या आईचा जीव वाऱ्यावर उडाला. या माणसाबरोबर माझे मूल गेले आणि हा आपली साधने परत घेऊन आला, आता त्याचे तिथे काय होईल? या विचाराने तिला काही सुचेनासे झाले. त्यानंतर एक-दोन महिन्यांत गणपतरावांची पत्रे येऊ लागली. 'बाबूराव अजून परत का येत नाहीत? मी येथे एकटाच आहे. माझी प्रकृती बरी नाही. माझ्याजवळ साधनेही नाहीत.' असा मजकूर त्यांत असे. त्यांची पत्रे पाहून आम्हां सर्व भावंडांना खूप दुःख होई. मी त्या वयात एक पत्र माझ्या बंधूंच्या पत्त्यावर लिहिले व त्यात त्यांना परत यावयास सांगितले. त्यांचे उत्तर आले, की पिके तोंडावर आली आहेत. ती सोडून कसा येऊ? पण पिके काढण्यासाठी लागणारे पैसेही जवळ नाहीत, असेही उत्तर आले. ते पत्र पाहिल्यानंतर, का, कोण जाणे, माझ्या भावाला एकटे सोडून परत आलेल्या त्या सधन स्नेह्याबद्दल एक प्रकारची अढी माझ्या मनामध्ये निर्माण झाली. मनावर एकदम निराशेचे सावट आले. दूरदेशी असलेला आपला भाऊ अडचणीत आहे आणि आपण त्याकरता काही करू शकत नाही, यातून निर्माण झालेली असहायता ही विलक्षण अशी होती. कित्येक आठवडे मी त्याच मनःस्थितीत होतो. आयुष्यभर मी अनेक संकटांमधून प्रवास केलेला आहे, त्यामुळे पुष्कळ वेळा मन निराशेने आकसून गेल्याचे मला आठवते, पण या वेळी मी जेवढा निराश झालो होतो, तेवढा केव्हाही झालो नाही. काही आठवड्यांनंतर एका दिवशी सकाळी पाहतो, तो माझा भाऊ घरी परत

आलेला दिसला, अंगावर खाकी कपडे, अर्धी पँट घातलेल्या व थकून गेलेल्या माझ्या भावाची मूर्ती पाहून मी त्याच्या गळी पडलो. बराच काळ दबलेल्या निराशेने अश्रूंद्वारे वाट काढली. माझा भाऊ माझी समजूत काढीत होता,

'अरे, असे दबून कसे चालेल ? मला यातूनही काही शिकायला मिळाले.'

त्यानंतरचा मला आठवणारा व मी बराच जाणता झाल्यानंतरच्या काळातला माझा अनुभवः १९३९ च्या दुसऱ्या महायुद्धाबरोबरच हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीत उलाढाली सुरू झाल्या. त्या वेळी पुण्यात कायद्याच्या अभ्यासासाठी राहत होतो. काहीशा जहालवादी राजकीय विचारसरणीतून माझी राजकीय वाढ झाली होती. मी ज्या विशिष्ट गटाबरोबर काँग्रेसमध्ये काम करीत होतो, त्यांच्याजवळ व काँग्रेसजवळही अशा ऐन मोक्याच्या वेळी स्वातंत्र्य-संग्राम तीव्र करण्याचा कसलाच कार्यक्रम नव्हता. एका प्रकारची दिशाहीनता तीव्रपणे जाणवू लागली. यातूनच माझ्या निराशेच्या कालखंडाला सुरूवात झाली. त्या काळात मी अनेकांशी चर्चा केल्या, बरोबरीच्या स्नेह्यांशी रात्रीच्या रात्री जागून वाद केले. डेक्कन जिमखान्यावर गुडलक रेस्टॉरंटमध्ये पीला हत्ती सिगारेटचा धूर सोडीत व तो पाहत मी तासन् तास एकाकी बसून काढले. लॉ. कॉलेजमध्ये हजेरी देण्यापलीकडे अभ्यासात माझे लक्ष नव्हते. देश नेतृत्वहीन झाला आहे, की काय, असे वाटू लागले. मनाचा कोंडमारा झाला होता. एकट्याने काही करावे, अशी शक्यता बुद्धीला पटत नव्हती. त्या वेळची ती निराशा माझ्या मनात घर करून कित्येक महिने राहिली होती. त्या वेळी माझ्या अभ्यासाचे वर्ष फुकट गेले. दुसरेही काही घडले नाही. निराशेच्या पोटी कृतिशून्यता निर्माण होते, असे म्हणतात, ते माझ्याबाबतीत या वेळी खरे ठरले.

त्यानंतर वैयक्तिक सत्याग्रह आणि भारत छोडो चळवळीचा काळ आला. आयुष्यातील महत्त्वाच्या संधीचा हा काळ आहे, या भावनेने भारावून जाऊन मी या काळात उडी घेतली. आशा-निराशावादाचा माझ्या आयुष्यातील हा कालखंड मी फार महत्त्वाचा मानतो. निराशेच्या काळात मनुष्य पुष्कळ वेळा अंतर्मुख होतो. आपल्या उणिवा तपासतो. त्या अर्थाने निराशेचे क्षण हे जीवनाला शक्ती देणारे क्षण असतात, असे मला वाटते. यातूनच कर्तृत्वाची संधी प्राप्त होत असते.

भारत छोडो चळवळीच्या काळातील १९४३ चा एक दिवस मला आठवतो. त्या दिवशी मी विलक्षण निराश झालो. भूमिगत अवस्थेत काम करीत असताना त्या दिवशी माझा मुक्काम पुण्यात होता. महात्मा गांधींचे

आगाखान पॅलेसमध्ये उपोषण चालू होते आणि दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत चालली होती. अशा काळातील तो दिवस होता. भूमिगत अवस्थेत मी माझ्या एका मित्राच्या घरी राहत होतो. त्या संध्याकाळी त्या माझ्या मित्राने येऊन बातमी सांगितली, की महात्माजींची प्रकृती फार खालावली असून, ते आता काही तासांचेच सोबती आहेत. ही बातमी ऐकल्यापासून ती सबंध रात्र मी एक प्रकारच्या, पूर्वी कधीही न अनुभवलेल्या निराशेने खचून काढली. म.गांधींशिवाय स्वातंत्र्यसंग्रामाच्या यशस्वितेची शक्यता वाटत नव्हती. गांधीजींशिवाय हिंदुस्थान कसा असेल, तेच मनाला उमगत नव्हते. हे एवढे सारे दुःख होते, परंतु डोळ्यांत पाणी येत नव्हते. अश्रू सारे आटले होते. सगळे व्यर्थ आहे, असे वाटत होते. ती सर्व रात्र मी जागून काढली. पहाटे होताच मित्राला वर्तमानपत्रे आणायला सांगितली. वर्तमानपत्रात गांधींची प्रकृती अस्वस्थ आहे, परंतु धोका नाही आणि सरकार त्यांची सुटका करणार आहे, अशी बातमी आली होती. ते वाचून काहीसे बरे वाटले. माझ्यासारखे असे सहस्त्रावधी लोक त्या दिवशी अशीच चिंता करीत असतील, अशी जाणीव मला झाली. ही निराशेची रात्र मी कधीही विसरू शकणार नाही.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची व्यवहार्य शक्यता आहे, या विचाराचा धागा माझे हाती १९५७ च्या अखेरी आला. तेव्हापासून तीन-चार वर्षांचा काळ हा एक नव्या आशावादाने भारून गेलेला काल आहे. १९५९ साली महाराष्ट्र राज्य निर्मिती शक्यतेपासून निर्णयाप्रत पोहोचली होती. कृषि-औद्योगिक विकासावर आधारलेली नवी अर्थरचना, महाराष्ट्रातील दलित व पुढारलेल्या समाजातील मानसिक दुरावा दूर करून सामाजिक एकतेची नवी वाटचाल व शतकानुशतक एकमेकांपासून वेगळे असलेल्या विभागांना एकात्मतेचा अनुभव हे माझे कार्यक्रम जीव ओतून पुरे करण्याची ही सुवर्णसंधी आहे, या दृष्टीने मी या नव्या राज्याकडे पाहत होतो. ५९-६० साली या नव्या राज्यासंबंधी मी केलेली भाषणे परवा 'सह्याद्रीचे वारे' या माझ्या पुस्तकामध्ये मी चाळून पाहत होतो, त्या भाषणांमध्ये माझा त्या काळचा आशावाद ओतप्रोत भरलेला दिसून येतो. पण त्या दिशेने आज प्रगती किती केली, हे जेव्हा पाहावयाचा प्रयत्न करतो, तेव्हा माझ्या मनाला निराशा वाटते. विशेषतः परवा मराठवाड्यात झालेली उग्र निदर्शने व दंगली पाहिल्या, म्हणजे आमच्या आशावादाचा, तात्पुरता का होईना, पण पराभव झाला आहे, असे मला वाटते. या जातीयतेच्या अंधारामध्ये कोणालाही वर येता येणे शक्य नाही.

का, कोण जाणे, निव्वळ या कामासाठी आयुष्य वाहून घेण्याची जरूरी आहे, असा तीव्र विचार माझ्या मनात येऊन गेला. हे कार्य संपवायचे म्हटले, तर सर्वांनी पराकाष्ठा केली पाहिजे, नाही तर आमच्या या समाजात निराशेच्या अंधाराशिवाय दुसरे काहीच उरत नाही.

माझ्या संपूर्ण राजकीय आयुष्यात गेल्या अनेक वर्षांच्या काळात एका गोष्टीसंबंधी वारंवार निराशेचा अनुभव करावा लागला आहे. मला वाटते, माझा हा राजकारणातील अनुभव इतरांनासुद्धा आला असेल, राजकारणामध्ये यशस्वी होणे एक कष्टसाध्य काम आहे. संघटनेतील कार्यकर्त्यांमध्ये स्नेहाचे जाळे विणावे लागते, माणसे सांभाळावी लागतात, वाढवावी लागतात व त्यासाठी असंख्यांच्या मनाची जपणूक वर्षानुवर्ष करावी लागते. पण त्यांतले काही थोडे, पण मोठे लोक त्यांच्या महत्त्वाकांक्षेला किंचितसा ओरखडा जाताच वैरभावाचा फणा उभारतात. अशा स्वभावाचे काही नमुने पाहिल्यानंतर मी निराश होतो. मला राग येत नाही, पण निराशेचा मात्र तीव्र अनुभव होतो. मला वाटते, कदाचित हा जीवनाच्या खेळातील एक आवश्यक भाग असेल. राजकारणात निदान सरळ रेषेत काहीच चालत नाही. कदाचित इतर क्षेत्रांतही चालत नसावे. सरळ रेषेची ही संकल्पना फक्त भूमितीतच पाहायची. वास्तव जीवनात दिसतात, त्या अनेक समांतर रेषा किंवा एकमेकांना छेदून त्रिकोण, चौकोन करणाऱ्या रेषा. हेही खरे आहे, की आकर्षक वळसे घेत मनोरम चित्ररेखा उभ्या करणाऱ्या रेषाही असतात, त्यांना विसरून चालणार नाही. जीवनाची ही वास्तविकता गृहीत धरून चालावे लागेल व ती हसतमुखाने स्वीकारल्याने मनुष्य निराशेच्या कक्षेबाहेर पडू शकेल.

अगदी अलीकडे मी अनुभविलेला आनंदाचा व आशेचा क्षण असाच अनपेक्षितपणे आला. १९७७ च्या जानेवारीमध्ये मी परराष्ट्रमंत्री म्हणून रूमेनियाच्या भेटीसाठी गेलो होतो. हिवाळ्यातील बर्फाच्छादित युरोपचे माझे हे पहिले दर्शन. त्या वर्षी बर्फही काहीसे जास्तच पडले होते. रूमेनियाच्या भेटीचा माझा हा शेवटचा दिवस होता. आदल्याच दिवशी 'ब्रशाव्ह' या बुखारेस्टपासून शंभर-एक मैलांवर असलेल्या शहरी जाऊन आलो होतो. येताना वाटेत हिवाळी शुभ्र सौंदर्याने नटलेल्या कार्पेथियनच्या रांगा डोळे भरून पाहिल्या होत्या. या पर्वतराजीच्या कुशीत वसलेल्या एका सुंदर स्थळी राष्ट्रपतींच्या विश्रामधामी जाऊन अध्यक्ष श्री.चाउशेस्की यांचेशी पुरेपुर दोन तास महत्त्वाच्या चर्चाही झाल्या होत्या. या शेवटच्या दिवशी विदेश मंत्र्यांची निरोपाची गाठभेट व

आमच्यातर्फे द्यावयाचा रात्रिभोज एवढेच काम शिल्लक उरले होते. गेले चार दिवस ओळीने युरोपियन खाना खाऊन कंटाळलो होतो. त्या दिवशी दुपारी राजदूत श्री. कौल यांच्या घरी हिंदुस्थानी 'डाळभात' खाण्याचा आमचा बेत होता. आमचे जेवण चालू असतानाच अडीच वाजण्याच्या सुमारास टेलिफोनची घंटी वाजली. टेलिफोन घ्यावा, म्हणून श्री. कौल उठून गेले. मीही माझे जेवण संपविले व निवांत हात धूत होतो. तेवढ्या राजदूत घाईघाईने माझेकडे आले व म्हणाले.

'तो बेलग्रेडचा फोन आहे. तेथील कॉन्सल मला काही सांगत नाही. तुमच्याशी प्रत्यक्ष बोलावयाचे, म्हणतो. तुमच्यासाठी काही मेसेज आहे.'

मी टेलिफोन घेतला, तेव्हा त्या कॉन्सलने आपले नाव सांगितले व प्रधानमंत्र्यांचा १७ तारखेचा संदेश हिंदीत वाचून दाखविला. संदेश होता, की त्या संध्याकाळी प्रधानमंत्री लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा करणार आहेत. मला काहीशी कल्पना होती, परंतु खात्री नव्हती. पण आता संदेश ऐकून मनावरचे ओझे एकदम हलके झाले. आणखीन दोन देशांचा दौरा करून मला परत जायचे होते. पंरतु आता परत जाण्यात औचित्य होते. सार्वत्रिक निवडणुकांना आम्ही कायमचे मुकलो, की काय, अशी धास्ती गेली कित्येक महिने वाटत होती, ती नाहीशी झाली.

मी माझ्या पत्नीला त्या दिवशी तेथूनच पत्र लिहिले, त्यात म्हटले आहे की,

'बहुतेक सर्व राजबंदी सुटतील व निवडणुकीचे वातावरण प्रस्थापित होईल. This is a gain. हवा मोकळी होईल. आज मी आनंदात आहे.'

- आणि तो दिवस खराच आनंदाचा होता. बुखारेस्ट शहराचे आकाश ढगाळलेले होते. हवा व वातावरण तीव्रतम थंडीमुळे उदास होते. पण तो संदेश ऐकल्यानंतर दिवसभर माझ्या मनात सकाळच्या कोवळ्या उन्हाचा उल्हास होता - एका नव्या आशावादी दृष्टीने भवितव्याकडे पाहण्याची संधी पुन्हा प्राप्त झाली होती.

# ७८... काही संस्मरणीय वाढदिवस

मी माझा वाढदिवस एका वर्षी साफ विसरलो होतो. पण त्या वेळच्या दिल्लीतल्या वाढदिवसानं माझ्या मनात कायमची आठवण नोंदविली.

१९६७ सालचा तो वाढदिवस, सार्वत्रिक निवडणुका नुकत्याच झाल्या होत्या आणि महामंत्र्यांच्या निवडीची गर्दी सुरू होती. ती निवडणूक झाली १२ मार्च या दिवशी. इंदिरा गांधी महामंत्रिपदावर विराजमान होताच त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. आम्ही मंडळी काही वेळ तिथं थांबलो, गर्दी एवढी झाली की, त्यांच्यापर्यंत पोहोचावं आणि अभिनंदन करावं, यासाठी मलाही अवसर मिळेना. शेवटी पुन्हा निवांत भेटून अभिनंदन करावं, असा विचार करून त्या गर्दीतून वाट काढली आणि थोड्या वेळानं घरी परतलो.

तो काय! काही मिनिटांतच इंदिराजी माझ्या घरी दाखल.

मी बुचकळ्यात पडलो.

'असं काय घडलं, एवढ्या तातडीनं तुम्ही आलात?' मी इंदिराजींना उत्सुकतेनं विचारलं.

'चौहान, गर्दीत मी विसरून गेले. तुम्हांला वाढदिवसाच्या शुभेच्छा व्यक्त करण्याचं राहून गेलं.' इंदिराजींनी असं म्हणतच शुभेच्छा व्यक्त केल्या.

इंदिराजींच्या मनाच्या स्निग्धतेनं माझा वाढदिवसाचा त्या दिवशीचा आनंद द्विगुणित-शतगुणित झाला.

कराडला कृष्णामाईच्या वाळवंटात आमच्या गप्पा रंगल्या होत्या. गप्पाच त्या, विषयाला धरबंध कुठला! १९३० साल. दांडीमार्च सत्याग्रह सुरू झालेला तो काळ, गप्पांच्या ओघात दांडीमार्चही सापडला. सत्याग्रह्यांचे मोर्चे जागोजाग निघत होते. कोणीतरी म्हणालं.

'काय होणार असल्या सत्याग्रहानं ?'

आचरटपणानं पुढे जो तो बोलत राहिला होता. त्यात मीही सामील झालो, पण गंभीरपणानं.

'यातून काही चांगलं निघणार आहे...' मी त्या सत्याग्रहाबद्दल म्हणालो.

'ते कसं काय?' एकानं आचरट हावभाव करीत विचारलं.

'अरे, दांडीमार्च सत्याग्रहाची सुरूवात १२ मार्चला झाली आहे.' मी.

'बरं मग!' सर्वांची पुच्छा

'दोस्तांनो, १२ मार्चला, म्हणजे माझा वाढदिवस... त्या दिवशी काही तरी चांगलं होणारच!'

- आणि मग आम्ही सारेच त्या वाळवंटात हसता-हसता गडबडा लोळलो. 'आचरटपणाचा अगदी कहर झाला!' कुणीतरी म्हणालं.

माझा एक वाढदिवस झाला. प्रतापगडावर भवानीमातेच्या दर्शनानं भारावलेल्या मनानं, अंतकरणानं.

मी तेव्हा जंगल खात्याचा मंत्री होतो. मला वाटतं, १९५३ साल असावं, मी आणि सौ. वेणूताई महाबळेश्वरात होतो. प्रतापगडाला बऱ्याच वर्षांत गेलो नव्हतो, म्हणून त्या दिवशी जायचं ठरवलं. प्रतापगडावर जाण्यासाठी त्या वेळी मोटारचा रस्ता नव्हता. मी गड चढून जायचं ठरवलं आणि सौ.वेणूताईसाठी खुर्चीची व्यवस्था केली.

आम्ही गडावर पोहोचलो. बरोबर फारसं कुणी नव्हतं. मंदिराच्या गाभाऱ्यात गेलो आणि उभयतांनी भवानीमातेचं दर्शन घेतलं.

अतिशय शांत, पवित्र, मंगलमय असं तिथलं वातावरण.

मनासमोरून इतिहासाची पान उलगडू लागली. छत्रपती शिवरायांचं हे श्रद्धास्थान. येथून कामगिरीवर निघताना आणि परतल्यावर महाराजांनी या जगन्मातेचे कौल घेतले.

असेच आणखी किती तरी प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहिले.

# ७९... भारताची सद्यःस्थिती

भारताची राजकीय सद्यःस्थिती अनेकांना अस्वस्थ करते. तशीच ती मलाही चिंताग्रस्त करते. विशेषतः, स्वातंत्र्य-लढ्यात भाग घेतलेले किंवा त्या उत्तेजक, स्वप्नरंजक वातावरण वाढलेले नेते अस्वस्थ होतात. कारण एका भव्य स्वप्नाच्या पूर्तीसाठी झगडत असताना दिसलेली बेहोशी आता कुठे दिसत नाही. उलट, अधिकारांची व हक्कांची चर्चा सर्वत्र होते. विमानातून जाताना दिसणारे नद्या-पर्वतांचे रूप मोहक असते, पण प्रत्यक्ष त्या नद्या-पर्वतांसमोर आपण उभे राहतो, तेव्हा ते दुर्लंघ्य वाटू लागतात. वाटते की, ती मोहकता हा एक भास होता. आपले तसेच झाले आहे. १९४२ साली भारतीय क्रांतीसाठी लढत असताना काही स्वप्ने तरळत होती आणि अगदी अचानकपणे १९४७ साली आपणांला या देशाचे राज्य करण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्या वेळी स्वातंत्र्याची पहाट फुटताना नेहरू म्हणाले होते की, भारत आता नियतीची भेट घेण्यासाठी (Tryst with destiny) मुक्त झाला आहे. एक स्वप्न साकार झाले होते. दुसरे स्वप्न देशाला देण्याची गरज होती. नेहरूंनी ते दिले. ते स्वप्न आपल्या योजनांत दिसले. ज्या क्रांतीचा उद्‌घोष आपण करीत होतो, तिच्यातील प्राणतत्त्वे, तिच्यातील स्फुरणे आपल्या राज्यघटनेत समाविष्ट झाली. आंतरराष्ट्रीय जगात भारत आपल्या शांतिप्रेमावर आधारलेली तत्त्वनिष्ठ भूमिका घेऊन उभा राहिला. मला वाटते, अव्यक्त भारतीय क्रांतीची ही व्यक्त रूपे होती.

ही क्रांती शांतपणे घडत होती. त्यामुळे तिच्याकडे लोकांचे पुरेसे लक्षच गेले नाही. रक्तरंजित आर्थिक क्रांतीत दिले जाणारे मानवी प्राणांचे मूल्य आपण दिले नाही. त्यामुळे आपल्याला वाटते आहे की, या देशात क्रांतीच सुरू झालेली आहे.

पण त्या दिवशी आपण अस्पृश्यतेला घटनेत मूठमाती दिली, स्त्रियांना मताधिकार दिला, सामाजिक क्रांतीचे नवे पर्व सुरू झाले. आपण कामगारांना न्याय देणारे अनेक कायदे केले. त्या दिवशी आपल्या आर्थिक न्याय देणाऱ्या उद्दिष्टांची पूर्ती करण्यास आपण प्रारंभ केला, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती,

सामूहिक विकास केंद्रे यांच्या द्वारे ग्रामीण क्रांतीची पायभरणी केली. विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या प्रयोगशाळा काढल्या, नवे, अवजड उद्योगाचे कारखाने निघाले, देश संरक्षणक्षम करण्यासाठी संरक्षक साधनांचे कारखाने सुरू केले. ही सगळी भारतातील नव्या वैज्ञानिक युगाची नांदी होती; पण दुर्दैव असे आहे की, परदेशांत घडलेल्या क्रांतीच्या उदाहरणांनी आम्ही इतके भारावून गेलो होतो की, आम्ही आमच्या देशात सुरू केलेली क्रांती यशस्वी होण्यासाठी, ती राबविण्यासाठी पुरेसा उत्साह दाखविला नाही. याचा अर्थ गेल्या वीस वर्षांत घडले, ते सारे बरोबर होते. चुकाच झाल्या नाहीत, असे मुळीच नाही. पण आज दिसणारे वैफल्य हे केवळ आपल्या अपेक्षाभंगातून निर्माण झालेले नसून, जे सभोवताली घडते आहे, ते आपण समजावून न घेतल्यामुळे आले आहे. त्यामुळे परिस्थिती अगदी निराशाजनक वाटते आणि समाजात दोषदर्शी प्रवृत्तीच वाढत जातात. एखादी योजना आपण आखतो, ती पार पाडू लागतो, त्या वेळी तिच्या सामाजिक, आर्थिक परिणामांची समग्र जाणीव अनेकदा आपल्यास होत नाही. जसजसे आपण त्या मार्गाने पुढे जातो, तसतसे आपणांस नवे प्रश्न दिसू लागतात. उदाहरणच द्यावयाचे झाले, तर शिक्षणाचे देता येईल. शिक्षणाचा अनिर्बंध प्रसार व्हावा, अशा मताचा मी होतो; आणि आजही आहे. शेकडो वर्षे निरक्षरतेच्या, अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या भारताला विज्ञानाचा प्रकाश लवकर दिसावा, ही त्यामागची तळमळ होती. ही विज्ञानाची कवाडे उघडली, प्रकाश आला, आणि त्यामुळे नवा, तंत्रज्ञांचा वर्ग निर्माण झाला. त्यातूनच बेकार तंत्रज्ञांची व शिक्षितांची समस्या आज आपल्यापुढे उभी आहे. एखाद्या वर्गाला पुढचे भवितव्य स्पष्ट दिसले नाही, की तो अस्वस्थ होतो. काही तरी नवा मार्ग शोधतो. शासन अशा वर्गाबाबत थंड व उदासीन राहिले, तर त्या वर्गाच्या असंतोषाला राजकीय स्वरूप येते. हा राजकीय असंतोष एका शैक्षणिक धोरणातून निर्माण झालेला आहे, असे लक्षात येते. समाजातील तंग परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे निर्माण होते. मी फक्त एकच उदाहरण दिले. तेव्हा दुसऱ्या दृष्टीने पाहिले, तर ही प्रगती नाही का ? तंत्रज्ञांची टंचाई असलेल्या या देशात त्यांची संख्या वाढावी, हे सुचिन्ह नाही काय?

दुसरे उदाहरण लोकशाहीतील राजकीय क्रांतीचे घेता येईल. आपण प्रौढ मतदानाचा अधिकार दिला. हा अधिकार देऊ नये, असे काही घटनापंडितांचे मत होते. यामुळे लोकशाही ही झुंडशाही होईल, असे त्यांना भय वाटत होते.

तरीही गांधीजींनी प्रौढमताधिकाराचा आग्रह धरला. कारण आता जर हा अधिकार दिला नाही, तर तो गरिबांना मिळावयास अनेक वर्षे झगडा करावा लागेल, असे त्यांचे मत होते. ज्या वर्गाच्या हातांत मर्यादित मतदानाने सत्ता जाईल, तो वर्ग ती सत्ता दलितांच्या हाती जाऊ देणार नाही. त्यासाठी डावपेचांचे राजकारण करीत राहील. या प्रौढमतदानाने आमचे भारतीय लोकशाहीचे प्रचंड स्वरूप आपण पाहत आहोत. त्यामुळे काही समस्या निर्माण झाल्या आहेत. हे खरे; पण ती एक फार मोठी राजकीय क्रांती आपण केली आहे, असे का आपण मानीत नाही?

मला वाटते, भारतातील क्रांतीमुळे निर्माण झालेल्या नव्या शक्तींचा आपण पुरेसा अभ्यासच केलेला नाही. त्याबाबत आपण उदासीन राहिलो आहोत. आपल्या देशात सत्तांतर शांततापूर्व झाले, ही एक अभूतपर्व घटना होती. तसेच, ही क्रांतीही अपूर्व आहे, असे आपण मानले नाही. क्रांती आता सुव्यवस्थित व फलदायी करावयाची, असे आपल्याला वाटतच नाही. क्रांतीच्या स्वप्नरंजक तत्त्वज्ञानात वावरणाऱ्यांना या क्रांतीचे महत्त्वच पटले नाही. झालेली क्रांती पूर्ण आहे, असे कोणीच मानत नाही. पण ती विधायक दृष्टीने राबवून शेवटच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न अपुरे पडले. मला वाटते, आता हे औदासीन्य टाकून दिले पाहिजे, क्रांती पुरे करण्यासाठी पुरोगामी शक्तींनी काही नवे आग्रह धरले पाहिजेत. रूसून किंवा चिडून हे घडणार नाही. आजचे सारे वैफल्य या आपल्या उदासीनतेतून आले आहे. आजचे राजकारण समाजापासून दूर जात आहे. याचे कारणही हेच आहे. दिल्लीत मला दिसते, ते असे की, कोणताही पक्ष हे लोककारण करीत नाही. त्यांच्या राजकीय चळवळी डावपेचाच्या स्वरूपाच्या झाल्या आहेत. त्यामुळे त्यांत सातत्य नाही. नव्या शक्ती उदयास येत नाहीत. नवे नेतृत्व दिसत नाही. या देशाचे राजकारण अद्यापि जुन्या घोषणांवर, जुन्या पूर्वग्रहांवर आधारलेले आहे. गेल्या वीस वर्षांत काय घडले आहे, याचा ताळेबंद तयार न करता, नेमके आजचे लोकांचे प्रश्न काय आहेत, त्यांचा लोकांत जाऊन अभ्यास न करता काँग्रेसच्या नेतृत्वाविषयीचे जुने आकस विविध पक्षांच्या धोरणांवर प्रभाव पाडीत आहेत. असे नकारात्मक राजकारण फार काळ चालू राहिले, तर नवी पिढी आणि जुने नेते यांच्यांतील अंतर झपाट्याने वाढेल. नवी पिढी दिशाहीन होईल आणि त्यातून नवा राजकीय पेचप्रसंग उद्‌भवेल.

दुसरी एक समस्या गेली काही वर्षे लोकांना अस्वस्थ करीत आहे. ती म्हणजे

प्रादेशिक राजकारणाची. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्यात दिसलेली एकात्मता एका समान शत्रूविरूद्ध केलेल्या युद्धातून निर्माण झालेली होती. बाहेरच्या शत्रूविरूद्ध युद्ध करताना एकत्रित होणे कठीण नसते. स्वातंत्र्यकाळातही १९६२ नि १९६५ साली या एकतेचा अनुभव आपण घेतला. स्वातंत्र्याची पहिली सतरा वर्षे नेहरूंचे नेतृत्व होते. त्यामुळे आपल्या प्रादेशिक, भाषिक व जातीय तंट्यांतून मार्ग काढण्यासाठी त्यांचा उपयोग होई. शिवाय एकपक्षीय सरकारे सर्वत्र होती. त्यामुळे आपल्यांतील मतभेद मिटविण्याचे संसदीय किंवा घटनात्मक मार्ग फारसे अवलंबावे लागले नाहीत.

पंडितजी गेल्यावर आणि १९६७ च्या निवडणुकी पार पडल्यावर जे राजकीय चित्र दिसले, ते अगदी वेगळे होते. म्हणजे आपल्या परिचयाचे नव्हे, एक प्रकारे राजकीय व सामाजिक स्फोटांचा (Social explosion) हा काळ आहे. आपल्यांतील मतभेद वर आलेले आणि पूर्वीचे भारतीय नेतृत्व गेलेले, अशा या काळात वावरताना स्वाभाविकच बावरल्यासारखे होते. आपल्या मनात विभूतिमत्त्वाची, पुरूषावताराची कल्पना कोठे तरी घर करून बसली आहे. त्यामुळे राजकीय नेतृत्वाकडे या दृष्टीने आपण पाहतो. ते साफ चूक आहे.

मला वाटते की, राजकारण आणि राजकीय नेतृत्व हा लोकव्यवहार आहे. त्यात सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा ही चालणार आहे. प्रभावी पुढारी आपल्या विचारसरणीचे, आपल्या कार्यक्रमाचा आग्रह धरणारे गट करणार, हेही आता उघड आहे. सत्ता मिळविणे किंवा तिची अभिलाषा धरणे म्हणजे काही तरी पाप आहे, असे मानणारे लोक राजकारण करू शकणार नाहीत. कोणता तरी गट अचडणीत सापडला. की दुसरा गट पुढे येणार, सत्तासंक्रमण हे आता असेच होत राहणार. म्हणून गटबाजीचे राजकारण, इत्यादी शब्द छद्मी अर्थाने आपण वापरतो. ते आता सोडून द्यावे लागेल. जगात सर्वत्र असेच चालले आहे. भारतातही त्याला अपवाद आढळणार नाही. अर्थात वैयक्तिक हेव्यादाव्यासाठी उभारलेले गट निंद्य व त्याज्यच समजावे लागतील.

दुसरा मुद्दा प्रादेशिक नेतृत्व आणि राष्ट्रीय नेतृत्व यांच्या निर्मितीचा आहे. राजकारणाचा पहिला संबंध एवढ्या प्रचंड देशात एकदम अखिल भारतीय पातळीवर येणे कठीण असते. म्हणून गाव, तालुका, जिल्हा, राज्य या ठिकाणी माणसे राजकारणात भाग घेऊ लागतील आणि तेथूनच ती वर जातील. मी स्वतः राजकारणात पडलो. तो स्थानिक पातळीवरच, कल्पनाही नसताना मला

राष्ट्रीय पातळीवर यावे लागले. तसेच आता होत राहील.

राष्ट्रीय नेतृत्व आता प्रदेशांतून चांगली माणसे आणून रूजवावे लागेल. विद्यमान कर्तृत्ववान नेत्यांपैकीच कोणाला तरी पुढे करून ते भारतीय सामूहिक नेतृत्व निर्माण केले जाईल. म्हणून गांधी-नेहरूंच्या काळातील राष्ट्रीय नेतृत्वाच्या कल्पना आता आपल्याला बदलाव्या लागतील.

प्रादेशिक राजकारणाचेही तसेच आहे. प्रादेशिक राजकारण अधिक लोकाभिमुख करावे लागेल. तेथे तपशिलाच्या अनेक प्रश्नांवर लोकमत प्रभावी करून सामाजिक, आर्थिक प्रश्न राज्य-पातळीवर सोडवावे लागतील. राष्ट्रीय उद्दिष्टांची समानता मान्य करूनही, शेवटी सत्तेचा पाया हा प्रादेशिक राजकारणात राहणार, हे उघड आहे. म्हणून तेथे पुरोगामी शक्ती व नेतृत्व संघटित केली पाहिजेत. राष्ट्रीय उद्दिष्टांवर एकमत असणारे राजकीय नेतृत्व (Politics of consensus) प्रादेशिक पातळीवर यशस्वी होईलच, असे नाही.

आपले राज्य हे खऱ्या अर्थाने संघराज्य होणार, हे स्पष्ट आहे. तसे होत गेले, तर आर्थिक, सामाजिक परिवर्तनाची क्रियात्मक पातळी (Operative level) ही राज्यातच राहील. अर्थात फुटीर प्रवृत्ती माजू नयेत, म्हणून काही संहिता ठरवावी लागेल. पण तसेच घडणे कठीण नाही. अगदी अलीकडची दोन उदाहरणे घेऊ, राष्ट्रीय एकात्मता परिषदेत जेव्हा राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा झाली, तेव्हा अनेक प्रश्नांवर विविध पक्षांचे एकमत झाले. दुसरे उदाहरण राष्ट्रीय विकास मंडळाच्या सभासदांत नियोजनातील विकास-खर्चावर झालेल्या चर्चेचे देता येईल. प्रत्येक प्रदेशालाच अधिक पैसा हवा आहे. प्रत्येकाला विकासाची ओढ आहे. पण राष्ट्रीय संकल्प आणि राष्ट्रीय तत्त्वे ही विचारात घेतली पाहिजेत, त्यासाठी काही तत्त्वसूची तयार केली पाहिजे, हेही सर्व राज्यांना-काँग्रेसेतर सरकारांनाही - पटले आहे. त्याचाच प्रत्यय राष्ट्रीय विकास मंडळात आला.

सारांश, अविवेकी, आत्मकेंद्रित प्रदेशनिष्ठा कोणत्याही प्रदेशाने जोपासली, तर तो प्रदेश एकाकी पडेल, हे आता अगदी उग्र प्रादेशिक निष्ठा असणाऱ्यांनाही कळून चुकले आहे. प्रादेशिकता व एकराष्ट्रीयत्व यांच्यांतील तोल सांभाळणे ही व्यवहार्य राष्ट्रीयता आहे.

ही सगळी परिस्थिती समजावून घेऊन आपली धोरणे आखली पाहिजेत. त्यासाठी आपली विचारांची जुनी पठडी बदलली पाहिजे. विविध प्रश्नांतून

उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीला आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे.

मला वाटते, आपण समस्यांनी उत्तेजित (Excite) व उद्विग्न होतो. पण मनुष्य जोपर्यंत सुधारणेसाठी झगडतो आहे तोपर्यंत प्रश्न हे राहणारच. ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणे हे राज्यकर्त्यांचे काम आहे. जगातील कोणत्याही प्रगत वा अप्रगत देशापुढे आज समस्या नाहीत, असे झालेले नाही. भारत तर एका अभूतपूर्व प्रयोगात गुंतला आहे. अनेक संकटे कोसळत आहेत. नवीन समस्या पुढे येत आहेत. पण वांछित नियतीसाठी झुंज देण्यातच खरा पुरूषार्थ आहे.

## ८०... जीवनाचे पंचामृत

राजकारणप्रधान राष्ट्रप्रपंच सुरू केला, त्याला जीवनाच्या या सातव्या दशकात, अर्धशतक पूर्ण होत आहे. पुरोगामी विचाराचे आणि आचाराचे बोट धरून आयुष्यातील साठ वर्षे वाटचाल सुरू राहिली. साठ वर्षे मागे सारून पुढची वाटचाल सुरू झाली. देशाला सुखी करण्याच्या शिखराकडे नेणारी वाट आक्रमीत राहिलो, याचे मागे वळून पाहिले, म्हणजे समाधान वाटते. एकमेकांच्या साथीने मार्ग चालत राहिलो आणि पुढचा पल्लाही साथीदारांसमवेतच गाठावयाचा आहे.

संपूर्ण जीवनाला काही अर्थ असू शकतो का, असा प्रश्न आयुष्य मागे टाकताना अनेकदा मनात आला. 'जीवनाचा अर्थ' शोधण्यात वर्षामागून वर्षे गेली सारीपटावर अनेक अर्थ उद्‌भवले, चमकले आणि अंतर्धान पावले. जीवनाचा शोध मात्र संपला नाही. या शोधकाळात अनेकविध अनुभवांची, अवस्थाभेदांची संख्या वाढली, संख्या वाढली; परंतु संपन्नता वाढल्याची साक्ष अंतर्मनात उमटत राहिली नाही. ती तेव्हाच उमटली - आणि मला वाटते, उमटते - की जेव्हा अनुभवात संग्रह, संबद्धता, विशालता, समन्वय, संगती, आदींची गुणवत्ता वाढत राहते. संपन्नतेची, मन मोठे बनल्याची साक्ष तेव्हाच उमटते.

जीवनाची धडपड ही काहीतरी प्राप्त करण्यासाठी असते. माणूस हा काही तत्त्व, ध्येय, अर्थ जीवनाला जोडत असतो. ते प्राप्त करण्यासाठी जीवन धडपडत असते. ती तत्त्वे, ध्येय, अर्थ या सर्वांचे महत्त्व अशासाठी असते, की त्यांची जीवनावर काही प्रतिक्रिया निर्माण होत असते.

माझ्या पिढीतल्या तरूणांसमोर, लोकांसमोर स्वातंत्र्यप्राप्ती, देशाचं स्वातंत्र्य हे ध्येय होतं. देश, देशातील लोक, त्यांचं जीवन आणि त्यांच्यासमोरची संकटं यांचा विचार करावयाचा, तो विधायक दृष्टिकोन ठेवूनच करावयाचा, याची खूणगाठ ऐन तारूण्यात असतानाच मनात पक्की झाली, ध्येयासाठी झपाटून जाण्याचाच तो काळ होता. त्याचाही तो परिणाम असू शकेल. आमची पिढी

विधायक दृष्टिकोनाने बांधली गेली. ही वस्तुस्थिती होती.

राष्ट्राच्या जीवनात एकामागून एक संकटे निर्माण होत होती. व्यक्तिगत जीवनातही संकटे कोसळली. अशा वेळी विचाराने दृढ आणि कृतीने स्थिर राहूनच त्यांतून पार व्हावे लागले. साथीदारांना पार करावे लागले. सुखाचा क्षण असो अगर दुःखाचा, संकटाचा असो, साथीदारांचे बोट धरून ठेवलेच पाहिजे. सुखाच्या वेळी एकत्र यायचे आणि संकटाच्या वेळी बोट सोडून, दिसेल त्या मार्गाने निसटून जायचे, अशी त्या पिढीची प्रवृत्ती नव्हती. माझ्या साठ-सत्तर वर्षांच्या जीवनाचा ताळेबंद जेव्हा मी मांडतो, तेव्हा विधायक दृष्टिकोन, विधायक प्रवृत्ती ही माझ्या आयुष्यातील जमेची बाजू प्रकर्षाने जाणवते, देशासाठी, देशातील लोकांसाठी काही करू शकलो, तो या विधायकतेचा परिणाम असावा. ध्येयाची, तत्त्वाची, अर्थाची जीवनावर प्रतिक्रिया निर्माण होत असते, असे आपण म्हणतो, त्याचा अर्थ, माझ्या समजुतीने, विधायक प्रवृत्तीने जीवन भारले जाणे, हाच असला पाहिजे.

संपूर्ण जीवनाला काही अर्थ असू शकतो का, असा प्रश्न मनात अनेकदा आला. परंतु त्या प्रत्येक वेळी मी त्यासंबंधी मीमांसा करू शकलो नाही. तो प्रश्न उद्‌भवत राहिला. त्याला तसा परिस्थितीचा संदर्भ असण्याचीही शक्यता आहे.

देवराष्ट्र हे माझे जन्मगाव आणि आजोळ, आमचं घर हे गावातल्या सामान्य शेतकऱ्याचं घर होतं. खेड्यात राहणाऱ्या लहान आणि गरीब घरांतील मुलांच्याप्रमाणेच माझे लहानपण जात होते. अडीअडचणी, गरिबी, कष्ट आणि नागवणूक यालाच जीवन असे म्हणत असत. घरची गरिबी होती. लहानपणीच मला पितृप्रेमाला वंचित व्हावे लागले. आईनं आम्हां मुलांना जगविण्यासाठी, वाढविण्यासाठी काबाडकष्ट उपसले, हे सर्व खरं, परंतु आमच्या घरानं गरिबीचं कधी भांडवल केलं नाही. आईला एकटीला, एकाकी पद्धतीने सारे करावे लागत होते. तरीपण संकटकालीन परिस्थितीला ती शरण गेल्याचे स्मरत नाही. सातत्याने ती सामोरी जात राहिली.

माझी आई शिकलेली नव्हती. परिस्थिती गरिबीची होती. परंतु मनानं, संस्कारानं ती श्रीमंत होती देवावर तिची अखंड निष्ठा होती. संकटाला ती शरण गेली नाही, त्याचं हे एक प्रमुख कारण असलं पाहिजे, आईनं मला गरिबीत वाढवलं, परंतु आपल्या मनाची, संस्कारांची संपूर्ण श्रीमंती तिनं मला दिली. मी माझं जीवन विचारी, कृतिशील आणि त्या अर्थानं संपन्न बनवू शकलो, ते

आईनं रूजविलेल्या संस्कारांमुळे होय, अशी माझी नम्र भावना आहे. मन विधायक प्रवृत्तीनं भारलं गेलं, ही देणगीही त्या संस्कारांचीच.

वैयक्तिक जीवनातून समाजजीवनात, लोकजीवनात आणि कालांतराने लोकसत्ताक जीवनात माझे पदार्पण होत राहिले, तेव्हा जीवनाचा अर्थ जीवनाव्यतिरिक्त दुसरा नसावा, असे प्रतीत होऊ लागले. जीवन हाच जीवनाचा अर्थ. वैयक्तिक जीवन हेच त्याचे ध्येय. लोकसत्ताक जीवनाचा अर्थही वैयक्तिक जीवन असाच करावा लागतो.

लोकसत्ताक जीवन म्हणजे राष्ट्रीय जीवन, या जीवनात प्रत्येक व्यक्ती ही सत्तेचे श्रेष्ठ केंद्र मानलेले आहे. राष्ट्राची म्हणून जी काही सत्ता असते, त्या सत्तेचा उगम मानवातून होतो. माणूसच या सत्तेचा उत्कर्ष साध्य करू शकतो आणि या सत्ताशक्तीचा उच्छेदही माणूसच करू शकतो. व्यक्तीचा, समाजाचा, राष्ट्राचा उत्कर्ष साधणारी आणि उच्छेद करणारी शक्ती मानवमात्र हीच असते. लोकसत्ताक जीवन आणि वैयक्तिक जीवन यांतील भेद ज्याला उमजेल, त्याला, मला वाटते, विधायक प्रवृत्ती म्हणजे काय, हे उमजण्यास अडचण पडू नये.

लोकसत्ता म्हणजे लोकांची सत्ता, अशा शब्दशः अर्थ असला, तरी लोकसत्तेचा खरा अर्थ व्यक्तिमात्राची स्वतःवरील पूर्ण सत्ता, प्रत्येक व्यक्तीचे स्वतःपुरते संपूर्ण स्वातंत्र्य, असाच करावयास पाहिजे. अनेकांची एकावरील सत्ता म्हणजे लोकसत्ता नव्हे, भारतीय लोकराज्यात, येथील लोकशाहीत, प्रत्येक व्यक्ती हीच श्रेष्ठ सत्तेचे केंद्र, संपूर्ण स्वातंत्र्याचा अधिकार-बिंदू राहिला, असेच अभिप्रेत आहे. लोकशाही म्हणजे समूहशाही किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य रसातळाला नेणारी कंपूशाही नव्हे, याची जाण ठेवावीच लागते. तशी ती ठेवली पाहिजे.

समूहशाहीचा, कंपूशाहीचा अहंकार आपल्या जीवनात निर्माण होऊ नये, यासाठी लोकशाहीतील प्रत्येक व्यक्तीने सावध राहिले पाहिजे, सावधानता राखलीच पाहिजे, आणि हे शक्य आहे. लोकशाही किंवा सामुदायिक सत्ता याचा अर्थ अनेकनिष्ठ एकात्मता, असाच मी तरी करतो. जनतेची, सगुणाची उपासना मला त्यामुळेच करता आली.

देश सर्वतोपरी सुखी राहील, असे वर्तन प्रत्येक व्यक्तिमात्राने करणे म्हणजेच मी उपासना मानतो, देशसेवा म्हणजे तरी काय? देशाची, देशातील

लोकांची सेवा, तीच उपासना. देशाची - आणि म्हटले, तर देवाचीही. देश आणि देव यांत काहीच अंतर नसते. अंतर मानावयाचेही नसते. महाराष्ट्रातील संतांची, राष्ट्रसंतांची ही शिकवण बालपणापासून माझ्यासमोर आहे. आपल्या सभोवताली समाज आणि देव यांत माझ्या आईने कधी अंतर निर्माण होऊ दिले नाही, हे मी लहानपणी अनुभवलेले आहे. ही शिकवण जेथे मिळते, त्याच मातीत मी जन्मलो आणि वाढलो, माझा व्यक्तिगत प्रपंच आणि राष्ट्रप्रपंचही तिथेच सुरू झाला.

मी प्रांपचिक आहे आणि राजकारणीही आहे. 'प्रपंचीं जाणे राजकारण' ही सज्जनगडची शिकवण समोर राहिल्याने राजकारणाशिवाय केलेला प्रपंच हा खरा प्रपंच नव्हेच, असे मी मानले, ती शिकवण माझ्या ठिकाणी नित्य जागृत राहिली. जिवंत राहिली. ती जिवंत आहे, तोपर्यंत देशसेवेचे, सगुण उपासनेचे बोट धरूनच माझी वाटचाल होत राहणार, हे निःसंशय यातून काही व्यक्तिगत तोटा होईल, झालाही असेल, टीका ऐकावी लागेल, तशी ऐकलीही.

परंतु व्यक्तिगत प्रपंचात आणि राजकारणाच्या प्रपंचात पाळावयाची पथ्ये तशी वेगळी असतात. राजकारणाचा प्रपंच करताना दुसऱ्याचं अंतःकरण जाणावं लागतं. अडचणीत न सापडण्याची खबरदारी घ्यावी लागते. समय ओळखावा लागतो. प्रसंगी नम्र व्हावे लागते. लोकांची पारख करावी लागते. प्रामाणिक आणि फितूर, दोन्ही गृहीत धरावी लागतात. दोष आढळला, तर तो अवगुण मानावा लागतो. वेळप्रसंगी त्याकडे काणाडोळा करावा लागतो. विरोधकांशी त्यांच्याच शस्त्राने लढावे लागते. तसे करणे कित्येकदा आवश्यकच असते. दूरदर्शीपणाने काही कयास बांधावे लागतात आणि पुन्हा सर्वांना बरोबर घेऊन पुढे जावे लागते.

देशाचे, देशातील लोकांचे सुख समोर ठेवून यथाशक्ति, यथामति आचरण करण्यावर गेली पाच-सहा दशके माझा कटाक्ष राहिला. हा कटाक्ष सांभाळूनच राजकारणात, कार्यकर्त्यांना, साथीदारांना आवश्यक असे मार्गदर्शन - उपदेश म्हणा, हवं तर - करण्याचं महत्त्वाचं काम प्रामणिकपणाने केले.

हे सारे घडले, पण हे कसे आणि कशामुळे घडले, याचा मी विचार करतो, तेव्हा विचाराशी येऊनच थांबावे लागते. विचाराने माझ्याशी किंवा मी विचाराशी जी अहर्निश सोबत केली, त्याचे हे फल मानले पाहिजे.

विचार म्हणजे वाचनाने, अध्ययनाने, व्यासंगाने मेंदूत साठविलेले विचार,

असे बहुतांशी मानतात, विचाराची मी सोबत केली, मेंदूत साठविण्याचा प्रयत्न केला, हे सत्य असले, तरी मला जी फलप्राप्ती होऊ शकली, ती केवळ विचाराची अहर्निश सोबत ठेवल्यामुळेच प्रामुख्याने मिळाली, असे मी मानत नाही. तसे पाहिले, तर वाचनाने, अध्ययनाने, व्यासंगाने विचारवंत बनलेले पुष्कळ असू शकतात. मर्यादित प्रमाणात त्याची फलप्राप्तीही त्यांना झालेली असेल. परंतु काही विचारवंतांच्या बाबतीत असेही आढळते की, विशाल विचार, विधायक विचार मेंदूत जमा झालेले आहेत, परंतु त्यांची हृदयाशी ताटातूट झालेली कायमच आहे ! वास्तवात ते अवतरत नाहीत किंवा अवतरलेले नाहीत.

मला वाटते, विशाल आणि विधायक विचाराची स्वप्ने साकार करावयाची, प्रत्यक्ष कृतीने दर्शवायची, तर त्यासाठी आणखी काही आत्मसात करावे लागत असावे. ज्यांनी ही स्वप्ने साकार केली, प्रत्यक्ष कृती केली, त्यांनी आपले विचार मेंदूत अडकवून ठेवले नाहीत. ते रक्तात भिनविले. देशाला स्वतंत्र करण्याचे विचार पूर्वीच्या पिढीने रक्तात भिनविले, म्हणूनच त्यांच्याकडून विधायक कृती घडली असली पाहिजे, क्रांतिकारकांनी इतिहास घडविला, तो त्यांचे रक्त तापलेले होते, असे आपण म्हणतो, याचा खरा अर्थ, त्या तरूणांनी देशाच्या स्वातंत्र्याचे विचार रक्तात भिनविले होते, असाच केला पाहिजे देश सर्वार्थाने सुखी बनविण्याचा विचार स्वातंत्र्योत्तर नव्या पिढीने असा रक्तात भिनविला, तर नव्या पिढीकडून विधायक कार्य घडू शकेल, यावर माझा विश्वास आहे.

समाजातील मूलगामी अशा काही प्रश्नांचा नवीन पिढीला विचार करावा लागणार आहे. काही आव्हाने स्वीकारावी लागणार आहेत. ती आव्हाने देशातील गरीब, दरिद्री समाजाबद्दलची असतील, माणसांच्या मूलभूत गरजांसंबंधी असतील, निर्धन बहुजन समाज, छोटे शेतकरी, औद्योगिक कामगारांच्या संबंधांतील असतील, समाजपरिवर्तनाची, जातीयवादाच्या समस्येची असतील, अल्पसंख्य समाजाची, उपेक्षित समाजाची, अस्पृश्यतेची, चातुर्वर्ण्याची, भटक्या -विमुक्तांची असतील या आणि प्रादेशिक वाद, विभक्ततावाद अशा देशासमोरील काही गंभीर समस्यांचा विचार आता नव्या पिढीला, तरूण पिढीलाच करावा लागणार आहे. नव्या पिढीने हा विचार केला आणि रक्तात भिनविला, तरच देशाचे, देशातील समाजाचे चित्र ही पिढी दुरूस्त करू शकेल, बदलू शकेल.

देश सुखी करावयाचा, तर देशाने स्वीकारलेल्या सामाजिक, राजकीय, राष्ट्र-विकासाच्या कार्यात सर्वांना समान पातळीवर, सहकाऱ्यांच्या नात्याने

सामील करून घेणे आणि त्यासाठी वर उल्लेखिलेल्या सर्वांच्या मनात विश्वास निर्माण करणे हे मूलभूत राष्ट्रकार्य स्वातंत्र्योत्तर काळातील पिढीसमोर, आव्हानरूपाने उभे आहे.

या कामाला वाहून घेण्यासाठी, हजारो, नव्हे, लाखोंच्या संख्येने तरूणांना झेप घ्यावी लागेल. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वस्व गमावलेले जपान, जर्मनी देश राखेतून उभे राहिले आणि त्यांनी उद्योग, व्यापार, अर्थव्यवस्था, जीवनमान, संशोधन, आदी क्षेत्रांत आघाडी प्रस्थापित केली. इतकेच नव्हे, तर जगासमोर एक आगळे आव्हान घेऊन ते उभे राहिले. अशी वस्तुस्थिती सांगितली जाते. हे कोणी घडविले? युद्धोत्तर काळातील तेथील नव्या पिढीने हा कायापालट घडविला आहे, याचे भान देशातील आजच्या आणि उद्याच्या पिढीला ठेवावेच लागेल.

क्रांतीचा विचार असो व शांतीचा, तो रक्तापर्यंत पोहोचवावाच लागतो, तरच तो जीवनाला ऊब आणतो. विधायक विचाराचे बी रक्तात भिजत घातले, रूजवले, तरच त्याला कोंब फुटतात आणि कालांतराने फळ धरते, अशी इतिहासाची साक्ष आहे.

देश स्वतंत्र होण्यासाठी, देशातील सर्व लोकांनी सुखी बनावे, यासाठी काहीतरी करावे, असे विचार, माझ्या लहानपणी मेंदूत शिरले, ते त्या वेळेच्या वाचनामुळे, अभ्यासूंचे, श्रेष्ठ नेत्यांचे विचार ऐकल्यामुळे. त्यातून कामाचा वसा मी घेतला. काम करता-करता मेंदूतील विचार हृदयात उतरू लागले. हळूहळू ते विचार हृदयात स्थिर झाले. देशाच्या, समाजाच्या कामासाठी मी अनेकांशी बोलत होतो आणि प्राप्त परिस्थितीत विचारही करीत होतो. काही वेळेस मनात विचारांचा झगडा उभा राहत होता, तर कधी कधी विकाराचा झगडा मनाला सतावीत होता.

परंतु पुढे-पुढे बोलून विचार करावा, यापेक्षाही विचार करूनच बोलावे, असा मनाचा पिंड बनला. मेंदूतील विचारांचा नकळत हृदयाशी मिलाप होऊ लागला, विचार रक्तात पसरण्याची प्रक्रिया त्यातूनच सुरू झाली असली पाहिजे. विचार, उच्चार आणि आचार यांची संगती हे त्या प्रक्रियेतून निर्माण झालेले सहजस्वरूप म्हणावे लागेल.

माझ्या जिल्ह्यात - सातारा जिल्ह्यात मी देशासाठी, समाजासाठी काम सुरू केल्यानंतर कालांतराने लोक मला नेता समजू लागले, म्हणू लागले.

त्या वेळी मात्र नेता या शब्दाने माझ्यासमोर भलेमोठे प्रश्नचिन्ह उभे केले. नेता, नेतृत्व हे शब्द आजकाल बरेच घसरडे झाले आहेत. चेष्टाविषय बनले आहेत. परंतु नेता, नेतृत्व हे शब्द माझ्या बाबतीत उच्चारण्यास प्रारंभ झाला, या प्रारंभीच्या काळापासून माझ्या विचारचक्राला एक वेगळी गती मिळत राहिली. नेतृत्वाचा अर्थ काय? खरा नेता कोण? नेत्याचे आणि नेतृत्वाचे स्थान आणि भान कोणते? असे अनेक प्रश्न मनात गर्दी करू लागले. पुढे स्वातंत्र्यपूर्वकाळातील नेता आणि नेतृत्व व स्वातंत्र्योत्तर लोकशाही जमान्यातील नेता आणि नेतृत्व यांतील फरक तीव्रतेने जाणवू लागला.

खरे म्हणजे, लोकांना योग्य तऱ्हेने, योग्य ठिकाणी नेतो, तो नेता. उदात्त उदाहरण घालून देणे, प्रगल्भ प्रात्यक्षिक निर्माण करणे म्हणजे नेतृत्व करणे होय. कोणत्याही समस्येत नेता हा अग्रभागी असावा लागतो. त्याला सर्वांच्या पुढे राहावे लागते. समस्या निर्माण करण्यासाठी आणि निर्माण झाल्यावर, सर्वांच्या अगोदर त्याला तेथे पोहोचावे लागते. पोहोचल्यावर अखेरपर्यंत थांबावे लागते. नेता असणाऱ्याला, नेतृत्व करणाऱ्याला सर्वांच्या अग्रभागी, शिरोभागी राहावे लागते, पण ते श्रेणीने - सर्वांच्या शिरोभागी म्हणजे प्रत्यक्ष डोक्यावर नव्हे, तसा तो डोक्यावर बसून राहिला, तर त्याला ज्यांचे नेतृत्व करावयाचे आहे, त्यांच्या भावना, आशा-आकांक्षा स्वभावातःच तो पायदळी तुडवू लागतो, असे घडले, म्हणजे त्या नेत्याबद्दलचा, नेतृत्वाबद्दलचा आदर संपुष्टात येतो, इतकेच नव्हे, तर ते नेतृत्वही संपुष्टात येते. ज्याला नेतृत्व करावयाचे आहे, त्याने अशी काही पथ्ये पाळली पाहिजेत.

लोकशाहीच्या जमान्यात नेतृत्व करणाऱ्या नेत्याने लोकशाही म्हणजे एक लोकसंस्था आहे, याचा विसर पडू देऊ नये. लोकशाहीत जो नेता लोकांशी निरंतरचा संलग्न राहून लोकांचा आणि स्वतःचा आत्मविश्वास वाढवितो, त्यालाच लोक आराध्यदैवत मानतात. लोक, लोकसंस्था आणि नेता यांच्यांत खरेखुरे तादात्म्य नांदले, तर नेत्याच्या शब्दाला ब्रह्मवाक्याचे रूप प्राप्त होते. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, स्वा. सावरकर, महात्मा फुले हे या श्रेणीचे नेते होऊन गेले.

या नेत्यांनी लोकनेतृत्व तर केलेच, त्याचबरोबर नेता हा नीतिमान असावा लागतो, तसा तो असलाच पाहिजे, हा आदर्शही त्यांनी प्रत्यक्ष आचरणाने देशासमोर, जगासमोर ठेवला. हा आदर्श स्वीकारावाच लागतो. मी तरी, माझ्या आयुष्यात सद्‌गुणाचे हे कण वेचण्याचा आणि साठविण्याचा प्रयत्न

केला. देश, देशातील लोक, लोकशाही यांवरील माझी श्रद्धा दृढमूल बनली, ती त्यामुळेच.

श्रद्धा ही एक शक्ती आहे. सत्य धारण करते, ती श्रद्धा. सत्याचा पाठपुरावा हा त्या अर्थाने श्रद्धेचाच पाठपुरावा असतो. अढळ आणि निस्सीम श्रद्धा सत्याच्या आचरणातून, तशा आचरणामुळेच वाढते आणि स्थिर बनते. अढळ आणि निस्सीम श्रद्धा मानवाला सर्वस्वाचा स्वाहाकार आनंदाने करण्यास सिद्ध बनवते. स्वातंत्र्याविषयीची श्रद्धा ज्यांनी जोपासली, त्यांच्या सर्वस्वाच्या स्वाहाकाराची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. इतिहासाने त्यांची नोंद घेतलेली आहे.

माझ्या व्यक्तिगत, सार्वजनिक आणि राजकीय जीवनात संघर्षाचे, श्रद्धा दोलायमान करणारे, जीवननिष्ठा दोलायमान करणारे प्रसंग निर्माण झाले. घटना शिजल्या. त्या प्रत्येक वेळी जीवननिष्ठा आणि श्रद्धा अधिक मजबूत, बळकट करण्याची ती एक संधी मी मानली. लोकांवरील, लोकशाहीवरील श्रद्धेच्या बळावर राष्ट्रनिष्ठा, समूहनिष्ठा, मानवतेवरील निष्ठा जीवननिष्ठेपासून अलग होऊ दिल्या नाहीत. एरवी हे जीवन निर्माल्य बनले असते.

व्यक्तिगत आणि राष्ट्राच्या, पक्षाच्या कठीण प्रसंगातही काँग्रेस पक्षाच्या बाजूला प्रमुख प्रवाहापासून, लोकगंगेपासून मी बाजूला झालो नाही. याचा अर्थ कुणी संधी-साधू असाही केला असेल. करोत बापडे! परंतु एकाकी व्यक्ती कसलाच विकास करू शकत नाही. स्वतःचाही आणि लोकांचा, राष्ट्राचाही नाही. लोकशाहीच्या वर्तुळात एकदा स्वतःला झोकून दिल्यानंतर त्या वर्तुळापासून आपण निराळे होऊ शकत नाही, राहू शकत नाही. तसे झाले, तर स्वत्वच नष्ट पावते.

स्वातंत्र्याचे, लोकशाहीचे होमकुंड, यज्ञकुंड देशात धगधगल्यानंतर त्यांतलाच एक निखारा म्हणून मी राहिलो, तो संधी म्हणून नव्हे, यज्ञकुंड धगधगत राहावे, यासाठी राहिलो. 'संधीसाधू' हा शब्दही त्या काळात माझ्या पिढीच्या आसपास वावरत नव्हता. निखारा बनून राहण्याचे आमच्या पिढीने स्वीकारले, ते संधी म्हणून नव्हे, कर्तव्य म्हणून. संधीसाधूपणाने यज्ञकुंडातून बाहेर पडतो, तो एकटा निखारा धगधगता राहू शकत नाही. त्याची राख होते. राख होऊ द्यावयाची, ती संकुचित भावनांची, क्षुद्रतेची. आमच्या पिढीने ती पूर्वीच केली. संघटनेच्या, समूहाच्या महान यज्ञात सातत्याने जळत राहून आपले आणि राष्ट्राचे जीवन तेजस्वी बनविण्याचे, उन्नत करावयाचे, हाच ध्यास

राहिला.

जीवन सश्रद्ध बनल्यामुळेच हा निर्णय आणि कृती मी सावधतेने करू शकलो. राजकारणप्रधान राष्ट्रप्रपंच (Politics) करताना 'सावध' असावेच लागते. हे 'सावध' पण सर्वांविषयी ठेवावे लागते. जोडीला साक्षेप, अत्यंत साक्षेपही ठेवावा लागतो. राजकारणी असणे वेगळे आणि साक्षेपी राजकारणी असणे वेगळे, असा माझा अनुभव आहे. राजकारणी जीवनाचा हा एक शोध म्हणावा, हवे तर.

'जीवनाचा अर्थ' शोधण्यात वर्षामागून वर्षे गेली. पण हा शोध 'मी कोण?' या आशयाचा, अध्यात्माचा शोध नव्हता. तो शोध घेणाऱ्यांची मनःस्थितीच वेगळी असते. त्यांचा शोध पूर्ण होतो, तेव्हा ते स्वतःचे असे राहत नाहीत, असा बोध त्यांच्या सिद्धावस्थेच्या वागण्यातून, कृतिशीलतेतून, उपदेशातून आणि एकूण चरित्रातून आपल्याला होतो. अशी काही निवडक चरित्रे मी वाचली आहेत.

'मी कोण?' हा विषय अंतर्मुख बनून विचार आणि निर्णय करण्याचा विषय आहे. व्यवहारी जगाच्या वर्तुळापासून पूर्णतः वेगळा 'मी कोण?' याचा त्या भूमिकेतून, अंतर्मुख बनून मी विचार करू शकलो नाही. त्यासाठी अवसर मिळाला नाही. तरी पण त्या मांडवाखालून मी गेलो आहे.

लहानपणी कराडच्या एका मठात मी कथा, प्रवचन, भजन, कीर्तन, पुराण, सप्ताह ऐकले. आईबरोबर मठात जाणे, ऐकणे घडले. परंतु मी राजकारणप्रधान राष्ट्रप्रपंच करणारा माणूस - तो विषय कवटाळून बसू शकलो नाही.

पण त्याची मनाला खंत नाही. मी जीवनाचा शोध केला, पण तो वेगळा. त्यातून बोध झाला, तो एवढाच की, 'बुद्धिनिष्ठा, नीतिनिष्ठा, ध्येयनिष्ठा, देशनिष्ठा आणि या सर्वांना ओलांडून जाणारी मातृनिष्ठा हे जीवनाचं पंचामृत आहे.'

कसेही चाखावे, एकत्रितपणे किंवा अलग-अलग, अनुभूती एकच- समाधान!

# ८१... सातव्या मजल्यावरील चढ

६० ते ६२ ही दोन वर्षं उलटली, तेव्हा महाराष्ट्राच्या भवितव्याची मोठी सफर सुरू झाली होती. ती सफर लांबची होती, कष्टाची होती. जनप्रेमाच्या शक्तीनंच महाराष्ट्र स्थिर करायचा होता. भाग्य घराशी आलं होतं. भाग्यवान बनायचं होतं.

त्याची आखणी करण्यात मन गुंतलं होतं. महाराष्ट्र घडविण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र हे मी साधन मानलं होतं. प्रमुख प्रश्न होता विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचा भाग यांची मनं एक होण्याचा! चांगलुपणाची भावना वाढण्यासाठी जातिवादाचा निरास करायचा होता. दलित समाजाविषयीची उपेक्षा सोडण्यासाठी मनं तयार करायची होती. महाराष्ट्रात राजकीय जागृती चांगलीच निर्माण झालेली होती. पण या जागृतीला अखिल भारतीय, राष्ट्रीय दृष्टिकोन प्राप्त होणं महत्त्वाचं होतं. कारखानदारी व शेती वाढवायची, शहरं आणि खेडी यांतील अंतर कमी करायचं, शिक्षणाचा प्रसार आणि पुनर्रचना करायची, असं कितीतरी मनात जमा होत राहिलं होतं. हे व्हायचं, तर कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सर्वांचं सहकार्य हवं होतं. स्थिती होती, ती अशी, की महाराष्ट्रात काँग्रेसविरूद्ध सर्व पक्ष एकत्र आले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वादातून हे पर्व सुरू झालं होतं. तरीपण जनतेची भावना मला विकृत किंवा उपेक्षणीय कधीच वाटली नाही. लोकांच्यावर माझा विश्वास होता. मला त्यांचाच आधार वाटत होता आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर लोकप्रेमाचं दर्शनही मला तंस घडलं. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळचा अनुभव माझ्या संग्रही होताच आणि महाराष्ट्रातील जनतेचं मनोहारी दर्शन मी नंतर घेत होतो. अगोदर सुख, की अगोदर दुःख, हा वाद निरर्थक आहे, असं मला नेहमीच वाटतं. निसर्गाचे खेळ निसर्गनियमानंच चालणार. वाटचाल करायची, ते सारं गृहीत धरूनच! महाराष्ट्राची ती वाटचाल सुरू झाली होती. घोडदौडीनं या काळात महाराष्ट्र पुढे आणि पुढेच जात राहिला.

त्याच वेळी भारताच्या उत्तर सीमेवर चीनचं आक्रमण झालं आणि एक

नवाच पेच उभा राहिला. १९६२ चा ऑक्टोबर महिन्यात चीनचं सैन्य भारी शक्तीनं चालून आलं होतं आणि भारताच्या स्वातंत्र्यालाच एक प्रकारचं आव्हान दिलं गेल होतं. शत्रू पुढं सरकत होता आणि भारताचं सैन्य मागे रेटत होता. अशा त्या आणीबाणीच्या आणि देशात हाहाकार उडालेल्या काळात पंतप्रधान पं. नेहरू यांनी संरक्षण खातं स्वतःकडे घेतलं होतं. देशात उलटसुलट चर्चा झडत होत्या. संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन यांच्या संदर्भात काही बोललं जात होतं आणि सारा देश या आक्रमणानं चिंतातुर बनवला होता. महाराष्ट्र विकासाची स्वप्नं आम्ही इकडे पाहत होतो. सुखाचं बोट धरून चालण्याच्या प्रयत्नात होतो. पण माझी संकटांची सोबत संपलेली नव्हती आणि एक दिवस भारताच्या संरक्षण खात्याची सूत्रं स्वीकारण्याची - संरक्षणमंत्रिपद स्वीकारण्याची आज्ञा आली. पंतप्रधान पं.नेहरू यांनी आपला मनोदय व्यक्त केला होता. मला ती आकांक्षा होती. त्यानुसार २१ नोव्हेंबर, १९६२ ला मी दिल्लीत दाखल झालो आणि नव्या जबाबदारीचा स्वीकार केला.

चीननं आक्रमण ६२ मधेच आवरलं होतं. पण त्यातून संरक्षणसिद्धतेची फार मोठी समस्या उभी राहिली होती. सेनादलाचे तिन्ही विभाग जय्यत करण्याच्या प्रयत्नात असतानाच मनावर फार मोठा आघात करणारी घटना घडली. हा आघात साऱ्या भारतावरच होता, पं. नेहरू निघून गेले. त्यातून सावरलो जातो, न जातो, तोच पाकिस्तानचं ६५ सालचं आक्रमण झालं. एक मोठं संकट पश्चिमेच्या बाजूनं पुढे सरकलं. पण जवान होते जिद्दीचे. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जिद्दीचे. 'कम व्हॉट मे' - त्यांनी पुकारा केला. जवानांपर्यंत हा पुकारा पोचला. मात्र, त्यांनी मारलेल्या मुसंडीनं शत्रूनं पळ काढला. पाकिस्तानच्या भूमीतच आमच्या जवानांनी आपल्या राष्ट्रध्वजाला मग वदंन केलं. या विजयाची चर्चा सुरू होती. उलटसुलट अर्थ लावले जात होते. सरकारला काही सांगितलं जात होतं. त्याच वेळी 'ताश्कंद' घडलं आणि या ताश्कंदनं 'गड आला; पण सिंह गेला' अशी अवस्था निर्माण केली.

पंतप्रधान शास्त्री सोडून गेले. संकटाच्या डोंगरावरील चढउतार संपला नव्हता. शास्त्रीजी गेले आणि पंतप्रधान कोण होणार, हा वाद वाढला. इंदिराजी, की मोरारजी, असा तो वाद होता. बरीच भवति न भवति झाली आणि एक दिवस 'पंतप्रधान इंदिराजी' हे देशाला आणि जगाला कळलं. देशाची गाडी नीट रूळांवरनं चालली, असं वाटलं. पण नियतीच्या मनात दुसरंच काही तरी होतं. ६६ च्या नोव्हेंबरात एक दिवस साधू मंडळींनी गोहत्या - बंदीसाठी

उठाव केला आणि दिल्ली उद्ध्वस्त करण्याचा घाट घातला. त्या वेळी मी मुंबईत होतो. माझ्यावर एक शस्त्रक्रिया झाली होती आणि प्रकृती सुधारण्याची वाट पाहत होतो.

अचानक एक दिवस दिल्लीचा फोन खणखणला. ७ नोव्हेंबर हा तो दिवस असावा. मी गृहमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारावी, अशी दिल्लीची इच्छा होती, सांगी होती. विचार करायलाही फुरसत नव्हती. साधू मंडळींनी दिल्ली डोक्यावर घेतली होती आणि कणखरपणे इलाज हवा होता. प्रकृतीच्या त्या अवस्थेतही मला दिल्ली गाठावी लागली आणि १४ नोव्हेंबरपासून गृहमंत्रिपदाचं काम सुरू केलंही. कामाच्या पहिल्याच आठवड्यात, मला आठवतं, विद्यार्थ्यांच्या अखिल भारतीय उठावाला काबूत आणण्याचा प्रश्न निर्माण झाला. गोहत्या - बंदी आणि साधू हा प्रश्न तयारच होता. एकामागून एक अशी संकटांची रस्सीखेच सुरू असतानाच ६७ च्या निवडणुका आल्या आणि देशाचं सारं चित्रच बदललं. काँग्रेस पक्षाला काही राज्यांत हादरा बसला. लोकसभेत अस्थिरता वाढली आणि सर्व देशातच कायदा आणि सुव्यवस्था हा प्रश्न डोकं वर काढीत राहिला.

सामान्य माणसाचं सुख हेच लोकशाही राज्याचं अंतिम ध्येय! हे ध्येय साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम यशस्वी करण्याची गरज देशात तीव्रतेनं निर्माण झाली होती आणि काँग्रेसला सर्व शक्ती पणास लावायला हवी होती. तसा प्रयत्न प्रत्यक्षात सुरू होताच काँग्रेसअंतर्गत स्फोटाचे आवाज निघू लागले आणि त्यांतून १९६९ चा बंगलोरचा इतिहास घडला. काँग्रेसचा महासागर घुसळला जात होता. त्यातून काय काय वर येईल, याकडे साऱ्या देशाचं, जगाचं लक्ष लागून राहिलं होतं. ठोकळेबाज आणि सैद्धान्तिक भूमिका दूर ठेवून, देशासमोरील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काँग्रेसचा नव्या वाटांचा शोध सुरू होता आणि वाटा अडविण्यासाठी मोठमोठे मोहरे इरेला पडत होते. ६९ चं बंगलोर आणि त्यानंतर सुरू झालेलं पर्व हा सारा ताजा इतिहास आहे. 'बांगला देशचं स्वातंत्र्य' देशाच्या अलीकडील इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेली पानं आहेत. या साऱ्याच घटनांचा शोध आणि बोध घ्यावा लागणार आहे. इतिहासकारांनी पुढेमागे ते काम करावं. हा इतिहास अजून पुरा झालेला नाही. तो घडतो आहे.

१९४६ पासून इथे, तिथे असा कुठेतरी मी सत्तेत राहिलो आहे. लौकिक अर्थानं प्रतिष्ठा, वैभव, मानाची जागा हे वाट्यास आलं. तरीपण गैरसमज,

टीका, मानसिक यातना अशा काटेरी मुलखातून सतत प्रवास करावा लागला. लढ्याच्या काळातले मित्र सच्चे राहिले, तर सत्तेच्या काळातले काही नकली निघाले, सत्तेच्या राजकारणातच ते मित्र म्हणून जवळ आले. माझी त्याबद्दल तक्रार नाही. कारण हा राजकारणाचा स्वभावही असेल, पण आनंद आहे, की या साऱ्या संघर्षातही तर्कशुद्ध विचारांचा पाठपुरावा, विषमतेला विरोध व समतेचा विचार यांची संगत कधी सुटली नाही. सत्ता ही ध्येयाकरता वापरायची, हे एक, आणि निर्णय अत्यंत निर्धारानं करावेत, पण अंमलबजावणी मानवी सहानभूतीनं करावी, त्यात सत्तेचा आवेश असू नये, असं माझं तत्त्वज्ञान आहे.

आत्ताचा काळ, तसं पाहिलं, तर एका अर्थानं अतिशय उत्पाताचा काळ आहे. लोकांच्या आकांक्षा वाढल्या आहेत. जाणिवा निर्माण झाल्या आहेत. नव्या जाणिवा निर्माण होत आहेत. नवी पिढी संपूर्ण वेगळ्या पार्श्वभूमीवर वाढली आहे. या परिस्थितीची, प्रेरणाची जाणीव असणारं नेतृत्व देशात आहे, ही आशेची गोष्ट आहे. याच आत्मविश्वासानं आणि आशेनं आंतरराष्ट्रीय व आर्थिक क्षेत्रांतील उत्पाताच्या स्थितीच्या या काळात हजारो वर्षं संकटाला तोंड देऊन उभा राहिलेला भारत स्वतंत्र मार्ग काढील, असा विश्वास वाटतो. उत्पातांतून मार्ग काढण्यासाठी अनेकांची जीवनं त्या तऱ्हेनं गेली आहेत. यापुढेही जातील. शेवटी व्यक्ती महत्त्वाची नाही, समाजजीवन, त्याला प्रेरणा देणारं ध्येय, विचार हे महत्त्वाचं असतं.

मला आठवतं, ३२ साली मी जेव्हा तुरूंगात होतो, त्या वेळी 'स्वातंत्र्य कशासाठी?' या विचारानं आम्हां तरूणांना घेरलं होतं. आम्ही आमच्या जीवनाची व्याख्या त्या वेळी बनवीत होतो आणि आदर्श जीवन ते - ज्यात मानवतेबद्दलचा जिव्हाळा आहे - असं आमचं उत्तर तयार झालं होतं. विचाराची बैठक जमली होती. त्यामुळेच अडचणीत आलो, त्या त्या वेळी थोर व्यक्ती, साधी माणसं, त्यांचे रागलोभ हे घडत राहूनही विचाराची, प्रेरणेची संगत असल्यानं त्यातून बाहेरही पडलो, जीवनात अनेक चढउतार झाले, तुफानं आली, शांतताही निर्माण झाली, सत्तेच्या राजकारणात संघर्ष उफाळले, संशय पसरले.

मी सत्तेवर नव्हतो, तेव्हा आणि आज आहे, तरीही तत्त्वज्ञानाशी मी प्रामाणिक राहिलो आहे. कॉँग्रेस पक्षाचं बोट धरून माझा राजकीय जीवनाचा गेल्या तीस-चाळीस वर्षांचा प्रवास झाला आणि कॉँग्रेस हेच माझं जीवन बनलं.

पक्षाच्या आणि व्यक्तीच्या जीवनात मतभेदाचे प्रसंग अनेकदा निर्माण होतात. काँग्रेस पक्षात ते आजवर अनेकदा झाले. तरीपण काँग्रेसचा गंगौघ पुढेच जात राहिला. या गंगौघात मी स्वतःला तरूण वयातच झोकून दिलेलं आहे. ते या प्रवाहाबरोबर सतत आणि सातत्यानं राह्यचं, या प्रतिज्ञेनंच! या गंगौघात खळबळ माजली, त्या प्रत्येक वेळी काठावरील लोक माझ्या निर्णयाकडे बघत राहिले, हे मला माहीत आहे. पण त्यांची प्रत्येक वेळेला निराशा झाली असली पाहिजे. अगदी बत्तीस-चौतीस सालातील समाजवादी पक्षाच्या स्थापनेपासून तो बावन्न सालातील शेतकरी, कामगार पक्षाच्या स्थापनेच्या वेळीही ! आणि अलीकडे काँग्रेसमध्ये फूट पडली, त्या वेळीही! देशापुढील आव्हानं ही राज्यकर्त्या पक्षासमोरील आव्हानं असतात. त्यांच्याशी मुकाबला करताना मतभेदाच्या ठिणग्या उघडतातही. पण खरी कसोटीची वेळ तेव्हाच निर्माण होते. दादाभाई नौरोजींपासून आजच्या काँग्रेसकडे पाहत राहिलं, तर तिच्यात कितीतरी परिवर्तन घडलं आहे. यांतली काही परिवर्तनं माझ्या समोरची आहेत. पण एखाद्या पक्षाची दखल घेताना एका प्रश्नाकडे, कुठल्या एका समस्येकडे किंवा कुठल्या एका कार्याकडे पाहून चालत नाही. सर्व प्रकारची समग्रतेनं शहानिशा करावी लागते. अशी शहानिशा मी अनेकदा केली आहे आणि जीवनाचं तत्त्वज्ञान निश्चित केलं आहे.

पण आज मनाला शांतता आहे. समाधान आहे. सत्तेत असलो, किंवा सत्तेच्या बाहेर असलो, तरी माझी वैचारिक संगत कधी सुटणारी नाही. जीवनाची लढाई संपलेली आहे, असं नव्हे. अंतापर्यंत ती चालू राहणार आहे. त्यासाठीच जीवन समर्पित आहे. कोणी रागावतात, कोणी रूसतात. आज तसे असतीलही. पण आपल्याबरोबर कुणी आहे - नाही - सत्तेवर आहे - नाही - हा भाग मला दुय्यम वाटतो. समाधान आहे कामाचं; ज्यांच्यासाठी काम करायचं आणि स्वातंत्र्य मिळविण्याचा ध्यास धरला, त्या कामाचं ! या कामात अनेकांचं सहकार्य मिळालं, त्या सर्वांच्याबद्दल मनात कृतज्ञता आहे. मागे वळून पाहताना असं दिसतं, की कोणाबद्दल मनात असूया नाही, राग नाही. आहे, ते समाधान. केलेल्या कामाचं-कराव्या लागणाऱ्या कामाचं! सातव्या मजल्याचा चढ त्यासाठीच चढतो आहे, सहा दशकं मागे टाकून सत्तरीकडे निघालेला मी, मागे वळून पाहतो, तेव्हा विचाराची संगत, ज्ञान ही माझी जीवनाची प्रेरणा आहे आणि सामान्य दलिताबद्दलचा जिव्हाळा हा माझा साथी आहे. हेच माझं समाधान, आजचं-उद्याचं.

